
महाराष्ट्र व गोवे शिलालेख-ताम्रपटांची वर्णनात्मक संदर्भ सूची

शांताराम भालचंद्र देव



सत्यमेव जयते

महाराष्ट्र व गोवे
शिलालेख-ताम्रपटांची वर्णनात्मक
संदर्भ सूची

★

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर–४१६ ००३ यांच्याद्वारे मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशने, महाराष्ट्र राज्य, मुंबई–४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

१९८४

किंमत रुपये २५-०० (रु. २५-००)

निवेदन

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या वतीने डॉ. शां. भा. देव यांनी भाषांतरित व संपादित केलेल्या "महाराष्ट्र व गोवे / शिलालेख–ताम्रपटांची वर्णनात्मक संदर्भ सूची" या ग्रंथाचे प्रकाशन करण्यास मंडळास आनंद होत आहे.

मुंबई
दि. २७ ऑक्टोबर, १९८२,
विजयादशमी,
आश्विन शु. १०, शके १९०४.

सुरेंद्र बारलिंगे,
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.

ऋणनिर्देश

नागपूर विद्यापीठात प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृती या विषयाचा प्राध्यापक म्हणून काम करीत असतांना, विद्यापीठ अनुदान मंडळाने भारतातील विविध प्रदेशातील प्रकाशित शिलालेख–ताम्रपटांची सूची तयार करण्याचा प्रकल्प योजला. त्यानुसार महाराष्ट्र आणि गोवे या विभागातील पुराभिलेखांची सूची करण्याचे काम माझ्याकडे आले. ही सूची मूळ इंग्रजीमध्ये होती व ती अद्यापही प्रसिद्ध झाली नाही, केव्हा होईल ते सांगता येत नाही.

महाराष्ट्र आणि गोव्याशी संबंधित असल्याने ही सूची मराठीत भाषांतरित करावी असे मला वाटले. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने ही सूची छापण्याचे मान्य केल्याबद्दल मी मंडळाचा व मंडळाचे अध्यक्ष प्रा. सुरेंद्र बारलिंगे यांचा ऋणी आहे.

या सूचीतील त्रुटींची मला पूर्ण जाणीव आहे. सर्वसाधारणपणे १९७० पर्यंत प्रकाशित झालेल्या व उपलब्ध असलेल्या साधनांतून हे पुराभिलेख संग्रहित केले आहेत. दरवर्षी अनेक पुराभिलेख प्रसिद्ध होत असल्याने, ही सूची अनेकांना अपुरी वाटेल. हे काम पुढेही चालू रहावे अशा स्वरुपाचे आहे.

या कामात अनंत अडचणी आल्या. गेली १०–१२ वर्षे हस्तलिखित पडून होते. इतर कामामुळे मला त्यात सुधारणा करता आल्या नाहीत, ते अद्यावत करता आले नाही. बऱ्याच जुन्या साधनात प्रकाशित इंग्रजी लेखनात गावांची वा व्यक्तींची नावें उच्चारणसंकेतासह दिलेली नाहीत, तालुके–जिल्हे बदलले आहेत, काळ-निश्चितीबद्दल मतभेद आहेत, निश्चित शब्दरचनेबद्दल एकमत नाही आणि जुनी प्रकाशित साधने उपलब्ध नाहीत. या सर्व त्रुटी लक्षात घेऊन ही सूची तयार केली आहे. लेण्यातील लेखात ते लेख नेमके कोणत्या लेण्यात कुठे आहेत याची माहिती जुन्या याद्यात नाही. लेण्यांचे क्रमांकही बदलले गेले आहेत. तसेच सारांशात किती माहिती द्यायची याला मर्यादा घालावी लागली.

या कामात अनेकांची मदत झाली, अनेक ग्रंथालयांनी सहकार्य केले. नागपूरचे श्री. जी. एस. दीक्षित व डॉ. मालती महाजन आणि पुण्याचे डॉ. वासंती जोशी,

डॉ. सुनीति दुबळे, डॉ. गौरी लाड, डॉ. शोभना गोखले, डॉ. मंगलम्, डॉ. अरविंद जामखेडकर आणि डॉ. गो. बं. देगलूरकर यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

१९७० नंतरचे लेख व या सर्वावरील विस्तृत राजकीय, सामाजिक, आर्थिक व धार्मिक दृष्टिकोनातून केलेले विश्लेषण दुसऱ्या खंडात करण्याचा मानस आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ व शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर, यांचे ऋण शब्दातीत आहे. मुद्रणाच्या प्रक्रियेस विलंब लागला त्याची जबाबदारी माझी आहे. सूचीतील त्रुटी माझ्या, गुणवत्ता असेल तर ती पूर्वसूरींची याची संपूर्ण जाणीव मला आहे.

पुणे

शांताराम भालचंद्र देव

संक्षेप सूची

अ. टे.––याजदानी, जी., अजंटा टेक्स्ट, लंडन, १९३०–१९५५.

अ. भा. रि. इं.––अनल्स् ऑफ दि भाण्डारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिटयूट, पुणे.

अ. स. रि.––आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, ॲन्युअल रिपोर्टस्, कलकत्ता.

अ. स. वे. इं.––आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ वेस्टर्न इंडिया, वाराणसी.

ॲ. रि. इं. ए.––ॲन्युअल रिपोर्ट ऑन इंडियन एपिग्राफी.

ॲ. रि. म्है. अ. डि.––ॲन्युअल रिपोर्ट ऑफ दि म्हैसूर आर्किऑलॉजिकल डिपार्टमेंट, मैसूर.

इ. आय्.––एपिग्राफिया इंडिका, दिल्ली.

इं. अ. रि.––इंडियन आर्किऑलॉजी ए रिव्हयू, न्यू दिल्ली.

इं. ॲ./आय. ए.––इंडियन ॲन्टिक्वरी, मुंबई.

इं. के. टे. वे. इं.––इन्स्क्रिप्शन्स् फ्रॉम दि केव्ह टेम्पल्स् ऑफ वेस्टर्न इंडिया (बुल्हर व इंद्रजी), मुंबई, १८८१.

इं. नॉ. क. को.––इन्स्क्रिप्शन्स् इन नॉर्थर्न कर्नाटक ॲण्ड दि कोल्हापूर स्टेट (के. जी. कुंदनगर), कोल्हापूर, १९३९.

इं. स. इं.––इण्डेक्स ऑफ साउथ इंडियन इन्स्क्रिप्शन्स्, मद्रास.

इं. सी. पी. ॲण्ड बी.––इन्स्क्रिप्शन्स् इन सेंट्रल प्रॉव्हिन्सेस ॲंड बेरार (हिरालाल), नागपूर १९३२.

इं. हि. क्वॉ.––इंडियन हिस्टॉरिकल क्वार्टर्ली, कलकत्ता.

ए. आय्./ए. इं.––एन्शन्ट इंडिया, बुलेटिन ऑफ दि आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, न्यू दिल्ली.

ए. आर. जी.––आर्किऑलॉजिकल रिपोर्ट, गोवा, पणजी.

कर्नाटक इन्स्.––कर्नाटक इन्स्क्रिप्शन्स्, धारवाड.

कॉ. इं. इं.––कॉर्पस इन्स्क्रिप्शनम इंडिकॅरम, उटकमंड.

ज. बि. रि. सो.––जर्नल ऑफ दि बिहार रिसर्च सोसायटी.

ज. बं. ए. सो.––जर्नल ऑफ दि बेंगाल एशिॲटिक सोसायटी, कलकत्ता.

ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.––जर्नल ऑफ दि बॉम्बे ब्रँच ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी, मुंबई.

ज. बॉ. हि. सो.––जर्नल ऑफ दि बॉम्बे हिस्टॉरिकल सोसायटी, मुंबई.

ज. रॉ. ए. सो.––जर्नल ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी, लंडन.

द. म. इ. सा.––दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने, (भारत-इतिहास-संशोधक मंडळ), पुणे.

ना. वि. प.––नागपूर विद्यापीठ पत्रिका, नागपूर.

न्यू. इं. ए.––न्यू इंडियन ॲन्टिक्वरी, मुंबई.

प्रा. म. को. ले.––प्राचीन मराठी कोरीव लेख, (शं. गो. तुळपुळे), पुणे, १९६३.

प्रो. अ. स. वे. स.––प्रोसीडिंग्ज ऑफ दि आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ वेस्टर्न सर्कल, (आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया), मुंबई.

प्रो. इं. हि. कॉ.––प्रोसीडिंग्ज ऑफ दि इंडियन हिस्टरी कांग्रेस.

प्रो. ट्रा. ई. ओ. कॉ.—प्रोसीडिंग्ज अँण्ड ट्रॅन्झॅक्शन्स् ऑफ दि ऑल इंडिया ओरिएन्टल कॉन्फरन्स्.
प्रो. रि. अ. स. वे. स.—प्रोग्रेस रिपोर्ट ऑफ दि अर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, वेस्टर्न सर्कल.
बु. डे. कॉ. रि. इं.—बुलेटिन ऑफ दि डेक्कन कॉलेज पोस्ट-ग्रॅज्यूएट अँण्ड रिसर्च इन्स्टिटयूट, पुणे.
बु. स्कू. ओ. अ. स्ट.—बुलेटिन ऑफ दि स्कूल ऑफ ओरिएन्टल अँण्ड अफ्रिकन स्टडीज, लंडन.
बॉ. गॅ.—बॉम्बे गॅझेटियर, मुंबई.
भा. सं. इ.—भारतीय संस्कृती आणि इतिहास, मुंबई.
भा. इ. सं. मं.—भारत इतिहास संशोधन मंडळ त्रैमासिक, पुणे.
म. प्र. ता. शि.—महाराष्ट्रातील काही प्राचीन ताम्रपट व शिलालेख, पुणे १९४७.
म. य. जु.—मराठवाडा युनिव्हर्सिटी जर्नल, औरंगाबाद.
म. सं. प.—मराठी संशोधन पत्रिका (मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय), मुंबई.
लि. अँ. रि. इन् बॉ. प्रे.—लिस्ट्स् ऑफ अँन्टिक्वेरियन रिमेन्स् इन बॉम्बे प्रेसिडेन्सी, मुंबई.
लि. अँ. रि. सी. पी. अँण्ड बी.—लिस्ट ऑफ अँन्टिक्वेरियन रिमेन्स् इन सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँण्ड बेरार (हिरालाल).
वा. नृ. का.—वाकाटक नृपति व त्यांचा काळ (मिराशी, वा. वि.), नागपूर १९५७.
वा. रा. त. अ.—वाकाटक राजवंशका इतिहास तथा अभिलेख. (मिराशी, वा. वि., हिन्दी भाषांतर, शास्त्री, अ. मि.) वाराणसी १९६४.
वा. वि. सं. मं.—विदर्भ संशोधन मंडळ, वार्षिक, नागपूर.
सं. मु.—संशोधन मुक्तावलि (मिराशी, वा. वि.), विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर.
स्ट. इं.—स्टडीज इन इण्डॉलॉजी (मिराशी, वा. वि.), नागपूर.

१. अक्कलकोट शिलालेख, शिलाहार इंदरस

जिल्हा—**सोलापूर** तालुका—**अक्कलकोट**

प्राप्तिस्थळ.—हा लेख अक्कलकोट येथील जुन्या महालातील नजरबाग या भागात एका शिळेवर कोरलेला मिळाला.

संदर्भ.—(१) देसाई, पी. बी., **इ. आय्.**, १९४७–४८, खंड २७, पृ. ६५–७४; (२) पंचमुखी, आर. एस., **कर्नाटक इन्स.**, १९५१–५२, खंड २, नं. १२, पृ. ३८–४८.

भाषा व लिपी.—इ. स. १२ व्या शतकातील कन्नड लिपी; प्रार्थनात्मक व शापात्मक श्लोकांशिवाय सर्व लेखाची भाषा कन्नड आहे; श्लोक संस्कृतमध्ये आहेत.

राजवंश व राजा.—या लेखात चालुक्य व यादव (देवगिरी) या राजवंशांची नावे आली असून या वंशांच्या अनुक्रमे त्रिभुवनमल्लदेव (विक्रमादित्य ६ वा) व सिंघणदेव या राजांची नावे आली आहेत.

वर्ष व तिथी.—**चालुक्य**-विक्रम संवत ३९, जय संवत्सर, पुष्यबहुल १२, उत्तरायण संक्रमण, व्यतिपात; शुक्रवार, डिसेंबर २५, इ. स. १११४. **यादव**-सिंघणदेव राज्यवर्ष १२ वे, प्रमोदात्रि संवत्सर, श्रावण, बहुल ११, सोमवार, व्यतिपात संक्रमण; सोमवार, ऑगस्ट १६, इ. स. १२१०.

सारांश.—या लेखाचा उद्देश महामंडलेश्वर इंदरस याने इतर अधिकाऱ्यांसह चिट्टयन करंजिगे येथील देवालयासाठी जमीन व इतर देणग्या दिल्या, हे नमूद करण्याचा आहे.

या लेखामध्ये दोन भाग आहेत. पहिला भाग जयंतीपूर येथे राज्य करणाऱ्या चालुक्यवंशीय त्रिभुवनमल्लदेव (विक्रमादित्य ६ वा) याच्या अमदानीतला असून त्यात शिलाहार घराण्यातील व जीमूतवाहनाच्या वंशातील त्रिभुवनमल्लदेवाचा मांडलिक महामंडलेश्वर इंदरस याचा उल्लेख आहे. इंदरस याने कुमार तैलपदेव याची दाई माता भोगिअब्बरसी, दंडनायक प्रभुकेसरी नायक व त्याचा पुत्र नंबरस यांच्यासह, आणनदूरु ३०० विषयांतील अंकुलगे ५० या विभागातील चिट्टयन करंजिगे येथील १०० मत्तर जमीन मंदिराला दान दिल्याचा उल्लेख आहे. या दानाचा उपयोग करंजिगे येथील सिद्धगज्जेश्वरदेवाच्या मंदिरात अखंड दीप लावण्यासाठी, दुरुस्त्या करण्यासाठी, नैवेद्य अर्पण व मूर्ती सजविणे इत्यादींसाठी करण्यात यावा, असे सांगितले आहे. दान घेणारा श्री ज्ञानसिद्धदेव हा त्या मंदिराचा आचार्य होता. त्याला अन्नछत्र चालविणे आवडत असे (अन्नदान-विनोद). प्रभुकेसरी नायक याने याच मंदिराला मूर्तीच्या अभिषेक प्रसंगी १० मत्तर जमीन दिल्याचा उल्लेख या लेखात आहे. महापसायित मंडलिक काटियण यानेही ५० मत्तर जमीन या मंदिराला दान दिली होती. या लेखात पुढे महामंडलेश्वर इंदरस याची वंशावळ दिलेली आहे.

या लेखाच्या दुसऱ्या भागात यादव नारायण प्रतापचक्रवर्ती सिंघणदेव याच्या कारकीर्दीत वर दिलेल्या तारखेस ५० मत्तर जमीन वर उल्लेखिलेल्या मंदिराच्या उपयोगासाठी सिंघणदेव रणधवळमय्य याने दान दिल्याचे नमूद करण्यात आलेले आहे.

व्यक्तिनामे.—(१) त्रिभुवनमल्लदेव—चालुक्य नृपती; (२) सिंघणदेव—यादव नृपती; (३) इंदरस—शिलाहार महामंडलेश्वर, दान देणारा; (४) भोगिअब्बरसी—दान देणारी, कुमार तैलपदेव याची दाई; (५) कुमार तैलपदेव—शिलाहार राजपुत्र; (६) प्रभुकेसरी नायक—गजांकुश घराण्यातील दंडनायक, दान देणारा; (७) जीमूतवाहन—शिलाहार घराण्याचा मूळ पुरुष; (८) पिट्टम—शिलाहार नृपती; (९) अज्ज (अज्जिग)—शिलाहार पिट्टम याचा पुत्र; (१०) नागार्जुन—शिलाहार राजपुत्र, अज्ज याचा पुत्र; (११) इन्द—नागार्जुनाचा पुत्र

शिलाहार राजपुत्र; (१२) कविलास—इन्द याचा ज्येष्ठ पुत्र; (१३) कंच—इन्द याचा पुत्र; (१४) बव्वस—कविलासाचा पुत्र; (१५) रक्कस—बव्वसाचा पुत्र; (१६) इन्द (द्वितीय)—रक्कसाचा पुत्र; (१७) सोवण—इन्द (द्वितीय) चा पुत्र; (१८) पिट्टम (द्वितीय)— सोवणाचा पुत्र; (१९) कविलास (द्वितीय)—सोवणाचा पुत्र; (२०) धनसंग्रह—कविलास (द्वितीय) चा पुत्र; (२१) अज्ज (द्वितीय)—धनसंग्रहाचा पुत्र; (२२) कविलास (तृतीय)—अज्ज (द्वितीय) चा पुत्र; (२३) डांक—कविलास (तृतीय) चा पुत्र; (२४) कविलास (चतुर्थ)—डांक याचा पुत्र; (२५) चंदलदेवी—कविलास (चतुर्थ) याची पत्नी, इंदरस याची माता; (२६) अंबरस—दान देणारा, प्रभुकेसरी नायक याचा पुत्र; (२७) ज्ञानसिद्धदेव—दान स्वीकारणारा आचार्य; (२८) काटियण—दान देणारा महापसायित मंडलिक;

ग्रामनामे.—(१) आणनदूरु—उस्मानाबाद जिल्ह्यात अक्कलकोटच्या उत्तरेस २० मैलावर असलेले हल्लीचे तालुक्याचे ठिकाण आणदुरु; (२) अंकुलगे—आधुनिक अक्कलकोट; (३) बिट्टेयन करंजिगे—अक्कलकोट संस्थानच्या नैर्ऋत्य भागात असलेले करजगी असावे.

२. अक्कलकोट शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख अक्कलकोट येथील जुन्या राजवाड्यात पडलेल्या एका शिळेवर मिळाला.

संदर्भ.—पंचमुखी, आर्. एस्., **कर्नाटक इन्स्**., १९५१–५२, खण्ड २, नं. ३२, पृ. ११९–१२०

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—हा लेख यादव नृपती सिंघणदेव याच्या राज्यकालातील असून त्याचा मांडलिक महाप्रधान मगरमुरारि संगमदेवनायक याचाही या लेखात उल्लेख आहे.

वर्ष व तिथी.—सिंघणदेव राज्यवर्ष ५ वे, रक्ताक्षि संवत्सर, कार्तिक वद्य अष्टमी, मंगळवार नोव्हेंबर १६, इ. स. १२०४.

सारांश.—या लेखाचा उद्देश महाप्रधान संगमदेवनायक याची पत्नी मायीदेवी हिचा भाऊ सोयीदेवनायक याने हिरियक्कप्परस, इंदियरनायक व इंदय यांच्यासह धूप-दीप-नैवेद्य यासाठी व चैत्र व पवित्र हे उत्सव साजरे करण्यासाठी सामंतन दुधुनिगे येथील मल्लिकार्जुनदेवाच्या मंदिराला जमीन व बगीचा दान दिला, हे नमूद करण्याचा आहे.

व्यक्तिनामे.—(१) मुरारी संगमदेवनायक—सिंघणदेवाचा महाप्रधान; (२) सिंघणदेव—यादव नृपति; (३) मायीदेवी—संगमदेवनायकाची पत्नी; (४) सोयीदेवनायक—दान देणारा मायीदेवीचा भाऊ; (५) हिरियक्कप्परस—दान देणारी व्यक्ती; (६) इंदियरनायक—दान देणारी व्यक्ती; (७) इंदय—दान देणारी व्यक्ती.

ग्रामनामे.—सामंतन–धुदुनिगे–आधुनिक सातनदुधनी, अक्कलकोट संस्थान.

३. अक्कलकोट शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख अक्कलकोट येथील जुन्या राजवाड्यात पडलेल्या शिळेवर मिळाला.

संदर्भ.—पंचमुखी, आर्. एस्., **कर्नाटक इन्स्**., १९५१–५२, खंड २, नं. ३३, पृ. १२०–१२२.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—यादव नृपती सिंघणदेव.

वर्ष व तिथी.—सिंघणदेव राज्यवर्ष ११ वे, प्रमोदूत, आषाढ वद्य अमावास्या, सोमवार, व्यतिपात व संक्रमण. प्रमोदूत संवत्सराचे वर्णन बरोबर वाटत नाही, कारण दुसऱ्या वर्षीच्या प्रजापती संवत्सरातील

(शक ११३३) सोमवार, जुलै ११, इ. स. १२११ शी हे वर्णन जुळते आहे. परंतु इ. स. १२११ मध्ये संक्रमण सोमवार, जून २६, या दिवशी आले होते.

सारांश.—या लेखाचा उद्देश यादव नृपती सिंघणदेव याचा मांडलिक महामण्डलेश्वर मन्नेय कुप्परस याने त्याचे सहकारी मल्लगौड, चंदगांवुड, आणि इतर यांच्यासह ५० मत्तर जमीन सोमेश्वर मंदिरासाठी ब्रह्मपुरी येथील ब्राह्मणांना दान दिली हे नमूद करण्याचा होता. या लेखात पुढे याच मंदिराला आठ मत्तर जमीन व सोने देणगी म्हणून मिळाल्याचा उल्लेख आहे.

व्यक्तिनामे—(१) सिंघणदेव—यादव नृपती; (२) कुप्परस—दान देणारा महामण्डलेश्वर; (३) मल्लगौड—दान देणारा महामण्डलेश्वराचा सहकारी; (४) चंदगांवुड—दान देणारा महामण्डलेश्वराचा सहकारी.

ग्रामनामे.—(१) कावुटगे—ओळख पटत नाही; (२) ब्रह्मपुरी—ओळख पटत नाही.

४. अक्कलकोट शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख अक्कलकोट येथील जुन्या राजवाड्यात एका शिळेवर मिळाला.

संदर्भ.—पंचमुखी, आर. एस., **कर्नाटक इन्स.**, १९५१–५२, खंड २, नं. ३४, पृ. १२२–१२५.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—यादव नृपती सिंघणदेव.

वर्ष व तिथी.—सिंघणदेव राज्यवर्ष ११ वे, (भाव), भाद्रपद व. अमावासे सोमवार.... ग्रहण. तिथी निश्चित समजत नाही; कारण या वर्षी सूर्यग्रहण अश्विन वद्य ३० = रविवार, ऑक्टोबर ५, इ. स. १२१४ या दिवशी होते.

सारांश.—या लेखाचा उद्देश महामण्डलेश्वर कप्परस याने दोन गावुड आणि हिट्टूचे आठ प्रतिनिधी यांच्यासह दक्षिणेकडील वाराणसी म्हणून प्रसिद्ध असलेल्या हिल्ली येथील पिशाचमोचन कूडल श्रीस्वयंभू संगमेश्वर मंदिराला अंकुलगे ८० मधील खेडे चिक्ककावुटगी हे दान दिले हे नमूद करण्याचा होता. हे दान देवर ब्रह्मपुरी येथील ब्राह्मणांनी मूलिग-पंच-काणिके आणि होळे-होन्नु यासह स्वीकारले.

व्यक्तिनामे.—(१) सिंघणदेव—यादव नृपती; (२) मगरमुरारी संगमदेवनायक—महाप्रधान; (३) कप्परस—महामंडलेश्वर.

ग्रामनामे.—(१) चिक्ककावुटगी; (२) हिल्ली; (३) अंकुलगे ८०; (४) देवर-ब्रह्मपुरी; (५) मूलिग-पंच-काणिके; (६) होळे-होन्नू; अंकुलगे म्हणजे आधुनिक अक्कलकोट असावे. बाकीच्या गावांची ओळख पटत नाही.

५. अक्कलकोट शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख अक्कलकोट येथील जुन्या राजवाड्यात असलेल्या एका तुटक्या शिळेवर मिळाला.

संदर्भ.—पंचमुखी, आर. एस., **कर्नाटक इन्स.**, १९५१–५२, खंड २, नं. ३९, पृ. १३७–१३९.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—यादव नृपती कंधरदेव याच्या कारकीर्दीतील हा लेख आहे.

वर्ष व तिथी.—शक वर्ष ११७७, राक्षस संवत्, सु. पुर्नमे, (चंद्रग्रहण) द्वितीय; शक ११७७ मध्ये दोन वेळा चंद्रग्रहण आले होते. एक श्रावण महिन्यात मंगळवार, जुलै २०, इ.स. १२५५ या दिवशी व दुसरे माघ महिन्यात गुरुवार, जानेवारी १३, इ.स. १२५६ या दिवशी. लेखात आलेले ग्रहण बहुधा दुसरे असावे.

सारांश.—हा लेख तुटक असल्यामुळे त्याचा सुसंगत अर्थ लावता येत नाही. लेखात वर्णिलेला यादव नृपती कंधरदेव, त्याची राजधानी द्वारावतीपूर येथून राज्य करीत होता.

व्यक्तिनामे.—कंधरदेव—यादव नृपती.

ग्रामनामे.—द्वारावतीपूर—ओळख पटत नाही.

६. अक्कलकोट शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख अक्कलकोट येथील जुन्या राजवाड्यात असलेल्या पश्चिमाभिमुख शिळेवर मिळाला.

संदर्भ.—पंचमुखी, आर. एस., **कर्नाटक इन्स.**, खंड २, नं. १६, पृ. ६२–७१.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—हा लेख चालुक्य नृपती त्रिभुवनमल्लदेव याच्या कारकीर्दीतील आहे.

वर्ष व तिथी.—चालुक्य विक्रम संवत् ४८, सोभकृत, अश्वयुज, शु. ७, रविवार, व्यतिपात विषु-संक्रमण = रविवार, सप्टेंबर १०, इ. स. ११२२. परंतु ही तिथी विक्रम संवत् ४६ याच्याशी जुळते. चालुक्य संवत् ४८ हे इ. स. ११२४ मध्ये येते. याबद्दल सुसंगत माहिती उपलब्ध नाही.

सारांश.—हा लेख जयंतीपूर येथून राज्य करणाऱ्या चालुक्य नृपती त्रिभुवनमल्लदेव याच्या अंमलातील आहे. या लेखात त्याचा मांडलिक महामंडलेश्वर इंदरस याचा आणंदूरु ३०० जिल्ह्यांतील अंकुलगे येथील मन्नेय म्हणून उल्लेख आलेला आहे. इंदरस हा शिलाहार घराण्यातील जीमूतवाहनाच्या वंशातील असून विजयपूर शहराचा स्वामी होता. त्याच्यावर चामुंडिकादेवीचा वरदहस्त होता. या लेखाचा उद्देश पूर्वी त्रिभुवनमल्लदेवाने मल्लेश्वर मंदिराला सिन्नीखेडा येथील दान दिलेला भाग सोडून बाकीची सर्व जमीन ब्राह्मणांच्या कल्याणार्थ आणि हडपवळ दंडनायक माधवभट्ट याने दैठाण येथे बांधलेल्या कंदर्पेश्वर व केशवदेव यांच्या मंदिरांसाठी इंदरस याने दान दिली हे नमूद करण्याचा होता. याशिवाय इतर व्यक्तींनी याच मंदिरांना दिलेल्या दानाचा या लेखात उल्लेख आलेला आहे. दानाचा उपयोग कोणत्या कार्यासाठी करावा हे या लेखात विस्तृतपणे दिलेले आहे. हा लेख ईश्वर-भक्त नरसिंगदेव याने लिहिलेला आहे.

व्यक्तिनामे.—(१) त्रिभुवनमल्लदेव—चालुक्य नृपती; (२) इंदरस—शिलाहार महा-मंडलेश्वर; (३) माधवभट्ट—हडपवळ दंडनायक मदिराज; (४) दाकरस—शिलाहार इंदरसाचा पुत्र; (५) कविलासरस—शिलाहार घराण्यातील व्यक्ती; (६) मल्लिदेवरस—शिलाहार घराण्यातील व्यक्ती; (७) अज्जरस—शिलाहार घराण्यातील व्यक्ती; (८) कुप्पदेवरस—शिलाहार घराण्यातील व्यक्ती; (९) राजरस—शिलाहार घराण्यातील कुप्पदेवरस याचा पिता(?); (१०) इंदरस (द्वितीय)—दाकरसाचा पुत्र; (११) दासियणभट्ट—कौशिक गोत्री ब्राह्मण माधवभट्ट ऊर्फ मादिराज याचा पितामह; (१२) कंदर्पभट्ट—दासियणभट्टाचा पुत्र माधवभट्ट ऊर्फ मादिराज याचा पिता; (१३) नरसिंगदेव—लेख लिहिणारा ईश्वरभक्त; (१४) मसणोज—दान स्वीकारणारी व्यक्ती.

ग्रामनामे.—(१) विजयपूर—आधुनिक विजापूर; (२) सिन्नीखेड—ओळख पटलेली नाही; (३) दैठाण—ओळख पटत नाही; (४) अंकुलगेनाडु; (५) आणंदूरु ३००; (६) असतिगोल्ल; (७) जयंतीपूर—ओळख पटत नाही.

विशेष महत्त्व.—या लेखात विविध कार्यांकरिता दिलेल्या दानाची माहिती सविस्तर दिली असून तत्कालीन मापे व नाणी यांचा उल्लेख आलेला आहे.

७. अक्कलकोट शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख अक्कलकोट येथील जुन्या राजवाड्याच्या कुंपणाला टेकून असलेल्या शिळेवर मिळाला.

संदर्भ.—पंचमुखी, आर्. एस्., **कर्नाटक इन्स्.**, १९५१–५२, खंड २, नं. २८, पृ. १०४–१०६.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—हा लेख कलचुर्य भुजबल चक्रवर्ती निस्संकमल्ल संकमदेव याच्या कारकीर्दीतील आहे.

वर्ष व तिथी.—शक संवत् ११०२, विकारी, श्रावण वद्य पंचमी, आदिवार, व्यतिपात संक्रमण; सोमवार, ऑगस्ट ११, इ. स. ११८०. परंतु इ. स. ११८० मध्ये सिंह संक्रमण रविवार, जुलै २७ ला आले होते. त्यामुळे लेखात उल्लेखिलेल्या आठवड्यातील दिवस व संक्रमण सुसंगत वाटत नाही.

सारांश.—या लेखाचा उद्देश चालुक्य नृपती चक्रवर्ती त्रिभुवनमल्लदेव याच्या कारकीर्दीत जेऊरगे अग्रहार व ब्रह्मपुरी येथील महाजनांनी सोवरस व गोज्जीयक्का यांचा पुत्र बीचय्य याला विकलेली जमीन त्याने अन्नछत्राला दान दिली हे नमूद करण्याचा होता. दान दिलेल्या जमिनीच्या उत्पन्नाचा किती भाग कोणत्या कार्यासाठी खर्च करावयाचा याचे वर्णन या लेखाच्या १४ ते २० या ओळीत आलेले आहे.

व्यक्तिनामे.—(१) निस्संकमल्ल संकमदेव—कलचुर्य नृपती; (२) त्रिभुवनमल्लदेव—चालुक्य नृपती; (३) बीचय्य—दान देणारा; (४) सोवरस—बीचय्य याचा पिता; (५) गोज्जीयक्का—बीचय्य याची माता.

ग्रामनामे.—(१) जेऊरगे—ओळख पटत नाही; (२) ब्रह्मपुरी—ओळख पटत नाही.

विशेष महत्त्व.—या लेखात उल्लेखिलेला चालुक्य नृपती म्हणजे कलचुर्य नृपतींनी ज्याच्या राज्याचा काही भाग जिंकून घेतला होता तो चक्रवर्ती त्रिभुवनमल्ल वीरसोमेश्वर (चौथा) असावा किंवा आपल्या विजयासाठी व दानधर्मासाठी प्रसिद्ध असलेला व चालुक्य चक्रवर्ती ही पदवी धारण करणारा विक्रमादित्य (सहावा) असावा.

८. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. २

जिल्हा—औरंगाबाद तालुका—सोयगाव (सिल्लोड)

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. २ मधील व्हरांड्याच्या डाव्या बाजूला असलेल्या मागच्या भिंतीवर चित्रित केलेल्या वेताच्या स्टुलावर आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ८१; (२) बर्जेस, **इं. अॅ.**, १९०३, खंड ३२, पृ. ३२६–३२८, नं. ८; (३) याजदानी, जी. व अॅलन, जे., **अ. टे.**, १९३३, खंड २, पृ. ५८, नं. १.

भाषा व लिपी.—संस्कृत; अक्षरांचे वळण इ. स. ६ व्या शतकातील.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अक्षरांच्या वळणाच्या आधारे इ. स. चे सुमारे ६ वे शतक.

सारांश.—या लेखात 'क्षांतिवादि' (सोशिकतेचा उपदेश करणारा) हा एकच शब्द आहे. अ‍ॅलनने याला खालील पुस्ती जोडलेली आहे. क्षांतिवादि (पालि-खंतिवादि) हा शब्द क्षांतिवादिन् = सोशिकतेचा उपदेश करणारा, या शब्दाशी मिळताजुळता आहे किंवा समानार्थी आहे. लेखाजवळच्या चित्रात या जातकातील राजाच्या पत्नीला उपदेश करणाऱ्या साधूचे चित्रण केले आहे. साधूच्या विरुद्ध दिशेला अजूनही राजपत्न्यांचे अस्तित्व दर्शविणाऱ्या खुणा दिसतात.

९. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. २

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. २ मध्ये रुद्राक्षमाला परिधान केलेल्या स्त्रीच्या मूर्तीच्या खालच्या बाजूला आहे. या आकृतीच्या विरुद्ध बाजूला एक मनुष्याकृती व राजा असून त्यांच्यामध्ये स्त्रीची आकृती आहे. त्याची एक पत्नी, हात जोडून राजाला दयाळू होण्याची विनंती करीत आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ८१–८२, नं. ५; (२) बर्जेस इं. अ‍ॅ., १९०३, खंड ३२, पृ. ३२६–३२८, नं. ८; (३) याजदानी, जी. व अ‍ॅलन जे., अ. टे., खंड २ पृ. ६०–६१, नं. ३.

भाषा व लिपी.—संस्कृत; तत्कालीन ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—रंगीत चित्रे व अक्षरांच्या वळणाच्या आधारे इ. स. चे ६ वे–७ वे शतक.

सारांश.—लेख त्रोटक आहे. ल्युडर्स यांनी क्षांतिजातकातील ५६ नंबरच्या श्लोकाची या शिलालेखाच्या वाचनाशी मिळवणी केलेली आहे. या लेखाचे भाषांतर पुढीलप्रमाणे होऊ शकेल: "त्याच्या अंगभूत शांत व दयाळू स्वभावामुळे त्या सद्वर्तनी पुरुषाच्या मनाला दुःखाचा स्पर्श झाला नाही. त्याचे स्वतःचे अवयव तोडले जात असतानासुद्धा त्याच्या सहनशक्तीला तडा गेला नाही. परंतु राजाचे अधःपतन झालेले पाहून मात्र त्याचे मन दुःखाने भरून आले".

विशेष महत्त्व.—अ‍ॅलनच्या मते या लेखाजवळ असलेल्या चित्रात राणीच्या प्रार्थनेकडे दुर्लक्ष करून क्रुद्ध राजाने एकएक अवयव तोडण्याची दिलेली शिक्षा भोगत असलेला साधू चित्रित केलेला आहे.

१०. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. २

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. २ मधील उजव्या बाजूच्या भिंतीवर काढलेल्या गायीच्या पाठीवर रंगवला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ८२, नं. ६; (२) बर्जेस, इं. अ‍ॅ. १९०३, खंड ३२, पृ. ३२६–३२८, नं. ६; (३) याजदानी, जी. व अ‍ॅलन, जे., अ. टे. १९३३, खंड २, पृ. ६१, नं. ४.

भाषा व लिपी.—प्राकृत; तत्कालीन ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—इ. स. सुमारे ६ वे–७ वे शतक.

सारांश.—या लेखात आलेला 'सरसुति' हा शब्द 'सरस्वती' (विद्येची देवता) या शब्दाचे प्राकृत रूप असावे.

व्यक्तिनामे.—सरसुति—सरस्वती.

११. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. २

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. २ मधील विहाराच्या उजव्या बाजूला चित्रित केलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ८२, नं. ८; (२) बर्जेस इं. अँ. १९०३, खंड ३२, पृ. ३२६–३२८, नं. ८; (३) याजदानी, जी. व अॅलन, जे., अ. टे., १९३३, खंड २, पृ. ६२, नं. ५.

भाषा व लिपी.—संस्कृत; तत्कालीन ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—इ. स. सुमारे ६ वे–७ वे शतक.

सारांश.—हा लेख आता वाचन करता येण्यासारख्या स्थितीत नाही. परंतु ल्युडर्स यांनी श्री. इंद्रजी यांच्या उताऱ्याच्या आधारे या लेखाची मिळवणी आर्यशूराच्या मैत्रीबल जातकातील ४४ नंबरच्या श्लोकाशी केली आहे. (कर्न प्रत, पृ. ४८). वाचन केलेल्या लेखाचे भाषांतर असे–"आणि दान देण्यामुळे होणाऱ्या आनंदाच्या अनुभवामुळे त्याच्या मनाला, अवयव तोडल्यामुळे होणाऱ्या दुःखाची जाणीव झाली नाही व त्याचे मन दुःखापासून सतत दूर राहिले".

विशेष महत्त्व.—या लेखावरून असे दिसते की या जवळच्या चित्रात कच्च्या, ताज्या व गरम रक्ताने भरलेल्या अशा नरमांसाची आवड असणाऱ्या यक्षाची इच्छा पुरविण्यासाठी, आपल्या पाच शिरा कापून रक्त देणाऱ्या मैत्रीबलाला चित्रित केले आहे.

१२. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. २

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. २ मधील लहान मंदिराच्या डाव्या बाजूला, मागच्या भिंतीवर असलेल्या बुद्धमूर्तीच्या कमलासनावर चित्रित केलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ८०, नं. १; (२) बर्जेस, इं. अँ., १९०३, खंड ३२, पृ. ३२६–३२८, (१); (३) याजदानी, जी. व अॅलन, जे., अ. टे. १९३३, खंड २, पृ. ६४, नं. ९.

भाषा व लिपी.—संस्कृत; चित्राच्या समकालीन ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—इ. स. सुमारे ६ वे–७ वे शतक.

सारांश.—या लेखात शाक्य भिक्षु आदरणीय बुधगुप्त याने दिलेली देणगी नमूद केली आहे.

व्यक्तिनामे.—बुधगुप्त–शाक्य भिक्षु.

१३. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. २

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. २ मध्ये दरवाजाच्या उजव्या बाजूस आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ८०, नं. २; (२) बर्जेस, इं. अँ. १९०३, खंड ३२, पृ. ३२६–३२८; (३) याजदानी, जी. व अॅलन, जे., अ. टे., १९३३, खंड २, पृ. ६४, नं. ११.

भाषा व लिपी.—संस्कृत; चित्रांच्या समकालीन ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—इ. स. सुमारे ६ वे–७ वे शतक.

सारांश.—खराब झालेल्या या लेखाचे भाषांतर असे– "शाक्य भक्ताने दिलेली पुण्यकारक देणगी". या लेखाच्या पुढील ओळीच्या खुणा दिसतात परंतु त्यावरून सुसंगत असा अर्थ काढता येत नाही.

१४. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. २

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. २ मध्ये एका बसलेल्या मूर्तीच्या आसनाखाली असलेल्या हिरव्या रंगाच्या पट्टयावर आढळतो.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ८१, नं. ४; (२) बर्जेस, इं. ॲं., १९०३, खंड ३२, पृ. ३२६–३२८; (३) याजदानी, जी., व ॲलन, जे., अ. टे. १९३३, खंड २ पृ. ५९–६०, नं. २.

भाषा व लिपी.—सस्कृत; चित्रांच्या समकालीन ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—लेखातील मजकूर सुसंगत नाही. लेख दोन ओळींचा दिसतो. लेख आता पूर्णपणे झिजला असून त्याचे दोन भागात विभाजन झालेले दिसते. ल्युडर्स यांनी या लेखाची आर्यशूराच्या जातकमालेतील नं. २८, पृ. १८१–१९२ (कर्न प्रत, हॉवर्ड संपादित ओरिएण्टल सीरिज, खंड १) क्षांतिजातकातील तीन श्लोकांशी मिळवणी केली आहे. त्याचे भाषांतर असे–"ज्या ठिकाणी सद्गुणांनी युक्त असलेल्या शुद्धाचरणी व्यक्ती रहातात ते ठिकाण फारच पवित्र व सुंदर असते. ते पवित्र यात्रास्थान (तीर्थ) व साधूंचे आश्रयस्थान असते."

१५. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. २

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. २ मधील बसलेल्या मूर्तीजवळ असलेल्या मंदिराच्या उजव्या भिंतीवर चित्रित केलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ८२, नं. ७; (२) याजदानी, जी., व ॲलन, जे., अ. टे., १९३३, खंड २, पृ. ६२–६३, नं. ६.

भाषा व लिपी.—संस्कृत, चित्रांच्या समकालीन ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—यातील फक्त "चैत्रीबलोर्की राजा" अथवा चैत्रीबलीर्क राजा हा शब्द विशेष आहे. हा शब्द मैत्रीबल जातकाचा नायक मैत्रीबल राजा या शब्दाच्याऐवजी चुकून पडला आहे असे ल्युडर्सचे मत ॲलनने प्रतिपादन केले आहे.

विशेष महत्त्व.—या शिलालेखाजवळील मूर्ती राजाची आहे.

१६. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. २

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. २ मधील आतील बाजूच्या दक्षिणेकडील व्हरांड्यात, मंदिराच्या दरवाजावर असलेल्या चार बुद्धमूर्तींच्या वर आहे.

संदर्भ.—याजदानी, जी. व ॲलन, जे., **अ. टे.**, १९३३, खंड २, पृ. ६३, नं. ७.

भाषा व लिपी.—प्रचलित कानडी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—ॲलनने या लेखाचे वाचन केलेले नाही.

विशेष महत्त्व.—संपादकांच्या मते हा लेख आधुनिक असावा.

१७. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. २

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. २ च्या आतल्या बाजूला असलेल्या व्हरांड्याच्या मागच्या भिंतीवर असलेल्या बुद्धमूर्तीच्या कमलासनावर चित्रित केलेला दिसतो.

संदर्भ.—याजदानी, जी. व ॲलन, जे., अ. टे., १९३३, खंड २, पृ. ६३, नं. ८.

भाषा व लिपी.—उल्लेख नाही.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—जरी येथे लेख असल्याच्या खुणा दिसत असल्या तरी त्यावरून सुसंगत वाचन करता येत नाही.

१८. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. २

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. २ मधील अंतरालाच्या मागील भिंतीवर असलेल्या बुद्धमूर्तीच्या कमलासनावर आहे.

संदर्भ.—याजदानी, जी. व ॲलन, जे., **अ. टे.**, १९३३, खंड २, पृ. ६४, नं. १०.

भाषा व लिपी.—निश्चित सांगता येत नाही.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—माहीत नाही.

सारांश.—या लेखात दोन ओळी दिसतात व काही अक्षरांच्या खुणा दिसतात.

१९. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. ४

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. ४ मध्ये असलेल्या मंदिरातील बुद्धमूर्तीच्या बैठकीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—सरकार, डी. सी., इ. आय्., १९५९–६०, खंड ३३, पृ. २५९–२६२.

भाषा व लिपी.—संस्कृत; अक्षरांचे वळण अजंठा शैलगृह क्र. १६ मधील वाकाटक राजा हरिषेण याच्या लेखाच्या अक्षराप्रमाणे आहे.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—संपादकाच्या मते हा लेख अंदाजे इ. स. च्या ६ व्या शतकाच्या प्रथमार्धातील आहे.

सारांश.—या लेखाचा उद्देश, अजंठा येथील लेण्याच्या—शैलगृह क्र. ४—स्वामीने ज्या मूर्तीच्या बैठकीवर हा लेख कोरलेला आहे ती मूर्ती देणगी दिल्याचे नमूद करण्याचा आहे. कार्वटीय गोत्रीय अभयनंदिन् (अभयनंदिन्) व स्कंदवसु यांच्या माथुर नामक पुत्राने ही मूर्ती दानधर्मात दिली होती.

व्यक्तिनामे.—(१) अभ्यनंदिन्—कार्वतीय गोत्राची व्यक्ति; (२) स्कंदवासु; (३) माथुर—दान देणारा, क्र. १ चा पुत्र.

विशेष महत्त्व.—या लेखामुळे अजंठा येथील या शैलगृहाच्या वादात्मक कालावर प्रकाश पडतो.

२०. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. ४

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. ४ मधील बुद्धमूर्तीच्या पायाखाली कोरलेला आहे.

संदर्भ.—इं. अ. रि., १९५७–५८, पृ. ५६, नं. १४.

भाषा व लिपी.—संस्कृत ; इ. स. ६ व्या शतकातील वळणाची पेटिकाशीर्षक लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख दान स्वरूपाचा आहे.

२१. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. ६

प्राप्तिस्थळ.—अजंठा शैलगृह क्र. ६ च्या पहिल्या खोलीच्या उजव्या बाजूला असलेल्या व्हरांड्यात हा लेख चित्रित केलेला आहे.

संदर्भ.—याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खण्ड ३, पृ. ८८.

भाषा व लिपी.—संस्कृत; अक्षरांचे वळण इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—इ. स. सुमारे ५ वे–६ वे शतक.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे–शाक्य भिक्षु तरणकीर्तन याने दिलेली ही पुण्यकारक देणगी आहे. ह्यामुळे मिळणारे पुण्य सर्व सजीव व्यक्तिमात्रांना सर्वोच्च ज्ञान मिळवण्यासाठी उपयोगी पडो.

व्यक्तिनामे.—तरणकीर्तन–शाक्य भिक्षु.

विशेष महत्त्व.—हा लेख बर्जेसच्या नजरेतून सुटला आहे. हा लेख छिन्नविछिन्न झालेल्या मूर्तीच्याखाली आहे. लेखाच्या डाव्या बाजूला उजवा गुडघा वाकलेली, उजवा हात उंच केलेली व डाव्या हातात काही वस्तू धरलेली मनुष्याकृती आहे. कदाचित ज्या भिक्षूने हे चित्र दान केले त्याची ही आकृती असावी.

२२. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. ९

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. ९ च्या आतल्या बाजूच्या दरवाजाजवळ, बुद्ध-मूर्तीच्या डोक्याजवळ (बर्जेस यांच्या मते ही भिक्षुमूर्ती आहे) असलेल्या समोरच्या भिंतीवर चित्रित केलेला आहे.

संदर्भ.–(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ८२, नं. ९; (२) बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं., १८८३, खण्ड ४, पृ. १३६, नं. १; (३) याजदानी व चक्रवर्ती, एन्. पी., अ. टे., खण्ड ३, पृ. ८५ व ८८, नं. १.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. ५ वे–६ वे शतक.

सारांश.—ही शाक्यभिक्षु संघप्रिय याने दिलेली पुण्यकारक देणगी आहे. हा लेख त्रोटक आहे.

व्यक्तिनामे.—संघप्रिय-शाक्यभिक्षू.

२३. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. ९

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. ९ च्या डांव्या बाजूला असलेल्या दालनातील पहिल्या स्तंभावरील बुद्धमूर्तीच्या खाली आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ८३, नं. १०; (२) बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं., १८८३, खण्ड ४, पृ. १३६, नं. २; (३) याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खण्ड ३, पृ. ८९, नं. २.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. ५ वे–६ वे शतक.

सारांश.—ही जसदेव (यशोदेव) या भक्ताची पुण्यकारक देणगी आहे.

व्यक्तिनामे.—जसदेव (यशोदेव)–उपासक.

२४. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. ९

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. ९ मधील बुद्धमूर्तीच्या छत्रावर असलेल्या खांबावर आहे.

संदर्भ.—याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खण्ड ३, पृ. ८९, नं. ३.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. चे ५ वे किंवा ६ वे शतक.

सारांश.—शाक्य भिक्षु ······याने दिलेली पुण्यकारक देणगी.

२५. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. ९

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. ९ मधील उभ्या बुद्धमूर्तीच्या खाली असलेल्या कमळाच्या पाकळयांवर आहे.

संदर्भ.—याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खण्ड ३, पृ. ८९, नं. ४.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. चे ५ वे–६ वे शतक.

सारांश.—या लेखातील मजकूर असा–देयधर्म्मोयं शाक्यभिक्षो·············· बर्जेसने या लेखाचे वाचन केलेले नाही, पण हा लेख पांढऱ्या रंगात लिहिलेला असून स्पष्ट वाचता येतो.

२६. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. ९

प्राप्तिस्थळ.—अजंठा शैलगृह क्र. ९ मध्ये डाव्या बाजूला असलेल्या चौथ्या खांबावर हा लेख चित्रित केला आहे.

संदर्भ.—याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खण्ड ३, पृ. ८९, नं. ५.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. ५ वे–६ वे शतक.

सारांश.—ही पुण्यकारक देणगी, शाक्य भिक्षु आदरणीय आचार्य······सेन······· याने दिलेली आहे.

या लेखाचे वाचन बर्जेसने केलेले नाही.

२७. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. ९

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. ९ मधील छताच्या डाव्या बाजूला असलेल्या आठव्या खांबावर आहे.

संदर्भ.—याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खण्ड ३, पृ. ८९, नं. ६.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. ५ वे–६ वे शतक.

सारांश.—लेख तुटक असून बर्जेसने वाचलेला नाही.

२८. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. ९

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. ९ मधील नवव्या खांबावर डाव्या बाजूला बुद्धमूर्तीच्या खाली चित्रित केलेला आहे.

संदर्भ.—बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं., १८८३, खण्ड ४, पृ. १३७, नं. ५.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. ५ वे–६ वे शतक.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे—'शाक्य भिक्षु भद्रसेन याने दिलेली ही पुण्यकारक देणगी आहे'.

व्यक्तिनामे.— भद्रसेन–शाक्य भिक्षू.

२९. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. ९

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. ९ च्या मागच्या भिंतीवर चैत्याकृतीच्या खाली चित्रित केलेला आहे.

संदर्भ.—(१) बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं., १८८३, खण्ड ४, पृ. १३७, नं. ४; (२) याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खण्ड ३, पृ. ८९, नं. ८.

भाषा व लिपी.— बर्जेसच्या मते पाली किंवा अशुद्ध संस्कृत; चक्रवर्तींच्या मते अशुद्ध संस्कृत; इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी. अक्षरे या शैलगृहात आढळणाऱ्या इतर लेखांपेक्षा मोठी आहेत.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. ५ वे–६ वे शतक.

सारांश.—हा लेख अपूर्ण आहे.

३०. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. ९

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. ९ मधील उजव्या बाजूच्या तिसऱ्या खांबावर आहे.

संदर्भ.—याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खण्ड ३, पृ. ९०, नं. ११.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. ५ वे–६ वे शतक.

सारांश.—लेखातील मजकूर असा–'देयधर्मोयं शाक्यभिक्षो'. या लेखाचे वाचन बर्जेसने केलेले नाही.

३१. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. ९

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. ९ मधील बसलेली बुद्धमूर्ती असलेल्या खांबाच्या अधोभागावर कोरलेला आहे.

संदर्भ.—बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं., १८८३, खण्ड ४, पृ. १३७, नं. ३; (२) याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., १९५५, खण्ड ४, पृ. १०, नं. १२.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे—'आदरणीय धर्मसेन याची पुण्यकारक देणगी.'

व्यक्तिनामे.—धर्मसेन–दात्याचे नाव.

३२. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. ९

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. ९ मधील नवव्या खांबावर, उभ्या बुद्धमूर्तीच्या खाली, उजव्या बाजूला आहे.

संदर्भ.—याजदानी व चक्रवर्ती अ. टे., खण्ड ३, पृ. ९०, नं. १०.

भाषा व लिपी.—निश्चित सांगता येत नाही.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—वाचन झालेले नाही.

३३. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. ९

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. ९ मधील उजव्या बाजूच्या नवव्या खांबाजवळ असलेल्या, मागच्या बाजूच्या पहिल्या खांबावर आहे.

संदर्भ.—याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खण्ड ३, पृ. ९०, नं. ९.

भाषा व लिपी.—स्पष्ट उल्लेख नाही.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

सारांश.—लेख त्रोटक आहे, आणि फक्त काही अक्षरेच दिसतात. वाचन केलेले नाही

३४. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. १०

प्राप्तिस्थळ.—अजंठा शैलगृह क्र. १० मधील डाव्या बाजूच्या भिंतीवर हा लेख आहे.

संदर्भ.—(१) भाऊ दाजी, जे. बी. बी. आर्. ए. एस्., १८६५, खंड ७, पृ. ६३; (२) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., नं. १, पृ. ६७; (३) बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं., १८८३, खंड ४, पृ. ११६, नं. १; (४) फँक, झेड्. डी. एम्. जी., १८९६, खंड १०, पृ. ५९७.

भाषा व लिपी.—प्राकृत; अक्षरांचे वळण फार पूर्वीपासून पश्चिम भारतातील शैलगृहातील लेखांमध्ये आढळते त्याप्रमाणे.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—लिपीच्या आधारे हा लेख इ. स. पूर्व दुसऱ्या शतकाच्या प्रथमार्धातील असावा असे वाटते.

सारांश.––हा लेख असा–"वासिठीपुतस कटहादिनो घरमुख दान." वासिष्ठीपुत्राने शैलगृहाच्या दर्शनी भागाचे व जाळीचे दान दिले.

व्यक्तिनामे.––वासिठीपुत (वासिष्ठीपुत्र) दात्याचे नाव.

३५. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. १०

प्राप्तिस्थळ.––अजंठा शैलगृह क्र. १० मधील तिसऱ्या स्तंभाच्या विरुद्ध दिशेला असलेल्या डाव्या भिंतीवर हा लेख आहे.

संदर्भ.––(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., नं. १९ पृ. ८४; (२) बर्जेस व बुल्हर, अ. स. वे.इं., १८८३, खंड ४, पृ. १३७, नं. ६; (३) याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खंड ३, नं. १, प. ९०–९१.

भाषा व लिपी.––प्राकृत.

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––उल्लेख नाही.

सारांश.––या लेखाचा अर्थ बरोबर लागत नसला तरी तो बुद्धाला अनुलक्षून आहे असे वाटते. पाली भाषेत 'पुवदेव' या शब्दाचा अर्थ प्राचीन देवता असा होतो. हा शब्द असुरांसंबंधी वापरताना अनेकवचनी असतो. हा लेख नवसात्मक (Votive) स्वरूपाचा नाही. या लेखाचा उद्देश चित्रातील दृश्याचे, जे कदाचित बुद्धाच्या जीवनातील प्रसंग असतील त्यांचे, स्पष्टीकरण करण्याचा आहे. लेख त्रोटक आहे. "भगवस यतिपुवदे (व)· · · ·तयतिपतिस यस· · · ·".

३६. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. १०

प्राप्तिस्थळ.––हा लेख अजंठा शैलगृह क्र. १० मधील डाव्या बाजूच्या १० व्या खांबावर बुद्धमूर्तीच्या वर असलेल्या छत्रीवर आहे.

संदर्भ.––(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ८५, नं. २१; (२) बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं., १८८३, खंड ४, पृ. १३७, नं. १२; (३) याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खंड ३, पृ. ९२, नं. ७.

भाषा व लिपी.––संस्कृत; इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––अंदाजे इ. स. ५ वे–६ वे शतक.

सारांश.––या लेखाचे भाषांतर असे–"शाक्य भिक्षु संघगुप्त याने दिलेली ही पुण्यकारक देणगी आहे."

व्यक्तिनामे.––संघगुप्त–शाक्य भिक्षु.

३७. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. १०

प्राप्तिस्थळ.––हा लेख अजंठा शैलगृह क्र. १० मधील १७ व्या खांबावर डाव्या बाजूला, बसलेल्या बुद्धमूर्तीच्या खाली आहे.

संदर्भ.––(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ८६, नं. २, २४; (२) याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खंड ३, पृ. ९२, नं. ८.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. चे ५ वे–६ वे शतक.

सारांश.—या लेखाच्या पहिल्या दोन ओळी तुटक आहेत. त्यामध्ये बुद्धमूर्ती तयार करण्यामुळे मिळणाऱ्या पुण्याचे वा गुणांचे वर्णन केले आहे. शेवटच्या ओळीत शाक्य भिक्षू बुद्धसेन याने ही देणगी दिल्याचा उल्लेख आहे. असाच श्लोक शैलगृह क्र. २२ मध्येही आढळतो.

व्यक्तिनामे.—बुद्धसेन–शाक्य भिक्षू.

३८. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. १०

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १० मधील अठराव्या खांबावर, बुद्धमूर्तीच्या खालच्या बाजूला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ८६, नं. २४ (शेवटचा परिच्छेद, ओळ पहिली); (२) याजदानी व चक्रवर्ती, अ. टे. खंड ३, पृ. ९२, नं. ९.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—इ. स. चे अंदाजे ५ वे–६ वे शतक.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे–"आदरणीय गुरु बुद्धसोम याने दिलेली ही पुण्यकारक देणगी आहे." हा लेख तुटक असून बर्जेस व इंद्रजी यांनी याचे वाचन केलेले नाही.

व्यक्तिनामे.—बुद्धसोम–दान देणारा आदरणीय गुरु.

३९. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. १०

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १० मधील १२ व्या खांबावर उजव्या बाजूला छत्रीच्या वर आहे.

संदर्भ.—याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खंड ३, पृ. ९२, नं. १०.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. ५ वे–६ वे शतक.

सारांश.—हा लेख झिजला असल्यामुळे नीट वाचता येत नाही. बहुधा बुद्धसोम याची देणगी.

४०. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. १०

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १० मधील १२ व्या खांबावर उजव्या बाजूला बुद्धमूर्तीच्या पायाजवळ आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ८६, नं. २३; (२) याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खंड ३, पृ. ९२–९३, नं. ११.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. चे ५ वे–६ वे शतक.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे–"आदरणीय शाक्य भिक्षू केशव याने माता, पिता व सर्वांच्या कल्याणाकरिता दिलेली ही पुण्यकारक देणगी आहे."

व्यक्तिनामे.—केशव–शाक्य भिक्षू.

४१. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. १०

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १० मधील १० व्या खांबावर उजव्या बाजूला बुद्धमूर्तीच्या पायापाशी आहे.

संदर्भ.—याजदानी व चक्रवर्ती, **अ. टे.**, खंड ३, पृ. ९३, नं. १२.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—इ. स. चे अंदाजे ५ वे–६ वे शतक.

सारांश.—हा लेख तुटक आहे.

४२. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. १०

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १० मधील २० व्या तुळईखाली उजवीकडील भिंतीवर आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी; **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ८६, नं. २४, शेवटचा परिच्छेद, तिसरी ओळ; (२) याजदानी व चक्रवर्ती, **अ. टे.**, खंड ३, पृ. ९३, नं. १३.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. चे ५ वे–६ वे शतक.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे–"ही शाक्य भिक्षू बुद्धनाग याची पुण्यकारक देणगी आहे." या तुटक लेखात फक्त एकच ओळ आहे. बर्जेस व इंद्रजी यांनी याचे वाचन केलेले नाही.

व्यक्तिनामे.—बुद्धनाग–शाक्य भिक्षू.

४३. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. १०

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १० मधील ७ व्या खांबावर उजव्या बाजूला, उभ्या बुध्दमूर्तीच्या खाली आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ८५, नं. १७; (२) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. १३७, नं. ९; (३) याजदानी व चक्रवर्ती, **अ. टे.**, खंड ३, पृ. ९३, नं. १४.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. चे ५ वे–६ वे शतक.

सारांश.—चक्रवर्ती यांच्या मते या लेखाचे भाषांतर असे–"पूर्णत्वास पोचलेला (विपश्यिन्), चेतिय संप्रदायाचा परिक याची देणगी."

व्यक्तिनामे.—परिक–देणगी देणारा.

४४. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. १०

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १० मध्ये उजव्या बाजूला, ६ व्या खांबावर, उभ्या बुद्धमूर्तीच्या पायाजवळ आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ८४, नं. १६; (२) बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं., १८८३, खंड ४, पृ. १२७, नं. ८; (३) याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खंड ३, पृ. ९३, नं. १५.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. चे ५ वे–६ वे शतक.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे—"आदरणीय शाक्य भिक्षू द्राढधर्म याने दिलेली ही पुण्यकारक देणगी आहे."

व्यक्तिनामे.—द्राढधर्म–शाक्य भिक्षू.

४५. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. १०

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख अजंठा शैलगृह क्र. १० मध्ये उजव्या बाजूला पाचव्या खांबावर, बुद्धमूर्तीच्या खाली पांढऱ्या रंगात आहे.

संदर्भ.—याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खंड ३, पृ. ९४, नं. १६.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. चे ५ वे–६ वे शतक.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे–"आदरणीय शाक्य भिक्षू द्रोणवर्मन् याने दिलेली ही पुण्यकारक देणगी आहे."

व्यक्तिनामे.—द्रोणवर्मन्–शाक्य भिक्षू.

४६. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. १०

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १० मध्ये उजव्या बाजूच्या दुसऱ्या खांबावर, बुद्धमूर्तीच्या खाली आहे.

संदर्भ.—याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खंड ३, पृ. ९४, नं. १७.

भाषा व लिपी.—संस्कृत; ५ व्या–६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—इ. स. अंदाजे ५ वे–६ वे शतक.

सारांश.—हा तुटक लेख बर्जेस व इंद्रजी यांच्या नजरेस आलेला नाही.

४७. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. १०

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १० मध्ये डाव्या बाजूला आठव्या खांबावर, उभ्या बुद्धमूर्तीच्या पायांखाली असलेल्या कमळावर आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ८५, नं. १९; (२) बुल्हर व बर्जेस, अ. स. व. इं., १८८३, खंड ४, पृ. १३७, नं. १०; (३) याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खंड ३, पृ. ९४, नं. १८(१).

भाषा व लिपी.—संस्कृत, ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. चे ५ वे–६ वे शतक.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे–"आदरणीय सुदत्ताचे · ·" हा लेख आता सापडत नाही.

व्यक्तिनामे.—सुदत्त.

४८. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. १०

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १० मधील आठव्या खांबावर, बुद्धमूर्तीच्या खाली असलेल्या कमळावर आहे.

संदर्भ.–(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ८५, नं. २०; (२) बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं., १८८३, खंड ४, पृ. १३७, नं. ११; (३) याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खंड ३, पृ. ९४, नं. १८(२).

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. चे ५ वे–६ वे शतक.

सारांश.—हा लेख असा–"(भद)न्त सुदत्तस्य"; बर्जेसच्या मते हा लेख झिजला आहे. आता खांब तुटल्यामुळे हा सापडत नाही.

व्यक्तिनामे.—सुदत्त–भिक्षू(?)

४९. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. १०

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १० मधील उजवीकडील ५ व्या खांबावर, उभ्या बुद्धमूर्तीच्या खाली होता.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ८६, नं. २२; (२) बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं., १८८३, खंड ४, पृ. १३८, नं. १३; (३) याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खंड ३, पृ. ९४, नं. १८(४).

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. चे ५ वे–६ वे शतक.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे–"आदरणीय शीलभद्र याने आपल्या माता-पित्यांच्या सन्मानार्थ दिलेली ही पुण्यकारक देणगी आहे". हा लेख सध्या सापडत नाही.

व्यक्तिनामे.—शीलभद्र–दान देणारा.

५०. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. १०

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १० मधील पाचव्या व सहाव्या खांबामध्ये असलेल्या जागेच्या विरुद्ध बाजूला असलेल्या डाव्या बाजूच्या भिंतीवर आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. बे. इं., १८८१, पृ. ८४, नं. १५; (२) बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं., १८८३, खंड ४, पृ. १३७, नं. ७; (३) याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खंड ३, पृ. ९१, नं. २.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे–"सचिव याने दिलेली ही पुण्यकारक देणगी आहे. यापासून मिळणारे पुण्य सर्व सजीव व्यक्तिमात्रांचे दुःख दूर करण्यास उपयोगी पडो." हा लेख त्रोटक आहे.

व्यक्तिनामे.—सचिव–शाक्य आचार्य.

५१. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. १०

प्राप्तिस्थळ.—अजंठा शैलगृह क्र. १० मध्ये डाव्या बाजूस नवव्या खांबावर, बुद्धाच्या डोक्यावर असलेल्या छत्रावर हा लेख आहे.

संदर्भ.—याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खंड ३, पृ. ९१, नं. ३.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—लेख त्रोटक असून बर्जेसने वाचलेला नाही.

५२. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. १०

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १० मधील नवव्या खांबावर बुद्धमूर्तीखाली आहे.

संदर्भ.—याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खंड ३, पृ. ९१, नं. ४.

भाषा व लिपी.—स्पष्ट नाही.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख फारच पुसट असून वाचता येत नाही.

५३. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. १०

प्राप्तिस्थळ.—अजंठा शैलगृह क्र. १० मध्ये नवव्या खांबावर हा लेख आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ८५, नं. १८; (२) याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खंड ३, पृ. ९१, नं. ५.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखातील फक्त "तस्यैव" हा शब्द वाचता येतो.

५४. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. १०

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १० मध्ये नवव्या खांबावर, बुद्धमूर्तीच्या खालच्या बाजूला आहे.

संदर्भ.—याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खंड ३, पृ. ९१, नं. ६.

भाषा व लिपी.—निश्चित केलेली नाही.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—लेख फार पुसट झाला असून वाचता येत नाही. हा लेख बर्जेसच्या वाचनात आलेला नाही.

५५. अजंठा येथील दोन प्राचीन ब्राह्मी लेख, शैलगृह क्र. १० (लेख अ)

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १० च्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—घोष, ए., इ. आयृ., १९६८, खंड ३७, भाग ६, पृ. २४१–२४४.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख अतिशय त्रोटक आहे. बाहडचा रहिवासी कन्हक याने भिंत दान दिल्याचे यात नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—कन्हक–दान देणारा.

ग्रामनामे.—बाहड–ओळख पटत नाही.

५६. अजंठा येथील दोन प्राचीन ब्राह्मी लेख, शैलगृह क्र. १० (लेख ब)

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १० मध्ये पहिल्या व दुसऱ्या कमानीमध्ये छतावर कोरलेला आहे.

संदर्भ.—घोष, ए., इ. आय्., १९६८, खंड ३७, भाग ६, पृ. २४१–२४४.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात प्रव्रजित धमदेव याच्या प्रसाददानाचा उल्लेख आलेला आहे.

व्यक्तिनामे.—धमदेव–दान देणारा प्रव्रजित.

ग्रामनामे.—उल्लेख नाही.

५७. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. १२

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १२ मधील उजव्या टोकाला असलेल्या दरवाजाच्या डाव्या बाजूला मागच्या भिंतीवर आहे.

संदर्भ.—(१) भाऊ दाजी, **जे. बी. बी. आर्. ए. एस्.**, १८६५, खंड ७, पृ. ६३; (२) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ६८; (३) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ११६, नं. २; (४) फ्रँक, **झेड्. डी. एम्. जी.**, १८९६, खंड ५०, पृ. ५९७.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे–"घनामदड या व्यापाऱ्याने मध्यवर्ती दालन असलेले व दालनाच्या सर्व बाजूंनी खोल्या असलेले लेणे दान दिले."

व्यक्तिनामे.—घनामदड–दान देणारा व्यापारी.

५८. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. १६

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १६ मध्ये, खालच्या ओळीत बसलेल्या क्र. एक व दोन या बुद्धमूर्तींच्या खाली आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ८७, नं. २६; (२) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. १३८, नं. १५; (३) याजदानी व चक्रवर्ती, **अ. टे.**, खंड ३, पृ. ९५, नं. १.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—इ. स. चे ५ वे–६ वे शतक.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे–"शाक्य भिक्षू आदरणीय धर्मदत्त याने दिलेली ही पुण्यकारक देणगी आहे. या दानामुळे मिळणारे पुण्य त्याचे माता, पिता व सर्व सजीव व्यक्तिमात्रांना सर्वोच्च ज्ञान मिळण्यास उपयोगी पडो."

व्यक्तिनामे.—धर्मदत्त–शाक्य भिक्षू.

५९. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. १६

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १६ मध्ये खालच्या ओळीतील तिसऱ्या व चौथ्या बुद्धमूर्तींच्या खाली आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ८७, नं. २७; (२) बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं., १८८३, खंड ४, पृ. १३८, नं. १५; (३) याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खंड ३, पृ. ९५, नं. २.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. ५ वे–६ वे शतक.

सारांश.—"शाक्य भिक्षू आदरणीय धर्मदत्त याची ही पुण्यकारक देणगी आहे. या दानामुळे प्राप्त होणारे पुण्य त्याचे माता, पिता व सर्व सजीव व्यक्तिमात्रांना सर्वोत्तम ज्ञान मिळण्यास उपयोगी पडो."

व्यक्तिनामे.—धर्मदत्त–शाक्य भिक्षू.

६०. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. १६

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १६ मध्ये वरच्या ओळीतील तिसऱ्या बुद्ध-मूर्तीच्या खाली आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ८७, नं. २५; (२) बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं., १८८३, खंड ४, पृ. १३८, नं. १४; (३) याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खंड ३, पृ. ९५, नं. ३.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. चे ५ वे–६ वे शतक.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे–"शाक्य भिक्षू आदरणीय दा(बा)पुक याने दिलेली ही पुण्यकारक देणगी आहे."

व्यक्तिनामे.—दापुक–(बापुक)–शाक्य भिक्षू.

६१. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. १६

प्राप्तिस्थळ.—हा लेख शैलगृह क्र. १६ मधील डाव्या बाजूच्या भिंतीवर आहे.

संदर्भ.—याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खंड ३, पृ. ९५, नं. ४–५.

भाषा व लिपी.—नोंदलेली नाही.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. चे ५ वे–६ वे शतक.

सारांश.—हा लेख खराब झाला असल्याने त्याचे सुसंगत वाचन करता येत नाही. बर्जेसने हा लेख वाचलेला नाही.

६२. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. १६

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १६ च्या प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूला असलेल्या व्हरांड्याच्या मागच्या भिंतीवर आहे. येथील काही चित्रांवर नावे लिहिलेली आहेत.

संदर्भ.—याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खंड ३, पृ. ९६, नं. ६.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. चे ५ वे–६ वे शतक.

सारांश.—या लेखातील "वैश्वन्तर", "इंद्र" ही नावे स्पष्ट दिसतात. तिसऱ्या नावातील फक्त "यु" हे अक्षर वाचता येते. कदाचित पाली जातकात उल्लेखिलेल्या वैश्वन्तर याला; त्याचा पुत्र व कन्या गुलाम म्हणून मागण्याकरिता आलेल्या "युजक" या ब्राह्मणाचे हे नाव असावे (पाली जातककथेतील जूजक).

व्यक्तिनामे.—(१) वैश्वन्तर–बोधिसत्त्व; (२) इंद्र–देव; (३) युजक (जूजक)–बहुधा ब्राह्मणाचे नाव.

६३. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. १६

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १६ च्या व्हरांड्याच्या अगदी टोकाला डाव्या बाजूच्या भिंतीवर आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ६९, नं. ३; (२) मिराशी, वा. वि., वा. नृ. का., १९५७, पृ. ३४१; (३) मिराशी, वा. वि., कॉ. इं. इं., १९६३, खंड ५, पृ. १०१–१११.

भाषा व लिपी.—संस्कृत; दाक्षिणात्य पेटिकाशीर्षक प्रकारची लिपी.

राजवंश व राजा.—वाकाटक नृपती हरिषेण.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही; हा लेख अंदाजे इ. स. च्या ५ व्या शतकातील शेवटच्या चतुर्थकातील असावा.

सारांश.—हा लेख वाकाटक नृपती हरिषेण याचा अमात्य वराहदेव याचा आहे. याचा उद्देश वराहदेवाने स्तंभ, चित्रावली व शिल्पाकृती इत्यादींनी विभूषित केलेले वेश्म (विहार) बौद्धसंघाला दान दिले हे नमूद करण्याचा होता. या लेखाचे दोन भाग पडतात. पहिल्या भागात पहिले वीस श्लोक येतात. त्यात तत्कालीन नृपती हरिषेण याची विंध्यशक्तीपासून वंशावळ दिलेली असून आनुषंगिक रीतीने देवसेन व हरिषेण या नृपतींचे अमात्य हस्तिभोज व त्याचा पुत्र वराहदेव यांचेही वर्णन आहे. दुसऱ्या भागात वराहदेवाने ज्यात चैत्य मंदिर (बुद्ध देवालय) व विहार आहेत असे लेणे कोरवून ते माता-पित्यांना पुण्यलाभ व्हावा म्हणून बौद्ध संघाला अर्पण केले त्याचे वर्णन आहे.

वरील लेखात हरिषेणाने जिंकून घेतलेल्या प्रदेशामध्ये पुढील प्रांतनामे आहेत :—

प्रांतनामे.—(१) कुंतल—भीमा व वेदवती या नद्यांमधील सातारा, सोलापूर, म्हैसूर व जुन्या मद्रास राज्यांतील काही जिल्ह्यांचा समावेश होत असलेला प्रदेश; (२) अवंती–पश्चिम माळवा; (३) कलिंग—महानदी व गोदावरी या नद्यांच्या मधला पूर्व किनाऱ्यालगतचा प्रदेश; (४) कोसल—आधुनिक छत्तीसगड व ओरिसा प्रांताला लागून असलेला प्रदेश; (५) त्रिकूट—नाशिकच्या पश्चिम दिशेस असलेला डोंगरी भाग; (६) लाट—मही व तापी या नद्यांमधील मध्य व दक्षिण गुजरातचा प्रदेश; (७) आंध्र—गोदावरी नदीच्या दक्षिणेकडील तेलुगूभाषीय प्रदेश.

व्यक्तिनामे.—(१) विंध्यशक्ति—वाकाटक घराण्याचा मूळ पुरुष; (२) प्रवरसेन—वाकाटक नृपती, विंध्यशक्तीचा पुत्र; (३) · · ·सेन—वाकाटक नृपती (?); (४) विंध्यसेन—वाकाटक नृपती; (५) देवसेन—वाकाटक नृपती; (६) हरिषेण—वाकाटक नृपती; (७) वराहदेव—दान देणारा हरिषेणाचा अमात्य; (८) हस्तिभोज—वराहदेवाचा पिता.

६४. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. १७

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १७ मधील व्हरांड्याच्या डाव्या बाजूला असलेल्या यक्ष (मणिभद्र) मूर्तीच्या खाली आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ८७, नं. २८; (२) याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खंड ३, पृ. ९६, नं. १.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. चे ५ वे–६ वे शतक.

सारांश.—या लेखात "मणिभद्र" हे नाव वाचता येते.

व्यक्तिनामे.—मणिभद्र—यक्ष.

६५. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. १७

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १७ मध्ये समोरच्या दालनाच्या उजव्या बाजूला शिबि जातककथा सांगणाऱ्या दृश्यामधील चित्रकृतीवर आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ. ८७, नं. २९; (२) याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., खंड ३, पृ. ९६, नं. २.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. चे ५ वे–६ वे शतक.

सारांश.—या लेखात फक्त शिबि राजाचे नाव तीन ठिकाणी व इंद्राचे नाव दोन ठिकाणी आलेले आहे.

व्यक्तिनामे.—(१) शिबि—राजा; (२) इंद्र—देव.

६६. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. १७

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. १७ च्या व्हरांड्याच्या बाजूच्या भिंतीवर कोरला आहे.

संदर्भ.—(१) मिराशी, वा. वि., कॉ. इं.इं., १९६३, खंड ५, पृ. १२०–१२९; (२) मिराशी,वा. वि., वा.मृ.का., १९५७, पृ. ३७१–३८८; (३) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ. ८३, नं. ४.

भाषा व लिपी.—भाषा संस्कृत असून लिपी पेटिकाशीर्षक प्रकारची आहे.

राजवंश व राजा.—हा लेख वाकाटक नृपती हरिषेण याच्या खानदेश प्रांतावर राज्य करीत असलेल्या मांडलिक राजाचा आहे.

वर्ष व तिथी.—या लेखात वर्ष व तिथीचा उल्लेख नाही. परंतु हा लेख इ. स. ४७५–५०० या काळातील असावा.

सारांश.—हा लेख ज्या राजाने कोरविला त्याचे नाव नष्ट झाले आहे. पण तो वाकाटक नृपती हरिषेण याचा मांडलिक असून खानदेशावर राज्य करीत असावा. या लेखाचा उद्देश या राजाने विहार १७ व १९ क्रमांकाचे गंधकुटी नामक शैलगृह खोदविले हे सांगण्याचा होता. या लेखात या मांडलिक राजाची वंशावळ दिलेली आहे.

व्यक्तिनामे.—(१) हरिषेण—वाकाटक नृपती असावा; (२) धृतराष्ट्र—लेणे कोरवणाऱ्या राजपुरुषाचा पूर्वज; (३) हरिसांब—धृतराष्ट्राचा पुत्र(?); (४) शौरिसांब—हरिसांब याचा पुत्र; (५) उपेंद्रगुप्त—शौरिसांबाचा पुत्र (?); (६) काच (प्रथम)—उपेंद्रगुप्ताचा पुत्र; (७) भिक्षुदास—काच (प्रथम) चा पुत्र (?); (८) नीलदास—भिक्षुदासाचा पुत्र; (९) काच (द्वितीय)—नीलदासाचा पुत्र (?); (१०) कृष्णदास—काच (द्वितीय) चा पुत्र; (११) अतिचंद्रा—कृष्णदासाची पत्नी; (१२) रविसांब—कृष्णदासाचा पुत्र, दान देणाऱ्या राजपुरुषाचा धाकटा भाऊ.

प्रांतनामे.—अश्मक—हा गोदावरीचा प्रदेश असून त्यात सध्याच्या अहमदनगर व बीड .जिल्ह्यांच्या काही भागाचा समावेश होत असावा.

६७. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. २०

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. २० मध्ये अर्धस्तंभावर आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ. ७६–७७, नं. ५; (२) बुल्हर व बर्जेस, अ.स.वे.इं., १८८३, खंड ४, पृ. १३२, नं. ५.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—बुल्हरच्या भाषांतराप्रमाणे हा लेख उपेंद्र अथवा उपेंद्र (गुप्त)–ज्याच्या पित्याचे नाव कृष्ण व पितामहाचे नाव कृष्णदास होते-त्याने दालन (मंडप) दान दिले हे जाहीर करण्याकरिता लिहिलेला आहे.

व्यक्तिनामे.—(१) उपेंद्र—दान देणारा; (२) कृष्ण—उपेंद्राचा पिता; (३) कृष्णदास —उपेंद्राचा पितामह.

६८. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. २१

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. २१ मध्ये व्हरांडयाच्या मागच्या भिंतीवर आहे. याच्या डाव्या बाजूला काही मोठी अक्षरे चित्रित केलेली आहेत.

संदर्भ.—याजदानी व चक्रवर्ती, अ.टे., १९५५, खंड ४, पृ. १११.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—निश्चित दिलेली नाही.

सारांश.—या लेखातील "दसरथ मंडण" ही अक्षरेच फक्त वाचता येतात. चक्रवर्ती यांच्या मतानुसार या लेखाचा संबंध दशरथ जातकाशी असावा.

६९. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. २२

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. २२ मध्ये मंदिराच्या डाव्या बाजूच्या भिंतीवर एका ओळीत बोधीवृक्षाखाली चित्रित केलेल्या आठ बुद्धमूर्तींच्या खाली आहे.

संदर्भ.—याजदानी व चक्रवर्ती, अ.टे., १९५५, खंड ४, पृ. १११.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—निश्चित दिलेली नाही.

सारांश.—या लेखात सात सर्वज्ञ बुद्ध व भावी मैत्रेय बुद्ध यांची नावे त्या त्या बुद्ध-मूर्तींच्या खाली दिलेली आहेत.

व्यक्तिनामे.—(१) विपश्वी; (२) शिखी; (३) विश्वभू; (४) ककुच्छंद; (५) कनक-मुनि; (६) काश्यप; (७) शाक्य मुनि; (८) मैत्रेय.

७०. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. २२

प्राप्तिस्थळ.—हा दोन ओळींचा लेख अजंठा शैलगृह क्र. २२ मध्ये बसलेल्या आठ बुद्ध-मूर्तींच्या खाली आहे.

संदर्भ.—याजदानी व चक्रवर्ती, अ. टे., १९५५, खंड ४, पृ. ११२.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—निश्चित उल्लेख नाही.

सारांश.—या तुटक लेखाचे भाषांतर असे—सर्व प्राणिमात्रांना सर्वोच्च ज्ञान प्राप्त व्हावे या उद्देशाने महायान पंथीय शाक्य भिक्षू याने दिलेली ही पुण्यकारक देणगी आहे. जो कोणी बुद्धमूर्ती तयार करवितो त्याला सौंदर्य, सद्भाव, सद्गुण, बुद्धिमत्ता आणि पूर्ण ज्ञान प्राप्त होते व ती व्यक्ती दर्शनीय होते.

७१. अजंठा चित्रित शिलालेख, शैलगृह क्र. २२

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. २२ मध्ये चित्रित केलेल्या आठ मूर्तींच्या वर असलेल्या बोधी वृक्षांच्या वर त्या त्या वृक्षांची नावे सांगणारा आहे.

संदर्भ.—याजदानी व चक्रवर्ती, अ. टें., १९५५, खंड ४, पृ. १११–११२.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. चे ५ वे–६ वे शतक.

सारांश.—हा लेख तुटक आहे. फक्त चार बोधीवृक्षांची नावे वाचता येतात: (१) पुंडरीक (शिखी); (२) शिरीष (क्रकुच्छंद); (३) उदुंबर (कनकमुनी); (४) न्यग्रो(ध) (काश्यप).

७२. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. २६

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. २६ मध्ये उजव्या बाजूला असलेल्या दरवाजावर आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टें.वे.इं., १८८१, पृ. ७७–७९, नं. ६; (२) बुल्हर व बर्जेस, अ.स.वे.इं., १८८३, खंड ४, पृ. १३२–१३५, क्र. ६.

भाषा व लिपी.—संस्कृत; या लेखातील अक्षरांचे वळण पूर्वचालुक्य आणि वलभी राजवंशाच्या ताम्रपटांवरील अक्षरांप्रमाणे आहे.

राजवंश व राजा.—हा लेख बहुधा अश्मक प्रदेशावर राज्य करणाऱ्या राजाच्या मंत्र्याचा असावा.

वर्ष व तिथी.—हा लेख बहुधा इ. स. च्या ६ व्या शतकाच्या उत्तरार्धातील अथवा ७ व्या शतकाच्या सुरवातीचा असावा.

सारांश.—या लेखाची सुरुवात बौद्ध पद्धतीप्रमाणे असून त्यामध्ये ज्या शैलगृहात हा लेख आहे, ते शैलगृह खोदल्याचे नमूद केले आहे. ज्या व्यक्तीने हे शैलगृह खोदण्याचा हुकूम दिला व या कामासाठी पैसा पुरवला त्या व्यक्तीचे नाव बुद्धभद्र असे होते. या लेखात अश्मक प्रदेशावर राज्य करणाऱ्या राजाचा उल्लेख आहे व त्याच्या दोन मंत्र्यांची भविराज व त्याचा पुत्र देवराज ही नावे दिलेली आहेत. याशिवाय या लेखात स्थविराचल मुनींनी लेणे खोदल्याचा उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—(१) बुद्धभद्र—दान देणारा; (२) भव्विराज—मंत्री; (३) देवराज—मंत्री, भविराजाचा पुत्र; (४) स्थविर अचल—मुनी; (५) धर्मदत्त—भिक्षू; (६) भद्रबंधु—भिक्षू.

७३. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. २६

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. २६ च्या बाहेरच्या बाजूला असलेल्या मूर्तीच्या खाली आहे.

संदर्भ.—बुल्हर व बर्जेस, अ.स.वे.इं., १८८३, खंड ४, पृ. १३६, नं. ७.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे–" शाक्य भिक्षू गुणकर याने दिलेली ही पुण्यकारक देणगी आहे. यापासून मिळणारे पुण्य त्याचे माता-पिता व सर्व सजीव प्राणिमात्रांना सर्वोत्तम ज्ञान मिळविण्यास उपयोगी पडो ".

व्यक्तिनामे.—गुणकर—शाक्य भिक्षू.

७४. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. २६

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. २६ मध्ये बाहेरच्या बाजूस असलेल्या मूर्तीच्या खाली (आधीच्या लेखात वर्णिलेल्या मूर्तीच्या बाजूस) कोरला आहे.

संदर्भ.—बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं., १८८३, खंड ४, पृ. १३६, नं. ८.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—पुण्यकारक देणगी. लेख त्रोटक आहे.

७५. अजंठा शिलालेख, शैलगृह क्र. २६

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठा शैलगृह क्र. २६ मध्ये उजव्या बाजूला असलेल्या लहान मूर्तीच्या खाली कोरलेला आहे.

संदर्भ.—बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं., १८८३, खंड ४, पृ. १३६, नं. ९.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—निश्चित दिलेली नाही.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे–"शाक्य भिक्षु संघमित्र याने दिलेली पुण्यकारक देणगी."

व्यक्तिनामे.—संघमित्र-दान देणारा.

७५अ. अप्रसिद्ध ताम्रपट, ध्रुवसेन (प्रथम)

जिल्हा—**उल्लेख नाही** तालुका—**उल्लेख नाही**

प्राप्तिस्थळ.—डॉ. बेलवलकर, डेक्कन कॉलेज, पुणे, यांनी प्रस्तुत ताम्रपट आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, वेस्टर्न सर्कलचे सुपरिटेंडेंट श्री. भांडारकर यांना दिला.

संदर्भ.—वत्स, मा. स्व., इ. आय्., १९२७–२८, खंड १९, पृ. ३०२–३०४.

भाषा व लिपी.—संस्कृत; गुर्जर.

राजवंश व राजा.—मैत्रक नृपती ध्रुवसेन (प्रथम).

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या ताम्रपटाचा मुख्य उद्देश राजाने हस्तवप्राहरणीमधील कलहाटक हे गाव भारद्वाज गोत्री विश्वदत्त व वसुदत्त नामक ब्राह्मणांना दान दिले हे नमूद करणे हा होता. या प्रसंगी प्रतीहार मम्मक हा दूतक होता व किक्कक याने हे शासन लिहिले.

व्यक्तिनामे.—(१) भटक्क—मैत्रक नृपती; (२) धरसेन—मैत्रक नृपती भटक्क याचा पुत्र; (३) द्रोणसिंह—मैत्रक नृपती, धरसेनाचा धाकटा भाऊ; (४) ध्रुवसेन—दान देणारा मैत्रक नृपती, द्रोणसिंहाचा धाकटा भाऊ; (५) विश्वदत्त—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (६) वसुदत्त—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (७) मम्मक—प्रतीहार दूतक; (८) किक्कक—लेखक.

ग्रामनामे—(१) हस्तवप्र—हल्लीचे भावनगर जवळचे हाथब; (२) कलहाटक—हल्लीचे कोलिआक.

७६. अमडापूर शिलालेख, यादव सिंघण, शके ११३२

जिल्हा—**बुलढाणा** तालुका—**चिखली**

प्राप्तिस्थळ.—हा लेख अमडापूर (प्राचीन अंबडापूर) येथील अंबिकेश्वराच्या (शिव) मंदिरात गर्भगृहाच्या द्वाराच्या वर बसविलेल्या शिळेवर आहे. अमडापूर हे ठिकाण विदर्भात बुलढाण्यापासून २८ मैलांवर आहे.

संदर्भ.—मिराशी, वा. वि., इ. आय्., खंड २१, पृ. १२७–१२८, १३१–१३२.

भाषा व लिपी.—अशुद्ध संस्कृत; नागरी लिपी.

राजवंश व राजा.—यादव वंशीय नृपती सिंघणदेव.

वर्ष व तिथी.—शके ११३३, गेलेले वर्ष, प्रजापती संवत्सर इ. स. १२११–१२१२.

सारांश.—शके ११३३ मध्ये श्रीमत् प्रताप चक्रवर्ती सिंघणदेव याच्या प्रभावी कारकीर्दीत देउनायक हा अमडापूरच्या सभोवतालच्या प्रदेशाचा राज्यपाल होता. या वर्षी, प्रजापती संवत्सर असताना अमडापूरनिवासी पद्मन (प्रद्युम्न) सेठी याने बांधलेल्या मंदिरात (कीर्तन) भाईदेवपुत्र मंगल या व्यक्तीने तोरण (?) बांधले.

व्यक्तिनामे.—(१) सिंघणदेव—यादव नृपती; (२) देउनायक—प्रादेशिक अधिकारी; (३) प्रद्युम्न सेठी—व्यापारी; (४) मंगल—दान देणारा; (५) भाईदेव—मंगलचा पिता.

ग्रामनामे.—अम्बडापूर—बुलढाणा जिल्ह्यातील हल्लीचे अमडापूर.

विशेष महत्त्व.—हा वऱ्हाड प्रांतात सापडलेला यादवांचा पहिला शिलालेख आहे.

७७. अरंडेश्वर शिलालेख

जिल्हा—**परभणी**

प्राप्तिस्थळ.—दिलेले नाही. (एरंडेश्वर असेही वाचतात.)

संदर्भ.—इं. अ. रि., १९६९–७०, पृ. ४८.

भाषा व लिपी.—मराठी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—शके ११२१; इ. स. ११९९.

सारांश.—या लेखात महानायक व महासेन रामचंद्राचा उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—रामचंद्र—महानायक; महासेन.

७८. अर्धापूर लेख

जिल्हा—**नांदेड**

प्राप्तिस्थळ.——नमूद केलेले नाही. (आर्धापूर असेही वाचतात.)

संदर्भ.—इं. अ. रि., १९६४–६५, पृ. २–११, नं. ४६.

भाषा व लिपी.——उल्लेख नाही.

राजवंश व राजा.——उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.——विरोधकृत संवत्सर, शके १११३.

सारांश.——या लेखात यादवांच्या स्थानिक अधिकाऱ्याचा उल्लेख आहे पण सविस्तर माहिती नाही.

७९. अर्धापूर शिलालेख

प्राप्तिस्थळ.——हा लेख अर्धापूर येथील पोलिस पाटील श्री. रामचंद्र राव यांच्या शेतात सापडलेल्या शिळेवर आढळला.

संदर्भ.—सरकार व भट्टाचार्य, इ. आय्., १९६३–६४, खंड ३५, पृ. १६८–१७०.

भाषा व लिपी.——संस्कृत; इ. स. १२ व्या–१३ व्या शतकातील दाक्षिणात्य नागरी लिपी.

राजवंश व राजा.——हा लेख कोणी रट्ट वंशीय हंसपाल या अर्धापूरच्या आसपासच्या प्रदेशावर राज्य करणाऱ्या राजाचा आहे.

वर्ष व तिथी.——अंदाजे इ. स. चे १२ वे किंवा १३ वे शतक.

सारांश.——या लेखाचा खालचा अर्धा भाग हरवल्यामुळे या लेखाचा उद्देश निश्चित सांगता येत नाही. उपलब्ध भागावरून असे दिसते की, एखाद्या रट्ट प्रमुखाने अर्धापूर येथील शिव देवालयाला दिलेल्या देणग्या या लेखात नमूद केल्या असाव्यात. या लेखात हंसपाल याचा पुत्र व नातू यांचीही नावे आलेली आहेत.

व्यक्तिनामे.—(१) हंसपाल—रट्टवंशीय राजा; (२) विक्रमार्क—हंसपालाचा पुत्र; (३) बल्लाल—विक्रमार्क याचा पुत्र व हंसपालाचा नातू.

ग्रामनामे.—अर्धापूर—नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर.

विशेष महत्त्व.——या लेखामुळे अर्धापूरच्या आसपासच्या प्रदेशावर कोणत्या तरी मोठ्या राजाच्या आधिपत्याखाली शासन करणाऱ्या रट्ट किंवा राष्ट्रकूट शाखेबद्दल प्रथम माहिती मिळाली.

८०. अर्वळें, शिवलिंग शिलालेख

गोवा राज्य

तालुका—**बिचोली**

प्राप्तिस्थळ.— हा लेख अर्वळें येथे पांडव लेणे क्र. २ मधील शिवलिंगावर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) पिसुर्लेकर, पी. एस्., **ज. बॉ. हि. सो.**, १९३०, खंड ४, पृ. २–४; (२) गुणे टी. व्ही., ए. आर. जी., १९६६, नं. ७.

भाषा व लिपी.——संस्कृत; दाक्षिणात्य वळणाची.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—लिपीच्या आधारे इ.स. चे ७ वे शतक.

सारांश.—या लेखात 'साम्बलूरवासी रविः' असे शब्द आहेत.

८१. अर्वळें शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख अर्वळें शैलगृह क्र. ३ मध्ये बसविलेल्या शिळेवर कोरलेला आहे.

संदर्भ.—इं. अ. रि., १९६५–६६, पृ. २, नं. ६.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ६ व्या शतकातील दक्षिणी पद्धतीची लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—साम्बलूरवासी रवि.

८२. अर्वळें (गोवा) गुहेतील स्तंभलेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख अर्वळें (हरवळे) येथील नं. ३ च्या गुहेतील मंदिराच्या तिसऱ्या स्तंभावर कोरला होता.

संदर्भ.—रमेश, के. व्ही., इ. आय्., १९६८, खंड ३७, भाग ६, पृ. २८२–२८३.

भाषा व लिपी.—संस्कृत; पेटिकाशीर्षक ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही. लिपीवरून अंदाजे इ. स. चे ५ वे शतक.

सारांश.—सांबलूर येथील रहिवाशी रवी एवढेच या लेखात म्हटले आहे.

व्यक्तिनामे.—रवी (बहुधा सूर्यासाठी असावे.)

ग्रामनामे.—सांबलूर—हे बहुधा हल्लीचे हरवळे असावे.

विशेष महत्त्व.—या लेखावरून व स्तंभाच्या सूर्यासारख्या गोलाकार आकारावरून इ. स. च्या ५ व्या शतकात गोव्यामध्ये सूर्याची उपासना चालू होती असे म्हणता येईल.

८३. अळते रामलिंग मंदिर, स्तंभ शिलालेख

जिल्हा—**कोल्हापूर** तालुका—**अळते**

प्राप्तिस्थळ.—हा लेख अळतें रामलिंग मंदिरातील ईशान्येकडील कोपऱ्यातील स्तंभावर कोरलेला आहे.

संदर्भ.—कुंदनगर, के. जी., इं. नॉं. क. को., नं. ४१, पृ. १२३, १८६.

भाषा व लिपी.—कानडी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—क्रोधी संवत्सर, भाद्र. शु. पुण्णम्या, शुक्रवार, सोमग्रहणदल्ली, शके ११६६, शुक्रवार, १९ ऑगस्ट १२४४ (चंद्रग्रहण).

सारांश.—क्रोधी संवत्सरात, भाद्रपद पौर्णिमा, शुक्रवार, चंद्रग्रहणाच्या दिवशी. हा लेख तुटक आहे.

८४. अळते रामलिंग मंदिर, स्तंभ शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख अळते रामलिंग मंदिरात ईशान्येकडील कोपऱ्यातील स्तंभावर पश्चिमेकडील बाजूला आहे.

संदर्भ.—कुंदनगर, के. जी., इं. नॉ. क. की., नं. ४२, पृ. १२३, १८६.

भाषा व लिपी.—कानडी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख फार झिजला आहे. त्यातील काही मजकूर लागतो तो असा—"करा-पासून मिळणारे सर्व उत्पन्न (परमेश्वर) केशव याला नम्रभावे दान दिले."

८५. अळते रामलिंग मंदिर, स्तंभ शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख अळते रामलिंग मंदिराच्या मंडपात ईशान्येकडील कोपऱ्यातील स्तंभावर आहे.

संदर्भ.—कुंदनगर, के. जी., इं. नॉ. क. को., नं. ४३, पृ. १२३, १८६.

भाषा व लिपी.—कानडी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—निश्चित समजत नाही.

सारांश.—हा लेख फार झिजला आहे.

८६. अळस ताम्रपट, राष्ट्रकूट युवराज गोविंद (द्वितीय), शक संवत् ६९२

जिल्हा—कोल्हापूर. तालुका—शिरोळ

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट अळस येथील जुन्या अवशेषांच्या उत्खननात मिळाला.

संदर्भ.—भांडारकर, डी. आर्., इ. आय्., १९००–१९०१, खंड ६, पृ. २०८–२१३.

भाषा व लिपी.—संस्कृत; दाक्षिणात्य लिपी.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूटवंशीय राजपुत्र दुसरा गोविंद याच्या कारकीर्दीतील हा लेख आहे.

वर्ष व तिथी.—आषाढ शुद्ध सप्तमी, सौम्य संवत्सर, शके ६९२, इ. स. ७६९–७७०.

सारांश.—हा ताम्रपट राष्ट्रकूट नृपती कृष्णराज (प्रथम) याचा पुत्र राजपुत्र गोविंदराज याने वेंगीच्या राजाचा पराभव केल्यानंतर कृष्णवेर्णा व मुसी यांच्या संगमावर असलेल्या

आपल्या तळावरून दिलेला आहे. राजपुत्र गोविंदराज याने अलक्तक विषयातील हरिय-गिरीच्या दक्षिण बाजूला असलेल्या प्रसादिनी नदीच्या तीरावर असलेले उत्तरई खेडे अरसिय-वाड खेड्यातील वनासहित, मानवलोक रत्नवर्ष या बिरुदाने ख्यात असलेल्या ध्रुवराज याचा नातू व दन्तिवर्मन् याचा पुत्र विजयादित्य याच्या विनंतीनुसार भारद्वाज गोत्री ब्राह्मण श्रीधर याचा पुत्र व केशव याचा नातू जग्गु यास दान दिल्याचा उल्लेख या लेखात आहे. या लेखात दान दिलेल्या खेडेगावाच्या सीमा सांगितलेल्या असून शापात्मक वचनांच्या शेवटी हा लेख श्रीसेन याने लिहिला असल्याचा उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—(१) गोविंदराज (द्वितीय)—दान देणारा राष्ट्रकूट नृपती; (२) गोविंदराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती; (३) कक्कराज—राष्ट्रकूट नृपती, गोविंदराज (प्रथम) चा पुत्र; (४) इंद्रराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, कक्कराजाचा पुत्र; (५) दन्तिवर्मन् (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, इंद्रराज (द्वितीय) चा पुत्र; (६) कृष्णराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, कक्क-राजाचा पुत्र, गोविंदराज (द्वितीय) चा पिता; (७) विजयादित्य—दानाची विनंती करणारा; (८) दन्तिवर्मन्—विजयादित्याचा पिता; (९) ध्रुवराज—विजयादित्याचा पितामह; (१०) जग्गु—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (११) श्रीधर—जग्गुचा पिता; (१२) केशव—जग्गुचा पितामह; (१३) श्रीसेन—लेखकर्ता.

स्थलनामे.—(१) अलक्तक—आधुनिक कोल्हापूर जिल्ह्यातील आळते विभाग; (२) अरसियवाड—या नावाच्या पहिल्या तीन अक्षरांवरून ज्या ठिकाणी ताम्रपट सापडला ते अळस हे स्थळ असावे असे वाटते; (३) उत्तरई—ओळख पटत नाही; (४) परत्तुरगे—ओळख पटत नाही; (५) नीवीवाड—ओळख पटत नाही; (६) मज्झिम—ओळख पटत नाही,

८७. अक्षी शिलालेख

जिल्हा—कुलाबा तालुका—अलिबाग

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख अक्षी या खेड्यात मिळाला.

संदर्भ.—(१) तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.**, १९६३, पृ. १–९, नं. १; **पुणे विद्यापीठ पत्रिका** (ह्यूमॅ), नं. ७, पृ. १–१३; **मराठी संशोधन पत्रिका**, १९५७, वर्ष ४ थे, अंक ३, **मराठी संशोधन पत्रिका**, वर्ष ५ वे, अंक १ ला, पृ. १–२०; **महाराष्ट्र साहित्य पत्रिका**, वर्ष ६, अंक २ रा; (२) राईस, बी. एल्., **इन्स्. श्रवणबेळगोला**, नं. ७५; (३) पोतदार, द. वा., **महाराष्ट्र साहित्य पत्रिका**, वर्ष १५(?), अंक ३ रा; (४) दीक्षित, मो. ग., **सुषमा**, जुलै १९५९, वर्ष ११, अंक ९–१०, पृ. २९–३१; **महाराष्ट्र साहित्य पत्रिका**, वर्ष ९, अंक २, पृ. १९–२०; (५) गुणे, पां. दा., **भा. इ. सं. मं., ८ वे अधिवेशन**, पृ. २३–५०.

भाषा व लिपी.—संस्कृत व मराठी संमिश्र भाषा; देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—कोकणचा शिलाहारवंशीय नृपती केशिदेवराय.

वर्ष व तिथी.—शके ९३४, प्रधावी संवत्सर, अधिक मास (ज्येष्ठ), सुक्रे = शुक्रवार, १६ मे इ. स. १०१२, डॉ. मो. ग. दीक्षित यांच्या मते शके ११३२, प्रभवा संवत्सर.

सारांश.—हा लेख कोकणचा राजा चक्रवर्ती केशीदेवराय याच्या कारकीर्दीतील असून या लेखाचा उद्देश चक्रवर्ती केशीदेवराय याचा महाप्रधान भइर्जु सेणुई याने गावातील नऊ कवलि धान्य देवीसाठी दान दिले हे नमूद करण्याचा आहे. या लेखाचा शेवट शापात्मक वचनांनी झाला आहे.

व्यक्तिनामे.—(१) केशीदेवराय—कोकण शिलाहार नृपती; (२) भइर्जु सेणुई—महाप्रधान; (३) लुनया—लेख कोरणारा.

विशेष महत्त्व.—मराठी भाषेतील उपलब्ध लेखातील हा पहिला शिलालेख होय असे तुळपुळयांचे मत आहे.

८८. अक्षी शिलालेख, यादव रामचंद्रदेव

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेली शिला अक्षी या खेडेगावात मिळाली.

संदर्भ.—तुळपुळे, शं. गो., प्रा. म. को. ले., १९६३, नं. ४१, पृ. २१७–२१९.

भाषा व लिपी.—संस्कृत व मराठी मिश्र भाषा; देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—देवगिरीचा यादव नृपती रामचंद्रदेव.

वर्ष व तिथी.—शके १२१३ (गत वर्ष), खर संवत्सर, चैत्र शुद्ध ८, शुक्रवार, ९ मार्च १२९१.

सारांश.—या लेखाचा उद्देश यादव नृपती रामचंद्रदेव याचा मांडलिक जाइदेव याचा पुत्र ईश्वरदेव क्षत्रिय याने वर दिलेल्या तिथीला देवीला एक गद्याण दान दिले हे नमूद करण्याचा आहे.

व्यक्तिनामे—(१) रामचंद्रदेव—यादव नृपती; (२) जाइदेव—यादव नृपतीचा मांडलिक; (३) ईश्वरदेव क्षत्रिय—जाइदेवाचा, दान देणारा पुत्र.

८९. अंजनवती ताम्रपट, राष्ट्रकूट गोविंद (तृतीय)

जिल्हा—**अमरावती** तालुका—**चांदुर**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट अंजनवती खेड्याजवळचे रहिवासी श्री. एन. टी. पांडे यांच्याजवळ मिळाला.

संदर्भ.—मिराशी व कुळकर्णी, इ. आय्., १९३५–३६, खंड २३, पृ. ८–१८.

भाषा व लिपी.—संस्कृत; लिपी गोविंद (तृतीय) याच्या पैठण ताम्रपटाप्रमाणे नागरी.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती गोविंद (तृतीय) याच्या कारकीर्दीतील हा लेख आहे.

वर्ष व तिथी.—गेलेल्या शके ७२२ या वर्षीचे सूर्यग्रहण, गुरुवार, २५ जून, इ. स. ८००.

सारांश.—या लेखाचा उद्देश राष्ट्रकूट नृपती गोविंद (तृतीय) याने आपल्या मयूरखिंडी या राजधानीहून सूर्यग्रहणाचे दिवशी "तुला पुरुष" निमित्ताने अंजनवंती हे खेडे १३ ब्राह्मणांना दान दिले हे नमूद करण्याचा होता. हे दान घेणारे ब्राह्मण निरनिराळया गोत्रांचे होते. त्यांपैकी नऊजणांची नावे व गोत्रे दिलेली आहेत : (१) वसिष्ठ, (२) क्रमइत्त (३) कुतिमाष, (४) हारिद्र, (५) मोग्गल, (६) भारद्वाज, (७) काश्यप, (८) वाजसनेय, (९) सीगुली (सांगली ?). या खेड्याच्या उत्पन्नाचे १८ समान भाग केले असून त्यांपैकी पाच भाग दीक्षित रुद्दप्प याला, दोन भाग देवदत्त याला व बाकीच्या ब्राह्मणांना प्रत्येकी एक भाग मिळणार होता. हा लेख सामन्त गौत याचा पुत्र, युद्ध व शांतता मंत्री कुक्कैक याने नृपती गोविंद (तृतीय) ची महाराज्ञी महादेवी हिच्या संमतीनुसार दिलेल्या आज्ञेवरून लिहिला आहे. यावेळी चाक्किराज हा दूतक होता.

या लेखात राष्ट्रकूट नृपती गोविंद (प्रथम) पासून वंशावळ दिलेली आहे :

व्यक्तिनामे.—(१) गोविंद (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती; (२) कक्क (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, गोविंद (प्रथम) चा पुत्र; (३) इंद्र (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, कक्क (प्रथम) चा पुत्र; (४) दन्तिदुर्ग—राष्ट्रकूट नृपती, इंद्र (द्वितीय) चा पुत्र; (५) कृष्ण—राष्ट्रकूट नृपती, दन्तिदुर्गाचा चुलता, कक्क (प्रथम) चा पुत्र; (६) राहप्प—कृष्णाने जिंकलेला राजा; (७) गोविंद

(द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, कृष्णाचा पुत्र; (८) ध्रुव—राष्ट्रकूट नृपती, गोविंद (द्वितीय) चा धाकटा भाऊ; (९) गोविंद (तृतीय)—राष्ट्रकूट नृपती, ध्रुवाचा पुत्र; (१०) हर्ष—दन्तिदुर्गाने जिंकलेल्या राजाचे नाव; (११) रुद्दप्प दीक्षित—दान स्वीकारणारा वसिष्ठ गोत्री ब्राह्मण; (१२) गोव्वैक भट्ट—रुद्दप्प दीक्षिताचा पिता; (१३) दुर्गप्प—दान स्वीकारणारा ऋभइत्त गोत्री ब्राह्मण; (१४) देवदत्त—दान स्वीकारणारा हारिद्र गोत्री ब्राह्मण; (१५) नारायण—दान स्वीकारणारा कुतिमाष (कुल्माष ?) गोत्री ब्राह्मण; (१६) मंगप्प—दान स्वीकारणारा ब्राह्मण; (१७) वोप्पण—दान स्वीकारणारा हारिद्र गोत्री ब्राह्मण; (१८) ऐयनि—दान स्वीकारणारा मोग्गल गोत्री ब्राह्मण; (१९) गंतियम्म—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (२०) लव्वैय—दान स्वीकारणारा ब्राह्मण; (२१) कसमण—दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण; (२२) छठिकुमर—दान स्वीकारणारा वाजसनेय गोत्री ब्राह्मण; (२३) नारौक—दान स्वीकारणारा सीगुली गोत्री ब्राह्मण; (२४) वादि—दान स्वीकारणारा ब्राह्मण; (२५) चाक्किराज—दूतक; (२६) कुक्कैक—लेख लिहिणारा युद्ध व शांतता मंत्री; (२७) गौत—सामंत, कुक्कैक याचा पिता.

ग्रामनामे.—(१) मयूरखंडी—चांदा जिल्ह्यातील मार्कंडी; (२) अंजनवती—दान दिलेले खेडे, येथे ताम्रपट सापडला; (३) अचलपूर—अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्याचे ठिकाण (एलिचपूर); (४) गोहसोद्दा—अंजनवतीच्या दक्षिणेस दीड मैलांवरील गव्हा; (५) सल्लैमाल—अंजनवतीच्या पश्चिमेस अडीच मैलांवरील सलोरा व नैर्ऋत्येस असलेले अमला ही दोन खेडी मिळून बहुधा हे गाव बनले असावे; (६) कुरे—अंजनवतीच्या वायव्येस तीन मैलांवर कुरहा; (७) वटपूर—कुरहाच्या पूर्वेस १ मैलावरील वडुर; (८) रंगलच्छि—ओळख पटत नाही; (९) वेयघन—अंजनवतीच्या दक्षिणेस तीन मैलांवरील वईगाव; (१०) तलेवाटक—अंजनवतीच्या नैर्ऋत्येस १० मैलांवरील तळेगाव.

९०. अंजनेरी ताम्रपट, जयभट तृतीय, कलचुरी वर्ष ४६१

जिल्हा—नाशिक **तालुका—नाशिक**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट नाशिक जिल्ह्यात त्रिंबकजवळ असलेल्या अंजनेरी या खेड्यात शिंद या कुटुंबाजवळ मिळाला.

संदर्भ.—(१) वत्स व डिस्कळकर, इ. आय्., १९३९-४०, खंड २५, पृ. २९२-२९६; (२) मिराशी, वा. वि., कॉ. इं. इं., १९५५, खंड ४, पृ. ९०-९६.

भाषा व लिपी.—संस्कृत; दाक्षिणात्य लिपीचा पश्चिमेकडील प्रकार.

राजवंश व राजा.—गुर्जरवंशीय जयभट (तृतीय) याने हा ताम्रपट दिला आहे.

वर्ष व तिथी.—तुला संक्रांति, आश्विन वद्य एकादशी, ४६१ (बहुतेक कलचुरी संवत्), गेलेले वर्ष म्हणजेच मंगळवार, २३ सप्टेंबर इ. स. ७१०.

सारांश.—या ताम्रपटाचा उद्देश जयभट (तृतीय) याने नांदीपूर विषयातील तौरणक खेड्यातील ६० निवर्तने भरत असलेल्या तीन जमिनी बलि, चरु, वैश्वदेव व इतर धार्मिक कृत्ये करण्याकरिता, छंदोगच्या (सामवेद) कौथुम शाखेचा शांडिल्य गोत्री ब्राह्मण चष्टस्वामिन् याचा ब्रह्मपुरीस राहणारा पुत्र नारायण याला दान दिल्या हे नमूद करण्याचा होता. हा ताम्रपट जयभटाने भरुकच्छ येथून दिला होता. यात दद्द (द्वितीय) पासून वंशावळ दिलेली आहे.

व्यक्तिनामे.—(१) कर्ण—गुर्जर नृपती; (२) दद्द (द्वितीय)—गुर्जर नृपती; (३) जयभट (द्वितीय)—गुर्जर नृपती, दद्द (द्वितीय) चा पुत्र; (४) दद्द (तृतीय)—गुर्जर नृपती, जयभट (द्वितीय) चा पुत्र; (५) जयभट (तृतीय)—दान देणारा गुर्जर नृपती, दद्द (तृतीय) चा पुत्र;

(६) नारायण---दान स्वीकारणारा ब्राह्मण; (७) वसुस्वामिन्---नारायणाचा पिता, डाभिल्य गोत्री ब्राह्मण (वत्स व डिस्कळकर); (८) चष्टस्वामिन्---नारायणाचा पिता, शांडिल्य गोत्री ब्राह्मण (मिराशी); (९) सहभट---लेख लिहिणारा बलाधिकृत्; (१०) दुर्गभट---सहभटाचा पिता, बलाधिकृत्; (११) बावुल्ल---दूतक, बलाधिकृत.

ग्रामनामे.---(१) भरुकच्छ---भडोच; (२) नांदीपूर---भडोच जिल्ह्यातील राजपिपला विभागातील नांदोद; (३) तोरणक---नांदोदच्या उत्तरेस दोन मैलांवर असलेले तोरण किंवा तोरणमाळ; (४) जयपूर---ओळख पटत नाही; (५) भूतिशोही---कर्जन नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर तोरणपासून दीड मैलावर असलेले भूछाड; (६) विद्रेरेक---ओळख पटत नाही; (७) ब्रह्मपुरी---नांदोदच्या नैर्ऋत्येस नऊ मैलांवर असलेले बामनफलिआ.

९१. अंजनेरी ताम्रपट, भोगशक्ति (प्रथम संच)

प्राप्तिस्थळ.---हा ताम्रपट नाशिक जिल्ह्यात त्रिंबकजवळ अंजनेरी खेड्यात शिंद कुटुंबाजवळ मिळाला.

संदर्भ.---(१) वत्स व डिस्कळकर, इ. आय्., १९३९–४०, खंड २५, पृ. २२५–२३८; (२) मिराशी, वा. वि., कॉ. इं. इं., १९५५, खंड ४, भाग १, पृ. १४६–१५४.

भाषा व लिपी.---संस्कृत; दाक्षिणात्य लिपीचा दक्षिणेकडील प्रकार.

राजवंश व राजा.---हरिश्चंद्रवंशीय राजा भोगशक्ति.

वर्ष व तिथी.---४६१ (बहुधा कलचुरी संवत्)–इ. स. ७०९–१० (चालू वर्ष) किंवा इ. स. ७१०–११ (गेलेले वर्ष) संवत्सरशतचतुष्टये एकषष्ट्यधिके ४००,६१, शासनं लिखितं.

सारांश.---हा ताम्रपट हरिश्चंद्रवंशीय नृपती भोगशक्ति याने दिलेला असून त्यामध्ये भोगशक्तीचा पिता सिंहवर्मराज व पितामह स्वामिचंद्र ही नावे आलेली आहेत. हा ताम्रपट गोपराष्ट, पूर्व त्रिकूट, आम्रराजी, मैरिका, पूर्व व पश्चिम महागिरीहार, पल्लुसुढाम्बक राष्ट्रांच्या रहिवाश्यांना उद्देशून आहे. या ताम्रपटाचा मुख्य उद्देश जयपूर शहरातील भोगेश्वर मंदिरात पूजाअर्चेसाठी साहित्य पुरविणे, इतर धार्मिक विधी करणे इत्यादींसाठी आठ खेडी–जयग्राम, अंबे अवंगण, पलित्तपाटक, कोकिलाक्षक, कलहक, मुद्गाहितक, क्षेमगिरक, आन्नग्राम-दान दिली हे नमूद करणे हा आहे.

ताम्रपटात पुढे देवालयाचे हक्क, अधिकार व उत्पन्न नमूद केले आहेत. या देवालयाची व्यवस्था व्यापारीवर्गाकडे सोपवली होती आणि या व्यापाऱ्यांना त्याच्या मोबदल्यात जकात नाका, सरकारी अधिकाऱ्यांची राहण्याची सोय करणे, वगैरेसारख्या सेवेतून मुक्त केले होते. शहरातील व्यापारीवर्गाने निवडलेल्या पाच किंवा दहा व्यापारी प्रतिनिधींनी मंदिरातील चालू प्रथेप्रमाणे दरवर्षी मार्गशीर्ष महिन्यात पंधरा दिवस यात्रोत्सव करावा, दान दिलेल्या आठ खेड्यातील लोकांनाही विशिष्ट हक्क प्राप्त झाले होते असे सांगितले आहे. हा ताम्रपट कल्लिवनवासी भरतस्वामिन् याने लिहिला आहे.

व्यक्तिनामे.---(१) विक्रमादित्य–चालुक्य नृपती ; (२) भोगशक्ति–दानकर्ता हरिश्चंद्रवंशीय राजा ; (३) सिंहवर्मराज–भोगशक्तीचा पिता ; (४) स्वामिचंद्र–भोगशक्तीचा पितामह ; (५) भरतस्वामिन्–ताम्रपट लिहिणारा ; (६) तेजवर्मन्–दान देणारा राजा.

ग्रामनामे.---(१) पुरीकोंकण–हे घारापुरी किंवा कुलाबा जिल्ह्यातील राजापुरी असावे; (२) गोपराष्ट्र–इगतपुरीच्या सभोवतालचा प्रदेश; (३) त्रिकूट–यामध्ये बहुधा नाशिक जिल्ह्यातील पश्चिम प्रदेशाचा समावेश होत असावा ; (४) जयग्राम–जयखेरा, दिंडोरी तालुका; (५) अंबे अवंगण–जयखेऱ्याच्या नैर्ऋत्येस ३ मैलांवरील आंबेगाव;

(६) कोकिलाक्षक–जयखेऱ्याच्या ईशान्येस ३ मैलांवरील कोकर ; (७) कलहक–जयखेऱ्याच्या पूर्वेस २ मैलांवरील कळसगाव ; (८) मुद्गाहितक—जयखेऱ्याच्या वायव्येस ५ मैलांवरील मगनपारा ; (९) कल्लिवन—कळवण, नाशिक जिल्हा ; (१०) जयपूर—अंजनेरीच्या नैर्ऋत्येस ९ मैलांवर असलेले जऱ्हार बुद्रुक. पुढील गावांची ओळख पटत नाही. (११) आम्रराजी ; (१२) मेरिका ; (१३) पूर्व महागिरीहार ; (१४) पश्चिम महा-गिरीहार, (१५) पल्लुसूढाम्बक ; (१६) क्षेमगिरक ; (१७) आन्नग्राम ; (१८) पालित्तपाटक.

विशेष महत्त्व.—या ताम्रपटात "कृष्णराजरूपक" या कलचुरींच्या नाण्याचा उल्लेख आहे.

९२. अंजनेरी ताम्रपट, भोगशक्ति (द्वितीय संच)

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट नाशिक जिल्ह्यात त्रिंबकजवळ अंजनेरी येथे शिंदे कुटुंबा-जवळ मिळाला.

संदर्भ.—(१) वत्स व डिस्कळकर, इ. आय्., १९३९–४०, खंड २५, पृ. २२५–२३८ ; (२) मिराशी, वा. वि., कॉ. इं. इं., १९५५, खंड ४, भाग १, पृ. १५४–१६९.

भाषा व लिपी.—संस्कृत ; इ. स. ७ व्या शतकातील दाक्षिणात्य लिपीचा पश्चिमे-कडील प्रकार.

राजवंश व राजा.—हरिश्चंद्रवंशीय राजा पृथिवीचंद्र भोगशक्ति याने हा लेख दिलेला आहे.

वर्ष व तिथी.—तिथी व वर्ष दिलेले नाही. अंदाजे इ. स. च्या आठव्या शतकाच्या प्रथमा-र्धातील हा लेख असावा.

सारांश.—या लेखाचा उद्देश समगिरी या शहराचे व्यापारी व रहिवासी यांचे हक्क, अधिकार व सवलती, तसेच या लोकांनी काही विशिष्ट गुन्हे वा अपराध केले असल्यास त्यांना द्यावा लागणारा दंड नमूद करण्याचा होता. हा लेख तेजवर्मराज याने लिहिला होता.

व्यक्तिनामे.—(१) विक्रमादित्य–चालुक्य नृपती ; (२) पृथिवीचंद्र भोगशक्ति—हरि-श्चंद्रवंशीय, दान देणारा नृपती ; (३) सिंहराज—भोगशक्तीचा पिता ; (४) स्वामिचंद्र–भोगशक्तीचा पितामह, हरिश्चंद्र घराण्याचा मूळ पुरुष, (५) एलेश्रेष्ठी—दान स्वीकारणारा ग्रामप्रमुख ; (६) करपुटश्रेष्ठी—दान स्वीकारणारा ग्रामप्रमुख ; (७) तेजवर्मराज—लेख घोषित करणारा.

ग्रामनामे.—(१) समगिरीपट्टन—ओळख पटत नाही ; (२) चंद्रपुरी—बहुधा अंजनेरीच्या नैर्ऋत्येस असलेले चंद्राची मेट असावे ; (३) सवाणेयपल्लिका–चंद्राची मेटच्या ईशान्येस ५ मैलांवर असलेले सामुण्डि ; (४) कंसारिपल्लिका–चंद्राची मेटच्या ईशान्येस ६ मैलांवरील कन्होली ; (५) मौरेयपल्लिका–नाशिकच्या नैर्ऋत्येस ३ मैलांवरील मोरवाडी ; (६) अंबेय-पल्लिका—ओळख पटत नाही.

विशेष महत्त्व.—चालुक्यांच्या आधिपत्याखाली इ. स. ७ व्या ८ व्या शतकात पुरीकोकण व नाशिकच्या परिसरात राज्य करणारे हरिश्चंद्रवंशीय राजे नव्याने माहीत झाले.

९३. अंजनेरी शिलालेख, महासामंत सेउणदेव

प्राप्तिस्थळ.—हा लेख अंजनेरी येथील पडक्या देवालयातील मंडपाच्या भिंतीमध्ये बसविलेल्या शिळेवर कोरलेला आहे.

संदर्भ.—इंद्रजी, इं. ॲ., १८८३, खंड १२, पृ. १२६–१२९.

भाषा व लिपी.—संस्कृत भाषा ; नागरी लिपी.

राजवंश व राजा.—द्वारावतीचा राजा यादववंशीय महासामंत श्री सेउणदेव.

वर्ष व तिथी.—ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमा, दुंदुभि संवत्सर, सोमवार, शके १०६३.

सारांश.—या लेखात यादववंशीय महासामंत सेउणचंद्र, द्वारावतीचा राजा याचा उल्लेख आहे. या लेखाचा उद्देश आठवा तीर्थंकर चंद्रप्रभ याच्या मंदिराची व्यवस्था ठेवण्याकरिता राजाने शहरातील तीन दुकाने दिली हे नमूद करण्याचा होता. शहरातील श्रीमंत व्यापारी वत्सराज याने लाहड व दशरथ या दोन व्यापाऱ्यांसह याच उद्देशाने दुकान व घर दान दिल्याचा उल्लेख या लेखात आहे. शापात्मक वचनानंतर हा लेख प्रसिद्ध दिवाकर पंडित याने शिलेवर कोरला असे सांगितले आहे. दिवाकर पंडित हा कोलश्वर पंडिताचा पुत्र होय.

व्यक्तिनामे.—(१) सेउणचंद्र—महासामंत ; (२) दिवाकर पंडित—लेख कोरणारा ; (३) कोलश्वर पंडित—दिवाकर पंडिताचा पिता ; (४) पाणुमडउरी—महामहत्तम ; (५) वत्सराज—दान देणारा श्रीमंत व्यापारी ; (६) लाहड—दान देणारा व्यापारी ; (७) दशरथ—दान देणारा व्यापारी.

विशेष महत्त्व.—प्रचलित नाणे द्रम्म उल्लेखिले आहे.

९४. अंदुरा ताम्रपट, राष्ट्रकूट गोविंद (चतुर्थ)

जिल्हा—**अकोला** तालुका—**बाळापूर**

प्राप्तिस्थळ.—सध्या नागपूर येथील मध्यवर्ती संग्रहालयात असलेला हा ताम्रपट अंदुरा येथे जुलै १९६३ मध्ये गढी खोदताना मिळाला.

संदर्भ.—(१) इं. अ. रि., १९६२–६३, पृ. ५१, नं. ३; (२) मिराशी, वा. वि., इ. आय्., १९६६, खंड ३६, पृ. २५७–२७२.

भाषा व लिपी.—संस्कृत; नागरी लिपी.

राजवंश व राजा.—हा लेख राष्ट्रकूट नृपती गोविंद (चतुर्थ) याच्या कारकीर्दीतील आहे.

वर्ष व तिथी.—बुधवार, पौष वद्य पंचमी, शकै ८५१, विकृत संवत्सर, उत्तरा फल्गुनी, महापर्व, उत्तरायण, २३ डिसेंबर इ. स. ९२९.

सारांश.—या लेखाचा उद्देश वडनेर ३०० या भागात असलेल्या एलौरी या खेड्याची देणगी आठ ब्राह्मणांना दिली हे नमूद करण्याचा होता.

व्यक्तिनामे.—(१) गोविंद (चतुर्थ)—राष्ट्रकूट नृपती; (२) नित्यवर्षदेव—राष्ट्रकूट नृपती इंद्र (तृतीय); (३) भागियव्वा—गोविंद (चतुर्थ) ची राणी; (४) गुणगक—भागियव्वाचा पिता; (५) रेवकव्वा—भागियव्वाची माता; (६) तैलप्प—भागियव्वाचा पितामह; (७) भीमराज—तैलप्पाचा पिता, चालुक्य राजा; (८) सण्वैभट्ट—दान घेणारा भारद्वाज गोत्री, ऋग्वेदी ब्राह्मण; (९) मधुवपय्यभट्ट—सण्वैभट्टाचा पिता; (१०) वावण—दान स्वीकारणारा कौशिक गोत्री, तैत्तिरीय शाखेचा ब्राह्मण; (११) तिक्कपय्य—वावण याचा पिता; (१२) केशव–दान स्वीकारणारा वत्स गोत्री, तैत्तिरीय शाखेचा ब्राह्मण; (१३) माधवैय्य–केशवाचा पिता; (१४) प्रभाकरभट्ट—दान स्वीकारणारा, कौशिक गोत्री ऋग्वेदी ब्राह्मण; (१५) वचुभट्ट–प्रभाकरभट्टाचा पिता; (१६) श्रीधरभट्ट—दान स्वीकारणारा, हारीत गोत्री तैत्तिरीय शाखेचा ब्राह्मण; (१७) रेवणैभट्ट—श्रीधरभट्टाचा पिता; (१८) तिक्केभट्ट—दान स्वीकारणारा, भारद्वाज गोत्री ऋग्वेदी ब्राह्मण; (१९) विडपैय—तिक्केभट्टाचा पिता; (२०) जन्नैभट्ट—दान स्वीकारणारा, गार्ग्य गोत्री तैत्तिरीय शाखेचा ब्राह्मण; (२१) विद्धपैय—

जन्नैभट्टाचा पिता; (२२) वावणैय्य—दान स्वीकारणारा, भारद्वाज गोत्री, ऋग्वेदी ब्राह्मण; (२३) रिसियण्ण—वावणैय्याचा पिता. या ताम्रपटात दन्तिदुर्गापासून गोविंद (चतुर्थ) पर्यंत राष्ट्रकूट वंशावळ दिलेली आहे.

ग्रामनामे.—(१) एलौरी—बहुधा पूर्णा नदीच्या दक्षिण काठावर असलेले येरली असावे. हे बुलढाणा जिल्ह्यात नांदुऱ्याच्या उत्तरेस सुमारे ६ मैलांवर आहे; (२) निंबग्राम—आधुनिक निमगाव, बुलढाणा जिल्हा; (३) दन्तिग्राम—बुलढाणा जिल्ह्यातील दादगाव; (४) कोट्टउरी—ओळख पटत नाही. बहुधा आधुनिक आलमपूर हे खेडे असावे; (५) वडनेर—नांदुऱ्याच्या पश्चिमेस ९ मैलांवर असलेले वडनेर; (६) चंद्रपूर—नागपूर-भुसावळ रेल्वे लाईनवरील चांदूर; (७) धर्मसेल्लुक—नांदुऱ्याच्या नैर्ऋत्येस सहा मैलांवरील सेलगाव; (८) सीसवे—अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील सिरसो; (९) पुरी—कुलाबा जिल्ह्यातील जंजिरा विभागातील राजपुरी असावे; (१०) चिखली—नांदुऱ्यापासून चार मैलांवर असलेले चिखली खेडे. यात उल्लेखिलेल्या इतर ग्रामांची ओळख पटत नाही.

विशेष महत्त्व.—व्यक्तिनामात सामान्यतः विरुदे घेतलेली नाहीत. प्रस्तुत लेखात इंद्र (तृतीय) चा उल्लेख 'नित्यवर्षदेव' या नावाने केलेला असल्याने ते व्यक्तिनामात नमूद केले आहे.

९५. (कल्याण) अंबरनाथ देवालय शिलालेख, महामंडलेश्वर महम्वाणिराजदेव

जिल्हा—**ठाणे** तालुका—**कल्याण**

प्राप्तिस्थळ.—हा लेख अंबरनाथ येथील देवालयात श्री. टेररी यांना आढळला.

संदर्भ.—भाऊ दाजी, ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो., १८६९–७०, खंड ९, पृ. २१९–२२१.

भाषा व लिपी.—संस्कृत; तत्कालीन देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—महामंडलेश्वर महम्वाणिराजदेव. या राजाच्या घराण्याचा उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—ज्येष्ठ शुद्ध ९, संपादकाच्या मते शक संवत् ७८२. कीलहॉर्नच्या मते शक संवत् ९८२.

सारांश.—प्रस्तुत लेख महामंडलेश्वर महम्वाणिराजदेव याच्या अमदानीतील आहे. या लेखाचा उद्देश महामंडलेश्वराने आपल्या अधिकाऱ्यांच्या साहाय्याने अंबरनाथ येथील देवालय दगडांनी बांधून काढले हे नमूद करण्याचा होता.

व्यक्तिनामे.—(१) महम्वाणिराजदेव—महामंडलेश्वर. संपादकांच्या मते हा यादववंशीय राजा असावा; (२) विगपय—महामंत्री; (३) नागणैय—महाप्रजन; (४) धेक धेय—लेखा-सांधिविग्रहिक; (५) जागलैय—महासांधिविग्रहिक; (६) सपमिसेन—भाण्डागार प्रमुख; (७) महादेव—दुय्यम भांडागार प्रमुख; (८) खमभाइलेय—मंत्री; (९) महाराज गुरु—व्यक्तिनाम; (१०) भाल्लघराज गुरु—व्यक्तिनाम; (११) विकल्लसिदभस्मक—व्यक्तिनाम.

९६. अंबिवले शैलगृह, शिलालेख

जिल्हा—**ठाणे** तालुका—**कर्जत**

प्राप्तिस्थळ.—हा लेख अंबिवले खेड्यापासून सुमारे दीड मैलावर असलेल्या शैलगृहामध्ये मध्यभागी असलेल्या स्तंभजोडीवर मिळाला.

संदर्भ.—बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ६६, नोंद १.

भाषा व लिपी.—पालि; लिपी ?

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखाचे वाचन झालेले नाही. यातील अक्षरे स्पष्ट नाहीत.

९७. अंबे शिलालेख, उदयादित्य, शके १०६६

जिल्हा—**बीड** तालुका—**मोमिनाबाद**

प्राप्तिस्थळ.—हा लेख अंबेजोगाई (आंबे) या खेड्यामध्ये जोगाईचे माहेर म्हणून प्रसिद्ध असलेल्या हत्तीखाना लेण्यात मिळाला.

संदर्भ.—(१) तुळपुळे, शं. गो., **महा. साहि. पत्रिका**, १९५१–५२, वर्ष २४, अंक ९९, पृ. २–८, **प्रा. म. को. ले.**, १९६३, नं. ५, पृ. २८–३६; (२) दीक्षित, मो. ग., **द. म. इ. सा.**, १९५१, खंड ४, पृ. ५७–६१; (३) कुळकर्णी, भा. र., **संशोधक**, वर्ष १९, भाग ३–४, पृ. १८७–१९२; वर्ष २०, भाग १–४, पृ. २१५–२१६; (४) खरे, ग. ह., **सह्याद्रि**, खंड ३५, अं. ५, पृ. २५३–२५४; **द. म. इ. सा.**, खंड १, पृ. ५५–७८; (५) रामपुरकर, वा. वै., **प्रतिष्ठान**, वर्ष १ ले, अं. २, पृ. ३९–४०; (६) मास्टर, ए., **बु. स्कू. ओ. अ. स्ट.**, खंड २०, पृ. ४२४–४२५.

भाषा व लिपी.—अर्धमराठी अर्धसंस्कृत अशी संमिश्र; इ. स. ११ व्या–१२ व्या शतकातील दाक्षिणात्य वळणाची नागरी लिपी.

राजवंश व राजा.—हा लेख गंग (?) वंशीय उदयादित्य राजाच्या कारकिर्दीतील आहे.

वर्ष व तिथी.—शके १०६६, रक्ताक्ष संवत्सर, अश्विन शुद्ध १ (चालू वर्ष) गुरुदिने; ३१ ऑगस्ट इ. स. ११४४.

सारांश.—हा लेख महामंडलेश्वर उदयादित्य याच्या कारकिर्दीतील आहे. या लेखाचा उद्देश श्रीभूचरनाथ मंदिरातील धार्मिक कृत्ये करण्याकरिता व इतर व्यवस्था ठेवण्याकरिता नृपतीने पुढील देणग्या दिल्या हे नमूद करण्याचा होता—(१) सेलुग्रामातील २० गद्याणांची जमीन; (२) कामाख्यग्रामातील १२ गद्याणांची जमीन; (३) राडी खेड्यातील सालिवण (शालिवाहन) दांड्याप्रमाणे ३ निवर्तने जमीन. या लेखात इतर खेड्यांमधून गद्याणाच्या स्वरूपात मिळालेल्या देणग्यांचाही उल्लेख आहे. याचा शेवट शापात्मक वचनांनी होतो.

व्यक्तिनामे.—(१) रत्नदेव—शिवभक्त; (२) उदयादित्य—दान देणारा नृपती; (३) सिंघणदेव—व्यक्तिनाम.

ग्रामनामे.—(१) अंबा—आधुनिक अंबेजोगाई; (२) सेलुग्राम—अंबेजोगाईपासून ५ मैलांवर असलेले हल्लीचे सेलू; (३) कामाख्यग्राम—अंबेजोगाईपासून ६ किंवा ७ मैलांवर असलेले कामखेड; (४) राडी—सेलुच्या दक्षिणेस २ मैलांवर असलेले आधुनिक राडी; (५) जवलग्राम—अंबेजोगाईपासून आग्नेयेस ६ किंवा ७ मैलांवर असलेले आधुनिक जवळगाव; (६) कुंभैपली किंवा कुंभैपल—राडीच्या पश्चिमेस ३ मैलांवर, अंबेजोगाईच्या आग्नेयेस साडेचार मैलांवर असलेले कुंभेफळ.

९८. अंबे शिलालेख, सिंघणदेव (कलचुरि)

प्राप्तिस्थळ.—हा लेख अंबेजोगाई येथील संगीत मशीदमध्ये भिंतीत बसविलेल्या शिलाखंडावर मिळाला.

संदर्भ.—तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.**, १९६३, नं. ६७, पृ. ३५१–३५४.

भाषा व लिपी.—मराठी; देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—महामंडलेश्वर सिंघणदेव कलचुरि याच्या कारकिर्दीतील हा लेख आहे.

वर्ष व तिथी.—श्री. तुळपुळ्यांच्या मतानुसार अंदाजे शके १११०, इ. स. ११८८.

सारांश.—या लेखात सिंघणदेव याचा महाप्रधान दंडनायक दोचरस याचा पुत्र व महामंडलेश्वर सिंघणदेव याचा मुख्य मंत्री दावरस याने देऊळ (कीर्तन), आवाराची भिंत (पौळी), पट्टशाळा (पडशाळा) व भोगादित्यदेवाचा मढ (देऊळ) बांधले असे नमूद केले आहे. तसेच १० गद्याण उत्पन्न असलेली जमीन देवालयातील पूजेसाठी दान दिल्याचाही उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—(१) सिंघणदेव—कलचुरी नृपती; (२) दोचरस—महाप्रधान दंडनायक; (३) दावरस—दोचरस याचा पुत्र, मुख्य मंत्री.

९९. अंबे शिलालेख, खोलेश्वर

प्राप्तिस्थळ.—हा लेख अंबेजोगाई येथे बन्सीलाल मारवाडी याच्या घरी मिळाला. प्रथम हा लेख असलेली शिला येथील सकळेश्वर मंदिरात असावी.

संदर्भ.—खरे, ग. ह., **ब. म. इ. सा.,** १९३०, खंड १, पृ. ५५–७८; (२) दीक्षित, मो. गं., **भा. इ. सं. मं.,** त्रैमासिक, वर्ष ३०, अं. १–२, परिशिष्ट, पृ. ५; **म. सं. प.,** वर्ष ९, भाग २, पृ. २३–३०; (३) तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.,** १९६३, नं. २३, पृ. ११८–१२३.

भाषा व लिपी.—३५ ओळी संस्कृतमध्ये आहेत. बाकीचा भाग अर्धवट संस्कृत, अर्धवट मराठीत असून, लिपी देवनागरी आहे.

राजवंश व राजा.—यादव नृपती सिंघणदेव.

वर्ष व तिथी.—शके ११५०, सर्वधारिणि संवत्सरे, इ. स. १२२८–२९.

सारांश.—हा लेख दोन भागात आहे. पहिला भाग संस्कृत असून त्यात यादव नृपती सिंघण याचा सरदार खोलेश्वर यांच्या मातृपितृकुलांची वंशावळ दिलेली आहे. या लेखात पुढे सिंघण नृपतीच्या पराक्रमाची माहिती दिलेली आहे. सिंघणाने तेलंगच्या राजाला मारले, गुर्जर, केसी होयसळ, चोळ, गौड या राजांचा पराभव केला, तुर्कांना हुसकावून लावले, सुभटाला ठार मारले इत्यादी. या लेखात पुढे खोलेश्वर या सरदाराच्या पराक्रमी कृत्यांची यादी दिलेली आहे. या लेखातील मराठी भागात खोलेश्वराने दिलेल्या दानाचे वर्णन आहे.

व्यक्तिनामे.—(१) सिंघण—यादव नृपती; (२) खोलेश्वर—सिंघणाचा सरदार; (३) त्रिविक्रम—खोलेश्वराचा पिता, मुदगल गोत्र; (४) चंद्रा—खोलेश्वराची माता; (५) स्वामिदेव—खोलेश्वराचा पितामह; (६) भाईदेव—खोलेश्वराचा प्रपितामह; (७) निंबदेव—चंद्राचा पिता, काश्यप गोत्र; (८) वासुदेव—चंद्राचा पितामह; (९) गोविंद—चंद्राचा प्रपितामह; (१०) भोजदेव—चाहंदचा राजा; (११) हेमाडी—निकुंभवंशीय राजा(?); (१२) रामपाल—काशीचा राजा; (१३) नागण—हा कोण हे समजत नाही; (१४) लक्ष्मीदेव—भंभागिरीचा आभीर राजा; (१५) मार्डलिंग—युवराज, लक्ष्मीदेवाचा नातू; (१६) सीहडी—गुर्जर प्रमुख; (१७) देवपाल—धाराचा नृपती; (१८) रट्टपति करूवेम—कांचीच्या चोळांपैकी असावा; (१९) श्रीकरणं पंडितसुत—लेखक; (२०) नाएक—लेख कोरण्याचा खर्च देणारा; (२१) सर्वेश—नाएकाचा पिता.

ग्रामनामे.—(१) अचलपूर—उमरावती जिल्ह्यातील हल्लीचे एलिचपूर; (२) खोल्लपूर—उमरावतीच्या पश्चिमेस सुमारे ८–१० मैलांवर असलेले हल्लीचे खोलापूर; (३) चाहंद—हल्लीचे चांदा किंवा वर्धा नदीच्या काठचे चाहंद हे गाव असावे; (४) काशी—ओळख पटत नाही; (५) भृगुकच्छ—भडोच; (६) वाराणसी—ओळख पटत नाही; (७) धारा—

ओळख पटत नाही; (८) भंभागिरी--हे बहुधा यवतमाळ जिल्ह्यातील राजाची भाम हे खेडे असावे किंवा अहमदनगर जिल्ह्यातील वांभोरी हे गाव असावे; (९) बाउची--अंबेजोगाईपासून १६ मैलावर असलेले हल्लीचे बाउची, तालुका मोमिनाबाद, जिल्हा बीड; (१०) केज--अंबेजोगाई-पासून २२ मैलांवर असलेले हल्लीचे केज, जिल्हा बीड; (११) औस--अंबेजोगाईच्या दक्षिणेस ३४ मैलांवर असलेले आधुनिक औसा; (१२) उदगिरी--उस्मानाबाद जिल्ह्यातील उदगीर हे तालुक्याचे ठिकाण; (१३) जवलग्राम--तालुका मोमिनाबाद, जिल्हा बीडमधील हल्लीचे जवळगाव; (१४) चाटुसी--अंबेजोगाईच्या दक्षिणेस ३३ मैलांवर असलेले आधुनिक चाट हे गाव; (१५) आडसी--अंबेजोगाईच्या पश्चिमेस असलेले आधुनिक आडस. या लेखात दिलेल्या इतर स्थळांची ओळख पटत नाही.

विशेष महत्त्व.--या लेखामुळे इ. स. १२ व्या शतकातील वऱ्हाडबद्दल महत्त्वपूर्ण भौगोलिक माहिती मिळते.

१००. अंबे शिलालेख, खोलेश्वरकन्या लक्ष्मी, शके ११६२

प्राप्तिस्थळ.--हा लेख आंबेजोगाई खेड्याच्या पश्चिमेस असलेल्या खोलेश्वर मठामध्ये आहे.

संदर्भ.--(१) बर्जेस, अ. स. **वे. इं.**, खंड ३, पृ. ४९, ८५-९३; (२) खरे, ग. ह., **द. म. इ. सा.**, १९३०, खंड १, पृ. ७६-७८; (३) तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.**, १९६३, नं. २५, पृ. १२९-१३२.

भाषा व लिपी.--संस्कृत २६ ओळी, मराठी २ ओळी; देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.--यादव नृपती सिंघण.

वर्ष व तिथी.--शके ११६२ (गतवर्ष), शार्वरि संवत्सर, कार्तिक शुद्ध दशमी (१०); शनिवार २७ ऑक्टोबर, इ. स. १२४०.

सारांश.--हा लेख यादव नृपती सिंघण याच्या कारकिर्दीतील असून त्यामध्ये सिंघणाचे दोन सरदार खोलेश्वर व रामदेव यांची स्तुती केली आहे. खोलेश्वराने गुर्जर, मालव, आभीर राजांचा पराभव केला. व रामदेव याने नर्मदा नदी ओलांडून गुर्जरांचा पराभव केला. रामदेवाची भगिनी लक्ष्मी हिने त्याच्या स्मृतीप्रीत्यर्थ ब्रह्मपुरी येथे रामनारायणाचे मंदिर बांधले. या लेखामध्ये दानाबद्दल सविस्तर माहिती दिलेली आहे. ही प्रशस्ती वाग्देवभट्ट याने रचिली असून नोवरे या गावचा रहिवासी रेमेय याचा पुत्र जोईया याने कोरली.

व्यक्तिनामे.--(१) सिंघण--यादव नृपती; (२) खोलेश्वर--सिंघणाचा मंत्री; (३) लक्ष्मी--दान देणारी खोलेश्वराची कन्या; (४) रामदेव--खोलेश्वराचा पुत्र, सिंघणाचा मंत्री; (५) वाग्देवभट्ट--प्रशस्ती लिहिणारा; (६) जोईया--प्रशस्ती कोरणारा; (७) रेमेय--जोईयाचा पिता.

ग्रामनामे.--(१) ब्रह्मपुरी; (२) नोवरे.

१०१. अंबे शिलालेख, यादव नृपति सिंघण व त्याचा मंत्री खोलेश्वर

प्राप्तिस्थळ.--हा लेख आंबे येथे चौभारा म्हणून ख्यात असलेल्या ठिकाणी भिंतीत बसवलेल्या शिळेवर मिळाला.

संदर्भ.--खरे, ग. ह., **द. म. इ. सा.**, १९३०, खंड १, पृ. ६८-७६.

भाषा व लिपी.--संस्कृत; देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.--उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही. अंदाजे इ. स. चे १३ वे शतक.

सारांश.—या लेखात सकलेश्वर व इतर देवालये बांधल्याचा, तसेच खोलेश्वराने योगेश्वरीच्या मंदिराला दिलेल्या सुवर्ण, रत्ने, तेलाणी गाव इत्यादी देणग्यांचा उल्लेख आहे. त्याच्या काही पराक्रमी कृत्यांची नोंद या लेखात केली आहे. हा लेख विष्णुवृद्ध गोत्रीय धनेश्वरपुत्र माधव याने तयार केला असून त्रिलोचन याने लिहिला आहे.

व्यक्तिनामे.—(१) सिंघण—यादव नृपति; (२) खोलेश्वर—दान देणारा सिंघणाचा मंत्री; (३) माधव—लेख तयार करणारा; (४) धनेश्वर—माधवाचा पिता; (५) त्रिलोचन—लेख कोरणारा.

१०२. अंबे शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख आंबे येथे योगेश्वरी (जोगाई) मंदिराच्या पश्चिमेस मायामोचन तीर्थाच्या ठिकाणी असलेल्या सासकुंडाच्या दक्षिणेस असलेल्या मंदिराजवळच्या भिंतीत बसविलेल्या शिळेवर मिळाला.

संदर्भ.—खरे, ग. ह., द. म. इ. सा., १९३०, खंड १, पृ. ५५(१).

भाषा व लिपी.—उल्लेख नाही.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख फार झिजला आहे.

१०३. आगाशी शिलालेख, हरिपालदेव

जिल्हा—ठाणे तालुका—**वसई**

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेली शिला आगाशी या खेड्याजवळ सापडली.

संदर्भ.—(१) सांकलिया व उपाध्याय, इ. आय्., १९३५–३६, खंड २३, पृ. २७३–२७४; (२) तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.**, १९६३, नं. ८, पृ. ४८–५०.

भाषा व लिपी.—संस्कृत व मराठी; तत्कालीन देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—शिलाहार वंशाचा नृपती हरिपालदेव.

वर्ष व तिथी.—शके १०७२, प्रमोद संवत्सर, मार्गशीर्ष शुद्ध प्रथमा किंवा २२ नोव्हेंबर, इ. स. ११५०.

सारांश.—हा लेख शिलाहार राजा हरिपालदेव याचा आहे. यामध्ये राजाच्या मंत्रीमंडळाच्या सभासदांची नावे आहेत. ती याप्रकारे—श्री. वेसु पडवल—महाप्रधान, श्री. लक्ष्मण प्रभु—महाप्रधान. पदम-सिव-राउल–महाप्रधान व प्रधान वासुगि नायक. हे मंत्री असताना सूर्पारक भागातील वट्टार या खेड्याचा स्वामी महाप्रधान श्रीआहवमल्लदेव याने (पटकील) राजानक पाटलाच्या स्वामित्वाखाली असलेल्या आनेवडी या खेड्याचे उत्पन्न उपाध्याय दिवाकरभट्ट याचा पुत्र व गोवन्नभट्ट याचा नातू ब्रह्मदेवभट्ट याला संक्रांतीच्या उत्तरायण प्रसंगी दान दिले. या दानास वट्टारग्राम प्रमुख रिसि म्हतारा(महत्तर), नागुजि म्हतारा अनंतनायक आणि चांगदेव म्हतारा हे साक्षीदार होते.

व्यक्तिनामे.—(१) हरिपालदेव—शिलाहार नृपती; (२) वेसु पडवल—मंत्रिमंडळाचा प्रमुख; (३) पदमसिव राउल—महाप्रधान; (४) लक्ष्मण प्रभु—महाप्रधान; (५) वासुगि

नायक—प्रधान; (६) आहवमल्लदेव—महाप्रधान; (७) राजानक—आनेवडीचा पटकील (पाटील); (८) ब्रह्मदेवभट्ट—दान स्वीकारणारा उपाध्याय; (९) दिवाकर भट्ट—ब्रह्मदेवभट्टाचा पिता; (१०) गोवन्नभट्ट (गोवर्धनभट्ट?)—ब्रह्मदेवभट्टाचा पितामह; (११) रिसि म्हतारा (महत्तर)—ग्रामप्रमुख साक्षीदार; (१२) नागुजी म्हतारा—ग्रामप्रमुख साक्षीदार; (१३) अनंतनायक—ग्रामप्रमुख साक्षीदार; (१४) चांगदेव म्हतारा—ग्रामप्रमुख साक्षीदार.

ग्रामनामे.—(१) सूर्पारक—हल्लीचे सोपारा अथवा नालासोपारा (जि. ठाणे); (२) वट्टार—सोपाऱ्याच्या वायव्येस सुमारे ६ मैलांवर असलेले वटारखेडे असावे; (३) आनेवाडी—ओळख पटत नाही.

विशेष महत्त्व.—म्हतारा हे उपनाम उल्लेखनीय आहे.

१०४. आपेगाव शिलालेख

जिल्हा—**औरंगाबाद** तालुका—**पैठण**

प्राप्तिस्थळ.—हा लेख आपेगाव येथील विज्ञानेश्वराचे मंदिरात गाभाऱ्याच्या उंबरठ्याच्या शिळेवर आतील बाजूने कोरलेला आढळला.

संदर्भ.—तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.**, १९६३, नं. ७४, पृ. ३७६–३७८.

भाषा व लिपी.—मराठी; इ. स. १२ व्या शतकातील देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—श्री. तुळपुळ्यांच्या मतानुसार इ. स. ११०० च्या आसपास.

सारांश.—वंकनाथदेवाच्या (शिवाच्या) भक्तीचे माहात्म्य सांगितले आहे. कायस्थ धारू पंडिताच्या वंशातील पंडित पद्मण याचा पुत्र षेईदेव (खेईदेव) याने भगवानाची भक्ती केली. त्याचा हा महाप्रसाद होय. वंकदेवाची भक्ती जन्मोजन्मी करावी. जो करणार नाही त्याला गिरिजा देवीची शपथ आहे. जो कोणी भक्ती करील त्याला उत्तम फळ मिळेल.

व्यक्तिनामे.—(१) धारु पंडित; (२) पंडित पद्मण; (३) षेईदेव (खेईदेव)—देऊळ बांधणारा पद्मण पंडिताचा पुत्र.

१०५. आभोणे ताम्रपट, कटचुरी शंकरगण

जिल्हा—**नाशिक** तालुका—**कळवण**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट आभोणे येथील एका राजपूत कुटुंबाच्या घरी सापडला.

संदर्भ.—(१) पाठक, के. बी., **इ. आय्.**, १९०७–८, खंड ९, पृ. २९६(१); (२) मिराशी, वा. वि., **सी. आय्. आय्.**, १९५५, खंड ४, पृ. ३८–४४.

भाषा व लिपी.—या लेखाची भाषा संस्कृत असून अक्षरांचे वळण दाक्षिणात्य लिपीच्या पश्चिमी पद्धतीचे आहे.

राजवंश व राजा.—हा लेख कटचुरी वंशाच्या शंकरगण या राजाचा आहे.

वर्ष व तिथी.—कटचुरी संवत् ३४७ व्या वर्षाची श्रावण महिन्याची शुक्ल पक्षातील पौर्णिमा किंवा ३ ऑगस्ट इ. स. ५९७ (गेलेले वर्ष).

सारांश.—हा ताम्रपट कटचुरी शंकरगण याचा असून त्याने हा त्याच्या उज्जयिनी येथील तळावरून दिलेला आहे. या ताम्रपटाचा उद्देश कटचुरी राजा शंकरगण याने भोगवर्धन

विषयातील वल्लिसीका या खेड्यातील दोन्ही बाजूने ४० दंड भरत असलेली १०० निवर्तने जमीन तैत्तिरीय शाखेच्या गौतम गोत्रीय ब्राह्मणास दिली हे नमूद करण्याचा आहे. हा ब्राह्मण कल्लिवन (कळवण) गावाचा रहिवासी आहे. हे दान गोग्गा याच्या विनंतीनुसार केलेले असून बलि, चरु, वैश्वदेव, अग्निहोत्र आणि इतर विधी करणे हा या दानाचा उद्देश आहे.

व्यक्तिनामे.—(१) शंकरगण—कटचुरी नृपती; (२) कृष्णराज; (३) गोग्गा—दानासाठी विनंती करणारा.

ग्रामनामे.—(१) उज्जयिनी—आधुनिक उज्जयिनी; (२) कल्लिवण—कळवन, जिल्हा नाशिक; (३) भोगवर्धन—हे बहुधा औरंगाबाद जिल्ह्यातील भोकरदन असावे. या ठिकाणी ब्राह्मणी धर्माची शैलोत्कीर्ण मंदिरे सापडली आहेत; (४) वल्लिसीका—हे बहुधा भोकरदनच्या दक्षिणेस सात मैलांवर असलेले हल्लीचे वळस असावे.

१०६. आळंदी, स्मारक शिलालेख, शके ११३९

जिल्हा—**पुणे** तालुका—**खेड**

प्राप्तिस्थळ.—हा लेख आळंदी येथील हरिहरेंद्र स्वामींच्या मठाजवळ असलेल्या समाधीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) राजवाडे, वि. का., **विश्ववृत्त,** वर्ष २, अंक ९, मार्च १९०८; (२) खरे, ग. ह., **श्रीक्षेत्र आळंदी,** शके १८५३, पृ. ११–१३; (३) तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.,** १९६३, नं. २२ पृ. ११४–११७.

भाषा व लिपी.—संस्कृत–मराठी मिश्र भाषा; जुन्या वळणाची देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—चैत्र शुद्ध पंचमी (५), भौमवार, ईश्वरनाम संवत्सर, शके ११३९; मंगळवार १४ मार्च, इ. स. १२१७.

सारांश.—या लेखात ही समाधी रत्ना व तिचा पती कृष्ण यांची आहे हे नमूद केलेले आहे.

व्यक्तिनामे.—(१) रत्ना; (२) कृष्ण—रत्नाचा पती.

१०७. आश्वी ताम्रपट, यादव ऐरमदेव

जिल्हा—**अहमदनगर** तालुका—**संगमनेर**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट आश्वी येथील एका शेतात सापडला.

संदर्भ.—(१) पटवर्धन, पा. न. **भा. इ. सं. मं.,** १९२२–२३, पृष्ठ १–५; (२) डिस्कळकर, डी. बी., **बॉ. ब्रँ. रॉ. ए. सो.,** १९२७, खंड ३, पृ. १८९–१९०; (३) गै., जी. एस्., **इ. आय्.** १९६५–६६, खंड ३६, पृ. २४९–२५६.

भाषा व लिपी.—संस्कृत; ११ व्या शतकातील नागरी.

राजवंश व राजा.—पश्चिमेकडील चालुक्य त्रिभुवनमल्ल पेर्माडिदेव (विक्रमादित्य ६ वा) याचा मांडलिक यादव वंशाचा ऐरमदेव.

वर्ष व तिथी.—शके १०२०, बहुधान्य संवत्सर, वैशाख अमावास्या; सोमवार, ३ मे, इ. स. १०९८.

सारांश.—या ताम्रपटात महामंडलेश्वर ऐरमदेव याने पाच प्रधानांच्या अनुमतीने कोंकणे हे संगमनेर ८४, श्रीनगर २,५०० मधील सेऊण देशातील खेडे कूकल नावाचा पंडित व इतर ३० ब्राह्मणांना

दान दिले हे नमूद केले आहे. कूकल पंडित हा काश्यप गोत्री व शाकल शाखेचा असून तो नागण क्रमवित् याचा पणतू, सुदनभट्टाचा नातू व गोपतिभट्टाचा पुत्र होता. तो करहाटकाहून आला होता. या ब्राह्मणांनी काही द्राम कर म्हणून राजाला द्यावे. हे शासन हरिश्चंद्राने लिहिले.

व्यक्तिनामे.––(१) दृढप्रहार–यादव वंशातील पहिला नृपती ; (२) सेउणचंद्र (प्रथम) यादव नृपती ; दृढप्रहार याचा पुत्र, (३) धाडियप्प––यादव नृपती––सेउणचंद्र (प्रथम) चा पुत्र; (४) बृहद् भिल्लम किंवा भिल्लम (प्रथम)–यादव नृपती, धाडियप्पाचा पुत्र; (५) राज–यादव नृपती, भिल्लम (प्रथम) चा पुत्र ; (६) वड्डिग– यादव नृपती, राजाचा पुत्र ; (७) भिल्लम (द्वितीय)–यादव नृपती, वड्गाचा पुत्र; (८) लच्छियव्वा–भिल्लम (द्वितीय) ची पत्नी, राष्ट्रकूट वंशाची राजकन्या ; (९) झंजराज–राष्ट्रकूट नृपती, लच्छियव्वाचा पिता ; (१०) वेसूक– यादव नृपती, भिल्लम (द्वितीय) चा पुत्र ; (११) भिल्लम (तृतीय)––यादव नृपती, वेसूकाचा पुत्र ; (१२) वाडुगी––यादव नृपती, भिल्लम (तृतीय) चा पुत्र ; (१३) वेसुगि–यादव नृपती, वाडुगीचा भाऊ ; (१४) भिल्लम(चतुर्थ)-वेसुगीनंतरचा यादव राज्यकर्ता––सेउणचंद्र (द्वितीय) ; (१५) ऐरमदेव––दान देणारा यादव नृपती, सेउणचंद्र (द्वितीय) चा पुत्र ; (१६) सोमेश्वर (द्वितीय)––ऐरमदेवाने जिंकलेला चालुक्य राजा ; (१७) पेर्माडिदेव (विक्रमादित्य ६ वा)–चालुक्य नृपती; (१८) योगल्ला––ऐरमदेवाची पत्नी ; (१९) कूकल पंडित––दान स्वीकारणारा काश्यप गोत्री, शाकल शाखेचा ब्राह्मण ; (२०) गोपतिभट्ट––कूकल पंडिताचा पिता ; (२१) सुदनभट्ट––कूकल पंडिताचा पितामह ; (२२) नागण क्रमवित्––कूकल पंडिताचा पितामह.

ग्रामनामे.––(१) द्वारावती पट्टन––द्वारका (गुजरात); (२) चन्द्रादित्यपूर––नाशिकच्या शान्येस ४० मैलांवर असलेले चांदोर किंवा चांदवडें असावे; (३) सिंहिनेर––नाशिकच्या आग्नेयेस १७ मैलांवर असलेले हल्लीचे सिन्नर. यालाच श्रीनगर असेही म्हणतात; (४) करहाटक–सातारा जिल्ह्यातील हल्लीचे कऱ्हाड; (५) सेउणदेश–नाशिकच्या भोवतालचा प्रदेश; (६)संगमनेर–अहमदनगरच्या वायव्येस ५० मैलांवर असलेले हल्लीचे संगमनेर; (७) कोंकणेग्राम–संगमनेरच्या पूर्वेस ७।। मैलांवर असलेले कोकणगाव; (८) कोनची––संगमनेरच्या पूर्वेस १० मैलांवर असलेले हल्लीचे कोंची; (९) मणियवली––संगमनेरच्या पूर्वेस ८ मैलांवर असलेले मनोली; (१०) जुंयरवे––संगमनेरच्या पूर्वेस ५ मैलांवर प्रवरेच्या उत्तरेस असलेले हल्लीचे जोर्वे; (११) वडगव ग्राम––संगमनेरच्या पूर्वेस ५ मैलांवर असलेले हल्लीचे वडगाव; (१२) कपथकग्राम–संगमनेरच्या उत्तरेस १० मैलांवर असलेले हल्लीचे कवठे कमळेश्वर असावे; (१३) मेशी––पाणीय (मेषी-पानीय)––हे एखाद्या जलप्रवाहाचे नाव असावे किंवा मेंढवण; (१४) नर्मदापुर––निश्चित ओळख पटत नाही.

विशेष महत्त्व.––आतापर्यंत ज्ञात असलेल्या यादवांच्या ताम्रपटात ऐरमदेवाचा ताम्रपट नियमच उजेडात आला आहे.

१०८. इस्लामपूर ताम्रपट, गंग नृपती विजयादित्य

जिल्हा––**सातारा** तालुका––**वाळवे**

प्राप्तिस्थळ.––प्रस्तुत ताम्रपट इस्लामपूर येथील मुधळे या गृहस्थाजवळ होता.

संदर्भ.––पाठक, व कोनोव, इ. आय्., १९१३–१४, खंड १२, पृ. ४८–५५.

भाषा व लिपी.––संस्कृत; लिपी दाक्षिणात्य वळणाची असून गंग घराण्याच्या इतर लेखांप्रमाणे आहे.

राजवंश व राजा.––गंग वंशीय नृपती विजयादित्य.

वर्ष व तिथी.––शासन वर्ष ३० वे.

सारांश.—हा लेख गंग नृपती विजयादित्य याच्या ३० व्या शासन वर्षातील आहे. त्याने सत्प्रसादाच्या जवळ असलेल्या तळयाच्या उत्तरेकडील कोपऱ्याच्या वायव्येस व दक्षिणेकडील कोपऱ्याच्या बाजूस असलेली तांदुळाची शेते व घर वेठुवलु येथे रहात असलेल्या हारितु गोत्री नागशर्मन् याचा पुत्र सोमशर्मन् याला दान दिले असा उल्लेख या लेखात आहे.

व्यक्तिनामे.—(१) कोंगुणिवर्मन्—जाह्नवेय कुलातील गंग वंशीय राजा; (२) माधव (प्रथम)—गंग राजा, कोंगणिवर्मन् याचा पुत्र; (३) हरिवर्मन्—गंग नृपती, माधव (प्रथम) चा पुत्र; (४) विष्णुगोप—गंग नृपती, हरिवर्मन् याचा पुत्र; (५) माधव (द्वितीय)—गंग नृपती, विष्णुगोपाचा पुत्र; (६) कोंगणि अविनीत—गंगनृपती, माधव (द्वितीय) चा पुत्र; (७) कृष्णवर्मन्—कदंब नृपती, कोंगणि अविनीत याचा मामा; (८) कोंगणि दुर्विनीत—गंग नृपती, कोंगणि अविनीत याचा पुत्र; (९) कोंगणि मुष्कर—गंग नृपती,कोंगणि दुर्विनीत याचा पुत्र; (१०) कोंगणि श्रीविक्रम—गंग नृपती, कोंगणि मुष्कराचा पुत्र; (११) सिंधुराज—कोंगणि श्रीविक्रमाचा मातामह; (१२) कोंगणि भूविक्रम—गंग नृपती, कोंगणि श्रीविक्रमाचा पुत्र; (१३) श्रीवल्लभ—कोंगणि भूविक्रम(?) (१४) नवकाम—गंग नृपती, श्रीवल्लभाचा धाकटा भाऊ; (१५) कोंगणि शिवमार—गंग नृपती; (१६) श्री पुरुष—गंग नृपती, कोंगणि शिवमाराचा नातू; (१७) विजयमहादेवी—पृथिवी कोंगणि श्रीपुरुष याची पत्नी, चालुक्य राजकन्या; (१८) विजयादित्य —गंग नृपती, पृथिवी कोंगणि श्रीपुरुष याचा पुत्र; (१९) सोमशर्मन्—दान स्वीकारणारा हारिती गोत्री ब्राह्मण; (२०) नागशर्मन्—सोमशर्मन् याचा पिता; (२१) धर्मशर्मन्—सोमशर्मन् याचा पितामह.

ग्रामनामे.—(१) आसन्दी—कडूर जिल्ह्यातील कडूर तालुक्यातील हल्लीचे आसंदी हे खेडे असावे. पुढील गावांची ओळख पटत नाही; (२) वेथुवुलु; (३) अन्दरि; (४) आलत्तुर; (५) पोरुलरे; (६) पेळनगर; (७) वेळंद.

१०९. उखळद जैन शिलालेख

जिल्हा—**परभणी**

प्राप्तिस्थळ.—दिलेले नाही.

संदर्भ.—इं. अ. रि. १९५८–५९, पृ. ६०, नं. २१.

भाषा व लिपी.—दिलेली नाही.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी—(१) वि. सं. १२९६–इ. स. १२३८; (२) वि. सं. १६६९–इ. स. १६११.

सारांश.—शके १५०६ ते १६८६ (इ. स. १५८४ ते १७६४) व विक्रम सं. १२९६ ते १६६९ (इ. स. १२३८ ते १६११) या काळात लिहिलेले सुमारे ७० जैन शिलालेख आहेत.

११०. उन्हकदेव शिलालेख, यादव रामचंद्रदेव

जिल्हा—**अदिलाबाद** तालुका—**किनवट**

प्राप्तिस्थळ.—हा लेख अदिलाबाद जिल्ह्यात, किनवट तालुक्यात उन्हकदेव येथील मुख्य देवालयाच्या दक्षिणेकडील दरवाजाच्या डाव्या बाजूला भिंतीत बसवलेल्या शिळेवर कोरलेला आहे.

संदर्भ.—तुळपुळे, शं. गो., प्रा. म. को. ले., १९६३, नं. ३७, पृ. १९८–२०५.

भाषा व लिपी.—पहिल्या तीन ओळी सोडल्यास लेख मराठी भाषेत यादवकालीन देवनागरी लिपीमध्ये कोरलेला आहे.

राजवंश व राजा.—यादववंशीय नृपती रामचंद्रदेव.

वर्ष व तिथी.—शके १२०१, विक्रम संवत्सर, इ. स. १२७९.

सारांश.—या लेखावरून शके १२०१ मध्ये श्री रामचंद्रदेव यादव राज्य करीत होता असे दिसते. त्याचा हाथीसाहाणी भावकदेव व प्रधान हेमाडि पंडित होता. त्याचा दुय्यम अधिकारी कायस्थ सोमदेव पंडित हा होता. शके १२०१ मध्ये माहूर गावचा रहिवासी व सरणु नायकाचा पुत्र कण्व शाखीय, कौंडिण्य गोत्री मेघदेव याने उन्हकदेवाचा प्रासाद बांधला. या शासनपत्रात तत्कालीन नीतीस अनुसरून, ग्रामदेवतेसाठी, राजमार्गातील ब्राह्मणांसाठी, काही भंगलेली स्थाने पुन्हा रचण्यासाठी देणग्या नमूद केल्या आहेत. त्याचप्रमाणे उन्हकदेव व राम यांच्यासाठी देणग्या दिलेल्या आहेत. पंडित लाक रावोता हा या शासनाचा लेखक होता.

व्यक्तिनामे.—(१) रामचंद्रदेव—यादव नृपती; (२) भावकदेव—हाथिसाहाणी; (३) सोमदेव पंडित—कायस्थ मुतालिक; (४) हेमाडि पंडित—प्रधान; (५) मेघदेव—उन्हकदेवाचा प्रासाद बांधणारा कण्व शाखीय, कौंडिण्य गोत्री; (६) सरणु नायक—मेघदेवाचा पिता; (७) पंडित लाक रावोता—लेखक.

ग्रामनामे.—(१) अुबरे—उन्हकदेवाच्या पश्चिमेस ३ मैलांवरील अुंबरी; (२) ओघाली—उन्हकदेवाच्या ईशान्येस १४ मैलांवरील वघारी; (३) करंदि—उन्हकदेवाच्या पूर्वेस ५ मैलांवरील करंजी; (४) काप—उन्हकदेवाच्या वायव्येस १० मैलांवर असलेले काप; (५) कुर्वली—उन्हकदेवाच्या उत्तरेस ५ मैलांवरील कुरली; (६) गुढा—उन्हकदेवाच्या वायव्येस ८ मैलांवरील गुढे; (७) चिंचवली—उन्हकदेवाच्या पश्चिमेस ५ मैलांवरील चिंचखेड; (८) जिरवलि—उन्हकदेवाच्या दक्षिणेस ६ मैलांवरील जवरली; (९) तलेपल—ओळख पटत नाही; (१०) पटवदे—उन्हकदेवाच्या दक्षिणेस ५ मैलांवरील पाटोदे; (११) पिंपलसेंडा किंवा पीपलसेंडा—उन्हकदेवाच्या पूर्वेस ३ मैलांवरील पिंपळशेंडा; (१२) पिंपलजै—उन्हकदेवाच्या आग्नेयेस ९ मैलांवरील पिंपळजे; (१३) बोथी किंवा बोंथी—उन्हकदेवाच्या पश्चिमेस २ मैलांवरील बोथ; (१४) मातापूर—उन्हकदेवाच्या पश्चिमेस २४ मैलांवरील माहूर; (१५) लिंग—उन्हकदेवाच्या आग्नेयेस २ मैलांवरील लिंगी; (१६) षापर—उन्हकदेवाच्या उत्तरेस २५ मैलांवरील खापरी; (१७) सकारगवा—उन्हकदेवाच्या ईशान्येस १० मैलांवरील साखरगाव(?); (१८) सांगवी—उन्हकदेवाच्या ईशान्येस ७ मैलांवरील सांगवी; (१९) सावेरे—उन्हकदेवाच्या वायव्येस ३ मैलांवरील सावळी.

१११. उमराणी शिलालेख

जिल्हा—**सांगली** तालुका—**जत संस्थान**

प्राप्तिस्थळ.—हा लेख उमराणी येथील हेमलिंग देवालयाच्या आतील बाजूस असलेल्या एका शिळेवर कोरलेला आहे.

संदर्भ.—पंचमुखी, आर्. एस्., **कर्नाटक इन्स.**, १९५२, खंड २, पृ. ५१–५९.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—पश्चिमी चालुक्य नृपती त्रिभुवनमल्लदेव विक्रमादित्य ६ वा.

वर्ष व तिथी.—(अ) शके १०४४, शुभकृत् संवत्सर, माघ अमावास्या, सोमवार, सूर्यग्रहण (लेखात दिलेली तिथी ह्या वर्षी सोमवारऐवजी बुधवारी आलेली होती असे आढळते.

परंतु शके १०४५, शोभन संवत्सरामध्ये मात्र ही तिथी बरोबर आलेली दिसते.) सोमवार, जानेवारी २२, इ. स. ११२३, (ब) शके १०६४, दुंदुभि संवत्सर, चैत्र पौर्णिमा, मेष संक्रांत (या तिथीचासुद्धा मेळ जमत नाही.)

सारांश.—हा लेख त्रिभुवनमल्लदेव याच्या कारकिर्दीतील आहे. या लेखाचा उद्देश त्रिभुवनमल्लदेवाचा मांडलिक महामंडलेश्वर हेम्मादिदेव याने आपली पत्नी पट्टमहादेवी चंदलदेवी व पुत्रासह हेम्मेश्वर देवालयाला जमीन व इतर काही देणग्या दिल्या हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) तैल (द्वितीय)—चालुक्य राजा; (२) त्रिभुवनमल्लदेव—चालुक्य राजा; (३) हेम्मादिदेव—बहुतेक शिलाहार राजा; (४) चंदलदेवी—हेम्मादिदेवाची राणी; (५) दोलरसदेव—शिलाहार राजपुत्र; (६) वर्नसिंहदेव—शिलाहार राजपुत्र; (७) चंद्रभरन पंडितदेव—मंदिराचा आचार्य.

ग्रामनामे.—(१) अंबरवनी; (२) कोपणपूर—हल्लीचे कोपबाळ.

११२. उमराणी शिलालेख, कलचुरी भुजबलमल्लदेव

प्राप्तिस्थळ.—हा लेख उमराणी येथील हेमलिंग देवालयाच्या आतल्या बाजूस उजवीकडे असलेल्या शिळेवर कोरलेला आहे.

संदर्भ.—पंचमुखी, आर्. एस्., **कर्नाटक इन्स.**, १९५२, खंड २, पृ. ९५–९९.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—कलचुरी वंशीय नृपती भुजबलमल्लदेव (बिज्जल) व त्याचा मांडलिक महाप्रधान मधुवनय्य मल्लिदेव.

वर्ष व तिथी.—(अ) शके १०८९, सर्वजित् संवत्सर, वैशाख अमावास्या, सोमवार, सूर्यग्रहण (या तिथीचा मेळ जमत नाही); (ब) शके १०९६, विजय संवत्सर, ज्येष्ठ अमावास्या, सूर्यग्रहण, मंगळवार (सोमवार) १२ जून, इ. स. ११७३.

सारांश.—या लेखाचा उद्देश (१) मधुवनय्य, इतर अधिकारी व महामंडलेश्वर हेम्मादिदेवरस यांनी हेम्मेश्वर व चंदलेश्वर या देवालयांच्या दुरुस्तीचे नवे बांधकाम व अखंड दीप लावण्यासाठी भुजबलमल्लदेव याच्या सूचनेवरून हिरियोक्कोलु प्रमाणानुसार ५५ मत्तर जमीन व तेलघाणे दान दिले हे नमूद करणे हा होता. (२) कप्पदेव गोपतिदंडनायक याच्या नेतृत्वाखाली काही अधिकाऱ्यांनी हेम्मेश्वर मंदिराची दुरुस्ती, बांधकाम, संन्याशांना भोजन घालण्यासाठी उमरावतीच्या हिरियोक्कोलु प्रमाणानुसार १२ मत्तर जमीन चंदलदेवीच्या इच्छेनुसार व रायमुरारि भुजबलमल्लदेव सोयिदेवरस याच्या सूचनेनुसार दान दिली असाही उल्लेख या लेखात आहे.

व्यक्तिनामे.—(१) जोगम—कलचुरि नृपती; (२) हेम्मादिदेव—कलचुरि नृपती; (३) बिज्जल भुजबलमल्लदेव—कलचुरि नृपती; (४) मधुवनय्य मल्लिदेव—महाप्रधान; (५) मधुवरस-देवरस—महाप्रधानाच्या कुळातील व्यक्ती; (६) वसुदेव—महाप्रधानाच्या कुळातील व्यक्ती; (७) मधुसूदन—वसुदेवाचा पुत्र; (८) चामांबिका—मधुसूदनाची पत्नी; (९) मधुसूदन—वसुदेवाच्या कुळातील दंडनायक; (१०) मल्लिदेव विभु—दंडनायक मधुसूदन याचा सहमंत्री; (११) हेम्मभूप—मंडलेश्वर; (१२) हेम्मादि देवरस—महामंडलेश्वर; (१३) कप्पदेव—गोपति दंडनायक; (१४) चंदलदेवी—पट्टमहादेवी; (१५) रायमुरारि भुजबलमल्ल सोयिदेवरस—दानाची सूचना करणारा.

११३. ऋद्धपूर ताम्रपट, प्रभावती गुप्ता

जिल्हा—–अमरावती

तालुका—–**मोर्शी**

प्राप्तिस्थळ.—–हा ताम्रपट ऋद्धपूर येथे महानुभाव पंथी महंत दत्तराज यांच्याजवळ मिळाला. सध्या हा ताम्रपट पुणे येथील भारत इतिहास संशोधन मंडळात आहे.

संदर्भ.—–मिराशी, वा. वि., कॉ. इं. इं., १९६३, खंड ५, पृ. ३३–३७.

भाषा व लिपी.—–संस्कृत; पेटिकाशीर्षक लिपी.

राजवंश व राजा.—–महादेवी प्रभावती गुप्ता—–वाकाटक महाराज रुद्रसेन याची पत्नी, व दामोदरसेन-प्रवरसेन यांची माता.

वर्ष व तिथी.—–कार्तिक शुद्ध १२, प्रवरसेन (द्वितीय) चे १९ वे शासन वर्ष.

सारांश.—–या ताम्रपटाचा मुख्य उद्देश प्रभावती गुप्ता हिने कोशिक विभागातील अश्वत्थ नगरातील शेत, एक घर व शेतकऱ्यांच्या चार झोपड्या यांच्यासह तैत्तिरीय शाखेच्या पराशर गोत्री ब्राह्मणाला दान दिले हे नमूद करण्याचा होता. या दान प्रसंगी देवनंद स्वामिन् हा दूतक होता व लेख लिहिण्याचे काम प्रभुसिंह याने केले.

व्यक्तिनामे.—–(१) घटोत्कच—–गुप्त नृपती; (२) चंद्रगुप्त (प्रथम)—–गुप्त नृपती, घटोत्क-चाचा पुत्र; (३) कुमारदेवी—–चंद्रगुप्त (प्रथम) ची पत्नी, लिच्छवी राजकन्या; (४) समुद्रगुप्त—–गुप्त नृपती, चंद्रगुप्त (प्रथम) चा पुत्र; (५) दत्तदेवी—–समुद्रगुप्ताची पत्नी; (६) चंद्रगुप्त (द्वितीय)—–गुप्त नृपती, समुद्रगुप्ताचा पुत्र; (७) कुबेरनागा—–चंद्रगुप्त (द्वितीय) ची पत्नी, प्रभावतीगुप्ताची माता; (८) प्रभावतीगुप्ता—–चंद्रगुप्त (द्वितीय) ची कन्या, वाकाटक नृपती रुद्रसेन याची अग्रमहिषी; (९) रुद्रसेन—–वाकाटक नृपती; (१०) दामोदरसेन—–वाकाटक नृपती, रुद्रसेनाचा पुत्र; (११) प्रवरसेन (द्वितीय)—–वाकाटक नृपती, रुद्रसेनाचा पुत्र; (१२) देवनंद-स्वामिन्; (१३) प्रभुसिंह—–लेख लिहिणारा.

ग्रामनामे.—–(१) रामगिरी—–हल्लीचे रामटेक; (२) अश्वत्थनगर—–अमरावती जिल्ह्यात अचलपूर तालुक्यातील असदपुर; (३) कौशिक—–ओळख पटत नाही.

११४. ऋद्धपूर ताम्रपट, भवत्तवर्मन्

प्राप्तिस्थळ.—–हा ताम्रपट ऋद्धपूर येथे महंत दत्तराज यांच्याजवळ मिळाला. सध्या हा ताम्रपट पुणे येथे भारत इतिहास संशोधन मंडळात आहे.

संदर्भ.—–गुप्ते, वाय्. आर्., **इ. आय्.**, १९२७–२८, खंड १९, पृ. १००–१०४.

भाषा व लिपी.—–संस्कृत; पेटिकाशीर्षक लिपी.

राजवंश व राजा.—–नलवंशीय महाराज भट्टारक अर्थपती भवत्तवर्मन्.

वर्ष व तिथी.—–कार्तिक वद्य ७, भवत्तवर्मन् याचे ११ वे शासन वर्ष. संपादकाच्या मते हा ताम्रपट इ. स. च्या ५ व्या शतकातील किंवा ६ व्या शतकाच्या सुरवातीचा असावा.

सारांश.—–या शासनाचा मुख्य उद्देश राजाने पाराशर गोत्री ब्राह्मण मात्राढ्यार्य व त्याचे आठ पुत्रांना कदंबगिरिग्राम दान दिले हे नमूद करणे हा होता. हे शासन राजाज्ञेनुसार चुल्ल याने लिहिले व पद्योपाध्याय यांचा नातू बोप्पदेव याने कोरले.

व्यक्तिनामे.—–(१) भवत्तवर्मन्—–नलवंशीय नृपती; (२) मात्राढ्यार्य—–दान स्वीकारणारा पाराशर गोत्री ब्राह्मण; (३) देवार्य; (४) देवदत्तार्य; (५) कुमारदत्तार्य; (६) वीरदत्तार्य; (७) वसुदत्तार्य; (८) गो (गौ) रिदत्तार्य; (९) ध्रुवदत्तार्य; (१०) दुर्गत्थार्य; (३) ते

(१०) दान स्वीकारणारे, मात्राढयार्याचे पुत्र, पाराशर गोत्री ब्राह्मण; (११) चुल्ल—शासन लिहिणारा; (१२) बोप्पदेव—शासन कोरणारा; (१३) पद्योपाध्याय—बोप्पदेवाचा पितामह.

ग्रामनामे.—(१) नंदिवर्धन—नागपूरजवळचे नगरधन किंवा यवतमाळ जिल्ह्यातील नांदूर असावे; (२) कदंबगिरिग्राम—कळंब; (३) प्रयाग—गंगा-यमुना संगमावर असलेले प्रयाग; (४) मालुक विरक—ओळख पटत नाही; (५) मधुकलतिका—ओळख पटत नाही; (६) बकसामलक—ओळख पटत नाही; (७) त्रिमन्दरविरक—ओळख पटत नाही.

११५. एलापूर ताम्रपट, पश्चिम चालुक्य नृपती विजयादित्य, शके ६२६

जिल्हा—**सातारा**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट चकलधर, एच. सी. यांना भांडारकर, डी. आर. यांच्याकडून मिळाला. हा ताम्रपट सातारा जिल्ह्यात सापडला परंतु ठिकाणाचे निश्चित नाव सांगता येत नाही.

संदर्भ.—चकलधर, एच. सी. इं. हि. क्वॉ. १९२८, खंड ४.

भाषा व लिपी.—संस्कृत; लिपी दाक्षिणात्य वळणाची असून याच राजाच्या रायगड ताम्रपटा-प्रमाणे आहे.

राजवंश व राजा.—बदामीचा चालुक्य नृपती विजयादित्य.

वर्ष व तिथी.—शासन वर्ष ९, पौष पौर्णिमा, शके संवत् ६२६ (गत वर्ष), इ.स. ७०६.

सारांश.—हा ताम्रपट एलापूर येथून देण्यात आलेला आहे. संपादकाच्या मते या ताम्र-पटात या राजाच्या इतर लेखांवरून मिळते त्यापेक्षा ऐतिहासिकदृष्टया महत्त्वपूर्ण अशी माहिती जास्त मिळत नाही. या लेखाचा उद्देश बदामीचा चालुक्य नृपती विजयादित्य याने एलापूर येथे तळ असताना कोल्लगिररहिवासी, भारद्वाज गोत्री पालिस्वामिन् याचा पुत्र केशवस्वामिन् याला अलकुल विषयातील तट्टियग्राम व तंबदरग्रामजवळ असलेले ब्राह्मणवाट ही खेडी दान दिली हे नमूद करण्याचा होता. त्याचप्रमाणे पूर्वी काश्यप गोत्री दुर्गशर्मन् याला ५० निवर्तने जमीन देणगीदाखल दिल्याची नोंदही या लेखात केली आहे. हे दानपत्र महासांधिविग्रहिक निरवद्यपुण्यवल्लभ याने लिहिले आहे.

व्यक्तिनामे.—(१) पुलकेशि वल्लभ—चालुक्य नृपती; (२) कीर्तिवर्मन्—चालुक्य नृपती, पुलकेशि वल्लभाचा पुत्र; (३) श्रीहर्षवर्धन—उत्तरापथेश्वर; (४) सत्याश्रय—चालुक्य नृपती, कीर्तिवर्मन् याचा पुत्र; (५) विक्रमादित्य सत्याश्रय—चालुक्य नृपती, सत्याश्रयाचा पुत्र; (६) विनयादित्य सत्याश्रय—चालुक्य नृपती, विक्रमादित्याचा पुत्र; (७) विजयादित्य सत्याश्रय—दान देणारा चालुक्य नृपती, विनयादित्याचा पुत्र; (८) केशवस्वामिन्—गावाचे दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (९) पालिस्वामिन्—केशवस्वामिन् याचा पिता; (१०) दामस्वामिन्—केशवस्वामिन् याचा पितामह; (११) दुर्गशर्मन्—जमिनीचे दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण; (१२) निरवद्यपुण्यवल्लभ—लेख लिहिणारा महासांधिविग्रहिक.

ग्रामनामे.—(१) ब्राह्मणवाट—दान दिलेले गाव, ओळख पटत नाही; (२) तंबदरग्राम—ओळख पटत नाही; (३) तट्टियग्राम—ओळख पटत नाही; (४) कोल्लगिर—केशवस्वामिन् याचे वास्तव्य स्थान, ओळख पटत नाही; (५) एलापूर—हल्लीचे एलोरा असावे.

११६. एलोरा ताम्रपट, राष्ट्रकूट दंतिदुर्ग

जिल्हा–औरंगाबाद तालुका–खुल्दाबाद

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट पुरातत्त्व विभागाने श्रीमती प्लंकेट यांच्याकडून विकत घेतला.

संदर्भ.—दीक्षित, एस्. के., **इ. आय्.**, १९३९–४०, खंड २५, पृ. २५–३१.

भाषा व लिपी.—संस्कृत; उत्तरेकडील लिपीप्रमाणे अक्षरांचे वळण.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती दंतिदुर्ग.

वर्ष व तिथी.—सोमवार, अश्विन शुद्ध त्रयोदशी, (शके) संवत् ६६३ ही तिथी बरोबर वाटत नाही. परंतु या तिथीचे वर्णन शके ६६४ (गत वर्ष) या वर्षाशी बरोबर जुळते. १७ सप्टेंबर, इ. स. ७४२.

सारांश.—प्रस्तुत ताम्रपट राष्ट्रकूट नृपती दंतिदुर्ग याच्या कारकिर्दीतील आहे. या ठिकाणी दिलेल्या वंशावळीत कर्कराज व इंद्रराज ही दोन नावे नवीन आहेत. दंतिदुर्गाला उद्देशून असलेल्या पदव्यांमुळे तो स्वतंत्र राजा नव्हता हे स्पष्ट होते. या दानपत्राचा मुख्य उद्देश नवसारिका येथील एका ब्राह्मणाला इंद्रराजपुत्र दंतिदुर्गाने चंदनपुरी ८४ या विषयातील पिप्पलाल हे खेडे दान दिले हे जाहीर करण्याचा होता. हे दानपत्र दंतिदुर्गाने बदरिका या गावातील तळावरून अग्निहोत्र व इतर धर्मकृत्ये करण्यासाठी दिले आहे. हे दानपत्र कुक्कुर याने लिहिले.

व्यक्तिनामे.—(१) दंतिदुर्ग—दान देणारा राष्ट्रकूट नृपती; (२) इंद्रराज—दंतिदुर्गाचा पिता; (३) कर्कराज—दंतिदुर्गाचा पितामह; (४) कुक्कुर—दानपत्र लिहिणारा.

ग्रामनामे.—(१) बदरिका—निश्चित ओळख पटत नाही, दक्षिण गुजरातमध्ये कुठेतरी असावे; (२) नवसारिका—हल्लीचे नौसारी (बडोदे); (३) एलापूर—प्रसिद्ध एलोरा हे ठिकाण; (४) गुहेश्वरतीर्थ—एलोरा येथील घृणेश्वर असावे; (५) चंदनपुरी—हे गिरणा नदीच्या तीरावरील मालेगावच्या नैर्ऋत्येस ३ मैलांवर व एलोऱ्यापासून ४५ मैलांवर असलेले हल्लीचे चंदनपुरी असावे; (६) पिंप्पलाल—चंदनपुरीच्या आग्नेयेस १२ मैलांवर व एलोरापासून ३३ मैलांवर असलेले हल्लीचे पीम्प्रळ.

११७. एलोरा शिलालेख, दशावतार शैलगृह

प्राप्तिस्थळ.—हा लेख एलोरा शैलगृहाच्या समोर असलेल्या मंडपाच्या पश्चिमेकडील बाजूवर कोरलेला आहे.

संदर्भ.—बर्जेस व इंद्रजी, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ५, पृ. ८७–८९.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. आठव्या शतकातील देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती दंतिदुर्ग.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. ८ वे शतक.

सारांश.—हा त्रोटक शिलालेख राष्ट्रकूट नृपती दंतिदुर्ग याच्या कारकिर्दीतला असून यामध्ये दंतिवर्मन् व इंद्रराज या गोविंद (प्रथम) च्या पूर्वीच्या नृपतींची नावे आली आहेत. नंतर या लेखात गोविंद, कर्क, इंद्र ही नावे आलेली आहेत. दंतिदुर्ग फार पराक्रमी होता. त्याने त्याच्या शत्रूंचा पराभव केला आणि श्रीवल्लभ हे नाव धारण केले. महाराज शर्व याची या लेखात स्तुति केलेली आहे.

व्यक्तिनामे.—(१) दंतिवर्मन्—राष्ट्रकूट नृपती; (२) इंद्रराज—राष्ट्रकूट नृपती; (३) गोविंदराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, इंद्रराजाचा पुत्र (?); (४) कर्कराज—राष्ट्रकूट नृपती;

(५) इंद्रराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, कर्कराजाचा पुत्र; (६) दंतिदुर्गराज—राष्ट्रकूट नृपती, इंद्रराज (द्वितीय) चा पुत्र; (७) शर्व—दंतिदुर्गाशी संबंधित राजाचे नाव; (८) वल्लभराज-चालुक्य नृपती कीर्तिवर्मन् (द्वितीय).

ग्रामनामे.—एलापूर—निश्चित ओळख पटत नाही.

११८. एलोरा जैन मूर्तीवरील शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख एलोरा येथील पार्श्वनाथ तीर्थंकराच्या मूर्तीच्या गिरदीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ९९–१००.

भाषा व लिपी.—संस्कृत; नागरी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—शके ११५६, जय संवत्सर, फाल्गुन शुद्ध तृतीया, बुधवार, इ. स. १२३४–३५.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे–"शके ११५६ या वर्षी जय संवत्सर असताना श्रीवर्धनापूर येथे राणुगि याचा जन्म झाला. त्याचा पुत्र म्हालुगि व सून स्वर्णा हे जगात प्रिय होते. या दोघांना चार पुत्र झाले. त्यांमध्ये चक्रेश्वर सद्गुण व औदार्य या दृष्टीने श्रेष्ठ होता. याने चारणांच्या टेकडीवर (किंवा डोंगरावर) पार्श्वनाथाचे स्मारक केले. त्याने जैन तीर्थंकरांच्या बऱ्याच मूर्ती बनवून चारणाद्रि या ठिकाणाला तीर्थाचे स्वरूप प्राप्त करून दिले. आपल्या शुद्धाचरणाने, दृढ निश्चयी स्वभावामुळे, पत्नीशी असलेल्या एकनिष्ठतेमुळे व औदार्यामुळे चक्रेश्वर–शुद्ध धर्माचा संरक्षक–पाचवा वासुदेव बनला."

व्यक्तिनामे.—(१) राणुगि—श्रीवर्धनापूर येथील रहिवासी; (२) म्हालुगि—राणुगिचा पुत्र; (३) स्वर्णा—म्हालुगिची पत्नी; (४) चक्रेश्वर—म्हालुगि व स्वर्णा यांचा पुत्र.

ग्रामनामे.—श्रीवर्धनापूर—ओळख पटत नाही.

११९. औरंगाबाद शिलालेख, यादव सिंघण

जिल्हा—**औरंगाबाद** तालुका—**औरंगाबाद**

प्राप्तिस्थळ.—हा लेख औरंगाबाद येथे मिळाला.

संदर्भ.—इं. अ. रि., १९५४–५५, पृ. २९.

भाषा व लिपी.—उल्लेख नाही.

राजवंश व राजा.—यादव नृपती सिंघणदेव.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—सारांश दिलेला नाही.

व्यक्तिनामे.—सिंघण—यादव नृपती.

१२०. औंढे (आवंढे) शिलालेख, यादव रामचंद्रदेव

जिल्हा—**परभणी** तालुका—**हिंगोली**

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेली शिला औंढेपासून १ मैलावर असलेल्या कनकेश्वरी मंदिराच्या बाहेरच्या बाजूस असलेल्या कट्ट्यात उपयोगात आणलेली होती.

संदर्भ.—तुळपुळे, शं. गो., **प्रा.म.को.ले.**, १९६३, नं. ३५, पृ. १९१–१९२.

भाषा व लिपी.—संस्कृत व मराठी मिश्र; देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—देवगिरीचा यादव नृपती रामचंद्रदेव.

वर्ष व तिथी.—शके १२००, बहुधान्य संवत्सर, श्रावण वदि ७, गुरुवार, ११; ऑगस्ट, इ. स. १२७८.

सारांश.—हा लेख यादव नृपती रामचंद्रदेव याचा आहे. या लेखाचा उद्देश वर दिलेल्या तिथीस राजा रामचंद्रदेव हा औंढे येथे होता हे नमूद करणे हा दिसतो. या लेखात सिवदेव पंडित याचाही उल्लेख आहे. याने बहुधा हा लेख लिहिला असावा.

व्यक्तिनामे.—(१) रामचंद्रदेव—यादव नृपती; (२) सिवदेव पंडित—लेख लिहिणारा.

१२१. करंजगाव शिलालेख

जिल्हा—**ठाणे** तालुका—**वसई**

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख करंजगाव येथे सापडला. (करंजोण)

संदर्भ.—**बॉ. गॅ.**, खंड १, भाग २, पृ. १९, ओळ ११, नं. ३.

भाषा व लिपी.—नोंदलेली नाही.

राजवंश व राजा.—महामंडलेश्वर हरिपालदेव या नावाचा या लेखात उल्लेख आहे. परंतु वंश, घराणे वगैरेंचा उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—दिलेली नाही.

सारांश.—हा लेख हरिपालदेव याचा आहे. या लेखामध्ये १२ ओळी आहेत. व हा लेख पूर्ण वाचता येत नाही. तिसऱ्या व चौथ्या ओळीत महामंडलेश्वर हरिपालदेव ही अक्षरे वाचता येतात.

व्यक्तिनामे.—हरिपालदेव—महामंडलेश्वर.

१२२. कऱ्हाड बौद्ध शैलगृह शिलालेख

जिल्हा—**सातारा** तालुका—**कऱ्हाड**

प्राप्तिस्थळ.—हा लेख कऱ्हाड शैलगृहात कोरलेला आढळला.

संदर्भ.—बुल्हर व बर्जेस, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८९, नं. ६.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात गोपालपुत्र संघमित्र याने लेण्याची देणगी दिल्याचे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) संघमित्र—दान देणारा; (२) गोपाल—संघमित्राचा पिता.

१२३. कऱ्हाड ताम्रपट, राष्ट्रकूट कृष्ण (तृतीय) अकालवर्ष

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट कऱ्हाड येथे एका जुन्या घराचा पाया खोदत असताना सापडला.

संदर्भ.—भांडारकर, आर्. जी., इ. आय्., १८९६–९७, खंड ४, पृ. २७८–२९०.

भाषा व लिपी.—संस्कृत; प्राचीन नागरी.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती कृष्ण (तृतीय).

वर्ष व तिथी.—बुधवार, फाल्गुन वद्य १३, कालयुक्त संवत्सर, शक संवत् ८८० (गत वर्ष), बुधवार, ९ मार्च, इ. स. ९५९.

सारांश.—या ताम्रपटात अकालवर्ष, वल्लभ, याही नावांनी संबोधिलेल्या कृष्णराज या राष्ट्रकूट राजाने करहाट विषयातील कांके हे गाव दान दिल्याचे नमूद केले आहे. दान घेणारा गगनशिव हा करंजखेटचा ईशानशिव याचा शिष्य होता आणि हे दान करहाट येथे राहणाऱ्या भिक्षूंचा चरितार्थ चालविण्यासाठी दिले होते.

व्यक्तिनामे.—(१) रट्ट—राष्ट्रकूट घराण्याचा मूळ पुरुष; (२) राष्ट्रकूट—रट्टाचा पुत्र; (३) दंतिदुर्ग—राष्ट्रकूट नृपती; (४) कृष्णराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, दंतिदुर्गाचा चुलता; (५) गोविंदराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, कृष्णराज (प्रथम) चा पुत्र; (६) निरुपम कलिवल्लभ—राष्ट्रकूट नृपती, गोविंदराज (प्रथम) चा धाकटा भाऊ; (७) जगत्तुंग (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, निरुपमाचा पुत्र; (८) नृपतुंगदेव—राष्ट्रकूट नृपती, जगत्तुंग (प्रथम) चा पुत्र; (९) कृष्णराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, नृपतुंगाचा पुत्र; (१०) जगत्तुंग (द्वितीय)—कृष्णराज (द्वितीय) चा पुत्र; (११) इंद्रराज—राष्ट्रकूट नृपती, जगत्तुंग (द्वितीय) चा पुत्र; (१२) अमोघवर्ष (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, इंद्रराजाचा पुत्र; (१३) गोविंदराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, अमोघवर्ष (प्रथम) चा धाकटा भाऊ; (१४) अमोघवर्ष (द्वितीय)— राष्ट्रकूट नृपती, जगत्तुंग (द्वितीय) चा पुत्र; (१५) कृष्णराज (तृतीय)—राष्ट्रकूट नृपती, अमोघवर्ष (द्वितीय) चा पुत्र; (१६) दंतिग—कृष्णराज (तृतीय) चा पराभूत शत्रू; (१७) वप्पुग—कृष्णराज (तृतीय) चा पराभूत शत्रू; (१८) अण्णिग—पल्लव राजा; (१९) गगनशिव—दान स्वीकारणारा मुनी; (२०) ईशानशिव—गगनशिवाचा गुरू; (२१) योस्यम्म—लेख लिहिणारा.

ग्रामनामे.—(१) कांके—हल्लीचे मिरज संस्थानातील कंकी गाव; (२) पेन्दुरे—कंकी गावाच्या दक्षिणेला असलेले पंदूर; (३) आढे—कंकीच्या पश्चिमेस असलेले आढी; (४) करहाट—हल्लीचे कऱ्हाड; (५) कल्ली—ओळख पटत नाही; (६) करंजखेट—ओळख पटत नाही.

१२४. कलमभोम शिलालेख

जिल्हा—**ठाणे** तालुका—**वसई**

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत शिलालेख कलमभोम या गांवाजवळ सापडला.

संदर्भ.—**बॉ. गॅ.**, खंड १, भाग २, पृ. २०, नं. २.

भाषा व लिपी.—उल्लेख नाही.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती अपरादित्य

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

व्यक्तिनामे.—अपरादित्य—शिलाहार नृपती.

१२५. कवठे ताम्रपट, चालुक्य विक्रमादित्य ५ वा

जिल्हा—**सांगली** तालुका—**मिरज**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट कवठे येथील आनंद खाडे यांच्याजवळ होता.

संदर्भ.—फ्लीट, इं. अँ., १८८७, खंड १६, पृ. १५–२४.

भाषा व लिपी.—संस्कृत; दाक्षिणात्य वळणाचीं नागरी लिपी.

राजवंश व राजा.—कल्याणचा चालुक्य नृपती विक्रमादित्य ५ वा.

वर्ष व तिथी.—पौर्णिमा, चंद्रग्रहण, सौम्य संवत्सर, शके ९३० (गत वर्ष); इ. स. १००९–१०.

सारांश.—हा ताम्रपट चालुक्य नृपती विक्रमादित्य ५ वा याच्या अमदानातील आहे. या लेखात पश्चिमी चालुक्य वंशाची विक्रमादित्य ५ वा याच्यापर्यंतची वंशावळ दिलेली आहे. या ताम्रपटाचा मुख्य उद्देश आत्रेय गोत्री ब्राह्मणाला कूण्डी देशातील अळतेज ७०० मधील कोद्दसी हे गाव विक्रमादित्य ५ वा याने दान दिले हे नमूद करण्याचा होता. हे दान त्याने कोल्हापूर या गावाहून दिले आहे.

व्यक्तिनामे.—(१) जयसिंह वल्लभ—चालुक्य राजा; (२) रणराग—चालुक्य नृपती, जयसिंहाचा पुत्र; (३) पुलकेशी (प्रथम)—चालुक्य नृपती, रणरागाचा पुत्र; (४) कीर्तिवर्मन् (प्रथम)—चालुक्य नृपती, पुलकेशी (प्रथम) चा पुत्र; (५) मंगलीश—चालुक्य नृपती, कीर्तिवर्मन् (प्रथम) याचा धाकटा भाऊ; (६) सत्याश्रय (प्रथम)—चालुक्य नृपती, कीर्तिवर्मन् (प्रथम) याचा पुत्र; (७) नेडमरि—चालुक्य नृपती, सत्याश्रय (प्रथम) चा पुत्र; (८) आदित्यवर्मन्—चालुक्य नृपती, नेडमरिचा पुत्र; (९) विक्रमादित्य (प्रथम)—चालुक्य नृपती, आदित्यवर्मन् याचा पुत्र; (१०) युद्धमल्ल—चालुक्य नृपती, विक्रमादित्य (प्रथम) चा पुत्र; (११) विजयादित्य—चालुक्य नृपती, युद्धमल्लाचा पुत्र; (१२) विक्रमादित्य (द्वितीय)—चालुक्य नृपती, विजयादित्याचा पुत्र; (१३) कीर्तिवर्मन (द्वितीय) चालुक्य नृपती, विक्रमादित्य (द्वितीय) चा पुत्र; (१४) कीर्तिवर्मन् (तृतीय)—चालुक्य नृपती, विक्रमादित्य (द्वितीय) च्या भावाचा पुत्र; (१५) तैल (प्रथम)—चालुक्य नृपती, कीर्तिवर्मन् (तृतीय) चा पुत्र; (१६) विक्रमादित्य (तृतीय)—चालुक्य नृपती, तैल (प्रथम) चा पुत्र (१७) भीम—चालुक्य नृपती, विक्रमादित्य (तृतीय) चा पुत्र; (१८) अय्यण (प्रथम)—चालुक्य नृपती, भीमाचा पुत्र; (१९) विक्रमादित्य (चतुर्थ)—चालुक्य नृपती, अय्यण (प्रथम) चा पुत्र; (२०) कृष्ण—राष्ट्रकूट नृपती, विक्रमादित्य (चतुर्थ) चा मातामह; (२१) बोंथादेवी—विक्रमादित्य (चतुर्थ) ची पत्नी, चेदि राजकन्या; (२२) लक्ष्मण—चेदि नृपती, बोंथादेवीचा पिता; (२३) तैल (द्वितीय)—चालुक्य नृपती, विक्रमादित्य (चतुर्थ) चा पुत्र; (२४) जाकव्व—तैल (द्वितीय) ची पत्नी, राष्ट्रकूट राजकन्या; (२५) भम्मह—राष्ट्रकूट नृपती, जाकव्वाचा पिता; (२६) सत्याश्रय (द्वितीय)—चालुक्य नृपती, तैल (द्वितीय) चा पुत्र; (२७) यशोवर्मन्—सत्याश्रय (द्वितीय) चा भाऊ; (२८) भाग्यवती—यशोवर्मन् याची पत्नी; (२९) विक्रमादित्य (पाचवा)—दान देणारा चालुक्य नृपती, यशोवर्मन् याचा पुत्र; (३०) देवेवीसोत्तर भट्ट—दान स्वीकारणारा आत्रेय गोत्री, यजुर्वेदी ब्राह्मण; (३१) दोणेक्रमयित भट्ट—देवेवीसोत्तरभट्टाचा पिता; (३२) देवणक्रमयित-भट्ट—देवेवीसोत्तर भट्टांचा पितामह.

ग्रामनामे.—(१) कोल्लापूर—हल्लीचे कोल्हापूर; (२) अळतगे—कोल्हापूरच्या ईशान्येस १३ मैलांवरचे अळते; (३) कोद्दसी—अळतेच्या उत्तरेस साडेसहा मैलांवर असलेले कुचि किंवा कोची; (४) वट्टार—वर्णा नदीच्या उजव्या तीरावरील, कोचीपासून १।। मैलांवर असलेले वाठार अथवा वटार; (५) भेडवाड—कोचीच्या नैर्ऋत्येस २ मैलांवर असलेले भेंडवाडे; (६) वंगी—कोचीजवळ असलेले वागणी; (७) दुध्धीग्राम—कोचीच्या ईशान्येस २ मैलांवर असलेले दुधगाव.

१२६. कवलापूर शिलालेख, यादव कृष्णदेव

जिल्हा—**सांगली** तालुका—**सांगली**

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख कवलापूर येथे विजेचे खांब रोवण्यासाठी जमीन खोदत असताना मिळाला. सध्या हा शिलालेख सांगली येथे जिल्हा विकास मंडळात आहे.

संदर्भ.—तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.**, १९६३, नं. ३०, पृ. १४८–१५०.

भाषा व लिपी.—संस्कृत व मराठी मिश्र, इ. स. १२ व्या–१३ व्या शतकातील देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—यादव नृपती कृष्णदेव (कान्हरदेव).

वर्ष व तिथी.—माघ शुद्ध, गुरौ, नल (अनल) संवत्सर, शके ११७८ (गत वर्ष); १८ किंवा २५ जानेवारी, इ. स. १२५७.

सारांश.—या लेखामध्ये वर उल्लेखिलेल्या तिथीला यादव नृपती कृष्णदेव याने कावलपूर येथील मंदिराला मालघव या गावातील तीन निवर्तने जमीन दान दिली असे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—कान्हरदेव—यादव नृपती.

ग्रामनामे.—(१) कावलापूर—सध्याचे कवलापूर, जिल्हा सांगली; (२) मालघव—कवलापूर-पासून सुमारे १० मैलांवर असलेले सध्याचे मालगाव.

१२७. कशेळी ताम्रपट, जाखण व रामणस मांडलिक

जिल्हा—**रत्नागिरी**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट कशेळी येथील कनकादित्य मंदिराच्या जामदारखान्यामध्ये सापडला.

संदर्भ.—(१) राजवाडे, **भा. इ. सं. मं.**, शके १८३५, पृ. २२०–२२६; (२) ग्रँट व टेलर, **ट्रान्स. लिट. सोसा. बॉं.**, खंड ३, पृ. ३९१–३९७; (३) दीक्षित, मो. ग., **म. सं. प.**, वर्ष ६, अंक ४, पृ. १४–१६; (४) मास्टर, **बु. स्कू. ओ. अ. स्ट.**, खंड २०, पृ. ४३२–४३३; (५) तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.**, १९६३, नं. ३६, पृ. १९३–१९७; (६) खरे, ग. ह., **द. म. इ. सा.**, खंड १, पृ. ९३–९४.

भाषा व लिपी.—संस्कृत (५८ ओळी) मराठी (१६ ओळी), इ. स. १२ व्या शतकातील देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—शिलाहार राजे भोज व हरिपालदेव; (२) रामणस व जाखण मांडलिक.

वर्ष व तिथी.—(संस्कृत भाग)-आषाढ शुद्ध ४, गुरुवार शके १११३, विरोधिकृत संवत्सर, शुक्रवार २७ जून इ. स. ११९१. (मराठी भाग)-बुधवार, भाद्रपद वद्य ८, शके १२०१, प्रमाथि संवत्सर, ३० ऑगस्ट, इ. स. १२७९. तिथी, वार यांचा मेळ जमत नाही.

सारांश.—या लेखाच्या संस्कृत विभागात शिलाहार नृपती भोज (द्वितीय) याची वंशावळ दिलेली आहे. या लेखाचा उद्देश भोज राजाने पद्मनाल किल्ल्यावर वास्तव्य असताना राजपुत्र गंडरादित्य याच्या विनंतीवरून ब्राह्मण गोविंदभट्ट यास १२ ब्राह्मणांना रोज भोजन घालण्यासाठी कसेलि या खेड्याचे उत्पन्न दान दिले हे नमूद करण्याचा होता. हा भाग ब्राह्मण बमियन याने कोरलेला आहे.

या लेखाच्या मराठी भागात शिलाहार राजा हरिपालदेव शासन करीत असताना त्याचे सेवक रामणस मांडलिक व जाखण मांडलिक यांनी कनकेश्वराचे मंदिराचा जीर्णोद्धार केल्याचे व काही देणग्या दिल्याचे नमूद केले आहे. ताम्रपटाचा हा भाग सेणवी हरिदेव याने लिहिला व कोंतापुरीच्या वज्यन या सुवर्णकाराने कोरला आहे.

व्यक्तिनामे.—(१) जतिग—शिलाहार नृपती; (२) नायिम—शिलाहार नृपती, जतिग याचा पुत्र; (३) चंद्रराज—शिलाहार नृपती, नायिमाचा पुत्र; (४) जतिग (द्वितीय)—शिलाहार नृपती, चंद्रराजाचा पुत्र; (४) गोंकल—शिलाहार नृपती, जतिग (द्वितीय) चा पुत्र; (५) गूवल (प्रथम)—शिलाहार नृपती, गोंकलचा धाकटा भाऊ; (६) कीर्तिराज—शिलाहार नृपती, गूवल (प्रथम) चा धाकटा भाऊ; (७) चंद्रादित्य—शिलाहार नृपती, कीर्तिराजाचा धाकटा भाऊ; (८) मारसिंह—शिलाहार नृपती, गोंकल याचा पुत्र; (९) गूवल (द्वितीय)—शिलाहार नृपती, मारसिंहाचा पुत्र; (१०) भोज (प्रथम)—शिलाहार नृपती, गूवल (द्वितीय) याचा धाकटा भाऊ; (११) बल्लाळ–शिलाहार नृपती, भोज (प्रथम) चा धाकटा भाऊ; (१२) गंडरादित्य (प्रथम)–शिलाहार नृपती, बल्लाळाचा धाकटा भाऊ; (१३) विजयादित्य—शिलाहार नृपती, गंडरादित्य (प्रथम) चा पुत्र; (१४) भोज (द्वितीय)—दान देणारा शिलाहार नृपती, विजयादित्याचा पुत्र; (१५) गंडरादित्य (द्वितीय)—दानाची विनंती करणारा, भोज (द्वितीय) याचा पुत्र; (१६) गोविंदभट्ट–दान स्वीकारणारा ब्राह्मण; (१७) हरिपालदेव–शिलाहार नृपती; (१८) रमणस मांडलिक—दानकर्ता; (१९) वैजुनायक—रमणसाचा पिता; (२०) नारायण मांडलिक—रमणसाचा पितामह; (२१) जाष(ख)ण मांडलिक—दानकर्ता महामंडलेश्वर; (२२) कांदेव (कामदेव)—जाखण मांडलिकाचा पिता; (२३) सेणवी हरिदेव—मराठी लेख लिहिणारा; (२४) वज्यन—मराठी लेख कोरणारा सुवर्णकार; (२५) माधवभट—दान स्वीकारणारा ब्राह्मण; (२६) बमियन—संस्कृत लेख लिहिणारा; (२७) बिम्मयराय—शिलाहार नृपती (राजवाडे).

ग्रामनामे.—(१) अट्टविरे—हल्लीचे आडिवरे; (२) कसेलि—जेथे ताम्रपट सापडला ते कशेळी गाव; (३) कोंतापुर—आडिवरेजवळ असलेले हल्लीचे कोंतापूर; (४) अंबेवेरिक—आजचे आंबेवेर किंवा आंबेरुख.

१२८. कळवण ताम्रपट, भोजदेव, यशोवर्मन्

जिल्हा—**नाशिक** तालुका—**कळवण**

प्राप्तिस्थळ.—सध्या मुंबई येथे प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालयात असलेला हा ताम्रपट कळवण या गावाजवळ मिळाला.

संदर्भ.—बॅनर्जी, आर्. डी., **इ.आय्.**, १९२७–२८, खंड १९, पृ. ६९–७५.

भाषा व लिपी.—संस्कृत; उत्तरेकडील इ. स. ११ व्या शतकातील वळणाची नागरी लिपी.

राजवंश व राजा.—धारा येथील परमार नृपती भोजदेव आणि त्याचा मांडलिक यशोवर्मन्.

वर्ष व तिथी.—चैत्र अमावास्या, सूर्यग्रहण.

सारांश.—हा ताम्रपट यशोवर्मन् या मांडलिक राजाच्या कारकिर्दीतील आहे. भोजदेवाने याला सेलुक या शहराचा अर्धा भाग दान दिला होता. तसेच त्याच्या ताब्यात १,५०७ खेडी होती असाही उल्लेख या ताम्रपटात आहे. प्रस्तुत ताम्रपट जैन धर्मातील श्वेतांबर पंथाचा आहे. या ताम्रपटाचा उद्देश राणक अम्म या गंगवंशीय् राजाने व इतर व्यक्तींनी औद्रहादि विषयातील मुक्तापलि या गावी असताना चैत्री अमावास्या, सूर्यग्रहण या प्रसंगी महिषबुद्धिका येथील कालकालेश्वर या तीर्थाच्या ठिकाणी काही जमीन दान दिली हे नमूद करणे हा होता. दान दिलेल्या जमिनीपैकी काही जमीन ४० निवर्तने, काही २५ निवर्तने व काही दोन निवर्तने अशी होती. याशिवाय जैन पंथीय भिक्षू मुनी सुव्रत देव याला दोन तेलघाण्या, १४ किराणा दुकाने, १४ द्रम्म नाणी श्वेतपाद प्रदेशातील जैन देवालयातील धार्मिक विधी करण्यासाठी दान दिले. हे दानपत्र राज्याचे अधिकारी व त्या प्रदेशाचे रहिवासी यांना उद्देशून काढलेले आहे. या लेखात उल्लेखिलेले अधिकारी असे–(१) देशिलक; (२) ग्रामटक; (३) गोकुलिक; (४) चौरिक; (५) शौलकिक; (६) दंडपाशिक; (७) प्रातिराज्यिक; (८) महत्तम इत्यादी.

व्यक्तिनामे.—(१) भोजदेव—परमारवंशीय नृपती; (२) सिंधुराजदेव—परमारवंशीय नृपती; (३) वाक्पतिराजदेव—परमारवंशीय नृपती; (४) सीयकदेव—परमारवंशीय नृपती; (५) यशोवर्मन्—भोजदेवाचा मांडलिक; (६) राणक अम्म—गंग नृपती; (७) कक्कपै—पूर्वीचा दानकर्ता राजा; (८) वक्कगल—पूर्वीचा दानकर्ता; (९) अम्मदेव—श्वेतांबर जैन आचार्य; (१०) छच्छाई—राणक अम्माची राणी, चालुक्य राजकन्या; (११) सुव्रतदेव—दान स्वीकारणारा जैन मुनी; (१२) जोगेश्वर—दानपत्र लिहिणारा सांधिविग्रहिक.

ग्रामनामे.—(१) धारा—सध्याचे धार शहर; (२) महिषबुद्धिक; (३) औद्रहाडि; (४) माहुडला; (५) हथावाडा; (६) ककड; (७) संगामनगर; (८) मुक्तापलि; (२) ते (८) या गावांची ओळख पटत नाही; (९) कालकालेश्वर—नाशिक जिल्ह्यात कळवणच्या पश्चिमेस १० मैलांवर असलेले कलकलेश्वराचे देवालय असावे.

१२९. कंदलगाव ताम्रपट

जिल्हा—**रत्नागिरी** तालुका—**मालवण**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट कांदलगाव येथे सापडला.

संदर्भ.—तेलंग, के. टी., इं. अॅ., खंड १४, पृ. ३३०, खंड ३०, पृ. २१७.

भाषा व लिपी.—संस्कृत; दाक्षिणात्य वळणाची.

राजवंश व राजा.—बदामीचा चालुक्य नृपती पुलकेशी द्वितीय.

वर्ष व तिथी.—शासनवर्ष ५, इ. स. ६१५–१६.

सारांश.—प्रस्तुत ताम्रपटाचा मुख्य उद्देश महानदीच्या उत्तर तीरावरील रेवतीद्वीपातील पिरिगिप हे खेडे द्रविड ब्राह्मण नारायणस्वामी याला बलि, चरु, वैश्वदेव इत्यादींसाठी दान दिले हे नमूद करण्याचा होता. हे दानपत्र गुंडपदेव याने लिहिले.

व्यक्तिनामे.—(१) पुलकेशी (द्वितीय)—चालुक्य नृपती; (२) नारायणस्वामी—दान स्वीकारणारा द्रविड ब्राह्मण; (३) गुंडपदेव—लेख लिहिणारा.

ग्रामनामे.—पिरिगिप—ओळख पटत नाही.

१३०. कंधार शिलालेख, राष्ट्रकूट कृष्ण (तृतीय)

जिल्हा—**नांदेड** तालुका—**कंधार**

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेली शिळा कंधार शहरापासून १ मैलावर असलेल्या बहादुरपूर या ठिकाणी असलेल्या खासबाग विहिरीजवळ आहे.

संदर्भ.—सरकार व भट्टाचार्य, इ. आय्., १९६३–६४, खंड ३५, पृ. १०५–११४.

भाषा व लिपी.—संस्कृत, उत्तरेकडील इ. स. १० व्या शतकातील वळणाची लिपी.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती कृष्ण (तृतीय).

वर्ष व तिथी.—तिथी दिलेली नाही. अंदाजे इ. स. ९३९–६७.

सारांश.—हा लेख स्तंभाच्या तीन बाजूंवर असल्यामुळे तीन भागात विभागला गेला आहे. या लेखाच्या अ विभागात राष्ट्रकूट नृपती दंतिदुर्ग व कृष्णराज यांची नावे आलेली आहेत. पुढचा भाग नष्ट झाला आहे. ब विभागात बहुधा कृष्ण (तृतीय) याच्या औदार्यपूर्ण कृत्यांची नोंद केली आहे व परमेश्वराची स्तुती करणाऱ्या पवित्र ग्रंथाचे दिवसातून ४ वेळा पठण

करणाऱ्यांना व इतर भाटांना अनुक्रमे २०० द्रम्म नाणी व १ कपड्याची जोडी, १०० द्रम्म व १ कपड्याची जोडी व ५० द्रम्म व एक कपड्याची जोडी दर वर्षी मिळेल असे नमूद केले आहे. या लेखाच्या क विभागात क्षेत्रपाल देवाच्या जवळ बांधलेल्या सर्वलोकाश्रय मंडप, पाणी वाटण्याची पाच, केंद्रे व पाच ठिकाणच्या अग्निस्थानांची नावे यांची नोंद केली आहे. याचा खर्च चालवण्यासाठी दररोज ५० द्रम्म नाणी नेमून दिली होती.

व्यक्तिनामे.—(१) दंतिदुर्ग—राष्ट्रकूट नृपती; (२) कृष्ण (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती दंतिदुर्गाचा चुलता; (३) कालमेघ. या लेखातील अनेक नावे नष्ट झाली आहेत.

ग्रामनामे.—नांदी—हल्लीचे नांदेड.

१३१. कान्हेगाव शिलालेख, यादव कृष्णदेव

जिल्हा—**उस्मानाबाद** तालुका—**उदगीर**

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख कान्हेगाव येथे सापडला.

संदर्भ.—तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.**, १९६३, नं. ३१, पृ. १५१–१५५.

भाषा व लिपी.—संस्कृत व मराठी मिश्र; देवनागरी.

राजवंश व राजा.—यादव नृपती कान्हरदेव (कृष्णदेव).

वर्ष व तिथी.—शके ११८०, कालयुक्त संवत्सर, मार्गशीर्ष शुद्ध १०, गुरुवार; ७ डिसेंबर, इ. स. १२५८.

सारांश.—हा लेख कान्हरदेव याच्या अमदानीतील आहे. या लेखामध्ये कान्हरदेवाचा मांडलिक राठोड वंशीय सोमवंश कुलातील गोपालदेवाचाही उल्लेख आहे. गोपालदेवाने स्वकीयांच्या कल्याणासाठी केलेल्या १ लक्ष होमांचा उल्लेख असून या होमांची पूर्तता व्हावी म्हणून काही गावे दान दिल्याची नोंद या लेखात केली आहे.

व्यक्तिनामे.—(१) कान्हरदेव—यादव नृपती; (२) गोपालदेव—कान्हरदेवाचा मांडलिक; (३) थोरनारायण श्रीपादाचार्य—गोपालदेवाचा पूर्वज.

ग्रामनामे.—(१) लत्तनौर—उस्मानाबाद जिल्ह्यातील हल्लीचे लातूर; (२) तुर्रे—हेर स्टेशनच्या पूर्वेस सुमारे २५ मैलांवर असलेले सध्याचे तुरुरी; (३) सखवल—कान्हेगावच्या पूर्वेस ३ मैलांवर असलेले सध्याचे साकोळे गाव; (४) खंधार—हेर स्टेशनच्या पूर्वेस सुमारे ३० मैलांवरील खंधार: १३ व्या शतकात देशनाम म्हणून प्रसिद्ध असावे; (५) उजलं—हेर स्टेशनच्या पश्चिमेस सुमारे ४ मैलांवरील हल्लीचे उजळंव; (६) कखरणे—हेर स्टेशनच्या उत्तरेस ६ मैलांवर असलेले काखनाळ; (७) उदयगिरी—सध्याचे उदगीर; (८) कोणे—ओळख पटत नाही.

१३२. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

जिल्हा—**ठाणे** तालुका—**बोरिवली**

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ७ मध्ये नं. ५२ मध्ये वर्णिलेल्या शिलालेखाच्या जवळ कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, **हि. रि.**, १८४७, पृ. ५६, नं. १२; (२) स्टिव्हन्सन, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, खंड ४, पृ. १३३, नं. २; (३) वेस्ट, **ज. बॉ.ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८६१, खंड ६, पृ. ५, नं. १३; (४) बुल्हर, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ५, पृ. ७८, नं. १३; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स्, इ. आय्.**, १०, पृ. १०४, नं. ९९६.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी, आंध्र वळणाची.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—नाणेघाट शिलालेखात उल्लेखिलेला सातकर्णि (प्रथम) व गौतमीपुत्र सातकर्णि या सातवाहन नृपतींच्या मधला काळ.

सारांश.—चेमुल येथील सुवर्णकार रोहणिमित (रोहिणीमित्र) याचा पुत्र सुलसदत (सुलसदत्त) याची कुंडाची देणगी.

व्यक्तिनामे.—(१) सुलसदत (सुलसदत्त)—देणगी देणारा; (२) रोहणिमित (रोहिणी-मित्र)—सुवर्णकार, खजिनदार, सुलसदत्त याचा पिता.

ग्रामनामे.—चेमुल—कुलाबा जिल्ह्यातील हल्लीचे चौल.

१३३. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी येथील टेकडीच्या मार्गावर असलेल्या टाके नं. ५ च्या वरच्या मोकळ्या जागेत कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, **हि. रि.**, १८४७, प्ले. ४१, ८; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५३, खंड ५, पृ. १४, नं. २; (३) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ४, नं. ११; (४) बुल्हर, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ५, पृ. ७८, नं. ११; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९-१०, पृ. १०३, नं. ९९४.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—सातवाहन नृपती वासिष्ठीपुत्र सातकर्णि.

वर्ष व तिथी.—दिलेली नाही.

सारांश.—प्रधान सतेरक याची पाण्याच्या कुंडाची देणगी. याशिवाय या लेखात सातवाहन नृपती वासिष्ठीपुत्र सातकर्णि याची राणी, कार्दमकवंशीय महाक्षत्रप रुद्र याची कन्या असा उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—(१) वासिष्ठीपुत्र सातकर्णि—सातवाहन नृपती; (२) रुद्र महाक्षत्रप; (३) सतेरक—अमात्य.

१३४. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी येथील शैलगृह क्र. ८१ च्या व्हरांड्याच्या बाहेरच्या बाजूस डाव्या बाजूला असलेल्या भिंतीवर आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, **हि. रि.** १८४७, प्ले. ४४, १४; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५३, खंड ५, पृ. २३, नं. ११; (३) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. १०, नं. ४४; (४) इंद्रजी (उल्लेख केला आहे.) **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८८३, खंड १५, पृ. ३१२; (५) बुल्हर, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ५, पृ. ७९, नं. १५; (६) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९-१०, पृ. १०८, नं. १०२४.

भाषा व लिपी.—प्राकृत; आंध्र वळणाची ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—सातवाहन नृपती गौतमीपुत्र यज्ञ सातकर्णि.

वर्ष व तिथी.—यज्ञ सातकर्णि याचे १६ वे शासन वर्ष, ग्रीष्म ऋतूतील पहिल्या पंधरवड्यातील पाचवा दिवस.

सारांश.—या लेखात कृष्णशैल पर्वतावर लेणे व मंडप दान दिल्याची नोंद केली आहे. दानकर्ता आनंदपुत्र उपासक अपरेणु हा कल्याणचा रहिवासी असून त्याने एक लेणे व मंडप चतु:दिशांच्या भिक्षुसंघाच्या उपयोगासाठी दान दिले. याशिवाय काही द्रव्य व मंगलस्थान खेड्यातील काही शेतीही कायम स्वरूपात दान दिली.

व्यक्तिनामे.—(१) गौतमीपुत्र यज्ञ सातकर्णि—सातवाहन नृपती; (२) अपरेणु—दान देणारा उपासक; (३) आनंद—अपरेणूचा पिता; (४) जुवारिणिका—आनंदची माता; (५) धर्मदेवी.

ग्रामनामे.—(१) कल्याण—हल्लीचे कल्याण; (२) मंगलस्थान—कान्हेरी गुंफांच्या जवळ असलेले हल्लीचे मगठाण.

१३५. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.— हा लेख कान्हेरी येथील चैत्य लेणे क्र. ३ च्या समोर असलेल्या प्रवेश-द्वाराच्या उजव्या हाताच्या स्तंभावर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, हि. रि., १८४७, प्ले. ४२; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५४, खंड ५, पृ. २५, नं. १२; (३) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६९, खंड ६, पृ. ३, नं. ४; (४) इंद्रजी, (उल्लेख केला आहे.), **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८८३, खंड १५, पृ. ३१२,; (५) बुल्हर, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ५, पृ. ७५–७६, नं. ४; (६) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ.आय्.**,१०, १९०९–१०, पृ. १०२, नं. ९८७.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—सातवाहन नृपती गौतमीपुत्र यज्ञ सातकर्णि.

वर्ष व तिथी.—निश्चित लागत नाही. ग्रीष्म कालातील पाचवा पंधरवडा.

सारांश.—हा लेख सातवाहन नृपती गौतमीपुत्र यज्ञ सातकर्णि याच्या कारकिर्दीतील आहे या लेखात क्षत्रिय बंधू गजसेन व गजमित (गजमित्र) यांनी भदायनीय पंथाच्या आचार्यांच्या नावाने आपल्या नातलगांच्या कल्याणार्थ चैत्य लेणे बांधल्याचे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) गजसेन—दान देणारा क्षत्रिय, गजमित याचा बंधू; (२) गजमित (गजमित्र)—दान देणारा क्षत्रिय, गजसेनाचा बंधू; (३) अचल—भदंत; (४) गहल (गृहल)—भदंत; (५) विजयमित (विजयमित्र)—भदंत; (६) बोधिक—लेणे खोदण्याच्या कामावर देखरेख करणारा भदंत, सेउंल भदंत याचा शिष्य; (७) धमपाल (धर्मपाल)—भदंत; (८) सेऊम्ल—भदंत बोधिकाचा गुरु; (९) अपरेनुक—व्यापारी उपासक; (१०) आनंद—अपरेनुक याचा पिता; (११) खदरकि (स्कन्दरकि)—भिंत गुळगुळीत करणारा; (१२) गौतमीपुत्र यज्ञ सातकर्णि—सातवाहन नृपती.

१३६. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ३६ च्या व्हरांडचाच्या बाहेरच्या बाजूला कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ६, नं. १९; (२) इंद्रजी, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८७७, खंड १२, पृ. ४०७–४०९; (३) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.**, १८८१. पृ. ६०, नं. २; (४) बुल्हर, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ५, पृ. ७९–८०, नं. १४; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ.आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०४, नं. १००१.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—नृपती माढरिपुत्र स्वामि सकसेन.

वर्ष व तिथी.—नृपती माढरिपुत्र स्वामि सकसेन याचे ८ वे शासनवर्ष.

सारांश.—हा लेख माढरिपुत्र स्वामि सकसेन याच्या कारकिर्दीतील आहे. या लेखात कल्याणचा व्यापारी वेण्हुनंदि याच्या व्यापारी गृहपती पुत्राची, पिता वेण्हुनंदि (विष्णुनंदी), माता भधिसमा किंवा बोधिसमा, बंधू हस्तिन् व इतर नातलग यांच्यासह दिलेली लेण्याची देणगी नमूद केली आहे.

व्यक्तिनामे.—(१) वेण्हुनंदि (विष्णुनंदी)—दान देणाऱ्याचा पिता; (२) भधिसमा किंवा बोधिसमा—दान देणाऱ्याची माता; (३) हस्तिन्—दान देणाऱ्याचा भाऊ; (४) माढरिपुत्र स्वामि सकसेन—तत्कालीन राजा.

ग्रामनामे.—कल्याण—हल्लीचे कल्याण.

१३७. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ३६ च्या व्हरांड्याच्या बाहेरच्या बाजूला कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ७, नं. २०; (२) बुल्हर, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ५, पृ. ८२, नं. १९; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स इ. आय्.** १०, १९०९–१०, पृ. १०५, नं. १००२.

भाषा व लिपी.—प्राकृत; आंध्र वळणाची ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—नृपती माढरिपुत्र स्वामि सक (सेन).

वर्ष व तिथी.—निश्चित उल्लेख नाही.

सारांश.— या लेखात लेण्याच्या दानाची नोंद केली आहे. यातील काही नावे वाचता येतात ती अशी.—वेण्हुनंदिन, हालणिका, धामा, वुद्धकय.

व्यक्तिनामे.—(१) वेण्हुनंदिन (विष्णुनंदी); (२) आय्यक; (३) हालणिका; (४) धामा; (५) वुद्धकय; — (६) माढरिपुत्र स्वामिसकसेन—तत्कालिन राजा.

१३८. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ७९ च्या व्हरांड्याच्या बाहेरच्या बाजूस, उजव्या हाताच्या भिंतीवर आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, **हि. रि.**, १८४७, प्ले. ४७, २६; (२) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. १०, नं. ४०; (३) बुल्हर, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ५, पृ. ८६, नं. २९; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०७, नं. १०२१.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—स. सव. ९(१), हेम., १० वा दिवस.

सारांश.—या लेखात महाराज, महाभोजी यांची कन्या, महारठिणी, खंदनागसातक (स्कंदनागशातक) याची माता, महाभोज अहिज(?) धेणसेण याची भगिनी नागमुलनिका (नागमूला) हिची भिक्षुसंघाला दिलेली लेण्याची देणगी नमूद केली आहे.

व्यक्तिनामे.—(१) नागमुलनिका—दान देणारी स्त्री; (२) खंदनागसातक (स्कंदनागशातक) —दान देणाऱ्या स्त्रीचा पुत्र; (३) अहिज(?) धेणसेण—नागमुलनिका हिचा भाऊ.

१३९. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. २ मध्ये असलेल्या दगोबाच्या मागे असलेल्या मोकळ्या जागेतील बुद्ध मूर्तीच्या खाली कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, **हि. रि.**, १८४७, प्ले. ४०, २; (२) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए. सो.**, १८६१, खंड ६, पृ. ३, नं १; (३) बुल्हर, **अ.स.वे.इं.**, खंड ५, पृ. ७४, नं. १; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०१, नं. ९८४.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी, इ. स. ४ थ्या किंवा ५ व्या शतकातील पश्चिमेकडील वळणाची.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. ४ थे–५ वे शतक.

सारांश.—या लेखामध्ये काही नावे नमूद केली आहेत.

व्यक्तिनामे.—(१) नण्ण—वैद्य; (२) राणो किंवा राण(?); (३) भास्कर; (४) भारवि; (५) चेल्लदेव; (६) बोपई (बोपदेव); (७) भट्ट खसु.

१४०. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी चैत्य लेणे नं. ३ च्या व्हरांड्यात असलेल्या बुद्ध मूर्तीच्या खाली कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, **हि.रि.**, १८४७, प्ले. ४१, ६; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५३, खंड ५, पृ. १४, नं. १; (३) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ३, नं. ६; (४) बुल्हर, **अ.स.वे.इं.** १८८३, खंड ५, पृ. ७७, नं. ६; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०३, ९८९.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी इ. स. ४ थ्या–५ व्या शतकातील पश्चिमेकडील वळणाची.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. ४ थे–५ वे शतक.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे– "बुद्ध भगवंताच्या धर्माचे पालन करणारा, त्रिपिटकाचा शिक्षक धर्मवत्स याचा शिष्य गंधकुटीचा पालक, शाक्य भिक्षू बुद्धघोष याची भगवंतमूर्तीची देणगी".

व्यक्तिनामे.—(१) धर्मवत्स—त्रिपिटकाचा शिक्षक; (२) बुद्धघोष—देणगी देणारा शाक्य भिक्षू, धर्मवत्साचा शिष्य.

१४१. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी चैत्य लेणे क्र. ३ च्या व्हरांड्यातील एका बुद्धमूर्तीच्या खाली कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५३, खंड ५, पृ. १६, नं. ३; (२) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ४, नं. ७; (३) बुल्हर, **अ.स.वे.इं.** १८८३, खंड ५, पृ. ७७, नं. ७; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०३, नं. ९९०.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी, इ. स. ४ थ्या–५ व्या शतकातील पश्चिमेकडील वळणाची.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. ४ थे–५ वे शतक.

सारांश.—ही शाक्य भिक्षू धर्मगुप्त याची देणगी.

व्यक्तिनामे.—धर्मगुप्त—देणगी देणारा शाक्य भिक्षू.

१४२. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ३ मधील व्हरांड्यातील लहान दगोबा शिल्पावर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, **हि. रि.** १८४७, प्ले. ४०, ४; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५३, खंड ५, पृ. १७, नं. ४; (३) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.** १८६१, खंड ६, पृ. ४, नं. ८; (४) बुल्हर, **अ.स.वे.इं.** १८८३, खंड ५, पृ. ७७, नं. ८; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०३, नं. ९९१.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. ४ थे–५ वे शतक.

सारांश.—या लेखात बौद्ध धर्माच्या प्रारंभाची नोंद केलेली आहे.

१४३. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी चैत्य लेणे क्र. ३ च्या प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला असलेल्या लहान खोलीमध्ये कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, **हि. रि.**, १८४७, प्ले. ४०, ५; (२) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ४, नं. ९; (३) बुल्हर, **अ.स.वे.इं.** १८८३, खंड ५, पृ. ७७, नं. ९; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०३, नं. ९९२.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. ४ थे–५ वे शतक.

सारांश.—या लेखात बुद्धरक्षित याच्या देणगीची नोंद केली आहे.

व्यक्तिनामे.—बुद्धरक्षित—दान देणारा आचार्य.

१४४. कान्हेरी लेण्यातील पुल्लशक्तीचा लेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ७८ च्या व्हरांड्याच्या गणेशपट्टीवर कोरला आहे. हा लेख डॉ. वेस्ट याने प्रथम प्रकाशात आणला.

संदर्भ.–(१) मिराशी, वा. वि., **सं. मु.**, १९६६, सर. ५, पृ. १५१–१५७; (२) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ. रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. १; (३) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.** १८८१, पृ. ६१–६२; (४) कीलहॉर्न, **इ. अॅ.**, १८८४, खंड १३, पृ. १३६–१३७; (५) इंद्रजी, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८८४, खंड १३, पृ. ११.

भाषा व लिपी.––संस्कृत; नागरी.

राजवंश व राजा.––शिलाहार पुल्लशक्ती.

वर्ष व तिथी.––संवत् ७६५, इ. स. ८४३–८४४.

सारांश.––प्रस्तुत लेखाचा आशय असा––"महाराजाधिराज परमेश्वर पृथ्वीवल्लभ अमोघवर्ष याच्या कारकिर्दीत त्याच्या कृपेने ज्याला कोंकणचे राज्य मिळाले होते त्या महासामंत कोकणवल्लभ श्रीकपर्दीच्या पायांचे चिंतन करणारा श्रीपुल्लशक्ती पुरी आदिकरून समग्र कोकणावर राज्य करीत असता त्याचा सेवक व सर्वाध्यक्ष श्रीपूर्णहरि याचा पुत्र पुरातन अमात्य सच्चरित्र श्रीविष्णुगुप्त याने श्रीकृष्णगिरी येथील पूज्य आचार्यसंघाला नमन करून मोठ्या कृपेने खालील दान दिले–भगवान (बुद्ध) याला प्रसन्न करण्यासाठी २० द्रम्म, विहाराच्या दुरुस्तीकरिता ३ द्रम्म, आर्य संघातील (भिक्षूंच्या) वस्त्राकरिता ५ द्रम्म आणि त्यांच्या पुस्तकांकरिता १ द्रम्म; या (२९ द्रम्मांच्या) व्याजाकरता त्याने ४०, ४०, आणि १२० द्रम्मांची अक्षयनीवि (कायम स्वरूपाची ठेव) ठेवली आहे. या द्रम्म (दानाचे) परिपालन स्वतःच्या स्त्रीपुत्रांप्रमाणे (काळजीपूर्वक) करावे".

व्यक्तिनामे.––(१) अमोघवर्ष––राष्ट्रकूट नृपती; (२) कपर्दी––शिलाहार नृपती; (३) पुल्लशक्ती––शिलाहार नृपती, कपर्दीचा पुत्र; (४) पूर्णहरि––पुल्लशक्तीचा सेवक व सर्वाध्यक्ष; (५) विष्णुगुप्त––दान देणारा; पुल्लशक्तीचा अमात्य, पूर्णहरीचा पुत्र.

ग्रामनामे.––(१) कोंकण––हल्लीचे कोकण; (२) कृष्णगिरी––कान्हेरीचे प्राचीन नाव; (३) पुरी––उत्तर कोकणची राजधानी, ही कोणती याविषयी मतभेद आहे––(अ) एलेफंटा लेण्यांची घारापुरी असावी; (ब) जंजिऱ्याजवळ असलेली राजापुरी असावी.

१४५. कान्हेरी शिलालेख, अमोघवर्ष (प्रथम)

प्राप्तिस्थळ.––हा लेख असलेली शिळा कान्हेरी येथे सापडली.

संदर्भ.––(१) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, नं. १५; (२) इंद्रजी, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, खंड १३, पृ. ११; (३) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.**, १८८१, पृ. ६१–६२; (४) बर्जेस, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ५, पृ. ६४, १०५ व पृ. ७०, १, ३; (५) कीलहॉर्न, इं. अॅ., १८८४, खंड १३, पृ. १३३.

भाषा व लिपी.––संस्कृत; देवनागरी.

राजवंश व राजा.––राष्ट्रकूट नृपती अमोघवर्ष.

वर्ष व तिथी.––अश्विन वदि २, प्रजापति संवत्सर, बुधवार शके ७७५; १६ सप्टेंबर, इ. स. ८५४.

सारांश.––हा लेख राष्ट्रकूट नृपती अमोघवर्ष (प्रथम) याच्या कारकिर्दीतला असून यामध्ये त्याचा मांडलिक कर्पादिन् हा कोकणचा अधिपति असल्याचा उल्लेख आहे. गौड प्रदेशातून आलेल्या, सुगताचा भक्त असलेल्या गौमिन अविघ्नाकर या व्यक्तीने ध्यानधारणेस योग्य असे दालन कृष्ण पर्वतावर बांधल्याचे व भिक्षूंना वस्त्रे पुरविण्यासाठी १०० द्रम्मांची कायम देणगी दिल्याचे या लेखात नमूद केले आहे. याशिवाय या लेखात राष्ट्रकूटांच्या काही राजांची नावे दिली आहेत.

व्यक्तिनामे.—(१) जगत्तुंग—राष्ट्रकूट नृपती; (२) अमोघवर्ष—राष्ट्रकूट नृपती; (३) कर्पादिन्—शिलाहार राजा; (४) पुल्लशक्ति—शिलाहार राजा, कर्पादिन् याचा पुत्र; (५) गौमिन अविघ्नाकर—दानकर्ता; (६) पात्तियाणक योग—साक्षीदार.

ग्रामनामे.—चिख्यल्लपल्लिका—ओळख पटत नाही.

१४६. कान्हेरी शिलालेख, अमोघवर्ष

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी येथे सापडला.

संदर्भ.—(१) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, नं. ४५अ; (२) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ. ६१–६२; (३) बर्जेस, अ.स.वे.इं., १८८३, खंड ५, पृ. ६४, १०५ व पृ. ७०, १, ३; (४) कीलहॉर्न, इं.ॲं., १८८४, खंड १३, पृ. १३३.

भाषा व लिपी.—संस्कृत; देवनागरी.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती अमोघवर्ष (प्रथम).

वर्ष व तिथी.—शके ७९९ (गतवर्ष), इ. स. ८७७–८७८.

सारांश.—हा लेख राष्ट्रकूट नृपती अमोघवर्ष (प्रथम) याच्या अमदानीतील आहे. या वेळेस त्याचा मांडलिक कर्पादिन् हा कोकणचा शासक होता. विष्णू नामक व्यक्तीने कृष्ण पर्वतावरील मठात राहणाऱ्या भिक्षूंना १०० द्रम्मांची देणगी दिली, ध्यानधारणेसाठी दालन बांधले असे या लेखामध्ये नमूद केले आहे. धर्माकरमित्र, गौम्यविघ्नाकर व पत्तियाणक योग हे या कृत्याला साक्षीदार होते.

व्यक्तिनामे.—(१) अमोघवर्ष—राष्ट्रकूट नृपती; (२) कर्पादिन्—कोकण शासक; (३) धर्माकरमित्र—साक्षीदार; (४) गौम्यविघ्नाकर–साक्षीदार; (५) पत्तियाणक योग–साक्षीदार; (६) विष्णु—दानकर्ता.

१४७. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. २ मधील टाक्याजवळ कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, हि. रि., १८४७, प्ले. ४०, ३; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५३, खंड ५, पृ. १५; (३) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ३, नं. ३; (४) बुल्हर, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ५, पृ. ७५, नं. ३; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०२, नं. ९८६.

भाषा व लिपी.—पाली; आंध्र वळणाची लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे—"भिक्षुसंघ व उपासक यांच्या सहवासात असलेल्या कल्याणचा सुवर्णकार स्वामिदत्ताची कुंडाची पुण्यकारक देणगी".

व्यक्तिनामे.—सामिदत—सुवर्णकार.

ग्रामनामे.—कलियन—हल्लीचे कल्याण.

१४८. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. २ मधील बाकाच्या मागच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, हि. रि., १८४७, प्ले. ४०, १; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो,** १८५३, खंड ५, पृ. १५, नं. २; (३) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.,** १८६१, खंड ६, पृ. ३, नं. २; (४) बुल्हर, **अ.स.वे.इं.,** १८८३, खंड ५, पृ. ७५, नं. २; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.,** १०, १९०९–१०, पृ. १०२, नं. ९८५.

भाषा व लिपी.—पाली; आंध्र वळणाची लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे—"नाशिकनिवासी नाकणक याची आसनाची (Seat) पुण्यकारक देणगी".

व्यक्तिनामे.—नागणक (नाकणक)—दानकर्ता.

ग्रामनामे.—नासिक—हल्लीचे नाशिक.

१४९. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ—हा लेख कान्हेरी चैत्य लेणे क्र. ३ च्या प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूच्या स्तंभावर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, हि. रि., १८४७, प्ले. ४२, १०; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.,** १८५३, खंड ५, पृ. २७, नं. १३; (३) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.,** १८६१, खंड ६, पृ. ३, नं. ५; (४) बुल्हर, **अ.स.वे.इं.,** १८८३, खंड ५, पृ. ७६–७७, नं. ५; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स इ. आय्.,** १०, १९०९–१०, पृ. १०२, नं. ९८८.

भाषा व लिपी.—प्राकृत; आंध्र वळणाची ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात सोपारक, कल्याण (अंबालिकाविहार) व पैठण येथे काही लेण्यांना केलेल्या दानांची नोंद केली आहे.

ग्रामनामे.–(१) सोपारकाहार–सोपारा; (२) कालिअण—हल्लीचे कल्याण; (३) पतिठाण–हल्लीचे पैठण; (४) राजतलाक (?).

१५०. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेला लहान चौकोनी शिलाखंड कान्हेरी चैत्य लेणे क्र. ३ जवळ सापडला.

संदर्भ.—(१) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.,** १८६१, खंड ६, पृ. ११, नं. ४९; (२) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.,** १०, १९०९–१०, पृ. १०८, नं. १०२९.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––उल्लेख नाही.

सारांश.––वाचन झालेले नाही.

१५१. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.––ही लेखशिळा कान्हेरी शैलगृह क्र. ३ च्या सज्ज्याजवळ सापडली.

संदर्भ.––(१) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. १२, नं. ५८; (२) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०९, नं. १०३४.

भाषा व लिपी.––प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––उल्लेख नाही.

सारांश.––वाचता येत नाही.

१५२. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.––हा लेख कान्हेरी चैत्य लेण्याच्या उत्तरेस असलेल्या खोली नं. ४ मध्ये कोरलेला आहे.

संदर्भ.––(१) बर्ड, हि. रि., १८४७, प्ले. ४१, ७; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५३, खंड ५, पृ. ३०, नं. १७; (३) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**१८६१, खंड ६, पृ. ५, नं. १२; (४) बुल्हर, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ५, पृ. ७८, नं. १२; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ.आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०३, नं. ९९५.

भाषा व लिपी.––प्राकृत; ब्राह्मी, गौतमीपुत्र सातकर्णि याच्या काळची.

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––दिलेली नाही.

सारांश.––"सोपारग येथील उपासक, व्यापारी समिक याची कुंडाची देणगी".

व्यक्तिनामे.––समिक (स्वामिक)––देणगी देणारा उपासक.

ग्रामनामे.––सोपारग (शूर्पारक)––सोपारा.

१५३. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.––हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ७ च्या विरुद्ध दिशेस असलेल्या एका बाकाच्या मागच्या बाजूवर कोरलेला आहे.

संदर्भ.––(१) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ११, नं. ५०; (२) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०८, नं. १०३०.

भाषा व लिपी.––प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख अर्धवट आहे. वाचन झालेले नाही.

१५४. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. १० च्या व्हरांड्याच्या बाहेर डाव्या बाजूला असलेल्या भिंतीवर आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ५, नं. १४; (२) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०४, नं. ९९७.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखाचे अजून वाचन झालेले नाही.

१५५. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. १० च्या पोर्चच्या डाव्या बाजूच्या भिंतीवर आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, **हि. रि.**, १८४७, प्ले. ४६, २३; (२) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ६, नं. १७; (३) बुल्हर, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ५, पृ. ८१, नं. १७; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०४, नं. ९९९.

भाषा व लिपी.—प्राकृत; गौतमीपुत्र श्री यज्ञ सातकर्णि याच्या काळची आंध्र वळणाची ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे—"आदरणीय आचार्य, भदंत अतर (अंतर) याचा भाऊ भिक्षू आनंद याची संघाला दिलेली लेण्याची पुण्यकारक देणगी". याशिवाय काही द्रव्य कायम स्वरूपात दान दिल्याचाही उल्लेख या लेखात आहे.

व्यक्तिनामे.—(१) आणद—दान देणारा भिक्षू; (२) अतर (अंतर)—भदंत आचार्य आनंदचा भाऊ.

१५६. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. १२ च्या व्हरांड्यात बाहेरच्या बाजूला डाव्या बाजूच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, **हि रि.**, १८४७, ४७, २४; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५३, खंड ५, पृ. २१, नं. ९, १०; (३) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ६, नं. १६; (४) बुल्हर, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ५, पृ. ८०, नं. १६; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.** १०, १९०९–१०, पृ. १०४, नं. ९९८.

भाषा व लिपी.—प्राकृत; आंध्र वळणाची, गौतमीपुत्र श्री यज्ञ सातकर्णि याच्या वेळची ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—निश्चित उल्लेख नाही.

सारांश.—या लेखामध्ये कल्याणचा सिवमित (शिवमित्र) याचा पुत्र, व्यापारी, धम (धर्म) व बुधक यांनी त्यांच्या सर्व कुटुंबियांसह चतु:दिशांच्या भिक्षू संघाला लेणे, पाण्याचे कुंड, वाक, खुर्च्या व पथ (चकम-चंकम) यांची दिलेली देणगी नमूद केली आहे. याशिवाय कल्याण गंधारिका भूमीतील दोन खोल्या असलेले घर व भोजनचातुसाला कायम स्वरूपात दान दिल्याचा उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—(१) धम (धर्म)—दानकर्ता व्यापारी; (२) सिवमित (शिवमित्र)—धम (धर्म) याचा पिता; (३) बुधक (बुद्धक)—दान देणारा.

ग्रामनामे.—कालियण—हल्लीचे कल्याण. २) मुकुडसिवयिवा (?)

१५७. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. १४ व १५ यांच्यामध्ये असलेल्या सुटचा शिलाखंडावर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो., १८६१, खंड ६, पृ. १२, नं. ५३; (२) बुल्हर, अ.स.वे.इं., १८८३, खंड ५, पृ. ८६, नं. ३०; (३) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १०८, क्र. १०३२.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे— "पथ ही कल्याणच्या नंद नामक लोहाराची पुण्यकारक देणगी".

व्यक्तिनामे.—नंद—दानकर्ता (कमार).

ग्रामनामे.—कलियण—हल्लीचे कल्याण.

१५८. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ७७ च्या प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला असलेल्या टाक्यावर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो., १८६१, खंड ६, पृ. १०, नं. ४१; (२) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १०७, नं. १०२२.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—निश्चित दिलेली नाही.

सारांश.—हा लेख फार अस्पष्ट झाला आहे. त्यामुळे वाचन करता येत नाही.

१५९. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ७८ च्या आतल्या बाजूस असलेल्या अंधाऱ्या खोलीत असलेल्या बसलेल्या मूर्तीच्या समोरच्या बैठकीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो., १८६१, खंड ६, पृ. १०, नं. ४२; (२) ल्युडर्स, **अपेंडिक्स,** इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १०७, नं. १०२३.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—दिलेली नाही.

सारांश.—या लेखाचे नीट वाचन करता येत नाही.

१६०. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ८२ च्या व्हरांड्याच्या बाहेरच्या बाजूस उजव्या हाताच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो., १८६१, खंड ६, पृ. १०, नं. ४५; (२) ल्युडर्स, **अपेंडिक्स,** इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १०८, नं. १०२५.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—दिलेली नाही.

सारांश.—हा लेख फार झिजला आहे. यात पाचपेक्षा जास्त ओळी असाव्यात. वाचन केलेले नाही.

१६१. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ८४ च्या व्हरांड्याच्या बाहेरच्या बाजूस उजव्या बाजूच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो., १८६१, खंड ६, पृ. ११, नं. ४६; (२) ल्युडर्स, **अपेंडिक्स,** इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १०८, नं. १०२६.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—दिलेली नाही.

सारांश.—हा लेख ज्या शिलेवर आहे ती खडबडीत झालेली आहे. वाचन झालेले नाही.

१६२. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ९६ च्या व्हरांड्याच्या डाव्या बाजूला टोकाला असलेल्या बाकाच्या वर असलेल्या मोकळ्या जागेत कोरलेला आहे.

संदर्भ.——(१) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ.११, नं. ४७; (२) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०८, नं. १०२७.

भाषा व लिपी.——प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.——उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.——उल्लेख नाही.

सारांश.——वाचन झालेले नाही. या लेखात दोन ओळी असाव्यात. पहिल्या ओळीची सुरवात 'सिद्धम् उच्चकस्स व्यमितपुतस निगमस' या शब्दांनी आहे व शेवटी 'देयधम चेत दिना अख्या / निवि' हे शब्द आहेत.

१६३. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.——हा लेख असलेली शिला कान्हेरी शैलगृह क्र. ३ च्या चैत्य लेण्यासमोर झाडाखाली असलेल्या ओटचावर पडलेली आहे.

संदर्भ.——(१) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ११, नं. ४८; (२) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०८, नं. १०२८.

भाषा व लिपी.——प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—— उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.——दिलेली नाही.

सारांश.——वाचन झालेले नाही.

१६४. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.——हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. २१ व २२ यांच्यामध्ये असलेल्या खडकापासून काढलेल्या लहानशा शिळेवर आहे.

संदर्भ.——(१) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ११, नं. ५२; (२) बर्ड, **हि. रि.**, १८४७, प्ले. ४६, २२; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०८, नं. १०३१.

भाषा व लिपी.——प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.——उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—— उल्लेख नाही.

सारांश.——वाचन झालेले नाही.

१६५. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.——हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. २४ च्या व्हरांड्याच्या आतील बाजूच्या भिंतीवर आहे.

संदर्भ.——(१) बर्ड, **हि. रि.**, १८४७, पृ. ५७, नं. १५; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५३, खंड ५, पृ. १७, नं. ५; (३) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ६, नं. १८; (४) बुल्हर, **अ.स.वे.इं**, १८८३, खंड ५, पृ. ८१, नं. १८; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०४, नं. १०००.

भाषा व लिपी.––प्राकृत; आंध्र वळणाची ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––उल्लेख नाही.

सारांश.––या लेखाचे भाषांतर असे––"ही कल्याणचा व्यापारी गोलणक याचा पुत्र इसिपाल याची त्याच्या कुटुंबियांसह त्याच्या मातापित्यांच्या सन्मानार्थ दिलेली लेणे व कुंड यांची देणगी". याशिवाय सफाऊ खेड्यातील शेताचे, भिक्षूंना वस्त्रे वगैरे देण्यासाठी व मंडप व इतर दुरुस्त्या करण्यासाठी कायम दान दिल्याचाही उल्लेख या लेखात आलेला आहे.

व्यक्तिनामे.––(१) ऋषिपाल––दान देणारा व्यापारी; (२) गोलणक––ऋषिपाल याचा पिता.

ग्रामनामे.––(१) कलिअण––हल्लीचे कल्याण; (२) सफाऊ––ओळख पटत नाही.

१६६. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.––हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ३७च्या व्हरांड्याच्या डाव्या बाजूला असलेल्या भिंतीवर, टाक्याच्या वरच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत कोरलेला आहे.

संदर्भ.––(१) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ७, नं. २१; (२) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०५, नं. १००३.

भाषा व लिपी.––प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––उल्लेख नाही.

सारांश.––वेस्टच्या मते या लेखामध्ये कल्याणच्या कोणातरी उपासक व्यापारी रहिवाश्याने लेणे व पाण्याचे टाके (पाणी पिण्यासाठी व स्नानासाठी) दान दिल्याचे नमूद केले आहे. दात्याचे नाव वाचता येत नाही.

ग्रामनामे.––कलियण––हल्लीचे कल्याण.

१६७. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.––हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ३८च्या सज्जाच्या प्रवेशद्वाराजवळ पडलेल्या शिळेवर कोरलेला आहे.

संदर्भ.––(१) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ७, नं. २२; (२) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १००४.

भाषा व लिपी.––प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––उल्लेख नाही.

सारांश.––या लेखातील "परिगहित" (परिगृहीत) एवढाच शब्द वाचता येतो.

१६८. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.––हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ३९च्या मोकळ्या सज्जाच्या मागच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, हि. रि., १८४७, पृ. ५८, नं. १६; (२) वेस्ट, ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो., १८६१, खंड ६, पृ. ७, नं. २३; (३) बुल्हर, अ.स.वे.इं., १८८३, खंड ५, पृ. ८२, नं. २०; (४) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १०५, नं. १००५.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे—"शूर्पारक येथील नागपालित नामक जवाहिऱ्याची, लेण्याची पुण्यकारक देणगी".

व्यक्तिनामे.—नागपालित—दान देणारा जवाहिऱ्या (मनिकर).

ग्रामनामे.—सोपारय—हल्लीचे सोपारा.

१६९. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ४३ च्या प्रवेशद्वाराच्या जवळ असलेल्या टाक्यावर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो., १८६१, खंड ६, पृ. ७, नं. २४; (२) बुल्हर, अ.स.वे.इं., १८८३, खंड ५, पृ. ८३, नं. २१; (३) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १०५, नं. १००६.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी, गौतमीपुत्र श्री यज्ञ सातकर्णि याच्या काळची.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे—"थेर भदंत घोष याची शिष्या भिक्षुणी पोगकिअसणा हिची आपल्या भगिनीसह चतुःदिशांच्या भिक्षुसंघाला दिलेली हीं कुंड व लेण्याची देणगी".

व्यक्तिनामे.—(१) घोष—भदंत थेर; (२) पोणकिअसणा—दान देणारी भिक्षुणी.

१७०. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ४८ च्या व्हरांड्यात डावीकडील भिंतीवर कोरला आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो., १८६१, खंड ६, पृ. ७, नं. २५; (२) बुल्हर, अ.स.वे.इं., १८८३, खंड ५, पृ. ८३, नं. २२; (३) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १०५, नं. १००७.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे—"ही लेणे, कुंड व मंडप यांची कण्ह (कृष्ण) याने दिलेली पुण्यकारक देणगी. आदरणीय थेर हालक". याशिवाय भिक्षुसंघाला कायम देणगी दिल्याचाही उल्लेख या लेखात आहे.

व्यक्तिनामे.—(१) कण्ह (कृष्ण)—दान देणारा; (२) हालक—थेर.

१७१. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.––हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ४९ च्या व्हरांडयाच्या बाहेरच्या बाजूला डाव्या हाताच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.––(१) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ८, नं. २६; (२) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०६, नं. १००८.

भाषा व लिपी.––प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––उल्लेख नाही.

सारांश.––हा लेख अर्धवट व अस्पष्ट असल्यामुळे नीट वाचन करता येत नाही.

१७२. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.––हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ५२ च्या व्हरांडयाच्या बाहेरच्या बाजूला उजव्या हाताच्या भिंतीवर आहे.

संदर्भ.––(१) बर्ड, हि. रि., १८४७, प्ले. ४५, १७; (२) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ८, नं. २७; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०६, नं. १००९.

भाषा व लिपी.––प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––उल्लेख नाही.

सारांश.––हा लेख झिजला आहे. वाचन झालेले नाही.

१७३. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.––हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ५३ च्या व्हरांडयाच्या बाहेरच्या बाजूला उजव्या हाताच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.––(१) वेस्ट, ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो., १८६१, खंड ६, पृ. ८, नं. २८; (२) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०६, नं. १०१०.

भाषा व लिपी.––प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––उल्लेख नाही.

सारांश.––हा लेख झिजला आहे.

१७४. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.––हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ५६ च्या व्हरांडयाच्या बाहेरच्या बाजूस डाव्या बाजूच्या भिंतीवर आहे.

संदर्भ.––(१) बर्ड, हि. रि., १८४७, प्ले. ४६, १९; (२) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ८, नं. २९; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०६, नं. १०११.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखामध्ये ११ ओळी आहेत. मधला भाग झिजला आहे. वाचन केलेले नाही.

१७५. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ५८ च्या व्हरांड्याच्या आतल्या बाजूच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८५३, खंड ५, पृ. २९, नं. १६; (२) वेस्ट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८६१, खंड ६, पृ. ८, नं. ३१; (३) बुल्हर, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ५, पृ. ८३, नं. २३; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०६, नं. १०१२.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख असा—"भदंत मितभूति याचे लेणे सागरपलोगन याची पुण्यकारक देणगी".

व्यक्तिनामे.—(१) मित्रभूति—भदंत; (२) सागरपलोगन(?)—दानकर्ता.

१७६. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ५९ मधील टाक्याच्या वर असलेल्या मोकळ्या जागेवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, **हि. रि.**, १८४७, प्ले. ४६, २१; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५३, खंड ५, पृ. २९, नं. १५; (३) बुल्हर, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ५, पृ. ८४, नं. २४; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०६, नं. १०१३.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख असा—"अपरांताची मूळ रहिवासी असलेली कल्याण निवासी दामिला (भोइगि) हिची लेणे व कुंड यांची देणगी".

व्यक्तिनामे.—दामिला—दान देणारी स्त्री.

ग्रामनामे.—कालिअण—हल्लीचे कल्याण.

१७७. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ५९ च्या व्हरांड्याच्या आतल्या बाजूच्या भिंतीवर आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, **हि. रि.**, १८४७, प्ले. ४७, २७; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५३, खंड ५, पृ. २९, नं. १४; (३) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ८, नं. ३३; (४) बुल्हर, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ५, पृ. ८४, नं. २५; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.** १०, १९०९–१०, पृ. १०६, नं. १०१४.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी, पुलुमावि याच्या काळची आंध्र वळणाची.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख असा—"कल्याणनिवासी भिक्षुणी दामिला हिची लेणे व कुंडाची देणगी".

व्यक्तिनामे.—दामिला—दान देणारी भिक्षुणी.

ग्रामनामे.—कालीयिण—हल्लीचे कल्याण.

१७८. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ६४ च्या प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूस असलेल्या टाक्याच्या वर असलेल्या जागेत कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ९, नं. ३४; (२) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०६, नं. १०१५.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखामध्ये ६ ओळी असाव्यात. परंतु हा लेख अस्पष्ट झाला आहे. काही ओळी नष्ट झाल्या आहेत. वेस्टच्या मते या लेखात पाण्याच्या कुंडाच्या देणगीचा उल्लेख आहे.

१७९. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ६८ मधील व्हरांड्याच्या बाजूस डाव्या बाजूच्या भिंतीवर आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, **हि. रि.**, १८४७, प्ले. ४६, २०; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.** १८५३, खंड ५, पृ. ३१, नं. १८; (३) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ९, नं. ३५; (४) बुल्हर, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ५, पृ. ८४, नं. २६; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०६, नं. १०१६.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी, पुलुमावि याच्या काळची.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख अर्धवट आहे. याचे भाषांतर असे—"· · · पाल याचा शिष्य भिक्षु · · · मितणक याची चतुःदिशांच्या भिक्षुसंघाला लेणे व कुंड यांची देणगी".

१८०. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.––हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ७० च्या व्हरांड्याच्या बाहेरच्या बाजूस डाव्या बाजूच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.––(१) बर्ड, हि. रि., १८४७, प्ले. ४७, ३५; (२) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ९, नं. ३७; (३) बुल्हर, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ५, पृ. ८५, नं. २७; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०७, नं. १०१८.

भाषा व लिपी.––प्राकृत; ब्राह्मी, आंध्र वळणाची.

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––उल्लेख नाही.

सारांश.––हा लेख तुटक आहे. या लेखात भद्रायणीय पंथाला दिलेल्या लेणे व पाण्याच्या कुंडाची देणगी नमूद केली आहे.

व्यक्तिनामे.––(१) नंदिणिका––दान देणाऱ्याची माता; (२) दामिला––दान देणाऱ्याची पत्नी व एक लेणे दान देणारी; (३) आर्यघोष––दान देणाऱ्याचा पुतण्या; (४) संघदेवनिका––दान देणाऱ्याची कन्या.

१८१. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.––हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ७५ च्या व्हरांड्याच्या बाहेरच्या बाजूस उजवी-कडील भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.––(१) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ९, नं. ३८; (२) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०७, नं. १०१९.

भाषा व लिपी.––प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––उल्लेख नाही.

सारांश.––हा लेख पूर्ण झिजला आहे. शेवटून दुसऱ्या ओळीतील "देयं धम लेण पाणिय" एवढे शब्दच वाचता येतात व शेवटच्या ओळीत "भिखस" हा शब्द आढळतो.

१८२. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.––हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ७६ मधील व्हरांड्याच्या बाहेरच्या बाजूस उजव्या हाताकडील भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.––(१) बर्ड, हि. रि., १८४७, प्ले. ४५, १८; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५३, खंड ५, पृ. २०, नं. ८; (३) वेस्ट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८६१, खंड ६, पृ. ९, नं. ३९; (४) बुल्हर, **अ.स.वे.इं.** १८८३, खंड ५, पृ. ८५, नं. २८; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०७, नं. १०२०.

भाषा व लिपी.––प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––दिलेली नाही.

सारांश.—या लेखात भदंत बोधिक याची शिष्या, धेनुकाकटनिवासी उपासक कुलपिय धमणक याची कन्या, भिक्षुणी सापा (सर्पा) हिची चतुःदिशांच्या भिक्षुसंघाला दिलेली लेणे व कुंड यांची देणगी नमूद केली आहे. ही देणगी तिने आपली भगिनी रतिनिका आणि इतर नातलगांसह दिलेली आहे. याशिवाय भिक्षुसंघाला दिलेल्या कायम देणगीचाही या लेखात उल्लेख केलेला आहे.

व्यक्तिनामे.—(१) कुलप्रिय धमणक (धर्म)—उपासक दान देणाऱ्या भिक्षुणीचा पिता; (२) बोधिक—थेर भदंत; (३) सापा (सर्पा)—दान देणारी भिक्षुणी, बोधिकाची शिष्या; (४) रतिनिका—सापाची बहीण.

ग्रामनामे.—धेनुकाकट—ओळख पटवलेली नाही.

१८३. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ९५ च्या जरा वर असलेल्या पायऱ्यांच्या बाजूला असलेल्या ठेंगण्या बाकाच्या मागच्या बाजूवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, ज.बॉ.ब्रँ.रॉ.ए.सो., १८६१, खंड ६, पृ. १२, नं. ५७; (२) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १०९, नं. १०३३.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख असा—"चेमुलनिवासी खजिनदार रोहणिमित (रोहिणीमित्र) याचा पुत्र धमणक (धर्म) याची देणगी".

व्यक्तिनामे.—(१) धमणक (धर्म)—दान देणारा; (२) रोहणिमित (रोहिणीमित्र)—धमणकाचा पिता.

ग्रामनामे.—चेमुल—हल्लीचे चौल ?.

१८४. कान्हेरी बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कान्हेरी शैलगृह क्र. ९९ च्या व्हरांड्याच्या बाहेरच्या बाजूस डाव्या बाजूच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, ज.बॉ.ब्रँ.रॉ.ए.सो., १८६१, खंड ६, पृ. ९, नं. ३६; (२) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १०७, नं. १०१७.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखामध्ये ६ ओळी आहेत. लेख फार अस्पष्ट आहे. ३ ऱ्या ओळीतील "लेन देयधम" ही अक्षरे फक्त वाचता येतात.

१८५. कामठी, कलचुरी शिलालेख

जिल्हा—सोलापूर

प्राप्तिस्थळ.—उल्लेख नाही.

संदर्भ—इं.अ.रि., १९६४–६५, पृ. ६०, नं. ५४.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—कलचुरी वंशीय नृपती बिज्जलदव.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात काही जमीन दान दिल्याचा उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—बिज्जलदेव—कलचुरी नृपती.

१८६. कार्ले शैलगृह शिलालेख

जिल्हा—पुणे **तालुका—वडगाव**

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले चैत्य लेण्याच्या मध्यंद्वाराच्या उजव्या बाजूला असलेल्या शिल्पाच्या वर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५३, खंड ५, पृ. १५९, नं. ४; (२) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.**, १८८१, पृ. ३३, नं. १३; (३) बुल्हर, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. १०१, नं. ६; (४) सेनार्ट, **इ. आय्.**, १९०२, खंड ७, पृ. ५७, नं. १३; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११८, नं. १०९९.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—क्षत्रप नहपान.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखामध्ये वलूरक शैलगृहात वर्षा ऋतूत राहाणाऱ्या भिक्षुसंघाला करजिक हे खेडे दिनिकपुत्र ऋषभदत्त याने दान दिल्याचे नमूद केले आहे. ऋषभदत्त हा क्षत्रप नहपान याचा जावई असल्याचाही उल्लेख या लेखात आहे.

व्यक्तिनामे.—(१) उसभदात—दान देणारा; (२) दिनिक—ऋषभदत्ताचा पिता; (३) नहपान—क्षत्रप राजा.

ग्रामनामे.—(१) वलूरक; (२) करजिक.

१८७. कार्ले शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले चैत्य लेण्याचे मध्यद्वार व उजव्या हाताचे द्वार यांच्या मध्ये असलेल्या बुद्ध मूर्तीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन, **ज.बं.ए.सो.**, १८३४, खंड ३, पृ. ४९८, नं. C व D; (२) प्रिन्सेप, **ज.बं.ए.सो.**, १८३७, खंड ६, पृ. १०४८, नं. ७; (३) बर्ड, **हि. रि.**, १८४७, पृ. ६०, नं. २३; (४) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५४, खंड ५, पृ. १५४, नं. ७, ५. ६; (५) बर्जस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.**, १८८१, पृ. ३६, नं. १९. १; (६) बुल्हर, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ११२, नं. २०; (७) हुल्श, **इ. आय्.**, १९०१, खंड ६, पृ. ३१९, नोंद १, २, ३, ५, ७; (८) सेनार्ट, **इ. आय्.**, १९०२, खंड ७, पृ. ६४, नं. १९; (९) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११९, नं. ११०५.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—सातवाहन नृपती गौतमीपुत्र सादकणि.

वर्ष व तिथी.—वर्षा ऋतूंतील ४ थ्या पंधरवड्यातील प्रथम दिवस.

सारांश.—या लेखात मामाड येथील अधिकारी परिगुत याला दिलेल्या हुकुमाची नोंद केलेली आहे. हा हुकुम मामाडच्या जिल्ह्यातील करजक हे गाव वालुरक लेंण्यामध्ये रहात असलेल्या महासांघिक पंथाच्या भिक्षू व प्रव्रजित (Mendicant) यांना दान देण्या-संबंधीचा आहे.

व्यक्तिनामे.—(१) परिगुत—मामाड येथील अधिकारी; (२) सिवखडगुत—लेख लिहिणारा.

ग्रामनामे.—(१) करजक; (२) वालुरक.

१८८. कार्ले बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले चैत्य लेण्याच्या मध्यद्वाराच्या डाव्या बाजूला वरती कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, हि. रि., १८४७, पृ. ५८, नं. १८; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५४, खंड ५, पृ. १५३, नं. ३; (३) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.**, १८८१, पृ. ३४, नं. १४; (४) बुल्हर, **अ.स.वे.इं**, १८८३, खंड ४, पृ. १०७, न. १७; (५) सेनार्ट, **इ. आय्.**, १९०२, खंड ७, पृ. ६१, नं. १४; (६) ल्युडर्स, **अपेंडिक्स**, **इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११८, नं. ११००.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—सातवाहन नृपती वासिष्ठीपुत्र स्वामी श्री पुळुमावि.

वर्ष व तिथी.—शासन वर्ष ७, ग्रीष्म कालातील ५ व्या पंधरवड्यातील प्रथम दिवस.

सारांश.—या लेखाचा उद्देश वलुरक येथील लेण्यामध्ये राहणाऱ्या संघाला ओखळकीय जातीचा महारथी कौशिकीपुत्र मित्रदेव याचा पुत्र महारथी वासिष्ठीपुत्र सोमदेव याने एक खेडे दान दिले हे नमूद करण्याचा होता.

व्यक्तिनामे.—(१) सोमदेव—दान देणारा महारथी; (२) मितदेव—महारथी, सोमदेवाचा पिता.

ग्रामनामे.—वलुरक.

१८९. कार्ले बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले येथे अगदी उत्तरेकडे असलेल्या अगदी वरच्या शैलगृहामध्ये कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, हि. रि., १८४७, पृ. ५४, नं. ७; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५४, खंड ५, पृ. १५८, न. १८; (३) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.**, १८८१, पृ. ३६, नं. २०; (४) बुल्हर, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ११३, नं. २१; (५) सेनार्ट, **इ. आय्.**, १९०२, खंड ७, पृ. ७१, नं. २०; (६) ल्युडर्स, **अपेंडिक्स**, **इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११९, नं. ११०६.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—सातवाहन नृपती, वासिष्ठीपुत्र श्री पुळुमावि.

वर्ष व तिथी.—शासनवर्ष २४, हेमंत ऋतूतील तिसऱ्या पंधरवड्यातील दुसरा दिवस.

सारांश.—हा लेख नृपती पुळुमावि याच्या अमदानीतील आहे. या लेखाचा मुख्य उद्देश अंबुला-मानिवासी सोवसक सेतफरण याचा पुत्र हरफरण याने चतु:दिशांच्या महासांघिक संघाला नऊ

खोल्यांनी युक्त असलेला मंडप दान दिला हे नमूद करण्याचा होता. हा मंडप महासांघिक पंथाला (खास संपत्तीप्रमाणे) दिला होता. याशिवाय या लेखात बुधरखित (बुद्धरक्षित) व त्याची माता यांचा उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—(१) हरफरण—दानकर्ता; (२) सेतफरण—हरफरणचा पिता; (३) बुधरखित (बुद्धरक्षित).

ग्रामनामे.—अबुलामा—ओळख पटत नाही.

१९०. कार्ले बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले शैलगृह क्र. १३ च्या टोकाला असलेल्या पाण्याच्या कुंडाच्या वर असलेल्या मोकळ्या जागेत कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८५४, खंड ५, पृ. १५८, नं. १६; (२) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. बे. इं.**, १८८१, पृ. ३७, नं. २१; (३) बुल्हर, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९२, नं. १८; (४) सेनार्ट, **इ. आय्.**, १९०२, खंड ७, पृ. ७३, नं. २१; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स**, **इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १२०, नं. ११०७.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—हेमंत पक्ष, ५ वे वर्ष.

सारांश.—भदंतच्या उसभा या स्त्री शिष्येने लेणे दान दिले व तिची बहीण श्राविका हिने भिक्षुसंघाला कुंडदान दिले. हा लेख बराच झिजला आहे त्यामुळे सुसंगत अर्थ लावता येत नाही.

व्यक्तिनामे.—(१) उसभा (ऋषभा)—भिक्षुणी; (२) श्राविका (?)—कुंड दान देणारी स्त्री, उसभाची बहीण.

१९१. कार्ले बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले चैत्य लेण्याच्या व्हरांड्यात डाव्या टोकाला वर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बं.ए.सो.**, १८३४, खंड ३, पृ. ४९८, नं. ए; (२) बर्ड, **हि. रि.** १८४७ पृ. ६०, नं. २२; (३) स्टिव्हन्सन व ब्रेट **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५४, खंड ५, पृ. १५२, नं. २; (४) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.बे.इं.**, १८८१, पृ. २८, नं. १; (५) बुल्हर, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९०, नं. १; (६) सेनार्ट, **इ. आय्.**, १९०२, खंड ७, पृ. ४८, नं. १; (७) ल्युडर्स, **अपेंडिक्स**, **इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११६, नं. १०८७.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—वैजयंती येथील श्रेष्ठी भूतपाल याने जम्बूद्वीपात उत्कृष्ट ठरेल असे शैलगृह स्थापन केले.

व्यक्तिनामे.—भूतपाल—दान देणारा श्रेष्ठी.

ग्रामनामे.—वेजयंती—कानरा जिल्ह्यातील वनवासी हे प्राचीन वैजयंती असावे.

१९२. कार्ले बौद्ध सिंहस्तम्भ शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले शैलगृहासमोर असलेल्या सिंहस्तंभावर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) विल्फोर्ड, ए. रि., १७९९, खंड ५, पृ. १३९, नं. ४; (२) स्टिव्हन्सन, **ज.बं.ए.सो.**, १८३४, खंड ३, पृ. ४९८, नं. ३; (३) प्रिन्सेप, **ज. बं. ए.सो.**, १८३७, खंड ६, पृ. ४६८, नं. १; (४) बर्ड व विल्सन, **हि. रि.**, १८४७, पृ. ५१, नं. २; (५) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५४, खंड ५, पृ. १५२, नं. १; (६) स्टिव्हन्सन, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५६, खंड ५, पृ. ४२६;, (७) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.**, १८८१ पृ. २८, नं. २; (८) बुल्हर व बर्जेस, **अ.स.वे.इं.**, १८८३ खंड ४, पृ. ९०, नं. २; (९) सेनार्ट **इ. आय्.**, १९०२, खंड ७, पृ. ४९, नं. २; (१०) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११६, नं. १०८८.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—गोतिपुत्र महारथी अग्निमित्रणक याची सिंहस्तंभाची देणगी.

व्यक्तिनामे.—(१) अगिमित्रणक (अग्निमित्र)—दान देणारा महारथी; (२) गोति (गौप्ती)—अग्निमित्रणक याची माता.

१९३. कार्ले बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले लेण्यातील व्हरांड्याच्या उजव्या टोकाला असलेल्या तीन हत्तींच्या पायाखाली कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.**, १८८१, पृ. २९, नं. ३; (२) बुल्हर व बर्जेस, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९०, नं. ३; (३) सेनार्ट, **इ. आय्.**, १९०२ खंड ७, पृ. ५१, नं. ३; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१० पृ. ११६, नं. १०८९.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—दोन हत्ती व हत्तींच्या वर व खाली असलेल्या वेदिकांची भदंत इंद्रदेव याने दिलेली ही देणगी.

व्यक्तिनामे.—इंददेव—देणगी देणारा भदंत.

१९४. कार्ले बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले येथील चैत्य लेण्याच्या उजव्या बाजूच्या दरवाजाच्या वर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) विलफोर्ड, **ए. रि.** १७९९, खंड ५, पृ. १३९, नं. ३; (२) बर्ड व विल्सन, हि. रि. १८४७, पृ. ५४, नं. २; (३) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५४, खंड ५, पृ. १५७, नं. १५; (४) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.**, १८८१, पृ. ३२, नं. ९; (५) बुल्हर व बर्जेस, **अ.स.वे.इं.**, १८८३; खंड ४, पृ. ९१; (६) सेनार्ट, **इ. आय्.**, १९०२, खंड ७, पृ. ५५, नं. ९; (७) **युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्**, १०, १९०९–१०, पृ. ११७, नं. १०९५.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात धेनुकाकट येथील सिंहदत्त याने शैलगृहाच्या द्वाराची दिलेली देणगी नमूद केलेली आहे.

व्यक्तिनामे.—सिहदत—दानकर्ता, (गंधिक).

ग्रामनामे.—धेनुकाकट.

१९५. कार्ले बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले शैलगृहाच्या व्हरांडयाच्या समोर असलेल्या स्तंभावर (Pillar of the open screen) कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड व विल्सन, **हि. रि.**, १८४७, पृ. ५९, नं. २०; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५४, खंड ५, पृ. १५६, नं. १२; (३) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.**, १८८१, पृ. ३०, नं. ५; (४) बुल्हर व बर्जेस, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९०, नं. ५; (५) सेनार्ट, **इ. आय्.**, १९०२, खंड ७, पृ. ५२, नं. ५; (६) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११६, नं. १०९१.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—गृहस्थ महादेवणक याची माता भायिला हिची देणगी.

व्यक्तिनामे.—(१) भायिला—दान देणारी स्त्री; (२) महादेवणक—भायिलाचा पुत्र, गृहस्थ.

१९६. कार्ले बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले शैलगृहाच्या व्हरांडयाच्या समोर असलेल्या स्तंभावर (Pillar of the open screen) खालच्या बाजूला कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५४, खंड ५, पृ. १५८, नं. १७ (फक्त उल्लेख केला आहे); (२) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.**, १८८१, पृ. ३०, नं. ६; (३) सेनार्ट, **इ. आय्.** १९०२, खंड ७, पृ. ५३, नं. ६; (४) बुल्हर व बर्जेस, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९० नं. ६; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११७, नं. १०९२.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—धेनुकाकटचा सुतार वेणुवासपुत्र सामिक (स्वामिक) याची प्रवेशद्वार (doorway) व वरच्या द्वाराची देणगी.

व्यक्तिनामे.—(१) सामिक (स्वामिक)—दान देणारा सुतार; (२) वेणुवास—सामिकाचा पिता.

ग्रामनामे.—धेनुकाकट—कृष्णा नदीच्या तीरावरील धरणिकोट.

१९७. कार्ले बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले चैत्य लेण्यातील डाव्या बाजूच्या ओळीतील चवथ्या स्तंभावर आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, हि. रि., १८४७, पृ. ५५, नं. ८; (२) विल्सन, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५३, खंड ४, पृ. ३७२; (३) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५४, खंड ५, पृ. १५६, नं. १४; (४) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.**, १८८१, पृ. ३१, नं. ७; (५) बुल्हर व बर्जेस, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९०, नं. ७; (६) सेनार्ट, **इ. आय्.**, १९०२, खंड ७, पृ. ५३, नं. ७; (७) ल्युडर्स, **अपेंडिक्स**, **इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११७, नं. १०९३.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—धेनुकाकटचा यवन सिहधय (सिंहध्वज) याची स्तंभाची देणगी.

व्यक्तिनामे.—सिंहधय (सिंहध्वज)—दान देणारा यवन.

ग्रामनामे.—धेनुकाकट—कृष्णा नदीच्या तीरावरील हल्लीचे धरणिकोट.

१९८. कार्ले बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले चैत्य लेण्यातील डाव्या बाजूच्या ओळीतील पाचव्या स्तंभावर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.**, १८८१, पृ. ३१, नं. ८; (२) बुल्हर व बर्जेस, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९१, नं. ८; (३) सेनार्ट, **इ. आय्.**, १९०२, खंड ७, पृ. ५४, नं. ८; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स**, **इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११७, नं. १०९४.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—सोपारक येथील धर्मोत्तरीय भदंत याचा शिष्य व नंदा याचा पुत्र धर्मोपदेशक सातिमित याची स्तंभाची देणगी.

व्यक्तिनामे.—(१) सातिमित—दान देणारा धर्मोपदेशक; (२) नंदा—सातिमिताचा पिता.

ग्रामनामे.—सोपारक (शूर्पारक)—वसईजवळचे सोपारा.

१९९. कार्ले बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले चैत्य लेण्यातील डाव्या ओळीतील चौथ्या स्तंभावर आधी वर्णिलेल्या लेखाच्या खाली कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) विलफोर्ड, **ए. रि.**, १७९९, खंड ५, पृ. १३९, नं. ३; (२) बर्ड व विल्सन, **हि. रि.**, १८४७, पृ. ५४, नं. २; (३) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५४, खंड ५, पृ. १५७, नं. १५; (४) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.**, १८८१, पृ. ३२, नं. ९; (५) बुल्हर व बर्जेस, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९१, नं. ९; (६) सेनार्ट, **इ. आय्.**, १९०२, खंड ७, पृ. ५५, नं. ९; (७) ल्युडर्स, **अपेंडिक्स**, **इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११७, नं. १०९५.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—सोपारा येथील धर्मोत्तरीय भदंताच्या बहिणीचा पुत्र धर्मोपदेशक सातिमित (स्वातिमित्र) याची अवशेषयुक्त (with relic) स्तंभाची देणगी.

व्यक्तिनामे.—(१) सातिमित (स्वातिमित्र)—दान देणारा धर्मोपदेशक.

ग्रामनामे.—सोपारक (शूर्पारक)—सोपारा.

२००. कार्ले बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले चैत्य लेण्यातील डाव्या बाजूच्या ओळीतील तिसऱ्या स्तंभावर आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ. ३२, नं. १०; (२) बुल्हर व बर्जेस, अ.स.वे.इं., १८८३, खंड ४, पृ. ९१, नं. १०; (३) सेनार्ट, इ. आय्., १९०२, खंड ७, पृ. ५५, नं. १०; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स**, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. ११७, नं. १०९६.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—धेनुकाकटच्या धम्मयवनाची देणगी.

व्यक्तिनामे.—धंम (धर्म)—दानकर्ता यवन.

ग्रामनामे.—धेनुकाकट—कृष्णा नदीवरील धरणिकोट.

२०१. कार्ले बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले चैत्य लेण्यातील डाव्या बाजूच्या सातव्या स्तंभावर आहे.

संदर्भ.—(१) वर्ड, हि. रि., १८४७, पृ.५५, नं. ११; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५४, खंड ५, पृ. १५६, नं. ११; (३) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ. ३२, नं. ११; (४) बुल्हर व बर्जेस, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९१, नं. ११; (५) सेनार्ट **इ. आय्.** १९०२, खंड ७, पृ. ५६, नं. ११; (६) ल्युडर्स, **अपेंडिक्स इ. आय्.** १०, १९०९–१०, पृ. ११७, नं. १०९७.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—धेनुकाकट येथील ऋषभदत्त याचा पुत्र मित्रदेव याची स्तंभाची देणगी.

व्यक्तिनामे.—(१) मितदेवणक (मित्रदेव)—दान देणारा; (२) उसभदत (ऋषभदत्त)—मित्रदेवाचा पिता.

ग्रामनामे.—धेनुकाकट—कृष्णा नदीच्या तीरावरील धरणीकोट.

२०२. कार्ले बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले येथील मोठ्या कमानीच्या खालच्या पट्टचावर (forming base) आतील बाजूस आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.**, १८८१, पृ. ३३, नं. १२; (२) बुल्हर व बर्जेस, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९१, नं. १२; (३) सेनार्ट, **इ. आय्.**, १९०२, खंड ७, पृ. ५६, नं. १२; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१० पृ. ११८, नं. १०९८.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—भिक्षुणी असाढमिता (आषाढमित्रा) हिची देणगी.

व्यक्तिनामे.—असाढमिता—दान देणारी भिक्षुणी.

२०३. कार्ले बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले चैत्य लेण्यातील व्हरांड्यात असलेल्या दोन मूर्तींच्या जोडीच्या वर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड हि. रि., १८४७, प्ले. ३८, नं. ९; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५४, खंड ५, पृ. १५५, नं. ८; (३) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.**, १८८१, पृ. ३५, नं. १५; (४) बुल्हर व बर्जेस, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९१, नं. १३; (५) सेनार्ट, **इ. आय्.**, १९०२, खंड ७, पृ. ६३, नं. १५; (६) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११८, नं. ११०१.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—भिक्षू भद्रशर्मन् याची मूर्तींच्या जोडीची देणगी.

व्यक्तिनामे.—भदसम (भद्रशर्मन्)—दान देणारा भिक्षू.

२०४. कार्ले बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले चैत्य लेण्यातील व्हरांड्याच्या उजव्या बाजूला असलेल्या जाळीच्या (Screen) आतील बाजूस कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८५४, खंड ५, पृ. १५५, नं. ९; (२) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ३५, नं. १६; (३) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९२, नं. १४; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११८, नं. ११०२.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—मूर्तींच्या जोडीची भिक्षु भदसम (भद्रशर्मन्) याने दिलेली देणगी.

व्यक्तिनामे.—भदसम (भद्रशर्मन्)—दानकर्ता भिक्षु.

२०५. कार्ले बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले चैत्य लेण्याच्या मध्य द्वाराच्या उजव्या बाजूला भिंतीवर (कठड्याच्या चित्राला लागून) कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ३५, नं. १७ ; (२) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९१, नं. १५ ; (३) सेनार्ट, **इ. आय्.**, १९०२, खंड ७, पृ. ६३, नं. १७ ; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११९, नं. ११०३.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—समणाच्या मातेने दिलेली वेदिकांची (कठडा) देणगी या लेखात नमूद केली आहे.

२०६. कार्ले बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले चैत्य लेण्याच्या मध्य द्वाराच्या बाजूला खालच्या भागात कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ३५, नं. १८ ; (२) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९१, नं. १६ ; (३) सेनॉर्ट, **इ. आय्.**, १९०२, खंड ७, पृ. ६४, नं. १८ ; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११९ नं. ११०४.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—नंदिक याने तयार केलेल्या वेदिकांची घुणिकमाता कोडी भिक्षुणी हिने दिलेली देणगी.

व्यक्तिनामे.—(१) नंदिक—वेदिका तयार करणारा ; (२) कोडी—दान देणारी भिक्षुणी ; (३) घुणिक—कोडी भिक्षुणीचा पुत्र.

२०७. कार्ले बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले शैलगृह क्र. ३ मध्ये असलेल्या चैत्याच्या दक्षिणेला कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८५६, खंड ५, पृ. ४२७ ; (२) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृष्ठ ३७, नं. २२, (३) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९२, नं. १७ ; (४) सेनॉर्ट, **इ. आय्.**, १९०२, खंड ७, पृ. ७४, नं. २२ ; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १२०, नं. ११०८.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.——उल्लेख नाही.

सारांश.——या लेखात भिक्षू बुधरखित (बुद्धरक्षित) याची देणगी असे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.——(१) बुधरखित—दान देणारा भिक्षू.

२०८. कार्ले शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.——हा लेख कार्ले चैत्य लेण्यामध्ये कोरलेला आहे.

संदर्भ.——(१) स्टिव्हन्सन, **ज. बं. ए. सो.**, १८३४, खंड ३, पृ. ४९८, नं. ब्री; (२) बर्ड, हि. रि., १८४७, पृ. ३८; (३) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८५४, खंड ५, पृ. १५६, नं. १८.

भाषा व लिपी.——प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.——उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.——उल्लेख नाही.

सारांश.——या ठिकाणी फक्त सिधम् हा शब्द कोरलेला आढळतो.

२०९. कार्ले शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.——हा लेख कार्ले चैत्य लेण्यातील उजव्या बाजूच्या ओळीतील पाचव्या स्तंभावर आहे.

संदर्भ.——वत्स, इ. आय्., १९२५–२६, खंड १८, पृ. ३२५–२६, नं. १.

भाषा व लिपी.——प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.——उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.——उल्लेख नाही.

सारांश.——हा स्तंभ उमेहनाकट येथील यवन विटसंगत याची देणगी आहे.

व्यक्तिनामे.——विटसंगत—दान देणारा यवन.

ग्रामनामे.——उमेहनाकट—ओळख पटत नाही.

२१०. कार्ले शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.——हा लेख कार्ले चैत्य लेण्यातील उजव्या बाजूच्या ओळीतील आठव्या स्तंभावर आहे.

संदर्भ.——वत्स, इ. **आय्.**, १९२५–२६, खंड १८, पृ. ३२६, नं. २.

भाषा व लिपी.——प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.——उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.——उल्लेख नाही.

सारांश.——हा स्तंभ गोणेकाक येथील उपासक धमुल याची देणगी आहे.

व्यक्तिनामे.––धमुल––देणगी देणारा उपासक.

ग्रामनामे.––गोणेकाक––ओळख पटत नाही.

२११. कार्ले शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.––हा लेख कार्ले चैत्य लेण्यातील उजव्या बाजूच्या ओळीतील अकराव्या स्तंभावर आहे.

संदर्भ.––वत्स, इ. आय्., १९२५–२६, खंड १८, पृ. ३२६, नं. ३.

भाषा व लिपी.––प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––उल्लेख नाही.

सारांश.––हा स्तंभ धेनुकाकटच्या व्यापारी संघाने दान दिला आहे.

ग्रामनामे.––धेनुकाकट––कृष्णा नदीच्या तीरावरील धरणीकोट.

२१२. कार्ले शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.––हा लेख कार्ले चैत्य लेण्यातील उजव्या बाजूच्या ओळीतील तेराव्या स्तंभावर आहे.

संदर्भ.––वत्स, इ. आय्., १९२५–२६, खंड १८, पृ. ३२६, नं. ४.

भाषा व लिपी.––प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––उल्लेख नाही.

सारांश.––हा स्तंभ धेनुकाकटचा यवन धमधय याने दान दिला आहे.

व्यक्तिनामे.––धमधय (धर्मध्वज)––दान देणारा यवन.

ग्रामनामे.––धेनुकाकट––कृष्णा नदीच्या तीरावरील धरणीकोट.

२१३. कार्ले शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.––हा लेख कार्ले चैत्य लेण्यातील उजव्या बाजूच्या ओळीतील १४ व्या स्तंभावर आहे.

संदर्भ.––वत्स, इ. आय्., १९२५–२६, खंड १८, पृ. ३२६–२७, नं. ५.

भाषा व लिपी.––प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––उल्लेख नाही.

सारांश.––हा स्तम्भ धेनुकाकटच्या रोहमिताने चुलपेतु येथील अगिल नामक व्यक्तीसाठी करविला.

व्यक्तिनामे.—(१) रोहमित; (२) अगिल.

ग्रामनामे.—(१) धेनुकाकट—हल्लीचे धरणिकोट; (२) चुलपेतु—ओळख पटत नाही.

२१४. कार्ले शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले चैत्य लेण्यातील उजव्या बाजूच्या ओळीतील पंधराव्या स्तंभावर आहे.

संदर्भ.—वत्स, इ. आय्., १९२५–२६, खंड १८, पृ. ३२७, नं. ६.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा स्तंभ धेनुकाकटचा यवन चुलयख याची देणगी आहे.

व्यक्तिनामे.—चुलयख—दान देणारा यवन.

ग्रामनामे.—धेनुकाकट—हल्लीचे धरणिकोट.

२१५. कार्ले शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले चैत्य लेण्यातील डाव्या बाजूच्या ओळीतील चौथ्या स्तंभावर आहे.

संदर्भ.—वत्स, इ. आय्., १९२५–२६, खंड १८, पृ. ३२७, नं. ७.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा स्तंभ धेनुकाकटचा यवन सिहधय ह्याची देणगी आहे.

व्यक्तिनामे.—सिहधय (सिंहध्वज)—दान देणारा यवन.

ग्रामनामे.—धेनुकाकट—हल्लीचे धरणिकोट.

२१६. कार्ले शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले चैत्य लेण्यातील डाव्या बाजूच्या ओळीतील सहाव्या स्तंभावर आहे.

संदर्भ.—वत्स, इ. आय्., १९२५–२६, खंड १८, पृ. ३२७, नं. ८.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—धेनुकाकटच्या सोमिलनक याची या स्तंभाची देणगी.

व्यक्तिनामे.—सोमिलनक—दान देणारा.

ग्रामनामे.—धेनुकाकट—हल्लीचे धरणिकोट.

२१७. कार्ले शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले चैत्य लेण्यातील डाव्या बाजूच्या ओळीतील आठव्या स्तंभावर आहे.

संदर्भ.—वत्स, इ. आय्., १९२५–२६, खंड १८, पृ. ३२७–३२८, नं. ९.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—धेनुकाकटच्या गोलनामक व्यापाऱ्याच्या इसलक नामक पुत्राची या स्तंभाची देणगी.

व्यक्तिनामे.—(१) गोल—व्यापारी ; (२) इसलक—दान देणारा, गोल व्यापाऱ्याचा पुत्र.

ग्रामनामे.—धेनुकाकट—हल्लीचे धरणिकोट.

२१८. कार्ले शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले चैत्य लेण्यातील डाव्या बाजूच्या ओळीतील नवव्या स्तंभावर आहे.

संदर्भ.—वत्स, इ. आय्., १९२५–२६, खंड १८, पृ. ३२८, नं. १०.

भाषा व लिपी.—प्राकृत. ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा स्तंभ धेनुकाकटचा यवन यसवधन याची देणगी.

व्यक्तिनामे.—यसवधन (यशवर्धन)—दान देणारा यवन.

ग्रामनामे.—धेनुकाकट—हल्लीचे धरणिकोट.

२१९. कार्ले शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कार्ले चैत्य लेण्यातील डाव्या बाजूच्या ओळीतील दहाव्या स्तंभावर आहे.

संदर्भ.—वत्स, इ. आय्., १९२५–२६, खंड १८, पृ. ३२८, नं. ११.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––उल्लेख नाही.

सारांश.––लेख बराच खराब झाला आहे. या लेखात धेनुकाकटच्या महमता स्त्रीचे नाव नमूद केले आहे. तिच्या पतीचे नाव लागत नाही.

व्यक्तिनामे.––महमता.

ग्रामनामे.––धेनुकाकट––हल्लीचे धरणिकोट.

२२०. कार्ले शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.––हा लेख कार्ले चैत्य लेण्यातील डाव्या बाजूच्या ओळीतील तेराव्या स्तंभावर आहे.

संदर्भ.––वत्स, इ. आय्., १९२५–२६, खंड १८, पृ. ३२८, नं. १२.

भाषा व लिपी.––प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––उल्लेख नाही.

सारांश.––हा स्तंभ धेनुकाकटचा गृहपति आसेक याची नातलग धर्मदेवी हिने दान दिला आहे.

व्यक्तिनामे.––(१) आसेक––गृहपती ; (२) धमदेवी––दान देणारी स्त्री.

ग्रामनामे.––धेनुकाकट––हल्लीचे धरणिकोट.

२२१. कार्ले शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.––हा लेख असलेली शिला कार्ले लेण्याजवळ सापडली.

संदर्भ.––वत्स, इ. आय्., १९२५–२६, खंड १८, पृ. ३२९, नं. १३.

भाषा व लिपी.––प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––उल्लेख नाही.

सारांश.––हा लेख नीट वाचता येत नाही.

२२२. कालवार शिलालेख, यादव रामचंद्रदेव

जिल्हा––**ठाणे** तालुका––**भिवंडी**

प्राप्तिस्थळ.––प्रस्तुत शिलालेख कालवार या गावी एका शेतात सापडला.

संदर्भ.––(१) दीक्षित, मो. गं., **म. प्रा. ता. शि.**, १९४७, पृ. १०३–१०५ ; (२) तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.**, १९६३, पृ. २१२–२१६. नं. ४०.

भाषा व लिपी.––संस्कृत व मराठी मिश्रण ; इ. स. १२ व्या किंवा १३ व्या शतकातील देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.––यादव नृपती रामचंद्रदेव.

वर्ष व तिथी.—भौमवार, माघ शुद्ध २, सर्वधारी संवत्सर शके १२१०, २५ जानेवारी, इ. स. १२८९.

सारांश.—हा लेख यादव नृपती रामचंद्रदेव याच्या अमदानीतील आहे. या लेखात रामचंद्रदेवाचा मांडलिक श्रीजाईदेव व कोकणचा सर्वाधिकारी कान्हरदेव यांचाही उल्लेख आहे. प्रस्तुत लेखाचा मुख्य उद्देश कान्हरदेवाने काही जमीन एका देवालयास दान दिली हे नमूद करण्याचा होता. दान दिलेल्या भूमीच्या चतुःसीमाही यात सांगितल्या आहेत. हा लेख राम याने कोरला आहे.

व्यक्तिनामे.—(१) रामचंद्रदेव—यादव नृपती; (२) जाईदेव—यादव नृपतीचा मांडलिक; (३) कान्हरदेव—दान देणारा कोकणचा सर्वाधिकारी; (४) राम—लेख कोरणारा.

ग्रामनामे.—(१) कालवाहार—भिवंडी तालुक्यातील सध्याचे कालवार; (२) कावेषंड (कावेखंड?)—ओळख पटत नाही. (३) मिरिदेस.

२२३. कासार शिरसी किंवा जमळगाम ताम्रपट, विजयादित्य

जिल्हा—**उस्मानाबाद** तालुका—**निलंगा**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट कासार शिरसी येथील पोलीस पाटील श्री. दिनकरराव बाळाजीराव यांच्याजवळ मिळाला.

संदर्भ.—(१) नागराजराव, इ. आय्., खंड ३६, पृ. ३१३–३१६; (२) कोलते, वि. भि., **ना.वि.सं.मं.**, जुलै १९६६, पृ. १७–३६; **ना.वि.प.**, एप्रिल १९६७, खंड १७, पृ. १४३–१४९.

भाषा व लिपी.—संस्कृत; लिपी दाक्षिणात्य वळणाची व पश्चिमी चालुक्य नृपतींच्या इतर शासनातील लिपीप्रमाणे.

राजवंश व राजा.—बदामीचा चालुक्य नृपती विजयादित्य.

वर्ष व तिथी.—वैशाख पौर्णिमा, शके ६१९ (गत वर्ष), इ. स. ६९६–६९७, प्रथम शासनवर्ष.

सारांश.—हा ताम्रपट चालुक्य नृपती विजयादित्य याच्या अमदानीतील आहे. या ताम्रपटाचा मुख्य उद्देश छल्लुंकी देशातील मोरखंडीच्या पश्चिमेस असलेली मुगुळि व पुल्लवादलि या गावांच्या मध्ये असलेले जमळगाम हे गाव भारद्वाज गोत्री प्रभाकर व कौशिक गोत्री कोत्तिशर्मन् या ब्राह्मणांना दान दिले हे नमूद करण्याचा होता. महासांधिविग्रहिक श्री रामपुण्यवल्लभ याने हा लेख लिहिला.

व्यक्तिनामे.—(१) पुलकेशी वल्लभ—चालुक्य नृपती; (२) कीर्तिवर्मन्—चालुक्य नृपती, पुलकेशी वल्लभाचा पुत्र; (३) सत्याश्रय—चालुक्य नृपती, कीर्तिवर्मन् याचा पुत्र; (४) विक्रमादित्य—चालुक्य नृपती, सत्याश्रयाचा पुत्र; (५) विनयादित्य—चालुक्य नृपती, विक्रमादित्याचा पुत्र; (६) विजयादित्य—चालुक्य नृपती, विनयादित्याचा पुत्र; (७) कोत्तिशर्मन्—दान स्वीकारणारा, गृहीतसाहस्र, कौशिक गोत्री ब्राह्मण; (८) प्रभाकर—दान स्वीकारणारा, गृहीतसाहस्र, भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (९) प्रभाकर—दान स्वीकारणारा षडंगविद्, भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (१०) नरेंद्रादित्य—दानाची विनंती करणारा; (११) श्रीहर्ष—उत्तरापथेश्वर; (१२) रामपुण्यवल्लभ—ताम्रपट लिहिणारा महासांधिविग्रहिक.

ग्रामनामे.—(१) मोरखंडी—कासार शिरसीच्या आग्नेयेस आठ मैलांवर असलेले म्हैसूर राज्यातील, बीड जिल्ह्यातील, हुमणाबाद तालुक्यातील मोरखंडी; (२) रासेनपुर—अहमदनगर जिल्ह्यातील राशिन असावे; (३) जमळग्राम—मोरखंडीच्या पश्चिमेस १२ मैलांवर जाजन मुगळी असून त्याच्या वायव्येस १५ मैलांवर बेट जवळग आहे. हे प्रस्तुत ताम्रपटातील जवळग्राम असावे;

(४) मुगुळि—कासार शिरसीच्या ईशान्येस १५ मैलांवर कल–मुगुलि व मोरखंडच्या पश्चिमेला १२ मैलांवर जाजन–मुगुली ही गावे आहेत; (५) पुल्लवादलि—ओळख पटत नाही.

२२४. कासारे ताम्रपट, अल्लशक्ति, कलचुरि संवत् ४०४

जिल्हा—**धुळे** तालुका—**साक्री**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट धुळे जिल्ह्यामध्ये कासारे या ठिकाणी सापडला. सध्या हा ताम्रपट पुणे येथील भारत इतिहास संशोधन मंडळात आहे.

संदर्भ.—(१) खरे, ग. ह., **द.म.इ.सा.**, खंड ३, पृ. ६६; **इ. आय्.**, १९४९–५०, खंड २८, पृ. १९७–२०५; (२) मिराशी, वा. वि., **कॉ.इं.इं.**, १९५५, खंड ४, भाग १, पृ. ११०–११६; (३) चांदोरकर, **इतिहास आणि ऐतिहासिक**, वर्ष ३, नं. २६, पृ. ४४.

भाषा व लिपी.—संस्कृत; लिपी दाक्षिणात्य वळणाची, पश्चिमेकडील प्रकारची.

राजवंश व राजा.—सेंद्रक नृपती अल्लशक्ति.

वर्ष व तिथी.—सूर्यग्रहण, आषाढ, वर्ष ४०४ (कलचुरि), १ जून, इ. स. ६५३.

सारांश.—हा ताम्रपट सेंद्रक नृपती अल्लशक्ति याने दिलेला आहे. या शासनाचा उद्देश शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन शाखेच्या कृष्णात्रेय गोत्री बालप्रवसित नामक ब्राह्मणाला पर्णन्धदि नदीच्या दक्षिणेला असलेल्या पिप्पलखेट गावातील ५० निवर्तने जमीन दान दिली हे नमूद करण्याचा होता. हा लेख महाबलाधिकृत श्रीवासव याच्या आज्ञेवरून देवदिन्न याने लिहिला

व्यक्तिनामे.—(१) निकुंभ—सेंद्रक नृपती; (२) आदित्यराज—सेंद्रक नृपती, निकुंभाचा पुत्र; (३) अल्लशक्ति—सेंद्रक नृपती, आदित्यराजाचा पुत्र; (४) बालप्रवसित—दान स्वीकारणारा कृष्णात्रेय गोत्री ब्राह्मण; (५) वासव—ताम्रपट लिहिण्याची आज्ञा देणारा महाबलाधिकृत; (६) देवदिन्न—लेख लिहिणारा.

ग्रामनामे.—पिप्पलखेट—कासारेच्या पश्चिमेस ९ मैलांवर असलेले पिंपळनेर (?).

२२५. काळेगाव ताम्रपट, यादव महादेव

जिल्हा—**अहमदनगर** तालुका—**नेवासे**

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत ताम्रपट काळेगाव येथे एका दगडी पेटीत सापडला.

संदर्भ.—कोपरकर, डी. जी. **इ. आय्.**, १९५७–५८, खंड ३२, पृ. ३१–४४.

भाषा व लिपी.—संस्कृत; देवनागरी.

राजवंश व राजा.—यादव नृपती महादेव.

वर्ष व तिथी.—दुर्मति (चालू), सोमवार, भाद्रपद शुद्ध २, शक संवत् ११८२; २९ ऑगस्ट, इ. स. १२६१.

सारांश.—हा ताम्रपट नृपती महादेव याच्या राज्याभिषेकप्रसंगी दिलेला आहे. या ताम्रपटामध्ये या प्रसंगी ५२ ब्राह्मणांना कालुगाव दान दिल्याचा उल्लेख आहे. या दान दिलेल्या गावाचे नाव बदलून पट्टवर्धनपूर असे करण्यात आले. या गावाचे दान घेणारे ५२ ब्राह्मण २२ गोत्रांचे होते. ५२ पैकी ३० ऋग्वेदी, २१ यजुर्वेदी व एक सामवेदी ब्राह्मण होता.

व्यक्तिनामे.—(१) पोति—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (२) माधव—पोतीचा पिता; (३) लक्ष्मीधर—दान स्वीकारणारा शांडिल्य गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (४) जोगदेव—लक्ष्मीधराचा पिता; (५) प्रभाकर—दान स्वीकारणारा शांडिल्य गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (६) जोगदेव—प्रभाकराचा पिता; (७) नारायण—दान स्वीकारणारा कौण्डिन्य गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (८) महादेव—नारायणाचा पिता; (९) कृष्ण—दान स्वीकारणारा कौण्डिन्य गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (१०) गोविंद—कृष्णाचा पिता; (११) जनार्दन—दान स्वीकारणारा मुद्गल गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (१२) देवर्त—जनार्दनाचा पिता; (१३) विष्णु—दान स्वीकारणारा वत्स गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (१४) शारंग—विष्णूचा पिता; (१५) दामोदर—दान स्वीकारणारा कौशिक गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (१६) सोमनाथ—दामोदराचा पिता; (१७) बोपदेव—दान स्वीकारणारा शाण्डिल्य गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (१८) जाकदेव—बोपदेवाचा पिता; (१९) जनार्दन—दान स्वीकारणारा जामदग्न्य वत्स गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (२०) पुरुषोत्तम—जनार्दनाचा पिता; (२१) चांगदेव—दान स्वीकारणारा पराशर गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (२२) देवण—चांगदेवाचा पिता; (२३) दामोदर—दान स्वीकारणारा कौण्डिन्य गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (२४) श्रीवत्स—दामोदराचा पिता; (२५) मैराल—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (२६) विष्णु—मैरालाचा पिता; (२७) विष्णु—दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (२८) कूथि—विष्णूचा पिता; (२९) नारायण—दान स्वीकारणारा जामदग्न्यवत्स गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (३०) वामन—नारायणाचा पिता; (३१) विद्याधर—दान स्वीकारणारा वसिष्ठ गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (३२) रेवदास—विद्याधराचा पिता; (३३) सोमनाथ—दान स्वीकारणारा बादरायण गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (३४) राघव—सोमनाथाचा पिता; (३५) विष्णु—दान स्वीकारणारा शांडिल्य गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (३६) तांमण—विष्णूचा पिता; (३७) आपदेव—दान स्वीकारणारा गार्ग्य गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (३८) वामन—आपदेवाचा पिता; (३९) आपदेव—दान स्वीकारणारा जामदग्न्यवत्स गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (४०) मैराल—आपदेवाचा पिता; (४१) अण्णम—दान स्वीकारणारा वसिष्ठ गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (४२) आपदेव—अण्णमाचा पिता; (४३) लोकनाथ—दान स्वीकारणारा कपि गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (४४) पुरुषोत्तम—लोकनाथाचा पिता; (४५) रामदेव—दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (४६) आपदेव—रामदेवाचा पिता; (४७) कोमण—दान स्वीकारणारा आत्रेय गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (४८) श्रीधर—कोमणाचा पिता; (४९) विष्णु—दान स्वीकारणारा गौतम गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (५०) तीकमपेदि—विष्णूचा पिता; (५१) आपदेव—दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (५२) चंद्र—आपदेवाचा पिता; (५३) पद्मनाभ—दान स्वीकारणारा वाभ्र्यश्व गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (५४) पुरुषोत्तम—पद्मनाभाचा पिता; (५५) वासुदेव—दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (५६) माधव—वासुदेवाचा पिता; (५७) कमलदेव—दान स्वीकारणारा भार्गव गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (५८) चांगदेव—कमलदेवाचा पिता; (५९) हरि—दान स्वीकारणारा हारीत गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (६०) कालिदास—हरीचा पिता; (६१) विनायक—दान स्वीकारणारा मि(त्र) युव गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (६२) बोपदेव—विनायकाचा पिता; (६३) लक्ष्मीधर—दान स्वीकारणारा लोहित गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (६४) पद्मनाभ—लक्ष्मीधराचा पिता; (६५) महादेव—दान स्वीकारणारा वाभ्र्यश्व गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (६६) पद्मनाभ—महादेवाचा पिता; (६७) वासुदेव—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (६८) हरिहर—वासुदेवाचा पिता; (६९) पोति—दान स्वीकारणारा देवरात गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (७०) मैराल—पोतिचा पिता; (७१) वासुदेव—दान स्वीकारणारा देवरात गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (७२) नारायण—वासुदेवाचा पिता; (७३) पद्मनाभ—दान स्वीकारणारा वत्स गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (७४) नागदेव—पद्मनाभाचा पिता; (७५) मलिदेव—दान स्वीकारणारा कौण्डिन्य गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा;

(७६) जक्किपेदि—मलिदेवाचा पिता; (७७) जोगदेव—दान स्वीकारणारा कौशिक गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (७८) वामन—जोगदेवाचा पिता; (७९) दामोदर—दान स्वीकारणारा वासिष्ठ गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (८०) वासुदेव—दामोदराचा पिता; (८१) गोविंद—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (८२) एकम—गोविंदाचा पिता; (८३) गोविंद—दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण, छंदोग शाखा; (८४) लक्ष्मीधर—गोविंदाचा पिता; (८५) चक्रपाणी—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (८६) माधव—चक्रपाणीचा पिता; (८७) कृष्ण—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (८८) वामन—कृष्णाचा पिता; (८९) विश्वनाथ—दान स्वीकारणारा कौण्डिन्य गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (९०) राघव—विश्वनाथाचा पिता; (९१) ऋषि—दान स्वीकारणारा कौण्डिन्य गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (९२) राघव—ऋषीचा पिता; (९३) मांद्रदेव-दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (९४) देवण-मांद्रदेवाचा पिता; (९५) केशव—दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (९६) मधुसूदन—केशवाचा पिता; (९७) नारायण—दान स्वीकारणारा वासिष्ठ गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (९८) दामोदर—नारायणाचा पिता; (९९) गंगाधर—दान स्वीकारणारा विश्वामित्राघमर्षण कौशिक गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (१००) अण्णम—गंगाधराचा पिता; (१०१) नीलकंठ—दान स्वीकारणारा विश्वामित्राघमर्षण कौशिक गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (१०२) सोमनाथ—नीलकंठाचा पिता; (१०३) हरि—दान स्वीकारणारा जामदग्न्यवत्स गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (१०४) शार्ंग (शाङर्ग)–हरिचा पिता; (१०५) सिंघण साहसांक–यादव नृपती; (१०६) मल्लुगि—यादव नृपती, साहसांकाचा पुत्र; (१०७) भिल्लम—यादव नृपती; (१०८) जैतुगि—यादव नृपती, भिल्लमाचा पुत्र; (१०९) सिंघणदेव—यादव नृपती, जैतुगिचा पुत्र; (११०) कृष्णदेव (कान्हरदेव)—यादव नृपती, जैतुगिचा पुत्र; (१११) महादेव—दान देणारा यादव नृपती, कान्हरदेवाचा धाकटा भाऊ; (११२) वीसल—गुर्जर नृपती.

ग्रामनामे.—(१) कालुगांव—जेथे ताम्रपट सापडला ते काळेगाव; (२) नींबरवी—काळेगावच्या पूर्वेस असलेले लिंबारी किंवा निंबारी; (३) दहींगौं—काळेगावच्या दक्षिणेस ४ मैलांवरील दहीगाव; (४) रांजणगौं—काळेगावच्या दक्षिणेस ४ मैलांवरील रांजणगाव; (५) खांभगौं—काळेगावच्या पश्चिमेस तीन मैलांवरील खामगाव; (६) नाईगौं—संपादकांच्या मते काळेगावच्या पश्चिमेस ४ मैलांवर असलेले वरखेड असावे. निश्चित ओळख पटत नाही. (७) सेउणदेश

२२६. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

जिल्हा—**कुलाबा** तालुका—**मानगाव**

प्राप्तिस्थळ.—कुडा शैलगृह क्र. १ मध्ये असलेल्या खोलीच्या द्वाराच्या डाव्या बाजूला असलेल्या भिंतीवर आहे. (भिंतीच्या पडलेल्या भागावर दोन तीन अक्षरे आहेत.)

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५४, खंड ५, पृ. १७१, नं. ५; (२) याकोबी, इं. अँ., १८७३, खंड ७, पृ. २५३, नं. १; (३) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ. ४, नं. १; (४) बुल्हर व बर्जेस, **आ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८४, नं. १; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.** १०, १९०९–१०, पृ. १०९, नं. १०३७.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—महाभोज मांदव स्कंदपालित, महाभोजी सडगेरी विजया.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात महाभोजी विजया हिचा पुत्र महाभोज मांदव स्कंदपालित याचा लेखक सुलसदत्त व उत्तरदत्ता यांचा पुत्र शिवभूती याची, त्याची पत्नी नंदा हिच्यासह दिलेली देणगी नमूद केली आहे.

व्यक्तिनामे.—(१) सिवभूती—दान देणारा; (२) नंदा—शिवभूतीची पत्नी; (३) सुलसदत—शिवभूतीचा पिता; (४) उतरदता—शिवभूतीची माता; (५) मंदव खंदपालित—महाभोज; (६) सडगेरि विजया—महाभोजी, मांदव स्कंदपालित याची माता.

२२७. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ—हा लेख कुडा शैलगृह क्र. १३ मध्ये कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५४, खंड ५, पृ. १७०, नं. ३; (२) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.**, १८८१, पृ. १५, नं. १९; (३) बुल्हर व बर्जेस, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८७, नं. १७; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १११, नं. १०५४.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—महाभोज साडकर सुदर्शन.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—महाभोज साडकर सुदर्शन याची कन्या विजयेनिका हिची लेण्याची देणगी या लेखात नमूद केली आहे.

व्यक्तिनामे.—(१) साडकर सुदंसण—महाभोज; (२) विजयनिका—दान देणारी महाभोज साडकर सुदर्शन याची कन्या.

२२८. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृहात कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) याकोबी, **इं. अँ.**, १८७८, खंड ७, पृ. २५६, नं. ८; (२) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.**, १८८१, पृ. १७, नं. २३; (३) बुल्हर व बर्जेस, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८७, नं. २०; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११२, नं. १०५८.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—मान्दव कोच्छिपुत महाभोज वेलिदत्त.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—मांदव कोच्छिपुत वेलिदत्त हा महाभोज असताना अहिलपुत्र रामदत्त अर्धगच्छक याने चेतियघर व लेणे आणि त्याची पत्नी वेलिदत्ता हिने एक लेणे अशी देणगी दिली असे या लेखात नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) रामदत—दान देणारा; (२) वेलिदता—दान देणारी, रामदत्त याची पत्नी; (३) अहिल—रामदत्ताचा पिता; (४) मंदव कोच्छिपुत वेलिदत—महाभोज; (५) कोच्छि—वेलिदत्ताची माता.

२२९. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. ३ मध्ये डाव्या बाजूच्या भिंतीवर बाहेरच्या बाजूवर आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ. ५, नं. २; (२) बुल्हर व बर्जेस अ.स.वे.इं., १८८३, खंड ४, पृ. ८४, नं. २; (३) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १०९, नं. १०३८.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात भूति या शद्वाने शेवट होणारे नाव असणाऱ्या व्यक्तीची लेण्याची देणगी नमूद केली आहे.

२३०. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. ५ मध्ये कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ.५, नं. ३; (२) बुल्हर व बर्जेस, अ.स.वे.इं., १८८३, खंड ४, पृ. ८४, नं. ३; (३) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १०९, नं. १०३९.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—दोन कुंडांची (पोढी) देणगी.

२३१. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. ५ मध्ये उजव्या बाजूच्या भिंतीवर मध्ये कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ. ६, नं. ४; (२) बुल्हर व बर्जेस, अ.स.वे.इं., १८८३, खंड ४, पृ. ८४, नं. ४; (३) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १०९, नं. १०४०.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात भदंत सिवदत (शिवदत्त) व सातिमिता (स्वातिमित्रा) यांच्या शिष्याने दिलेली लेण्याची देणगी नमूद केली आहे. देणगी देणाऱ्यांचे नाव नष्ट झाले आहे.

व्यक्तिनामे.—(१) सिवदत (शिवदत्त); (२) सातिमिता (स्वातिमित्रा).

२३२. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. ५ च्या व्हरांड्याच्या डाव्या बाजूच्या भिंतीवर आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो., १८५४, खंड ५, पृ. १७३, नं. ८;

(२)याकोबी, इं.अँ., १८७८, खंड ७, पृ. २५४, नं. २; (३) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ. ६, नं. ५; (४) बुल्हर व बर्जेस, अ.स.वे.इं., १८८३, खंड ४, पृ. ८५, नं. ५; (५) ल्युडर्स, अपेंडिक्स्, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १०९–११०, नं. १०४१.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—भदंत पातिमित व भदंत आगिमित यांच्या बहिणीची मुलगी भिक्षुणी नागनिका हिची मुलगी पदुमनिका हिची, तिची शिष्या बोधी व तिची शिष्या असाल्हमिता यांच्यासह दिलेली लेणे व कुंडाची देणगी या लेखात नमूद केली आहे.

व्यक्तिनामे.—(१) पातिमित(स्वातिमित्र?)—भदंत; (२) आगिमित (अग्निमित्र)—भदंत; (३) नागनिका—भिक्षुणी; (४) पदुमनिका (पद्मनिका)—दान देणारी भिक्षुणी, नागनिकेची कन्या; (५) बोधी—पदुमनिकेची शिष्या; (६) असाल्हमिता (अषाढमित्रा)—बोधीची शिष्या.

२३३. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. ६ मधील व्हरांड्याच्या डाव्या टोकाला कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) याकोबी, इं. अँ., १८७८, खंड ७, पृ. २५४, नं. ३; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए. सो., १८५४, खंड ५, पृ. १७३, नं. ९; (३) बुल्हर व बर्जेस, अ.स.वे.इं., १८८३, खंड ४, पृ. ८५, नं. ६; (४) ल्युडर्स, अपेंडिक्स्, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. ११०, नं. १०४५.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—महाभोज मंदव स्कंदपालित.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—सुलसदत्त व उत्तरदत्ता यांचा पुत्र शिवम व त्याची पत्नी विजया यांची लेण्याची देणगी, शिवाय शिवमचे पुत्र शिवपालित, शिवदत्त व सपिल यांची कोरण्याची (Stone-carving) देणगी व त्याच्या कन्या सर्पा, शिवपालिता, शिवदत्ता व सुलसदत्ता यांची स्तंभांची देणगीही या लेखात नमूद केली आहे.

व्यक्तिनामे.—(१) मांदव खंदपालित—महाभोज; (२) साडगेरि किंवा साडगेर्या विजया—महाभोजी; (३) सिवम—लेणे दान देणारा; (४) विजया—शिवमची पत्नी; (५) सुलसदत—शिवमचा पिता; (६) उतरदता–शिवमची माता; (७) सिवपालित–कोरण्याची (सेलरूपकम्) देणगी देणारा सिवमचा पुत्र; (८) सिवदत्त—देणगी देणारा शिवमचा पुत्र; (९) सपिल—देणगी देणारा शिवमचा पुत्र; (१०) सापा (सर्पा); (११) सिवपालिता; (१२) सिवदत्ता; (१३) सुलसदता; (१०) ते (१३) स्तंभांचे दान देणाऱ्या शिवमच्या कन्या; (१४) सिवभूति—शिवमचा मोठा भाऊ.

२३४. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. ६ मध्ये आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ. ८, नं. ६; (२) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. ११०, नं. १०४२.

भाषा व लिपी.—संमिश्र भाषा, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात कोणातरी संघोपासक व्यक्तीची देणगी नमूद केली आहे. लेख तुटक आहे, वाचता येत नाही.

२३५. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. ६ मध्ये आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ. ८, नं. ७; (२) बुल्हर व बर्जेस, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८५, नं. ७; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स**, **इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११०, नं. १०४३.

भाषा व लिपी.—संस्कृत (मिश्र भाषा), ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—शाक्योपासिका व्याघ्रका हिची पुण्यकारक देणगी.

व्यक्तिनामे.—व्याघ्रका—उपासिका.

२३६. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. ६ मध्ये व्हरांड्यातील उजव्या बाजूच्या लहान स्तंभाच्या खालच्या अर्धवर्तुळाकार भागावर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) ल्युडर्स, **अपेंडिक्स**, **इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११०, नं. १०४२.

भाषा व लिपी.—संस्कृत (बर्जेस), मिश्र भाषा (ल्युडर्स), ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—पिता, माता व पूर्ण जगास सर्वोच्च ज्ञान प्राप्त व्हावे या उद्देशाने एका शाक्य भिक्षूने दिलेली देणगी.

२३७. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. ६ मध्ये कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५४, खंड ५, पृ. १७२, नं. ७; (२) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ. ११, नं. १०; (३) बुल्हर व बर्जेस, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८६, नं. ९; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स**, **इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११०, नं. १०४६.

भाषा व लिपी.—मिश्र भाषा, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—शाक्य भिक्षु बुद्धसिंघ (बुद्धसिंह) याची देणगी.

व्यक्तिनामे.—बुद्धसिंघ (बुद्धसिंह)—शाक्य भिक्षु.

२३८. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. ६ मध्ये आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ११, नं. ११ व १२; (२) बुल्हर व बर्जेस, अ.स.वे.इं., १८८३, खंड ४, पृ. ८६, नं. १०; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११०, नं. १०४७.

भाषा व लिपी.—मिश्र भाषा, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—शाक्य भिक्षु संघदेव याची मूर्ति व दिवा लावण्यासाठी चेंडिन शेत याची देणगी.

व्यक्तिनामे.—संघदेव—शाक्य भिक्षु.

२३९. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. ७ मध्ये आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५४, खंड ५, पृ. १७२, नं. ६; (२) याकोबी, इं. अँ., १८७८, खंड ७, पृ. २५५, नं. ४; (३) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.**, १८८१, पृ. १२, नं. १३; (४) बुल्हर व बर्जेस, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८६, नं. ११; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स**, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १११, नं. १०४८.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—मामकवेजिय वैद्य, उपासक इसिरखित (ऋषिरक्षित) याचा पुत्र सोमदेव वैद्य व त्याचे पुत्र नाग, इसिरखित, सिवघोस व कन्या इसिपालिता, पुसा, धंमा व सपा यांची लेण्याची देणगी.

व्यक्तिनामे.—(१) सोमदेव—देणगी देणारा वैद्य; (२) इसिरखित (ऋषिरक्षित)—मामकवेजिय वैद्य, सोमदेवाचा पिता; (३) नाग—सोमदेवाचा पुत्र; (४) इसिरखित (ऋषिरक्षित)—सोमदेवाचा पुत्र; (५) सिवघोस (शिवघोष)—सोमदेवाचा पुत्र; (६) इसिपालिता (ऋषिपालिता)—सोमदेवाची कन्या; (७) पुसा (पुष्या)—सोमदेवाची कन्या; (८) धंमा (धर्मा)—सोमदेवाची कन्या; (९) सपा (सर्पा)—सोमदेवाची कन्या.

२४०. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. ७ मधील फुटक्या कुंडाच्या वर असलेल्या मोकळ्या जागेत आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.बे.इं.**, १८८१, पृ. १३, नं. १४; (२) बुल्हर व बर्जेस, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८६, नं. १२; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १११, नं. १०४९.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—मंडवप्रमुख शिवम याचा पुत्र कुमार मंडव याची देणगी.

व्यक्तिनामे.—(१) सिवम—मंडवप्रमुख; (२) कुमार मडव—देणगी देणारा शिवमचा पुत्र.

२४१. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. ९ च्या व्हरांड्याच्या उजवीकडील बाजूला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५४, खंड ५, पृ. १७०, नं. १; (२) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.बे.इं.**, १८८१, पृ. १४; नं. १५; (३) बुल्हर व बर्जेस, **अ.स.बे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८६, नं. १३; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १११, नं. १०५०.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—ब्राह्मण उपासक अयितिलु याची पत्नी भयिला हिची चेतियघराची देणगी.

व्यक्तिनामे.—(१) अयितिलु (आर्यतिलु)—ब्राह्मण उपासक; (२) भयिला—दान देणारी ब्राह्मणी, अयितिलुची पत्नी (भ्राजिला).

२४२. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. १० च्या प्रांगणाच्या उजव्या बाजूला असलेल्या खिडकीच्या वर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५४, खंड ५, पृ. १७०, नं. २; (२) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.बे.इं.**, १८८१, पृ. १४, नं. १६; (३) बुल्हर व बर्जेस, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८६, नं. १४; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १११, नं. १०५१.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—वधुक नामक माळ्याचा पुत्र माळी सिवपिरित याची लेण्याची देणगी.

व्यक्तिनामे.—(१) वधुक—माळी; (२) सिवपिरित (शिवप्रीत अथवा शिवपालित)—दान देणारा माळी.

२४३. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. ११ च्या व्हरांडाच्या उजव्या बाजूच्या भिंतीवर आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.**, १८८१, पृ. १४, नं. १७; (२) बुल्हर व बर्जेस, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८६, नं. १५; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १११, नं. १०५२.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात एका महाभोजाच्या मुलीची देणगी नमूद केलेली असावी. लेख अर्धवट आहे, वाचता येत नाही.

२४४. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. १२ मध्ये उजव्या बाजूला असलेल्या बाकाच्या वरच्या मोकळ्या जागेत आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.**, १८८१, पृ. १५, नं. १८; (२) बुल्हर व बर्जेस, **अ.स.वे.इं.**, १८८३, पृ. ८७, नं. १६; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १११, न. १०५३.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—राजमंत्री हाल याची कन्या गोयंमा हिची लेण्याची देणगी.

व्यक्तिनामे.—(१) हाल—राज्यमंत्री; (२) गोयंमा—दान देणारी हालाची कन्या.

२४५. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. १४ च्या डाव्या बाजूच्या भिंतीवर आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५४, खंड ५, पृ. १७१, नं. ४; (२) याकोबी, **इं. अँ.**, १८७८, खंड ७, पृ. २५६, नं. ७; (३) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.**, १८८१, पृ. १६, नं. २०; (४) बुल्हर व बर्जेस, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८७, नं. १८; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११२, नं. १०५५.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—करहाटकचा लोहवणिज महिक याची लेण्याची देणगी.

व्यक्तिनामे.—महिक—देणगी देणारा लोहवणिज.

ग्रामनामे.—करहाकड—सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड.

२४६. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. १४ मध्ये असलेल्या टाक्यावर आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ.१६, नं. २१; (२) बुल्हर व बर्जेस, अ.स.वे.इं., १८८३, पृ.८७, नं. १९; (३) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ.११२, नं. १०५६.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—गृहपती वसुल या सावकाराची (श्रेष्ठी) स्नानाच्या टाक्याची देणगी.

व्यक्तिनामे.—वसुल—दान देणारा श्रेष्ठी गृहपती.

२४७. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. १४ जवळ असलेल्या, मातीत दबलेल्या टाक्यावर आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ. १६, नं. २२; (२) बुल्हर व बर्जेस, अ.स.वे.इं., १८८३, खंड ४, पृ. ८७, नं. २०; (३) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. ११२, नं. १०५७.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखाचे वाचन केलेले नाही.

२४८. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. १६ मध्ये असलेल्या पाण्याच्या टाक्यावर आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ. १८, नं. २४; (२) बुल्हर व बर्जेस, अ.स.वे.इं., १८८३, खंड ४, पृ. ८७, नं. २१; (३) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. ११२, नं. १०५९.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखातील पहिली ओळ नष्ट झाली आहे. दुसऱ्या ओळीत स्त्री शिष्या बोधी हिचे नाव आहे.

व्यक्तिनामे.—बोधी.

२४९. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. १६ मध्ये असलेल्या खोलीचे दार व खिडकी यांच्यामध्ये असलेल्या मोकळ्या जागेत आहे.

संदर्भ.—(१) याकोबी, इं. अँ., १८७८, खंड ७, पृ. २५६, नं. ९; (२) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ. १८, नं. २५; (३) बुल्हर व बर्जेस, अ.स.वे.इं., १८८३, खंड ४, पृ. ८७, नं. २२; (४) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. ११२, नं. १०६०.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—भदंत विजय याची शिष्या भिक्षुणी सपिला (सर्पिला) हिची, लोहिता, वेण्हुया व सर्पिला हिची बोधि नामक शिष्या यांच्यासह दिलेली लेण्याची देणगी.

व्यक्तिनामे.—(१) विजय—भदंत; (२) सपिला (सर्पिला)—भिक्षुणी; (३) लोहिता—भिक्षुणी; (४) वेण्हुया—भिक्षुणी; (५) बोधि—भिक्षुणी.

२५०. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. १६ मधील एका टाक्यावर आहे.

संदर्भ.—(१) याकोबी, इं. अँ., १८७८, खंड ७, पृ. २५६, नं. १०; (२) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ. १८, नं. २६; (३) बुल्हर व बर्जेस, अ.स.वे.इं., १८८३, खंड ४, पृ. ८८, नं. २३; (४) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. ११२, नं. १०६१.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—मुगुदा-माळचाची कुंडाची देणगी. देणगी देणाऱ्याचे नाव पूर्ण वाटत नाही. ल्युडर्सच्या मते ते मृगदास असावे.

२५१. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. १७ मध्ये समोरच्या खोलीच्या दाराच्या डाव्या बाजूला मागच्या भिंतीवर अगदी छताजवळ कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) याकोबी, इं. अँ. १८७८, खंड ७, पृ. २५७, नं. ११; (२) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ. १९, नं. २७; (३) बुल्हर व बर्जेस, अ.स.वे.इं., १८८३, खंड ४, पृ. ८८, नं. २४; (४) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. ११३, नं. १०६२.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—स्वामीपुत्र नाग, व्यापारी व गृहपती, याची लेण्याची देणगी.

व्यक्तिनामे.—(१) नाग—व्यापारी गृहपती, देणगी देणारा; (२) स्वामी—नागाचा पिता.

२५२. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. १८ मधील डाव्या बाजूला असलेल्या व्हरांड्याच्या मागच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) याकोबी, इं. अँ., १८७८, खंड ७, पृ. २५७, नं. १२; (२) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ. १९, नं. २८; (३) बुल्हर व बर्जेस, अ.स.वे.इं., १८८३, खंड ४, पृ. ८८, नं. २५; (४) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. ११३, नं. १०६३.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—व्यापारी वसुलणक याची लेण्याची पुण्यकारक देणगी.

व्यक्तिनामे.—वसुलणक—दान देणारा व्यापारी.

२५३. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. २१ च्या दाराच्या डाव्या बाजूला असलेल्या टाक्यावर आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. २०, नं. २९; (२) बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं., १८८३, खंड ४, पृ. ८८, नं. २६; (३) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. ११३, नं. १०६४.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—वसुलणक श्रेष्ठीची कुंडाची देणगी.

व्यक्तिनामे.—वसुलणक—देणगी देणारा श्रेष्ठी.

२५४. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. २३ मध्ये डाव्या बाजूला असलेल्या खिडकीच्या वर कोरलेला आहे.

संदर्भ.—बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. २०, नं. ३०; (२) बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं., १८८३, खंड ४, पृ. ८८, नं. २७; (३) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. ११३, नं. १०६५.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—पुसणकची माता व वेहमित व्यापाऱ्याची पत्नी सिवदता हिची लेण्याची देणगी.

व्यक्तिनामे.—(१) सिवदता (शिवदत्ता)—देणगी देणारी स्त्री ; (२) पुसणक (पुष्य)-सिवदताचा पुत्र; (३) वेहमित (वेदमित्र)—सार्थवाह, सिवदताचा पती.

२५५. कुडा बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडा शैलगृह क्र. २४ च्या द्वाराच्या उजव्या बाजूला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इ. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. २१, नं. ३१, (२) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८८, नं. २८; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११३, नं. १०६६.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—अचलदास नामक व्यापाऱ्याचा पुत्र असाळमित याची लेण्याची देणगी.

व्यक्तिनामे.—(१) असाळमित (आषाढमित्र)—देणगी देणारा ; (२) अचलदास—व्यापारी सार्थवाह, असाळमिताचा पिता.

२५६. कुडाळ शिलालेख

जिल्हा—**सोलापूर**

प्राप्तिस्थळ.—दिलेले नाही.

संदर्भ.—इं. अ. रि., १९६०–६१, पृ. ४६, नं. ३८ (III).

भाषा व लिपी.—उल्लेख नाही.

राजवंश व राजा.—यादव नृपती सिंघण.

वर्ष व तिथी.—१६ वे शासन वर्ष.

सारांश.—महापसयत जैतय साहनी याने दिलेल्या जमिनीच्या देणगीचा या लेखात उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—जैतय साहनी—दान देणारा.

२५७. कुडाळ शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कुडाळ येथे भीमा नदीच्या काठावरील संगमेश्वर मंदीरात एका तुटक्या शिळेवर कोरलेला आहे.

संदर्भ.—**इं. अ. रि.**, १९६०–६१, पृ. ४६, नं. ३८ (I).

भाषा व लिपी.—दिलेली नाही.

राजवंश व राजा.—कलचुरि नृपती संकामदेव.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात हरिश्चंद्राने बांधलेल्या मंदिराला काही जमीन दान दिल्याचे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—हरिश्चंद्र—मंदिर बांधणारा.

२५८. कुडाळ शिलालेख

प्राप्तिस्थळ.—दिलेले नाही.

संदर्भ.—इं. अ. रि., १९६०–६१, पृ. ४६, नं. ३८ (II).

भाषा व लिपी.—उल्लेख नाही.

राजवंश व राजा.—शिलाहार राजा दाकरस.

वर्ष व तिथी.—दिलेले नाही.

सारांश.—दिलेला नाही

व्यक्तिनामे.—दाकरस—शिलाहार राजा.

२५९. कुर्डी शिलालेख

गोवा—राज्य तालुका—**फोंडा**

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेली शिळा कुर्डी येथे एका प्राचीन मंदिराजवळ सापडली.

संदर्भ.—गुणे, टी. व्ही., **ए. आर्. जी.**, १९६६, नं. ९.

भाषा व लिपी.—संस्कृत, इ. स. १० व्या शतकातील देवनागरी.

राजवंश व राजा.—राजा षष्ठ.

वर्ष व तिथी.—लिपीच्या आधारे इ. स. चे १० वे शतक.

सारांश.—हा लेख त्रोटक असून यात फक्त पदव्या दिलेल्या आहेत व षष्ठनामक व्यक्तींचा उल्लेख आलेला आहे.

व्यक्तिनामे.—षष्ठ.

२६०. केरी शिलालेख

गोवा—राज्य तालुका—**फोंडा**

प्राप्तिस्थळ.—हा लेख केरी येथे नारायण मंदिरातील मूर्तीच्या डाव्या बाजूला कोरलेला आहे.

संदर्भ.—गुणे, टी. व्ही., **ए. आर्. जी.**, १९६६, नं. १६.

भाषा व लिपी.—नागरी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. चे १३ वे शतक.

सारांश.—या लेखातील "सिरिवडव" एवढीच अक्षरे वाचता येतात.

२६१. केंदुर ताम्रपट, चालुक्य कीर्तिवर्मन् (द्वितीय)

जिल्हा—**पुणे** तालुका—**खेड**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट केंदुर येथे राजपाठक यांच्याजवळ होता. संपादकाला हा ताम्रपट भिगारकर यांच्याकडून मिळाला.

संदर्भ.—पाठक, इ. आय्., १९०७–८, खंड ९, पृ. २००–२०६.

भाषा व लिपी.—संस्कृत, दाक्षिणात्य वळणाची लिपी.

राजवंश व राजा.—बदामीचा चालुक्य नृपती कीर्तिवर्मन् (द्वितीय).

वर्ष व तिथी.—वैशाख, पौर्णिमा, चंद्रग्रहण, शके ६७२ (गत वर्ष), ६ वे शासन वर्ष.

सारांश.—हा ताम्रपट नृपती कीर्तिवर्मन् (द्वितीय) याच्या कारकीर्दीतील असून यामध्ये पुलकेशी (प्रथम) पासून कीर्तिवर्मन् (द्वितीय) पर्यंतची वंशावळ दिलेली आहे. हा ताम्रपट रक्तपूरहून दिलेला असून याचा मुख्य उद्देश वेळवोला जिल्ह्यातील पेरबळ्ळि, सुळ्ळम, किसुमंगलम व पेण्बस्सरु या गावांच्यामध्ये असलेल्या बेपट्टी या गावाचे दिलेले दान नमूद करणे, हा होता. हे दान राज्ञीच्या विनंतीवरून दिले होते. दान स्वीकारणारा ब्राह्मण वाजपेयी काश्यप गोत्री माकय याचा पुत्र रामशर्मन् हा होता. हा ताम्रपट धनंजय पुण्यवल्लभ याने लिहिला.

व्यक्तिनामे.—(१) पोलेकेशिवल्लभ—चालुक्य नृपती ; (२) कीर्तिवर्मन् (प्रथम)—चालुक्य नृपती पोलेकेशीचा पुत्र; (३) सत्याश्रय (पोलेकेशी द्वितीय)—चालुक्य नृपती ; (४) विक्रमादित्य (प्रथम)—चालुक्य नृपती, सत्याश्रयाचा पुत्र ; (५) हर्षवर्धन—उत्तरापथेश्वर ; (६) विनयादित्य—चालुक्य नृपती, विक्रमादित्य (प्रथम)चा पुत्र ; (७) विजयादित्य—चालुक्य नृपती, विनयादित्याचा पुत्र ; (८) विक्रमादित्य (द्वितीय)—चालुक्य नृपती, विजयादित्याचा पुत्र ; (९) नंदिपोतवर्मन्—पल्लव नृपती ; (१०) नरसिंहपोतवर्मन्—कांचीचा पल्लव नृपती ; (११) वत्सराज ; (१२) कीर्तिवर्मन् (द्वितीय)–दान देणारा चालुक्य नृपती ; विक्रमादित्य (द्वितीय) चा पुत्र ; (१३) रामशर्मन्—दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण ; (१४) माकय—रामशर्म्याचा पिता, वाजपेय यज्ञ करणारा काश्यप गोत्री ब्राह्मण ; (१५) वाजप्पशर्मन्–रामशर्म्याचा पितामह ; (१६) धनंजय पुण्यवल्लभ—लेख लिहिणारा.

ग्रामनामे.—(१) रक्तपूर—धारवाड जिल्ह्यातील लक्ष्मेश्वर; (२) बेपट्टी—धारवाड जिल्ह्यातील बेहट्टी ; (३) पेणबसअरु—धारवाड जिल्ह्यातील हेबसुर ; (४) किसुमंगलम्-धारवाड जिल्ह्यातील कुसुगल्ल ; (५) सुळ्ळम्—धारवाड जिल्ह्यातील सुळ्ळ ; (६) पेरब्बळी—धारवाड जिल्ह्यातील हेब्बळी ; (७) वेळवोल—बेळवल.

२६२. कोचरे ताम्रपट, विजयमहादेवी

जिल्हा—**रत्नागिरी** तालुका—**वेंगुर्ला पेटा**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट कोचरे येथील वासुदेव रामकृष्ण तेंगसे यांच्याजवळ होता.

संदर्भ.—(१) जेकॉब, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, खंड ३, भाग २, पृ. २११ ; (२) फ्लीट, इं. अँ., १८७९, खंड ८, पृ. ४४–४७.

भाषा व लिपी.—संस्कृत, लिपी प्रारंभीच्या पश्चिमी चालुक्य वंशीय लिपीप्रमाणे.

राजवंश व राजा.—बदामीचा चालुक्य नृपती चंद्रादित्य व त्याची राणी विजयमहादेवी.

वर्ष व तिथी.—वैशाख शुद्ध १२.

सारांश.—या ताम्रपटाचा मुख्य उद्देश विजयमहादेवी हिने वत्सगोत्री. .गोलस्वामी यास कोञ्चुरक गावी मशागत करण्यास योग्य अशी जमीन दान दिली हे नमूद करण्याचा होता.

व्यक्तिनामे.—(१) पुलकेशिवल्लभ—चालुक्य नृपती ; (२) कीर्तिवर्मन्—चालुक्य नृपती; (३) सत्याश्रय—चालुक्य नृपती ; (४) विक्रमादित्य—चालुक्य नृपती ; (५) चंद्रादित्य—चालुक्य नृपती ; (६) विजयमहादेवी—दान देणारी चंद्रादित्याची पत्नी ; (७) गोल-स्वामी—दान स्वीकारणारा वत्स गोत्री ब्राम्हण.

२६३. कोपराड शिलालेख, यादव रामचंद्र

जिल्हा—**ठाणे** तालुका—**वसई**

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख मुंबई येथील एशियाटिक सोसायटीचे तेव्हाचे ग्रंथपाल श्री. ना. अ. गोरे यांना कोपराड येथे मिळाला. सध्या हा शिलालेख मुंबई येथील प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—(१) दीक्षित, मो. गं., **म. सं. प.**, वर्ष ९, अं. २–३, पृ. ३०–३३ ; (२) तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.**, १९६३, पृ. २२२–२२६, नं. ४३.

भाषा व लिपी.—संस्कृत व मराठी संमिश्र भाषा. लिपी देवनागरी असून तिचे वळण यादव कालीन महाराष्ट्रातील नागरीच्या रूढ वळणाशी जुळते.

राजवंश व राजा.—यादव नृपती रामचंद्रदेव.

वर्ष व तिथी.—शालिवाहन शके १२१९ (गतवर्ष), हेमलंब संवत्सर, फाल्गुन वद्य १, शुक्रवार; २८ फेब्रुवारी, इ. स. १२९८.

सारांश.—यादव नृपती रामचंद्रदेव याचा महामंडलेश्वर श्रीकान्हरदेव व त्याचा मुतालिक अधिकारी मुहुमद प्रोस्राहि यांनी कशाच्या तरी निर्मितीप्रीत्यर्थ करटी गावाच्या भागाने प्रतिबद्ध असलेल्या कोपराड भागातील वाटिकांपैकी जवलपे येथील वृत्ती, तसेच म्हैसव्वणे येथील वृत्ती करून देऊन उभय वृत्तीतील १९ द्राम उत्पन्न व अगास येथील मशिदीने प्रतिबद्ध असलेल्या वेसाज (= आगर, शेत) मधील नारळ १७, मुक्ती (एक माप आहे), याप्रमाणे नेमणूक करून दिली.

व्यक्तिनामे.—(१) रामचंद्रदेव—यादव नृपती ; (२) कान्हरदेव—महामंडलेश्वर; (३) मुहुमद प्रोस्राही—कान्हरदेवाचा मुतालिक.

ग्रामनामे.—(१) करटि (कट्टि)—ठाणे जिल्ह्यात वसई तालुक्यात पश्चिम किनाऱ्यावर वसईच्या उत्तरेस ५–७ मैलांवरील कराडी ; (२) कोपराठ—हल्लीचे कोपराड, जिल्हा ठाणे, तालुका वसई ; (३) जवलप—कोपराडच्या उत्तरेस ५–६ मैलांवरील जवलपे; (४) म्हैस-व्वणे—कोपराडपासून ५ मैलांवरील म्हैसवणे; (५) अगास—वसई तालुक्याच्या वायव्य कोणातील आगाशी.

२६४. कोरोची, कानडी ताम्रपट

जिल्हा—**कोल्हापूर**

प्राप्तिस्थळ.—सन १९२८ च्या सुमारास प्रस्तुत दानपत्र कोल्हापूरच्या कोरोची नामक खेड्यात सापडले.

संदर्भ.—मिराशी, वा. वि., **सं. मु.** १९६६, सर ५, पृ. १३३–१४२.

भाषा व लिपी.—कानडी, जुनी कानडी.

राजवंश व राजा.—(डॉ. कृष्णांच्या मते राष्ट्रकूट) सर्वरस

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखाचा उद्देश कन्नवाड, गंगवाड, बळियवाड, रेर्नादाळ व सियळार या गावांचा मालक सर्वरस याने आरुंबाळिगे यासह शितर्गे हे गाव दान दिले हे नमूद करण्याचा आहे.

व्यक्तिनामे.—सर्वरस—डॉ. कृष्णांच्या मते राष्ट्रकूट सम्राट शर्व किंवा पहिला अमोघवर्ष डॉ. मिराशींच्या मते हा सर्वरस कोल्हापूरजवळच्या काही खेड्यांचा मालक किंवा इनामदार होता.

ग्रामनामे.—(२) कन्नवाड—डॉ. कृष्णांच्या मते कन्नदेश. यात सोलापूरजवळचा प्रदेश अंतर्भूत होता. डॉ. मिराशींच्या मते शिरोळ तालुक्यातील कनवाड ; (२) गंगवाड—डॉ. कृष्णांच्या मते म्हैसूरजवळचा गंगांचा प्रदेश डॉ. मिराशी यांच्या मते हे करवीर तालुक्यातील घालवडे ; (३) बळयवाड—डॉ. कृष्णांच्या मते नाशिकजवळचे बेळगाव तऱ्हाळे किंवा तुंगभद्रेच्या काठचा प्रदेश. डॉ. मिराशींच्या मते कागल तालुक्यातील बेळेवाडी ; (४) रेर्नाडाळ— डॉ. कृष्णांच्या मते कोल्हापूरजवळचे रेंदाळ. डॉ. मिराशींच्या मते हातकणंगले तालुक्यातील रेंदाळ ; (५) सियळार—डॉ. कृष्णांच्या मते शिलाहारांचा कोल्हापूरजवळचा प्रदेश. डॉ. मिराशींच्या मते शाहुवाडी तालुक्यातील शिराळे ; (६) आरुंबाळिगे—हे करवीर तालुक्यातील बालिंगे असावे ; (७) शितर्गे—हे शाहुवाडी तालुक्यातील शितूर असावे.

२६५. कोल बौद्ध शैलगृह शिलालेख

जिल्हा—**कुलाबा** तालुका—**महाड**

प्राप्तिस्थळ.—हा लेख कोल येथील लेण्यामध्ये कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी., **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ३ ; (२) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८९, नं. ३ ; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय.**, १०, १९०९–१०, पृ. ११४, नं. १०७५.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—गृहपतिपुत्र श्रेष्ठी संघरक्षित याने या लेण्याची देणगी दिली.

व्यक्तिनामे.—सघरखित (संघरक्षित)—दान देणारा श्रेष्ठी.

२६६. कोल बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कोल येथील लेण्यामध्ये कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८९, नं. ४ ; (२) ल्युडर्स **अपेंडिक्स**, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. ११४, नं. १०७६.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.— धर्मश्री हिची या लेण्याची देणगी.

व्यक्तिनामे.—(१) धमसिरी—दान देणारी स्त्री ; (२) सिवदत—धर्मश्रीचा पती.

२६७. कोल बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कोल येथील लेण्यामध्ये कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं., १८८३, खंड ४, पृ. ८९, नं. ५ ; (२) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. ११४, नं. १०७७.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—आधाअकस गावचा शिवदत्त याची या लेण्याची देणगी.

व्यक्तिनामे—सिवदत–दान देणारा.

ग्रामनामे.—आधाअकस—ओळख पटत नाही.

२६८. कोल्हापूर बौद्धस्मारक पेटिका शिलालेख

जिल्हा—कोल्हापूर तालुका—कोल्हापूर

प्राप्तिस्थळ.—हा लेख कोल्हापूर येथे सापडलेल्या एका स्तूपामधील स्मारक पेटिकेच्या, झाकणावर कोरलेला आहे.

संदर्भ.—बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ३९, नं. ६.

भाषा व लिपी.—प्राकृत, लिपी मौर्य अथवा अशोकाच्या काळातील ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही. अंदाजे इ. स. पू. ३ रे शतक.

सारांश.—धमगुत (धर्मगुप्त) याने तयार केलेली बम्ह (ब्रह्म) याची देणगी.

व्यक्तिनामे.—(१) धमगुत (धर्मगुप्त)—पेटिका तयार करणारा ; (२) बम्ह (ब्रह्म)–दान देणारा.

२६९. कोल्हापूर ताम्रपट, विनयादित्य सत्याश्रय

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट सध्या कोल्हापूर येथील आर्यविन शेतकी संग्रहालयात आहे.

संदर्भ.—पंचमुखी, डायजेस्ट ऑफ ए. आर्. ऑन. कन्नड रिसर्च इन बॉम्बे प्रॉव्हिन्स, १९४१; कर्नाटक इन्स्., १९५२, खंड २, पृ. ६–११, नं. ३.

भाषा व लिपी.—संस्कृत, प्राचीन कन्नड.

राजवंश व राजा.—बदामीचा चालुक्य नृपती विनयादित्य सत्याश्रय.

वर्ष व तिथी.—माघ पौर्णिमा, १३ वे शासन वर्ष, शके ६१५ (गतवर्ष), इ. स. ६९३.

सारांश.—हा ताम्रपट चालुक्य नृपती विनयादित्य याच्या कारकीर्दीतील असून त्याने हा त्याच्या सिन्ना नदीवरील लष्करी तळावरून दिलेला आहे. या ताम्रपटाचा मुख्य उद्देश नृपतीने कलिंगेती (कलिंगपती) याच्या विनंतीवरून भारद्वाजगोत्री दशगुणशर्मन् याला उंडमड्वुळ व उरुविगे या खेड्यांचे करमुक्त उत्पन्न व दोन्ही खेड्यांतील ५०,५० निवर्तने जमीन दान दिली हे नमूद करण्याचा होता. या ताम्रपटात विनयादित्य याची वंशावळ दिलेली आहे.

व्यक्तिनामे.—(१) विनयादित्य—दान देणारा चालुक्य नृपती; (२) विक्रमादित्य (प्रथम)—चालुक्य नृपती, विनयादित्याचा पिता; (३) सत्याश्रय (पुलकेशी द्वितीय)—चालुक्य नृपती, विक्रमादित्य (प्रथम) चा पिता; (४) कीर्तिवर्मन्—चालुक्य नृपती, सत्याश्रयाचा पिता; (५) पुलकेशिवल्लभ—चालुक्य नृपती, कीर्तिवर्मन् याचा पिता, (६) दशगुणशर्मन्—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (७) हर्षवर्धन—सत्याश्रयाने जिंकलेला नृपती..

ग्रामनामे.—(१) उंडमड्वुळ—ओळख पटत नाही; (२) उरुविगे—ओळख पटत नाही.

२७०. कोल्हापूर, अंबाबाई देवालय शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख कोल्हापूरच्या अंबाबाईच्या देवालयात आहे.

संदर्भ.—ग्रॅहॅम, कोल्हापूर, १८५४, पृ. ३३४ व ४७९–८०, नं. २३.

भाषा व लिपी.—संस्कृत; बाळबोध लिपी.

राजवंश व राजा.—चालुक्य नृपती सोमदेव.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख चालुक्य नृपती सोमदेव याच्या अमदानीतील आहे. सोमदेव महालक्ष्मीच्या मध्यान्ह पूजेला आला असताना उपाध्यायाच्या व इतर ब्राह्मणांच्या विनंतीवरून त्याने कंभरगी हे खेडे दान दिले असा उल्लेख या लेखात आहे. हा लेख विद्याधर पंडित याने लिहिला आहे.

व्यक्तिनामे.—(१) कर्णदेव—चालुक्य नृपती; (२) नृसिन्व (नृसिंह)—चालुक्य नृपती; (३) वेतुगि—चालुक्य नृपती, नृसिन्वाचा पुत्र; (४) सोमेश्वर—चालुक्य नृपती, वेतुगिचा पुत्र; (५) सोमदेव—दान देणारा चालुक्य नृपती, सोमेश्वराचा धाकटा भाऊ; (६) विद्याधर पंडित—लेख लिहणारा.

ग्रामनामे.—(१) कंभरगी—हल्लीचे कंभरगाव.

२७१. कोल्हापूर, आर्यविन शेतकी संग्रहालय शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख सध्या आर्यविन शेतकी संग्रहालय, कोल्हापूर येथे आहे.

संदर्भ.—कुंदनगर, इ. नॉ. क. को., १९३९, पृ. ३८–४१ व ९९–१०१, नं. ११.

भाषा व लिपी.—कानडी.

राजवंश व राजा.—कल्याणाचा चालुक्य नृपती त्रैलोक्यमल्लदेव सत्याश्रय.

वर्ष व तिथी.—सोमवार, १४ वा दिवस.

सारांश.—हा लेख बराच झिजला असल्यामुळे बरोबर वाचता येत नाही. तुटक वाटतो. या लेखात संकेश्वर मंदिर बांधल्याचा उल्लेख आहे.

व्यक्तिनावे.— (१) जयसिंहदेव ; (२) त्रैलोक्यमल्ल ; (३) जगदेकमल्लदेव; (४) शंकरदेव ; (५) गोविंद ; (६) त्रिष्णुदेव ; (७) अैरावण ; (८) अय्य शंकर ; (९) कालिदास—सेनापती ; (१०) बिज्जल ; (११) रामसेट्टि ; (१२) रामचंद्र ; (१३) सोवलदेवी.

ग्रामनामे.—कल्याणपुर—कल्याण.

२७२. कोल्हापूर शिलालेख, चालुक्य शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कोल्हापूर येथील टाऊन हॉलच्या बगीच्यात मिळाला.

संदर्भ.—इं. अ. रि., १९६४–६५, पृ. ५९, नं. ४५.

भाषा व लिपी.—कन्नड, इ. स. १२ व्या शतकातील.

राजवंश व राजा.—चालुक्य नृपती आहवमल्लदेव.

वर्ष व तिथी.—दिलेली नाही.

सारांश.—या लेखात संत नेल्लियदेव याची स्तुती केलेली आहे.

व्यक्तिनावे.—(१) आहवमल्लदेव—चालुक्य नृपती ; (२) संत नेल्लियदेव.

२७३. कोल्हापूर शिलालेख, चालुक्य आहवमल्लदेव

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेला स्तंभ सध्या कोल्हापूर येथील टाऊन हॉलमध्ये ठेवलेला आहे.

संदर्भ.—कुंदनगर, इ. नॉ. क. को., १९३९, पृ. १–४ व ६१–६३.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—चालुक्य नृपती आहवमल्लदेव.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख स्तंभाच्या चारही बाजूवर कोरलेला आहे. स्तंभाच्या पश्चिमेकडील बाजूवर काही भौगोलिक माहिती दिलेली आहे. उत्तरेकडील बाजूवर शारदादेवीचे वर्णन केलेले आहे. दक्षिणेकडील बाजूवर काही व्रतांचा उल्लेख केलेला आहे. हा लेख अर्धवट आहे.

व्यक्तिनावे.—आहवमल्लदेव—चालुक्य नृपती.

ग्रामनामे.—अयोध्या.

२७४. कोल्हापूर ताम्रपट, राष्ट्रकूट अकालवर्षदेव

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट कोल्हापूर येथील तांत्रिक विद्यालयाचे सुपरिंटेंडेंट श्री. डी. आर्. महाडिके यांच्याकडून आयर्विन शेतकी संग्रहालयाला मिळाला.

संदर्भ.—कुंदनगर, ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो., १९३४, खंड १०, (न्यू. सि.), पृ. २१–३७

भाषा व लिपी.—संस्कृत, देवनागरी.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती अकालवर्षदेव.

वर्ष व तिथी.—शके ८८२, बुधवार, वैशाख शुद्ध ३, रुद्र संवत्सर; इ. स. ९६०.

सारांश.—हा ताम्रपट राष्ट्रकूट नृपती अकालवर्षदेव यांच्या अमदानीतील आहे. अकालवर्षदेव याचा मेलपाटि येथे तळ असताना त्याने करहाटक प्रांतातील कुरेग्रामचा रहिवासी आत्रेयसगोत्री देवभट्टाचा पुत्र गोविंदभट्ट याला अलतगे ७०० मधील रिक्कटी हे खेडे दान दिले हे जाहीर करणे हा या शासनाचा मुख्य उद्देश आहे. या ताम्रपटात अकालवर्षदेव याची वंशावळ दिलेली आहे.

व्यक्तिनामे.—(१) रट्ट—तुंग कुलातील राष्ट्रकूट घराण्याचा मूळ पुरुष ; (२) राष्ट्रकूट–राष्ट्रकूट नृपती, रट्ट राजाचा पुत्र ; (३) दंतिदुर्ग—राष्ट्रकूट नृपती; (४) कृष्णराज—राष्ट्रकूट नृपती, दंतिदुर्गाचा चुलता ; (५) गोविंदराज—राष्ट्रकूट नृपती, कृष्णराजाचा पुत्र; (६) निरुपम—राष्ट्रकूट नृपती, गोविंदराजाचा धाकटा भाऊ ; (७) जगत्तुंग —राष्ट्रकूट नृपती, निरुपमाचा पुत्र ; (८) नृपतुंगदेव—राष्ट्रकूट नृपती, जगत्तुंगाचा पुत्र ; (९) कृष्णराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, नृपतुंगदेवाचा पुत्र ; (१०) जगत्तुंग—(द्वितीय)—राष्ट्रकूट राजपुत्र, कृष्णराज (द्वितीय) चा पुत्र ; (११) इंद्रराज—राष्ट्रकूट नृपती, जगत्तुंग (द्वितीय) चा पुत्र ; (१२) अमोघवर्ष—राष्ट्रकूट नृपती, इंद्रराजाचा पुत्र ; (१३) गोविंदराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, अमोघवर्षाचा धाकटा भाऊ ; (१४) अमोघवर्ष—राष्ट्रकूट नृपती, जगत्तुंग (द्वितीय) चा पुत्र, उपरोक्त अमोघवर्षाचा चुलता ; (१५) कृष्णराज (तृतीय)—राष्ट्रकूट नृपती, अमोघवर्षाचा पुत्र, अकालवर्षदेव ; (१६) दन्तिग—कृष्णराज (तृतीय) ने पराभूत केलेला राजा ; (१७) वप्पुक—कृष्णराज (तृतीय) ने पराभूत केलेला राजा ; (१८) रच्यामल्ल—कृष्णराज (तृतीय) ने पराभूत केलेला गंगपाटीचा राजा ; (१९) भूतार्य—कृष्णराज (तृतीय) ने गंगपाटीला प्रस्थापित केलेला राजा ; (२०) अण्णिग—पल्लव राजा ; (२१) गोविंदभट्ट—दान स्वीकारणारा आत्रेयसगोत्री ब्राह्मण; (२२) देवभट्ट—गोविंदभट्टाचा पिता; (२३) यौतुभट्ट—गोविंदभट्टाचा पितामह; (२४) रामदेवभट्ट—गोविंदभट्टाचा प्रपितामह.

ग्रामनामे.—(१) अलतगे—कोल्हापूरच्या ईशान्येस सुमारे १७ मैलांवर असलेले अळते; (२) रिक्कटी—अळतेच्या आग्नेयेस सुमारे ५ मैलांवर असलेले हल्लीचे रूकडी; (३) सिरेग्राम—हल्लीचे साजणी गाव असावे. निश्चित ओळख पटत नाही; (४) मालिग्राम–साजणीजवळ रूकडीच्या अग्नेयेस असलेले हल्लीचे माणगाव; (५) कोडवलि–रूकडीच्या दक्षिणेस तीन मैलांवर असलेले हल्लीचे पट्टण–कडोली; (६) येरूरगे–रूकडीच्या वायव्येस दोन मैलांवरील हेर्ले गाव; (७) मुडसिंगे–हेर्लेच्या जवळ रूकडीच्या उत्तरेस दोन मैलावर हल्लीचे मुडसिंगे; (८) चिंचवाट–रूकडीच्या पश्चिमेस असलेले हल्लीचे चिंचवाड; (९) चोके–रूकडीच्या वायव्येस असलेले चोकाक; (१०) कुरेग्राम–कोरेगाव.

२७५. कोल्हापूर ताम्रपट, यादव बल्लाळराय

प्राप्तिस्थळ—या ताम्रपटाचे प्राप्तिस्थळ निश्चित सांगता येत नाही.

संदर्भ.—कुंदनगर, के. जी., **इ. नॉ. क. को.**, १९३९, पृ. १७९–१८२, नं. ३७.

भाषा व लिपी.—कन्नड, देवनागरी.

राजवंश व राजा.—यादव नृपती बल्लाळराय (देवगिरी).

वर्ष व तिथी.—गुरुवार, माघ १५, सर्वधारी संवत्सर, शके ९२५; इ. स. १००३.

सारांश.—या ताम्रपटाचा मुख्य उद्देश बल्लाळराय तिगेरे येथे आला असता त्याने दिलेल्या अनेक देणग्या नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) बल्लाळराय.—दान देणारा यादव नृपती ; (२) बोम्मेयसाहणि; (३) आसीम्यवंतन कोलरस ; (४) बोल्लय ; (५) मूलस्थानदेव ; (६) बलदेव—आचार्य ; (७) श्रीकंठदेव—सिद्धान्ती आचार्य ; (८) मलजी—आचार्य ; (९) बलदि—दान घेणारी व्यक्ती ; (१०) मलेयर पारिसय-दान घेणारी व्यक्ती ; (११) बादुमय—दान घेणारी व्यक्ती ; (१२) मार-नायक—दान घेणारा खेड्याचा पहारेकरी ; (१३) लखुमय्य—दान घेणारा धोबी ; (१४) चौडय्य नायक हिट्टकारे—दान घेणारी व्यक्ती ; (१५) हिलोज—दान घेणारा सुतार ; (१६) देवोज—दान घेणारा लोहार ; (१७) पारिसोज—दान घेणारा सोनार ; (१८) केत—दान घेणारा न्हावी ; (१९) बागिल मारबोव—दान घेणारी व्यक्ती ; (२०) कलचायि बादेय—दान घेणारी व्यक्ती ; (२१) बोम्मदेव—दान घेणारा ताडी दुकानदार ; (२२) केतयसाहणि—जमीन मालक ; (२३) सोसन कोवे—दान घेणारी व्यक्ती ; (२४) देवजी—दान स्वीकारणारा अरवेश्वरदेवाचा आचार्य ; (२५) कोलनूर बोम्मजी—दान स्वीकारणारा आचार्य ; (२६) सेनबोव गोपाळदेव—दान घेणारी व्यक्ती ; (२७) मोदल-मदव-सोय-कलेय—दान घेणारी व्यक्ती ; (२८) केत-मंडली-राय—व्यक्तीनाम ; (२९) बमैय्य नायक—एक प्रसिद्ध व्यक्ती.

ग्रामनामे.—(१) नण्टूरु ; (२) कोलमुरुडु ; (३) मड्डेय-केरे ; (४) आडुबल्ल; (५) किसुगल्ल (कुसुगल्लु) ; (६) येकलकोवे ; (७) इंगुलगे ; (८) शिरगुप्पे ; (९) कोलनमुरु ; (१०) सुत्तुगुण्डि ; (११) कुंदुगल (कुंदगोळ) ; (१२) किसुवगल ; (१३) हुबळी ; (१४) नम्मूरु ; (१५) मेलडवि ; (१६) कातरिके.

२७६. कोल्हापूर शिलालेख, यादव सिंघण

प्राप्तिस्थळ.—हा लेख कोल्हापूर येथील अंबाबाईच्या मंदिराच्या आवारातील गणेश मंदिराच्या पायऱ्यांच्या उजव्या बाजूला असलेल्या स्तंभावर कोरलेला आहे.

संदर्भ.—खरे, ग. ह., ब. म. इ. सा., १९४९, खंड ३, पृष्ठ १७-१९, नं. १.

भाषा व लिपी.—संस्कृत, इ. स. ११ व्या किंवा १२ व्या शतकातील नागरी लिपी.

राजवंश व राजा.—यादव नृपती सिंघणदेव.

वर्ष व तिथी.—शके ११४०, बौधायन संवत्सर; इ. स. १२१८.

सारांश.—हा लेख यादव नृपती सिंघणदेव याच्या अमदानीतील आहे. या लेखाचा उद्देश तैलण नामक व्यक्तीने महालक्ष्मी मंदिराचे समोर तोरण बांधले हे नमूद करण्याचा होता.

व्यक्तिनामे.—(१) भिल्लम—यादव नृपती ; (२) जैत्रपाल—यादव नृपती, भिल्लमाचा पुत्र; (३) सिंहण (सिंघण)—यादव नृपती, जैत्रपालाचा पुत्र; (४) तैलण—देवीपुढे तोरण बांधणारा.

२७७. कोल्हापूर शिलालेख, यादव सिंघण

प्राप्तिस्थळ.—हा लेख कोल्हापूर येथील रवणेश्वर तळ्याच्या जवळ असलेल्या रामेश्वर मंदिराच्या दक्षिणेकडील भिंतीत बसविलेल्या शिलाखंडावर कोरलेला आहे.

संदर्भ.—ग्रॅहॅम, कोल्हापूर, १८५४, नं. १२, पृष्ठ ३३० व ४२६.

भाषा व लिपी.—संस्कृत, प्राचीन बाळबोध लिपी.

राजवंश व राजा.—देवगिरीचा यादव नृपती सिंघणदेव.

वर्ष व तिथी.—मन्मथ संवत्सर, गुरुवार ३०, श्रावण वदि, शके ११५७; इ. स. १२३५.

सारांश.—प्रस्तुत लेखात महालक्ष्मीदेवीची स्तुती केली असून सिंघणदेवाची भरभराट होवो अशी इच्छा व्यक्त केली आहे.

व्यक्तिनामे.—सिंघणदेव—यादव नृपती.

ग्रामनामे.—कोल्लापूर.

२७८. कोल्हापूर शिलालेख, यादव जयसिल व सिंघणदेव

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेला शिलाखंड कोल्हापूर महालक्ष्मी मंदिराच्या पश्चिम द्वारासमोर असलेल्या पायऱ्यांसमोर सापडला.

संदर्भ.—ग्रॅहॅम, कोल्हापूर, १८५४, नं. १३, पृष्ठ ३३० व ४२६.

भाषा व लिपी.—संस्कृत, प्राचीन बालबोध लिपी.

राजवंश व राजा.—यादव नृपती जयसिल व सिंघणदेव.

वर्ष व तिथी.—सोमवार, माघ शुद्ध १५, दुर्मुखी संवत्सर, शके ११५८, इ. स. १२३६.

सारांश.—प्रस्तुत लेखाचा उद्देश जयसिल याने चंद्रग्रहण प्रसंगी, सौवर्ण जटेश्वराला धूप, दीप, नैवेद्य दाखविण्यासाठी काही सरकारी उत्पन्न दान दिले हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) जयसिल—यादव नृपती; (२) सिंघणदेव—यादव नृपती; (३) लुच्छुयिदेव—महामंत्री; (४) जेनू नाईक—लुच्छुयिदेवाचा पिता; (५) दरु—नाईक.

२७९. कोल्हापूर शिलालेख, यादव कान्हेरदेव

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेला शिलाखंड कोल्हापूरच्या राजवाड्यात ठेवलेला होता.

संदर्भ.—(१) ग्रॅहॅम, कोल्हापूर, १८५४, नं. १४, पृष्ठ ३३० व ४३७, (२) शास्त्री ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो., खंड २, पृष्ठ २६४, नं. ५.

भाषा व लिपी.—संस्कृत, बालबोध लिपी.

राजवंश व राजा.—यादव नृपती कन्हरदेव.

वर्ष व तिथी.—शुक्रवार, वैशाख वदि ३०, सौम्य संवत्सर, शके ११७२, इ. स.; १२५०.

सारांश.—हा लेख कन्हरदेव याच्या अमदानीतील आहे. या लेखामध्ये कुर्द या खेड्यातून मिळणारे सर्व करांचे उत्पन्न गौतमरी केशवदेव याची पत्नी अंबिका हिच्या समृद्धीसाठी तेथील महाजनांच्या हाती सोपविल्याचा उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—(१) कान्हरदेव—यादव नृपती; (२) कामय नाईक—मंत्री; (३) जैतमल राऊत; (४) वुनुय—कर वसूल करणारा; (५) अंबिका—दान स्वीकारणारी स्त्री; (६) गौतमरी केशवदेव—अंबिकेचा पती.

ग्रामनामे.—कुर्द—दान दिलेले गाव.

२८०. कोल्हापूर शिलालेख, यादव नृपती महादेव

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख सध्या कोल्हापूर येथील आर्यविन शेतकी संग्रहालयात आहे.

संदर्भ.—कुंदनगर, के. जी., इ. नॉ. क. को., १९३९, पृ. ९०–९१ व १५४–५५, नं. १९.

भाषा व लिपी.—मराठी–संस्कृत मिश्र. देवनागरी.

राजवंश व राजा.—यादव नृपती महादेव.

वर्ष व तिथी.—शके ११८३, दुर्मति संवत्सर, इ. स. १२६१.

सारांश.—हा लेख यादव नृपती महादेव याच्या अमदानीतील आहे. महामंडलेश्वर जल्लणदेव याने अैगिदाल येथील कल्लिनाथ व मल्लिकार्जुनदेव मंदिराला ५० आणि १०० योन करमुक्त जमीन पूजा, नैवेद्य व दीप यासाठी दान दिल्याचा उल्लेख आहे. महादेव नृपतीनेही काही देणग्या या दैवतांच्या प्रीत्यर्थ दिल्याचा उल्लेख या लेखात आहे.

व्यक्तिनामे.—(१) महादेव—यादव नृपती; (२) जल्लणदेव—महामंडलेश्वर.

ग्रामनामे.—अैणिदाल—ओळख पटत नाही.

२८१. कोल्हापूर शिलालेख, यादव नृपती महादेव

प्राप्तिस्थळ.—कोल्हापूर येथील अंबाबाई देवालयाच्या आवारात असलेल्या नवग्रह मंदिराच्या रंगमंडपाच्या स्तंभावर हा लेख कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) ख, ग. रे ह., द. म. इ.सा., १९४७, खंड ३, पृ. २१–२२; (२) शास्त्री, ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो., खंड २, पृ. २६४, नं. ४.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. १३ व्या शतकातील नागरी लिपी.

राजवंश व राजा.—यादव नृपती महादेव.

वर्ष व तिथी.—शके ११८७, क्रोधन संवत्सर, माघ शुद्ध पौर्णिमा; शुक्रवार, २२ जानेवारी, इ. स. १२६६ (शास्त्री, ११७८ = १२५६ इ.)

सारांश.—हा लेख देवगिरीचा यादव नृपती महादेव याच्या अमदानीतील आहे. या लेखाचा मुख्य उद्देश पंडित कनकचंद्र आणि हेगडे वसवदेव यांनी ईश्वरकेशव व नरसिंह यांना नेमादेवी वसतीची व्यवस्था ठेवण्यासाठी काही जमीन देणगीदाखल दिली हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) सिंह (सिंघणदेव)—यादव नृपती; (२) जैत्र—यादव नृपती, सिंघणदेवाचा पुत्र; (३) कन्हरदेव—यादव नृपती, जैत्राचा पुत्र; (४) महादेव—यादव नृपती, कन्हरदेवाचा धाकटा भाऊ; (५) पंडित कनकचंद्र—दान देणारा; (६) हेगडे वसवदेव—दान देणारा; (७) ईश्वर केशव—दान घेणारा; (८) नरसिंह—दान घेणारा; (९) म्हाईदेव–महालक्ष्मीस्थानाचा रक्षक; (१०) अब्ज–महादेव राजाचा मोठा भाऊ.

ग्रामनामे.—(१) कोळापूर—हल्लीचे कोल्हापूर; (२) वरुलेखोल्ल—वरणा नदीचे वारुणखोरे; (३) वेट्टदसिरि—वरणा नदीच्या खोऱ्यातील बिलसी गाव.

२८२. कोल्हापूर शिलालेख, यादव नृपती रामदेव

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेला शिलाखंड कोल्हापूरच्या वरुणतीर्थाचे ठिकाणी असलेल्या तटबंदीच्या भिंतीत बसविलेला आढळला.

संदर्भ.—ग्रॅहॅम, कोल्हापूर, १८५४, पृ. ३३२ व ४३७, नं. १५.

भाषा व लिपी.—संस्कृत; प्राचीन बाळबोध लिपी.

राजवंश व राजा.—यादव नृपती रामदेव.

वर्ष व तिथी.—माघ पौर्णिमा, चंद्रग्रहण, आंगिरस संवत्सर, शके ११९४, इ. स. १२७२-७३.

सारांश.—या लेखात यादव नृपती सिंघण व रामदेव यांचा उल्लेख आहे. या लेखाचा मुख्य उद्देश रामदेवाने विश्वरूप नामक उपाध्यायाला ब्रह्मेश्वराच्या पंचामृतपूजा, अष्टांगपूजा व मंत्रनैवेद्य यासाठी व ब्राह्मणभोजन घालण्यासाठी तुलसीघोलेमधील गिरीवली हे गाव सर्व उत्पन्नासह दान दिले हे नमूद करणें हा होता. याशिवाय रामदेवाने भार्गव गोत्री भटोपाध्याय गदाधर पंडित याला व भारद्वाज गोत्री गोविंद नायकाचा पुत्र रेवुलदेव याला काही निष्क किंमतीची जमीन दान दिली. तसेच आणखी काही ब्राह्मणांना त्याने निरनिराळ्या किंमतीची जमीन दान दिल्याचा उल्लेख या लेखात आहे.

व्यक्तिनामे.—(१) सिंघणदेव—यादव नृपती; (२) रामराजा—व्यक्तिनाम; (३) रामदेव—यादव नृपती; (४) विश्वरूप—दान स्वीकारणारा आचार्य; (५) रेवुलदेव—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (६) गदाधर पंडित—दान स्वीकारणारा भार्गव गोत्री भटोपाध्याय; (७) गोविंदनायक—रेवुलदेवाचा पिता; (८) जंबे नाईक—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (९) वासुदेवभट—दान स्वीकारणारा वत्स गोत्री ब्राह्मण; (१०) मयनेबदेव नाईक—वासुदेवभटाचा पिता; (११) गंगाधरभट—वासुदेवभटाचा पितामह; (१२) केशवदेव—दान स्वीकारणारा गौतम गोत्री ब्राह्मण; (१३) दामोदर त्रिवेदी—केशवदेवाचा पिता; (१४) वासुदेव-भट—लेख लिहिणारा; (१५) गंगाधर भट—लेख लिहिणाऱ्या वासुदेव भटाचा पिता.

ग्रामनामे.—(१) गिरीवली—ओळख पटत नाही; (२) तुलसीघोले—ओळख पटत नाही.

२८३. कोल्हापूर ताम्रपट, शिलाहार गंडरादित्य, शके १०३७

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट राजाराम कॉलेजचे सेवानिवृत्त प्राचार्य श्री. आपटे यांच्याजवळ होता. संपादकाने हा ताम्रपट पाठक यांच्यामार्फत मिळवला होता.

संदर्भ.—खरे, ग. ह., **द.म.इ.सा.**, १९३०, खंड १, पृ. ३३; **इ. आय्.**, १९४७-४८, खंड २७, पृ. १७६-१८२.

भाषा व लिपी.—संस्कृत; कानडी मिश्रण, इ. स. १२ व्या शतकातील कानडी लिपी.

राजवंश व राजा.—कोल्हापूर शिलाहार नृपती गंडरादित्यदेव.

वर्ष व तिथी.—शके १०३७, मन्मथ संवत्सर, बुधवार, कार्तिक शुद्ध ८; २७ ऑक्टोबर, इ. स. १११५.

सारांश.—या ताम्रपटाचा मुख्य उद्देश गंडरादित्य याने वळयवाड मुक्कामी असताना निगुंब सामंत नोळंब याला अंकुलगोंब व आपेयवाड ही गावे आदगे नामक गावाचा समावेश करून दान दिली हे नमूद करण्याचा होता.

व्यक्तिनामे.—(१) जतिग (प्रथम)—शिलाहार नृपती गोमंथदुर्गाधिप; (२) नायिमांक—शिलाहार नृपती, जतिग (प्रथम) चा पुत्र; (३) चंद्र—शिलाहार नृपती, नायिमांकाचा पुत्र; (४) जतिग (द्वितीय)—शिलाहार नृपती, चंद्राचा पुत्र; (५) गोंकल—शिलाहार नृपती, जतिग (द्वितीय) चा पुत्र; (६) गूवल (प्रथम)—शिलाहार नृपती, जतिग (द्वितीय) चा पुत्र; (७) मारसिंह—शिलाहार नृपती, गोंकलाचा पुत्र; (८) गूवल (द्वितीय)—शिलाहार नृपती, मारसिंहाचा

पुत्र; (९) भोजदेव—शिलाहार नृपती, गूवल (द्वितीय) चा धाकटा भाऊ; (१०) शांतर—कदंब नृपती; (११) विक्रमादित्य—चालुक्य नृपती; (१२) कोंगज—भोजदेवाने जिंकलेला राजा; (१३) बिज्जण—भोजदेवाने जिंकलेला कळचुर्य नृपती; (१४) कोक्कल—भोजदेवाने जिंकलेला राजा; (१५) गोविंद—भोजदेवाने जिंकलेला राजा (मौर्यवंशीय अथवा निकुंभवंशीय); (१६) भिल्लम—भोजदेवाने जिंकलेला कोंकण नृपती; (१७) बल्लाळदेव—शिलाहार नृपती, भोजदेवाचा धाकटा भाऊ; (१८) गंडरादित्यदेव—शिलाहार नृपती, बल्लाळदेवाचा धाकटा भाऊ; (१९) दंडब्रह्म—कुंडिदेशचा राजा; (२०) हारिम—निगुंबवंशीय व्यक्तिनाम; (२१) बीरण—निगुंब हारिमाचा पुत्र; (२२) अरिकेसरी—निगुंब, बीरणाचा धाकटा भाऊ; (२३) कुंदाति—निगुंब, बीरणाचा पुत्र; (२४) नायिम—निगुंब, कुंदातिचा धाकटा भाऊ; (२५) नोळब–निगुंब सामंत, नायिमाचा पुत्र; (२६) पेर्मानडि–गंग नृपती, बुट्टग याचा द्वितीय पुत्र.

ग्रामनामे.—(१) मिरिंज देश—मिरज; (२) अंकुलगोबी—तासगाव तालुका, सातारा जिल्हा यातील अक्कलखोप असावे; (३) आप्पेयवाड—आंबेवाडी; (४) बळयवाड—कोल्हापूरच्या पूर्वेस २ ते ३ मैलांवरील वळेवाड; (५) वेणुग्राम—बेळगाव; (६) तगर—उस्मानाबाद जिल्ह्यातील हल्लीचे तेर; (७) गोमंथ— हल्लीचे गोवे असावे; (८) अदगो—ओळख पटत नाही; (९) कुंडिदेश—निश्चित ओळख पटत नाही.

२८४. कोल्हापूर ताम्रपट, शिलाहार गंडरादित्य, शके १०४८

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट कोल्हापूर येथील खासबाग मैदानात काही काम चालू असताना मिळाला. सध्या हा ताम्रपट कोल्हापूर राजाराम कॉलेजच्या संग्रहालयात आहे.

संदर्भ.—उपाध्याय, इ. आय्. १९३५–३६, खंड २३, पृ. २८–३४.

भाषा व लिपी.—संस्कृत, देवनागरी.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती गंडरादित्य, महामंडलेश्वर.

वर्ष व तिथी.—पराभव संवत्सर, शके १०४८, शनिवार, आषाढ शुक्ल ४; २६ जून, इ. स. ११२६.

सारांश.—या ताम्रपटाचा मुख्य उद्देश गंडरादित्याने आपला मंत्री मैलपय्य याच्या विनंतीवरून ब्रह्मपुरी येथील खेडादित्य मंदिराच्या दुरुस्तीसाठी, आठ ब्राह्मणांना त्यांचा चरितार्थ चालवण्यासाठी मिरज जिल्ह्यातील कोडवल्लि भागातील कोंनिजवाड येथील जमीन दान दिली हे नमूद करणे हा होता. हे शासन गंडरादित्य याने वल्लवाडग्राम येथून दिले.

व्यक्तिनामे.—(१) जतिग (प्रथम)—शिलाहार नृपती; (२) नायिम्म—शिलाहार नृपती, जतिग (प्रथम) चा पुत्र; (३) चंद्रराज—शिलाहार नृपती, नायिम्माचा पुत्र; (४) जतिग (द्वितीय)—शिलाहार नृपती, चंद्रराजाचा पुत्र; (५) गोंकल्ल—शिलाहार नृपती, जतिग (द्वितीय) चा पुत्र; (६) गूहल (प्रथम)—शिलाहार नृपती, गोंकल्लाचा मोठा भाऊ; (७) कीर्तिराज—शिलाहार नृपती, गोंकल्लाचा धाकटा भाऊ; (८) चंद्रादित्य—शिलाहार नृपती, गोंकल्लाचा धाकटा भाऊ; (९) मारसिंह—शिलाहार नृपती, गोंकल्लाचा पुत्र; (१०) गूहल (द्वितीय) शिलाहार नृपती, मारसिंहाचा पुत्र; (११) भोजदेव—शिलाहार नृपती, गूहल (द्वितीय) चा भाऊ; (१२) गंडरादित्य—शिलाहार नृपती, भोजदेवाचा धाकटा भाऊ; (१३) मैलपय्य—गंडरादित्याचा मंत्री; (१४) राजय—नारगावुंड; (१५) सेनय—नारगावुंड; (१६) गंगाधर—चतुर्वेदी भट्टोपाध्याय, गौतम गोत्री ब्राह्मण; (१७) गोविंद—भारद्वाज गोत्री क्रमवित् ब्राह्मण; (१८) भास्कर–अत्रिगोत्री, चतुर्वेदी ब्राह्मण; (१९) नारायणभट्ट—जामदग्न्यवत्स गोत्री ब्राह्मण; (२०) माधव—भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (२१) वामन—काश्यप गोत्री ब्राह्मण; (२२) विष्णुभट्ट—धनंजय गोत्री ब्राह्मण; (२३) वामन—भारद्वाज गोत्रीब्राह्मण.

ग्रामनामे.—(१) तगरपूर—उस्मानाबाद जिल्ह्यातील हल्लीचे तेर; (२) वल्लवाड—कोल्हापूरच्या नैर्ऋत्येस २७ मैलांवर असलेले राधानगरी असावे; (३) कोल्लापूर—हल्लीचे कोल्हापूर; (४) ब्रह्मपुरी—कोल्हापूरचा काही भाग; (५) मिरिंज—मिरज; (६) कोडवल्लि—कोल्हापूरच्या पूर्वेस सुमारे ७ मैलांवरील कोडोली असावे; (७) कोंनिजवाड—ओळख पटत नाही.

२८५. कोल्हापूर शिलालेख, शिलाहार गंडरादित्य, शके १०५८

प्राप्तिस्थळ.—हा लेख कोल्हापूर येथील शुक्रवार दरवाजाजवळच्या पार्श्वनाथ मंदिराच्या उजव्या बाजूला असलेल्या शिळेवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) ग्रँहॅम, कोल्हापूर, पृष्ठ ३५७, नं. ३ ; (२) शास्त्री, ज. बॉ. ब्रॅं. रॉ. ए. सो., खंड २, पृ. २६६ ; (३) बार्नेट, इ. आय्., १९२७–२८, खंड १९, पृ. ३०–३५.

भाषा व लिपी.—कानडी.

राजवंश व राजा.—शिलाहार महामंडलेश्वर गंडरादित्य.

वर्ष व तिथी.—शके १०५८, राक्षस संवत्सर, कार्तिक वदि ५, सोमवार; २९ ऑक्टोबर, इ. स. ११३६.

सारांश.—हा लेख गंडरादित्य याच्या अमदानीतील आहे. गंडरादित्याचा महासामंत निंबदेवरस याने तोंडइचा पराभव केल्यावर कवडेगोल्ल येथे जैन मंदिर बांधल्याचा उल्लेख या लेखात आहे. वीर बणनंज संघाने कोल्लापूर येथील रूपनारायणाच्या मंदिराचा उपाध्याय श्रुतकीर्ति याला कवडेगोल्ल मंदिरासाठी काही रक्कम (उत्पन्न Revenue) दान दिली असाही उल्लेख या लेखात आहे.

व्यक्तिनामे.—(१) गंडरादित्य—शिलाहार महामंडलेश्वर ; (२) निंबदेवरस—गंडरादित्याचा महासामंत ; (३) बिल्हण(?)सेट्टि—कोल्हापूरचा व्यापारी ; (४) गोविंद सेट्टि — कोल्हापूरचा व्यापारी ; (५) कुमार अप्पणमय्य — मिरजेचा व्यापारी ; (६) बिज्जसेट्टि — मिरजेचा व्यापारी ; (७) बोप्पिसेट्टि — मिरजेचा व्यापारी ; (८) वेसपय्यसेट्टि—गंडरादित्य देवाचा राजव्यापारी; (९) बम्मिसेट्टि—मंडलेश्वराच्या कुटुंबाचा वाणी ; (१०) रावसेट्टि—प्रानणी, कुंडी गावातील सूर्यमंदिरातील नोंदणी अधिकारी (Recorder) ; (११) चौधोरे बोप्पिसेट्टि—व्यापारी ; (१२) कल्लपय्य-सेट्टि—तोरंबगे येथील प्रमुख ; (१३) चौधोरे गोरविसेट्टि—मथिसिगे येथील अध्यक्ष; (१४) शांतिसेट्टि—बळेयवट्टण येथील व्यापारी; (१५) हालियसेट्टि—अय्यवोळे येथील ५०० व्यापाऱ्यांचा प्रमुख ; (१६) खप्परय्य — कवडेगोल्ल येथील प्रमुख ; (१७) श्रुतकीर्ति त्रैविद्यदेव—रूपनारायण बसतीचा आचार्य.

ग्रामनामे.—(१) तगर—उस्मानाबाद जिल्ह्यातील हल्लीचे तेर ; (२) वळेवाड—निश्चित ओळख पटत नाही ; (३) अय्यवोळे—विजापूर जिल्ह्यातील हल्लीचे ऐहोळे असावे ; (४) मिरिंजे—मिरज ; (५) कोल्लापूर—कोल्हापूर ; (६) तोरंबगे—कोल्हापूर जिल्ह्यात गारगोटीजवळ असलेले हल्लीचे तेरंबे ; (७) बळेयवट्टण—मलबार जिल्ह्यातील बलिपट्टम् किंवा बलपट्टम् ; (८) कवडेगोल्ल—ओळख पटत नाही ; (९) कुंडिपट्टम्—ओळख पटत नाही ; (१०) मथिसिगे—ओळख पटत नाही.

२८६. कोल्हापूर शेषशायी देवालय शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख कोल्हापूर येथील अंबाबाई देवालयाच्या आवारात असलेल्या शेषशायी मंदिराच्या उत्तरेकडील बाजूला असलेल्या शिलेवर आहे.

संदर्भ.—ग्रॅहॅम, कोल्हापूर, १८५४, पृ. ३३२ व ४६५, न. २०.

भाषा व लिपी.—प्राचीन कानडी, संस्कृत मिश्रण, प्राचीन कानडी लिपी.

राजवंश व राजा.—शिलाहार महामंडलेश्वर गंडरादित्य.

वर्ष व तिथी.—दिलेली नाही.

सारांश.—या लेखात गंडरादित्याचे सद्‌गुण, शौर्य, सौंदर्य वगैरेची स्तुती केलेली आहे.

व्यक्तिनामे.—गंडरादित्य—शिलाहार महामंडलेश्वर.

२८७. कोल्हापूर शिलालेख, शिलाहार विजयादित्य

प्राप्तिस्थळ.—हा लेख कोल्हापूर येथील शुक्रवार दरवाजाच्याजवळ असलेल्या जैन मंदिराच्या समोर शिळेवर आहे.

संदर्भ.—(१) ग्रॅहॅम, कोल्हापूर १८५४ पृ. ३५८, (२) किलहॉर्न, इ. आय्., १८९४–९५, खंड ३, पृ. २०७–२१०.

भाषा व लिपी.—संस्कृत, प्राचीन कानडी.

राजवंश व राजा.—शिलाहार महामंडलेश्वर विजयादित्य.

वर्ष व तिथी.—चंद्रग्रहण, सोमवार, माघ पौर्णिमा, दुंदुभि संवत्सर, शके १०६५, सोमवार १ फेब्रुवारी, इ. स. ११४३.

सारांश.—हा शिलालेख शिलाहार नृपती विजयादित्य याच्या अमदानीतील आहे. विजयादित्य याने वळवाड येथे मुक्काम असताना क्षुल्लकपूर येथील रूपनारायण या जैन मंदिराच्या उपाध्याय व मूल संघाच्या देशीय गणाच्या पुस्तकगच्छ विभागाचा प्रमुख माघनंदिसिद्धांतदेव याचा शिष्य व सामंत कामदेव याचा सेवक वासुदेव याने हाविनहरिलगे येथे बांधलेल्या मंदिरातील पार्श्वनाथ देवाच्या अष्टभोगासाठी, मंदिराच्या व्यवस्थेसाठी, साधूंना भोजन घालण्यासाठी आजिरगेखोल्ल जिल्ह्यातील हाविनहरिलगे गावातील पाच निवर्तनें जमीन व १२ हस्त लांबी रुंदीचे घर दान दिले.

व्यक्तिनामे.—(१) जतिग—शिलाहार नृपती; (२) गोंकल—शिलाहार राजपुत्र, जतिगाचा पुत्र ; (३) गूवल (प्रथम)—शिलाहार राजपुत्र, जतिगाचा पुत्र ; (४) कीर्तिराज—शिलाहार राजपुत्र, जजतिगाचा पुत्र ; (५) चंद्रादित्य—शिलाहार राजपुत्र, जतिगाचा पुत्र ; (६) मारसिंह—शिलाहार नृपती, गोंकल याचा पुत्र ; (७) गूवल (द्वितीय)—शिलाहार नृपती, मारसिंहाचा पुत्र ; (८) गंगदेव—शिलाहार नृपती, मारसिंहाचा पुत्र ; (९) बल्लाळदेव—शिलाहार नृपती, मारसिंहाचा पुत्र ; (१०) भोजदेव—शिलाहार नृपती, मारसिंहाचा पुत्र ; (११) गंडरादित्यदेव— शिलाहार नृपती, मारसिंहाचा पुत्र ; (१२) विजयादित्य—शिलाहार नृपती, गंडरादित्याचा पुत्र ; (१३) वासुदेव—पार्श्वनाथदेवाची वसति बांधणारा, सामंत कामदेवाचा सेवक ; (१४) कामदेव—सामंत ; (१५) माघनंदिसिद्धांतदेव—वासुदेवाचा गुरु ; (१६) माणिक्यनंदिपंडित—दान स्वीकारणारा पार्श्वनाथ वसतीचा प्रमुख, माघनंदिसिद्धांतदेवाचा शिष्य.

ग्रामनामे.—(१) वळवाड—कोल्हापूरच्या दक्षिणेस १६ मैलांवर हल्लीचे वाळवे गाव; (२) क्षुल्लकपूर—हल्लीचे कोल्हापूर असावे ; (३) हाविनहरिलगे—ओळख पटत नाही ; (४) आजिरगेखोल्ल—ओळख पटत नाही.

२८८. कोल्हापूर शिलालेख, भोजदेव (द्वितीय)

प्राप्तिस्थळ.—हा लेख कोल्हापूर कोटितीर्थ टाक्यावर काठावर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) ग्रॅहॅम, कोल्हापूर, १८५४, नं. ६, पृष्ठ ३८२; (२) किलहॉर्न, इं. स. इं., पृष्ठ ५८, नं. ३२४.

भाषा व लिपी.—प्राचीन कानडी, कानडी.

राजवंश व राजा.—वळवाड येथे रहाणारा महामंडलेश्वर भोजदेव.

वर्ष व तिथी.—विलंब संवत्सर, दक्षिणायन संक्रमण, आषाढ शुद्ध १०, शके ११०१; इ. स. ११७९.

सारांश.—भोजदेव याने कोटेश्वर मंदिर बांधले व मूर्तीच्या अष्टभोग पूजेसाठी काही देणग्या दिल्या असे या लेखात नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) भोजदेव—शिलाहार नृपती; (२) नारायण—श्रेष्ठी.

२८९. कोल्हापूर शिलालेख, शिलाहार भोज (द्वितीय)

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेली शिळा कोल्हापूर येथील महालक्ष्मीच्या मंदिराच्या आवारात असलेल्या हरिहरेश्वराच्या मंदिराच्या भिंतीमध्ये बसविलेली आहे.

संदर्भ.—दीक्षित, मो. ग., म. प्रा. ता. शि., १९४७, पृष्ठ ७३–८०; इ. आयु., १९५१–५२, खंड २९, पृष्ठ १३–१८.

भाषा व लिपी.—संस्कृत, इ. स. च्या १२ व्या शतकातील नागरी लिपी.

राजवंश व राजा.—शिलाहारवंशीय भोज (द्वितीय).

वर्ष व तिथी.—शके ११०४, शुभकृत् संवत्सर, पौष शुद्ध ४, मंगळवार, उत्तरायण संक्रांत, १ डिसेंबर इ. स. ११८२.

सारांश.—प्रस्तुत लेखात शिलाहार महामंडलेश्वर श्री भोजराजाने श्रीमहालक्ष्मी देवळाच्या पश्चिम दरवाजाजवळ असलेल्या, सहवासी ब्राह्मण लोकण नायक याने बांधविलेल्या मठातील उमामहेश्वराच्या मूर्तीचे पूजन करण्यासाठी, तसेच तो मठ सुस्थितीत ठेवण्यासाठी मठाचे नैर्ऋत्येकडील घरात राहणाऱ्या आदित्यभट्ट, जनार्दनभट्ट, प्रभाकर घैसास, वासियण घैसास या ब्राह्मणांना चार घरे, देवाच्या पूजेसाठी एक पुष्पवाटिका व पंचोपचार पूजा, ब्राह्मणभोजन वगैरेसाठी पणवुकमेगोल्लामधील सेल्लेयवाड गावाच्या सीमेमधील एक राज······व त्याच गावात बारा हात लांबी-रुंदीचे एक घर असे सर्व हक्कासहित दान दिल्याचा उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—(१) जीमूतवाहन—शिलाहार घराण्याचा प्रवर्तक विद्याधर; (२) जतिग (प्रथम)—शिलाहार नृपती; (३) नायिम (नायिम्म)—शिलाहार नृपती, जतिग (प्रथम) चा पुत्र; (४) चंद्रराज—शिलाहार नृपती, नायिमाचा पुत्र; (५) जतिग (द्वितीय)—शिलाहार नृपती, चंद्रराजाचा पुत्र; (६) गोंकल्ल—शिलाहार नृपती, जतिग (द्वितीय) चा पुत्र; (७) मारसिंह—शिलाहार नृपती, गोंकल्लाचा पुत्र; (८) गूवल—शिलाहार नृपती, मारसिंहाचा पुत्र; (९) भोजदेव (प्रथम)—शिलाहार नृपती, गूवलाचा भाऊ; (१०) गोविंद-(भोजदेवाने जिंकलेला राजा); (११) कोंगज—(भोजदेवाने जिंकलेला राजा); (१२) बल्लाळदेव—शिलाहार नृपती, भोजदेव (प्रथम) चा धाकटा भाऊ; (१३) गंडरादित्य शिलाहार नृपती, बल्लाळदेवाचा धाकटा भाऊ; (१४) विजयार्क्कदेव (विजयादित्य)—

शिलाहार नृपती, गंडरादित्याचा पुत्र ; (१५) भोजदेव (द्वितीय)—शिलाहार नृपती, विजयादित्याचा पुत्र ; (१६) लोकणनायक—उमामहेश्वरांचा मठ बांधणारा ; (१७) आदित्यभट्ट—दान स्वीकारणारा सहवासी ब्राह्मण ; (१८) जनार्दन भट्ट—दान स्वीकारणारा सहवासी ब्राह्मण; (१९) प्रभाकर घैसास–दान स्वीकारणारा (करहाटकचा?) ब्राह्मण; (२०) वासियण घैसास–दान स्वीकारणारा ब्राह्मण ; (२१) नेम्रण—दान स्वीकारणारा काश्यपसगोत्री ब्राह्मण; (२२) लक्ष्मण—दान स्वीकारणारा काश्यपसगोत्री ब्राह्मण; (२३) माधवार्य—महत्तर, नेमण–लक्ष्मण यांचा पिता; (२४) उद्धवार्य—नेमण-लक्ष्मणांचा पितामह.

ग्रामनामे.—(१) तगरपूर—उस्मानाबाद जिल्ह्यातील आधुनिक तेर ; (२) वलवाड—कोल्हापूर जवळील हल्लीची राधानगरी असावी ; (३) कोल्लापूर—हल्लीचे कोल्हापूर; (४) पणतुरगे—कोल्हापूरच्या नैऋत्येस १४ मैलांवरील पणुत्रा ; (५) सेल्लेयवाड—पणुत्राच्या नैऋत्येस ७.५ मैलांवरील आधुनिक शेळोशी.

२९०. कोल्हापूर ताम्रपट, भोजदेव (द्वितीय)

प्राप्तिस्थळ.—हा लेख सध्या कोल्हापूर राजाच्या संग्रही आहे.

संदर्भ.—(१) ग्रॅहॅम, **कोल्हापूर**, १८५४, नं. ७, पृष्ठ ३९७; (२) किलहॉर्न, **इं. स. इं.** पृष्ठ ५८, नं. ३२५.

भाषा व लिपी.—कानडी, प्राचीन कानडी लिपी.

राजवंश व राजा.—जीमूतवाहनाच्या वंशातील नृपती भोजदेव (द्वितीय).

वर्ष व तिथी.—भाद्रपद, वदि, ३०, शुक्रवार शके ११०९, प्लवंग संवत्सर, इ. स. ११८७.

सारांश.—भोजराजाने एकनागवीर येथील जैन मंदिरातील शांतिदेवाच्या मूर्तीच्या अष्टांग पूजेसाठी, तेथे रहाणाऱ्या साधूंना भोजन देण्यासाठी, कुमारकीर्ति नामक जैन भिक्षूला मिरज प्रदेशातील कोरम्बी हे गाव दान दिले असा उल्लेख या लेखात आहे.

व्यक्तिनामे.—(१) भोजदेव—जीमूतवाहनाच्या वंशातील नृपती; (२) कुमारकीर्ति—दान स्वीकारणारा जैन पंडित; (३) इंद्रकीर्ति—कुमारकीर्तीचा गुरु; (४) नागभद्र—इंद्रकीर्तीचा भाऊ ; (५) मुनिचंद्र—साहित्यविद्यापती, कुमारकीर्तीचा भाऊ; (६) विमलेंदु—मुनिचंद्राचा पिता ; (७) शांतधीर—विमलेंदूचा भाऊ; (८) बालचंद्र मुनि—भोजराजाच्या समकालीन जैन मुनी ; (९) सिंघणराजा—भोजदेवाच्या समकालीन राजा ; (१०) त्रिभुवनचंद्र स्वामी—कोल्हापूरच्या जैन वसतीवर कुमारकीर्तीची नियुक्ती करणारा ; (११) संघय—एकांगवीर येथे देऊळ बांधणारा.

ग्रामनामे.—(१) कोरंबी—दान दिलेले गाव ; (२) कुरुंबी—कोरंबीच्या आग्नेयेस असलेले खेडे ; (३) कुंबीनूर—कोरंबीच्या वायव्येस असलेले गाव ; (४) तिल्लिदिल्ली—कुबीनूरच्या वायव्येस असलेले गाव ; (५) एकांगवीर किंवा एकनागवीर—ओळख पटत नाही.

२९१. कोल्हापूर शिलालेख, भोज (द्वितीय)

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत लेख असलेली शिळा अंबाबाईच्या मंदिराच्या आवारात रहाणाऱ्या अण्णाचार्य पंडित यांच्या घराच्या भिंतीत बसवलेली होती. सध्या हा शिलालेख कोल्हापूरच्या टाऊन हॉलमध्ये ठेवलेला आहे.

संदर्भ.—(१) ग्रॅहॅम, **कोल्हापूर**, १८५४, नं. ८, पृ. ३९८ ; (२) किलहॉर्न, **इ. आय्.**, १८९४–९५, खंड ३, पृ. २१३–२१६.

भाषा व लिपी.—संस्कृत, नागरी.

राजवंश व राजा.—शिलाहार महामंडलेश्वर भोजदेव (द्वितीय).

वर्ष व तिथी.—(१) मंगळवार, पौष वद्य १२, साधारण संवत्सर, उत्तरायण संक्रांत, शके १११२ (गत वर्ष), मंगळवार, २५ डिसेंबर, इ. स. ११९० ; (२) या शिलालेखातील दुसऱ्या भागाची तिथी–शुक्रवार, अश्विन शुक्लपक्ष १, परिधावी संवत्सर, शके १११४ (गत वर्ष), बुधवार, ९ सप्टेंबर, इ. स. ११९२ ; (३) तिसऱ्या भागाची तिथी—शुक्रवार, फाल्गुन शुक्ल ५, प्रमादि संवत्सर, शुक्रवार २८ फेब्रुवारी, इ. स. ११९४.

सारांश.—हा लेख तीन भागात आहे.—(१) भोजदेवाने प्रणालक मुक्कामी असताना कोल्हापूरच्या महालक्ष्मी देवळाच्या पश्चिम दरवाजाजवळ लोकण नायक याने स्थापन केलेल्या मठात रहाणाऱ्या आदित्यभट्ट, लक्ष्मीधरभट्ट, प्रभाकर घैसास, वासियण घैसास या ब्राह्मणांना, उमामहेश्वराचे पूजनासाठी मठात राहणाऱ्या ब्राह्मणांना भोजन देण्यासाठी, महालक्ष्मीला त्रिकाळ नैवेद्य दाखविण्यासाठी व मठ सुस्थितीत ठेवण्यासाठी एडेनाड विभागातील कोप्परवाड या गावातील ५५० वप्यक जमीन दान दिली. त्याचबरोबर १२ हात लांबी-रुंदी असलेले एक घर व खडवलक हेही दान दिले ; (२) लोकण नायकाचा पुत्र नायक कालियण याने पौव गावातील तालुरगेखोल्ल भागातील जमीन त्याची माता पोमाकौवा हिने स्थापलेल्या सत्रामध्ये ब्राह्मण भोजन घालण्यासाठी वर उल्लेखिलेल्या ब्राह्मणांना दान दिली ; (३) नायक कालियण याने सोमेश्वरभट्टाच्या मुलीच्या मुलीकडून विकत घेतलेली जमीन तेथे स्थापिलेल्या शाळेत वेदाध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांना भोजन घालण्यासाठी वर उल्लेखिलेल्या चार ब्राह्मणांना दान दिली.

व्यक्तिनामे.—(१) भोजदेव—दान देणारा महामंडलेश्वर, शिलाहार नृपती ; (२) आदित्यभट्ट—दान स्वीकारणारा ब्राह्मण ; (३) लक्ष्मीधरभट्ट—दान स्वीकारणारा ब्राह्मण ; (४) प्रभाकर घैसास—दान स्वीकारणारा ब्राह्मण ; (५) वासियण घैसास—दान स्वीकारणारा ब्राह्मण ; (६) नायक लोकण—मठ संस्थापक ; (७) नायक कालियण—दान देणारा, नायक लोकण याचा पुत्र ; (८) लखुमण घैसास—कालियण याने दान दिलेल्या एका जमिनीचा मूळ मालक ; (९) पोमाकौवा—दानशाला बांधणारी कालियण याची माता ; (१०) मायिकौवा—दान दिलेल्या एका जमिनीची मूळ मालकीण, सोमेश्वरभट्टाच्या मुलीची मुलगी ; (११) सोमेश्वरभट्ट—सामवेदाध्यायी ब्राह्मण.

ग्रामनामे.—(१) पन्नालेदुर्ग—कोल्हापूरच्या वायव्येस ११ मैलांवर असलेला पन्हाळा किल्ला ; (२) एडेनाड—निश्चित ओळख पटत नाही ; (३) कोप्परवाड—कोल्हापूर जिल्ह्यातील बीरच्या ईशान्येस असलेले कोपुर्द असावे. निश्चित ओळख पटत नाही ; (४) तिरवाडबीड—कोल्हापूरच्या नैऋत्येस असलेले बिर किंवा बीड हे गाव असावे ; (५) पौव—ओळख पटत नाही; (६) तालुरगेखोल्ल—ओळख पटत नाही.

२९२. कोल्हापूर ताम्रपट, भोज पृथिविमल्लवर्मन्

प्राप्तिस्थळ.—माहिती नाही.

संदर्भ.—इं. अ. रि., १९७०–७१, पृ. ४९.

भाषा व लिपी.—संस्कृत, ६ व्या शतकातील दक्षिणेकडील लिपी.

राजवंश व राजा.—भोज, पृथ्वीमल्लवर्मन्.

वर्ष व तिथी.—पृथ्वीमल्लवर्म्याचे ३१ वे शासन वर्ष.

सारांश.—हे शासन पृथ्वीमल्लवर्म्याच्या ३१ व्या शासन वर्षी पृथिविपर्वताहून दिले आहे. यात शिवार्य या कौण्डिण्य गोत्री ब्राह्मणाला जमीन दान दिल्याचे नमूद केले आहे. हे शासन भोजक निधिवर याने अंमलात आणले आणि श्रीदाम याने लिहिले.

व्यक्तिनामे.—(१) भोज पृथिविमल्लवर्मन्; (२) शिवार्य—दान स्वीकारणारा कौंडिण्य गोत्री ब्राह्मण; (३) निधिवर—शासन अंमलात आणणारा भोजक; (४) श्रीदाम—ताम्रपट लिहिणारा. हा आदिरहसिय अथवा रहसिक कुलातील असल्याचा उल्लेख आहे.

ग्रामनामे.—पृथिविपर्वत—ओळख पटत नाही.

२९३. कोंडाणे चैत्यगृह शिलालेख

जिल्हा—**ठाणे**

प्राप्तिस्थळ.—हा लेख कोंडाणे चैत्य लेण्याच्या प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला भव्य मूर्तीच्या उजव्या बाजूला असलेल्या शिळेवर कोरला आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो., १८६१, खंड ६, पृ. १४, नं. ६४; (२) बुल्हेर व बर्जेस, अ. स. वे. इं., १८८३, खंड ४, पृ. ९ व ८३; (३) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १९०९–१०, पृ. ११४, नं. १०७१.

भाषा व लिपी.—प्राकृत, मौर्य काळातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात कण्हचा शिष्य बलुक याने दिलेली देणगी नमूद केली आहे.

व्यक्तिनामे.—(१) कण्ह (कृष्ण); (२) बलुक (बलक)—दान देणारा कण्हाचा शिष्य.

२९४. कोंडिवटे ब्राम्ही शिलालेख

जिल्हा—**मुंबई उपनगर**

प्राप्तिस्थळ.—हा लेख बोरिवलीजवळ कोंडवाईत येथे सापडला.

संदर्भ.—इं. अ. रि. १९५४–५५, पृ. २७.

भाषा व लिपी.—ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—ब्राह्मणाने विहार लेण्याला दिलेली देणगी या लेखात नमूद केली आहे.

२९५. खरडे ताम्रपट, राष्ट्रकूट कक्कराज (द्वितीय ?)

जिल्हा—**धुळे** तालुका—**तळोदे**

प्राप्तिस्थळ.—कुर्डा किंवा खरडा येथे सापडलेला हा ताम्रपट मुंबई येथील रॉयल एशियाटिक सोसायटीच्या ऑफिसमध्ये होता.

संदर्भ.—(१) वाथेन, व्ही. एम्., **ज. रॉ. ए. सो.**, (ओ. एस्.), खंड २, पृ. ३७९ व खंड ३, पृ. ९४; (२) फ्लिट, **इं. अँ.**, १८८३, खंड १२, पृ. २६३–२७०.

भाषा व लिपी.—संस्कृत, प्राचीन नागरी लिपी.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती कक्क (तृतीय).

वर्ष व तिथी.—चंद्रग्रहण, बुधवार, आश्वयुज, शके ८९४, आंगिरस संवत्सर, इ. स. ९७२–७३.

सारांश.—हा ताम्रपट राष्ट्रकूट नृपती कक्क (द्वितीय) याच्या आमदानीतील असून मान्यखेटहून दिलेला आहे. या ताम्रपटाचा मुख्य उद्देश गेजररावीच्या भारद्वाजगोत्री भट्टच्छन्नपैय याला उप्पलिका ३०० विभागातील वव्वुलतल्ल १२ या उपविभागातील पंगरिका हे गाव तेथील वृक्ष व इतर सर्व उत्पन्नासह दान दिले हे नमूद करणे हा होता. हे शासन नृपतीने राष्ट्रपती, विषयपती, महत्तर, आयुक्त, उप आयुक्त आणि अधिकारिक यांना उद्देशून काढले होते.

व्यक्तिनामे.—(१) दंतिदुर्ग—राष्ट्रकूट नृपती; (२) कृष्णराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, दंतिदुर्गाचा चुलता; (३) गोविंदराज—राष्ट्रकूट नृपती, कृष्णराज (प्रथम)चा पुत्र; (४) निरुपम—राष्ट्रकूट नृपती, गोविंदराजाचा धाकटा भाऊ; (५) जगत्तुंग (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, निरुपमाचा पुत्र; (६) अमोघवर्ष (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, जगत्तुंग (प्रथम) चा पुत्र; (७) कृष्णराज (द्वितीय) अकालवर्ष—राष्ट्रकूट नृपती, अमोघवर्ष (प्रथम) चा पुत्र; (८) लक्ष्मी—कृष्ण अकालवर्ष याची पत्नी, चेदि राजकन्या, कोक्कल याची कन्या. (९) कोक्कल—चेदि देशचा हैहय राजा, लक्ष्मीचा पिता; (१०) शंकुक—लक्ष्मीचा मोठा भाऊ; (११) जगत्तुंग (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, कृष्ण (द्वितीय) चा पुत्र; (१२) लक्ष्मी—जगत्तुंग (द्वितीय) ची पत्नी, शंकरगणाची कन्या; (१३) शंकरगण—चेदि देशचा राजा, जगत्तुंग (द्वितीय) चा मामा, लक्ष्मीचा पिता; (१४) इंद्रराज—राष्ट्रकूट नृपती, जगत्तुंग (द्वितीय) याचा पुत्र; (१५) गोविंदाम्बा–जगत्तुंग (द्वितीय) ची पत्नी, शंकरगणाची कन्या; (१६) अमोघवर्ष (द्वितीय)-राष्ट्रकूट नृपती, गोविंदाम्बा हिला झालेला जगत्तुंग (द्वितीय) चा पुत्र; (१७) कृष्णराज (द्वितीय)–राष्ट्रकूट नृपती, अमोघवर्ष (द्वितीय) चा मोठा भाऊ; (१८) कुंदकदेवी—अमोघवर्ष (द्वितीय) ची पत्नी, युवराजाची कन्या; (१९) युवराज—कुंदकदेवीचा पिता; (२०) खोट्टिगदेव—राष्ट्रकूट नृपती, अमोघवर्ष (द्वितीय) चा पुत्र; (२१) निरुपम—राष्ट्रकूट खोट्टिगदेवाचा धाकटा भाऊ; (२२) कक्कराज—राष्ट्रकूट नृपती, निरुपमाचा पुत्र; (२३) भट्ट छन्नपैय—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (२४) संगमैय—छन्नपैयाचा पिता; (२५) शंकरैय—छन्नपैयाचा पितामह; (२६) पुन्नाय—लेख लिहिणारा कायस्थ; (२७) योगमार्य—पुन्नार्याचा पिता; (२८) अंबार्य—पुन्नार्याचा पितामह.

ग्रामनामे.—(१) मान्यखेट—हल्लीचे मालखेड; (२) पांगारिका; (३) वव्वुलतल्ल; (४) उप्पलिका; (५) रोहितल्ल; (६) सिलहरे; (७) किणिही; (८) अंतरवल्ली; (९) गेजररावी यांपैकी कोणत्याच गावाची ओळख संपादकांनी पटवलेली नाही.

२९६. खाकुर्डी ताम्रपट, राष्ट्रकूट दंतिदुर्ग, शके ९७८

प्राप्तिस्थळ.—हा लेख खाकुर्डी येथून डॉ. ग. वा. तगारे यांच्या प्रयत्नांनी मिळाला.

संदर्भ.—दीक्षित, मो. ग., **द.म.इ.सा.**, १९५१, खंड ४, पृ. २०–२७.

भाषा व लिपी.—संस्कृत; दाक्षिणात्य वळणाची नागरी लिपी.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती दंतिदुर्ग.

वर्ष व तिथी.—कार्तिक वदि ३०, सूर्यग्रहण, तारण संवत्सर, शके ९७८. ही तिथी सुसंगत वाटत नाही. सूर्यग्रहण २२ नोव्हेंबर १०५४ ला होते.

सारांश.—हा ताम्रपट राष्ट्रकूट नृपती दंतिदुर्ग याच्या अमदानीतील आहे. या लेखात माध्यंदिन शाखेचा कोंमदेव याचा पुत्र गोविंद याला शोम्मवाट अथवा खोग्गवाट गावातील अठरा वृत्ती दान दिल्याचे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) कर्कराज—राष्ट्रकूट नृपती; (२) अमोघवर्ष—राष्ट्रकूट नृपती, कर्कराजाचा पुत्र; (३) दंतिदुर्ग—दान देणारा राष्ट्रकूट नृपती, अमोघवर्षाचा पुत्र; (४) गोविंदभट्ट—दान स्वीकारणारा पाराशर गोत्री त्रैविद्य ब्राह्मण, माध्यंदिन शाखा; (५) कोंमदेव—गोविंदभट्टाचा पिता; (६) दद्दपै—गोविंदभट्टाचा पितामह.

ग्रामनामे.—(१) मानखेट—राष्ट्रकूटांची राजधानी, हैद्राबाद संस्थानातील मालखेड; (२) खोग्गवाट–हल्लीचे खाकुरडी; (३) मोहरखेटक—खाकुरडीच्या आग्नेयेस चार मैलांवरील मोर-गव्हाण; (४) चिंचाखेटक—ओळख पटत नाही; (५) उड्वाटी—ओळख पटत नाही; (६) वंविलपाटक—खाकुरडीच्या नैर्ऋत्येस पाच मैलांवरील वांयगाव असावे; (७) भोजपूर—सिन्नरपासून पाच मैलांवरील भोजापूर असावे; (८) मोसिणि नदी–हल्लीची मोसम.

२९७. खानापूर ताम्रपट, माधववर्मन्

जिल्हा—**सातारा** तालुका—**खानापूर**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट खानापूर येथे श्री. दादासाहेब माने यांच्याजवळ होता.

संदर्भ.—(१) गुप्ते, **क्वा.भा.इ.सं.मं**, १९२७, खंड ८, पृ. १६३, पुणे; (२) मिराशी, वा. वि., **द.म.इ.सा.**, १९५१, खंड ४, पृ. ९–१४.

भाषा व लिपी.—संस्कृत; दाक्षिणात्य वळणाची लिपी.

राजवंश व राजा.—विष्णुकुंडिन् वंशीय नृपती माधववर्मन्.

वर्ष व तिथी.—वैशाख, पौर्णिमा. (कोणताही संवत् वा शासन वर्ष दिलेले नाही.)

सारांश.—हा ताम्रपट विष्णुकुंडिन् माधववर्मन् या नृपतीच्या अमदानीतील आहे. या ताम्रपटाचा उद्देश माधववमन् याने महावैशाखीच्या प्रसंगी शालंकायन गोत्री बोलस्वामी व भारद्वाज गोत्री केशवस्वामी यांना रेट्टुरक हे गाव बंकतीर्थ, तंबतीर्थ (स्तंभतीर्थ), कदंबतीर्थ या घाटांसह व बेलवाटिका, कोलिकाटिका व वट्टरिका या तीन वाड्यांसह दान दिले हे नमूद करण्याचा होता. हे शासन कायस्थ श्रीपाल याने लिहिले.

व्यक्तिनामे.—(१) माधववर्मन्—दान देणारा नृपती; (२) बोलस्वामी—दान स्वीकारणारा शालंकायन गोत्री ब्राह्मण; (३) केशवस्वामी—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (४) श्रीपाल—लेख लिहिणारा कायस्थ.

ग्रामनामे.—(१) रेट्टूरक—कृष्णा-वेण्णा नदीच्या आग्नेयेस असलेले हल्लीचे रेठरे बुद्रुक; (२) तंबतीर्थ—रेठऱ्याच्या दक्षिणेस २॥ मैलांवरील तांबवे; (३) कदंबतीर्थ—ओळख पटत नाही; (४) बेलवाटिका—रेठरेच्या पश्चिमेस तीन मैलांवरील बेलवडे; (५) कोलिकावाटिका—रेठरेच्या आग्नेयेस दोन मैलांवरील कोळे-खुबी; (६) वट्टरिका—रेठरेच्या पश्चिमेस १॥–२ मलांवरील वाठार.

२९८. खामखेड किंवा खामगांव ताम्रपट, प्रतापशील

जिल्हा—**बुलढाणा** तालुका—**मेहकर**

प्राप्तिस्थळ.—हा लेख खामगाव येथील एका शेतकऱ्याला आपल्या घराच्या भिंतीखाली खोदत असताना मिळाला.

संदर्भ.—मिराशी वा. वि., इ. आय्. १९३३–३४ खंड २२, पृ. ९३–९६.

भाषा व लिपी.—अशुद्ध संस्कृत; उत्तर हिंदुस्थानी नागरी.

राजवंश व राजा.—राजा प्रतापशील (घराण्याचा उल्लेख केलेला नाही.)

वर्ष व तिथी.—दिलेली नाही. (अंदाजे इ. स. चे ८ वे शतक असावे.)

सारांश.—या लेखाचा मुख्य उद्देश पर्णिखेटच्या आग्नेयेस ४ मैलांवर असलेले नंदपुर हे गाव प्रतापशील राजाचा बंधु उतरगण याचा पुत्र दवन द्रुहट याने सूर्यग्रहणप्रसंगी शर्मन् सोमस्वामी, षष्ठिकुमार, नागशर्मन्, आदित्यशर्मन् आणि इतर ब्राह्मणांना दान दिले हे नमूद करण्याचा होता.

व्यक्तिनामे.—(१) प्रतापशील—तत्कालीन राजा, दवनद्रुहटाचा चुलता; (२) दवनद्रुहट—दान देणारा; (३) उतरगण–दवनद्रुहटाचा पिता; (४) सोमस्वामी—दान स्वीकारणारा ब्राह्मण; (५) षष्ठीकुमार—दान स्वीकारणारा ब्राह्मण; (६) नागशर्मन्—दान स्वीकारणारा ब्राह्मण; (७) आदित्यशर्मन्—दान स्वीकारणारा ब्राह्मण; (८) ईश्वरभट्ट—पुरोहित; (९) नागम्मभट्ट—पुरोहित; (१०) गोविंद—भोगिक; (११) गोलम्म—श्रेष्ठी; (१२) दुर्गहरि—लेख लिहिणारा सेनापती.

ग्रामनामे.—(१) नंदपुर—हल्लीचे खामखेड असावे; (२) पर्णिखेट—खामखेडच्या वायव्येस दीड मैलांवरील पांगारखेड असावे; (३) व्याघ्रविरक—खामखेडच्या ईशान्येस सुमारे एक मैलांवरील वाघोर असावे; (४) ब्रह्मशक—ओळख पटत नाही; (५) च्छोबविरक—ओळख पटत नाही.

२९९. खारेपाटण ताम्रपट, शिलाहार मांडलिक रट्टराज

जिल्हा—**रत्नागिरी** तालुका—**देवगड**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट खारेपाटण येथील एका ब्राह्मणाला सापडला.

संदर्भ.—शास्त्री बा. गं., **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.** खंड १, पृ. २०९; (२) किलहॉर्न, **इ. आय्.,** १८९४–९५, खंड ३, पृ. २९२–३०२.

भाषा व लिपी.—संस्कृत; नागरी.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती रट्टराज.

वर्ष व तिथी.—ज्येष्ठ पौर्णिमा, किलक, शके ९३०, सोमवार, २२ मे, इ. स. १००८–९.

सारांश.—हा ताम्रपट शिलाहार नृपती रट्टराज याने दिलेला आहे. हा ताम्रपट दोन भागात विभागला गेला आहे पहिल्या भागात रट्टराज, राष्ट्रकूट व पश्चिमी चालुक्य नृपती यांची वंशावळ दिलेली आहे आणि दुसऱ्या भागात विविध देणग्या नमूद केल्या आहेत. दुसऱ्या भागाचा मुख्य उद्देश राजाने मत्तमयूर पंथाच्या कर्करोणी शाखेचे उपदेशक आत्रेय व अंभोजशंभू यांना अव्वेश्वर देवाच्या पूजेसाठी व मंदिराच्या व्यवस्थेसाठी कूष्मांडी, असनवीर, वडद्गुल ही गावे दान दिली हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) दंतिदुर्ग—राष्ट्रकूट नृपती; (२) कृष्णराज—राष्ट्रकूट नृपती, दंतिदुर्गाचा चुलता; (३) गोविंदराज–राष्ट्रकूट नृपती, कृष्णराजाचा पुत्र; (४) निरुपम—राष्ट्रकूट नृपती गोविंदराजाचा धाकटा भाऊ; (५) जगत्तुंग—राष्ट्रकूट नृपती, निरुपमाचा पुत्र; (६) अमोघवर्ष—राष्ट्रकूट नृपती, जगत्तुंगाचा पुत्र; (७) अकालवर्ष—राष्ट्रकूट नृपती, अमोघवर्षाचा पुत्र; (८) इंद्रराज–राष्ट्रकूट नृपती, अकालवर्षाचा नातू; (९) अमोघवर्ष–राष्ट्रकूट नृपती, इंद्रराजाचा पुत्र; (१०) गोविंदराज—राष्ट्रकूट नृपती, अमोघवर्षाचा धाकटा भाऊ; (११) वड्डिग—

राष्ट्रकूट गोविंदराज याचा चुलता, जगत्तुंगाचा पुत्र; (१२) कृष्णराज—राष्ट्रकूट नृपती, वड्डिगाचा पुत्र; (१३) खोटिक—कृष्णराजाचा भाऊ; (१४) कक्कल—खोटिक याचा पुतण्या; (१५) तैलप–राष्ट्रकूट कक्कलाला जिंकणारा चालुक्य नृपती; (१६) सत्याश्रय–चालुक्य नृपती, तैलपाचा पुत्र; (१७) सणफुल्ल—शिलाहार राजा, राष्ट्रकूट नृपती कृष्ण (प्रथम) याचा अंकित; (१८) धम्मियर—शिलाहार राजा, सणफुल्लाचा पुत्र; (१९) ऐयपराज—शिलाहार राजा, धम्मियरचा पुत्र; (२०) अवसर (प्रथम)—शिलाहार राजा, ऐयपराज याचा पुत्र; (२१) आदित्यवर्मन्–शिलाहार राजा, अवसर (प्रथम) चा पुत्र; (२२) अवसर (द्वितीय)–शिलाहार राजा, आदित्यवर्म्याचा पुत्र; (२३) इंद्रराज–शिलाहार राजा, अवसर (द्वितीय) चा पुत्र; (२४) भीम–शिलाहार राजा, इंद्रराजाचा पुत्र; (२५) अवसर (तृतीय)–शिलाहार राजा, भीमाचा पुत्र; (२६) रट्ट—दान देणारा शिलाहार राजा, अवसर (तृतीय) चा पुत्र; (२७) आत्रेय–दान स्वीकारणारा मत्तमयूरान्वयाचा उपदेशक ब्राह्मण; (२८) अंभोजशंभु–आत्रेयाचा गुरू; (२९) लोकपार्य—लेख लिहिणारा; (३०) देवपाल—लोकपार्याचा पिता, सांधिविग्रहिक.

ग्रामनामे.—(१) कूष्मांडी; (२) मणिग्राम; (३) वापरवट; (४) सच्छांदलकपित्थ; (५) असनविर; (६) कारपर्णी; (७) गवहण; (८) वडग्दुल; (९) अखडद; (१०) पटसड; (११) स्तामान; (१२) देवलक्ष्मी; (१३) व्यद्गरूल; (१४) सय्यापली; (१५) कंदलमूलीय; (१६) चंद्रपूर. यापैकी कोणत्याच गावाची ओळख संपादकांनी पटवलेली नाही; (१७) चेमूल्य—हल्लीचे चौल.

३००. खारेपाटण ताम्रपट, शिलाहार अनंतपाल

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट श्री. रामचंद्र शिवराम देसाई यांना खारेपाटण येथे जमिनीत पुरलेला सापडला. संपादकाला हा ताम्रपट रावसाहेब भाटवडेकर यांच्यामार्फत मिळाला.

संदर्भ.—तेलंग, का. त्रि., इं. ॲ., १८८०, खंड ९, पृ. ३३.

भाषा व लिपी.—संस्कृत, देवनागरी.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती अनंतपाल.

वर्ष व तिथी.—शके १०१६, माघ शुद्ध प्रतिपदा, भाव संवत्सर.

सारांश.—या शासनान्वये अनंतपालदेवाने दुर्गश्रेष्ठीचा पुत्र भाभण श्रेष्ठी व त्याचा भाऊ धणम श्रेष्ठी यांच्या श्रीस्थानक, सुपरिक, चेमुली व कोंकण १४०० मधील इतर बंदरात येणाऱ्या व जाणाऱ्या मालाच्या गाड्यांवरील आयात व निर्यात कर रद्द केल्याचे जाहीर केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) कपर्दी (प्रथम)—शिलाहार नृपती; (२) पुलसक्ति (पुल्लशक्ति)—शिलाहार नृपती, कपर्दी (प्रथम) चा पुत्र; (३) कपर्दी (द्वितीय)—शिलाहार नृपती, पुल्लशक्तीचा पुत्र; (४) वत्पुवन्न—शिलाहार नृपती, कपर्दी (द्वितीय) चा पुत्र; (५) झंझ; शिलाहार नृपती, वत्पुवन्नाचा पुत्र; (६) गोग्गिराज—शिलाहार नृपती, झंझाचा भाऊ–(७) वज्जडदेव (प्रथम)—शिलाहार नृपती, गोग्गिराजाचा पुत्र; (८) अपराजित—शिलाहार नृपती, वज्जडदेव (प्रथम) चा पुत्र; (९) वज्जडदेव (द्वितीय)—शिलाहार नृपती, अपराजिताचा पुत्र; (१०) अरिकेसरी—शिलाहार नृपती, वज्जडदेव (द्वितीय) चा भाऊ; (११) च्छित्त-राज—शिलाहार नृपती, वज्जडदेव (द्वितीय) चा पुत्र; (१२) नागार्जुन—शिलाहार नृपती, छित्तराजाचा धाकटा भाऊ; (१३) मुम्मुणि—शिलाहार नृपती, नागार्जुनाचा धाकटा भाऊ; (१४) अनंतपाल—दान देणारा शिलाहार नृपती, नागार्जुनाचा पुत्र; (१५) नौवित्तिक वासैद—महामात्य; (१६) रिषिभट्ट—महासांधिविग्रहिक; (१७) महादेवैय प्रभु—भांडागार

प्रथमच्छेपादिसेन महाप्रधान; (१८) सोमणैय प्रभु—द्वितीयच्छेपादिसेन प्रधान; (१९) भाभणश्रेष्ठी—कर माफ झालेला महाप्रधान; (२०) दुर्गश्रेष्ठी—भाभण श्रेष्ठीचा पिता, महाप्रधान; (२१) धणम—कर माफ झालेला महासांधिविग्रहिक, भाभण श्रेष्ठीचा भाऊ; (२२) पाणम—कर माफ झालेला श्रेष्ठी; (२३) कुडुकल—कर माफ झालेला श्रेष्ठी; (२४) मालैय—कर माफ झालेला श्रेष्ठी; (२५) श्रीधर पंडित—दानपत्र मिळवणारा.

ग्रामनामे.—(१) तगरपूर—उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर; (२) श्रीस्थानक—हल्लीचे ठाणे; (३) पुरी—ओळख पटत नाही; (४) हंजमण—ओळख पटत नाही; (५) रायवार—ओळख पटत नाही; (६) नागपूर—अलिबाग जवळील नागाव असावे किंवा नागोठणे असावे; (७) स(सू)र्पारक—हल्लीचे सोपारा; (८) चेमुली—हल्लीचे चौल; (९) सोमेश्वर—सोमनाथ.

३०१. खिद्रापूर शिलालेख, यादव सिंघणदेव

जिल्हा—**कोल्हापूर** तालुका—**शिरोळ**

प्राप्तिस्थळ.—हा लेख खिद्रापूर येथील कोप्पेश्वरदेव मंदिराच्या दक्षिणेकडील प्रवेशद्वाराच्या उजव्या हाताला असलेल्या शिलाखडावर (Stone table) कोरलेला आहे.

संदर्भ.—पिलट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८७६, खंड १२, पृ. १–२ व ७–१०.

भाषा व लिपी.—संस्कृत, देवनागरी.

राजवंश व राजा.—देवगिरीचा यादव नृपती सिंघणदेव.

वर्ष व तिथी.—शके ११३६, श्रीमुख संवत्सर, चैत्र, सूर्यपर्व, सोमवार, इ. स. १२१४–१५.

सारांश.—या लेखाचा मुख्य उद्देश यादव नृपती सिंघणदेव याने मिरिंजि जिल्ह्यातील कूडल, कृष्णवेणी व भेणसी या नद्यांच्या संगमावर वसलेले कूडलदामवाड हे गाव तेथील वृक्ष व या गावाच्या कक्षेत येणारी, कृष्णवेणी व कुवेणी या नद्यांच्या संगमापर्यंत पसरलेली जमीन व इतर संपत्ति .... कोप्पेश्वरदेव मंदिराला अंगभोग, रंगभोग व इतर धार्मिक कृत्यांसाठी दान दिली हे नमूद करण्याचा होता. याशिवाय सिंघणदेवाने जूगुल व सिरिगुप्प ही दोन गावे या मंदिराला दान दिल्याचा उल्लेख केलेला आहे.

व्यक्तिनामे.—सिंघणदेव—यादव नृपती.

ग्रामनामे.—(१) द्वारावतीपूर—म्हैसूर संस्थानातील हल्लीचे हळेबीड; (२) सिरिगुप्प—ओळख पटत नाही; (३) जूगुल—ओळख पटत नाही; (४) कूडलदामवाड—ओळख पटत नाही. (५) मिरिंजि–मिरज.

३०२. खिद्रापूर शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख खिद्रापूर येथील कोपेश्वर मंदिरात विरगळवर कोरलेला आहे.

संदर्भ.—कुंदनगर, **इ.नॉ.क.को.** नं. ३५, पृ. १७९.

भाषा व लिपी.—कन्नड, कन्नड लिपी.

राजवंश व राजा.—महामंडलेश्वर भोजदेव, (बहुधा हा शिलाहार राजा असावा).

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखामध्ये महामंडलेश्वर भोजदेव याचा उल्लेख असून संगम खिडीमध्ये झालेल्या युद्धात निधन पावलेला बम्मेश याचाही उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—(१) भोजदेव—महामंडलेश्वर; (२) बम्मेश—युद्धातमृत्यु पावलेला वीर.

३०३. खिद्रापूर शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख खिद्रापूर येथील कोपेश्वर मंदिराच्या बाहेरच्या भिंतीवर हस्त (bracket) मूर्तीच्या खाली कोरलेला आहे.

संदर्भ.—कुंदनगर, इ.नॉ.क.को., १९३९, पृ. १७५, नं. २५.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात विजयादित्याचा सेवक बप्पण दंडनायक याच्या शौर्याची प्रशंसा केलेली आहे.

व्यक्तिनामे.—(१) विजयादित्य; (२) बप्पण—विजयादित्याचा सेवक, दंडनायक.

३०४. खिद्रापूर शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख खिद्रापूर येथील कोपेश्वर मंदिरातील मूर्तीच्या खाली भिंतीवर आहे.

संदर्भ.—कुंदनगर, इ.नॉ.क.को., १९३९, पृ. १७५, नं. २६.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखामध्ये बप्पण दंडनायक याची स्तुती केलेली आहे.

व्यक्तिनामे.—बप्पण—दंडनायक.

३०४ अ. खिद्रापूर शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख खिद्रापूर येथील कोपेश्वर मंदिरातील मूर्तीच्या खाली आहे.

संदर्भ.—कुंदनगर, इ.नॉ.क.को., १९३९, पृ. १७५, नं. २७.

भाषा व लिपी.—कानडी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात, सेनापती शिरिग याचे सद्गुण वर्णन करणे सहस्त्रशीर्ष व दोन सहस्त्र जिव्हा असणाऱ्या शेषासही अशक्य आहे असे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—शिरिग—सेनापती.

३०५. खिद्रापूर शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख खिद्रापूर येथील कोपेश्वर मंदिरातील मूर्तीच्या खाली आहे.

संदर्भ.—कुंदनगर, **इ.नॉ.क.को.**, १९३९, पृ. १७६, नं. २८.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात बोप्पण नामक सरसेनापतीची, त्याने आपल्या राजाच्या एकछत्राखाली सर्व प्रदेश आणून लोकांना सुखी केल्याबद्दल प्रशंसा केली आहे.

व्यक्तिनामे.—बोप्पण—सरसेनापती.

३०६. खिद्रापूर शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख खिद्रापूर येथील कोपेश्वर मंदिरात हस्ताकार मूर्तीच्या खाली आहे. (नं. ६.)

संदर्भ.—कुंदनगर, **इ.नॉ.क.को.**, १९३९, पृ. १७६, नं. २९.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात बप्पण दंडनायक याच्या ठिकाणी पाच पांडवांचे सद्गुण एकवटले आहेत असे लिहिले आहे.

व्यक्तिनामे.—बप्पण—दंडनायक.

३०७. खिद्रापूर शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख खिद्रापूर येथील कोपेश्वर मंदिरात हस्ताकार मूर्तीच्या खाली कोरलेला आहे. (नं. ७.)

संदर्भ.—कुंदनगर, **इ.नॉ.क.को.**, १९३९, पृ. १७६, नं. ३०.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—दिलेली नाही.

सारांश.—या लेखात बोप्पणाच्या शौर्याची प्रशंसा केलेली आहे.

व्यक्तिनामे.—बोप्पण.

३०८. खिद्रापूर शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख खिद्रापूर येथील कोपेश्वर मंदिरात हस्ताकार मूर्तीच्या खाली कोरलेला आहे.

संदर्भ.—कुंदनगर, इ.नॉ.क.को., १९३९, पृ. १७७, नं. ३१.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख त्रोटक आहे. सुसंगत अर्थ लागत नाही.

३०९. खिद्रापूर शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख खिद्रापूर येथील कोपेश्वर मंदिरात हस्ताकार मूर्तीच्या खाली कोरलेला आहे.

संदर्भ.—कुंदनगर, इ.नॉ.क.को., १९३९, पृ. १७७, नं. ३२.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात ज्या व्यक्तीच्या शौर्याची स्तुती केलेली आहे त्या व्यक्तीचे नाव दिलेले नाही.

३१०. खिद्रापूर शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख खिद्रापूर येथील कोपेश्वर मंदिरात हस्ताकार मूर्तीच्या खाली कोरलेला आहे.

संदर्भ.—कुंदनगर, इ.नॉ.क.को., १९३९, पृ. १७७; नं. ३३.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात सिरियण याची स्तुती केलेली आहे.

व्यक्तिनामे.—सिरियण.

३११. गणेशवाडी शिलालेख, चालुक्य विक्रमादित्य ६ वा

जिल्हा—उस्मानाबाद तालुका—निलंगा

प्राप्तिस्थळ.—संपादकाला या लेखाचे ठसे महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व व पुराभिलेख विभागाचे संचालक मो. गं. दीक्षित, यांच्याकडून मिळाले. हा लेख तीन विभागात असून गणेशवाडी येथील केशवभारती यांच्या समाधीजवळील शिळेवर डाव्या बाजूस कोरलेला आहे. (विभाग पहिला)

संदर्भ.—कोलते, वि. भि., वि. सं. मं. वा., १९६९, पृ. ३६–४६.

भाषा व लिपी.—संस्कृत, नागरी.

राजवंश व राजा.—चालुक्य नृपती विक्रमादित्य.

वर्ष व तिथी.—२४ वे शासनवर्ष, शके १०२१, प्रमाथी संवत्सर, मार्गशीर्ष पौर्णिमा, सोमवार, चंद्रग्रहण, बुधवार, ३० नोव्हेंबर इ. स. १०९९.

सारांश.—चालुक्य नृपती विक्रमादित्य याच्याकडून त्याचा महाप्रधान दंडनायक भीमनाथ याने पिप्पलग्राम हे गाव मिळविले व तेथे भीमसमुद्र सरोवराच्या काठावर ब्रह्मा, विष्णु, महेश्वरादी देवतांची देवालये बांधली. त्यांच्या पूजा-अर्चेसाठी व तेथील सरस्वती मंडपातील तपस्वी आणि विद्यार्थी यांच्या अन्नधान्यसंवर्धनासाठी पिप्पलग्राम येथील ५०० निवर्तने भूमी तत्पुरुष पंडिताला दान दिली. त्याचप्रमाणें भीमेश्वर देवाच्या 'पुरुविधानार्थ' गावात रहाण्यासाठी जागा दिली हे नमूद करणे हा या लेखाचा मुख्य उद्देश आहे.

व्यक्तिनामे.—(१) त्रिभुवनमल्लदेव (विक्रमादित्य)—चालुक्य नृपती ; (३) भीमनाथ—दान देणारा महाप्रधान दंडनायक ; (३) तत्पुरुष पंडित—दान स्वीकारणारा ब्राह्मण ; (४) क्रियाशक्ति पंडित—तत्पुरुष पंडिताचा गुरु ; (५) वादिरुद्र पंडित—क्रियाशक्ति पंडिताचा गुरु.

ग्रामनामे.—(१) कल्याणपूर—कर्नाटक राज्यात बिदर जिल्ह्यातील सध्याचे कल्याणी; (२) पिप्पलग्राम—उस्मानाबाद जिल्ह्यात निलंगा तालुक्यातील हिप्पळगाव; (३) शिलाकरग्राम—हिप्पळगावच्या किंचित नैऋत्येला ४ मलांवर असलेले सध्याचे सलगर हे गाव असावे; (४) शुष्कग्राम—हिप्पळगावजवळील सूगाव असावे.

३१२. गणेशवाडी शिलालेख, चालुक्य विक्रमादित्य ६ वा

प्राप्तिस्थळ.—हा लेख तीन विभागात असून गणेशवाडी येथील केशव भारती समाधीजवळच्या शिळेवर कोरलेला आहे. (विभाग दुसरा)

संदर्भ.—कोलते, वि. भि. **वि. सं. मं. वा.**, १९६९, पृ. ४६–५५.

भाषा व लिपी.—संस्कृत, आजच्या देवनागरी वळणाला जुळणारी नागरी लिपी.

राजवंश व राजा.—चालुक्य नृपती विक्रमादित्य ६ वा.

वर्ष व तिथी.—२४ वे शासन वर्ष, शके १०२१, प्रमाथी संवत्सर, मार्गशीर्ष पौर्णिमा, सोमवार ; ३० नोव्हेंबर, इ. स. १०९९, बुधवार.

सारांश.—प्रस्तुत लेखात महाप्रधान भीमसेन याची प्रशंसा केलेली असून त्याच्या धर्मकृत्याचे वर्णन केलेले आहे.

व्यक्तिनामे.—(१) त्रिभुवनमल्लदेव (विक्रमादित्य)—चालुक्य नृपती ; (२) भीमनाथ—आत्रेय गोत्री ब्राह्मण, महाप्रधान ; (३) वल्लभट्ट—भीमनाथाचा पिता ; (४) शीयुभट्ट—वल्लभट्टाचा पिता ; (५) आदित्यभट्ट—शीयुभट्टाचा पिता ; (६) जयावती—वल्लभट्टाची पत्नी, भीमनाथाची माता ; (७) जोगलदेवी किंवा जोगवा—भीमनाथाची पत्नी ; (८) कालिदास—दंडनायक, प्रशस्तीचा लेखक, भीमनाथाचा पुत्र.

ग्रामनामे.—(१) मेघंकर—बुलढाणा जिल्ह्यातील आजचे मेहकर ; (२) पिप्परिकखेट—मेहकरच्या नैऋत्येस असलेले आजचे पिंपरखेड असावे ; (३) नांदीतट—आजचे नांदेड ; (४) वाग्घिका—नांदेडच्या पश्चिमेस ६ किलोमीटर अंतरावर असलेले हल्लीचे वाघी ; (५) भुवनाचल—निश्चित ओळख पटत नाही ; (६) शिवपुर—गोदावरी व कौम नदीच्या उत्तरेस सहा मैलांवरील शिवपुर किंवा नांदेड जिल्ह्यातील शिवपुरी हे गाव असावे ; (७) मुरंबिका-उस्मानाबाद जिल्ह्यात उमरगा तालुक्यातील मुरुम किंवा नांदेड जिल्ह्यात कंधार तालुक्यातील मुरंबी हे गाव असावे ; (८) कल्याणपुरी—बिदर जिल्ह्यातील हुमणाबाद तालुक्यातील कल्याणी ; (९) कल्लुंबर—नांदेड जिल्ह्यात कंधार तालुक्यातील आजचे कलंबर हे गाव असावे ; (१०) पिप्पलग्राम—उस्मानाबाद जिल्ह्यात निलंगा तालुक्यातील हिप्पळगाव असावे.

३१३. गणेशवाडी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख तीन विभागात असून गणेशवाडी येथील केशव भारती समाधीजवळच्या शिळेवर कोरलेला आहे. (विभाग तिसरा).

संदर्भ.—कोलते, वि. भि., **वि. सं. मं. वा.**, १९६९, पृ. ५५–६६.

भाषा व लिपी.—संस्कृत, नागरी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश—या लेखात शिवलिंगी संतानातील काही आचार्यांची वर्णने आली आहेत. या लेखाचा मुख्य विषय पिप्पलग्राम येथे भीमनाथाने बांधून दिलेल्या देवळातील आचार्य तत्पुरुष पंडित याची गुरुपरंपरा वर्णन करण्याचा आहे.

व्यक्तिनामे.—(१) वादिरुद्र—शिवलिंगी संतानातील सर्वश्रेष्ठ ; (२) क्रियाशक्ति पंडित—वादिरुद्राचा शिष्य ; (३) त्रिलोचनार्य पंडित—क्रियाशक्ति पंडिताचा धाकटा भाऊ ; (४) तत्पुरुष पंडित—क्रियाशक्ति पंडिताचा दुसरा भाऊ व शिष्य ; (५) श्रीकंठमुनी.

३१४. गुळवाडा शिलालेख, वराहदेव

जिल्हा—**औरंगाबाद** तालुका—**सोयेगाव** (सिल्लोद)

प्राप्तिस्थळ.—हा लेख अजंठ्याच्या पश्चिमेस ११ मैलांवर असलेल्या गुळवाडा येथील घटोत्कच लेण्यातील व्हरांड्यात मागच्या भिंतीवर डाव्या बाजूला टोकाला कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृष्ठ ४४ ; (२) बुल्हर, **अ. स. वे. इं** १८८३, खंड ५, पृष्ठ १३८; (३) मिराशी, वा. वि., **कॉ. इं. इं.**, १९६३, खंड ५, पृष्ठ ११२–११३

भाषा व लिपी.—संस्कृत, दाक्षिणात्य वळणाची पेटिकाशीर्षक लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. च्या ५ व्या शतकाच्या शेवटच्या २५ वर्षांतील असावा.

सारांश.—या लेखाचा मुख्य उद्देश वाकाटकांच्या मंत्र्याने (नाव नष्ट झाले आहे. परंतु हे नाव वराहदेव असावे असे श्री. मिराशी यांचे मत आहे) विहार लेणे खोदले हे जाहीर करण्याचा होता. वराहदेव हा हस्तिभोजाचा पुत्र होता. या लेखात या मंत्र्याची वंशावळ दिलेली आहे. हे घराणे वल्लूरचे होते.

व्यक्तिनामे.—(१) यज्ञपति—वल्लूर घराण्याचा आद्य पुरुष; (२) देव—यज्ञपतीचा पुत्र; (३) सोम—देवाचा पुत्र; (४) रवि—सोमाचा पुत्र; (५) प्रवर—रवीचा पुत्र; (६) श्रीराम—प्रवराचा पुत्र; (७) कीर्ति—श्रीरामाचा पुत्र; (८) हस्तिभोज—कीर्तीचा पुत्र; (९) वराहदेव (?)—हस्तिभोजाचा पुत्र, वाकाटकांचा मंत्री; (१०) देवसेन—वाकाटक नृपती; (११) हरिषेण—वाकाटक नृपती.

ग्रामनामे.—वल्लूर—जुन्या हैदराबाद संस्थानातील करीमनगर जिल्ह्यातील वेलूर असावे.

३१५. गोडची ताम्रपट, कत्ति अरस, वर्ष १२

जिल्हा—**कोल्हापूर** तालुका—**तोरगल**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट गोडची येथील वीरशैव मठाच्या स्वामीजवळ होता. बागलकोट येथील बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य नंदिमठ, एन्. सी. यांना १९२७ मध्ये या ताम्रपटाचा शोध लागला.

संदर्भ—(१) नंदिमठ एन्. सी., **ज. य. बॅ.**, जानेवारी १९३७, खंड ५, पृष्ठ १६५, नं. ४; **प्रबुध्द कर्नाटक** खंड २३, पृष्ठ २५, नं. १; (२) देसाई, पी. बी., **इ. आय्.**, १९४९–५०, खंड २८; पृष्ठ ५९–६२.

भाषा व लिपी.—संस्कृत, इ. स. च्या ६ व्या शतकात कन्नड प्रदेशात प्रचलित असलेली दाक्षिणात्य वळणाची लिपी.

राजवंश व राजा.—नृपती कत्ति अरस (बदामीचा चालुक्य कीर्तिवर्मन्‌थम (प्रथम) असावा.)

वर्ष व तिथी.—कार्तिक १५, १२ वे शासन वर्ष–इ. स. ५७८.

सारांश.—प्रस्तुत लेखाच्या प्रारंभी पश्चिम चालुक्य वंशाची स्तुती केलेली असून कत्ति अरस हा रणविक्रम महाराजांचा पुत्र असल्याचे सांगितले आहे. या राजाने व्याघ्रस्वामीच्या विनंतीवरून कौंडिण्य गोत्री कृष्णस्वामी या विद्वान ब्राह्मणाला शासनाच्या १२ व्या वर्षी जमीन दान दिली. दान दिलेली जमीन पाच निवर्तने असून ती नुळगाल या खेड्यात होती.

व्यक्तिनामे.—(१) रणविक्रम—चालुक्य नृपती, पुलकेशी (प्रथम); (२) कत्ति अरस—चालुक्य नृपती कीर्तिवर्मन् (प्रथम), रणविक्रमाचा पुत्र ; (३) व्याघ्रस्वामी—दानासाठी विनंती करणारा ब्राह्मण; (४) कृष्णस्वामी—दान स्वीकारणारा कौंडिण्य गोत्री ब्राह्मण.

ग्रामनामे.—नुळगाल—ओळख पटत नाही.

३१६. गोवा ताम्रपट, सत्याश्रय ध्रुवराज इंद्रवर्मन्

गोवा राज्य

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट गोव्यामध्ये रहाणाऱ्या एका पोर्तुगीज गृहस्थाजवळ होता. तेलंग यांना या ताम्रपटाची नक्कल त्यांचा मित्र एन्. एम्. परमानन्द यांच्याकडून मिळाली.

संदर्भ.—तेलंग, के. टी., **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८७१–७४, खंड १०, पृष्ठ ३४८–३६७.

भाषा व लिपी.—संस्कृत, चालुक्य कालातील लेखांप्रमाणे दक्षिणी पद्धतीची ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—पृथवीवल्लभ महाराज व त्याचा बप्पूर वंशीय मांडलिक सत्याश्रय ध्रुवराज इंद्रवर्मन्.

वर्ष व तिथी.—माघ पौर्णिमा, शासन वर्ष २०, शके ५३२.

सारांश.—प्रस्तुत शासन पृथवीवल्लभ महाराजांच्या अमदानीतील आहे. याचा मुख्य उद्देश चार विषय मंडलाचा अधिपती असलेल्या सत्याश्रय ध्रुवराज इंद्रवर्मन् याने राजाच्या परवानगीने खेटाहारातील कारेल्लिका हे गाव गार्ग्य घराण्यातील शिवार्याला दान दिले हे नमूद करणे हा होता हे शासन किल्ल्याचा शासक विजयराजे याने तयार केले, दुर्गनाग याने लिहिले व शंकरपुत्राने कोरले.

व्यक्तिनामे.—(१) पृथवीवल्लभ—विद्वानांच्या मते हा बदामीचा कोणीतरी चालुक्य राजा असावा; (२) सत्याश्रय ध्रुवराज इंद्रवर्मन्—बप्पूर वंशीय मांडलिक राजा; (३) शिवार्य—दान स्वीकारणारा गार्ग्य गोत्री ब्राह्मण; (४) विजयराज—शासन तयार करणारा दुर्गपाल; (५) दुर्गनाग—लेख लिहिणारा; (६) शंकर—लेख कोरणाऱ्याचा पिता.

ग्रामनामे.—(१) खेटाहार—रत्नागिरी जिल्ह्यातील सध्याचे खेड; (२) रेवतीद्वीप—रत्नागिरी जिल्ह्यातील रेड्डी ; (३) कारेल्लिका—ओळख पटत नाही.

३१७. गोवा ताम्रपट, भोज पृथिवीमल्लवर्मन्

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट गोव्यामध्ये मिळाला.

संदर्भ.—(१) गै, जी. एस्., **इ. आय्.**, १९५९–६०, खंड ३३, पृ. ६१–६३, (भाग-अ); (२) गुणे, टी. व्ही., **ए. आर. जी.**, १९६६, नं. २.

भाषा व लिपी.—संस्कृत, दक्षिणी पद्धतीची कीलक शीर्षक लिपी.

राजवंश व राजा.—भोज नृपती पृथिवीमल्लवर्मन्.

वर्ष व तिथी.—ज्येष्ठ शुक्ल १३, १ ले शासन वर्ष. लिपीच्या आधारे अंदाजे इ. स. चे ६ वे किंवा ७ वे शतक.

सारांश.—या शासनाचा मुख्य उद्देश कुपल(प)कटाहार देशातील भागलपल्लिका खेड्यातील शेत अग्निवेश्य गोत्री माधवार्य याला दान दिले हे नमूद करणे हा होता. हे शासन भारद्वाज गोत्री देवशर्माचार्य याने लिहिले.

व्यक्तिनामे.—(२) पृथिवीमल्लवर्मन्—भोज राजा; (२) चेतसादेवी—पृथिवीमल्लवर्म्याची माता; (३) शत्रुदमन—पृथिवीमल्लवर्म्याचा भाऊ; (४) नेल्लिक; (५) देवशर्माचार्य–शासनाचा लेखक; (६) माधवार्य—दान स्वीकारणारा अग्निवेश्य गोत्री ब्राह्मण.

ग्रामनामे.—(१) वृषभिणिखेट—ओळख पटत नाही; (२) कुपला (प) कटाहार—ओळख पटत नाही; (३) भागलपल्लिका—ओळख पटत नाही.

३१८. गोवा ताम्रपट, भोज पृथिवीमल्लवर्मन्

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट गोव्यात कुठेतरी मिळाला.

संदर्भ.—गाय, **इ. आय्.**, १९५९–६०, खंड ३३, पृ. ६३–६४ (भाग ब).

भाषा व लिपी.—संस्कृत, दक्षिणी पद्धतीची कीलकशीर्षक लिपी.

राजवंश व राजा.—भोज नृपती पृथिवीमल्लवर्मन्.

वर्ष व तिथी.—श्रावण शुक्ल १५, २५ वे शासन वर्ष.

सारांश.—प्रस्तुत शासन पृथिवीपर्वत येथील विजयी तळावरून दिलेले आहे. याचा उद्देश कुपलाकट देशातील मलार गावातील कपोतिखज्जन नामक शेत राजाने भारद्वाज गोत्री (अग्निवेश्य) दामार्य याला दान दिले हे नमूद करणे हा होता. हे शासन कंबोज गोत्री बुद्धदास याने लिहिले.

व्यक्तिनामे.—(१) पृथिवीमल्लवर्मन्—भोज राजा; (२) दामार्य—दान घेणारा, भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (३) बुद्धदास—लेखक; (४) निधिवर—शासन अमलात आणणारा आज्ञप्ति (Executor).

ग्रामनामे.—(१) पृथिवीपर्वत—ओळख पटत नाही; (२) कुपलाकटदेश—ओळख पटत नाही; (३) मलार—ओळख पटत नाही.

३१९. गोवा ताम्रपट, जयकेशी (प्रथम)

प्राप्तिस्थळ.—मूळ ताम्रपट इ. स. १७२७ मध्ये लिस्बन येथे पाठविण्यात आला. या ताम्रपटाचे पोर्तुगीज भाषांतर पणजी येथील गोवा अर्काइव्हज्‌मध्ये आहे. या ताम्रपटाची नागरी लिपीतील नक्कल श्री. वाघ यांच्याकडे मिळाली.

संदर्भ.—(१) पिसुर्लेकर, **ओ. पी. पी.**, २२, पृ. ३८७–९१; (२) **द. म. इ. सा.** (उल्लेख आहे), खंड ४, पृ. ९९; (३) गुणे, टी. व्ही., **ए. आर. जी.**, १९६६, नं. ११.

भाषा व लिपी.—संस्कृत, नागरी.

राजवंश व राजा.—कदंब नृपती जयकेशी (प्रथम).

वर्ष व तिथी.—शके ९७५, इ. स. १०५३.

सारांश.—प्रस्तुत शासन गोव्याचा कदंब राजा जयकेशी (पहिला) याच्या अमदानीतील आहे. या शासनात छदम नामक अरब व्यक्तीला गोपक द्वीपात मशीद बांधणे व मशिदीची व्यवस्था ठेवण्यासाठी दिलेल्या सवलतींचा उल्लेख केलेला आहे. याशिवाय अरबाने कदंब राजा षष्ठ याचे प्राण वाचविल्याचाही उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—(१) जयकेशी (प्रथम)—कदंब राजा; (२) छदम—अरब व्यापारी; (३) षष्ठ—कदंब राजा; (४) आलिया—छदमाचा पिता; (५) मधुमद—छदमाचा आजा.

ग्रामनामे.—(१) गोपक द्वीप—गोवा; (२) चेमुल्य—हल्लीचे चौल असावे.

३२०. गोवा शिलालेख, कदंब जयकेशी (प्रथम)

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख जुन्या गोव्यातील फ्रॅन्सिस ऑफ अस्सिसि यांच्या आश्रमातील प्रांगणात मिळाला.

संदर्भ.—रमेश, के. व्ही., **इ. आय्.**, १९६८, खंड ३७, भाग ६, पृ. २८४–२८७.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—कदंब जयकेशिन् (प्रथम).

वर्ष व तिथी.—शके ९७(६), वैशाख शुद्ध प्रतिपदा, सोमवार, २५ एप्रिल, इ. स. १०५४.

सारांश.—या शिलालेखात जयकेशिन् (प्रथम) याचा उल्लेख बीरवर्मदेव (वीरवर्मदेव) असा आला आहे. याचा मंत्री अणय्य हा अत्यंत मुत्सद्दी व धोरणी असून जयकेशीचा उजवा हात आहे. त्याने अनेक लढाया जिंकल्या आहेत. तो पंजणखणी येथील धर्ममंत्री होता. त्याने चंद्रापूर जिंकले.

व्यक्तिनामे.—(१) वीरवर्मदेव—कदंब नृपती जयकेशिन् (प्रथम); (२) अणय्य—जयकेशिन् (प्रथम) चा धर्ममंत्री; (३) अणल्लदेव—अणयने जिंकलेला राजा; (४) अरकय्य—अणय्य यांचा वरिष्ठ अधिकारी.

ग्रामनामे.—(१) पंजणखणी—हल्लीचे पणजी, गोव्याची राजधानी; (२) चंद्रापूर—हल्लीचे चांदोर, तालुका मडगाव.

विशेष महत्त्व.—अणयच्या धर्ममंत्री या अधिकारावरून अशोककालीन धर्ममहामात्र आठवतात

३२१. गोवा शिलालेख, त्रिभुवनमल्लदेव

प्राप्तिस्थळ.—हा लेख गोव्यात कोठेतरी सापडला. या लेखाचे पोर्तुगीज भाषांतर इ. स. १७३१ मध्ये लिस्बन येथे पाठविण्यात आले.

संदर्भ.—(१) पिसुर्लेकर, **ओ. पी. पी.**, २२, पृ. ४००–४०४; (२) गुणे, टी. व्ही., **ए. आर्. जी.**, १९६६, नं. १४.

भाषा व लिपी.—संस्कृत, नागरी.

राजवंश व राजा.—कदंब राजा त्रिभुवनमल्लदेव.

वर्ष व तिथी.—शके १०२१, इ. स. १०९९.

सारांश.—या लेखात पिरोलच्या नागेश्वराला १० निष्क दान दिल्याचे नमूद केले आहे. नाग देवार्य याने या दानाचा स्वीकार केला.

व्यक्तिनामे.—(१) त्रिभुवनमल्लदेव—कदंब राजा ; (२) नाग देवार्य—दान स्वीकारणारा.

ग्रामनामे.—(१) अंत्रुज—हल्लीचे फोंडा ; (२) पिरोल.

३२२. गोवा ताम्रपट, कदंब शिवचित्त षष्ठ (दुसरा) व त्याचा शालक कामदेव

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट गोव्यामध्ये कोठेतरी सापडला. हल्ली हा ताम्रपट मुंबईच्या बॉ. ब्रँ. रॉ. ए. सो. च्या ग्रंथालयात आहे.

संदर्भ.—(१) फ्लिट, **इं. अँ.**, १८८५, खंड १४, पृ. २८८–२८९; (२) गुणे टी. व्ही., **ए. आर. जी.**, १९६६, नं. १६.

भाषा व लिपी.—संस्कृत, नागरी.

राजवंश व राजा.—कदंब राजा षष्ठदेव (द्वितीय) व त्याचा मेव्हणा कामदेव.

वर्ष व तिथी.—कलियुग ४३४८, शासन वर्ष ५, शके ११७२ (७३), साधारण संवत्सर, बुधवार अश्विन वद्य १.

सारांश.—या शासनात राजाने, गुरु, राजगुरु व दीक्षित ज्येष्ठ गार्ग्य गोत्री विष्णुशर्मन् याला भातशेती दान दिल्याचे नमूद केले आहे. हे शासन सोमनाथपुत्र चटचणार्य याने तयार केले.

व्यक्तिनामे.—(१) गूहल्ल—कदंब राजा ; (२) षष्ठदेव (प्रथम)—कदंब नृपती ; (३) जयकेशिन् (प्रथम)—कदंब नृपती, षष्ठदेव (प्रथम) चा पुत्र ; (४) विजयार्क—कदंब नृपती, जयकेशिन् (प्रथम) चा पुत्र ; (५) जयकेशिन् (द्वितीय) —कदंब नृपती, विजयार्काचा पुत्र ; (६) मैलल महादेवी—जयकेशिन् (द्वितीय) ची पत्नी, चालुक्य राजकन्या ; (७) पेर्माडि-देव—चालुक्य नृपती, मैलल महादेवीचा पिता ; (८) पेर्माडि—जयकेशिन् (द्वितीय) चा पुत्र ; (९) विजय—कदंब नृपती, जयकेशिन् (द्वितीय) चा पुत्र ; (१०) जयकेशिन् (तृतीय)—कदंब नृपती विजयचा पुत्र ; (११) महादेवी—जयकेशिन् (तृतीय) ची पत्नी ; (१२) त्रिभुवनमल्ल—कदंब नृपती, जयकेशिन् (तृतीय) चा पुत्र ; (१३) माणिकदेवी—त्रिभुवनमल्लाची पत्नी ; (१४) षष्ठदेव (द्वितीय)—त्रिभुवनमल्लाचा पुत्र शिवचित्त, कदंब नृपती ; (१५) कामदेव किंवा कावण—षष्ठदेव (द्वितीय) चा मेव्हणा ; (१६) लक्ष्मीदेव—कामदेवाचा पिता ; (१७) लक्ष्मी—कामदेवाची माता ; (१८) चटचणार्य—शासन तयार करणारा; (१९) सोमनाथ—चटचणार्याचा पिता ; (२०) नारायण—शासनाचा लेखक ; (२१) दुर्गण-नारायणाचा पिता ; (२२) ज्येष्ठ विष्णुशर्मन्—दान स्वीकारणारा गार्ग्य गोत्री ब्राह्मण, राजगुरु

ग्रामनामे.—(१) शालीभट्टी—हल्लीचे बेतीम ; (२) गोपकपुरी.

३२३. गोवा म्युझियम शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख गोवा येथे म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—(१) हेरास, **ज.गो.हि.सो.**, १९३१, खंड ४, पृ. १७९; (२) गुणे, टी.व्ही., **ए.आर्.जी.**, १९६६, नं. २०.

भाषा व लिपी.—हाळे कन्नड.

राजवंश व राजा.—महामंडलेश्वर वीरवर्मन् (वंशाचा उल्लेख नाही).

वर्ष व तिथी.––वर्ष व तिथी दिलेला भाग झिजला आहे. सोमवार, जय‥‥शक संवत् असे काही शब्द वाचता येतात. फादर हेरासच्या मते हा लेख इ. स. १२५४ किंवा १३५४ मधील असावा.

सारांश.––हा लेख असलेली शिळा महामंडलेश्वर वीरवर्मन् याच्या स्मृतिप्रीत्यर्थ बसविण्यात आली असा उल्लेख या लेखात आहे.

व्यक्तिनामे.––वीरवर्मन्––महामंडलेश्वर.

३२४. चम्मक ताम्रपट, वाकाटक प्रवरसेन (द्वितीय)

जिल्हा––**अमरावती** तालुका––**अचलपूर**

प्राप्तिस्थळ.––हा ताम्रपट १८६८ साली चम्मक येथे शेत नांगरत असताना सापडला.

संदर्भ.––(१) बर्जेस व इंद्रजी, **अ.स.वे.इं.**, १८७९, पृ. ५४, नं. ९; (२) बुल्हर व बर्जेस, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ११६; (३) फ्लिट, **कॉ.इं.इं.**, खंड ३, पृ. २३५–२४३; (४) मिराशी, वा. वि., **कॉ.इं.इं.**, १९६३, खंड ५, पृ. २२–२७.

भाषा व लिपी.––संस्कृत; दक्षिणेकडील पेटिकाशीर्षक प्रकारची लिपी.

राजवंश व राजा.––वाकाटक नृपती प्रवरसेन (द्वितीय).

वर्ष व तिथी.––शासन वर्ष १८, ज्येष्ठ शुक्ल त्रयोदशी.

सारांश.––प्रस्तुत लेखाचा उद्देश द्वितीय प्रवरसेनाने भोजकट विभागातील मधुनदीच्या तीरावरील चर्मांक नामक ग्राम हजार ब्राह्मणांना दान दिले, हे नमूद करण्याचा होता. या गावाचा विस्तार राजमानाने आठ हजार निवर्तने इतका होता. हे दान शत्रुघ्न राजाचा पुत्र कोंडराज याच्या विनंतीवरून केले होते. चित्रवर्मा हा यावेळी सेनापती होता.

व्यक्तिनामे.––(१) प्रवरसेन (द्वितीय)––दान देणारा वाकाटक नृपती; (२) प्रभावती गुप्ता––प्रवरसेन (द्वितीय) ची माता; (३) देवगुप्त (चंद्रगुप्त द्वितीय)––प्रभावती गुप्ताचा पिता, गुप्त सम्राट; (४) रुद्रसेन (द्वितीय)––वाकाटक नृपती, प्रवरसेन (द्वितीय) चा पिता, पृथिवीसेनाचा पुत्र; (५) प्रवरसेन (प्रथम)––वाकाटक नृपती; (६) गौतमीपुत्र––वाकाटक नृपती, प्रवरसेन (प्रथम) चा पुत्र; (७) रुद्रसेन (प्रथम)––वाकाटक नृपती, गौतमीपुत्राचा पुत्र; (८) भवनाग भारशिव––रुद्रसेन (प्रथम) चा मातामह; (९) पृथिवीसेन––वाकाटक नृपती, रुद्रसेन (प्रथम) चा पुत्र; (१०) कोंडराज––दानासाठी विनंती करणारा; (११) शत्रुघ्नराज––कोंडराजाचा पिता; (१२) गणार्य––दान स्वीकारणारा शाट्यायन गोत्री ब्राह्मण; (१३) देवार्य––दान स्वीकारणारा वात्स्य गोत्री ब्राह्मण; (१४) कुमारशर्मार्य––दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (१५) मातृशर्मन्––दान स्वीकारणारा कौंडिण्य गोत्री ब्राह्मण; (१६) वरशर्मन्––दान स्वीकारणारा कौंडिण्य गोत्री ब्राह्मण; (१७) गोंडशर्मन्––दान स्वीकारणारा कौंडिण्य गोत्री ब्राह्मण; (१८) नागशर्मन्––दान स्वीकारणारा कौंडिण्य गोत्री ब्राह्मण; (१९) शांतिशर्मन्––दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (२०) रुद्रशर्मन्––दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (२१) भोजकदेवार्य––दान स्वीकारणारा वत्स्य गोत्री ब्राह्मण; (२२) मघशर्मन्––दान स्वीकारणारा वत्स्य गोत्री ब्राह्मण; (२३) देवशर्मन्––दान स्वीकारणारा वत्स्य गोत्री ब्राह्मण; (२४) मोक्षशर्मन्––दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (२५) नागशर्मन्––दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (२६) रेवतीशर्मन्––दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (२७) धर्मार्य––दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (२८) शर्मार्य––दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (२९) नंदनार्य––दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण;

(३०) मूलशर्मन्—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (३१) ईश्वरशर्मन्—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (३२) वरशर्मन्—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (३३) स्कंदार्य—दान स्वीकारणारा वात्स्य गोत्री ब्राह्मण; (३४) बप्पार्य—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (३५) स्कंदार्य—दान स्वीकारणारा आत्रेय गोत्री ब्राह्मण; (३६) सोमशर्मार्य—दान स्वीकारणारा गौतम गोत्री ब्राह्मण; (३७) भर्तृशर्मार्य—दान स्वीकारणारा गौतम गोत्री ब्राह्मण; (३८) रुद्रशर्मार्य—दान स्वीकारणारा गौतम गोत्री ब्राह्मण; (३९) मघार्य—दान स्वीकारणारा गौतम गोत्री ब्राह्मण; (४०) मातृशर्मार्य—दान स्वीकारणारा गौतम गोत्री ब्राह्मण; (४१) ईश्वरशर्मार्य—दान स्वीकारणारा गौतम गोत्री ब्राह्मण; (४२) देवशर्मार्य—दान स्वीकारणारा कौंडिण्य गोत्री ब्राह्मण; (४३) वरशर्मार्य—दान स्वीकारणारा कौंडिण्य गोत्री ब्राह्मण; (४४) रोहार्य—दान स्वीकारणारा कौंडिण्य गोत्री ब्राह्मण; (४५) स्वामिदेवार्य—दान स्वीकारणारा गौतम गोत्री ब्राह्मण; (४६) रेवतीशर्मार्य—दान स्वीकारणारा गौतम गोत्री ब्राह्मण; (४७) ज्येष्ठशर्मार्य—दान स्वीकारणारा गौतम गोत्री ब्राह्मण; (४८) कुमारशर्मार्य—दान स्वीकारणारा शांडिल्य गोत्री ब्राह्मण; (४९) स्वातिशर्मार्य—दान स्वीकारणारा शांडिल्य गोत्री ब्राह्मण; (५०) कोंडार्य—दान स्वीकारणारा शाटचायन गोत्री ब्राह्मण; (५१) गुहशर्मन—दान स्वीकारणारा पाराशर्य गोत्री ब्राह्मण; (५२) देवार्य—दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण; (५३) महेश्वर—दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण; (५४) मातार्य—दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण; (५५) रुद्रार्य—दान स्वीकारणारा कौंडिण्य गोत्री ब्राह्मण; (५७) हरिशर्मार्य—दान स्वीकारणारा कौंडिण्य गोत्री ब्राह्मण; (५८) चित्रवर्मन्—सेनापती.

ग्रामनामे.—(१) प्रवरपूर—वर्ध्यापासून ६ मैलांवरील हल्लीचे पवनार; (२) चर्मांक—जेथे ताम्रपट सापडला ते चम्मक; (३) भोजकट—भातकुली नावाचे अमरावतीपासून ८ मैलांवर असलेले खेडे.

३२५. चारठाणे शिलालेख

जिल्हा—**परभणी** तालुका—**जिंतूर**

प्राप्तिस्थळ.—हा लेख चारठाणे येथील नरसिंह तीर्थाजवळ असलेल्या हेमाडपंती मंदिरातील एका स्तंभावर कोरलेला आहे.

संदर्भ.—तुळपुळे, शं. गो., **प्रा.म.को.ले.**, १९६३, पृ. ३७९–३८०, नं. ७५.

भाषा व लिपी.—मराठी; देवनागरी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—दुंदुभि संवत्सर. भाषा व लिपीच्या आधारे हा लेख इ. स. च्या १३ व्या शतकातील असावा असे दिसते. दुंदुभी संवत्सर हे शके ११२४ व ११८४ या दोन वर्षी होते. श्री. तुळपुळचांच्या मतानुसार हा लेख शके ११२४ मधील असावा. हा काल मान्य केल्यास या लेखाचे इ. स. प्रमाणे वर्ष इ. स. १२०२ येते.

सारांश.—हा लेख अतिशय त्रोटक असल्यामुळे त्याचा अर्थ स्पष्ट व्यक्त होत नाही.

३२६. चांजें शिलालेख, शिलाहार अपरादित्य

जिल्हा—**कुलाबा** तालुका—**उरण**

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेला शिलाखंड चांजें येथे मिळाला. सध्या हा शिलालेख प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, मुंबई येथे आहे.

संदर्भ.—सांकलिया व उपाध्याय, **इ.आय्.**, १९३५–३६, खंड २३, पृ. २७०–२७२.

भाषा व लिपी.—अशुद्ध संस्कृत; देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती अपरादित्यदेव.

वर्ष व तिथी.—शके १०६०, माघ शुद्ध प्रतिपदा, गुरुवार, १३ जानेवारी, ११३९.

सारांश.—हा लेख शिलाहार नृपती अपरादित्यदेव याच्या कालातील आहे. या लेखाचा उद्देश राजमाता लीलादेवी हिच्या कल्याणार्थ नागम या खेड्यातील आंबराई श्रीधर याला दान दिली, तसेच नृपती अपरादित्य याने चडिज येथील काही जमीन सूर्यग्रहणाच्या दिवशी दान दिली हे नमूद करण्याचा होता.

व्यक्तिनामे.—(१) अपरादित्यदेव—शिलाहार नृपती; (२) लीलादेवी—अपरादित्यदेवाची माता; (३) सोढनायकु—महामात्य; (४) लक्ष्मणैयप्रभु—महाप्रधान; (५) श्रीधर—क्रम जाणणारा, दान स्वीकारणारा ब्राह्मण.

ग्रामनामे.—(१) नागम—उरणच्या नैर्ऋत्येस २ मैलांवरील नागाव; (२) चडिज—उरणच्या पश्चिमेस २ मैलांवरील चांजें.

३२७. चांजें शिलालेख, शिलाहार सोमेश्वर

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख उरणजवळ चांजें या गावी मिळाला. सध्या हा शिलालेख मुंबई येथे प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—(१) सांकलिया व उपाध्याय, **इ. आय्.**, १९३५–३६, खंड २३, पृ. २७९–२८१; (२) तुळपुळे, शं. गो., **प्रा.म.को.ले.**, १९६३, पृ. १६१–१६४, नं. ३३.

भाषा व लिपी.—संस्कृत-मराठी मिश्र; देवनागरी.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती सोमेश्वरदेव.

वर्ष व तिथी.—शके ११८२, रौद्र संवत्सर, चैत्र वदि १५, सोमवार, सूर्यग्रहण; सोमवार, एप्रिल १२, इ. स. १२६०.

सारांश.—प्रस्तुत लेखात कोकणाधिपती सोमेश्वरदेव याने उरण विभागातील चांडिजे गावातील कोंथलेवाडीपैकी भूमी व १६२ पोरुत्थ द्राम सूर्यग्रहणप्रसंगी श्रीस्थानक येथील उत्तरेश्वर देवाप्रीत्यर्थ दान दिले हे जाहीर केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) सोमेश्वरदेवराय—शिलाहार नृपती; (२) झांपडप्रभु—महामात्य; (३) माइनाकु—महासांधिविग्रहिक; (४) बेबलप्रभु—मंत्री; (५) पोमदेपंडित—मंत्री; (६) गोवेंनाकु—कोशाध्यक्ष; (७) सानु ठाकुर—जमीन मालक; (८) विण्णुकान्ह—जमीन मालक.

ग्रामनामे.—(१) उरुण—हल्लीचे उरण; (२) श्रीस्थानक—हल्लीचे ठाणे; (३) चांडिजे—हल्लीचे चांजे; (४) कोंथले—उरणच्या उत्तरेस असलेले कलधोंड.

३२८. चिकुर्डे ताम्रपट, चालुक्य जनमेजय

जिल्हा—**सांगली**

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत ताम्रपट चिकुर्डे खेड्यात एका धनगर स्त्रीजवळ होता. श्री. वि. का. राजवाडे यांना हा ताम्रपट श्री. अप्पासाहेब देशपांडे चिकुर्डेकर यांच्यामार्फत पहावयास दोन दिवसांसाठी मिळाला.

संदर्भ.—(१) राजवाडे वि. का. **विश्ववृत्त**, वर्ष १, भाग १०, पृ. १–३४. जानेवारी १९०७; (२) गुणे, पां. दा., **भा.इ.सं.मं.**, ६ वे संमेलनवृत्त ,पृ. ३२–३४; **विविध ज्ञानविस्तार**, ५३, ४५६; (३) तुळपुळे. शं. गो. **पुणे विद्यापीठ नियतकालिक** (हयुमॅ), नं. ७, पृ. १–१३; **प्रा. म. को. ले.**, १९६३, नं. ६१, पृ. ३१९–३२६.

भाषा व लिपी.—संस्कृत व मराठी संमिश्र; देवनागरी.

राजवंश व राजा.—पांडव कुलातील सोमवंशी नृपती चक्रवर्ती जनमेजय (चालुक्य वंश).

वर्ष व तिथी.—वैशाख, कृष्ण पक्ष, भाव संवत्सर, सोमवार, अष्टमी, अंदाजे शके १०७६, इ.स. ११५४.

सारांश.—हा लेख चालुक्य नृपती जनमेजय याच्या कारकीर्दीतील आहे. चक्रवर्ती जनमेजयाने दक्षिणेकडे विजय संपादन केल्यानंतर आपल्या करहाट कंबलेश्वरदेव येथील तळावरून करहाट ४५०० विभागातील बलियवाड व चिकलवाड या गावांची मूळ जमीन करमुक्त करून राम गावुंडा याला दिली असा उल्लेख आहे. नंतर कोणकोणत्या जमिनी व वस्तू दानादाखल दिल्या याचा तपशील दिलेला आहे. त्याचप्रमाणे कोणाची किती जमीन आहे याचाही तपशील दिलेला आहे. या खेड्यांच्या सीमामर्यादाही सांगितल्या आहेत.

व्यक्तिनामे.—(१) जनमेजय—चालुक्य नृपती; (२) परीक्षिसतानीक—जनमेजयाचा पिता; (३) रामगावुंडा—दान घेणारा.

ग्रामनामे.—(१) करहाट—ओळख पटत नाही. (२) बलियवाड—ओळख पटत नाही; (३) देवुलग्राम—ओळख पटत नाही; (४) स्ताणपग्राम—ओळख पटत नाही; (५) आमलकग्राम—ओळख पटत नाही; (६) चिकलवाड—हल्लीचे चिकुर्डे; (७) आयितग्राम—सध्याचे आयतवडे.

३२९. चिपळूण ताम्रपट, चालुक्य नृपती सत्याश्रय पुलकेशिन्

जिल्हा—**रत्नागिरी** तालुका—**चिपळूण**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट चिपळूण येथील शेतकऱ्याकडून मिळविला. सध्या हा ताम्रपट मुंबई येथील रॉयल एशियाटिक सोसायटी वाचनालयाच्या ऑफिसमध्ये आहे.

संदर्भ.—फ्लिट, इ. **आय्.**, १८९४–९५, खंड ३, पृ. ५०–५३.

भाषा व लिपी.—संस्कृत; दाक्षिणात्य प्रकारची लिपी.

राजवंश व राजा.—बदामीचा चालुक्य नृपती सत्याश्रय (पुलकेशी द्वितीय).

वर्ष व तिथी.— तिथी दिलेली नाही. अंदाजे हा ताम्रपट इ. स. ६०९ ते ६४२ यामधल्या काळातील असावा.

सारांश.—हा ताम्रपट पश्चिमी चालुक्य नृपती सत्याश्रय पुलकेशी (द्वितीय) याच्या अमदानीतील असून याचा उद्देश पुलकेशीचा मामा सेंद्रक श्रीवल्लभ सेनानंदराज याने आत्रेय गोत्री कृष्णस्वामी याचा पुत्र ब्राह्मण महेश्वर याला अवरेटिका विषयातील आम्रवटवक आणि वारुवेन्ना नदी तीरावरील अवंचपली खेड्यातील २० भाग दान दिले हे नमूद करण्याचा आहे.

व्यक्तिनामे.—(१) कीर्तिवर्मन् (प्रथम) चालुक्य नृपती; (२) सत्याश्रय पुलकेशी; (द्वितीय) चालुक्य नृपती कीर्तिवर्मन्, (प्रथम) चा पुत्र; (३) श्रीवल्लभ सेनानंदराज— सेंद्रक कुलातील, सत्याश्रयाचा मामा; (४) महेश्वर—दान स्वीकारणारा आत्रेय गोत्री ब्राह्मण; (५) कृष्णस्वामी—महेश्वराचा पिता.

ग्रामनामे.—(१) आम्रवटवक—ओळख पटत नाही; (२) अवंचपली—ओळख पटत नाही.

३३०. चिपळूण शिलालेख, मल्लिकार्जुन

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत लेख असलेला स्तंभावशेष इ. स. १८८० मध्ये चिपळूण येथील एका घरात मिळाला. हल्ली हा लेख मुंबई येथील प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—(१) **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, खंड १४, पृ. ३५; (२) **बॉ. गॅ.** खंड १, भाग २, पृ. २०, नोंद १; (३) अळतेकर **आय. सी.**, खंड २, पृ. ४१५; (४) दीक्षित, मो. गं., **ज. बॉ. यु.**, खंड १३, भाग १, पृ. ६०–६४; (५) मास्टर, ए. **बु. स्कू. ओ. अ. स्ट.**, खंड २०, पृ. ४२६; (६) तुळपुळे, शं. गो. **प्रा. म. को. ले.**, १९६३ नं. १०, ५३–५८.

भाषा व लिपी.—संमिश्र संस्कृत व मराठी, इ. स. ११ व्या, १२ व्या शतकातील देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—शिलाहार महामंडलेश्वर मल्लिकार्जुन.

वर्ष व तिथी.—वैशाख शुद्ध अक्षय तृतीया, युगादि पर्व, भौमवार, मृगशीर्ष नक्षत्र, शके १०७८, धाता संवत्सर, २४ एप्रिल, इ. स. ११५६.

सारांश.—शके १०७८ मध्ये महामंडलेश्वराधिपती मल्लिकार्जुन शासन करीत असताना नारण नायक प्रभु व लक्ष्मणैप्रभुसुत अनंतुगि हे अनुक्रमे महाप्रधान व महासांधिविग्रहिक असताना गंगाखेड येथे लखुमादेवी व तिलमांडेश्वर यांच्या मूर्तीची स्थापना झाल्याचा उल्लेख या शिलालेखात केलेला आहे. यावेळी प्रणालक देशाच्या संरक्षणासाठी सूपया याची दंडाधिपती म्हणून नेमणूक झाली होती.

व्यक्तिनामे.—(१) मल्लिकार्जुन—शिलाहार नृपती, महामंडलेश्वराधिपती; (२) नारण नायक—महाप्रधान; (३) अनंतुगिप्रभु—महासांधिविग्रहिक; (४) लक्ष्मणैप्रभु—अनंतुगि प्रभुचा पिता; (५) सूपया—प्रनालक देशाचा दंडाधिपती; (६) परशराम प्रभु—साहाय्यक श्रीकरण (मंत्रिमंडळातील); (७) वेतपै प्रभु—परशराम प्रभूचा पिता; (८) अनंतुगि(?) प्रभु—साहाय्यक श्रीकरण; (९) तारुपै प्रभु—अनंतुगि(?) प्रभूचा पिता; (१०) च्छितुमै प्रभु—साहाय्यक श्रीकरण; (११) जोइपै प्रभु—च्छितुमै प्रभूचा पिता.

ग्रामनामे.—(१) प्रनालक देश किंवा पनला—(।) हल्लीचे पनवेल असावे, (तुळपुळे), (।।) कोल्हापूरजवळील पन्हाळचाचा प्रदेश (मो. ग. दीक्षित); (२) गंगाखेड—नक्की ओळख पटत नाही; कोकणातील गंगाकुंड किंवा गंगापुरी असावे.

३३१. चिंचनी ताम्रपट, राष्ट्रकूट इंद्र (तृतीय), शके ८४८

जिल्हा—**ठाणे** तालुका—**डहाणू**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट चिंचनी येथे एका शेतकऱ्याला शेत नांगरीत असताना मिळाला. सध्या हा ताम्रपट मुंबई येथे डायरेक्टर ऑफ अर्काइव्हजच्या ऑफिसमध्ये आहे.

संदर्भ.—सरकार, डी. सी. **इ. आय्.**, १९५७–५८, खंड ३२, पृ. ४५–५५.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. १० व्या शतकातील उत्तरेकडील लिपीप्रमाणे.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती इंद्र (तृतीय).

वर्ष व तिथी—वैशाख शुद्ध ३, अक्षय तृतीया, सोमवार, व्यय संवत्सर, शके ८४८; १७ एप्रिल इ. स. ९२६.

सारांश.—प्रस्तुत लेख राष्ट्रकूट नृपती इंद्र (तृतीय) याच्या अमदानीतील आहे. लेखाच्या प्रारंभी प्रस्तावनेनंतर राष्ट्रकूट नृपती गोविंदराज (प्रथम) पासून वंशावळ दिलेली आहे. इंद्र (तृतीय) चा मांडलिक राजा ताजिक जातीचा (अरब) मधुमति याला कृष्णराज याने संयान हे पूर्ण मंडल दिले असल्याचाही उल्लेख या ताम्रपटात आहे. मधुमति सुगतिप याचा मंत्री पुव्वैय, त्याचा मित्र भारद्वाज गोत्री नारायणभट्ट याचा पुत्र व नित्यवर्ष (इंद्र तृतीय) याचा नोकर अन्नैय यांनी मठिका बांधली. अन्नैय याच्या विनंतीवरून मधुमति सुगतिप याने इंद्र नृपतीची परवानगी घेऊन संयान मंडलातील कोलिमहार विषयातील देवीहार खेड्यातील अर्धा धुर जमीन व संयान मंडलातील काणाडुक खेडे दशमी देवीला नैवेद्य व पंचगौडीय महापरिषदेशी संबद्ध ९ व्यक्तींना भोजन देण्यासाठी दान दिल्याचा उल्लेख या ताम्रपटात आहे. ही दशमी देवी मठिकेतील असावी.

व्यक्तिनामे.—(१) गोविंदराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती; (२) कक्कराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, गोविंदराज (प्रथम) चा पुत्र; (३) इंद्र (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, कक्कराज (प्रथम) चा पुत्र; (४) दंतिदुर्ग (दंतिवर्मन् द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, इंद्रराज (द्वितीय) चा पुत्र; (५) कृष्णराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, इंद्र (द्वितीय) चा धाकटा भाऊ; (६) गोविंदराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, कृष्णराज (प्रथम) चा पुत्र; (७) ध्रुवराज—राष्ट्रकूट नृपती, गोविंदराज (द्वितीय) चा धाकटा भाऊ; (८) जगत्तुंग (गोविंद तृतीय)—राष्ट्रकूट नृपती, ध्रुवराजाचा पुत्र; (९) अमोघवर्ष (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, जगत्तुंगाचा पुत्र; (१०) कृष्णराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, अमोघवर्ष (प्रथम) चा पुत्र; (११) जगत्तुंग (द्वितीय)—राष्ट्रकूट कृष्णराज (द्वितीय) चा पुत्र; (१२) इंद्रराज (तृतीय)—राष्ट्रकूट नृपती, जगत्तुंग (द्वितीय) चा पुत्र, कृष्णराज (द्वितीय) चा वारस, नित्यवर्ष; (१३) मधुमति सुगतिप—ताजिक (अरब) जातीचा नृपती; (१४) सहियारहार (हियारहार किंवा यारहार)—मधुमति सुगतिप याचा पिता; (१५) पुव्वैय—मधुमति सुगतिप याचा मंत्री; (१६) अन्नैय (अन्नमैय)—दानासाठी विनंती करणारा पुव्वैय याचा मित्र; (१७) नारायणभट्ट—अन्नमैय याचा पिता, भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (१८) वासुदेव—अन्नमैय याचा पितामह; (१९) रेवण—देऊळ बांधण्याच्या कामी अन्नमैय याचा सहकारी; (२०) कौतुक—देऊळ बांधण्याच्या कामी अन्नमैय याचा सहकारी; (२१) सुगत—लेख लिहिणारा; (२२) अजित—सुगताचा पिता, ध्रुवराजाच्याकालीन सांधिविग्रहिक; (२३) वार्थैय—लेखाला अनुमती देणारा.

ग्रामनामे.—(१) संयान—आधुनिक संजान ठाणे जिल्हा; (२) काणाडुक—दान दिलेले खेडे; (३) कोलिमहार—संजानच्या उत्तरेस १५ मैलांवरील कोलइ(?); (४) सेंबक—काणाडुकच्या दक्षिणेस असलेले गाव, ओळख पटत नाही; (५) कल्लग्राम—काणाडुकच्या जवळील गाव, ओळख पटत नाही; (६) देवीहार—ओळख पटत नाही; (७) हिंगुवार—ओळख पटत नाही. (८) चवशा— ओळख पटत नाही; (९) वाघवास— ओळख पटत नाही; (१०) चिनानु—ओळख पटत नाही.

* **विशेष**—या लेखात अनेक करांचा व हक्कांचा उल्लेख आहे.

३३२. चिचनी ताम्रपट, राष्ट्रकूट कृष्ण (तृतीय)

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत ताम्रपट चिचनी येथे एका शेतकऱ्याला शेत नांगरीत असताना मिळाला. सध्या हा लेख मुंबई येथे डायरेक्टर ऑफ अर्काइव्हजच्या ऑफिसमध्ये आहे.

संदर्भ.—सरकार, डी. सी., इ.आय्., १९५७–५८, खंड ३२, पृ. ५५–६०.

भाषा व लिपी.—संस्कृत; लिपी उत्तरेकडील इ. स. १० व्या शतकातील लिपीप्रमाणे.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती कृष्ण (तृतीय).

वर्ष व तिथी.—तिथी दिलेली नाही. अंदाजे इ. स. चे १० वे शतक.

सारांश.—हा लेख राष्ट्रकूट नृपती कृष्ण (तृतीय) याच्या अमदानीतला असून यामध्ये नेहमीप्रमाणे कृष्ण (तृतीय) पर्यंत वंशावळ दिलेली आहे. कृष्ण (तृतीय) याला शरण आलेल्या राजांची यादीही या लेखात दिलेली आहे. हा ताम्रपट जेथून दिला त्या गावाचे नाव निश्चित दिलेले नाही. कौतुक याने एक मठिका बांधल्याची नोंद या ठिकाणी केलेली आहे. ही प्रशस्ती कायस्थ अंबैप याचा पुत्र शंभुदेव याने लिहिली आहे.

व्यक्तिनामे.—(१) दंतिदुर्ग—राष्ट्रकूट नृपती; (२) कृष्णराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती; (३) गोविंदराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती; (४) निरुपम (ध्रुव)—राष्ट्रकूट नृपती; (५) जगत्तुंग (गोविंद तृतीय)—राष्ट्रकूट नृपती; (६) अमोघवर्ष (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती; (७) अकालवर्ष (कृष्ण द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, अमोघवर्ष (प्रथम) चा पुत्र; (८) इंद्रराज (तृतीय)—राष्ट्रकूट नृपती; (९) अमोघवर्ष (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती; (१०) गोविंदराज (चतुर्थ) सुवर्णवर्ष—राष्ट्रकूट नृपती; (११) अमोघवर्ष (तृतीय)—राष्ट्रकूट नृपती; (१२) कृष्णराज (तृतीय)—राष्ट्रकूट नृपती, अमोघवर्ष (तृतीय) चा पुत्र; (१३) कौतुक—अंबिकेची मठिका बांधणारा; (१४) गंभुवक—संयानचा श्रेष्ठी; (१५) शंभुदेव—लेख लिहिणारा कायस्थ; (१६) अंबैप—शंभुदेवाचा पिता; (१७) जोग्गपैय—शंभुदेवाचा पितामह.

ग्रामनामे.—(१) संयान—ठाणे जिल्ह्यातील सध्याचे संजान; (२) भिल्लमाल—जोधपूरच्या नैर्ऋत्येस १०० मैलांवर असलेले भिनमाल.

३३३. चिंचनी ताम्रपट, चामुंडराज, शके ९५६

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत ताम्रपट चिंचनी येथे एका शेतकऱ्याला शेत नांगरीत असताना मिळाला. सध्या हा लेख मुंबई येथे डायरेक्टर ऑफ अर्काइव्हजच्या ऑफिसमध्ये आहे.

संदर्भ.—सरकार, डी.सी., इ.आय्., १९५७–५८, खंड ३२, पृ. ६१–६८.

भाषा व लिपी.—संस्कृत; तत्कालीन शिलाहार नृपतीच्या लेखाप्रमाणे व इ. स. १० व्या शतकातील उत्तरेकडील लिपीप्रमाणे लिपी.

राजवंश व राजा.—उत्तर कोकणातील शिलाहार नृपती छिन्तुराज (छित्तराज) व त्याचा मांडलिक संयानचा चामुंडराज.

वर्ष व तिथी.—भाद्रपद वदि १५, भाव संवत्सर, शके ९५६ (गत वर्ष), १५ सप्टेंबर, इ. स. १०३४.

सारांश.—हा लेख शिलाहार नृपती छिंतुराज अथवा छित्तराज याच्या कारकीर्दीतला आहे. या लेखात महामात्य नागणैय व सांधिविग्रहिक नाऊपैय यांचाही उल्लेख आहे. यावेळेस चामुंडराज हा संयान विषयाचा शासक होता. या लेखाचा मुख्य उद्देश चामुंडराजाने भगवती-समोर दीप लावण्यासाठी तेलघाणी (घाणक) कौतुक मठिकेला दान दिली याची नोंद करणे हा आहे. हे दानपत्र ध्रुव याने लिहिले आहे.

व्यक्तिनामे.—(१) छिंतुराज (छित्तराज)—शिलाहार नृपती; (२) चामुंडराज—संयान पट्टनाचा शासक, छित्तराजाचा मांडलिक; (३) विज्जराणक—चामुंडराजाचा पिता; (४) ध्रुव मम्मलैय—राजकर वसूल करणारा अधिकारी, हे शासन लिहिणारा; (५) नागणैय—महामात्य; (६) नाऊपैय—महासांधिविग्रहिक; (७) अल्लिय—परकीय (अरब?) अधिकारी; (८) महर—परकीय (अरब?) अधिकारी; (९) मधुमत—परकीय (अरब?) अधिकारी; (१०) केसरिन्—संयानमधील ग्रामप्रमुख श्रेष्ठी; (११) सुवर्ण—संयानमधील ग्रामप्रमुख श्रेष्ठी; (१२) कक्कल—संयानमधील ग्रामप्रमुख श्रेष्ठी; (१३) उव—व्यापारी; (१४) सुवर्ण—व्यापारी; (१५) सोमैय—व्यापारी; (१६) वेर्थलैय—जिल्हाधिकारी; (१७) याज्ञिकर—

शालास्थान प्रमुख; (१८) क्षित—जिल्ह्यातील अधिकारी (१९) लिंबैय—जिल्ह्यातील अधिकारी; (२०) वेलैय—जिल्ह्यातील अधिकारी; (२१) केसवैय—जिल्ह्यातील अधिकारी; (२२) अगस्ति; (२३) गवी; (२४) सीलुव; (२५) भास्कर; (२६) अर्जुन; (२७) दिनकर; (२८) देदे; (२९) आर्य; (३०) सिंदूर; (३१) आदित्यवर्ण; (२२) ते (३१) महापरिषदेचे सभासद; (३२) चीहड—दान स्वीकारणारा स्वाध्यायिक; (३३) कौतुक—अंबिकेचे देऊळ (मठिका) बांधणारा

ग्रामनामे—(१) तगरपूर—उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर; (२) संयान—ठाणा जिल्ह्यातील हल्लीचे संजान

विशेष महत्त्व.—या लेखामुळे संधानपट्टनाचा शासक चामुंडराज हा शिलाहार छित्त-राजाचा मांडलिक होता हे निदर्शनास आले आहे.

३३४. चिंचनी ताम्रपट, विज्जल

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट चिंचनी येथे एका शेतकऱ्याला शेत नांगरीत असताना मिळाला. सध्या हा लेख मुंबई येथे डायरेक्टर ऑफ अर्काइव्हजच्या ऑफिसमध्ये आहे.

संदर्भ.—सरकार, डी. सी., इ. आय्., १९५७–५८, खंड ३२, पृ. ६८–७१.

भाषा व लिपी.—संस्कृत; लिपी उत्तरेकडील इ. स. १० व्या शतकातील लिपीप्रमाणे व चामुंड-राजाच्या दानपत्रातील लिपिप्रमाणे

राजवंश व राजा.—मोढवंशीय महामंडलेश्वर विज्जलदेव.

वर्ष व तिथी.—माघ संक्रांती, शके ९६९, २२ जानेवारी, इ. स. १०४८.

सारांश.—हा लेख विजयपूरहून राज्य करणाऱ्या महामंडलेश्वर विज्जलदेव याच्या अम-दानीतील आहे. या लेखाचा उद्देश कौतुक मठिकेच्या शासनाखाली असलेल्या काणाड्डुग्रामचा सिरिडिर्का कर बहुधर, कांकुअ (गृहस्थाश्रमी), महादेव व लक्ष्मीधर या विद्वानांना दान दिला हे नमूद करणे हा होता. हे दान वरिष्ठक मुम्मरक व ठक्कुर डोंबलैय यांच्या अनुमतीने व मयूखमालिन् देवतेची पूजा करून दिलेले आहे. हे दानपत्र कायम स्वरूपाचे असून ते लिंबादित्य याने लिहिलेले आहे.

व्यक्तिनामे—(१) विज्जल—मोढ कुलातील नृपती; (२) बहुधर—दान स्वीकारणारा गृहस्थ; (३) कांकुअ—दान स्वीकारणारा गृहस्थ; (४) महादेव—दान स्वीकारणारा स्वाध्या-यिक; (५) लक्ष्मीधर—दान स्वीकारणारा स्वाध्यायिक; (६) साधार—विज्जलाने जिंकलेला राजा; (७) सेल्ल—विज्जल याने जिंकलेला राजा; (८) सहस्रबाहु—विज्जलाने जिंकलेला राजा; (९) मुम्मरक—वरिष्ठक; (१०) डोंबलैय—मंत्री; (११) लिंबादित्य—लेख लिहिणारा.

ग्रामनामे—(१) विजयपूर—संयान शहराचा एक भाग असावा; (२) काणाड्डग्राम—काणाडुक (?), ओळख पटत नाही; (३) संयान—ठाणे जिल्ह्यातील संजान.

३३५. चिंचनी ताम्रपट, विज्जलदेव, शके ९७५

प्राप्तिस्थळ—हा ताम्रपट चिंचनी येथे एका शेतकऱ्याला शेत नांगरीत असताना मिळाला. हा लेख सध्या मुंबई येथे डायरेक्टर ऑफ अर्काइव्हजच्या ऑफिसमध्ये आहे.

संदर्भ.—सरकार, डी. सी., इ. आय्., १९५७–५८, खंड ३२, पृ. ७१–७६.

भाषा व लिपी—संस्कृत; लिपी उत्तर भारतीय लिपिप्रमाणे.

राजवंश व राजा —मोढ महामंडलेश्वर विज्जलदेव.

वर्ष व तिथी.—कार्तिक वदि १५, सूर्यग्रहण, विजय संवत्सर, शके ९७५ (गत वर्ष), १३ नोव्हेंबर, इ. स. १०५३.

सारांश.—या लेखात मोढ विज्जलदेव याचा उल्लेख आहे. त्याने त्याच्या दुय्यम अधिकाऱ्यांना उद्देशून हे दानपत्र दिलेले आहे. कौतुक मठिकेच्या शासनाखाली असलेल्या केणसाग्रामाहून सिरिडिका म्हणून मिळालेल्या ३ द्रम्म रकमेतून कौतुक मठिकेशी संबंधित असलेल्या गृहस्थाश्रमी व्यक्ती व विद्वान पंडितांना, दररोज २५ ब्राह्मणांना भोजन देण्यासाठी कायम स्वरूपात (भोजन आक्षयणी-अक्षयनीवि) दान दिल्याची नोंद या ताम्रपटात केली आहे. हे दानपत्र ध्रुव मम्मलैय याने दोन्ही पक्षांच्या विनंतीवरून मंडलेश्वर वीजराणक याने दिलेल्या आज्ञेनुसार लिहिले आहे.

व्यक्तिनामे.—(१) वीजराणक—मोढ कुलातील नृपती विज्जल; (२) वीजल—मोढ नृपती विज्जल; (३) वीज—मोढ नृपती विज्जल; (४) विज्ज—मोढ नृपती विज्जल; (५) एंगल—वीजराणकाचा पिता; (६) दीमराक—विजराणकाचा पितामह; (७) मुम्मुरक—वरिष्ठक महामात्य; (८) डोंबलैय—महाठक्कुर; (९) बुद्धपैय—महाप्रधान; (१०) मम्मलैय—लेख लिहिणारा ध्रुवाधिकारी.

ग्रामनामे.—(१) संयान—ठाणे जिल्ह्यातील संजान; (२) आकाशिका—ओळख पटत नाही; (३) केणसाग्राम—ओळख पटत नाही.

३३६. चिंचाळा शिलालेख

जिल्हा—**बीड**

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख बीड जिल्ह्यात चिंचाळा येथे मिळाला.

संदर्भ.—इं.अ.रि., १९६९–७०, पृ. ४८.

भाषा व लिपी.—संस्कृत.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—शके १२७२, इ. स. १३५०

सारांश.—प्रस्तुत लेखात रघुदेव नामक व्यक्तीने कुमार चांगदेव व चिक्कदेव या देवांना जमीन दान दिल्याचे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—रघुदेव—दानकर्ता.

३३७. चितकामंत ताम्रपट, सोमेश

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट मुंबई येथे प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये मिळाला.

संदर्भ.—नरसिंहस्वामी, एच. के. व कृष्णन्, के. जी., इ. **आय्.**, १९६७, खंड ३७, भाग ४, पृ. १७५–१८४.

भाषा व लिपी.—संस्कृत व तामीळ, ग्रंथ.

राजवंश व राजा.—कलुकडपुर प्रमुख सोमेश.

वर्ष व तिथी.—विरोधी, मकर संक्रमण, शुक्रवार, एकादशी, २३ डिसेंबर, १२८९.

सारांश.—या ताम्रपटात सोमेश याची वंशावळ दिलेली आहे. आणि अल्लु-गंग-चोळ या सूर्यवंशी राजाने चितकामंत हे गाव पेरुमाळ सोमयाजियार याला दान दिल्याचे नमूद केले आहे. चितकामंत या गावाला त्याचे मामा रायिदेव महाराज यांच्या नावावरून रायरपुरम् हे दुसरे नाव देण्यात आले होते. दान दिलेल्या गावाचे ३६ भाग करून ते अनेक ब्राह्मणांना दान दिले. 'देवदान' आणि 'ब्रह्मपुरी' जमिनी या दानातून वगळल्या आहेत. दानपत्राच्या शेवटी 'स्वदत्तम्' असे लिहिले आहे. सोमेश याच्या अधिकाराखाली हे दान दिले गेले.

व्यक्तिनामे.—(१) भुवनाधिप—सोमवंशी नृपती, कलुकडपूरचा पहिला प्रमुख; (२) आहव-मल्ल—भुवनाधिपाच्या वंशातील नृपती; (३) गंग (प्रथम)—आहवमल्लाचा पुत्र; (४) सोमिदेव—गंग (प्रथम) चा पुत्र; (५) गंग (द्वितीय)—सोमिदेवाचा पुत्र; (६) रायिदेव—गंग (द्वितीय) चा पुत्र; (७) गंग (तृतीय)—रायिदेवाचा पुत्र; (८) केशव—रायिदेवाचा पुत्र; (९) सोमेश—रायिदेवाचा पुत्र; (१०) सिद्ध—रायिदेवाचा पुत्र; (११) अल्लु-गंग—दान देणारा सूर्यवंशीय चोळ नृपती; (१२) पेरुमाळ सोमयाजियार—दान स्वीकारणारा हारीत गोत्री, कोमपुरम्चा रहिवासी; (१३) रायिदेव—अल्लु-गंग याचा मामा; (१४) गंडदेव—आण्डप्पूरचा नृपती, वैदुंब वंश; (१५) विश्वेश्वर सोमयाजियार—दान स्वीकारणारा पेरुमाळ सोमयाजियारचा पुत्र; (१६) वळ्ळप्पिळ्ळान् भट्टर—दान स्वीकारणारा पेरुमाळचा पुत्र; (१७) तिरुवरंगच्छि-रियान् भट्टर—दान स्वीकारणारा पेरुमाळचा पुत्र; (१८) आण्डपिळ्ळै चोट्टन—दान स्वीकारणारा पेरुमाळचा पुत्र; (१९) गोविंद अप्पन् भट्टर—दान स्वीकारणारा पेरुमाळचा पुत्र; (२०) बालेंदु-मौलि उपाध्यायर्—दान स्वीकारणारा कौंडिण्य गोत्री गोमठम्चा रहिवासी; (२१) पेरियाळ्वान भट्टर्—दान स्वीकारणारा कौंडिण्य गोत्री एट्टुकूरुचा रहिवासी; (२२) यज्ञमूर्ति भट्टर्— दान स्वीकारणारा कण्व गोत्री चिरुपुदूरचा रहिवासी; (२३) वेण्णैक्कूत्त भट्टर्—दान स्वीकारणारा शांडिल्य गोत्री कुरवशेरीचा रहिवासी; (२४) वामनभट्टर—दान स्वीकारणारा कौशिक गोत्री, उवियूरचा रहिवासी; (२५) पिळ्ळान् भट्टर—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री रायूरचा रहिवासी; (२६) चिगप्पेरुमाळि भट्टर्—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (२७) पेद्दि भट्टर्—दान स्वीकारणारा उपमन्यु-वसिष्ठ गोत्री ब्राह्मण; (२८) एम्मरुगन् केशवन्—दान स्वीकारणारा उपमन्यु-वसिष्ठ गोत्री ब्राह्मण; (२९) रायिदेव—दान स्वीकारणारा अत्रि गोत्री ब्राह्मण; (३०) अल्लाळपेद्दि—दान स्वीकारणारा श्रीवत्स गोत्री ब्राह्मण; (३१) कोमरि पेद्दि—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (३२) मधुरान्तक भट्टर्—दान स्वीकारणारा एट्टुकूरचा ब्राह्मण; (३३) पेरुमाळ आच्छान् भट्टर्—दान स्वीकारणारा रायूरचा ब्राह्मण; (३४) तिरु-वरंगन—दान स्वीकारणारा रायूरचा ब्राह्मण; (३५) वरन्तरुवान्—दान स्वीकारणारा रायूरचा ब्राह्मण.

ग्रामनामे.—(१) आण्डप्पूर—गंडदेवाची राजधानी, हल्लीचे आडुपूरु, तालुका राजमपेट; (२) चितकामंत—यालाच पुन्हा रायरपुरम् हे नाव दिले. याची ओळख पटत नाही. तीत्तुरालघट्टु, नुरंगल-कणवाय, अमटगुट्टैगळ या चितकामंतच्या सीमा सांगितल्या आहेत. ही बहुधा गावांची नावे नसावीत; (३) कोमपुरम्; (४) एट्टुकूरु; (५) चिरुपुदूर; (६) गोमठम्; (७) कुरवशेरी; (८) उवियूर; (९) रायूर; (३) ते (९) या गावांची ओळख पटवलेली नाही.

३३८. चेउल शिलालेख, यादव रामचंद्रदेव

जिल्हा—**कुलाबा** तालुका—**अलिबाग**

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत लेख चेउलच्या उत्तरेस मोडकवाडी म्हणून प्रसिद्ध असलेल्या भागात मिळाला.

संदर्भ.—तुळपुळे, शं. गो., **प्रा.म.को.ले.**, १९६३, पृ. २२७–२२८, नं. ४४.

भाषा व लिपी.—संस्कृत व मराठी मिश्र; देवनागरी.

राजवंश व राजा—देवगिरीचा यादव नृपती रामचंद्रदेव.

वर्ष व तिथी.—शके १२२०, विलंब संवत्सर, चैत्र शुद्ध ११, सोमवार; २४ मार्च, इ. स. १२९८.

सारांश.—हा लेख यादव नृपती रामचंद्रदेव याच्या कालातील आहे. या लेखाचा अर्थ सुसंगतपणे लावता येत नाही कारण या लेखात फक्त सुरवातीच्या दोन व शेवटच्या दोन ओळी वाचता येतात. शेवटच्या ओळीत शापात्मक वचन आहे.

व्यक्तिनामे.—रामचंद्रदेव—यादव नृपती.

३३९. जमळगाव ताम्रपट, चालुक्य विजयादित्य

जिल्हा—**नाशिक**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट केसर सिरसीचे (जि. उस्मानाबाद, ता. निलंगा) पोलीस पाटील, श्री. दिनकरराव बालाजीराव यांच्याजवळ होता. या ताम्रपटाचा नक्की मालक कोण होता ते माहीत नाही.

संदर्भ.—नागराजराव, एम्. एस्., **इ.आय.**, १९६५–६६, खंड ३६, पृ. ३१३–३१६.

भाषा व लिपी.—संस्कृत, दक्षिणेकडील ब्राह्मी.

राजवंश व राजा.—चालुक्य विजयादित्य.

वर्ष व तिथी.—शके ६१९, वैशाख पौर्णिमा, १ ले शासन वर्ष, इ. स. ६९६–९७.

सारांश.—या ताम्रपटात चालुक्य नृपती विजयादित्य याने रासेनपुरला असताना जमळगाम हे गाव कोत्तिशर्मन् आणि प्रभाकर या ब्राह्मणांना दान दिल्याचे नमूद केले आहे. इतर ताम्रपटांप्रमाणे यातही चालुक्य वंशावळ दिलेली आहे. हे दानपत्र नरेंद्रादित्याच्या विनंतीवरून देण्यात आले.

व्यक्तिनामे.—(१) पुलकेशी—चालुक्य नृपती; (२) कीर्तिवर्मन्—चालुक्य नृपती, पुलकेशीचा पुत्र; (३) सत्याश्रय—चालुक्य नृपती, कीर्तिवर्म्याचा पुत्र; (४) विक्रमादित्य—चालुक्य नृपती, सत्याश्रयाचा पुत्र; (५) विनयादित्य—चालुक्य नृपती, विक्रमादित्याचा पुत्र; (६) विजयादित्य—चालुक्य नृपती, विनयादित्याचा पुत्र; (७) नरेंद्रादित्य—हा नक्की कोण होता हे माहीत नाही. परंतु याच्या विनंतीवरुन हे दानपत्र देण्यात आले; (८) कोत्तिशर्मन्—दान स्वीकारणारा कौशिक गोत्राचा गृहीतसाहस्र ब्राह्मण; (९) प्रभाकर—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्राचा गृहीतसाहस्र ब्राह्मण; (१०) प्रभाकर—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्राचा षडंगवित् ब्राह्मण; (११) रामपुण्यवल्लभ—ताम्रपट लिहिणारा महासांधिविग्रहिक.

ग्रामनामे.—(१) रासेनपुर—हल्लीचे रासिन, जि. अहमदनगर, ता. कर्जत; (२) मोरखंडी—नाशिक जिल्ह्यातील मोरखंडी किंवा मार्कंड; (३) जमळगाम—निश्चित ओळख पटत नाही पण नाशिक जिल्ह्यात असावे; (४) चाल्लुंकि देश—निश्चित ओळख पटत नाही पण मयूरखंडीच्या आसपासचा प्रदेश असावा; (५) पुल्लवादलि—निश्चित ओळख पटत नाही परंतु नाशिकच्या जवळच असावे; (६) मुगुळी—निश्चित ओळख पटत नाही.

विशेष महत्त्व.—विजयादित्याच्या पहिल्या शासनवर्षाचा प्रथमच हा ताम्रपट मिळाला आहे. यापूर्वी त्याच्या तिसऱ्या व चवथ्या शासनवर्षांचे ताम्रपट उपलब्ध झालेले आहेत.

३४०. जवखेड ताम्रपट, अमोघवर्ष (प्रथम), शके ७४२

जिल्हा—**धुळे (पश्चिम खानदेश)** तालुका—**शहादे**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट जवखेड येथे रस्ता दुरुस्तीचे काम चालू असताना खोदतानामिळाला.

संदर्भ.—भट, डी. आर्., **इ.आय्.**, १९५७–५८, खंड ३२, पृ. १२९–१३४.

भाषा व लिपी.—संस्कृत; लिपी राष्ट्रकूटांच्या नवव्या शतकातील ताम्रपटाप्रमाणे.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती अमोघवर्ष (प्रथम).

वर्ष व तिथी.—शुक्रवार, आषाढ शुद्ध ८, शक संवत् ७४२ (गत वर्ष), २२ जून, इ. स. ८२०.

सारांश.—प्रस्तुत ताम्रपटात राष्ट्रकूट नृपती अमोघवर्ष याने श्रीनिस्वपुरक येथे राहात असताना एकाशय विषयातील वोथिपद्रक हे खेडे कौंडिण्य गोत्री खेड्डीभट्ट याचा पुत्र जोगड्डी भट्ट याला दान दिल्याची नोंद केली आहे. हे दान भट्टारिका असगव्वा हिच्या विनंतीवरून केलेले आहे. हे दानपत्र शंकरगणपुत्र रुद्र याने लिहिले आहे.

व्यक्तिनामे.—(१) कृष्णराज—राष्ट्रकूट नृपती; (२) निरुपम कलिवल्लभ—राष्ट्रकूट नृपती, कृष्णराजाचा पुत्र; (३) गोविंदराज—राष्ट्रकूट नृपती, निरुपमाचा पुत्र; (४) मारशर्व—गोविंदराजाने जिंकलेला राजा; (५) शर्व अमोघवर्ष—राष्ट्रकूट नृपती, गोविंदराजाचा पुत्र; (६) जोगड्डिभट्ट—दान स्वीकारणारा कांचीनिवासी कौंडिण्य गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (७) रेवड्डिभट्ट—जोगड्डिभट्टाचा पिता; (८) भट्टारिका असगव्वा—दानासाठी विनंती करणारी स्त्री; (९) रुद्र—लेख लिहिणारा; (१०) शंकरगण—रुद्राचा पिता.

ग्रामनामे.—(१) श्रीनिस्वपुरक—मध्यभारतात कुक्षिजवळ असलेले निसारपुर असावे; (२) कांची; (३) वोथिपद्रक; (४) लघु मोइपद्रक; (५) ऊंबरोपिकाग्राम. या गावांची ओळख दिलेली नाही.

३४१. जालगाव ताम्रपट, जैत्र सामंत, शके ११२४

जिल्हा—**रत्नागिरी** तालुका—**दापोली**

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत ताम्रपट दापोलीजवळ असलेल्या जालगाव या ठिकाणी श्री. बर्वे यांच्या संग्रही होता. सध्या हा मुंबई येथे प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—(१) दीक्षित, मो. ग., **द.म.इ.सा.**, खंड ३, पृ. ६१–६४; (२) मास्टर, **बु.स्कू.ओ.अ.स्ट.**, खंड २०, पृ. ४२८–४३०; (३) तुळपुळे, शं. गो., **प्रा.म.को.ले.**, नं. १८, पृ. ९३–९७.

भाषा व लिपी.—मराठी; देवनागरी.

राजवंश व राजा.—जैत्र सामंत.

वर्ष व तिथी.—चैत्र शुद्ध प्रतिपदा, आदित्यवार, दुंदुभि संवत्सर, शके ११२४; रविवार, २४ फेब्रुवारी, इ. स. १२०२.

सारांश.—हा ताम्रपट आठगाव विभागावर जैत्र सामंत हा राज्य करीत असताना, त्याने आठगाव वेळितातील अग्रहार घोणसविरी येथील प्रभुत्व, ३०० पोफळी यांच्यासहित आदियक्षपालाकडून ३५० दामांस घेऊन जगदेव सामंताचा उपपुत्र (?) जैत्र सामंत याने केशव प्रभु व त्याचे पुत्र, गोत्र यांच्या अनुमतीने मुद्गल गोत्री नारायण घैसासाचा पुत्र गोविंद कवि यास दिले हे जाहीर करण्यासाठी दिलेला आहे. जैत्र सामंत, त्याचा भाऊ लखुमिदेवकुवर, प्रधान देउगिनायक व गावचे महाजन हे या प्रभुत्वाचे रक्षक होते (प्रतिपालक).

याशिवाय सत्येश्वरदेवाच्या प्रीत्यर्थ केलेल्या दानाची व इतर दानाची या लेखात नोंद केलेली आहे. हे शासन दिवाकर ज्योतिषी याने लिहिले आहे.

व्यक्तिनामे.—(१) जैत्र सामंत—दीक्षितांच्या मते हे सामंत शिलाहारांचे मांडलिक म्हणून कोकणात राज्य करीत असावेत; (२) जगदेव सामंत—जैत्र सामंताचा पिता; (३) आदियक्षपाल, (४) केशव प्रभु—दानास अनुमती देणारा; (५) गोविंदकवि—दान स्वीकारणारा मुद्गल गोत्री ब्राह्मण; (६) नारायण घैसास—गोविंदकवीचा पिता; (७) लखुमिदेवकुवर—जैत्र सामंताचा भाऊ; (८) देउगिनायक—प्रधान; (९) पद्मलनायक—ऊंबरलीचा ग्रामप्रमुख; (१०) दिवाकर ज्योतिषी—लेख लिहिणारा.

ग्रामनामे.—(१) आठगाव; (२) घोणसविरी; (३) दुगी; (४) सिरवली; (५) कुद्रिकि; (६) उंवरयली. या गावांची ओळख पटत नाही.

३४२. जांब कोथुरक ताम्रपट, वाकाटक प्रवरसेन (द्वितीय)

जिल्हा—**वर्धा** तालुका—**हिंगणघाट**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट जांब येथील मोकासदार अठोळे यांच्याजवळ मिळाला.

संदर्भ.—मिराशी, वा. वि., **इ. आय्.**, १९४१–४२, खंड २६, पृ. १५५–१६१; **कॉ.इं.इं.**, १९६३, खंड ५, पृ. १०–१५.

भाषा व लिपी.—संस्कृत; दक्षिणेकडील पेटिकाशीर्षक लिपी.

राजवंश व राजा.—वाकाटक नृपती प्रवरसेन (द्वितीय).

वर्ष व तिथी.—२ रे शासनवर्ष, अश्विन शुद्ध १२.

सारांश.—या ताम्रपटात वाकाटकांची वंशावळ दिलेली आहे. या ताम्रपटाचा मुख्य उद्देश द्वितीय प्रवरसेनाने सुप्रतिष्ठ आहारातील कोथुरक गाव दान दिला हे नमूद करणे हा होता. हे दान तैत्तिरीय शाखीय कौंडिण्य गोत्री कालुट्टक नामक गणयाजी ब्राह्मणास दिले होते. हा लेख नागवर्मन् याने लिहिला.

व्यक्तिनामे.—(१) प्रवरसेन (प्रथम)—विष्णुवृद्ध गोत्रातील वाकाटक सम्राट; (२) गौतमीपुत्र—वाकाटक नृपती प्रवरसेन (प्रथम) याचा पुत्र; (३) भवनाग—भारशिव राजा, गौतमीपुत्राचा सासरा; (४) रुद्रसेन (प्रथम)—वाकाटक नृपती, गौतमीपुत्राचा पुत्र; (५) पृथिवीसेन (प्रथम)—वाकाटक नृपती, रुद्रसेन (प्रथम) चा पुत्र; (६) रुद्रसेन (द्वितीय)—वाकाटक नृपती, पृथिवीसेन (प्रथम) चा पुत्र; (७) प्रभावती गुप्ता—रुद्रसेन (द्वितीय) ची पत्नी, गुप्त राजकन्या; (८) देवगुप्त—गुप्त नृपती चंद्रगुप्त (द्वितीय), प्रभावती गुप्ताचा पिता; (९) प्रवरसेन (द्वितीय)—वाकाटक नृपती, रुद्रसेन (द्वितीय) चा दान देणारा पुत्र; (१०) कालुट्टक—दान स्वीकारणारा कौंडिण्य गोत्री ब्राह्मण, कृष्ण यजुर्वेद, तैत्तिरीय शाखा; (११) चक्रदेव—दूतक; (१२) नागवर्मन्—लेखक.

ग्रामनामे.—(१) नंदिवर्धन—नागपुर जिल्ह्यातील नगरधन; (२) कोथुरक—ओळख पटत नाही. वुन्ना नदीवरील हल्लीचे माणगाव असावे; (३) चिंचापल्ली—माणगावच्या दक्षिणेस अर्ध्या मैलावरील चिंचोली; (४) बोथिकवाटक—माणगावच्या वायव्येस ३॥ मैलांवरील बोथाड; (५) मंडुकीग्राम—माणगावच्या उत्तरेस दोन मैलांवरील मांडगाव; (६) सुप्रतिष्ठ आहार—हिंगणघाट तालुका.

३४३. जांबगाव ताम्रपट, राष्ट्रकूट इंद्र (तृतीय)

जिल्हा—**औरंगाबाद** तालुका—**गंगापूर**

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत ताम्रपट जांबगाव या गावी मिळाला.

संदर्भ.—(१) पोहनेरकर, व. शे., **म.यु.ज.**, १९६१, खंड १, नं. १, पृ. ७–११; १९६२, खंड २, नं. २, पृ. ४९; (२) मिराशी, वा. वि., **इ.आय.**, १९६६, खंड ३६, पृ. २२३--२३८.

भाषा व लिपी.—संस्कृत; देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती इंद्र (तृतीय).

वर्ष व तिथी.—फाल्गुन शुद्ध ७, बुधवार, मृगशीर्ष, युव संवत्सर, शक संवत् ८३६ (गत वर्ष); बुधवार, २४ फेब्रुवारी, इ. स. ९१५.

सारांश.—हा ताम्रपट राष्ट्रकूट नृपती इंद्र (तृतीय) याच्या अमदानीतील आहे. मान्यखेट या राजधानीहून कुरुंदक गावी आपल्या पट्टबंधोत्सवाच्या प्रसंगी गेला असताना तुलापुरुष महादानानिमित्त राजाने हे दान दिलेले आहे. या ताम्रपटाचा मुख्य उद्देश राजाने पैठणजवळ असलेले खइरोंढी हे खेडे दान दिले हे नमूद करणे हा होता. याशिवाय कुरुंदक, आणखी काही खेडी व पाच लाख द्राम्म दान दिले. ही प्रशस्ती नेमादित्यपुत्र त्रिविक्रमभट्ट याने लिहिली.

व्यक्तिनामे.—(१) दंतिदुर्ग—राष्ट्रकूट घराण्याचा संस्थापक; (२) कृष्णराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, दंतिदुर्गाचा चुलता; (३) निरुपम—राष्ट्रकूट नृपती, कृष्णराज (प्रथम) चा पुत्र; (४) जगत्तुंग (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, निरुपमाचा पुत्र; (५) श्रीवल्लभ—राष्ट्रकूट नृपती, जगत्तुंग (प्रथम) चा पुत्र; (६) कृष्णराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, श्रीवल्लभाचा पुत्र; (७) जगत्तुंग (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, कृष्णराज (द्वितीय) चा पुत्र; (८) लक्ष्मी—जगत्तुंग (द्वितीय) ची पत्नी, हैहय राजकन्या; (९) रणविग्रह—लक्ष्मीचा पिता, चेदि देशचा हैहय नृपती; (१०) कोक्कल—लक्ष्मीचा पितामह; (११) इंद्रराज (तृतीय)—राष्ट्रकूट नृपती, जगत्तुंग (द्वितीय) व लक्ष्मी यांचा पुत्र; (१२) त्रिविक्रमभट्ट—लेख लिहिणारा; (१३) नेमादित्य—त्रिविक्रमभट्टाचा पिता; (१४) दामोदरभट्ट—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण, वाजसनेय शाखा; (१५) भीमाशीतभट्ट—दामोदरभट्टाचा पिता; (१६) मेरु—बाणवंशीय राजा.

ग्रामनामे.—(१) पइट्ठाण—गोदावरी तीरावरील पैठण; (२) खइरोंढी—पैठणच्या वायव्येस चार मैलांवरील खिरई; (३) नंदौरकग्राम—गोदावरीच्या दक्षिण तीरावरील आगर नांदूर असावे (मिराशी); (४) पिप्पलग्राम—गोदावरीच्या उत्तर तीरावर आगर नांदूरच्या पूर्वेस १।। मैलांवरील पिप्पलवाडी असावे (मिराशी); (५) कुरुंदक—(i) तापी नदीवरील कडोदा (आर्. जी. भांडारकर), (ii) कृष्णा व पंचगंगा यांच्या संगमावरील कुरुंदवाड (जॅक्सन), (iii) प्रवरा-संगमावरील कंइगाव (मिराशी); (६) मान्यखेट—हल्लीचे मालखेड; (७) सिरिसिका; (८) सेडिआले—ओळख पटत नाही.

३४४. जांबगाव शिलालेख

जिल्हा—**सोलापूर**

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख जांबगाव येथे हनुमान मंदिरात आहे.

संदर्भ.—इं. अ. रि., १९६४–६५, पृ. १३, नं. ५३.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—यादव नृपती जतुगि (पहिला).

वर्ष व तिथी.—शके १११७, इ. स. ११९५.

सारांश.—या लेखात काश्मीर देशाहून आलेल्या सेनापतीचा पुत्र दंडनायक पद्मनाभ याने सोन्नलिगे येथील कपिल–सिद्ध–मल्लिकार्जुन देवालयातील पूजा, नैवेद्यासाठी जंबुगवे हे गाव दान दिल्याचे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) जैतुगि—यादव नृपती ; (२) पद्मनाभ—दंडनायक.

ग्रामनामे.—(१) सोन्नलिगे ; (२) जंबुगवे—ओळख दिलेली नाही.

३४५. जितूर, जैन मूर्तिलेख

जिल्हा—**परभणी**

प्राप्तिस्थळ.—दिलेले नाही.

संदर्भ.—इं. अ. रि., १९६९–७०, पृ. ४८.

भाषा व लिपी.—उल्लेख नाही.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—शके ११४० ; इ. स. १२१८.

सारांश.—या लेखात जितूर हे ग्रामनाम आलेले असून देवेंद्रकीर्तीच्या वंशजाचा प्रणाम नमूद केला आहे.

व्यक्तिनामे.—देवेंद्रकीर्ति.

ग्रामनामे.—जितूर—ओळख दिलेली नाही.

३४६. जुगल शिलालेख

जिल्हा—**कोल्हापूर**

प्राप्तिस्थळ.—माहीत नाही.

संदर्भ.—कुंदनगर, इ. **नॉ. क. को.**, पृ. १७४, नं. २४.

भाषा व लिपी.—कानडी.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती विजयादित्य.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख अपूर्ण आहे. वळवाड राजधानीहून राज्य करणारा शिलाहार नृपती विजयादित्य याच्या आमदानीतील हा लेख आहे. यात विजयादित्याची स्तुती केलेली आहे. त्याच्यावर महालक्ष्मी देवीचा वरदहस्त असल्याचाही उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—विजयादित्य—शिलाहार नृपती.

ग्रामनामे.—(१) वळवाड—शिलाहार राजधानी ; (२) तगरपूर—उस्मानाबाद जिल्ह्यातील हल्लीचे तेर.

३४७. जुन्नर, प्राकृत शिलालेख

जिल्हा—**पुणे** तालुका—**जुन्नर**

प्राप्तिस्थळ.—दिलेले नाही.

संदर्भ.—इं. अ. रि., १९६०–६१, पृ. ४६, नं. ३७.

भाषा व लिपी.—प्राकृत, ख्रिस्तपूर्व १ ल्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—ख्रिस्तपूर्व १ ले शतक.

सारांश.—या लेखात कुमीच्या मूलस्वामीची पत्नी पोपिना हिने लेणे खोदल्याचा उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—(१) पोपिना—दान देणारी स्त्री ; (२) मूलस्वामिन्—पोपिनाचा पती.

ग्रामनामे.—कुमी—ओळख पटत नाही.

३४८. जुन्नर, बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर येथील मानमोडी टेकड्यांच्या पूर्व बाजूला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८५४, खंड ५, पृ. १६९, नं. २६ ; (२) बर्जेस, **आय्. ए.**, १८७७, खंड ६, पृ. ३५, नं. ८ ; (३) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ५१, नं. २५ ; (४) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. १०३, नं. ३५. (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १३४, नं. ११७४.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—महाक्षत्रप स्वामी नहपान.

वर्ष व तिथी.—वर्ष ४६.

सारांश.—या लेखात नहपानाचा उल्लेख असून त्याचा मंत्री वत्सगोत्री अयम याने मंडप व कुंड दान दिल्याचे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) नहपान—महाक्षत्रप ; (२)अयम—वत्सगोत्री, दान देणारा, नहपानाचा अमात्य.

३४९. जुन्नर, शैलगृह कुंड शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर येथील मानमोडी गटातील शैलगृह क्र. ३७ च्या डाव्या बाजूला असलेल्या तिसऱ्या कुंडावर आहे.

संदर्भ.—इं. अ. रि., १९६२–६३, पृ. ५२, नं. ३६.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. चे १ ले शतक.

सारांश.—या लेखामध्ये कुंडाच्या देणगीची नोंद केली आहे.

३५०. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर येथील लेण्याच्या पडक्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ४१–४२, नं. १; (२) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९२, नं. १; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १३०, नं. ११५०.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५० ते २००.

सारांश.—या लेखात भूतिनक नामक व्यक्तीने कुंड व (बहुधा) लेणे दान केल्याचा उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—भूतिनक—दानकर्ता.

३५१. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—जुन्नर येथील शैलगृहामध्ये हा लेख कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ४१–४२, नं. २; (२) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९२–९३, नं. २; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १३०, नं. ११५१.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५० ते २००.

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे—ही स्वागतकक्षाची पुण्यकारक देणगी मुधकिय मल व गोलिकिय आनंद यांनी दिली आहे.

व्यक्तिनामे.—(१) आनंद—दान देणारा (२) मल (मल्ल)—दान देणारा

३५२. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर शैलगृहामध्ये आहे.

संदर्भ.—(१) साइक्स, **ज. रॉ. ए. सो.**, १८३७, खंड ४, पृ. २८९, नं. ६; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८५४, खंड ५, पृ. १६३, नं. ८, ९; (३) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ४२, नं. ३; (४) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ ९३, नं. ३; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १३०, नं. ११५२.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५० ते २००

सारांश.—या लेखाचे भाषांतर असे—कुंड व लेणे ही अपगुरिय सवगिरियास याचा पुत्र पतीबधक गिरिभूति सखुयारु याची पुण्यकारक देणगी आहे. या लेखात त्याने गावातील धम्मुतरियांच्या मठाला कार्षापणाच्या रूपात कायम देणगी दिल्याचाही उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—(१) गिरिभूति सखुयारु—दान देणारा ; (२) सवगिरियास—गिरिभूतीचा पिता; (३) शिवपालितनिका—गिरिभूतीची पत्नी.

३५३. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर येथील चैत्य लेण्यात आहे.

संदर्भ.—(१) साइक्स्, **ज. रॉ. ए. सो.**, १८३७, खंड ४, पृ. २८९ नं७ ; (२) प्रिन्सेप, **ज. बं. ए. सो.**, १८३७, खंड ६, पृ. १०४५, नं. ३ ; (३) स्टिव्हन्सन व ब्रेट **नॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५४, खंड ५, पृ. १६३, नं. ७ ; (४) स्टिव्हन्सन, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५.,खंड ५, पृ. ४२८; (५) बर्जेस, **आय. ए.**, १८७७, खंड ६, पृ. ३९-१२; (६) वर्जेस व इंद्रजी **जके टे. वे. इं.**, १८८१, पृ. ४२; नं. ४ ; (७) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ.९३इं.६४ ; (८) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १३१, नं. ११५३.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५० ते २००.

सारांश.—"वीरसेणक याची सर्व जगाच्या कल्याणार्थ ही चैत्यगृहाची पुण्यकारक देणगी."

व्यक्तिनामे.—वीरसेणक—दान देणारा गृहपतिप्रमुख व व्यापारी.

३५४. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर येथील शैलगृहात कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ४३, नं. ५; (२) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९३, नं. ५ ; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**,१०, १९०९–१०, पृ. १३१, नं. ११५४.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ.स. १५० ते २००.

सारांश.—"गत देशचा यवन इरिल याची दोन कुंडांची पुण्यकारक देणगी."

व्यक्तीनामे.—इरिल—दान देणारा गर्त देशातील यवन.

३५५. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर शैलगृहात आहे.

संदर्भ.—(१) साइक्स्, **ज. रॉ. ए. सो.**, १८३७, खंड ४, पृ. २८९, नं. ८ ; (२) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ४३, नं. ६ ; (३) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ.९३, नं. ६ ; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १३१, नं. ११५५.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५० ते २००.

सारांश.—"अपगुरिय सवगिरियास याचा पुत्र पतिबधक गिरिभूति याची पत्नी सिवपालिनिका हिच्यासह दिलेली लेणे व कुंड यांची देणगी." ही देणगी कायम स्वरूपाची आहे.

व्यक्तिनामे.—(१) पतिबधक गिरिभूति—दान देणारा ; (२) सवगिरियास—गिरिभूतीचा पिता ; (३) सिवपालिनिका—गिरिभूतीची पत्नी.

३५६. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर येथील शैलगृहाच्या दरवाज्याच्या डाव्या बाजूला कोरलेला आहे.
संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, खंड ४, पृ. ५५, नं. ३२ ; (२) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९४, नं. ७ ; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १३६, नं. ११८१.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५० ते २००.

सारांश.—" उगाहपुत्र इसिपालित याची त्याच्या पुत्रांसह देणगी. "

व्यक्तिनामे.—(१) इसिपालित (ऋषिपालित)—दान देणारा ; (२) उगाह (उग्राह)—इसिपालित याचा पिता.

३५७. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर येथील खुल्या लेण्यात डाव्या बाजूच्या भिंतीवर कोरलेला आहे. (लेणे नं. ६७, शिवनेरी डोंगर).

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे.इं.**, १८८१, पृ. ५५, नं. ३३ ; (२) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९४, नं. ८; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १३६, नं. ११८२.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५० ते २००.

सारांश.—" गत देशचा रहिवासी यवन चिट (चैत्र) याची संघाला भोजन मंडपाची देणगी. "

व्यक्तिनामे.—(१) चिट (चैत्र)—दान देणारा गत देशातील यवन.

३५८. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर येथील चैत्य लेण्याच्या उजव्या बाजूला कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ५५, नं. ३४ ; (२) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९४, नं. ९ ; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १३६, नं. ११८३.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५० ते २००.

सारांश.—" उगाहपुत्र इसिपालित याची त्याच्या कुटुंबियांसह चैत्य लेण्याची देणगी. "

व्यक्तिनामे.—(१) इसिपालित (ऋषिपालित)—दान देणारा ; (२) उगाह (उग्राह)—इसिपालिताचा पिता.

३५९. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर येथील शैलगृहाच्या व्हरांड्यातील डाव्या बाजूच्या खिडकीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) साइक्स्, **ज. रॉ. ए. सो.**, १८३७, खंड ४, पृ. २८९, नं. ९; (२) प्रिन्सेप, **ज. बं. ए. सो.**, १८३७, खंड ६, पृ. १०४४, नं. २ ; (३) बर्ड, **हि. रि.**, १८४७, पृ. ५५, नं. १० ; (४) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८५४, खंड ५, पृ. १६०, नं. १ ; (५) बर्जेस **इं. अॅ.**, १८७७, खंड ६, पृ. ३४, नं. २ ; (६) बर्जेस व इंद्रजी, **इं. के .टे .बे. इं.**, १८८१, पृ. ५४, नं. ३१ ; (७) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९४, नं. १० ; (८) ल्युडर्स **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १३५, नं. ११८०.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५० ते २००.

सारांश.—" धान्यविक्रेत्या श्रेणीची सात लेणी व कुंडाची पुण्यकारक देणगी. "

३६०. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर येथील शैलगृहातील व्हरांड्याच्या मागच्या भिंतीवर (इंद्रजी), गणेश लेण्यातील चैत्याच्या दरवाजाच्या वर (बुल्हर) कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) साइक्स्, **ज. रॉ. ए. सो.**, १८३७, खंड ४, पृ. २८९, नं. १० ; (२) प्रिन्सेप, **ज. बं. ए. सो.**, १८३७, खंड ६, पृ. १०४५, नं. ४ ; (३) बर्ड, **हि. रि.**, १८४७, पृ. ५६, नं. १३ ; (४) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८५४, खंड ५, पृ. १६१, नं. २ ; (५) कर्न, **इं. सु.**, १८७६, खंड १४, पृ. ३९६, नं. १ ; (६) बर्जेस, **इं. अॅ.**, १८७७, खंड ६, पृ. ३३, नं. १; (७) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे इं.**, १८८१, पृ. ५४, नं. ३० ; (८) बुल्हर व बर्जेस **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९४, नं. ११ ; (९) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १३५, नं. ११७९.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.— अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५०–२००.

सारांश.—" कल्याणचा हेरणिक याचा पुत्र सुलसदत याची चैत्य लेण्याची देणगी. "

व्यक्तिनामे.—(१) सुलसदत (सुलसदत्त)—दान देणारा ; (२) हेरणक—सुलसदताचा पिता.

ग्रामनामे.—कल्याण.

३६१. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर शैलगृहाच्या दरवाजाच्या डाव्या बाजूला असलेल्या व्हरांड्याच्या मागच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, **हि. रि.**, १८४७, पृ. ५९, नं. १० ; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रँ. रॉ. ए. सो.**, १८५४, खंड ५, पृ. १६१, नं. ३ ; (३) बर्जेस, **इं. अँ.**, १८७७, खंड ६, पृ. ३५, नं. ३ ; (४) कर्न, **इं. अँ.**, १८७७, खंड ६, पृ. ४० ; (५) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ५३, नं. २९ ; (६) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९४, नं. १२ ; (७) ल्युडर्स, **अपेंडिक्स**, **इ. आय.**, १०, १९०९–१०, पृ. १३५, नं. ११७८.

भाषा व लिपी—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५०–२००.

सारांश.—" उपासक तापस याचा पुत्र, उपासक कपिल याचा नातू आनद (आनंद) याची चैत्य लेण्याची देणगी. "

व्यक्तिनामे.—(१) आनद (आनंद)—दान देणारा ; (२) तापस—आनंदाचा पिता, उपासक ; (३) कपिल—आनंदाचा पितामह, उपासक.

३६२. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर शैलगृहातील कुंडाच्या वर असलेल्या मोकळ्या जागेत कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) साइक्स्, **ज. रॉ. ए. सो.**, १८३७, खंड ४, पृ. २८९, न. १२ ; (२) प्रिन्सेप, **ज. बं. ए. सो.**, १८३७, खंड ६, पृ. १०४६, नं. ५ ; (३) बर्ड, **हि. रि.**, १८४७, पृ. ५७, नं. १४ ; (४) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रँ. रॉ. ए. सो.**, १८५४, खंड ५, पृ. १६१, नं. ४ ; (५) कर्न, **इं. स्टु.**, १८७६, खंड १४, पृ. ३९६, नं. ४ ; (६) बर्जेस, **इं. अँ.**, १८७७, खंड ६, पृ. ३५, नं. ४ ; (७) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ५३, नं. २८ ; (८) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९४, नं. १३ ; (९) ल्युडर्स, **अपेंडिक्स**, **इ. आय.**, १०, १९०९–१०, पृ. १३५, नं. ११७७.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५०–२००.

सारांश.—" कल्याणनिवासी कुळिर (कुलीर) याचा सुवर्णकार पुत्र सघक (संघक) याची कुंडाची देणगी. "

व्यक्तिनामे.—(१) सधक (संधक)—दान देणारा सुवर्णकार ; (२) कुलिर (कुडिर)—सधकचा पिता.

ग्रामनामे.—कलिनंक—कल्याण.

३६३. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर शैलगृहातील टाक्याच्या वर असलेल्या कोनाड्याच्या मागच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) साइक्स्, ज. रॉ. ए. सो., १८३७, खंड ४, पृ. २८९, नं. ११ ; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, ज. बॉ. ब्रँ. रॉ. ए. सो., १८५४, खंड ५, पृ. १६२, नं. ५ ; (३) बर्जेस, इं. अँ., १८७७, खंड ६, पृ. ३५, नं. ५ ; (४) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ५२, नं. २७; (५) बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं., १८८३, खंड ४, पृ. ९४, नं. १४ ; (६) ल्युडर्स, **अपेंडिक्स**, **इ. आय.**, १०, १९०९–१०, पृ. १३५, नं. ११७६.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५०–२००.

सारांश.—"नाडक तोरिक याची पत्नी लच्छिनिका व इसिमूलसामी याची पत्नी नडबालिका यांनी दिलेली कुंडाची देणगी."

व्यक्तिनामे.—(१) लच्छिनिका (लक्ष्मीनिका)—कुंडाची देणगी देणारी स्त्री ; (२) नदबालिका (नंदबालिका)—कुंडाची देणगी देणारी स्त्री ; (३) तोरिक—लच्छिनिकाचा पती, (४) इसिमूलसामि (ऋषिमूलस्वामिन्)—नदबालिकेचा पती.

३६४. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर शैलगृहातील खुल्या व्हरांड्यात मागच्या भितीत कोरलेल्या बाकाच्या वर आहे.

संदर्भ.—(१) साइक्स् ज. रॉ. ए. सो. १८३७, खंड ४, पृ. २८९, नं. १३ ; (२) प्रिन्सेप, **ज. बं. ए. सो.**, १८३७, खंड ६, पृ. १०४६, नं. ६; (३) स्टिव्हन्सन व ब्रेट **ज. बॉ. ब्रँ. रॉ. ए. सो.**, १८५४, खंड ५, पृ. १६२, नं. ६; (४) बर्जेस, **इं. अँ.**, १८७७, खंड ६, पृ. ३५, नं. ६; (५) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ५२, नं. २६; (६) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.** १८८३, खंड ४, पृ. ९५, नं. १५; (७) सेनार्ट, **इ. आय.**, १९०५, खंड ८, पृ. ७५; (८) ल्युडर्स, **अपेंडिक्स**, **इ. आय.**, १०, १९०९–१०, पृ. १३४, नं. ११७५.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५०–२००.

सारांश.—"सामड (श्यामल) या उपासकाचा पुत्र सिवभूति याची कपिचित संघाला लेण्याची देणगी."

व्यक्तिनामे.—(१) सिवभूति—दान देणारा ; (२) सामड (श्यामल)—सिवभूतीचा पिता उपासक.

ग्रामनामे.—(१) कपिचित—लेण्याद्रिवरील बौद्ध विहाराचे जुने नाव असावे.

३६५. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर येथील मानमोडी टेकडीवर असलेल्या चैत्य लेण्याच्या प्रवेशद्वारावर आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ४३, नं. ७ ; (२) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९५, नं. १६; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स**, **इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १३१, नं. ११५६.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—इ. स. पू. १५० ते इ. स. १५०–२००.

सारांश.—"यवन चंद याची गर्भद्वाराची पुण्यकारक देणगी."

व्यक्तिनामे.—चंद (चंद्र)—देणगी देणारा यवन.

३६६. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर येथील शैलगृहामध्ये असलेल्या शेवटच्या व्हरांड्याच्या बाहेरच्या बाजूला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, हि. रि., १८४७, पृ. ५२, नं. ४; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो., १८५४, खंड ५, पृ. १६४, नं. १०; (३) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. बे. इं., १८८१, पृ. ५०, नं. २२; (४) बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं., १८८३, खंड ४, पृ. ९५, नं. १७; (५) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १३४, नं. ११७१.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—इ. स. पू. १५० ते इ. स. १५०–२००.

सारांश.—या लेखात देणगीची नोंद केलेली असून त्रिपिटक जाणणाऱ्या गणाचार्य सुलस याचा विद्यार्थी थेर भदंत चेतियस व कोणत्यातरी गृहपतीचा नातू नदणक यांचा उल्लेख केलेला आहे.

व्यक्तिनामे.—(१) सुलस—गणाचार्य; (२) चेतियस—सुलसचा शिष्य; (३) नदणक—गृहपती........चा नातू.

३६७. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर येथील शैलगृहातील दोन खोल्यांच्या दारांच्या मध्ये असलेल्या जागेत कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, हि रि., १८४७, प्लेट नं. ४९.२; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो., १८५४, खंड ५, पृ. १६४, नं. १२; (३) कर्न, इं. अॅ., १८७७, खंड ६, पृ. ४०, नं. १०; (४) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. बे. इ., १८८१, पृ. ५०, नं. २१; (५) बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं. १८८३, पृ. ९५, नं. १८; (६) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १३३, नं. ११७०.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५०–२००.

सारांश.—"गहपती सयिती याचा पुत्र गहपती सिवदास याची देणगी."

व्यक्तिनामे.—(१) सिवदास—दान देणारा गहपति (गृहपती); (२) सयिती—सिवदासाचा पिता, गहपती.

३६८. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर येथील अपूर्ण चैत्य लेण्याच्या उजव्या बाजूला असलेल्या दोन खोल्यांच्या दरवाजाच्या मध्ये असलेल्या मागच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, **हि. रि.**, १८४७, पृ. ५१, नं. ३ ; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८५४, खंड ५, पृ. १६५, नं. १२ ; (३) बर्जेस, **इं. अॅं.**, १८७७, खंड ६, पृ. ३६, नं. ९ ; (४) कर्न, **इं. अॅं.**, १८७७, खंड ६, पृ. ४०, नं. ९ ; (५) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. बे. इं.**, १८८१, पृ. ४९, नं. २० ; (६) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९६, नं. १९.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५०–२००.

सारांश.—"भरुकच्छवासी अश्वशर्म्याचे पुत्र लंकुडिय बुधमित व बुधरखित या बंधूंनी दिलेली दोन खोल्यांच्या शैलगृहाची देणगी."

व्यक्तिनामे.—(१) बुधमित—दान देणारा ; (२) बुधरखित—दान देणारा ; (३) असमम (अश्वशर्मा)—बुधमित व बुधरखित यांचा पिता.

ग्रामनामे.—भरुकच्छ—हल्लीचे भडोच.

३६९. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर शैलगृहामध्ये असलेल्या व्हरांड्याच्या मागच्या भिंतीवर डावीकडे कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, **हि. रि.**, १८४७, प्लेट ६ ; (२) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. बे. इं.**, १८८१, पृ. ४४, नं. ९ ; (३) स्टिव्हिन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.** १८५४, खंड ५, पृ. १६८, नं. २२ ; (४) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.** १८८३, खंड ४, पृ. ९६, नं. २० ; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १३१, नं. ११५८.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५०–२००.

सारांश.—"पलप याने पुवानद खेड्यातील १५ निवर्तने जमीन दान दिली. ही देणगी त्याने अपजित पंथाच्या उपयोगासाठी ठेवली."

व्यक्तिनामे.—(१) पलप—दान देणारा ; (२) पयोगोक—दान स्वीकारणारा अपराजित पंथीय.

ग्रामनामे.—पुवानद—ओळख पटत नाही.

३७०. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर येथील चैत्य लेण्याच्या समोर असलेल्या अष्टकोनी स्तंभावर आहे.

संदर्भ.—(१) साइक्स्, **ज. रॉ. ए. सो.**, १८३७, खंड ४, पृ. २८, नं. ३ ; (२) बर्ड, **हि. रि.**, १८४७, प्लेट ४९५ ; (३) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८५४, खंड ५, पृ. १६५,

नं. १५ ; (४) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ४५, नं. १० ; (५) बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं., १८८३, खंड ४, पृ. ९६, नं. २१ ; (६) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १३१, नं. ११५९.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५०–२००.

सारांश.—या लेखाचा सुसंगत अर्थ लागत नाही.

३७१. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर येथील शैलगृहातील कमानीयुक्त खिडकीच्या डाव्या बाजूला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो., १८५४, खंड ५, पृ. १६७, नं. १९, २० ; ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो., १८५६, खंड ५, पृ. ४२८ ; (२) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ४६, नं. १४ ; (३) बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं., १८८६, खंड ४, पृ. ९५, नं. २५ ; (४) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १३२, नं. ११६३.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५०–२००.

सारांश.—महाविज गावातील २६ निवर्तने शेत जंबू वृक्षांची लागवड करण्यासाठी, मानमुकड टेकडीजवळ दुसरे एक शेत ताड वृक्ष लावण्यासाठी, तसेच गावाच्या सीमेच्या आतील तिसरे एक शेत शाल वृक्षांच्या लागवडीसाठी अपराजित संघाच्या सिद्धगणांच्या स्वाधीन केले.

ग्रामनामे.—महावेज—ओळख पटत नाही.

३७२. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर येथील शैलगृहाच्या खिडकीच्या समोरच्या कमानीच्या डाव्या बाजूला कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो., १८५४, खंड ५, पृ. १६६, नं. १८ ; (२) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ४५, नं. १५ ; (३) बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं., १८८३, खंड ४, पृ. ९७, नं. २१ ; (४) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय., १०, १९०९–१०, पृ. १३२, नं. ११६४.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५०–२००.

सारांश.—"वाहत वचेडुक याची आम्रवृक्षांची लागवड करण्यासाठी दिलेली दोन निवर्तने जमिनीची देणगी."

व्यक्तिनामे.—वाहत वचेडुक—दान देणारा.

३७३. जुन्नर बौध्द शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर येथील शैलगृहात कमानीच्या उजव्या बाजूला कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रँ. रॉ. ए. सो.** १८५४, खंड ५, पृ. १६६, नं. १७ ; (२) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ४७, नं. १६ ; (३) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९७, नं. २७ ; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय.**, १०, १९०९–१०, पृ. १३२, नं. ११६५.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५०–२००.

सारांश.—वसकर आणि कासाकर यांच्या संघाजवळ (श्रेणी) ठेव ठेवली.

३७४. जुन्नर बौध्द शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर येथील शैलगृहाच्या खिडकीच्या उजव्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रँ. रॉ. ए. सो.**, १८५४, खंड ५, पृ. १६५, नं. १६ ; (२) बर्जेस व इंद्रजी, **इ. के. टे. वे. इ.**, १८८१, पृ. ४८, नं. १८ ; (३) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९७, नं. २८ ; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १३३, नं. ११६६.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५०–२००.

सारांश.—वलाहक व सेउरक या गावातील शेते करंज वृक्षाच्या लागवडीसाठी.

ग्रामनामे.—(१) वलाहक ; (२) सेउरक—ओळख पटत नाही.

३७५. जुन्नर बौध्द शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर शैलगृहामधील शिलालेख क्र. ३७१ च्या उजव्या बाजूला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ४८, नं. १८; (२) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९७, नं. २९ ; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १३३, नं. ११६७.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५०–२००.

सारांश.—हा लेख तुटक आहे. त्यामुळे सुसंगत अर्थ लावता येत नाही. वाचता येण्याजोग्या मजकुराचे भाषांतर असे—" वसरिखडकाच्या पश्चिमेस एक शेत; जंबु वृक्षांच्या लागवडीसाठी एक शेत. कोडक खेड्यातील एक शेत. "

ग्रामनामे.—कोडक—ओळख पटत नाही.

३७६. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर शैलगृहामध्ये दरवाजाच्या वर असलेल्या वर्तुळाकार भागावर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८५४, खंड ५, पृ. १६८, नं. २३, २४; (२) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ४९, नं. १९ ; (३) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९८, नं. ३० ; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १३३, नं. ११६८.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५०–२००.

सारांश.—या लेखामध्ये बऱ्याच देणग्या नमूद केल्या आहेत. परंतु त्याबद्दल सविस्तर माहिती दिलेली नाही.

३७७. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर येथील शैलगृहामध्ये आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, **हि. रि.**, १८४७, पृ. ४ ; (२) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ४४, नं. ८ ; (३) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९८, नं. ३१ ; (४) ल्युडर्स **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १३१, नं. ११५७.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५०–२००.

सारांश.—"गृहपतीचे पुत्र व बंधु यांची ५ खोल्यांची (पचगभ) पुण्यकारक देणगी."

३७८. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर शैलगृहातील मोठ्या कोनाड्याच्या मागच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, **हि. रि.**, १८४७, पृ. ४ ; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८५४, खंड ५, पृ. १६९, नं. २५ ; (३) कर्न, **इं. अँ.**, १८७७, खंड ६, पृ. ४०, नं. ७; (४) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ५१, नं. २४ ; (५) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९८, नं. ३३ ; (६) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १३४, नं. ११७३.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५०–२००.

सारांश.—"सिवसम याचा पुत्र सिवभूति याची कुंडाची देणगी."

व्यक्तिनामे.—१) सिवभूति (शिवभूति)–दान देणारा; २) सिवसम (शिवशर्मा)–सिवभतीचा पिता.

३७९. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.–हा लेख जुन्नर शैलगृहातील व्हरांड्याच्या बाहेर अष्टकोनी लहान स्तंभ व दरवाजा यांच्या मधल्या उजव्या बाजूच्या भिंतीवर आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इ.**, १८८१, पृ. ५१, नं. २३ ; (२) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९८, नं. ३४ ; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १३४, नं. ११७२.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५०–२००.

सारांश.—हा लेख त्रोटक आहे.

व्यक्तिनामे.—(१) सतमल ; (२) वीरभूती.

३८०. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर येथील टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या अपूर्ण चैत्य लेण्यासमोर असलेल्या अष्टकोनी स्तंभावर आहे.

संदर्भ.—(१) साइक्स्, **ज. रॉ. ए. सो.**, १८३७, खंड ४, पृ. २८८, नं. १ ; (२) बर्ड, **हि. रि.** १८४७, प्ले. नं. ४९ डी. ; (३) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८५४, खंड ५, पृ. १६५, नं. १३ ; (४) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**. १८८१, पृ. ४५, नं. ११ ; (५) बुल्हर व बर्जेस **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९६, नं. २२; (६) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १३२, नं. ११६०.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५०–२००.

सारांश.—या लेखाचा सुसंगत अर्थ लावता येत नाही.

३८१. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर येथील अर्धवट राहिलेल्या चैत्य लेण्याच्या समोर असलेल्या अष्टकोनी स्तंभाच्या आतल्या बाजूच्या जवळ कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) सिकस, **ज. रॉ. ए. सो.**, १८३७, खंड ४, पृ. २८८, नं. २ ; (२) बर्ड, **हि. रि.** १८४७, प्ले. नं. ४९. ५ ; (३) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८५४, खंड ५, पृ. १६५, नं. १४ ; (४) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ४५, नं. १२ ; (५) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९६, नं. २३ ; (६) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १३२, नं. ११६१.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १५० ते इ. स. १५०–३००.

सारांश.—हा लेख नीट वाचता येत नाही.

३८२. जुन्नर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख जुन्नर शैलगृहातील दरवाजावर असलेल्या मोकळचा जागेत डाव्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो., १८५४, खंड ५, पृ. १६७, नं. २१; (२) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ४५, नं. १३ ; (३) बुल्हर व बर्जेस, अ. स. वे. इं. १८८३, खंड ४, पृ. ९६, नं. २४ ; (४) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १३२, नं. ११६२.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

सारांश.—कोणाचिक श्रेणीत उपासक आडुथूम शक याने वडालिका गावात करंज वृक्षासाठी २० निवर्तने व कटपुतक गावात वटवृक्षासाठी नऊ निवर्तने जमीन दिली.

व्यक्तिनामे.—आडुथूम—शक उपासक.

ग्रामनामे.— (१) वडालिका—जुन्नरपासून उत्तरेस ६ मैलांवरील वराड असावे; (२) कटपुतक—जुन्नरच्या नैऋत्येस ५ मैलांवर असलेले कतुर असावे.

३८३. जेजुरी ताम्रपट, विनयादित्य

जिल्हा—**पुणे** तालुका—**सासवड**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट जेजुरी येथे सापडला.

संदर्भ.—भांडारकर, डी. आर्., इ. आय्., १९२७–२८, खंड १९, पृ. ६२–६५.

भाषा व लिपी.—संस्कृत, दाक्षिणात्य वळणाची लिपी.

राजवंश व राजा.—बदामीचा चालुक्य नृपती विनयादित्य.

वर्ष व तिथी.—शके ६०९ (गत वर्ष), ९ वे शासन वर्ष, इ. स. ६८७.

सारांश.—प्रस्तुत ताम्रपट पश्चिम चालुक्य नृपती विनयादित्य याच्या कारकीर्दीतील आहे व त्याने हा पळयट्ठानजवळ असलेल्या भाडली या खेड्यात तळ असताना दिलेला आहे. या लेखाचा मुख्य उद्देश राजाने पळयट्ठान विषयातील सातिमाळ भोग प्रदेशांतील नीरा नदीच्या तीरावरील कलहट्ठान, परांचिक व हरिणयिग या गावांच्या मध्ये वसलेले वीर नामक खेडे कौंडिण्य गोत्री पांचालशर्मन् याचा पुत्र अल्लशर्मन् याला दान दिले हे नमूद करण्याचा होता.

व्यक्तिनामे.—(१) पुलकेशी वल्लभ—चालुक्य नृपती ; (२) कीर्तिवर्मन्—चालुक्य नृपती पुलकेशीचा पुत्र ; (३) सत्याश्रय—चालुक्य नृपती, कीर्तिवर्म्याचा पुत्र ; (४) हर्षवर्धन—सत्याश्रयाने जिंकलेला उत्तरापथेश्वर ; (५) विक्रमादित्य—चालुक्य नृपती, सत्याश्रयाचा पुत्र ; (६) विनयादित्य—दान देणारा चालुक्य नृपती, विक्रमादित्याचा पुत्र ; (७) अल्लशर्मन्—दान स्वीकारणारा कौंडिण्य गोत्री ब्राह्मण; (८) पांचालशर्मन्—अल्लशर्म्याचा पिता ; (९) दुर्गशर्मन्—अल्लशर्म्याचा पितामह ; (१०) भम्मणराज—दानासाठी विनंती करणारा.

ग्रामनामे.—(१) पळयट्ठान—हल्लीचे फलटण ; (२) भाडली—फलटणच्या आग्नेयेस ५ मैलांवर असलेले भाडळी बुद्रुक ; (३) वीर—नीरा नदीच्या उत्तरेस दीड मैलावर असलेले हल्लीचे वीर गाव ; (४) कलहट्ठान—ओळख पटत नाही ; (५) हरिणयिग—वीरच्या ईशान्येस अडीच मैलांवर असलेले हल्लीचे हरणी ; (६) परांचिक—वीरच्या आग्नेयेस ३ मैलांवर असलेले परिंचे.

३८४. जोगेश्वरी शैलगृह शिलालेख

जिल्हा—ठाणे तालुका—सालसेट

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख जोगेश्वरी येथील शैलगृहातील स्तंभयुक्त व्हरांड्यात उजव्या टोकाला असलेल्या आसनाच्या पाठीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो., १८६१, खंड ६, पृ. १४, नं. ६३ ; (२) ल्युडर्स अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १०९, नं. १०३६.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखातील 'गहपट्टिकराज' ही अक्षरे फक्त वाचता येतात.

३८५. झरिका ताम्रपट, राष्ट्रकूट गोविंद (तृतीय), शके ७२५

जिल्हा—अकोला तालुका—मूर्तिजापूर

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट सिरस येथे ॲ. गुलाबराव देशमुख यांना मिळाला.

संदर्भ.—कोलते, वि. भि., इ. आय्., १९५७–५८, खंड ३२, पृ. १५७–१६४.

भाषा व लिपी.—संस्कृत, प्राचीन देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती गोविंद (तृतीय).

वर्ष व तिथी.—शके ७२५ (गत वर्ष), कार्तिक पौर्णिमा, चंद्रग्रहण ; २ नोव्हेंबर, इ. स. ८०३.

सारांश.—राष्ट्रकूट नृपती गोविंद (तृतीय) याने हे दानपत्र तुंगभद्रा नदीच्या काठावर असलेल्या अलमपुरजवळील त्याच्या विजयी तळावरून दिले आहे. हे दान धाराशिवनिवासी काश्यप गोत्री रिसियप भट्ट याला दिले आहे. दान दिलेल्या खेड्याचे नाव झरिका असे होते. हे दानपत्र राजाच्या उपस्थितीत देवय्य नामक अधिकारी व सेनापती गौड याचा पुत्र कुक्काय्य यांनी लिहिले.

व्यक्तिनामे.—(१) गोविंदराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती ; (२) कर्कराज—राष्ट्रकूट नृपती, गोविंदराज (प्रथम) चा पुत्र ; (३) इंद्रराज—राष्ट्रकूट नृपती, कर्कराजाचा पुत्र ; (४) दंतिदुर्गराज—राष्ट्रकूट नृपती, इंद्रराजाचा पुत्र ; (५) कृष्णराज —राष्ट्रकूट नृपती, कर्कराजाचा पुत्र ; (६) राहप्प—कृष्णराजाने पराभूत केलेला राजा ; (७) गोविंदराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, कृष्णराजाचा पुत्र ; (८) ध्रुवराज निरुपम—राष्ट्रकूट नृपती गोविंदराज (द्वितीय) चा धाकटा भाऊ ; (९) गोविंदराज (तृतीय)—राष्ट्रकूट नृपती, ध्रुवराज निरुपम याचा पुत्र ; (१०) भट्ट रिसियप—दान स्वीकारणारा काश्यप गोत्री त्रैविद्य ब्राह्मण. बह्वृच शाखा ; (११) भट्ट अन्नस्वामी—भट्ट रिसियप याचा पिता ; (१२) कुक्काय्य—लेख लिहिणारा ; (१३) गौड—बलाधिकृत, कुक्काय्य याचा पिता ; (१४) देवय्य—महाक्षपटलाधिप.

ग्रामनामे.—(१) झरिका—यवतमाळ जिल्ह्यातील केळापुर तालुक्यातील हल्लीचे झरी ; (२) अलमपुर—अलमपुर रोड रेल्वे स्टेशनजवळ असलेले हल्लीचे अलमपुर ; (३) पोण—वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्यात वर्धा नदीच्या तीरावरील हल्लीचे पोहना ; (४) तलुती—झरीच्या पूर्वेस ३ मैलांवर असलेले तरोडी ; (५) विदुराम्र—झरीच्या दक्षिणेस ४ मैलांवर असलेले उंबरी ; (६) मारग्राम—झरीच्या उत्तरेस ५ मैलांवर असलेले मारेगाव ; (७) तलभी—ओळख पटत नाही ; (८) धाराशिव.

३८६. ठाणे ताम्रपट शिलाहार अरिकेसरी

जिल्हा—ठाणे

तालुका—ठाणे

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट ठाणे येथील किल्ल्यामध्ये काही खोदकाम चालू असताना मिळाला.

संदर्भ.—(१) कारनाक व रामलोचन पंडित, **एशियाटिक रिसर्चेस,** १८०१, खंड १, पृ. ३५६–३६७; (२) किलहॉर्न, **इं. स. इं.,** पृ. ५५, नं. ३०६.

भाषा व लिपी.—संस्कृत, नागरी.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती अरिकेसरी.

वर्ष व तिथी.—चैत्र शुद्ध १५, पिंगल संवत्सर, शके ९४०, इ. स. १०१८.

सारांश.—हे शासन शिलाहार नृपती अरिकेसरी याच्या अमदानीतील आहे. याचा उद्देश काविनार हे गाव चितपैय्यचा पुत्र तिक्कपैय्य याला यज्ञकर्मे करण्यासाठी दान दिले हे नमूद करणे हा होता. हे शासन नागलैवच्या भावाचा पुत्र जोउब याने लिहिले व वेदपैय्यपुत्र मान भारपैय्य याने कोरले.

व्यक्तिनामे.—(१) कपर्दिन् (प्रथम)—शिलाहार नृपती; (२) पुल्लशक्ति—शिलाहार नृपती ; (३) कपर्दिन् (द्वितीय) शिलाहार नृपती, पुल्लशक्तीचा पुत्र ; (४) वप्पुवन्न—शिलाहार नृपती; (५) झंझ—शिलाहार नृपती, वप्पुवन्नाचा पुत्र; (६) गोग्गिराज—शिलाहार नृपती, झंझाचा भाऊ; (७) वज्जड (प्रथम)—शिलाहार नृपती, गोग्गिराजाचा पुत्र; (८) अपराजित—शिलाहार नृपती, वज्जड (प्रथम) चा पुत्र; (९) वज्जड (द्वितीय)—शिलाहार नृपती, अपराजिताचा पुत्र; (१०) अरिकेसरी—शिलाहार नृपती, वज्जड (द्वितीय) चा भाऊ; (११) तिक्कपैय्य—दान स्वीकारणारा ब्राह्मण; (१२) चितपैय्य—तिक्कपैय्यचा पिता; (१३) जोउब—लेख लिहिणारा; (१४) नागलैव—जोउबाचा चुलता; (१५) मान भारपय्य—लेख कोरणारा; (१६) वेदपैय्य—मान भारपैय्य याचा पिता.

ग्रामनामे—काविनार—ओळख पटत नाही.

३८७. ठाणे ताम्रपट, शिलाहार नागार्जुन

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट ठाणे शहराच्या सीमेवर पंच-पाखाडी नावाच्या वस्तीत एप्रिल १९६५ मध्ये मिळाला. 'मेसर्स शक्ति प्रिंटिंग अँड डाईंग वर्क्स प्रा. लिमिटेड' यांच्या मालकीच्या तलावात हा ताम्रपट पडला होता.

संदर्भ.—दीक्षित, मो. गं., **इ. आय्;** १९६८, खंड ३७, भाग ६, पृ. २४७–२५६.

भाषा व लिपी.—संस्कृत, नागरी.

राजवंश व राजा.—शिलाहार नागार्जुन.

वर्ष व तिथी.—शके ९६१, प्रमाथी संवत्सर, बुधवार, श्रावण कृष्ण १५, सूर्यग्रहण; २७ ऑगस्ट, इ. स. १०३९.

सारांश.—या ताम्रपटात नागार्जुन याने गोकर्ण पंडिताचा पुत्र माधव पंडित या पाराशर गोत्री आणि यजुर्वेद शाखेच्या ब्राह्मणास कोरियल १२ मधील मुंजवली येथील काही जमीन दान दिली असल्याचे नमूद केले आहे. हे दान त्याने स्वकल्याणार्थ केले. त्याचा विनियोग रोजच्या व इतर धार्मिक कार्यासाठी आणि त्याच्या कुटुंबासाठी व्हावा असे सांगितले आहे. हे दान घेण्यासाठी माधव पंडित मध्यदेशातील हस्तिग्रामहून आला होता.

व्यक्तिनामे.—(१) जीमूतवाहन—शिलाहार घराण्याचा मूळ पुरुष, जीमूतकेतूचा पुत्र; (२) कपर्दिन् (प्रथम)—शिलाहार नृपती; (३) पुल्लशक्ति—शिलाहार नृपती; कपर्दिन् (प्रथम) चा पुत्र; (४) कपर्दिन् (द्वितीय)—शिलाहार नृपती, पुल्लशक्तीचा पुत्र;

(५) वप्पुवन्न—शिलाहार नृपती, कर्पदिन् (द्वितीय) चा पुत्र; (६) झंझराज—शिलवहा नृपती, वप्पुवन्नाचा पुत्र (७) गोग्गिराज—शिलाहार नृपती, झंझराजाचा भाऊ; (८) वज्जडदेर (प्रथम)—शिलाहार नृपती, गोग्गिराजाचा पुत्र; (९) अपराजित—शिलाहार नृपती, वज्जडदेव (प्रथम) चा पुत्र; (१०) वज्जडदेव (द्वितीय)—शिलाहार नृपती, अपराजिताचा पुत्र; (११) अरिकेसरी—शिलाहार नृपती, वज्जडदेव (द्वितीय) चा भाऊ; (१२) छित्तराज—शिलाहार नृपती, वज्जडदेव (द्वितीय) चा पुत्र; (१३) नागार्जुन—दान देणारा शिलाहार नृपती, छित्तराजाचा धाकटा भाऊ; (१४) दद्धपैय—महामात्य; (१५) सोढलैय—महासांधिविग्रहिक; (१६) नागलैय—महाकवि, भांडागारसेन; (१७) जोगपैय—लेख लिहिणारा भांडागारसेन, नागलैयाचा पुतण्या; (१८) माधव पंडित—दान स्वीकारणारा पाराशर. गोत्री ब्राह्मण, यजुर्वेद शाखा; (१९) गोकर्ण पंडित—माधव पंडिताचा पिता; (२०) गोम्म—अपराजिताने आश्रय दिलेला; (२१) ऐयपदेव—अपराजिताने मदत केलेला राजा; (२२) भिल्लम—अपराजिताने अभय दिलेला राजा; (२३) अम्मण—अपराजिताने अभय दिलेला राजा; (२४) मम्बुव—अपराजिताने अभय दिलेला राजा.

ग्रामनामे.—(१) हस्तिग्राम—ओळख पटत नाही; (२) मध्यदेश—हल्ली चामध्य प्रदेश; (३) वंगणी—मुंबई-पुणे रेल्वे लाईनवरील वांगनी हे स्टेशन; (४) मुंजवली—वांगनी गावाच्या उत्तरेस २ मैलांवर असलेला ओसाड प्रदेश; (५) दोणा—मुंजवलीच्या पूर्वेस दीड मैलांवरील हल्लीचे दोणा; (६) धवला—मुंजवलीच्या पूर्वेस १ मैलावरील धवला; (७) कुडिसवरा—मुंजवलीच्या उत्तरेस २ मैलांवरील खेडे; (८) कोरियल १२— ओळख पटत नाही. हे बहुधा वांगनीच्या पश्चिमेस २ मैलांवरील हल्लीचे गोरेला किंवा गोरियली असावे.

विशेष महत्त्व.—आतापर्यंतच्या शिलाहार शिलालेखात नागार्जुन राजाचा उल्लेख मिळत असे. परंतु त्याचा स्वतःचा लेख मिळालेला नव्हता. तो या ताम्रपटाने उपलब्ध झाला.

३८८. ठाणे ताम्रपट, शिलाहार मुम्मुणिराज

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट ठाणे येथे चर्च आणि जिल्हा ऑफिस यांच्यामध्ये खणत असताना १९५६ साली मिळाला. हा सध्या प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, मुंबई येथे आहे.

संदर्भ.—मिराशी, वा. वि., इ. आय्., १९६९, खंड ३८, भाग ४, पृ. १४५–१६४.

भाषा व लिपी.—संस्कृत, नागरी.

राजवंश व राजा.—शिलाहार मुम्मुणिराज.

वर्ष व तिथी.—फाल्गुन शुद्ध पौर्णिमा, शके ९७०, सौर वर्ष सर्वधारी, २० फेब्रुवारी, इ. स. १०४९.

सारांश.—या दानपत्राचा उद्देश शिलाहार नृपती मुम्मुणिराज याने महाराणी पद्मै हिच्या धार्मिक कल्याणासाठी दान दिले हे नमूद करण्याचा आहे. करहाटक, एकसाल, भूतवली, वडवली, आसलग्राम, अंबरवल्ली या ठिकाणाहून आलेल्या १४ ब्राह्मणांना बरेटिका विषयातील खेड्यांचा महसूल प्रत्येक घराला एक द्रम्म आणि एक कुमार गद्याणक याप्रमाणे दान दिला. याशिवाय अभ्यंतर षट्षष्टि विषयातील मूलंड बोरियाली आणि शूर्पारक षट्षष्टि विषयातील बृहद्-आडनिका, लघु-आडनिका, खानुवडा, पेढाल आणि वीरार या पाच खेड्यांचा महसूल द्रम्म आणि धान्याच्या स्वरुपात मध्य प्रदेश, करहाट आणि पुरी या ठिकाणांहून आलेल्या ७ ब्राह्मणांना दान केल्याचा उल्लेख आहे. या दानाचा विनियोग या ब्राह्मणांनी पंच महायज्ञ, इतर यज्ञ आणि स्वतःच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी करावा. हा लेख भांडागारसेन जो उपैय प्रधान याने लिहिला.

व्यक्तिनामे.—(१) जीमूतवाहन—शिलाहार घराण्याचा मूळ पुरुष, जीमूतकेतूचा पुत्र; (२) कर्पदिन् (प्रथम)—शिलाहार नृपती; (३) पुल्लशक्ति—शिलाहार नृपती, कर्पदिन् (प्रथम)

चा पुत्र ; (४) लघु कपर्दिन् (कपर्दिन् द्वितीय)—शिलाहार नृपती, पुल्लशक्तीचा पुत्र; (५) वप्पुवन्न—शिलाहार नृपती, लघुकपर्दीचा पुत्र ; (६) झंझराज—शिलाहार नृपती; वप्पुवन्नाचा पुत्र ; (७) गोग्गिराज—शिलाहार नृपती, झंझराजाचा भाऊ ; (८) वज्जडदेव (प्रथम)—शिलाहार नृपती, गोग्गिराजाचा पुत्र ; (९) अपराजित—शिलाहार नृपती, वज्जडदेव (प्रथम) चा पुत्र ; (१०) वज्जडदेव (द्वितीय)—शिलाहार नृपती, अपराजिताचा पुत्र; (११) अरिकेसरी—शिलाहार नृपती, वज्जडदेव (द्वितीय) चा भाऊ ; (१२) छित्तराज—शिलाहार नृपती, वज्जडदेव (द्वितीय) चा पुत्र ; (१३) नागार्जुन—शिलाहार नृपती, छित्तराजाचा धाकटा भाऊ ; (१४) मुम्मुणिराज—दान देणारा शिलाहार नृपती, छित्तराजाचा धाकटा भाऊ ; (१५) पद्मै—पट्टमहाराणी.

दान स्वीकारणाऱ्या ऋग्वेदशाखीय ब्राह्मणाचे नाव	वडिलांचे नाव	गोत्र	मूळ गाव
(१६) नारायण पंडित	(१७) तिक्कपैय	जमदग्नि-वत्स	
(१८) रांब पंडित (नारायण पंडिताचा भाऊ)	तिक्कपैय	—,,—	
(१९) लक्ष्मीधर पंडित	तिक्कपैय	—,,—	
(२०) गोपति पंडित	रांब पंडित	—,,—	
(२१) केशवभट्ट (कर्णाट)	. . .	. . .	
(२२) धारेश्वरभट्ट	(२३) माधवभट्ट	जमदग्नि-वत्स	
(२४) नारायणभट्ट	(२५) गोवर्धनभट्ट	गार्ग्य	
(२६) चक्रपाणिभट्ट	(२७) द्रोणभट्ट	कपि	
(२८) माधव (ज्योतिर्विद)	(२९) दांउपैय्य	आत्रेय	
(३०) वांबदेवभट्ट	(३१) रिसियपभट्ट	—,,—	
(३२) वाम्बण	(३३) तीकपैय	—,,—	
(३४) वावलैय	(३५) दांउपैय	काश्यप	
(३६) जनार्दनभट्ट	(३७) वेव्वल (षडंगवित्)	—,,—	
(३८) दिवाकरैय	(३९) सिद्धपैय	भारद्वाज	
(४०) दद्दपैय	(४१) ब्रह्मनायक	गार्ग्य	(मध्यप्रदेश)
(४२) वाप्यैय	(४३) धालन (षडंगवित्)	वासिष्ठ	(करहाट)
(४४) दांउपैय	(४५) रिसियपैय	काश्यप	—,,—
(४६) नागदेवय		—,,—	—,,—
(४७) लोकपैय	(४८) वावणय	—,,—	—,,—
(४९) गोविंदैय	(५०) महिधरैय	जमदग्नि-वत्स	—,,—
(५१) नन्नपैय	(५२) मधुवलैय	भारद्वाज	पुरी

एच १५–१२

(५३) जोउपैय—प्रशस्ती लिहिणारा ; भांडागारसेन महाकवि वागलैय याच्या भावाचा पुत्र.

ग्रामनामे.—(१) वरेटिका विषय—कुलाबा जिल्ह्यातील कर्जत तालुका असावा ; (२) एकसाल—सेंट्रल रेल्वेच्या भिवपुरी रोड रेल्वे स्टेशनच्या उत्तरेस १—१।। मैलांवरील एकसाल ; (३) वडवली—एकसालच्या दक्षिणेस १ मैलावरील वडवली ; (४) भूतवली—वडवलीच्या नैऋत्येस १ मैलावरील भूतवली ; (५) आसल—भूतवलीच्या उत्तरेस एका फर्लांगावरील आसल ; (६) विकराल—आसलच्या उत्तरेस २ फर्लांगावर असलेले सध्याचे बेकरे ; (७) ऊंबरवली—भिवपुरी रोड स्टेशनच्या दक्षिणेस एका मैलावरील उमरोली ; (८) आभ्यंतर षट्षष्टि विषय—ठाणे आणि वसईच्या खाड्यांमधील भाग ; (९) शूर्पारक षट्षष्टि विषय—सध्याचा सोपाऱ्या जवळचा भाग ; (१०) मूलंड—सध्याचे मुलुंड ; (११) वोरियली—सध्याचे ठाणे जिल्ह्यातील बोरिवली ; (१२) काढेवली पल्लिका—ठाण्याच्या पश्चिमेस ६ मैलावरील कांडिवली असावे ; (१३) मनिग्राम—बोरिवली जवळचे मनोरी असावे ; (१४) खानुवडा—मानेग्रामच्या पूर्वेस असलेले खानिवडे असावे ; (१५) बृहद् आडनिका व लघु आडनिका—सध्याचे आडणे. विरारच्या पूर्वेस ८।। मैलांवर व सोपाऱ्याच्या उत्तरेस ५ मैलांवर एका छोट्या प्रवाहामुळे याचे दोन भाग झाले आहेत ; (१६) वीरार—सध्याचे विरार ; (१७) पेढाल—वसईच्या ईशान्येस ८ मैलांवरील पेल्हार ; (१८) पुरी—शिलाहार राजांची पूर्वीची राजधानी. जंजिऱ्याजवळची राजापुरी असावे.

३८९. ठाणे शिलालेख, शिलाहार अपरादित्य (द्वितीय)

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख कोठे सापडला हे निश्चित सांगता येत नाही. सध्या हा शिलालेख प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, मुंबई येथे आहे.

संदर्भ.—इंद्रजी, **बॉ. गॅ.**, खंड १, भाग २, पृ. २०, नोंद २ ; (२) डिसकळकर, द. बा., **अ. भा. ओ. रि. इं.**, खंड ५, पृ. १६९—७० ; (३) सांकलिया व उपाध्याय, **इ. आय.**, १९३५—३६, खंड २३, पृ. २७७—७८, नं. ४३ ; (४) तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.**, १९६३, पृ. ७७—७९, नं. १५.

भाषा व लिपी.—संस्कृत-मराठी मिश्र, इ. स. १२ व्या शतकातील देवनागरी.

राजवंश व राजा.— शिलाहार नृपती अपरादित्य (द्वितीय).

वर्ष व तिथी.—रविवार, चैत्र शुद्ध १५, विश्वावसु संवत्सर, शके ११०७ ; १७ मार्च, इ. स. ११८५.

सारांश.—हा लेख अपरादित्य याच्या अमदानीतील असून महामात्य भास्कर नायकाचा पुत्र लक्ष्मण नायक याने काही विशिष्ट काळाकरता स्थानकीय पाटन येथील शेताचे उत्पन्नातील ४ द्रम्म व परमेश्वर सोमनाथाचे पूजेसाठी भाताच्या शेताच्या उत्पन्नातील २८ द्रम्म देणगी दिल्याचे नमूद केले आहे. चाहडदेव याने हे दान घेतले.

व्यक्तिनामे.—(१) अपरादित्यदेव—शिलाहार नृपती ; (२) लक्ष्मण नायक—दान देणारा ; (३) भास्कर नायक—लक्ष्मण नायकाचा पिता, महामात्य ; (४) चाहडदेव—दान स्वीकारणारा.

ग्रामनामे.—स्थानकीय पाटन—सध्याचे ठाणे.

३९०. ठाणे ताम्रपट, यादव नृपती रामचंद्रदेव

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट ठाणे येथील कबरस्तानात कबर तयार करीत असताना मिळाला.

संदर्भ.—(१) वाथेन, **ज. रॉ. ए. सो.**, (First Series), खंड २, पृ. ३८८, **ज. रॉ. ए. सो.**, खंड ५, पृ. १८३, नं. १० ; (२) बार्नेट, एल्. डी., **इ. आय्.**, १९१५—१६, खंड १३, पृ. १९८—२०६.

भाषा व लिपी.—संस्कृत, तत्कालीन नागरी.

राजवंश व राजा.—यादव नृपती रामचंद्रदेव.

वर्ष व तिथी.—अश्विन शुद्ध ५, रविवार, अंगिरस संवत्सर, शके ११९४. फ्लीटच्या मते तारीख चुकीची ठरते.

सारांश.—हा ताम्रपट देवगिरीचा यादव राजा रामचंद्रदेव याच्या अमदानीतील आहे. या शासनाचा मुख्य उद्देश कोकणचा अधिकारी अच्युत नायक याने वउल हे गाव ३२ ब्राह्मणांना दान दिले हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) भिल्लम—यादव नृपती; (२) जैत्रपाल—यादव नृपती; (३) सिंघण—यादव नृपती, जैत्रपालाचा पुत्र; (४) कृष्ण—यादव नृपती; (५) महादेव—यादव नृपती, कृष्णाचा धाकटा भाऊ; (६) रामचंद्र—यादव नृपती, कृष्णाचा पुत्र; (७) हेमाद्रि—मुख्य मंत्री; (८) जल्हण—गौतम गोत्री, हेमाद्रीचा पूर्वज (मोठा भाऊ?); (९) अच्युत नायक—दान देणारा कोकणचा अधिपती; (१०) मूधुगि—अच्युत नायकाचा पिता.

दान स्वीकारणाऱ्या ब्राह्मणाचे नाव	वडिलांचे नाव	गोत्र
(११) विष्णु दीक्षित	(१२) भानु	गार्ग्य
(१३) आऊप्रभु	(१४) विष्णुप्रभु	जामदग्न्य-वत्स
(१५) वाच्छ्नायक	(१६) राघव नायक	अत्रि
(१७) वासुदेवभट्ट	(१८) मारसिंह पंडित	जामदग्न्य-वत्स
(१९) खेतमाचार्य	(२०) कृष्णाचार्य	वसिष्ठ
(२१) नागदेभट्ट	(२२) माधवभट्ट	जामदग्न्य-वत्स
(२३) अऊभट्ट	(२४) सोमनाथ घैसास	गौतम
(२५) नागदेभट्ट	(२६) पुरुषोत्तमभट्ट	भारद्वाज
(२७) कान्हुपाध्ये	(२८) दामोदर उपाध्याय	चंद्रात्रेय
(२९) त्रिविक्रम घैसास	(३०) वासुदे घैसास	काश्यप
(३१) रामेश्वरभट्ट	(३२) सोमदेभट्ट	भारद्वाज

ग्रामनामे.—(१) सासटि—हल्लीचे सालसेट, जिल्हा ठाणे; (२) वऊल—ठाण्याच्या वायव्येस ५ मैलांवरील वऊल; (३) कामेश्वर-वऊलच्या आग्नेयेस १ मैलावर असलेले कवेश्वर; (४) द्वारवती—ओळख पटत नाही.

३९१. ठाणे ताम्रपट, यादव रामचंद्रदेव

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट ठाण्याजवळ सापडला.

संदर्भ.—वाथेन, ज. रॉ. ए. सो. (ओ. सि.), खंड ५, पृ. १७८–१८३ (१८३९).

भाषा व लिपी.—संस्कृत, नागरी.

राजवंश व राजा.—यादव नृपती रामचंद्रदेव.

वर्ष व तिथी.—वैशाख शुद्ध १५, पौर्णिमा, भौमवार, विरोधी संवत्सर, शालिवाहन शके १२१२

सारांश.—या शासनाचा मुख्य उद्देश कोकणचा अधिपती कृष्णदेव याने वेदपठण करणाऱ्या ब्राह्मणांना अंजारे हे गाव दान दिले हे नमूद करण्याचा होता. हे शासन माधव पंडित याने लिहिले.

व्यक्तिनामे.—(१) भिल्लम—यादव नृपती; (२) जैत्रपाल—यादव नृपती; (३) सिंघण—यादव नृपती, जैत्रपालाचा पुत्र; (४) जैत्रपाल (द्वितीय)—यादव नृपती; (५) कृष्ण—यादव नृपती; (६) महादेव—यादव नृपती, कृष्णाचा धाकटा भाऊ; (७) रामचंद्र—यादव नृपती, कृष्णाचा पुत्र, (८) एकदेव पंडित—महामात्य; (९) कृष्णदेव—दान देणारा कोकणाधिपती; (१०) बमिदेव—कृष्णदेवाचा पिता, (११) पद्मनाभ—कृष्णदेवाचा पितामह, भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (१२) माधव पंडित-लेख लिहिणारा; (१३) कंकरदेव—दानपत्र लिहिण्याची आज्ञा देणारा.

ग्रामनामे.—अंजारे—ओळख पटत नाही.

३९२. ठाणेगाव शिलालेख

जिल्हा—**वर्धा** तालुका—**आर्वी**

प्राप्तिस्थळ.—हा लेख ठाणेगाव येथील देवीच्या मंदिरात कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) कझिन्स, **अॅ. रि. सी. पी. अँड बी.**, पृ. ११; (२) हिरालाल, **इं. सी. पी. अँड बी.** पृ. १०, नं. ११.

भाषा व लिपी.—संस्कृत, देवनागरी (?).

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—शालिवाहन संवत्, ११४५, इ. स. १२२३.

सारांश.—यामध्ये तत्कालीन अधिकाऱ्यांची नावे दिलेली आहेत.

३९३. डोंगरगांव शिलालेख, परमार जगद्देव

जिल्हा—**यवतमाळ** तालुका—**पुसद**

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख डोंगरगाव येथे मिळाला.

संदर्भ.—मिराशी, वा. वि., **इ. आय्.**, १९४१–४२, खंड २६, पृ. १७७–१८५.

भाषा व लिपी.—संस्कृत, नागरी.

राजवंश व राजा.—परमार नृपती जगद्देव.

वर्ष व तिथी.—चैत्र १५, शके १०३४, नंदन संवत्सर, शुक्रवार, १५ मार्च, इ. स. १११२.

सारांश.—हा शिलालेख परमार नृपती जगद्देव याच्या कालातील आहे. या लेखाचा उद्देश जगद्देव याने श्रीनिवास या ब्राह्मणाला डोंगरगाव दान दिले, या गावी त्या ब्राह्मणाने एक देवालय बांधले व आपला पिता श्रीनिधि याला पुण्यप्राप्ती व्हावी या उद्देशाने त्या देवालयात शिवाची स्थापना केली हे सांगण्याचा होता. हा लेख विश्वस्वामी याने लिहिला. या लेखात परमार जगद्देव याची वंशावळही सांगितली आहे.

व्यक्तिनामे.—(१) परमार—परमार घराण्याचा मूळ पुरुष; (२) भोज—परमार नृपती; (३) उदयादित्य—परमार नृपती, भोजाचा भाऊ; (४) जगद्देव—दान देणारा परमार नृपती, उदयादित्याचा पुत्र; (५) श्रीनिवास—दान स्वीकारणारा ब्राह्मण; (६) श्रीनिधि—श्रीनिवासाचा पिता; (७) विश्वस्वामी—लेख लिहिणारा.

ग्रामनामे.—(१) डोंगरग्राम—ज्या ठिकाणी लेख सापडला ते पुसदजवळील डोंगरगाव.

३९४. तडखेळ शिलालेख, चालुक्य सोमेश्वर (प्रथम)

जिल्हा—**नांदेड** तालुका—**देगलूर**

प्राप्तिस्थळ.—दिलेले नाही.

संदर्भ.—इ. अं. रि., १९५८–५९, पृ. ६०, नं. २०(१).

भाषा व लिपी.—दिलेली नाही.

राजवंश व राजा.—कल्याणचा चालुक्य नृपती त्रैलोक्यमल्ल सोमेश्वर (प्रथम).

वर्ष व तिथी.—शके ९६९, इ. स. १०४७.

सारांश.—हा लेख त्रैलोक्यमल्ल सोमेश्वराच्या अमदानीतील असून यामध्ये नागवर्मन् व कालिमय्य या वाजी कुलातील सरदारांची नावे आलेली आहेत.

व्यक्तिनामे.—(१) त्रैलोक्यमल्ल सोमेश्वर (प्रथम)—चालुक्य नृपती ; (२) नागवर्मन्–वाजी कुलातील सरदार ; (३) कालिमय्य (कलिमय्य)—वाजी कुलातील सरदार.

३९५. तडखेळ शिलालेख, चालुक्य सोमेश्वर (द्वितीय)

प्राप्तिस्थळ.—दिलेले नाही.

संदर्भ.—इं. अ. रि., १९५८–५९, पृ. ६०, नं. २०(२).

भाषा व लिपी.—दिलेली नाही.

राजवंश व राजा.—कल्याणचा चालुक्य नृपती भुवनैकमल्ल सोमेश्वर (द्वितीय).

वर्ष व तिथी.—शके ९९३, इ. स. १०७०.

सारांश.—या लेखात नागवर्मन् व कालिमय्य या सरदारांची नावे आली आहेत.

व्यक्तिनामे.—(१) भुवनैकमल्ल सोमेश्वर (दुसरा)—चालुक्य नृपती ; (२) नागवर्मन्–वाजी कुलातील सरदार ; (३) कालिमय्य—वजी कुलातील सरदार.

३९६. तडवळ शिलालेख, यादव कन्हरदेव

जिल्हा—**सोलापूर** तालुका—**अक्कलकोट संस्थान**

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेला शिलाखंड तडवळ येथील मल्लिकार्जुनाच्या देवालयात पडलेला होता.

संदर्भ.—पंचमुखी, आर्. एस्., **कर्नाटक इन्स**. १९५३, खंड २, पृ. १४१–१४४.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—यादव नृपती कन्हरदेव.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. चे १३ वे शतक.

सारांश.—प्रस्तुत लेख दोन भागात आहे.—(१) या भागात श्री सिद्धनाथ हे नाव आलेले आहे ; (२) या भागात कन्हरदेवाचा उल्लेख आलेला असून सोन्नलिगे येथील कपिलसिद्ध मल्लिकार्जुनाच्या देवालयाला दिलेल्या काही देणग्या नमूद केल्या आहेत.

व्यक्तिनामे.—(१) कन्हरदेव—यादव नृपती ; (२) चेटरस—कन्हरदेवाचा अधिकारी ;

(३) कुचरस—कन्हरदेवाचा अधिकारी.

ग्रामनामे.—सोन्नलिगे—हल्लीच्या सोलापूर शहराचे उपनगर.

३९७. तळाले ताम्रपट, शिलाहार गंडरादित्य

जिल्हा—**कोल्हापूर**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट तळाले येथील शेतात रामचंद्र अप्पाजी नामक गृहस्थाला सापडला.

संदर्भ.—(१) इंद्रजी, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८७७–७८, खंड १३, पृ. १–१७; (२) किलहॉर्न, **इं. स. इं.**, पृ. ५७, नं. ३१७.

भाषा व लिपी.—संस्कृत, नागरी.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती गंडरादित्य.

वर्ष व तिथी.—(१) मंगळवार, माघ शुद्ध १०, विरोधी संवत्सर, शके १०३२; १ फेब्रुवारी; इ. स. १११० ; (२) वैशाख पौणिमा, विकृत संवत्सर, शके १०३३, चंद्रग्रहण, गुरुवार, ५ मे इ. स. १११०.

सारांश.—प्रस्तुत शासनात राजाने १६ भिन्न गोत्रीय ब्राह्मणांना कन्यादान केले व या प्रसंगी ब्राह्मणांना काही जमीन वृत्ति दिल्याचे नमूद केले आहे. नंतर दुसऱ्या वर्षी, विकृत संवत्सर असताना त्याने आणखी दोन वृत्ति दिल्या, आपण स्थापन केलेली मंदिरे, जमिनी दिल्या व गूडालय या गावच्या वंशपरंपरागत असलेल्या अधिकाऱ्यासही काही देणग्या दिल्याचे या लेखात नमूद केले आहे. हे शासन दामोदर याने तयार केले व अपिओज याने कोरले.

व्यक्तिनामे.—(१) जतिग (प्रथम)—शिलाहार नृपती ; (२) नयिवर्मन्—शिलाहार नृपती, जतिग (प्रथम) चा पुत्र ; (३) चंद्रराज—शिलाहार नृपती, नयिवर्म्याचा पुत्र ; (४) जतिग (द्वितीय)—शिलाहार नृपती, चंद्रराजाचा पुत्र ; (५) गोंकराज—शिलाहार नृपती, जतिग (द्वितीय) चा पुत्र ; (६) गूवल—शिलाहार नृपती, गोंकराजाचा भाऊ; (७) कीर्तिराज—शिलाहार नृपती, गोंकराजाचा भाऊ ; (८) मारसिंह—शिलाहार नृपती, गोंकराजाचा पुत्र ; (९) गूवल (द्वितीय)—शिलाहार नृपती, मारसिंहाचा पुत्र ; (१०) भोजदेव—शिलाहार नृपती, गूवल (द्वितीय) चा भाऊ ; (११) बल्लाळ—शिलाहार नृपती, गूवल (द्वितीय) चा धाकटा भाऊ; (१२) गंडरादित्य—दान देणारा शिलाहार नृपती, गूवल (द्वितीय) चा धाकटा भाऊ; (१३) दामोदर—शासन लिहिणारा ; (१४) अप्योज्ज—शासन कोरणारा.

ग्रामनामे.—(१) मिरिंज—सांगली जिल्ह्यातील हल्लीचे मिरज ; (२) प्रयाग—हल्लीचे अलाहाबाद असावे. पुढील गावांची ओळख पटत नाही : (३) सप्तखोल्ल ; (४) खोल्ल ; (५) गुडयग्राम ; (६) वंकवन ; (७) गालगूत्तिसजयापल्ली ; (८) गूडलय (९) इरुकुडी; (१०) पनुतरगेखोल्ल ; (११) मयूरवर्ष ; (१२) मनियवर्षि ; (१३) एडनाड ; (१४) तिरवाड ; (१५) तगरपूर—हल्लीचे तेर.

वैशिष्ट्य.—महादेव, बुध्द आणि अर्हत् या देवांनाही देणग्या दिल्या.

३९८. तळेगांव ताम्रपट, राष्ट्रकूट कृष्णराज (प्रथम)

जिल्हा—**पुणे** तालुका—**सिरूर**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट तळेगाव ढमढेरे येथे सापडला.

संदर्भ.——स्टेन कोनो, इ. आय., १९१५–१६, खंड १३, पृ. २७५–२८२.

भाषा व लिपी.——संस्कृत, दाक्षिणात्य वळणाची.

राजवंश व राजा.——राष्ट्रकूट नृपती कृष्णराज (प्रथम).

वर्ष व तिथी.——वैशाख अमावास्या, सूर्यग्रहण, प्लवंग संवत्सर, शके ६९० (गत वर्ष). बुधवार २३ मार्च, इ. स. ७६८.

सारांश.——हे शासन कृष्णराज (प्रथम) याच्या अमदानीतील आहे. हा ताम्रपट मण्णनगर येथील तळावरून दिलेला आहे. या शासनाचा मुख्य उद्देश पूनक विषयातील कुमारिग्राम, भमरोपरा, अरलुव, सिंदीग्राम व तडवले ही गावे करहाटक, १००० विषयातील ब्राह्मणांना दान दिली हे नमूद करण्याचा होता. या दानाचे दोन भाग वासुदेव भट्टासाठी राखून ठेवले होते. हे शासन इंद्र याने लिहिले.

व्यक्तिनामे.——(१) गोविंदराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती ; (२) कर्कराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, गोविंदराज (प्रथम) चा पुत्र ; (३) इंद्रराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, कर्कराज (प्रथम) चा पुत्र ; (४) दंतिदुर्ग—राष्ट्रकूट नृपती, इंद्रराज (द्वितीय) चा पुत्र ; (५) श्रीहर्ष—दंतिदुर्गाने जिंकलेला नृपती ; (६) वज्रट—दंतिदुर्गाने जिंकलेला नृपती ; (७) वल्लभ कीर्तिवर्मन्—दंतिदुर्गाने जिंकलेला चालुक्य नृपती ; (८) कृष्णराज (प्रथम)—दान देणारा राष्ट्रकूट नृपती, दंतिदुर्गाचा चुलता, कर्कराज (प्रथम) चा पुत्र ; (९) प्रभुतुंग गोविंदराज—राष्ट्रकूट राजपुत्र, कृष्णराज, (प्रथम) चा पुत्र ; (१०) वासिष्ठ श्रीकुमार—दानासाठी विनंती करणारा ; (११) जैवन्ती पाणैय—दानासाठी विनंती करणारा ; (१२) भट्ट वासुदेव—दान स्वीकारणारा ब्राह्मण ; (१३) इंद्र—शासन लिहिणारा.

ग्रामनामे.——(२) क्ररहाट १,००० ——सातारा जिल्ह्यातील कऱ्हाडभोवतालचा प्रदेश ; (२) मण्णनगर—बंगलोर जिल्ह्यात निलमंगल तालुक्यातील हल्लीचे मण्णे असावे ; (३) कुमारिग्राम्—कऱ्हेगाव ; (४) भमरोपरा—भोवरपूर ; (५) अरलुव—उरुळी ; (६) सिंदीग्राम—सींदवणे ; (७) तडवले—तुरुली : (८) पूनक—हल्लीचे पुणे ; (९) खंबग्राम—खामगाव ; (१०) वोरिमग्राम—वोरी (११) दाडिमग्राम—दलींव ; (१२) अलंदिय—पुण्यापासून १५ मैलांवरील चोराची आळंदी ; (१३) थिअुरग्राम—थेऊर.

३९९. ताम्रपट कदंब त्रिभुवनमल्ल

जिल्हा——**उल्लेख नाही** तालुका——**उल्लेख नाही**

प्राप्तिस्थळ.——श्री. खरे, ग. ह. यांना या ताम्रपटाचे फोटो त्यांच्या एका मित्राकडून मिळाले.

संदर्भ.——खरे, ग. ह., द. म. इ. सा., १९५१, खंड ४, पृ. ४५–५६.

भाषा व लिपी.——संस्कृत, नागरी ११ व्या शतकातील दक्षिणी पद्धतीची.

वर्ष व तिथी.——गुरुवार, फाल्गुन शुद्ध १३, व्यय संवत्सर, शके १०२८ (गत वर्ष), ७ फेब्रुवारी इ. स. ११०७.

सारांश.——हा ताम्रपट कदंब नृपती त्रिभुवनमल्ल याच्या अमदानीतील आहे. या शासनाचा उद्देश त्रिभुवनमल्लाच्या गंडगोपाल ऊर्फ केलिम नामक चाकराने जमीन् व मळे बारा भिन्न गोत्रीय ब्राह्मणांना दान दिले हे नमूद करणे हा होता. त्याने एक सरस्वतीचे मंदिर उभारले. मठग्रामातील शोलेघ्री नामक शेत खरेदी करून लावून दिले. तसेच लेखक आचार्य व सरस्वतीचा पूजक यांना तीन घरे बांधून दिली.

व्यक्तिनामे.——(१) षष्ठ—कदंब नृपती ; (२) जयकेशी—कदंब नृपती, षष्ठाचा पुत्र ; (३) त्रिभुवनमल्ल—कदंब नृपती, जयकेशीचा पुत्र ; (४) कालपां—षष्ठाचा चाकर ; (५) नागान (नागण)—कालपांचा पुत्र ; (६) गंडगोपाल केलिम—दान देणाऱ्या नागणाचा पुत्र.

दान स्वीकारणाऱ्या ब्राह्मणांची नावे पुढीलप्रमाणे.

ब्राह्मणाचे नाव	पित्याचे नाव	पितामहाचे नाव	गोत्र	व्यवसाय
(७) सोमार्य	(८) पोम्मणार्यक	(९) अण्णय्यभट्ट	शंख	अथर्वन् शांतिकपौष्टित
(१०) जयंतभट्ट	(११) रेवदास	(१२) माधवार्य	मुख्य. भालंदन (उपर्युक्ताच्या शाखेचे)	राजाचे पौराणिक
(१३) मय्याल	(१४) शांत	(१५) साविणार्य	भारद्वाज	राज ज्योतिषी
(१६) ईश्वरार्य द्विवेदी	(१७) म्हालय्य दीक्षित	(१८) सोमभट्ट	कौशिक	राजाचे धर्माधिकारी
(१९) केशवार्य + सोमार्य	(२०) नारायणभट्ट	(२१) परमेश्वर	—,,—	राजाचे गुरु
(२२) वामनभट्ट	(२३) नाग	(२४) अज्जमार्य	भारद्वाज	राजाचे अश्ववैद्य
(२५) अज्जमभट्ट	(२६) वामनार्य	(२७) तिक्कय्य घैसास	वत्स	राजाचे पुरोहित
(२८) म्हालय्य	(२९) नारायणार्य	(३०) म्हालपार्य	शांडिल्य	राजाचे विद्यागुरु
(३१) नारायणार्य	(३२) त्रिविक्रमभट्ट	(३३) म्हालपार्य	—,,—	राजाचे धर्माधिकारी
(३४) अज्जल घैसास	(३५) वातय्य	(३६) वासलार्य	वत्स	वेदातील पट्टवर्धन
(३७) गोविंद क्रमविद्	(३८) पत्तय्य	(३९) शांतिभट्ट	कौशिक	याजकातील पट्टवर्धन
(४०) गोविंद द्विवेदी	(४१) विष्णु पंडित	(४२) गोविंद द्विवेदी	अत्रि	याज्ञिकांतील श्रेष्ठ

ग्रामनामे.––(१) गाली––गोंवा राज्यातील हल्लीचे गाली ; (२) प:जणि खली––हल्लीचे पणजी; (३) गोपक (खली)––हल्लीचे गोवे व बेट; (४) आम्रवण––फोंड्याच्या उत्तरेस १० मैलांवरील हल्लीचे आमोणे; (५)वेर––फोंड्याच्या उत्तरेस ६ मैलांवरील वेरे; (६) पिरियल––फोंड्याच्या उत्तरेस ३ मैलांवरील हल्लीचे प्रियोळ ; (७) कुलत्थाली––फोंड्याच्या ७ मैल पश्चिमेस हल्लीचे कुट्ठाळ ; (८) कपिलक––फोंड्याच्या पश्चिमेस २ ते ४ मैलांवर हेल्लीचे कवळे; (९) नेऊर––फोंड्याच्या वायव्येस ८ मैल हल्लीचे नेवरे; (१०) पल––फोंड्याच्या वायव्येस १६ मैलांवरील पालये; (११) अंतुरज––हल्लीचे अंत्रूज, फोंडे महालाच्या आसपासचा भाग; (१२) मडक––फोंड्याच्या पश्चिमेस ५ मैलांवरील हल्लीचे मडकई; (१३) शतक किंवा शंताक––हल्लीचे सातक ; (१४) वेल्लोर––हल्लीचे वेलोर ; (१५) मज्झिखंड––हल्लीचे माजीखंड ; (१६) कर:जाली––हल्लीचे कर्जाली ; (१७) होड्ड खज्जणक––हल्लीचे होड-खाजन ; (१८) षट्षष्टि––गोव्यातील प्रमुख विभाग सालसेट किंवा साष्टी ; (१९) कुत्तडरी––मडगावच्या पूर्वेस ५ मैल व फोंड्याच्या दक्षिणेस ८ मैल, हल्लीचे कुडतोरी ; (२०) राइग्राम––फोंड्याच्या दक्षिणेस ६ मैल हल्लीचे राय ; (२१) मठग्राम––फोंड्याच्या दक्षिणेस ९ मैलांवरील हल्लीचे मडगाव पुढील गावांची ओळख पटत नाही :– (२२) ब्रह्मपुरी ; (२३) किसूर ; (२४) असौली ; (२५) चिचखंडि ; (२६) सिरूर ; (२७) कोंढलक ; (२८) पय्यावद्य.

४००. ताम्रपट, राष्ट्रकूट गोविंद (तृतीय)

जिल्हा––**उल्लेख नाही** तालुका––**उल्लेख नाही**

प्राप्तिस्थळ.––दिलेले नाही.

संदर्भ.––डिसकळकर, दि. ब., **ज.. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १९२८, खंड ३ (न्यू सि.), क्र. ४, पृ. १८७–१८८.

भाषा व लिपी.––संस्कृत, राष्ट्रकूटांच्या इतर लेखांप्रमाणे लिपी.

राजवंश व राजा.––राष्ट्रकूट नृपती गोविंद (तृतीय).

वर्ष व तिथी.––वैशाख महापर्वणीं, शके ७३३, इ. स. ८११.

सारांश.––हें शासन राष्ट्रकूट नृपती गोविंद (तृतीय) याच्या अमदानीतील आहे. शासनाचा मुख्य उद्देश धंकपिप्पल भुक्तिमधील नंदपूर हे गाव हरिद्र गोत्री ब्राह्मण श्रीधरभट्टाचा पुत्र पिंगकुल यास राजाने दान दिले हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.––(१) गोविंद––दान देणारा राष्ट्रकूट नृपती ; (२) पिंगकुल––दान स्वीकारणारा हरिद्र गोत्री ब्राह्मण ; (३) श्रीधरभट्ट––पिंगकुलाचा पिता ; (४) अरुणादित्य–लेखक ; (५) वत्सराज––अरुणादित्याचा पिता ; (६) नागभट्ट––दूतक.

ग्रामनामे.––(१) नंदपुर ; (२) धंक ; (३) कांडरिका ; (४) वडग्राम ; (५) वच्चुलिका ; (६) दहियपिप्पल ; (७) परियली ; (८) मयूरखंडी. यापैकी कोणत्याच गावाची ओळख पटत नाही.

४०१. तासगाव ताम्रपट, यादव कृष्ण

जिल्हा––**सांगली** तालुका––**तासगाव**

प्राप्तिस्थळ.––हा ताम्रपट तासगाव येथील श्री. जोग व लिमये यांच्याजवळ मिळाला.

संदर्भ.––(१) खरे, ग. ह., **द. म. इ. सा.**, खंड ३, पृ. ९–१६ व ६५–६६; इ. आय्., १९४७, ४८, खंड २७, पृ. २०८–२१६ ; (२) तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.**, १९६३, पृ. १३५–१३९ नं. २७.

भाषा व लिपी.---संस्कृत-मराठी मिश्रण, १२ व्या-१३ व्या शतकातील देवनागरी.

राजवंश व राजा.---यादव नृपती कृष्ण.

वर्ष व तिथी.---शके ११७२, साधारण संवत्सर, माघ वद्य १४, महाशिवरात्र ; सोमवार २० फेब्रुवारी, १२५१. (तुळपुळे)

सारांश.---हे शासन यादव नृपती कृष्ण याच्या अमदानीतील आहे. याचा उद्देश यादव मांडलिक चंद्र व केशव यांनी शिवालय बांधले व मंजरवाटक हे गाव दान दिले हे नमूद करण्याचा होता. या गावाचे अर्धे उत्पन्न देवाच्या अष्टांगपूजेसाठी व अर्धे उत्पन्न २५ ब्राह्मणांना भोजन घालण्यासाठी उपयोगात आणावयाचे होते. हे शासन म्हांइदेव याने तयार केले.

व्यक्तिनामे.---(१) भिल्लम---यादव नृपती ; (२) जैत्र (प्रथम)---यादव नृपती, भिल्लम याचा पुत्र ; (३) सिंह---यादव नृपती, जत्र (प्रथम) चा पुत्र ; (४) जैत्र (द्वितीय)---यादव नृपती, सिंहाचा पुत्र ; (५) कृष्ण---यादव नृपती, जैत्र (द्वितीय) चा पुत्र ; (६) चंद्रदेव-दान देणारा, यादव कृष्ण याचा मांडलिक ; (७) केशव ---दान देणारा, चंद्रदेवाचा धाकटा क्षाऊ भाऊ; (८) जल्हण पंडित---चंद्रदेवाचा पिता ; (९) श्रियानंद---चंद्रदेवाचा पितामह ; (१०) कुमारदेवी---चंद्रदेवाची माता ; प्रभादित्याची कन्या ; (११) प्रभादित्य---कुमारदेवीचा पिता, विश्वावसु गोत्री ब्राह्मण ; (१२) शतानंद---जल्हणपंडिताचा पितामह, कृष्णात्रेय गोत्री गुर्जर ब्राह्मण ; (१३) म्हांइदेव---शासनाचा लेखक. या धर्मकार्याची चिंता वाहणारे ब्राह्मण ; (१४) कांतबाहु ; (१५) नरसिंघभट्ट ; (१६) अण्णंभट्ट ; (१७) गंगाधरभट्ट ; (१८) महादेवभट्ट ; (१९) गोविंदभट्ट; (२०) विष्णुभट्ट ; (२१) चांचरसु लाखणभट्ट.

ग्रामनामे.---(१) मंजरवाटक---तासगावच्या ईशान्येस ९ मैलांवरील मांजर्डे ; (२) गोवरू---मांजर्डेच्या पूर्वेस २ मैलांवरील गोवरगाव किंवा घोगाव ; (३) वालगवाड---मांजर्डेच्या दक्षिणेस २ मैलांवरील वलगवडे ; (४) हधिनौर---मांजर्डेच्या पश्चिमेस ३॥ मैलांवरील हतनूर ; (५) पेढ---मांजर्डेच्या उत्तरेस ३॥ मैलांवरील पेड ; (६) सुरगिरि---दौलताबाद ; (७) श्रीपर्णखेट---(अ) पश्चिम खानदेशच्या नैऋत्य कोणातील पालखेड किंवा पानखेड असावे (श्री. खरे) (ब) हेमाद्रिने व्रतखंडात उल्लेखिलेले गाव. वऱ्हाडमधील वार्शी टाकळीच्या नैऋत्येस असलेले पातखेड (श्री. मिराशी). निश्चित ओळख पटत नाही.

४०२. तेर शिलालेख, जोगमरस

जिल्हा---उस्मानाबाद **तालुका---उस्मानाबाद**

प्राप्तिस्थळ.---हा लेख तेर येथील त्रिविक्रम मंदिरातील काळ्या दगडी सिंहासनाच्या दर्शनी पट्टीवर (Pedestal) कोरलेला आहे.

संदर्भ.---खरे, ग. ह., द. म. इ. सा., १९३४, खंड २, पृ. ७४-८०.

भाषा व लिपी.---कानडी, इ. स. ११ व्या शतकातील कानडी लिपी.

वर्ष व तिथी.---अंदाजे शके १०००.

राजवंश व राजा.---महामंडलेश्वर जोगमरस.

सारांश.---हा लेख असा---"महामंडलेश्वर जोगमरसाच्या विद्यावंत वारिमल्लोजाचा पुत्र हे विरुद असलेल्या वारिस्थळीच्या कालभैरवाची कृति."

व्यक्तिनामे.---(१) जोगमरस---महामंडलेश्वर, कलचुरी राजा ; (२) कालभैरव---शिल्पी ; (३) वारिमल्लोज---कालभैरवाचा पिता.

४०३. तेर शिलालेख

प्राप्तिस्थळ.––हा लेख तेरच्या पूर्वेस असलेल्या मारुतीच्या देवळाच्या पाराच्या पश्चिम बाजूस टेकून असलेल्या शिलेवर कोरलेला आहे.

संदर्भ.––(१) खरे, ग. ह., **द. म. इ. सा.**, १९३४, खंड २, पृ. ८०–८२ ; (२) तुळपुळे, शं. गो. **प्रा. म. को. ले.**, १९६३, पृ. ६३–६७, नं. १२.

भाषा व लिपी.––जुनी मराठी, देवनागरी (इ. स. ११ वे शतक).

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––सुभानु संवत्सर, वैशाख शुद्ध १३, शके १०८६, गुरुवार, १८ एप्रिल, इ. स. ११६३.

सारांश.–– या लेखाचा मुख्य उद्देश या मंदिराशी संबंधित असलेल्या महाजनांनी काही दाने दिली हे नमूद करण्याचा होता.

४०४. तेरवण ताम्रपट

जिल्हा––**रत्नागिरी** तालुका––**राजापूर**

प्राप्तिस्थळ––हा ताम्रपट तेरवण येथे सापडला.

संदर्भ.––(१) वाथेन, **ज. रॉ. ए. सो.**, खंड ५, पृ. १७७; (२) ज़ेकब, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.** १८५२, खंड ४, पृ. १०५–१०६.

भाषा व लिपी.––संस्कृत, तत्कालीन नागरी लिपी.

राजवंश व राजा.––कल्याण चालुक्यांचा मांडलिक मंडलेश्वर काण्वदेवराय.

वर्ष व तिथी.––शनिवार, पौष वद्य ७, रौद्र संवत्सर, शालिवाहन संवत् ११८२; इ. स. १२६१

सारांश.––या शासनात चालुक्य राजाचा मांडलिक काण्वदेव याचा मंत्री केशव महाजनी याने तेरवाटक हे गाव सर्व उत्पन्न व सर्व अधिकारांसह केशव प्रभु यास दान दिले हे नमूद केले आहे. याशिवाय विमलेश्वर देवाला व १९ ब्राह्मणांना काही दाने दिल्याचे व जाल्हुन पुत्र गोई राऊल याला दानपत्र (edict) दिल्याचे या ताम्रपटात नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.––(१) काण्वदेवराय––चालुक्य राजाचा मांडलिक; (२) केशव महाजनी––दान देणारा काण्वदेवाचा मंत्री ; (३) गोविंद––शासन लिहिणारा ; (४) केशव प्रभु––दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (५) माधवदेव––दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण ; (६) नागदे क्रमैत––दान स्वीकारणारा भार्गव गोत्री ब्राह्मण ; (७) विठ्ठल पैशास (?)––दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण; (८) विठ्ठल पैशास (?)––दान स्वीकारणारा भार्गव गोत्री ब्राह्मण; (९) उकल पैशास (?)––दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (१०) गोविंद-भट––दान स्वीकारणारा गार्ग्य गोत्री ब्राह्मण; (११) सोमदे भट––दान स्वीकारणारा अत्रि गोत्री ब्राह्मण; (१२) सोमदे क्रमैत––दान स्वीकारणारा वसिष्ठ गोत्री ब्राह्मण; (१३) केशव भट––दान स्वीकारणारा वसिष्ठ गोत्री ब्राह्मण ; (१४) माधव भट––दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण ; (१५) वासुदेव भट––दान स्वीकारणारा मुद्गल गोत्री ब्राह्मण ; (१६) पदुमन भट––दान स्वीकारणारा वसिष्ठ गोत्री ब्राह्मण ; (१७) माधवभट––दान स्वीकारणारा गार्ग्य गोत्री ब्राह्मण ; (१८) अच्युत भट––दान स्वीकारणारा अत्रि गोत्री ब्राह्मण; (१९) वामन भट––दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण; (२०) नारायण भट––दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण ; (२१) नारायण ठाकूर––दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; गावचा

चौधरी व संरक्षक ; (२२) मरिदेव भट—दान स्वीकारणारा भारद्वज गोत्री ब्राह्मण; (२३) तिकल भट—दान स्वीकारणारा भार्गव गोत्री ब्राह्मण; (२४) गोई राऊल—याला दानपत्र (edict) दिले ; (२५) जाल्हुन राऊल—गोई राऊलचा पिता.

ग्रामनामे.—(१) कल्याण—हे ठाणे जिल्ह्यातील कल्याण किंवा चालुक्यांची राजधानी कल्याणी असावे ; (२) करहाटक—सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड असावे, निश्चित ओळख पटत नाही ; (३) तेरवाटक—राजापूर तालुक्यातील तेरवण.

४०५. तोरखेडे ताम्रपट, राष्ट्रकूट गोविंदराज

जिल्हा—धुळे तालुका—शहादा

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट तोरखेडे येथील जहागीरदार श्री. दे. व. कदमबांडे यांच्याजवळ मिळाला.

संदर्भ.—फ्लिट, इ. आय्., १८९४–९५, खंड ३, पृ. ५३–५८

भाषा व लिपी.—संस्कृत, दाक्षिणात्य वळणाची

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती गोविंदराज (तृतीय) व त्याचा पुतण्या गुजराथचा शासक असलेला मांडलिक गोविंदराज.

वर्ष व तिथी.—पौष शुद्ध ७, नंदन संवत्सर, शके ७३५ ; १४ डिसेंबर, इ स. ८१२.

सारांश.—या ताम्रपटाचा मुख्य उद्देश गोविंदराजाचा महासामंत याने आपल्या संपत्तीतील गोवहण नामक गाव दान दिले हे नमूद करणे हा होता. हा लेख नन्नपुत्र कृष्ण याने लिहिला.

व्यक्तिनामे.—(१) प्रभूतवर्ष गोविंदराज (तृतीय)—राष्ट्रकूट नृपती ; (२) इंद्रराज–राष्ट्रकूट नृपती, गोविंदराज (तृतीय) चा भाऊ ; (३) कर्कराज—राष्ट्रकूट नृपती, इंद्रराजचा पुत्र ; (४) गोविंदराज (चतुर्थ)—राष्ट्रकूट नृपती, कर्कराजाचा धाकटा भाऊ; (५) बुद्धवरस–दान देणारा शलुकिक वंशीय महासामंत ; (६) मणिनाग—बुद्धवरसाचा पितामह ; (७) राजादित्य—मणिनागाचा पिता ; (८) कृष्ण-लेख लिहिणारा ; (९) नन्न—कृष्णाचा पिता ; (१०) पासून (५९) पर्यंत दान स्वीकारणाऱ्या ब्राह्मणांची नावे—(१०) सोम—लावायन गोत्र, वाजसनेय माध्यंदिन शाखा ; (११) सर्वदेव—सोमाचा पिता ; (१२) नाहर—गौतम गोत्र ; (१३) महेश्वर—नाहराचा पिता ; (१४) द्रोण—वार्ष्णेय गोत्र ; (१५) शर्मन्—द्रोणाचा पिता ; (१६) सोम—कात्यायन गोत्र ; (१७) बप्पुक—सोमाचा पिता ; (१८) लकुटि—आग्नेयस् गोत्र (आग्नेय म्हणजे अगस्त्य. हे गोत्र अगस्त्य असावे काय ?) ; (१९) सर्वदेव—लकुटिचा पिता ; (२०) सर्वदेव—मुद्गल गोत्र ; (२१) गोव—वत्स गोत्र ; (२२) नेव—वत्स गोत्र, गोवचा पिता ; (२३) भाअुल्ल—वत्स गोत्र ; (२४) गोवशर्मन्—गौतम गोत्र ; (२५) अणहादित्य—गौतम गोत्र ; (२६) नासेन—गौतम गोत्र ; (२७) गोव–गौतम गोत्र ; (२८) द्रोण—गोवचा पिता ; (२९) आदित्य—पाराशर गोत्र ; (३०) लिवा–दित्य—आग्नेयस् गोत्र (अगस्त्य गोत्र ?) ; (३१) योग—शांडिल्य गोत्र ; (३२) अग्नि–शर्मन्—मुद्गल गोत्र ; (३३) नेवरेव—मुद्गल गोत्र; (३४) नाग—माधर गोत्र ; (३५) नाणसर—यौगन गोत्र ; (३६) रेवसम—यौगन गोत्र ; (३७) भाअुल्ल—योगन गोत्र ; (३८) नेवादित्य—भारद्वाज गोत्र; (३९) ईश्वर—कौश गोत्र ; (४०) बप्पस्वामिन्–वार्ष्णेय गोत्र ; (४१) गोवशर्मन्—वार्ष्णेय गोत्र ; (४२) शिवादित्य—लावायन गोत्र ; (४३) देवहट—लावायन गोत्र ; (४४) सींह—लावायन गोत्र– (४५) नन्न—कात्यायन गोत्र ; (४६) मातृशूर—कात्यायन गोत्र; (४७) महेश्वर—आग्नेयस् गोत्र (अगस्त्य गोत्र?) (४८) नैन—महेश्वराच्या मुलीचा मुलगा ; (४९) लल्ल—भारद्वाज गोत्र ; (५०) जन्नक–

भारद्वाज गोत्र ; (५१) दत्त—सौदान गोत्र ; (५२) अग्निशर्मन्—आग्नेयस् गोत्र (अगस्त्य गोत्र ?) ; (५३) नेवादित्य—कौश गोत्र ; (५४) संबऊर (संबौर ?)—कौश गोत्र ; (५५) जज्जुक—वार्ष्णेय गोत्र ; (५६) आदित्य—गौतम गोत्र ; (५७) आदित्यचीहल्लक–मुद्‌गल गोत्र ; (५८) सोम—आदित्यचीहल्लकाचा पिता ; (५९) रेव—आग्नेयस् गोत्र (अगस्त्य गोत्र ?)

ग्रामनामे.—(१) सिहरखी—बडोद्याजवळ असलेले सेरखी ; (२) गोवट्टण—ओळख पटत नाही ; (३) मेशुवल्लिका—ओळख पटत नाही ; (४) बदरसिद्धि—ओळख पटत नाही.

४०६. तोरगल, कानडी शिलालेख

जिल्हा—**कोल्हापूर** तालुका—**तोरगल**

प्राप्तिस्थळ.–हा लेख तोरगल येथे गच्छिन्न हिरेमठाच्या प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला भिंतीला लागून असलेल्या शिलेवर कोरलेला आहे.

संदर्भ.—पाठक, के. बी., इं. अँ., १८३३, खंड १२, पृ. ९५–९९.

भाषा व लिपी.—कानडी.

राजवंश व राजा.—महामंडलेश्वर बर्म.

वर्ष व तिथी—प्लवंग संवत्सर, बुधवार, पौष वद्य १०, व्यतिपात शके १११०, इ. स. ११८७–८८.

सारांश.—या लेखात बर्म याने मिळवलेले प्रदेश नमूद केले आहेत. त्याचप्रमाणे त्याच्या सुग्गलदेवी नामक राणीने सुग्गलेश्वराला दिलेली दाने नमूद केली आहेत.

व्यक्तिनामे.—(१) आहवमल्ल भूतेयदेव—गेणुकार प्रमुख ; (२) दावरमल्ल (प्रथम)–भूतेयदेवाचा पुत्र; (३) चट्ट (प्रथम) दावरमल्ल–(प्रथम) चा पुत्र; (४) दावरमल्ल (द्वितीय)–चट्ट (प्रथम) चा पुत्र; (५) चट्ट (द्वितीय)—दावरमल्ल (द्वितीय) चा पुत्र; (६) भूत (भूतेयदेव?)—महामंडलेश्वर चट्ट (द्वितीय) चा पुत्र; (७) नूर्मडि तैल—छोट्या राजांचा प्रमुख; (८) बर्म—भूतेयदेवाचा पुत्र, महामंडलेश्वर; (९) सुग्गलदेवी—दान देणारी, बर्मची राणी; (१०) हेर्गडे मल्लय्य—जमिनीचा मालक; (११) हेर्गडे चावुंडमय्यनायक—हेर्गडेमल्लय याचा पिता.

ग्रामनामे.—(१) लोकापूर ; (२) होळलुगुंद ; (३) दोड्डवाड; (४) नविलुगुंद; (५) कोळेनुरु ; (६) तोरगले ; (७) हाळहोळे ; (८) कुंबारगेरे ; (९) बन्निबूरू ; (१०) बेलकुप्पे ; (११) सुरुगन—हाळू. या गावांची ओळख पटवलेली नाही.

४०७. थाळनेर ताम्रपट, भानुषेण (संच अ)

जिल्हा—**धुळे** तालुका—**शिरपुर**

प्राप्तिस्थळ.–हे ताम्रपट जानेवारी १९६७ मध्ये थाळनेरमधील एका तांबटाकडे श्री. पी. पी. वैशंपायन यांना मिळाले.

संदर्भ.—दीक्षित, मो. गं., इ. आय्., १९६९, खंड ३८, भाग २, पृ. ६९–७५.

भाषा व लिपी.—संस्कृत, दक्षिणेकडील वळणाची पेटिकाशीर्षक लिपी.

राजवंश व राजा.—कुंभकर्ण, भानुषेण.

वर्ष व तिथी.—कार्तिक शुद्ध सप्तमी, ३० वे शासन वर्ष. अक्षरांच्या वळणावरून इ. स. चे ६ वे–७ वे शतक.

सारांश.—या ताम्रपटात भानुषेणाने वद्रपीधर या स्थलीनगर जिल्ह्यातील विषयभोग गावातली काही जमीन भट्टिशूराचा पुत्र नागवसु या गौतम गोत्री, यजुर्वेदाच्या वाजसनेयी शाखीय, चार वेदांचा अभ्यास करणाऱ्या ब्राह्मणास दान दिली असल्याचे नमूद केले आहे. लेखाच्या प्रारंभी कुंभकर्ण वंशाची वंशावळ दिलेली आहे व शेवटी शापात्मक वचने आलेली आहेत.

व्यक्तिनामे.—(१) जयराज—कुंभकर्ण वंशातील आद्य नृपती ; (२) आढ्यराज–कुंभकर्ण नृपती, जयराजाचा पुत्र ; (३) भट्टारकराज—कुंभकर्ण नृपती, आढ्यराजाचा पुत्र! (४) स्वामिकराज—कुंभकर्ण नृपती, भट्टारकराजाचा पुत्र ; (५) भानुषेण–दान देणारा. कुंभकर्ण नृपती, स्वामिकराजाचा पुत्र; (६) नागवसु—दान स्वीकारणारा– चतुर्वेदी ब्राह्मण गौतम गोत्र, वाजसनेयी शाखा ; (७) भट्टिशूर—नागवसूचा पिता ; (८) नागदास प्रतीहार–दूतक ; (९) देव—ताम्रपट लिहिणारा ; (१०) पृथ्वीदेव—देवाचा पिता.

ग्रामनामे.—(१) स्थालकनगर—तापी नदीच्या उत्तर किनाऱ्यावरील थाळनेर ; (२) वद्रपीधर—तापी नदीच्या प्रवाहाच्या विरुद्ध दिशेला ७ मैलांवर थाळनेरच्या पूर्वेस असलेले पिळोदे असावे.

४०८. थाळनेर ताम्रपट, भानुषेण (संच ब)

प्राप्तिस्थळ.—हे ताम्रपट जानेवारी १९६७ मध्ये थाळनेर मधील एका तांबटाकडे श्री. पी. पी. वैशंपायन यांना मिळाले.

संदर्भ.—दीक्षित, मो. गं., इ. आय्., १९६९, खंड ३८, भाग २, पृ. ६९–७५.

भाषा व लिपी.—संस्कृत, दक्षिणेकडील वळणाची पेटिका शीर्षक लिपी.

राजवंश व राजा.—कुंभकर्ण भानुषेण.

वर्ष व तिथी.—कार्तिक शुद्ध सप्तमी, ३० वे शासन वर्ष. अक्षरांच्या वळणावरून इ. स. चे ६ वे–७ वे शतक.

सारांश.—या ताम्रपटाचा उद्देश भानुषेणाने स्वतःच्या व पितरांच्या कल्याणासाठी बूरावि नदीच्या काठी टक्कारिखेटक गावातील 'पर्णाशा' आणि 'पंचाशा' ही जमीन नागवसु ब्राह्मणाला दान दिली हे नमूद करण्याचा आहे. यावेळी नागदास याने दूतकाचे काम केले. लेखाच्या शेवटी शापात्मक वचने आलेली आहेत.

व्यक्तिनामे.—संच (अ) मधील व्यक्तिनामे

ग्रामनामे.—(१) स्थालकनगर—हल्लीचे थाळनेर ; (२) टक्कारिखेटक—अमळनेरपासून पूर्वेस ६ मैलांवर असलेले टाकरखेड ; (३) बूरावि—बोरी नदी ; (४) पिप्परिमंडलक—धुळयाच्या दक्षिणेस ४ मैलांवरील सध्याचे पिंपरी.

४०९. दिवे–आगर ताम्रपट

जिल्हा—**कुलाबा** तालुका—**श्रीवर्धन**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट दिवे-आगर येथे मिळाला.

संदर्भ.—इं. अ. रि., १९६२–६३, पृ. ५२, नं. ३४.

भाषा व लिपी.—संस्कृत, इ. स. ५ व्या शतकातील दाक्षिणात्य वळणाची लिपी.

राजवंश व राजा.—गंग नृपती दुर्विनीत.

वर्ष व तिथी.—दुर्विनीत नृपतीचे २४ वे शासन वर्ष.

सारांश.—या लेखात राजाने सेनशर्मन् नामक ब्राह्मणाला चुरूरमधील शेती व कोवलल विषयातील टाके (Tank) दान दिल्याचे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) दुर्विनीत—गंग नृपती; (२) सेनशर्मन्—दान स्वीकारणारा ब्राह्मण

ग्रामनामे.—चुरूर—ओळख पटत नाही.

४१०. दिवे–आगर ताम्रपट, जयाश्रय मंगलरस

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट दिवे-आगर येथे मिळाला.

संदर्भ.—इं. अ. रि., १९६२–६३, पृ. ५२, नं. ३४. (२).

भाषा व लिपी.—संस्कृत, दाक्षिणात्य वळणाची.

राजवंश व राजा.— गुजराथचा चालुक्य नृपती जयाश्रय मंगलरस.

वर्ष व तिथी.—शके ६४९ ; इ. स. ७२७–२८.

सारांश.—या लेखात राजपुत्र धराश्रय जयसिंह याने कडद्रोहो-वोटिनेर येथील टाक्यावर (देवद्रोणि) असलेल्या कात्यायनी देवीला पथिक विषयातील तलवल्लिका हे गाव दान दिल्याचा उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—(१) धराश्रय जयसिंह—दान देणारा राजपुत्र ; (२) जयाश्रय मंगलरस—गुजराथेतील चालुक्य नृपती.

ग्रामनामे.—(१) कडद्रोहो-वोटिनेर—ओळख पटत नाही ; (२) तलवल्लिका—ओळख पटत नाही.

४११. दिवे–आगर ताम्रपट, शिलाहार छित्तपराज

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट दिवे-आगर येथे मिळाला.

संदर्भ.—इं. अ. रि., १९६२–६३, पृ. ५२, नं. ३४. (३)

भाषा व लिपी.—नागरी.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती छित्तपराज

वर्ष व तिथी.—शके ९४९ ; इ. स. १०२७–२८.

सारांश.—या लेखात दंडनायक नागवर्मन् याने दीपकगरच्या गोविंद ब्राह्मणाला दिलेल्या बगीच्याची व्यवस्था ठेवण्याकरता राजाने त्याला २० द्रम्म देणगी दिल्याचे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) छित्तराज—शिलाहार नृपती ; (२) नागवर्मन्—दंडनायक ; (३) गोविंद—दान स्वीकारणारा ब्राह्मण.

ग्रामनामे.—दीपकगर.

४१२. दिवे–आगर ताम्रपट

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट दिवे-आगर येथे मिळाला.

संदर्भ.—इं. अ. रि., १९६२–६३, पृ. ५२, नं. ३४ (४).

भाषा व लिपी.—नागरी.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती मुम्मुणिराज.

वर्ष व तिथी.—शके ९७५, इ. स. १०५३–५४.

सारांश.—हा ताम्रपट म्हणजे दीपकगर व इतर खेड्यातून मिळणाऱ्या कराबद्दलचे पद्मलदेवीने दिलेले व शिलाहार नृपती मुम्मुणिराज याने नवीन करून दिलेले व्यवस्थापत्र होय.

व्यक्तिनामे.—(१) पद्मलदेवी—शिलाहार राणी ; (२) मुम्मुणिराज—शिलाहार नृपती

ग्रामनामे.—दीपकगर.

४१३. दिवे–आगर ताम्रपट

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत ताम्रपट श्री. मो. ग. दीक्षित यांनी दिवे-आगर येथील श्री. पटवर्धन यांच्या मार्फत मिळविला.

संदर्भ.—(१) दीक्षित, मो. ग. **सह्याद्री**, वर्ष १५, अंक ६ ; **द. म. इ. सा.**, खंड ४, पृ. ४० ; **इ. आय्.**, १९४९–५०, खंड २८, पृ. १२१ ; (२) तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.**, १९६३ नं. २, पृ. १०–१४ ; (३) मास्टर, **ए. बु. स्कू. ओ. अ. स्ट.**, खंड २०, पृ. ४२२–४२३.

भाषा व लिपी.—प्राचीन मराठी, अकराव्या शतकातील देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—शक संवत् ९८२ (गतवर्ष), शार्वरी संवत्सर, मार्गशीर्ष पौर्णिमा, शुक्रवार १० नोव्हेंबर, १०६०.

सारांश.—दिवे गावातील वासुदेव भट्ट या ब्राह्मणाने बहुश: त्याच्याजवळ असलेले स्थितिपुरी या गावासंबंधीचे दोन ताम्रपट (शासने) रिसियप्प घैसास, सीवु षडंगविद् हे प्रमुख असलेल्या मुख्य सभेत (स्थान) मावलभट्ट या इसमाजवळ ठेवले. सोन्याची १२७ गद्याणक नाणी सभेचा योगक्षेम नीट चालावा म्हणून दामोदर नावाच्या इसमास दिली. हे सर्व दिवे गावच्या रिसियप, पौंवदेव षडंगविद्, तिकै षडंगविद्, जीवणै, नागरुद्र भट्ट, मधुवै षडंगविद् व मधुवय देवल यांना ठाऊक आहे. तसेच जी सुवर्णाची नाणी लिहिली ती सर्व एका कंठ्यात ओवलेली आहेत. असा मजकूर या ताम्रपटात आलेला आहे.

व्यक्तिनामे.—(१) वासुदेवभट्ट—विश्वस्तांसमोर शासने ठेव म्हणून ठेवणारा ब्राह्मण; (२) मावलभट्ट—ठेव स्वीकारणारा ब्राह्मण ; (३) दामोदर—गद्याण स्वीकारणारा ; (४) रिसियप घैसास—विश्वस्त षडंगविद् ब्राह्मण ; (५) सीवू—विश्वस्त असलेला षडंगविद् ब्राह्मण ; (६) रिसियपै—साक्षीदार ब्राह्मण ; (७) पौंवदेव—साक्षीदार ब्राह्मण ; (८) तिकै-साक्षीदार, षडंगविद् ब्राह्मण ; (९) जीवणै—साक्षीदार, षडंगविद् ब्राह्मण ; (१०) नागरुद्र भट्ट—साक्षीदार, ब्राह्मण ; (११) मधुवै—साक्षीदार षडंगविद् ब्राह्मण ; (१२) मधुवय देवल-साक्षीदार षडंगविद् ब्राह्मण; वासुदेवभट्टवांये षडंगवि याचे वाचन करताना श्री. दीक्षित दोन व्यक्तिनामे स्वीकारतात, (१) वासुदेवभट्ट, (१अ) वांये—विश्वस्त असलेला षडंगविद् ब्राह्मण.

ग्रामनामे.—(१) दिवे—प्रस्तुत ताम्रपट सापडला ते दिवे-आगर ; (२) स्थितिपुरी—निश्चित ओळख पटत नाही परंतु दिव्यापासून उत्तरेस ३ मैलांवर "स्थित" नावाचे ठिकाण सर्व्हे ऑफ इंडियाच्या नकाशात दिसते तेच बहुधा असावे.

४१४. दिवे–आगर शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेली शिला दिवे–आगर येथील श्री. यशवंतराव जोशी यांच्या वाडीत खोदकाम चालू असताना मिळाली.

संदर्भ.—(१) दीक्षित, मो. ग., **सि. इ. म.**, १९४७, पृ. ८५–८८.

भाषा व लिपी.—संस्कृत, देवनागरी.

राजवंश व राजा.—शिलाहार (?) महामंडलेश्वराधिपति अनंतदेव.

वर्ष व तिथी.—आषाढ वदि ८, आनंद संवत्सर, शके ११७६, २४ जून, इ. स. १२५४.

सारांश.—हा लेख बहुतेक शिलाहार महामंडलेश्वराधिपति अनंतदेव याच्या अमदानीतील आहे. या लेखात गणपति नायक याला दीपक ग्रामातील एक वाटिका मंडलिक राम याने दान दिल्याची नोंद केली आहे.

व्यक्तिनामे.—(१) अनंतदेव—महामंडलेश्वराधिपती ; (२) राम मंडलिक—दान देणारा दिवे–आगर येथील अनंतदेवाचा अधिकारी; (३) श्रीधर—दान केलेल्या वाटिकेच्या उत्तरेस याची वृत्ति असल्याचा उल्लेख आहे; (४) गणपति नायक—दान स्वीकारणारा.

ग्रामनामे.—दीपकग्राम—दिवे-आगर.

४१५. देऊळगांव–राजे शिलालेख

जिल्हा—**पुणे** तालुका—**दौंड**

प्राप्तिस्थळ.—हा लेख देऊळगाव येथील जुन्या देवालयाच्या प्रवेशद्वाराशी असलेल्या शिळेवर आहे.

संदर्भ.—(१) पोतदार, डी. व्ही., **भा. इ. सं. मं.**, ७ वे संमेलन, पृ. १६१–१६२; (२) तुळपुळे शं. गो., **प्रा. म. को. ले.**, १९६३, नं. ७१, पृ. ३७०–३७२.

भाषा व लिपी.—मराठी, देवनागरी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. १२ वे—१३ वे शतक.

सारांश.—या लेखात जो कोणी हे देवालय वा देणगी चालू ठेवणार नाही त्याला उद्देशून शापात्मक वचन आहे.

४१६. देवटेक शिलालेख, रुद्रसेन (प्रथम)

जिल्हा—**चांदा** तालुका—**ब्रह्मपुरी**

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेली शिला देवटेक येथे सापडली. सध्या हा शिलालेख नागपूर येथील संग्रहालयात आहे.

संदर्भ.—(१) कनिंगहॅम, कॉ. इं. इं., खंड १ (प्रथमावृत्ति) पृ. २८–२९ ; (२) मिराशी वा. वि., प्रो ट्रा. इं. ओं. कॉ., १९३५, पृ. ६३ ; कॉ. इं. इं., १९६३, खंड ५, नं. १, पृ. १–४.

भाषा व लिपी.—(१) प्रारंभीच्या काळातील प्राकृत, गिरनार लेखांप्रमाणे ब्राह्मी ; (२) संस्कृत, दक्षिणेकडील पेटिकाशीर्षक ब्राह्मी.

राजवंश व राजा.—(१) मौर्य अशोक ; (२) वाकाटक नृपती रुद्रसेन.

वर्ष व तिथी.—(१) वर्ष १४. हे बहुधा शासन वर्ष असावे. तिथी दिलेली नाही ; (२) अक्षरांच्या वळणावरून इ. स. चे ४ थे शतक असावे.

सारांश.—हा लेख दोन भागांत आहे. पहिल्या भागात लेखाचा उद्देश कोणी अधिकाऱ्याने (सामी) पकडणे आणि कत्तल करणे (बहुधा जनावरांची) यावर चिक्कंबुरी येथे घातलेल्या बंदीची नोंद करणे हा आहे. हा नियम मोडणाऱ्यांना शिक्षा पण सांगितल्या आहेत. तिसऱ्या ओळीत हा नियम अंमलात आणणाऱ्या कार्यकारी अधिकाऱ्यांची नोंद केलेली आहे. शेवटच्या ओळीत १४ हे वर्ष दिले आहे. हे बहुतेक शासन वर्ष असावे. या वर्षी हा नियम लागू करण्यात आला असावा. मिराशींच्या मते या लेखातील भाषा व लिपी अशोकाच्या गिरनार लेखाप्रमाणे आहे. हा हुकूम धर्ममहामात्राने अशोकाच्या राज्याभिषेकानंतर १४ व्या वर्षी दिला असावा. दुसऱ्या भागातील लेखाचा उद्देश नृपती रुद्रसेन याने चिक्कंबुरी येथे धर्मस्थान किंवा देवालय बांधले हे नमूद करण्याचा होता.

व्यक्तिनामे.—(१) प्रवर—वाकाटक नृपती ; (२) रुद्रसेन—वाकाटक नृपती.

ग्रामनामे.—चिक्कंबुरी—हे गाव देवटेकजवळचे हल्लीचे चिकमारा.

विशेष महत्त्व.—प्रस्तुत लेख वाकाटकांच्या सर्व ज्ञात कोरीव लेखांमध्ये कालक्रमाने पहिला आहे.

४१७. देवळाली ताम्रपट, यादव भिल्लम (तृतीय) (संच अ)

जिल्हा—अहमदनगर तालुका—राहुरी

प्राप्तिस्थळ.—हे ताम्रपट अहमदनगर जिल्ह्यातील देवळाली या खेड्यात मिळाले. सध्या हे पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळामध्ये आहेत.

संदर्भ.—(१) शंकरनारायणन्, इ. आय्., १९६७, खंड ३७, भाग २, पृ. ७४–८४ ; (२) छाब्रा, बी. छा., ॲ. रि. इं. ए., १९५७–५८ ; (३) खरे, ग. ह., प्रो. ट्रा. इं. ओ. कॉ., १९५५, १८ वा सेशन, पृ. ३४४–३४६.

भाषा व लिपी.—संस्कृत, ११ व्या शतकातील नागरी.

राजवंश व राजा.—देवगिरीचा यादव नृपती भिल्लम (तृतीय).

वर्ष व तिथी.—पौष शुक्ल १५, चंद्रग्रहण, शके ९७४ ; ८ डिसेंबर, इ. स. १०५२.

सारांश.—या दानपत्राचा मुख्य हेतु देवगिरीचा यादव नृपती भिल्लम (तृतीय) याने श्रीधर या श्रीवत्स गोत्री ब्राह्मणास कोणंथा, रुयी, पिप्पलत्था आणि जुमरहर ही गावे दान दिली हे नमूद करण्याचा आहे. यावेळी वीज, महेश्वर, गुणिगु आणि भारथैव हे अधिकारी उपस्थित होते. तसेच श्रीपती आणि मंख हे सामंतही उपस्थित होते. यापुढे येणारे राजे या चारही गावांचे चांगले रक्षण करोत अशी प्रार्थना केली आहे. हे दानपत्र तैकतैय याने तयार केले आणि सोहनैयपुत्र भ्रत्त किंवा भरथ याने लिहिले. या दानपत्रात यादव राजांची वंशावळ दिलेली आहे.

व्यक्तिनामे.—(१) दृढप्रहार—यादव नृपती ; (२) सेऊणचंद्र (प्रथम)—यादव नृपती, दृढप्रहाराचा पुत्र ; (३) धाडियप्प—यादव नृपती, सेऊणचंद्र (प्रथम) चा पुत्र ; (४) बृहद्

भिल्लम किंवा भिल्लम (प्रथम)—यादव नृपती, धाडियप्पाचा पुत्र ; (५) राज—यादव नृपती, भिल्लम (प्रथम) चा पुत्र ; (६) वद्दिग—यादव नृपती, राज याचा पुत्र ; (७) भिल्लम (द्वितीय)—यादव नृपती, वद्दिगाचा पुत्र ; (८) लच्छियव्वा—भिल्लम (द्वितीय) ची पत्नी, राष्ट्रकूट नृपती झंझ याची कन्या ; (९) झंझ—राष्ट्रकूट नृपती, लच्छियव्वाचा पिता ; (१०) वेसुक—यादव नृपती, लच्छियव्वाचा पुत्र (?) ; (११) नायीयलदेवी—वेसुकाची पत्नी, गोगीराजाची कन्या ; (१२) भिल्लम (तृतीय)—दान देणारा यादव नृपती, वेसुकाचा पुत्र; (१३) अव्वल्लदेवी—भिल्लम (तृतीय) ची राणी, चालुक्य राजा जयसिंह याची कन्या, आहवमल्लाची भगिनी ; (१४) जयसिंह—चालुक्य नृपती, अव्वल्लदेवीचा पिता ; (१५) आहवमल्ल-चालुक्य नृपती, अव्वल्लदेवीचा भाऊ ; (१६) सिल्लण—ओयारीचा रहिवासी, श्रीवत्स गोत्री ब्राह्मण, माध्यंदिन शाखा ; (१७) वैरिसिंह—धारा येथील परमार नृपती ; (१८) पव्वण—सिल्लणचा पुत्र ; (१९) विष्णु—पव्वणाचा पुत्र ; (२०) श्रीधर—परमारांचा दंडनायक, विष्णूचा पुत्र, दान स्वीकारणारा ब्राह्मण ; (२१) भोज—माळव्यातील परमार नृपती ; (२२) तैकतैय—दानपत्र तयार करणारा कायस्थ ; (२३) विजयैय—तैकतैयाचा पिता ; (२४) श्रीबीज किंवा बीज—भिल्लम (तृतीय) चा अधिकारी, साक्षीदार ; (२५) महेश्वर—, भिल्लम (तृतीय) चा अधिकारी, साक्षीदार ; (२६) गुणिगु—भिल्लम (तृतीय) चा अधिकारी साक्षीदार ; (२७) भरथैय—भिल्लम (तृतीय) चा अधिकारी, साक्षीदार ; (२८) श्रीपती—साक्षीदार सामंत ; (२९) मंख—साक्षीदार सामंत ; (३०) भ्रत्त किंवा भरथ—दानपत्र लिहिणारा ; (३१) सोहनैय—भरथाचा पिता.

ग्रामनावे.—(१) रूयी—हल्लीचे रुई, जिल्हा औरंगाबाद ; (२) पिप्पलत्था—सध्याचे पिपलेगाव, जिल्हा औरंगाबाद; (३) कोणंथा—औरंगाबाद जिल्ह्यातील गाव, निश्चित ओळख पटत नाही ; (४) जुमरहर—औरंगाबाद जिल्ह्यात वरील गावांच्या आसपास असावे ; (५) वासीम–कोणंथाच्या पूर्वेस असलेले खेडे—निश्चित ओळख पटत नाही. यापुढील गावांची निश्चित ओळख पटत नाही. (६) आड—कोणंथाच्या दक्षिणेस असलेले खेडे ; (७) धोधुंवर—कोणंथाच्या पश्चिमेस असलेले खेडे; (८) मेणेवेध—कोणंथाच्या उत्तरेस असलेली टेकडी ; (९) सिंघणग्राम—रूयीग्रामच्या पूर्वेचे खेडे ; (१०) सावल—रूयीग्रामच्या दक्षिणेचे खेडे ; (११) विहरी—रूयीग्रामच्या पश्चिमेकडचे खेडे ; (१२) कोक्कमस्थान—रूयीग्रामच्या उत्तरेकडचे खेडे ; (१३) ध्वजग्राम—पिप्पलत्थाच्या पूर्वेकडील खेडे ; (१४) सिंघेखडक—पिप्पलत्थाच्या दक्षिणेकडील खेडे ; (१५) दधिग्राम—पिप्पलत्थाच्या पश्चिमेकडील खेडे ; (१६) गजेरहतग्राम—पिप्पलत्थाच्या उत्तरेकडील खेडे; (१७) कडेद्रह—जुमरहरच्या पूर्वेकडचे खेडे; (१८) प्रेहरा—जुमरहरच्या दक्षिणेकडचे खेडे ; (१९) पथरक—जुमरहरच्या पश्चिमेकडील खेडे ; (२०) करकल्लीशा—जुमरहरच्या उत्तरेकडचे खेडे.

४१८. देवळाली ताम्रपट, यादव सेउणचंद्र (द्वितीय) (संच ब)

प्राप्तिस्थळ.—हे ताम्रपट अहमदनगर जिल्ह्यातील देवळाली या खेड्यात मिळाले. सध्या हे पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळात आहेत.

संदर्भ.—(१) शंकरनारायणन्, इ. आय्., १९६७, खंड ३७, भाग १, पृ. ७४–८४ ; (२) छाब्रा, बी. छा., ॲ. रि. इं. ए., १९५७–५८ ; (३) खरे, ग. ह., **प्रो. ट्रा. इं. ओ. कॉ.**, १९५५, १८ वा सेशन, पृ. ३४४–३४६.

भाषा व लिपी.—संस्कृत, ११ व्या शतकातील नागरी.

राजवंश व राजा.—यादव नृपती सेउणचंद्र (द्वितीय).

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही. अंदाजे इ. स. १०७६ ते १०९८.

सारांश.—या ताम्रपटाचा मुख्य उद्देश यादव नृपती सेउणचंद्र (द्वितीय) याने कुमरहरऐवजी देउलवली हें गाव श्रीधर यास दान दिले हे नमूद करण्याचा आहे. याशिवाय सेउणचंद्र (द्वितीय) याने स्वतःचे राज्य शत्रूंपासून वाचविले, चालुक्य राजा विक्रमादित्य (सहावा) याला शत्रूंशी मुकाबला करण्यात मदत केली आणि कल्याण राज्यात त्याची नेमणूक केली, तसेच त्याने कोकणच्या राजालाही मदत केली हें नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) सेऊणचंद्र (द्वितीय)—यादव नृपती ; (२) भिल्लम (तृतीय)—यादव नृपती ; (३) श्रीधर—दान स्वीकारणारा दंडाधिपती ; (४) विक्रमादित्य (६ वा)—चालुक्य नृपती.

ग्रामनामे.—(१) कुमरहर—संच (अ) मधील जुमरहर असावे ; (२) देउलवली—अहमदनगर जिल्ह्यातील देवळाली. पुढील गावांची निश्चित ओळख पटत नाही ; (३) टकलीग्राम—देऊलवलीच्या पूर्वेकडचे खेडे ; (४) चिंचवेहर—देऊलवलीच्या दक्षिणेकडील खेडे ; (५) सोहव—देउलवलीच्या पश्चिमेस असलेले खेडे ; (६) अंबी—देउलवलीच्या उत्तरेकडचे खेडे.

४१९. देवळी ताम्रपट, राष्ट्रकूट कृष्ण (तृतीय)

जिल्हा—**वर्धा** तालुका—**वर्धा**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट देवळी येथील एका विहिरीत सापडला.

संदर्भ.—भांडारकर, आर्. जी., **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, खंड १८, पृ. २३९–२५३ ; **इ. आय्.**, १८८८–८९, खंड ५, पृ. १८८–१९७.

भाषा व लिपी.—संस्कृत, देवनागरी.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती कृष्ण (तृतीय).

वर्ष व तिथी.—शक वर्ष ८६२ (गत वर्ष), वैशाख वद्य ५, शर्वरी संवत्सर, इ. स. ९४०–४१.

सारांश.—प्रस्तुत ताम्रपटाचा उद्देश नागपुर-नंदिवर्धन जिल्ह्यातील तालपुरुंषक हे खेडे भारद्वाज गोत्री, वेदिक वाजी-काण्व शाखीय ब्राह्मणाला दान दिले हे नमूद करण्याचा होता. हे दान राष्ट्रकूट नृपती कृष्ण (तृतीय) उर्फ अकालवर्ष याने आपला बंधु जगत्तुंग याच्या नावाने आपली राजधानी मान्यखेट येथे रहात असताना वर निर्देशिलेल्या तिथीस दिले. या दानपत्रात राष्ट्रकूटांची पूर्ण वंशावळ दिलेली आहे. हा ताम्रपट योग्राष्टच याने कोरला आहे.

व्यक्तिनामे.—(१) रट्ट—राष्ट्रकूट घराण्याचा मूळ पुरुष; (२) दंतिदुर्ग—राष्ट्रकूट नृपती; (३) कृष्णराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, दंतिदुर्गाचा चुलता ; (४) गोविंदराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, कृष्णराज (प्रथम) चा पुत्र; (५) निरुपम कलिवल्लभ—राष्ट्रकूट नृपती, गोविंदराज (द्वितीय) चा धाकटा भाऊ ; (६) जगत्तुंग (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती गोविंद (तृतीय), निरुपमाचा पुत्र ; (७) नृपतुंगदेव—राष्ट्रकूट नृपती अमोघवर्ष, जगत्तुंग (प्रथम) चा पुत्र ; (८) कृष्णराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती अकालवर्ष, नृपतुंगदेवाचा पुत्र ; (९) जगत्तुंग (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, कृष्णराज (द्वितीय) चा पुत्र ; (१०) इंद्र (तृतीय)—राष्ट्रकूट नृपती, जगत्तुंग (द्वितीय) चा पुत्र ; (११) अमोघवर्ष (१ ला)—राष्ट्रकूट नृपती, इंद्र (तृतीय) चा भाऊ; (१२) अमोघवर्ष (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, इंद्र (तृतीय) चा पुत्र; (१३) गोविंद (चतुर्थ)—राष्ट्रकूट नृपती, अमोघवर्ष (द्वितीय) चा धाकटा भाऊ ; (१४) कृष्णराज (तृतीय)—राष्ट्रकूट नृपती, अमोघवर्ष (१ ला) चा पुत्र; (१५) दंतिग—कृष्णराज (तृतीय) ने जिंकलेला राजा; (१६) वप्पुक—कृष्णराज (तृतीय) ने जिंकलेला राजा ; (१७) रच्छयामल्ल—कृष्णराज (तृतीय) ने जिंकलेला गांग प्रदेशाचा राजा ; (१८) भूतार्य—गांग प्रदेशावर कृष्णराज (तृतीय) ने

स्थापिलेला राजा ; (१९) राजादित्य—कृष्णराज (तृतीय) ने जिंकलेला चोळ राजा ; (२०) अण्णिग—कृष्णराज (तृतीय) ने जिंकलेला पल्लव राजा ; (२१) जगत्तुंग (तृतीय)—राष्ट्रकूट राजपुत्र, कृष्णराज (तृतीय) चा धाकटा भाऊ ; (२२) रिषिअप्प—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण, वाजी—काण्व शाखा ; (२३) योग्राष्टच—लेख कोरणारा; (२४) चेवानन्वेर—योग्राष्टच याचा भाऊ ; (२५) भाइल्ल—रिषियप्प याचा पिता.

ग्रामनामे.—(१) तालपुरुंषक—दान दिलेले खेडे, ओळख पटत नाही; (२) मादार्टढिढर—ओळख पटत नाही, दान दिलेल्या खेडयाच्या पूर्वेकडील गाव; (३) मोहमग्राम—नागपूरच्या वायव्येस ५० मैलांवर असलेले मोहगाव, छिंदवाडा जिल्हा ; (४) वध्रीर—नागपूर शहराचा वर्डी हा भाग ; (५) नंदिवर्धन—नागपूर जिल्ह्यातील हल्लीचे नगरधन.

४२०. दौलताबाद ताम्रपट, राष्ट्रकूट शंकरगण

जिल्हा—**औरंगाबाद** तालुका—**खुल्दाबाद**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट दौलताबाद येथील भाऊ देवराम भट या टांगेवाल्याच्या घरी होता.

संदर्भ.—भांडारकर, डी. आर्., इ. आय्., १९०७–१९०८, खंड ९, पृ. १९३–१९८.

भाषा व लिपी.—संस्कृत, उत्तरेकडील लिपीप्रमाणे.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती कलिवल्लभ नरेंद्र (ध्रुव निरुपम) व त्याचा मांडलिक शंकरगण, राष्ट्रकूट नन्नचा पुत्र.

वर्ष व तिथी.—शके ७१५, इ. स. ७९३.

सारांश.—हा लेख राष्ट्रकूट नृपती ध्रुव याच्या कारकीर्दीतील आहे. या लेखाचा उद्देश त्याचा मांडलिक राष्ट्रकूट शंकरगण याने दिलेल्या दानाची नोंद करणे हा आहे. प्रस्तुत लेखात नेहमीप्रमाणेच राष्ट्रकूटांची ध्रुव निरुपम पर्यंत वंशावळ दिलेली आहे. दान घेणाऱ्या व्यक्तीचे व दान दिलेल्या खेडयाचे नाव अस्पष्ट झाले आहे. दान घेणाऱ्याबद्दल इतकेच सांगता येईल की, ती व्यक्ती तेनवीहून आलेली होती आणि 'तत्पादपूजार्थ गुरुदक्षिणा' या शब्दावरून ती व्यक्ती शंकरगणाचा गुरु असावी असे वाटते. हे दानपत्र चंदयिक याने नृपती ध्रुव निरुपम याच्या आज्ञेवरून लिहिले. दुसरे दान स्वीकारणाऱ्या व्यक्तीचे नावही वाचता येत नाही. परंतु तो भारद्वाज गोत्री असावा असे दिसते. दान दिलेल्या खेडयाचे नाव 'सामिरा' असावे.

व्यक्तिनामे.—(१) गोविंदराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती ; (२) कक्कराज—राष्ट्रकूट नृपती, गोविंदराज (प्रथम) चा पुत्र ; (३) इंद्रराज—राष्ट्रकूट नृपती, कक्कराजाचा पुत्र ; (४) दंतिदुर्ग—राष्ट्रकूट नृपती, इंद्रराजाचा पुत्र ; (५) कृष्णराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, कक्कराजाचा पुत्र, दंतिदुर्गाचा चुलता ; (६) गोविंदराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, कृष्णराज (प्रथम) चा पुत्र ; (७) पारिजात—गोविंद (द्वितीय) ने जिंकलेला राजा ; (८) गोवर्धन—गोविंद (द्वितीय) ने मदत देऊ केलेला राजा ; (९) निरुपम—राष्ट्रकूट नृपती, गोविंदराज (द्वितीय) चा धाकटा भाऊ ; (१०) नन्न—निरुपमाचा चुलता, कक्कराजाचा पुत्र ; (११) समरावलोक शंकरगण—दान देणारा राष्ट्रकूट नृपती, नन्न याचा पुत्र ; (१२) चंदयिक—लेख लिहिणारा.

ग्रामनामे.—(१) तेनवी—ओळख पटत नाही ; (२) समिरा—ओळख पटत नाही ; (३) चिंचग्राम—ओळख पटत नाही ; (४) निंबग्राम—ओळख पटत नाही.

४२१. धर्मपुरी शिलालेख, चालुक्य जगदेकमल्ल (द्वितीय)

जिल्हा—बीड तालुका—मोमिनावाद

प्राप्तिस्थळ.—महाराष्ट्र राज्य पुरातत्त्व विभागाच्या डेप्युटी डायरेक्टरकडून या लेखाचाचे ठसे मिळाले.

संदर्भ.—ॲ. रि. इं. ए., १९६१–६२, पृ. ९३, नं. ४५९.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—कल्याणचा चालुक्य नृपती जगदेकमल्ल (द्वितीय).

वर्ष व तिथी.—शासन वर्ष २ रे, सिद्धार्थी संवत्सर, कार्तिक शुद्ध १५, रविवार. (अनियमित).

सारांश.—या लेखात मुकुटीचा मन्नेय मुंजराणेयाचा पुत्र देमरस याने काळेश्वर देवाला दिलेली देणगी नमूद केली आहे.

व्यक्तिनामे.—(१) देमरस—दानंकर्ता ; (२) मुंजराणेय—देमरसाचा पिता.

ग्रामनामे.—(१) लोक्किगुण्डि—ओळख पटत नाही ; (२) मुकुटी (?).

४२२. धर्मपुरी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—महाराष्ट्र राज्य पुरातत्त्व विभागाच्या डेप्युटी डायरेक्टरकडून या लेखाचे ठसे मिळाले.

संदर्भ.—ॲ. रि. इं. ए., १९६१–६२, पृ. ९३, नं. ४६०.

भाषा व लिपी.—कन्नड, इ. स. ११ व्या शतकातील लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. चे ११ वे शतक.

सारांश.—या लेखात यापनीय संघाचा जैन उल्लेख असून ईश्वर भट्ट हा लेखक आहे असे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—ईश्वरभट्ट—लेख लिहिणारा.

४२३. धर्मपुरी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—महाराष्ट्र राज्य पुरातत्त्व विभागाच्या डेप्युटी डायरेक्टरकडून या लेखाचे ठसे मिळाले.

संदर्भ.—ॲ. रि. इं. ए., १९६१–६२, पृ ९३, नं. ४६२.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. चे ११ वे शतक.

सारांश.—या लेखात काही देणगी नमूद केली आहे. लेख त्रोटक आहे.

४२४. धर्मपुरी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख धर्मपुरी येथील हेमाडपंती देवालयाच्या भिंतीच्या बाहेरच्या बाजूवर कोरलेला आहे.

संदर्भ.—ॲ. रि. इं. ए., १९६१–६२, पृ. ९४, नं. ४६३.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. ११ वे शतक.

सारांश.—या लेखात एका व्यक्तीची स्तुती केली आहे. त्या व्यक्तीचे नाव बहुधा विक्रमांक असावे.

४२५. धर्मपुरी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—महाराष्ट्र राज्य पुरातत्त्व विभागाच्या डेप्युटी डायरेक्टरकडून या लेखाचे ठसे मिळाले.

संदर्भ.—ॲ. रि. इं. ए., १९६१–६२, पृ. ९३, नं. ४६१.

भाषा व लिपी.—कन्नड, इ. स. ११ व्या शतकातील.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात पोट्टलकेरे, कंचगार व तेलुंगनगर येथील पंच पट्टनांनी निरनिराळ्या करांचे उत्पन्न देवपूजा व संन्याशांना भोजन घालण्यासाठी दान दिल्याचे नमूद केले आहे. ही देणगी धर्मपूर येथील सेट्टिय बसतीचा आचार्य वंडियूरगण व यापनीय संघाचा महावीर पंडित यांच्या स्वाधीन केली होती.

व्यक्तिनामे.—(१) महावीर पंडित—दान स्वीकारणारा यापनीय संघ प्रमुख ; (२) वंडियूरगण—दान स्वीकारणारा सेट्टिय बसतीचा आचार्य.

ग्रामनामे.—(१) पोट्टलकेरे ; (२) कंचगार ; (३) तेलुंगनगर, या गावांची ओळख पटवलेली नाही.

४२६. धाबादेव शिलालेख, यादव मेलुगिदेव

जिल्हा—धुळे तालुका—शिरपूर

प्राप्तिस्थळ.—हा लेख बोर खेड्यापासून ६ मैलांवर धाबादेव येथे जंगलात सापडला.

संदर्भ.—(१) भट, द. रा., संशोधक, वर्ष २६, भाग १-४, पृ. ७८–८० ; (२) तुळपुळे शं. गो., प्रा. म. को. ले., १९६३, नं. ६४, पृ. ३४१–४३.

भाषा व लिपी.—संस्कृत-मराठी मिश्र, प्राचीन देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—यादव नृपती मेल्लुगिदेव.

वर्ष व तिथी.—नवसिकावरि संवत्सर, अंदाजे इ. स. ११२८. तुळपुळ्यांच्या मते मेलुगिदेव शके १०५० मध्ये शासनकर्ता होता.

सारांश.—प्रस्तुत लेखात नवसिकावरि संवत्सर असताना सिंघणदेवाचा पुत्र मेलुगि याने कोंडेव्वाचे (देवीचे) देऊळ, मठ व विहीर बांधली असा उल्लेख आहे. नंतर सिंघणदेव पुत्र मेलुगिदेव याने हा लेख स्वतःच्या हाताने लिहिला असा उल्लेख आहे. लेख त्रोटक आहे.

व्यक्तिनामे.—(१) सिंघणदेव—यादव नृपती; (२) मेलुगिदेव—देऊळ बांधणारा, सिंघणाचा पुत्र.

४२७. धारूर ताम्रपट, राष्ट्रकूट गोविंद (तृतीय)

जिल्हा—**बीड** तालुका—**केज**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट धारूर येथील बापूराव भाऊराव महाजन यांच्याजवळ होता.

संदर्भ.—(१) मिराशी, वा. वि., व गोरे, एन्. ए., इ. आय्., १९६५–६६, खंड ३६, पृ. २८५—२९६; (२) गोरे एन्. ए., म. यु. ज., ३, पृ. ७६.

भाषा व लिपी.—संस्कृत, नागरी.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती, गोविंद (तृतीय).

वर्ष व तिथी.—शके (७)२८, ज्येष्ठ अमावास्या, सूर्यग्रहण (अनियमित).

सारांश.—या ताम्रपटाचा मुख्य उद्देश राष्ट्रकूट नृपती गोविंद (तृतीय) हा मयूरखंडी येथे असताना सूर्यग्रहणाच्या वेळी अणहे हे धारूर जिल्ह्यातील खेडे दुर्गैय या वत्स गोत्राच्या ब्राह्मणास दान दिले हे नमूद करण्याचा आहे. हा ताम्रपट अरुणादित्याने लिहिला. देवैय्य राणक हा दूतक होता.

व्यक्तिनामे.—(१) कृष्णराज—राष्ट्रकूट नृपती; (२) निरुपम कलिवल्लभ—राष्ट्रकूट नृपती, कृष्णराजाचा पुत्र; (३) गोविंदराज (तृतीय)—राष्ट्रकूट नृपती, निरुपमाचा पुत्र; (४) दुर्गैय भट्ट—दान स्वीकारणारा वत्स गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (५) चंदैय—क्रमविद् ब्राह्मण, दुर्गैयभट्टाचा पिता; (६) विजाडि भट्ट—दुर्गैयभट्टाचा पितामह; (७) अरुणादित्य—या ताम्रपटाचा लेखक; (८) वत्सराज—अरुणादित्याचा पिता; (९) देवैय्य राणक—दूतक.

ग्रामनामे.—(१) मयूरखंडी; (२) श्रीभवन—गुजराथेतील हल्लीचे सारभोण; (३) धारअुर—हल्लीचे धारूर; (४) अणहे—धारूरच्या आग्नेयेस १४ मैलांवरील हल्लीचे अणेगाव; (५) अइवच्छग्राम—अणेगावच्या पूर्वेस १$\frac{1}{4}$ मैलांवरील आवसगाव; (६) धणीग्राम—अणेगावच्या दक्षिणेस २ मैलांवरील धणेगाव; (७) वाउजीग्राम—अणेगावच्या पश्चिमेस १ मैलावरील बावाची कैज; (८) अणंतग्राम—अणेगावच्या उत्तरेस ४ मैलांवरील आनंदगाव.

४२८. धुळे शिलालेख, राष्ट्रकूट कर्कराज

जिल्हा—**धुळे** तालुका—**धुळे**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट धुळे येथे कलेक्टर ऑफिसच्या रेकॉर्डरूममध्ये ठेवला होता.

संदर्भ.—भांडारकर, डी. आर्., इ. आय्., १९०५–१९०६, खंड ८, पृ. १८२–१८७.

भाषा व लिपी.—संस्कृत, दाक्षिणात्य वळणाची.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती गोविंदराज व त्याचा मांडलिक राष्ट्रकूट कर्कराज.

वर्ष व तिथी.—पौष शुक्ल १०, शके ७०१, इ. स. ७७९.

सारांश.—या दानपत्राचा उद्देश कर्कराजाने सिंदीनगर येथे असताना संक्रांतीच्या प्रसंगी नासिक विषयातील रक्खुल्लग्राम हे खेडे कौशिक गोत्री चंद्रादित्य भट्ट याचा पुत्र ········ याला दान दिले हे जाहीर करण्याचा आहे.

व्यक्तिनामे.—(१) गोविंदराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती ; (२) कर्कराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, गोविंदराज (प्रथम) चा पुत्र ; (३) इंद्रराज—राष्ट्रकूट नृपती, कर्कराज (प्रथम) चा पुत्र ; (४) दंतिदुर्गराज—राष्ट्रकूट नृपती, इंद्रराजाचा पुत्र ; (५) कृष्णराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, कर्कराज (प्रथम) चा पुत्र ; (६) गोविंदराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, कृष्णराज (प्रथम) चा पुत्र ; (७) ध्रुवराज—राष्ट्रकूट नृपती, गोविंदराज (द्वितीय) चा धाकटा भाऊ ; (८) कर्कराज (द्वितीय) —राष्ट्रकूट नृपती, ध्रुवराजाचा पुत्र ; (९) भट्ट चंद्रादित्य–कौशिक गोत्री ब्राह्मण, दान स्वीकारणाऱ्या ब्राह्मणाचा पिता ; (१०) दुग्गडि—लेख लिहिणाऱ्याचा पिता.

ग्रामनामे.—(१) रक्खुलग्राम—नाशिक जिल्ह्यातील हल्लीचे लाखलगाव ; (२) सिंदीनगर–हल्लीचे सिन्नर ; (३) चेभटिका—लाखलगावच्या पूर्वेस असलेले चेहडि ; (४) वटमुख—लाखलगावच्या पश्चिमेकडील ओढे ; (५) वटपुर—लाखलगावच्या उत्तरेकडील गाव. ओळख पटत नाही ; (६) नासिक्क विषय—हल्लीचा नाशिक विभाग.

विशेष महत्त्व.—या लेखामुळे गोविंद (द्वितीय) याचा नक्की काळ समजतो.

४२९. नगरधन ताम्रपट; स्वामिराज

जिल्हा—**नागपूर** तालुका—**रामटेक**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट रामटेकजवळ नगरधन येथे सापडला.

संदर्भ.—मिराशी, वा. वि., इ. आय्., १९४९–५०, खंड २८, पृ. १–११, कॉ. इं. इं., १९५५, खंड ४, पृ. ६११–६१७.

भाषा व लिपी.—संस्कृत, पेटिकाशीर्षक लिपी. इ. सनाचे ६वे शतक.

राजवंश व राजा.—नृपती स्वामिराज (बहुधा प्रारंभीचा राष्ट्रकूट राजा).

वर्ष व तिथी.—(१) आषाढ संवत्सर, चैत्र अमावास्या; (२) वर्ष ३२२, कार्तिक, शुद्ध ५.

सारांश.—हे शासन स्वामिराज याच्या राजवटीत त्याचा भाऊ नन्नराज याने नंदिवर्धन येथून दिलेले आहे. या शासनाचा मुख्य उद्देश पुढील दोन देणग्या नमूद करण्याचा होता. (१) चिंचपट्टिका येथील १२ निवर्तने जमीन महामात्र गणाच्या कार्यकारी समितीच्या सभासदांच्या व अध्यक्षांच्या विनंतीवरून दान दिली, (२) चटुकवट जवळ असलेले अंकोल्लिका हे गाव सूर्यग्रहण प्रसंगी दान दिले. हे दान स्वीकारणारे काही ब्राह्मण शुक्ल यजुर्वेदी, काही कृष्ण यजुर्वेदी व काही सामवेदी होते. लेखाच्या शेवटी उपरोक्त (२) नंबरची तिथी दिलेली आहे. हा लेख क्षत्रिय चंद्रपुत्र दुर्गादित्य याने लिहिला आहे.

व्यक्तिनामे.—(१) स्वामिराज—दान देणारा नृपती ; (२) नन्नराज—स्वामिराजाचा भाऊ, दान नोंदवणारा नृपती : (३) कलिंग—दानासाठी विनंती करणाऱ्या महामात्र गणाचा स्थविर ; (४) ते (१०) महामात्रगणाच्या कार्यकारी समितीचे सभासद ; (४) केटभ (५) रोलदेव ; (६) प्रदीप्तभट ; (७) शिवदेवभठ ; (८) मातृस्वामी ; (९) गणदेव; (१०) कोंकभट ; (११) सामस्वामी—हस्तिवैद्य ; (१२) असंगत ; (१३) प्रभाकर—महामात्रगणाचे सभासद; (१४) माल्लायिक—पीलुपती; (१५) दिवाकर—दान स्वीकारणारा उपमन्यु गोत्री ब्राह्मण, वाजसनेय शाखा ; (१६) देवस्वामी—दान स्वीकारणारा

मौद्गल्य गोत्री ब्राह्मण; (१७) शंकर—दान स्वीकारणारा कौशिक गोत्री ब्राह्मण; (१८) आदित्य—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (१९) दामोदर—दान स्वीकारणारा उपमन्यु गोत्री ब्राह्मण; (२०) गण; (२१) सोम; (२२) वत्स; (२३) चंडि; (२४) कुमार; (२०) ते (२४) दान स्वीकारणारे तैत्तिरीय शाखेचे ब्राह्मण; (२५) ईशान दान स्वीकारणारा सामवेदी ब्राह्मण; (२६) रविचन्द्र—दान स्वीकारणारा कौंडिन गोत्र ब्राह्मण, काण्व शाखा; (२७) रविगण—दान स्वीकारणारा कौंडिन गोत्री, ब्राह्मा ण, काण्व शाखा; (२८) कर्कस्वामी—दान स्वीकारणारा वत्स गोत्री ब्राह्मण; (२९) सुप्रभ—दान स्वीकारणारा तैत्तिरीय शाखेचा ब्राह्मण; (३०) दुर्गादित्य—लेख लिहिणारा क्षत्रिय; (३१) चंद्र–दुर्गादित्याचा पिता.

ग्रामनामे.—(१) नांदीवर्धन—हल्लीचे नगरधन; (२) अचलपूर—अमरावती जिल्ह्यातील अचलपूर (एलिचपूर); (३) अंकोल्लिका—नगरधनाच्या आग्नेयेस सुमारे ८ मैलांवर असलेले आरोली हे गाव, सूर नदीचा पूर्व तीर; (४) चिंचपट्टिका—नगरधनाच्या ईशान्येस दीड मैलांवरील चिंचाल; (५) श्रीपर्णिका—ओळख पटत नाही. रामटेकच्या आसपास असावे.

४३०. नरवण ताम्रपट, पश्चिमी चालुक्य नृपती विक्रमादित्य

जिल्हा—रत्नागिरी **तालुका—चिपळूण**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट नरवण येथे श्री. डी. एच्. जोशी यांना सापडला. सध्या हा ताम्रपट पुणे येथे भारत इतिहास संशोधन मंडळात आहे.

संदर्भ.—खरे, ग. ह., भा. इ. सं. मं., त्रैमासिक पुणे, खंड १०, क्र. १, पृ. ९–१६.

भाषा व लिपी.—संस्कृत, चालुक्य नृपती कीर्तिवर्मन् (दुसरा) याच्या केंदूर व वक्कलेरि येथे सापडलेल्या ताम्रपटांप्रमाणे लिपी.

राजवंश व राजा.—बदामीचा चालुक्य नृपती विक्रमादित्य (द्वितीय).

वर्ष व तिथी.—शके ६६४ (गत वर्ष), आठवे शासनवर्ष, २१ डिसेंबर, इ. स. ७४१–४२.

सारांश.—प्रस्तुत लेख पश्चिमी चालुक्य नृपती विक्रमादित्य (द्वितीय) याच्या राजवटीतील असून त्याने आदित्यवाड या लष्करी तळावरून राष्ट्रकूट गोविंदराज याच्या विनंतीवरून भिन्न गोत्री ब्राह्मणांना नरवण हे गाव चिंद्रमाडासह दान दिल्याचे या लेखात नमूद केले आहे. हा लेख महासांधिविग्रहिक अनिवाति (अनिवारित) पुण्यवल्लभ याने लिहिला.

व्यक्तिनामे.—(१) पोलकेशि (प्रथम)—चालुक्य नृपती; (२) कीर्तिवर्मन् (प्रथम)—चालुक्य नृपती, पोलकेशि (प्रथम) चा पुत्र; (३) सत्याश्रय—चालुक्य नृपती, कीर्तिवर्मन् (प्रथम) चा पुत्र; (४) विक्रमादित्य (प्रथम)—चालुक्य नृपती, सत्याश्रयाचा पुत्र; (५) विनयादित्य—चालुक्य नृपती, विक्रमादित्य (प्रथम) चा पुत्र; (६) विजयादित्य—चालुक्य नृपती, विनयादित्याचा पुत्र; (७) विक्रमादित्य (द्वितीय)—दान देणारा चालुक्य नृपती, विजयादित्याचा पुत्र; (८) गोविंदराज—राष्ट्रकूट वंशातील व्यक्ति; (९) शिवराज—राष्ट्रकूट गोविंदराजाचा पिता; (१०) देगुलिस्वामी—दान स्वीकारणारा कौशिक गोत्री ब्राह्मण; (११) दुर्गनागस्वामी—देगुलिस्वामीचा पिता; (१२) नागडि दीक्षित—दान स्वीकारणारा कौशिक गोत्री ब्राह्मण; (१३) टोणस्वामी—नागडि दीक्षिताचा पिता; (१४) नारायण नन्नस्वामी—कुंतलदेशीय दान स्वीकारणारा ब्राह्मण; (१५) देवु—दान स्वीकारणारा ब्राह्मण; (१६) धनंजयदुग्गु—दान स्वीकारणारा भूर्भू गोत्री ब्राह्मण; (१७) अनिवाति (अनिवारित) पुण्यवल्लभ—लेख लिहिणारा महासंधिविग्रह.

ग्रामनामे.—(१) आदित्यवाड—सातारा जिल्ह्यातील वाळवे तालुक्यात असलेल्या ऐतवडे नामक दोन गावांपैकी एक असावे ; (२) चिप्ररूलन—हल्लीचे चिपळूण ; (३) नरवण—रत्नागिरी जिल्ह्यातील हल्लीचे नरवण ; (४) चिंद्रमाड—नरवणच्या ईशान्येस ४ मैलांवर असलेले चिंद्रावळ असावे ; (५) अंबाड—ओळख पटत नाही.

४३१. नंदे शिलालेख, सीहराज

राज्य—**गोवा**

प्राप्तिस्थळ.—हा लेख नंदे (नुंदे, नूने) येथील महामाया मंदिराजवळ पडलेल्या शिळेवर कोरलेला आढळला.

संदर्भ.—(१) इं. अ. रि., १९६५–६६, पृ. ६१–६२, नं. ७; (२) गुणे, टी. व्ही., **ए. आर. जी.**, १९६६, नं. ८ ; (३) रमेश, के. व्ही., इ. आय्., १९६८, खंड ३७, भाग ६, पृ. २८३–२८४.

भाषा व लिपी.—संस्कृत, इ. स. ५ व्या–६ व्या शतकातील दक्षिणी वळणाची लिपी.

राजवंश व राजा.—नृपती सीहराज.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात सीहराजाने पार्वतीस्वामीच्या मंदिराला व एलस्वामीच्या मंदिराला द्वार व जमीन दान दिल्याचा उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—सीहराज.

४३२. नागद ताम्रपट, निकुंभाल्लशक्ति

जिल्हा—**औरंगाबाद** तालुका—**कन्नड**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट नागद येथील जी. डी. पाटील यांच्याजवळ मिळाला.

संदर्भ.—खरे, ग. ह., इ. आय्., १९४९–५०, खंड २८, पृ. १९५–१९७ व २०१–२०२.

भाषा व लिपी.—संस्कृत, प्राचीन कन्नड.

राजवंश व राजा.—सेंद्रक नृपती निकुंभाल्लशक्ति.

वर्ष व तिथी.—शक वर्ष ५७७, आनंद संवत्सर, माघ शुद्ध ३, १५ जानेवारी, इ. स. ६५५.

सारांश.—कायावतार येथील तळ्याजवळ आपला तळ असताना निकुंभाल्लशक्ति याने पुण्योपार्जनासाठी नांदीपुरद्वारि जिल्ह्यातील सुश्चिरारवोली हे गाव प्राक्तंगरा येथील रहिवासी, आत्रेय गोत्री ब्राह्मण नन्नस्वामी याचा पुत्र भोगिक याला दान दिले असे या शासनात नमूद केले आहे. हे शासन मातृदत्त याने सेनापती वासव याच्या आज्ञेवरून व सांधिविग्रहिक देवदिन्न याच्या अनुमतीनुसार लिहिले होते.

व्यक्तिनामे.—(१) निकुंभाल्लशक्ति—दान देणारा सेंद्रक नृपती ; (२) आदित्यशक्ति—सेंद्रक नृपती, निकुंभाल्लशक्तीचा पिता ; (३) भानुशक्ती—सेंद्रक नृपती, निकुंभाल्लशक्तीचा पितामह ; (४) भोगिक—दान स्वीकारणारा आत्रेय गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा ; (५) नन्नस्वामी—भोगिकाचा पिता ; (६) मातृदत्त—लेख लिहिणारा ; (७) वासव—लेख लिहिण्याची आज्ञा करणारा महाबलाधिकृत ; (८) देवदिन्न—लेखाला संमती देणारा सांधिविग्रहिक.

ग्रामनामे.—(१) कायावतार—डभोईजवळील हल्लीचे कारवण असावे; (२) नांदीपुर–द्वारी—(अ) वर्ध्याजवळील नांदोरा (हिरालाल), (ब) खानदेशातील नंदुरबार असावे (खरे); (३) सुश्चिराखोली—ओळख पटत नाही; (४) प्राक्तंगरा—ओळख पटत नाही.

४३३. नागपूर म्युझियम ताम्रपट, जनमेजय महाभवगुप्त

जिल्हा—नागपूर **तालुका—नागपूर**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट सध्या नागपूर येथील सेंट्रल म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—हुल्त्झ, इ. आय्., १९०५, खंड ८, पृ. १३८–१४३.

भाषा व लिपी.—संस्कृत.

राजवंश व राजा.—त्रिकलिंगाधिपती सोमकुलातील जनमेजय नृपती महाभवगुप्त.

वर्ष व तिथी.—८ वे शासन वर्ष, कार्तिक १२.

सारांश.—या शासनाचा उद्देश महाभवगुप्त याने ओड्रदेशातील पुरुषमंडपहून आलेल्या गौतम गोत्री धृतिकर याचा पुत्र भट्ट सांथकर याला कशलोडा विषयांतर्गत सतल्लमा गाव दान दिले हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) महाभवगुप्त—दान देणारा जनमेजय कुलातील सोमवंशीय नृपती; (२) शिवगुप्त—महाभवगुप्ताचा पिता; (३) सांथकर—दान स्वीकारणारा गौतम गोत्री ब्राह्मण; (४) धृतिकर—सांथकराचा पिता; (५) साधारण—महामहत्तम, दूतक; (६) शोभन—साधारणाचा पिता; (७) मल्लादत्त—महासांधिविग्रहिक; (८) धारदत्त—मल्लादत्ताचा पिता; (९) आल्लव—लेख लिहिणारा कायस्थ; (१०) कैलास—आल्लवाचा पिता; (११) संग्राम—लेख कोरणारा; (१२) रयणओज्झा—संग्रामाचा पिता.

ग्रामनामे.—(१) सतल्लमा—दान दिलेले गाव; (२) पुरुषमंडप—ओड्रदेशातील (ओरिसा) गाव; (३) मुरुजुंग—सांथकर ब्राह्मणाचे वास्तव्यस्थान.

४३४. नागपूर म्युझियम शिलालेख, चालुक्य विक्रमादित्य (६ वा)

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेला स्तंभ नागपूरच्या सीताबर्डी विभागात मिळाला. सध्या हा शिलालेख नागपूरच्या सेंट्रल म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—किलहॉर्न, इ. आय्., १८९४–९५, खंड ३, पृ. ३०४–३०६.

भाषा व लिपी.—अशुद्ध संस्कृत, नागरी.

राजवंश व राजा.—कल्याणचा पश्चिमी चालुक्य नृपती त्रिभुवनमल्लदेव विक्रमादित्य (६ वा)

वर्ष व तिथी.—शक संवत् १००८, शुक्रवार, वैशाख शुद्ध ३, प्रभव संवत्सर, ८ एप्रिल इ. स. १०८७ (संपादकांच्या मते).

सारांश.—हा लेख विक्रमादित्य (६ वा) याच्या राजवटीतील आहे. या लेखाचा मुख्य उद्देश विक्रमादित्याचा महाराष्ट्रकूट वंशीय मांडलिक महासामंत धाडिभंडक याचा लत्तलौर निवासी दंडनायक वत्सगोत्री पद्मनाभभट्टाचा पुत्र वासुदेव याने दिलेल्या दानाची नोंद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) त्रिभुवनमल्लदेव विक्रमादित्य (६ वा)—कल्याणीचा चालुक्य नृपती ; (२) धाडिभंडक—महाराष्ट्रकूट वंशीय महासामंत ; (३) राणक धाडिदेव—धाडिभंडक; (४) वासुदेव—दान देणारा वत्स गोत्री, काण्वशाखेचा दंडनायक ; (५) भट्ट पद्मनाभ—वासुदेवाचा पिता ; (६) भट्ट बोपपै—वासुदेवाचा पितामह ; (७) भट्ट वीठपै—वासुदेवाचा प्रपितामह.

ग्रामनामे.—लत्तलौर—उस्मानाबाद जिल्ह्यातील लातूर.

४३५. नागपूर म्युझियम शिलालेख, परमार नरवर्म देव

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेला शिलाखंड सध्या नागपूर येथील सेंट्रल म्युझियममध्ये आहे.

संदर्भ—२५९ ; (१) किलहॉर्न, इ. आय्., १८९४ खंड २, पृ. १८०–१९५.

भाषा व लिपी.—संस्कृत, इ. स. च्या १२ व्या शतकाच्या प्रारंभीची नागरी लिपी.

राजवंश व राजा.—परमार नृपती नरवर्मदेव.

वर्ष व तिथी.—विक्रम संवत् ११६१, इ. स. ११०४–११०५.

सारांश.—या प्रशस्तीचा मुख्य उद्देश लक्ष्मणदेव व नरवर्मदेव यांनी अनुक्रमे व्यापुरमंडलातील दोन गावे व मोखलपाटक हे गाव दान दिले हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) वैरिसिंह—परमार नृपती; (२) सीयक—परमार नृपती, वैरिसिंहाचा पुत्र ; (३) मुंजराज—परमार नृपती, सीयकाचा पुत्र ; (४) सिंधुराज—परमार नृपती, मुंजराजाचा धाकटा भाऊ ; (५) भोजदेव—परमार नृपती, सिंधुराजाचा पुत्र ; (६) उदयादित्य—परमार नृपती ; (७) कर्ण—चेदि नृपती; (८) लक्ष्मदेव—परमार नृपती, उदयादित्याचा पुत्र ; (९) नरवर्मदेव—परमार नृपती, लक्ष्मदेवाचा पुत्र; (१०) लक्ष्मीधर—देऊळ बांधणारा शिल्पकार.

ग्रामनामे.—(१) त्रिपुरी—जबलपूरजवळ असलेले सध्याचे तेवर गाव असावे; (२) व्यापुरमंडल—ओळख पटत नाही ; (३) मोखलपाटक—ओळख पटत नाही.

४३६. नाडसुर बौद्ध शैलगृह शिलालेख

जिल्हा—**कुलाबा** तालुका—**सुधागड**

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाडसुर येथील शैलगृहात कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) हुल्झ अ. क. न. क., १८९१, पृ. ६; (२) बुल्हर—**व्हिएन्ना ओ. ज.** १८९१ खंड ५, पृ. २३१ ; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स**, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. ११३ नं. १०६७

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात शिवगणकपुत्र गोदत्त याची देणगी नमूद केली आहे.

व्यक्तिनामे.—(१) गोदत (गोदत्त)—देणगी देणारा; (२) सिवगनक (शिवगणक)—गोदत्ताचा पिता.

४३७. नाडसुर बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाडसुर येथील शैलगृहात कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) हुल्त्झ अ. क. न. क., १८९१, पृ. ७; (२) बुल्हर, व्हिएन्ना, ओ. ज., १८९१ खंड ५, पृ. २३२; (३) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९-१०, पृ. ११३, नं. १०६८.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख तुटक आहे. यामध्ये मित (मित्र) नामक व्यक्तीची देणगी नमूद केलेली आढळते.

व्यक्तिनामे.—(१) मित (मित्र)—दान देणारा; (२) सघरखित (संघरक्षित)—दान देणारा; (३) थूपसख (स्तूपसख)—दान देणारा.

४३८. नाणेघाट शैलगृह शिलालेख

जिल्हा—ठाणे | तालुका—मुरबाड

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाणेघाट शैलगृहात मागच्या भिंतीवर कोरलेल्या मूर्तीच्या डोक्याच्यावर, कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) साइक्स, ज. रॉ. ए. सो., १८३७, खंड ४, पृ. २८८, क्र. ४; (२) इंद्रजी, ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो., १८७८, खंड १३, पृ. ३११, क्र. १; (३) बुल्हर, अ. स. वे. इं., १८८३, खंड ५, पृ. ६४, क्र. ३; (४) इंद्रजी, बॉ. गॅ. १८८३, खंड १६, पृ. ६११; (५) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९-१०, पृ. १२१, क्र. १११३.

भाषा व लिपी.—प्राकृत, प्राचीन ब्राह्मी.

राजवंश व राजा.—सातवाहन नृपती सिमुक.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—राजा सिमुक सातवाहन सिरिमत्.

व्यक्तिनामे.—सिमुक—सातवाहन नृपती.

४३९. नाणेघाट शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाणेघाट येथील शैलगृहाच्या मागच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) साइक्स्, ज. रॉ. ए. सो., १८३७, खंड ४, पृ. २८८; (२) इंद्रजी, ज. बॉ., ब्रॅ. रॉ. ए. सो., १८७७, खंड १२, पृ. ४०४; ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो., १८७८, खंड १३, पृ. ३११, क्र. २, बॉ. गॅ. १८८३, खंड १६, पृ. ६११; (३) बुल्हर, अ. स. वे. इं., १८८३, खंड ५, पृ. ६४, क्र. ४; (४) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९-१०, पृ. १२१, क्र. १११४.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—सातवाहन नृपती सातकर्णि.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—राणी नागनिका, राजा सातकर्णि (यांच्या मूर्ती).

व्यक्तिनामे.—(१) सिरिसातकणि—सातवाहन नृपती; (२) नायनिका—सायवाहन राणी,

४४०. नाणेघाट शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाणेघाट शैलगृहात मागच्या भिंतीवर कोरलेल्या लेखाचा एक भाग आहे.

संदर्भ.—(१) साइक्स्, **ज. रॉ. ए. सो.**, १८३७, खंड ४, पृ. २८८, क्र. ४ ; (२) इंद्रजी, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८७८, खंड १३, पृ. ३११, क्र. ४; (३) बुल्हर, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ५, पृ. ६४, क्र. ६ ; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १२१, क्र. १११६.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—महारठि त्नकयिर (याचो प्रतिमा).

व्यक्तिनामे.—त्रणकयिर—महारथी.

४४१. नाणेघाट शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाणेघाट शैलगृहात मागच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) साइक्स **ज. रॉ. ए. सो.**, १८३७, खंड ४, पृ. २८८, क्र. ४; (२) इंद्रजी, **ज. ब्रॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८७८, खंड १३, पृ. ३११, क्र. ५ ; (३) बुल्हर, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ५, पृ. ६४, क्र. ७; (४) इंद्रजी, **बॉ. गॅ.**, १८८३, खंड १६, पृ. ६११; (५) ल्युडर्स **अपेंडिक्स, इ. आय.**, १०, १९०९–१०, पृ. १२१, क्र. १११७.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—सातवाहन राजपुत्र हकुश्री.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—राजपुत्र हकुश्री (याची प्रतिमा).

व्यक्तिनामे.—हकुसिरि (शक्तिश्री)—सातवाहन राजपुत्र.

४४२. नाणेघाट शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाणेघाट शैलगृहात मागच्या भिंतीवरील प्रतिमेच्या डोक्याच्या जरा वर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) साइक्स्, **ज. रॉ. ए. सो.**, १८३७, खंड ४, पृ. २८८, क्र. ४ ; (२) इंद्रजी, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८७८, खंड १३, पृ. ३११; (३) बुल्हर, **अ. स. वे. इं.**, १८८३,

खंड ५, पृ. ६४, क्र. ८, (४) इंद्रजी, बॉ. गॅ., १८८३, खंड १६, पृ. ६११ ; (५) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १२२, नं. १११८.

भाषा व लिपी.––प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.––सातवाहन राजपुत्र सातवाहन.

वर्ष व तिथी.––उल्लेख नाही.

सारांश.––राजपुत्र सातवाहन (याची प्रतिमा).

व्यक्तिनामे.––सातवाहन––सातवाहन राजपुत्र.

४४३. नाणेघाट शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.––हा लेख नाणेघाट शैलगृहात मागच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.––(१) साइक्स, ज. रॉ. ए. सो., १८३७, खंड ४, पृ. २८८, क्र. ४ ; (२) इंद्रजी, ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो., १८७८, खंड १३, पृ. ३११, क्र. ३ ; (३) बुल्हर, अ. स. वे. इं., १८८३. खंड ५, पृ. ६४, क्र. ५ ; (४) इंद्रजी, बॉ. गॅ., १८८३, खंड १६, पृ. ६११ ; (५) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १२१, क्र. १११५.

भाषा व लिपी.––प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.––सातवाहन राजपुत्र भाय.

वर्ष व तिथी.––उल्लेख नाही.

सारांश.––राजपुत्र भाय (याची प्रतिमा).

व्यक्तिनामे.––भाय––सातवाहन राजपुत्र.

४४४. नाणेघाट कुंड शिलालेख

प्राप्तिस्थळ.––हा लेख नाणेघाट येथील कुंडावर कोरलेला आहे.

संदर्भ.––(१) इंद्रजी, ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो., १८८३, खंड १५, पृ. ३१३ ; (३) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १२२, क्र. ११२०.

भाषा व लिपी.––प्राकृत, आंध्र वळणाची ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.––सातवाहन नृपती वासिष्ठीपुत्र.

वर्ष व तिथी.––संवत्सर तर १३ हेमंत पक्ष पंचमी १०.

सारांश.––हा लेख वासिष्ठीपुत्र सातकर्णी याच्या अंमलातील असून यामध्ये कामवननिवासी गृहपती दमघोस (दमघोष) याने दिलेली विहिरीची (पनियपुवा) देणगी नमूद केली आहे.

व्यक्तिनामे.––(१) दमघास (दमघोष)––दानकर्ता; (२) चतरपण सतकणि, वसठि–पुत––सातवाहन नृपती.

ग्रामनामे.––कमवन––ओळख पटत नाही.

४४५. नाणेघाट शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.––हा लेख नाणेघाट शैलगृहात उजव्या व डाव्या बाजूच्या भिंतीवर आहे.

संदर्भ.—(१) साइक्स्, ज. रॉ. ए. सो., १८३७, खंड ४, पृ. २८८, क्र. ४; (२) प्रिन्सेप, ज. ए. सो., १८३८, खंड ७, पृ. ५६५; (३) स्टिव्हन्सन, ज. बॉ. ब्रँ. रॉ. ए. सो., १८५४, खंड ५, पृ. १७४; ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो., १८५६, खंड ५, पृ. ४२८; (४) इंद्रजी, ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो. १८७७, खंड १२, पृ. ४०४, १८७८, खंड १३, पृ. ३१०; (५) बुल्हर, अ. स. वे. इं., १८८३, खंड ५, पृ. ६०, क्र. १, २; (६) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १२१, क्र. १११२.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—सातवाहन नृपती.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख त्रोटक आहे. त्यामुळे सुसंगत अर्थ लावता येत नाही. अंगीय घराण्याचा वंशज महारथी कळलाय याची कन्या, सिरि याची पत्नी, वेदिसिरि व सती सिरिमत (शक्ति श्रीमत्) यांची माता. प्रारंभी धर्म, इंद्र, संकर्षण, वासुदेव, यम, वरुण, कुबेर, वासव यांना अभिवादन.

व्यक्तिनामे.—(१) वेदिसिरि (वेदिश्री); (२) सति सिरिमत् (शक्ति श्रीमत्); (३) कळलाय—महारथी.

४४६. नाणेघाट शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाणेघाट येथील शैलगृहाच्या जवळ असलेल्या कुंडावर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बुल्हर, अ. स. वे. इं., १८८३, खंड ५, पृ. ६४, क्र. ९; (२) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १२२, क्र. १११९.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—सातवाहन नृपती.

वर्ष व तिथी.—बुल्हरच्या मताप्रमाणे हा लेख गौतमीपुत्र सातकर्णी किंवा पुलुमायीच्या वेळचा असावा.

सारांश.—सोपारियक (सोपाऱ्याचा) गोविंददास याने दिलेली कुंडाची देणगी.

व्यक्तिनामे.—गोविंददास—दानकर्ता.

ग्रामनामे.—सोपारय—ठाणे जिल्ह्यातील सोपारा.

४४७. नाशिक बौद्ध शैलगृह शिलालेख

जिल्हा—नाशिक

तालुका—नाशिक

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. १९ मध्ये उजव्या बाजूच्या खिडकीच्या वरच्या बाजूला कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, ज. बॉ. ब्रॅ. रॉ.ए. सो., १८६५, खंड ७, पृ. ४८, नं. ६; (२) भांडारकर ट्रान्झा. दुसरी ओरिएण्टल कॉंग्रेस, लंडन, १८७६, पृ. ३३८, नं. ६; (३) बुल्हर, अ. स. वे. इं., १८८३, खंड ४, पृ. ९८, नं. १; (४) इंद्रजी, बॉ. गॅ. नं. १, १८८३, पृ. ५९१, क्र. २१७; (५) सेनॉर्ट, इ. आय्., १९०५, खंड ८, पृ. ९३, क्र. २२; (६) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १२९, क्र. ११४४.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—सातवाहन नृपती कण्ह (कृष्ण).

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—सातवाहन नृपती कृष्ण याच्या कारकीर्दीत हे शैलगृह नाशिक येथील श्रमणांची व्यवस्था पहाणाऱ्या अधिकाऱ्याने (महामात) खोदले असे या लेखात नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—कण्ह (कृष्ण)—सातवाहन नृपती.

ग्रामनामे.—नासिक—हल्लीचे नाशिक.

४४८. नाशिक बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. १० च्या व्हरांड्यात मागच्या भिंतीवर छताखाली कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, हि. रि., १८४७, पृ. ६, क्र. २४ ; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८५३, खंड ५, पृ. ४९, क्र. ४ ; (३) वेस्ट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८६५, खंड ७, पृ. ५०, क्र. १७, १९ ; (४) भांडारकर, **ट्रॅन्झ. २ री लंडन ओरिएण्टल कॉंग्रेस**, १८७६, पृ. ३२६, क्र. १७; (५) बुल्हर व बर्जेस, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९९, क्र. ५ ; (६) होर्नले, **इं. अॅ.**, १८८३, खंड १२, पृ. २७ ; (७) भांडारकर, **इ. अॅ.**, १८८३, खंड १२, पृ. १३९; (८) इंद्रजी, **बॉ. गॅ.** १८८३, खंड १६, पृ. ५७९, क्र. १० ; (९) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १२५, क्र. ११३१.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—क्षहरात क्षत्रप नहपान.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात उषवदाताने निरनिराळ्या ठिकाणी दिलेल्या देणग्या नमूद केल्या आहेत त्याने गोवर्धन येथील त्रिरश्मी टेकडीवरील लेणे व कुंड यांची देणगी दिली. याशिवाय देव, ब्राह्मण व चतुःदिशांच्या भिक्षुसंघाला तीर्थांच्या ठिकाणी देणग्या दिल्या होत्या.

व्यक्तिनामे.—(१) उषवदात (ऋषभदत्त)—देणगी देणारा ; (२) नहपान— उषवदाताचा सासरा, क्षहरात क्षत्रप ; (३) दीनीक—उषवदाताचा पिता ; (४) अश्विभूति—शेताचा ब्राह्मण मालक ; (५) वाराही —अश्विभूतीची माता.

ग्रामनामे.—(१) प्रभास—काठेवाडातील हल्लीचे प्रभास किंवा सोमनाथपट्टन ; (२) भरुकछ—हल्लीचे भडोच ; (३) दशपुर—मध्यप्रदेशातील मंदसोर हे जिल्ह्याचे ठिकाण ; (४) गोवर्धन—नाशिकच्या पश्चिमेस ६ मलावर असलेले गोवर्धन गंगापुर हे यात्रेचे ठिकाण असावे ; (५) शोर्पारग—हल्लीचे सोपारा ; (६) पुष्कर—राजस्थानमध्ये अजमेरच्या उत्तरेस सात मैलांवर असलेले हल्लीचे पोखर किंवा पुष्कर हे तीर्थाचे ठिकाण.; (७) नानंगोल—ठाणे जिल्ह्यातील, नारगोल असावे. नद्या–तापी, दमण (दमणगंगा), दाहनुका, पारादा, बारणासा (बनास), इबा, करबेणा.

४४९. नाशिक शैलगृह शिलालेख, वासिठीपुत पुळुमायि

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. २ च्या व्हरांड्याच्या मागच्या भिंतीवर आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट व वेस्ट, ज. बॉ. ब्रँ. रॉ. ए. सो., १८६५, खंड ७, पृ. ५२, क्र. २७; (२) भांडारकर, ट्रान्झ. २ री लंडन ओरिएंटल कॉंग्रेस, १८७६, पृ. ३३८, क्र. २७; (३) बर्जेस व बुल्हर, अ.स.वे.इं., १८८३, खंड ४, पृ. १०७, क्र. १६; (४) सेनार्ट, इ. आय्., १९०५, खंड ८, पृ. ५९, क्र. १; (५) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १२२, क्र. ११२२.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—सातवाहन नृपती वासिष्ठीपुत्र पुळुमायि.

वर्ष व तिथी.—६ वे शासन वर्ष, ग्रीष्म ऋतूतील पाचवा पंधरवडा. (संवत्सरे छठे ६, गिम्हपखे पचमे ५, दिवसे....)

सारांश.—हा लेख त्रोटक आहे. तिथीशिवाय काही मजकूर लागत नाही.

व्यक्तिनामे.—(१) पुलुमायि—सातवाहन नृपती; (२) वासिठी (वासिष्ठी)–पुलुमायिची माता.

४५०. नाशिक बौद्ध शैलगृह शिलालेख, गोतमीपुत सिरिसदकणि

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत लेख नाशिक शैलगृह क्र. ३ च्या व्हरांडयाच्या पूर्वेकडील भिंतीवर छताला लागूनच कोरलेला आहे.

सारांश.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, ज. बॉ. ब्रँ. रॉ. ए. सो., १८५३, खंड ५, पृ. ४६, क्र. २ (पहिला भाग); (२) वेस्ट व वेस्ट, ज. बॉ. ब्रँ. रॉ. ए. सो., १८६५, खंड ७, पृ. ५१, क्र. २५; (३) भांडारकर, ट्रान्झ, २री लंडन ओरिएंटल कॉंग्रेस, १८७६, पृ. ३१९, क्र. २५ (पहिला भाग); (४) बर्जेस व बुल्हर, अ. स. वे. इं.., १८८३, खंड ४, पृ १०४, क्र. १३; (५) इंद्रजी, बॉ. गॅ., १८८३, खंड १६, पृ. ५५८, क्र. ४; (६) सेनार्ट, इ. आय्, १९०५, खंड ८, पृ. ७१, क्र. ४; (७) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्. १०, १९०९–१०, पृ. १२३–१२४, क्र. ११२५.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—सातवाहन नृपती गौतमीपुत्र सातकर्णि.

वर्ष व तिथी.—१८ वे शासन वर्ष, वर्षा ऋतूच्या दुसऱ्या पंधरवडयातील पहिला दिवस. (संवत्सरे वासपखे २ दिवसे १).

सारांश.—प्रस्तुत लेखात नृपती गौतमीपुत्र सातकर्णि याने गोवधनाच्या वैजयंतीहून विष्णुपालित नामक अधिकाऱ्याला उद्देशून काढलेला हुकूम नमूद करण्यात आलेला आहे. या हुकुमान्वये पश्चिम कखडी गावातील पूर्वी उसभदात याच्याकडे असलेली २०० निवर्तने जमीन तेकिरसी येथील संन्याशांना देण्यात आली. हा हुकूम महासंघाने नियुक्त केलेल्या सिवगुत नामक अधिकाऱ्याने लिहिला होता आणि हा लेख तापास याने तयार केला.

व्यक्तिनामे.—(१) गोतमीपुत सिरिसदकणि (गौतमीपुत्र श्रीसातकर्णि)—सातवाहन नृपती; (२) विण्हुपालित—गोवधनाचा अमच (अमात्य); (३) सिवगुत (शिवगुप्त)—अमच (अमात्य) (४) तापस—लेख तयार करणारा; (५) उसभदात (ऋषभदत्त) शेताचा पूर्वीचा मालक.

ग्रामनामे—(१) वेजयंती–म्हैसूर संस्थानांतील शिमोगा जिल्ह्यातील वनवासी; (२) बेणाकटक; (३) अपरकखडी–ओळख पटत नाही; (४) गोवधन (गोवर्धन–नाशिकच्या पश्चिमेस ६ मैलावर असलेले हल्लीचे गोवर्धन गंगापूर असावे.

४५१. नाशिक बौद्ध शैलगृह शिलालेख, राजन गोतमीपुत सातकणि

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक येथील शैलगृह क्र. ३ मधील व्हरांडयाच्या पूर्वेकडील भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८५३, खंड ५, पृ. ४६, क्र. २. (दुसरा भाग); (२) वेस्ट व वेस्ट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८६५, खंड ७, पृ. ५१, क्र. २५ (खालचा भाग); (३) भांडारकर, **ट्रान्झ. २ री लंडन ओरिएंटल कॉंग्रेस**, १८७६ पृ. ३१९, क्र. २५; (४) बर्जेस व बुल्हर, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. १०५, क्र. १४; (५) इंद्रजी, **बॉ. गॅ.**, १८८३, खंड १६, पृ. ५६०, क्र. ५; (६) हुल्श, **इ. आय्.** १९०१, खंड ६, पृ. ३१९, नोंद २,३; (७) सेनार्ट, **इ. आय्.**, १९०५, खंड ८, पृ. ७३, क्र. ५; (८) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १२४, क्र. ११२६

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—सातवाहन नृपती गौतमीपुत्र सातकर्णी.

वर्ष व तिथी.—(१) वर्षा ऋतूच्या ४ थ्या पंधरवड्यातील ५ वा दिवस, २४ वे शासनवर्ष (संवत्सरे २०, ४, वासान पखे ४, दिवसे पचमे ५); (२) ग्रीष्म ऋतूतील दुसऱ्या पंधरवड्यातील १० वा दिवस, २४ वे शासन वर्ष. (संवत्सरे २०, ४, गिम्हाण पखे २, दिवसे १०).

सारांश.—या लेखात नृपती गौतमीपुत्र व राज्ञी माता यांनी गोवर्धन येथील सामक नावाच्या अधिकाऱ्यास उद्देशून काढलेला आदेश नमूद केला आहे. या आदेशान्वये पूर्वी कखडि गावातील दिलेल्या जमिनीऐवजी गोवर्धनच्या हद्दीत असलेली जमीन तेरण्हुक लेण्यामधील भिक्षूंना दान दिली होती. या लेखाचे लेखन द्वारपाल लोटा हिने केले आणि सुजीवी याने हा आदेश तयार केला.

व्यक्तिनामे.—(१) गौतमीपुत्र सातकणि (गौतमीपुत्र सातकर्णि)— सातवाहन नृपती; (२) सामक (श्यामक)— गोवर्धन।च। अमच (अमात्य); (३) लोटा—महादेवीची मुख्य दासी (पटिहारखी); (४) सुजीवी—लेख लिहिणारा.

ग्रामनामे.—(१) गोवर्धन—नाशिकच्या पश्चिमेस ६ मैलांवर असलेले गोवर्धन गंगापुर असावे; (२) कखडि—ओळख पटत नाही; (३) तिरण्हु—सध्याची लेण्यांची टेकडी.

४५२. नाशिक बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. ३ च्या व्हरांड्यात मागच्या भिंतीवर दाराच्या वर आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८५३, खंड ५, पृ. ४५, क्र. १ (दुसरा भाग); (२) वेस्ट व वेस्ट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८६५, खंड ७, पृ. ११, क्र. २६ (खालचा भाग); (३) भांडारकर, **ट्रान्झ. २ री लंडन ओरिएंटल कॉंग्रेस**; १८७६, पृ. ३१४, क्र. २६; (४) बर्जेस व बुल्हर, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ११०, क्र. १९; (५) इंद्रजी, **बॉ. गॅ**, १८८३, खंड १६, पृ. ५५५, क्र. ३; (६) हुल्श, **इ. आय्.** १९०१, खंड ६, पृ. ३१९, नोंद २, ३; (७) सेनार्ट, **इ. आय्.**, १९०५, खंड ८, पृ. ७५, क्र. ३; (८) ल्युडर्स, **अपेंडिक्स इ. आय्.** १०, १९०९–१०, पृ. १२३, क्र. ११२४.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—सातवाहन नृपती वासिठीपुत पुळुमायि.

वर्ष व तिथी.—(१) १९ वें शासनवर्ष, ग्रीष्म ऋतूतील दुसऱ्या पंधरवड्यातील १३ वा दिवस; (२) २२ वे शासनवर्ष, ग्रीष्म ऋतूतील ७ वा दिवस.

सारांश.—प्रस्तुत लेखात सुदिसन व सामलिपद या गावांच्या देणगीबद्दल दिलेला आदेश नमूद केला आहे. हा आदेश गोवर्धनचा अधिकारी सिवखदिल याला उद्देशून काढला आहे. या आदेशान्वये सुदिसन व सामलिपद ही दोन गावे भदायनिय भिक्षूंना (राणीने दान दिलेल्या लेण्यात [देविलेण] रहात असलेले) दान दिली होती. हा लेख महासेनापति मेधुन याने लिहिला होता. तिरण्हु (त्रिरश्मी) टेकाडावरील लेण्यात धनकट येथील भिक्षूही रहात होते.

व्यक्तिनामे.—(१) पुळुमावि वासिष्ठीपुत्र—सातवाहन नृपती; (२) सिवखदिल (शिवस्कंदिल)— गोवर्धनचा अमच (अमात्य); (३) मेधुन—लेख मंजूर करणारा महासेनापती; (४) विण्हुपाल (विष्णुपाल)—गोवर्धनातील अधिकारी.

ग्रामनामे.—(१) सामलिपद — नाशिक जिल्ह्यात असावे, ओळख पटत नाही; (२) गोवर्धन — नाशिकच्या पश्चिमेस ६ मैलावर असलेले गोवर्धन गंगापुर असावे; (३) सुदिसन—डॉ. बुल्हरच्या मते पिसाजिपदक हेच प्राचीन सुदिसन असावे.

४५३. नाशिक शैलगृह शिलालेख, गोमती बलसिरी

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. ३ मधील व्हरांडयाच्या मागच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट **ज. बॉ. ब्रॅं. रॉ. ए. सो.**, १८५३, खंड ५, पृ. ४१, क्र. १; (२) वेस्ट व वेस्ट, **ज. बॉ. ब्रॅ. ए. सो.**, १८६५, खंड ७, पृ. ५१, क्र. २६ (वरचा भाग); (३) भांडारकर, **ट्रान्झ. २ री लंडन ओरिएंटल कॉंग्रेस**, १८७६ पृ. ३०७, क्र. २६; (४) बर्जेस व बुल्हर **अ. स. वे. इं.** १८८३, खंड ४, पृ. १०८; क्र. १८; (५) इंद्रजी **बॉं. गॅ.** १८८३, खंड १६, पृ. ५५० क्र. २; (६) सेर्टना, **इ. आय्.** १९०५, खंड ८, पृ. ६०, क्र. २; (७) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १२२, क्र. ११२३.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—सातवाहन; नृपती वासिठीपुत सिरि पुळुमायि.

वर्ष व तिथी.—१९ वे शासन वर्ष, ग्रीष्म ऋतूच्या दुसऱ्या पंधरवडयातील १३ वा दिवस (सविच्छरे एकुनवीसे १०, ९, गिम्हाण पखे बितीये २, दिवसे तेरसे १३).

सारांश.—प्रस्तुत लेखाचा मुख्य उद्देश गौतमीपुत्र सातकर्णि याची माता गौतमी बलश्री हिने भदायनीय भिक्षुसंघाला तिरण्हु टेकडीवरील लेणे दान दिले हे नमूद करणे हा होता. या लेण्याची व्यवस्था ठेवण्यासाठी राणीच्या नातवाने पिसाजिपदक खेडे दान दिल्याचाही उल्लेख या लेखात आहे. या लेखात पुळुमायीचा उल्लेख असिक, असक, मुळक, सुरठ, कुकुर, अपरंत, अनुप, विदभ, आकरावंति या प्रदेशांचा राजा; विज्झ, अच्छवत, पारिचात, सह्य कण्हगिरि, चकोर पर्वतांचा अधिपति; सक, यवन, पल्हव व खखरात यांचा निःपात करणारा, असा आला आहे.

व्यक्तिनामे.—(१) पुळुमायि वासिष्ठीपुत्र—सातवाहन नृपती; (२) सातकणि (सातकणि) गौतमीपुत्र—सातवाहन नृपती, वासिष्ठीपुत्र पुळुमायीचा पिता; (३) बळसिरी गौतमी—गौतमीपुत्र सातकर्णीची माता; (४) वासिष्ठी—पुळुमायीची माता.

ग्रामनामे.—पिसाजिपदक—डॉ. बुल्हर यांच्या मते हे प्राचीन सुदिसन असावे

४५४. नाशिक बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. ६ च्या व्हरांडयाच्या मागच्या भिंतीवर आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, हि. रि. , १८४७, प्ले. ५२, पृ. ५; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**; १८६५, खंड ७, पृ. ५१, क्र. २४; (३) भांडारकर, **ट्रान्झ. २ री लंडन ओरिएंटल कॉंग्रेस**, १८७६, पृ. ३४७, क्र. २४; (४) इंद्रजी, **बॉ. गॅ.**, १८८३, खंड १६, पृ. ५६४, क्र. ६; (५) बर्जेस व बुल्हर, **अ. स. वे. इं.** १८८३, खंड ४, पृ. ११६, क्र. ८; (६) सेनार्ट, **इ. आय्.**, १९०५, खंड ८, पृ. ७५, क्र. ६,; (७) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १२४, क्र. ११२७.

भाषा व लिपी.—प्राकृत , ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—दिलेली नाही.

सारांश.—गृहपति, व्यापारी वीर याने त्याची पत्नी नंदसिरी व कन्या पुरिसदता यांनी दान दिलेल्या लेण्यांसह हे चार खोल्यांचे लेणे दान दिल्याचा उल्लेख या लेखात केलेला आहे.

व्यक्तिनामे.—(१) विर—दान देणारा व्यापारी गृहपति; (२) नंदसिरी (नंदश्री)–अंतर्गृहाचे दान देणारी वीरची पत्नी; (३) पुरिसदता (पुरुषदत्ता)– अंतर्गृहाचे दान देणारी वीरची कन्या.

४५५. नाशिक बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. ७ च्या द्वाराच्या डाव्या बाजूला मागच्या भिंतीवर आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**; १८६५, खंड ७, पृ. ५१, क्र. २३; (२) इंद्रजी, **बॉ. गॅ.**, १८८३, खंड १६, पृ. ५६५, क्र. ७; (३) सेनार्ट, **इ. आय्.** १९०५, खंड ८, पृ. ७६, क्र. ७; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.** १०, १९०९–१०, पृ. १२५, क्र. ११२८.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—चारी दिशातील भिक्षुसंघाच्या उपयोगासाठी आदरणीय सवस याची शिष्या भिक्षुणी तापसिनी हिची लेण्याची देणगी.

व्यक्तिनामे.—(१) तापसिनी—दान देणारी भिक्षुणी; (२) सवस—तापसिनीचा गुरु.

४५६. नाशिक बौद्ध शैलगृह शिलालेख

ग्रामनामे.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. ८ मध्ये उजव्या बाजूच्या पाचव्या आणि सहाव्या स्तंभावर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, हि. रि., १८४७, प्ले. ५२, पृ. ९; (२) वेस्ट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८५३, खंड ५, पृ. ४८, क्र. १० व ९; (३) भांडारकर, **ट्रान्झ २ री लंडन ओरिएंटल कॉंग्रेस**, १८७६, पृ. ३४३, क्र. ९ व १०; (४) बर्जेस व बुल्हर, **अ. स. वे. इं.** १८८३, खंड ४, पृ. ९९, क्र. ४; (५) इंद्रजी, **बॉ. गॅ**; १८८३, खंड १६, पृ. ५८९, क्र. १९; (६) सेनार्ट, **इ. आय्.** १९०५, खंड ८, पृ. ९१, क्र. १९; (७) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १२८, क्र. ११४१.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—कपणणक याची माता, राज्याधिकारी अगियतणक याची पत्नी, राजामात्य अरहलय याची कन्या, महाहकुसिरीची नात, भटपालिका हिने तिरण्हु पर्वतावरील हे चैत्यघर बांधले असे या लेखात नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) भटपालिका—दान देणारी स्त्री.; (२) महाहकुसिरी—भटपालिकेचा आजा; (३) अरहलय—भटपालिकेचा पिता, राजामात्य; (४) अगियतणक (अग्नितनय)-भांडागारिक, भटपालिकेचा पती; (५) कपणणक—भटपालिकेचा पुत्र.

४५७. नाशिक बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. ८ च्या व्हरांड्याच्या दरवाजाच्या डाव्या बाजूला मागच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, हि. रि., १८४७, प्लेट ५२.६; (२) वेस्ट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८६५, खंड ७, पृ. ५०, क्र. २१; (३) भांडारकर, **ट्रान्झ. २ री लंडन ओरिएंटल कॉंग्रेस**, १८७६, पृ. ३४६, क्र. २१; (४) बर्जेस व बुल्हर, **अ. स. बे. इं.** १८८३, खंड ४, पृ. ११५, क्र. ६; (५) इंद्रजी, **बॉ. गॅ.**, १८८३, खंड १६, पृ. ५६६, क्र. ९; (४) सेनार्ट, **इ. आय.** १९०५, खंड ८, पृ. ७७, क्र. ९; (७) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १२५, क्र. ११३०.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—चेतिक संघाच्या मुगुदासाने या शैलगृहाची देणगी दिली असे या लेखात नमूद केले आहे. याशिवाय उपासक बोधिगुत याचा पुत्र धमनंदिन याने या शैलगृहात वास्तव्य करीत असलेल्या भिक्षूंना वस्त्रे पुरविण्यासाठी कण्हहिनीतील एका शेताचे उत्पन्न लावून दिले होते असेही या लेखात नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) मुगुदास—देणगी देणारा चेतिक उपासक; (२) धमनन्दिन (धर्मनन्दी)—दान देणारा उपासक, ; (३) बोधिगुत (बोधिगुप्त)—धमनंदिनचा पिता.

४५८. नाशिक बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. ८ च्या व्हरांड्याच्या मागच्या भिंतीवर दरवाजाच्या उजव्या बाजूला कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८६५, खंड ७, पृ. ५०, क्र. २२; (२) भांडारकर, **ट्रान्झ २ री लंडन ओरिएंटल कॉंग्रेस**, १८७६, पृ. ३४७, क्र. २२; (३) बर्जेस व बुल्हर, **अ. स. बे. इं.** १८८३, खंड ४, पृ. ११५, क्र. ७; (४) इंद्रजी **बॉ. गॅ.**, १८८३, खंड १६, पृ. ५६५, क्र. ८; (५) **सेनार्ट, इ. आय्.**, १९०५, खंड ८, पृ. ७६, क्र. ८, (६) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १२५, क्र. ११२९.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—मुगूदास नामक कोळयाने दिलेली लेण्याची देणगी.

व्यक्तिनामे.—मुगूदास—दान देणारा कोळी (दासक).

४५९. नाशिक बौध्द शैलगृह शिलालेख, दखमिता

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. १० च्या व्हरांड्यातील उजव्या बाजूच्या खोलीच्या दरवाजाच्या वर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो. १८५३, खंड ५, पृ. ५४ क्र. ७; (२) वेस्ट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो**. १८६५, खंड ७, पृ. ५०, क्र. २०; (३) बर्जेस व बुल्हेर, **अ. स. वे. इ.** १८८३, खंड ४, पृ. १०३, क्र. १०; (४) इंद्रजीं **बॉ. इ.** १८८३, खंड १६ पृ. ५७५, क्र. १३; (५) सेनार्ट **इ. आय.** १९०५, खंड ८, पृ. ८५, क्र. १३; (६) ल्युडर्स **अपेडिक्स इ. आय.** १०, १९०९–१०, पृ. १२६, क्र. ११३४.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—क्षहरात क्षत्रप नहपान व त्याच जावई उषवदात.

वर्ष व तिथी.—दिलेली नाही.

सारांश.—क्षहरात क्षत्रप नहपान याची कन्या, दीनीकपुत्र उषवदात यांची पत्नी दखमिता हिची या खोलीची (ओवरक) देणगी.

व्यक्तिनामे.—(२) नहपान–क्षत्रप नृपती; (२) उषवदात (ऋषभदत्त)—नहपानाचा जावई; (३) दीनीक–उषवदाताचा पिता; (४) दखमिता (दक्षमित्रा)–देणगी देणारी स्त्री, उषवदाताची पत्नी.

४६०. नाशिक शैलगृह शिलालेख, उषवदात

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. १० च्या आवाराच्या उजव्या बाजूच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट व वेस्ट, **ज. ब्रॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८६५, खंड ७, पृ. ४९. क्र. १४. (वरचा भाग). (२) भांडारकर, **ट्रान्झ २ री लंडन ओरीएंटल कॉंग्रेस** १८७६, पृ. ३३६, क्र. १४; (३) बर्जेस व बुल्हर, अ. स. वे. इं. १८८३, खंड ४, पृ १०१, क्र. ७; (४) इंद्रजी,. बॉ. गॅ, १८८३, खंड १६, पृ. ५७६, क्र. १४; (५) सेनॉर्ट **इ. आय.** १९०५, खंड ८, पहृ. ८५, क्र. १४; (६) ल्युडर्स, **अपेडिक्स ई. आय.** १०, १९०९–१० पृ. १२७, क्र. ११३५.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—क्षहरात क्षत्रप नहपान व त्याचा जावई उषवदात.

वर्ष व तिथी.—चैत्र शुद्ध १५.

सारांश.—हा लेख त्रोटक आहे. या लेखाचा उद्देश नहपानाचा जावई उषवदान याने निरनिराळया ठिकाणच्या देवतांना लव व ब्राह्मणांना दिलेल्या देणग्या नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) नहपान–क्षत्रप नृपती; (२) उषवदात–नहपानाचा जावई; (३) दीनीक–उषवदाताचा पिता.

ग्रामनामे.—(१) चेचिंत्र–ओळख पटत नाही; (२) दाहनूकानगर–ठाणे जिल्ह्यातील हल्लीचे डहाणू असावे; (३) उजेनी–हल्लीचे उज्जैन; (४) केकापुर–ओळख पटत नाही; (५) अनुगामि–ओळख पटत नाही; (६) साखा–ओळख पटत नाही; (७) शोपरिग–हल्लीचे सोपारा; (८) भरुकच्छ–सुरत जिल्ह्यातील हल्लीचे भडोच. (९) बणासा नदी.

४६१. नाशिक बौध्द शैलगृह शिलालेख, दखमिता

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. १० च्या व्हरांड्यात डाव्या बाजूच्या खोलीच्या दरवाजाच्या वर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड हि. रि. १८४७ पृ. ५२. क्र. ५; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट. **ज. बॉ. रॉ. ए. सो.**, १८५३ खंड ५ पृ. ५२ क्र. ६, (३) वेस्ट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८६५; खंड ७, पृ. ५०, क्र. १६; (४) भांडारकर, **ट्रान्झ २ री लंडन ओरिएन्टल काँग्रेस**, १८७६, पृ ३३४, क्र. १६; (५) बर्जेस व बुल्हर, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. १०३, क्र. १०; (६) इंद्रजी, **बॉ. गॅ.**, १८८३, खंड १६, पृ. ५७२, क्र. ११; (७) सेनार्ट **इ. आय्.**, १९०५, खंड ८, पृ. ८१, क्र. ११; (८) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १२६, क्र. ११३२.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—क्षहरात क्षत्रप नहपान व त्याचा जावई उषवदात.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या खोलीची देणगी उषवदात याची पत्नी दखमित्रा हिने दिलेली आहे.

व्यक्तिनामे.—(१) दखमिता (दक्षमित्रा)—दान देणारी नहपानाची कन्या; (२) नहपान–क्षहरात क्षत्रप नृपती; (३) उषवदात (ऋषभदत्त)— दीनीकपुत्र, नहपानाच जावई, दखमिताचा पती; (४) दीनीक—उषवदाताचा पिता.

४६२. नाशिक बौद्ध शैलगृह शिलालेख, ईश्वरसेन

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. १० च्या अंगणाच्या डाव्या बाजूच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८६५, खंड ७, पृ. ४९, क्र. १५; (२) भांडारकर, **ट्रान्झ. २ री लंडन ओरिएंटल काँग्रेस**, १८७६, पृ. ३४१, क्र. १५; (३) बर्जेस व बुल्हर, **अ. स. वे. इ.**, १८८३, खंड ४, पृ. १०३, क्र. १२; (४) इंद्रजी, **बॉ. गॅ.**, १८८३, खंड १६, पृ. ५७९, क्र. १५; (५) सेनार्ट, **इ. आय्.**, १९०५, खंड ८, पृ. ८८, क्र. १५; (६) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १२७, क्र, ११३७.

भाषा व लिपी.—मिश्र भाषा; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—आभीर शिवदत्त याचा पुत्र नृपती माढरीपुत्र ईश्वरसेन.

वर्ष व तिथी.—९ वे शासन वर्ष, ग्रीष्म ऋतूतील ४ थ्या पंधरवड्यातील १३ वा दिवस.

सारांश.—या लेखात विष्णुदता शकनिका हिने त्रिरश्मी टेकडीवरील विहारात वास्तव्य करणाऱ्या चतुर्दिशांच्या भिक्षुसंघाला कायम स्वरूपात काही द्रव्य देणगी दिल्याचे नमूद केले आहे. हे द्रव्य तिने काही श्रेणीमध्ये गुंतविले होते. कुलरिक (कुंभार), तिलपिषक (तेली) व ओदयंत्रिक (जलयंत्री) या त्या श्रेणी.

व्यक्तिनामे.—(१) ईश्वरसेन, माढरीपुत्र—आभीर नृपती; (२) शिवदत्त—ईश्वर सेनाचा पिता; (३) माढरी—ईश्वरसेनाची माता; (४) विष्णुदत्ता—दान देणारी शक निका स्त्री उपासिका; (५) अग्निवर्मन्—विष्णुदत्ताचा पिता; (६) रेभिल—गणपक, विष्णुदत्ताचा पति; (७) विश्ववर्मन्—गणपक, विष्णुदत्ताचा पुत्र.

४६३. नाशिक बौद्ध शैलगृह शिलालेख, उषवदात

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. १० च्या व्हरांड्यात उजव्या बाजूच्या खोलीच्या दरवाजावर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, हि. रि. १८४७, पृ. ५९, क्र. २१; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट ज. बॉ. ब्रॅ. ए. सो., १८५३, खंड ५, पृ. ५२, क्र. ६; (३) वेस्ट व वेस्ट, ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो., १८६५, खंड ७, पृ. ५०, क्र. १६, १८; (४) भांडारकर, **ट्रान्झ. २ री लंडन ओरिएंटल काँग्रेस**, १८७६, पृ. ३३१, क्र. १८, पृ. ३३४, क्र. १६; (५) बर्जेस व बुल्हर **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. १०२, क्र. ९; (६) इंद्रजी, **बॉ. गॅ.**, १८८३, खंड १६, पृ. ५७३, क्र. १२; (७) सेनार्ट **इ. आय्.**, १९०५, खंड ८, पृ. ८२, क्र. १२; (८) ल्युडर्स **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०. १९०९–१०, पृ. १२६, क्र. ११३३.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—क्षहरात क्षत्रप नहपान व त्याचा जावई दीनिकपुत्र उषवदात.

वर्ष व तिथी.—(१) ४२ वे शासनवर्ष, वैशाख मास; (२) कार्तिक शुक्ल १५; (३) ४५ वे शासनवर्ष १५ वा (दिवस किंवा तिथी).

सारांश.—या लेखाचा उद्देश नहपानाचा जावई उषवदात याने चतु:दिशांच्या भिक्षु-संघाला लेणे, ब्राह्मणांना काही द्रव्य व कापुर आहारातील चिखलपद्र गावातील नारळाची झाडे दान दिली हे नमूद करण्याचा होता. द्रव्य गोवर्धनाच्या विणकरांच्या (कोलीकनिकाय) श्रेणीत गुंतविले होते.

व्यक्तिनामे.—(१) नहपान—क्षहरात क्षत्रप नृपती; (२) उषवदात (ऋषभदत्त) –दान देणारा नहपानाचा जावई; (३) दीनीक—उषवदाताचा पिता.

ग्रामनामे.—(१) गोवधन—नाशिकच्या पश्चिमेस ६ मैलावर असलेले गोवर्धन; (२) चिखलपद्र—सुरत जिल्ह्यातील सौगांध तालुक्यात असलेले चिखलोद.

४६४. नाशिक बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. १० च्या अंगणाच्या उजव्या बाजूच्या भिंतीवर आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.** १८६५ खंड ७, पृ. ४९, क्र. १४; (२) बर्जेस व बुल्हर, **अ. स. वे. इं**, १८८३, खंड ४, पृ. १०२, क्र. ८ (३) इंद्रजी, **बॉ. गॅ.**, १८८३, खंड १६, पृ. ५७६, क्र. १४; (४) सेनार्ट, **इ. आय्.**, १९०५, खंड ८, पृ. ८७, क्र. १४ ब; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १२७, क्र. ११३६.

भाषा व लिपी.—मिश्र भाषा; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—चैत्र शुद्ध.

सारांश.—हा लेख त्रोटक आहे. या लेखात ब्राह्मणांना दिलेल्या देणग्या नमूद केल्या आहेत.

४६५. नाशिक बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. ११ च्या व्हरांडयाच्या मागच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८६५, खंड ७, पृ. ४९, क्र. १३; (२) भांडारकर, **ट्रान्झ. २ री लंडन ओरिएंटल कॉंग्रेस**, १८७६, पृ. ३४६, क्र. १३; (३) बर्जेस व बुल्हर, **अ. स. वे. इं**, १८८३, खंड ४, पृ. ११५, क्र. ५; (४) इंद्रजी, **बॉ. गॅ.**, १८८३, खंड १६, पृ. ५८२, क्र. १६; (५) सेनार्ट, **इ. आय्.** १९०५, खंड ८, पृ. ८९, क्र. १६; (६) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.** १०, १९०९–१०, पृ. १२८, क्र. ११३८.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—लेखक सिवमित याचा पुत्र रामंणक याची लेण्याची देणगी.

व्यक्तिनामे.—(१) रामंणक—दान देणारा; (२) सिवमित (शिवमित्र)—रामणकाचा पिता.

४६६. नाशिक बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. १२ च्या व्हरांडयाच्या मागच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए सो.**, १८५३, खंड ५, पृ. ५४, क्र. ९; (२) वेस्ट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८६५, खंड ७, पृ ४९, क्र. ११; (३) भांडारकर, **ट्रान्झ. २ री लंडन ओरिएंटल कांग्रेस**, १८७६, पृ. ३४५, क्र. ११; (४) बर्जेस व. बुल्हर, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ११४, क्र. ३; (५) भांडारकर, **इं. अॅ.**, १८८३, खंड १२, पृ. १४७; (६) इंद्रजी, **बॉ. गॅ.**, १८८३, खंड १६, पृ. ५८६, क्र.१८; (७) सेनार्ट, **इ. आय्.**, १९०५, खंड ८, पृ. ९०, क्र. १८; (८) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १२८, क्र. ११४०.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—दतामितिचा रहिवाशी व उत्तरेकडील यवन धंमदेवाचा पुत्र ईद्राग्निदत याने तिरण्हु पर्वतावर चैत्य लेणे व कुंड यासहित लेणे खोदल्याचा उल्लेख या लेखात केलेला आहे. त्याने हे लेणे आपला पुत्र धंमरखित यासह चारी दिशातील भिक्षुसंघाला दान दिल्याचे या लेखात नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) ईद्रागिदत (इंद्राग्निदत्त)—लेणे व चैत्यगृह खोदविणारा यवन; (२) धम्मदेव (धर्मदेव)—इंद्राग्निदत्ताचा पिता; (३) धम्मरखित (धर्मरक्षित)—इंद्राग्निदत्ताचा पुत्र.

ग्रामनामे.—(१) दन्तामिती—(अ) दत्तामित्री, (भांडारकर) (ब) दान्तामित्री (बुल्हर)

४६७. नाशिक बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. १२ च्या व्हरांडयाच्या मागच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, **हि. रि.** १८४७, पृ. ५८, क्र. १७; (२) स्टिव्हन्सन व ब्रेट. **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए., सो.** १८५३, खंड ५, पृ. ५४, क्र. ८; (३) वेस्ट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.** १८६५, खंड ७, पृ. ४९, क्र. १२; (४) भांडारकर, **ट्रान्स. २ री लंडन ओरिएंटल कॉंग्रेस,** १८७६, पृ. ३४५, क्र. १२; (५) बर्जेस व बुल्हर, **अ. स. वे. इं.,** १८८३, खंड ४, पृ. ११५, क्र. ४; (६) इंद्रजी, **बॉं. गॅ.,** १८८३, खंड १६, पृ. ५८६, क्र. १७; (६) सेनार्ट, **इ. आय्.** १९०५, खंड ८, पृ. ९०, क्र. १७; (७) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ.आय्.,** १०, १९०९–१०, पृ. १२८, क्र. ११३९.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात छाकलेपकच्या वेल्लिदत्ताचा पुत्र रामणक या व्यापाऱ्याने लेणे दान दिल्याचे नमूद केले आहे. याशिवाय या व्यापाऱ्याने काही काहापण भिक्षुसंघाला कायम देणगी म्हणून दिले होते. यातील काही भाग या लेण्यात वास करणाऱ्या भिक्षूंच्या वस्त्रांसाठी खर्च करावयाचा होता.

व्यक्तिनामे.—(१) रामणक—दान देणारा व्यापारी; (२) वेलीदात—रामणकचा पिता

ग्रामनामे.—छाक (ग) लेप—ओळख पटत नाही.

४६८. नाशिक बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. १८ मध्ये असलेल्या यक्षमूर्तीच्या वर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.,** १८६५, खंड ७, पृ. ४८, क्र. ७; (२) बर्जेस व बुल्हर, **अ. स. वे. इं.,** १८८३, खंड ४, पृ. ९९, क्र. ३; (३) इंद्रजी, **बॉं. गॅ.,** १८८३, खंड १६, पृ. ५९१, क्र. २१; (४) सेनार्ट, **इ. आय्.,** १९०५, खंड ८, पृ. ९३, क्र. २१; (५) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.,** १०, १९०९–१०, पृ. १२९, क्र. ११४३.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—नदासिरिया व आणखी एका व्यक्तीने (नाव झिजले आहे) कठडा व यक्ष–मूर्ति तयार करवून घेतल्याचे या लेखात नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—नदासिरिया (नंदाश्रीका)—दान देणारी स्त्री.

४६९. नाशिक बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख नासिक शैलगृह क्र. १८ च्या दरवाजावर असलेल्या कमानीच्या खाली कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो**, १८६५, खंड ७, पृ. ४८, क्र. ८; (२) भांडारकर, **ट्रान्झ २ री लंडन ओरिएंटल काँग्रेस**, १८७६, पृ. ३४३, क्र. ८; (३) बर्जेस व बुल्हर, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ९८, क्र. २; (४) इंद्रजी, **बॉ. गॅ.**, १८८३, खंड १६, पृ. ५९०, क्र. २०; (५) सेनार्ट, **इ. आय.**, १९०५, खंड ८, पृ. ९२, क्र. २०; (६) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १२९, क्र. ११४२.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—दिलेली नाही.

सारांश.—नाशिकच्या लोकांनी दिलेली धंभिक गावाची देणगी या लेखात नमूद केली आहे.

ग्रामनामे.—(१) नासिक—हल्लीचे नाशिक; (२) धंभिकग्राम—ओळख पटत नाही.

४७०. नाशिक बौद्ध शैलगृह शिलालेख, (कण्ह)

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. १९ मध्ये उजव्या बाजूच्या खिडकीच्या वरच्या बाजूला कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८६५, खंड ७, पृ. ४८ क्र. ६; (२) भांडारकर, **ट्रान्झ, २ री लंडन ओरिएंटल काँग्रेस**, १८७६, पृ. ३३८, क्र. ६; (३) बर्जेस व बुल्हर, **अ. स. वे. इं**, ., १८८३, खंड ४, पृ. ९८, क्र. १; (४) इंद्रजी, **बॉ. गॅ.**, खंड १, १८८३, पृ. ५९१, क्र. २१७; (५) सेनार्ट, **इ. आय्.**, १९०५, खंड ८, पृ. ९३, क्र. २२; (६) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १९०९–१०, पृ. १२९, क्र. ११४४.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—सातवाहन नृपती कण्ह (कृष्ण)

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—सातवाहन नृपती कण्ह (कृष्ण) याच्या कारकीर्दीत हे शैलगृह नासिक येथील श्रमणांची व्यवस्था पहाणाऱ्या अधिकाऱ्याने खोदले असे या लेखात नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) कण्ह (कृष्ण)—सातवाहन नृपती. (२) समण (श्रमण)—अधिकाऱ्याचे नाव ?

ग्रामनामे.—नासिक—हल्लीचे नासिक.

४६१. नाशिक शैलगृह शिलालेख, गौतमीपुत्र यज्ञ सातकणि

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. २० मधील व्हरांड्याच्या मागच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन्सा व ब्रेट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८५३, खंड ५, पृ. ५६ क्र. १२; (२) वेस्ट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८६५, खंड ७, पृ. ४८, क्र. ४; (३) भांडारकर, **ट्रान्झा २ री लंडन ओरिएंटल कॉंग्रेस,** १८७६, पृ. ३३९, क्र. ४; (४) बर्जेस व बुल्हर, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ११४, क्र. २२; (५) इंद्रजी. **बॉ. गॅ.**, १८८३, खंड १६, पृ. ५९६, क्र. २४; (६) सेनार्ट, **इ. आय्.** १९०५, खंड ८, पृ. ९३, क्र. २४; (७) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.** १०, १९०९–१०, पृ. १२९, क्र. ११४६.

भाषा व लिपी.–प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—सातवाहन नृपती गौतमीपुत्र स्वामी श्री यज्ञ सातकणि.

वर्ष व तिथी.—७ वे शासन वर्ष, हेमंत ऋतूच्या तिसऱ्या पंधरवडयातील १ ला दिवस (संवछरे सातमे ७, हेमताण पखे ततिये ३, दिवसे पठमे)

सारांश.—प्रस्तुत लेखात कौशिक गोत्री सरदार महासेनापती भवगोप याची पत्नी वासू हिने भिक्षुसंघाला लेणे दान दिल्याचे नमूद केले आहे. हे लेणे यति बोपकि यांच्या देखरेखीखाली कोरण्यात आले.

व्यक्तिनामे.—(१) यज्ञ सातकणि—सातवाहन नृपती; (२) वासू—दान देणारी महासेनापतिनी; (३) भवगोप—महासेनापति, वासूचा पती; (४) बोपकि—बांधकाम सुरू करणारा (?) यती.

४७२. नाशिक बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. २० मधील शेवटच्या खोलीच्या दरवाजावर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८५३, खंड ५, पृ. ५६ क्र. १३; (२) वेस्ट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८६५, खंड ७, पृ. ४८, क्र. ५; (३) भांडारकर, **ट्रान्झ. २ री लंडन ओरिएंटल कॉंग्रेस,** १८७६, पृ. ३४२, क्र. ५; (५) बर्जेस व बुल्हर, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड, ४, पृ. ११६, क्र. ९; (५) इंद्रजी, **बॉ. गॅ.**, १८८३, खंड १६, पृ. ५९६, पृ. क्र. २३; (६) सेनार्ट, **इ. आय्.** १९०५, खंड ८, पृ. ९३, क्र. २३; (७) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.** १०, १९०९–१०, पृ. १२९, क्र. ११४५.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—उपासिका मम्मा हिने दिलेली लेण्याची देणगी या लेखात नमूद केलेली आहे.

व्यक्तिनामे.—मम्मा (महिमा?)—देणगी देणारी उपासिका.

४७३. नाशिक बौद्ध शैलगृह शिलालेख, वासिठीपुत पुळुमावी

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक येथे शैलगृह क्र. २३ च्या पलिकडे असलेल्या अपूर्ण शैलगृहाच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट व वेस्ट, **ज. बॉ. ब्रॅं. रॉ. ए. सो.**, १८६५, खंड ७, पृ. ४७, क्र. ३; (२) भांडारकर, **ट्रान्झा. २ री लंडन ओरिएंटल कॉंग्रेस**, १८७६, पृ. ३३८, क्र. ३; (३) बर्जेस व बुल्हर, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. १०५, क्र. १५; (४) इंद्रजी, **बॉ. गॅ.**, १८८३, खंड १६, पृ. ६०३, क्र. २५; (५) सेनार्ट **इ. आय्.** १९०५, खंड ८, पृ. ९४ क्र. २५; (६) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १२९, क्र. ११४७

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—सातवाहन नृपती वासिठीपुत सामि सिरिपुळुमावि.

वर्ष व तिथी.—शासनवर्ष २, हेमंत ऋतूतील ४ थ्या पंधरवड्यातील ६ वा किंवा ८ वा दिवस. (संवछरे २, हेमंतपखे ४, दिवसे ८ एतिय पुवाय).

सारांश.—धणम नामक कुटुम्बिकाने हे लेणे खोदले असा उल्लेख या लेखात आहे.

व्यक्तिनामे.—(१) धणम—लेणे खोदणारा कुटुम्बिक; (२) सिरिपुळुमाइ (वासिष्ठीपुत्र श्री पुळुमावि)—सातवाहन नृपती; (३) वासिठी (वासिष्ठी)—पुळुमावीची माता.

४७४. नाशिक बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. २४ च्या व्हरांड्याच्या मागच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, **ज. बॉ. ब्रॅं. रॉ. ए. सो.**, १८६५, खंड ७, पृ. ४७, क्र. १; (२) भांडारकर, **ट्रान्झ. २ री लंडन ओरिएंटल कॉंग्रेस**, १८७६, पृ. ३४२, क्र. १; (३) बर्जेस व बुल्हर, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ११४, क्र. १; (४) इंद्रजी, **बॉ. गॅ.**, १८८३, खंड १६, पृ. ६०५, क्र. २६; (५) सेनार्ट, **इ. आय्.**, १९०५, खंड ८, पृ. ९५, क्र. २७; (६) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.** १०, १९०९–१०, पृ. १३०, क्र. ११४८.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—दिलेली नाही.

सारांश.—दशपुरचा विष्णुदत याचा पुत्र, लेखक, शक दामचिक वुधिक याची दोन कुंडे व लेण्याची देणगी या लेखात नमूद केली आहे.

व्यक्तिनामे.—(१) दामचिक वुधिक (वृद्धिक)—दान देणारा शक लेखक; (२) विष्णुदत (विष्णुदत्त)—दामाचिक वुधिकचा पिता.

ग्रामनामे.—दशपुर—मध्यप्रदेशातील मंदसोर हे जिल्ह्याचे ठिकाण असावे.

४७५. नाशिक बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख नाशिक शैलगृह क्र. २४ च्या उजव्या बाजूला असलेल्या दोन कुंडांपैकी एका कुंडावर आहे.

संदर्भ.—(१) वेस्ट, ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो., १८६५, खंड ७, पृ. ४७, क्र. २; (२) भांडारकर, **ट्रान्झ. २ री लंडन ओरिएंटल कॉंग्रेस,** १८७६, पृ. ३४३, क्र. २; (३) बर्जेस व बुल्हर, **अ. स. वे. इं.,** १८८३, खंड ४, पृ. ११४, क्र. ३; (४) इंद्रजी, **बॉ. गॅ.,** १८८३, खंड १६, पृ. ६०५, क्र. २७; (५) सेनार्ट, **इ. आय्.,** १९०५, खंड ८, पृ. ९५, क्र. २७; (६) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.,** १०, १९०९–१०, पृ. १३०, क्र. ११४९.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—दिलेली नाही.

सारांश.—लेखक शक दामचिक वुधिक याची कुंडाची देणगी.

व्यक्तिनामे.—दामचिक वुधिक (वृद्धिक)—दान देणारा शक लेखक.

४७६. नाशिक ताम्रपट, चालुक्य जयसिंह

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट श्री. बाबासाहेब देशपांडे यांना त्यांच्या एका नातेवाईकाकडून मिळाला.

संदर्भ.—खरे, ग. ह., **द. म. इ. सा.,** १९३०, खंड १, पृ. ८–१५.

भाषा व लिपी.—संस्कृत, लिपी चालुक्यांच्या ६ व्या शतकातील इतर लेखातील लिपी-प्रमाणे.

राजवंश व राजा.—गुजरात व कोकणचा चालुक्य नृपती जयसिंहवर्मन्.

वर्ष व तिथी.—शके ५८० (?), चैत्र शुद्ध दशमी.

सारांश.—प्रस्तुत ताम्रपटाचा उद्देश राजा जयसिंहाने नासिक निवासी भारद्वाज गोत्री ब्राह्मण प्रीतिशर्मन् याचा पुत्र त्रिविक्रम याला ढोण्डकग्राम दान दिले हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) कीर्तिवर्मराज—चालुक्य नृपती; (२) सत्याश्रय पुलकेशी—चालुक्य नृपती, कीर्तिवर्मराजाचा पुत्र; (३) जयसिंहवर्मराज—दान देणारा चालुक्य नृपती, सत्याश्रय पुलकेशीचा पुत्र; (४) श्रीहर्ष—पुलकेशीने जिंकलेला उत्तराधिपती; (५) वज्जड—जयसिंहवर्मराजाने जिंकलेला मही व नर्मदा यांच्यातील प्रदेशाचा राजा; (६) शिवभट्टारक—हरपार्वतीय नाटकाचा कर्ता, कविश्रेष्ठ भिक्षु; (७) अनिवारित—जयसिंहवर्मराजाचा गुरु; (८) त्रिविक्रम—दान स्वीकारणारा वाजसनेयी भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (९) प्रीतिशर्मन्—त्रिविक्रमाचा पिता; (१०) मय—लेख लिहिणारा; (११) सोविक—मयाचा पिता.

ग्रामनामे.—(१) ढोंढकग्राम—नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील हल्लीचे धोंडगाव.

४७७. नांदगाव ताम्रपट, चालुक्य नागवर्धन

जिल्हा—नाशिक **तालुका—नांदगाव**

प्राप्तिस्थळ.—उत्तर कोकणात नांदगाव येथील एका ठाकुराच्या घरी हा ताम्रपट मिळाला.

संदर्भ.—(१) शास्त्री, बी. जी., **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.,** १८४४, खंड २, पृ. ४-१२. क्र. २; (२) भांडारकर, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.;** १८७८–८०, खंड १४, पृ. १६; (३) फ्लिट, जे. एफ्., **इं. अॅ.** १८८०, खंड ९, पृ. १२३.

भाषा व लिपी.—संस्कृत; गुप्तकालीन वळणाची.

राजवंश व राजा.—चालुक्य नृपती नागवर्धन.

वर्ष व तिथी.—दिलेली नाही.

सारांश.—या ताम्रपटात नागवर्धनाने बल्लाम्म ठाकूर याच्या विनंतीवरून गोपराष्ट्राच्या सीमेवर असलेल्या कपालेश्वराच्या धूपपूजेसाठी, सार्वजनिक इमारतींच्या व्यवस्थेसाठी आणि सैन्याच्या निवासाच्या व्यवस्थेसाठी बलेग्राम हे गाव दान दिल्याचे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) कीर्तिवर्मन्—चालुक्य नृपती; (२) पुलकेशीवल्लभ—चालुक्य नृपती, कीर्तिवर्म्याचा पुत्र; (३) श्रीहर्ष—पुलकेशीने जिंकलेला उत्तरापथाधिपती; (४) जयसिंहवर्मन् —चालुक्य नृपती, पुलकेशीचा धाकटा भाऊ; (५) श्रीनागवर्धन—पुलकेशीचा गुरु; (६) नागवर्धन—चालुक्य नृपती, जयसिंहवर्म्याचा पुत्र, दानकर्ता; (७) बलाम्म ठाकूर—दानासाठी विनंती करणारा.

ग्रामनामे.—बलेग्राम—इगतपुरीच्या आग्नेयेस १२ मैलांवरील बेलगाव तऱ्हाळा.

४७८. नांदगाव खंडेश्वर देवालय शिलालेख

जिल्हा—**अमरावती** तालुका—**अमरावती**

प्राप्तिस्थळ—हा लेख नांदगाव येथील खंडेश्वराच्या देवालयाच्या बाहेरच्या भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ—(१) मिराशी, वा. वि., **इ. अप्र.** १९४७–४८, खंड २७, भाग १, पृ ९–११; (२) तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.** १९६३, पृ. १४४–१४७, क्र. २९.

भाषा व लिपी.—संस्कृत—मराठी मिश्र. यादवकालीन देवनागरी.

राजवंश व राजा.—(यादव) नृपती कान्हिरदेव.

वर्ष व तिथी—श्री सकु ११७७, आनंद संवत्सर, इ. स. १२५४–५५. या लेखात मास, पक्ष, तिथी किंवा नक्षत्र यांचा उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख कान्हिरदेव याच्या अमदानीतील असून या लेखाचा उद्देश नांदगाव येथील खंडेश्वराच्या देवालयात फुलांची लाखोली देवाला वाहण्यासाठी गद्याण नामक सोन्याची नाणी कोणी व किती दिली हे नमूद करण्याचा होता.

व्यक्तिनामे.—(१) कान्हिरदेव—बहुधा यादव नृपती; (२) पांचोलिनिबंधु—कान्हिरदेवाचा सेवक; (३) सोमदेव—पांचोलिनिबंधु याचा मुतालिक अधिकारी 'वडवा', दानकर्ता; (४) धनंजय पंडित—दानकर्ता; (५) देसैनायक—दानकर्ता; (६) असुगिनायक—दानकर्ता; (७) ढोंढी—दानकर्ता; (८) भोपति नायक—दानकर्ता; (९) धनैए—दानकर्ता; (१०) नागैए—दानकर्ता; (११) ढोहडदाउ—दानकर्ता.

ग्रामनामे.—वितहवाडी—ओळख पटत नाही.

४७९. नेऊरगाव शिलालेख, यादव रामचंद्र

जिल्हा—**औरंगाबाद** तालुका—**उल्लेख नाही**

प्राप्तिस्थळ—हा शिलालेख नेऊरगाव येथील संकटेश्वराचे मंदिरात आढळला.

संदर्भ—दीक्षित, मो. गं. **म., प्रा. ता. शि.**, १९४७, पृ. ८९–१०३.

भाषा व लिपी.—संस्कृत; नागरी.

राजवंश व राजा.—यादव नृपती रामचंद्रदेव.

वर्ष व तिथी.—शके १२००, प्रमाथिनी संवत्सर, कार्तिक शद्ध एकादशी, १७ ऑक्टोबर, इ. स. १२७९.

सारांश.—या लेखाचा मुख्य उद्देश यादव नृपती रामचंद्र याने बिल्वग्राम, पिपलग्राम व खेटक ही गावे ८७ ब्राह्मणांना दान दिली हे नमूद करण्याचा होता. हे दान देतेवेळी रामचंद्राचा मुक्काम बहुधा नेऊरगाव येथे असावा. हा लेख लषुमिदेव याने लिहिला.

व्यक्तिनामे.—(१) सिंह—यादव नृपती; (२) जैत्रपाल—यादव नृपती, सिंहाचा पुत्र; (३) कृष्ण—यादव नृपती, जैत्रपालाचा पुत्र (४) महादेव—यादव नृपती, कृष्णाचा धाकटा भाऊ; (५) रामचंद्र—दान देणारा यादव नृपती; (६) नृसिंहदेव—दान स्वीकारणारा ब्राह्मण, याला १२ वृत्ती दिल्या; (७) हरिहर—दान स्वीकारणारा ब्राह्मण, याला १० वृत्ती दिल्या; (८) विश्वनाथ—हरिहराचा पिता.

दानीचे नाव	पित्याचे नाव	गोत्र	शाखा
९) माहादेव	१०) विष्णु	वासिष्ठ	—
११) त्रिविक्रम	१२) वैजनाथ	भारद्वाज	—
१३) विष्ण	१४) रेद्धदेव	—,,—	—
—	१५) वेद	—,,—	—
१६) जोगदेव	१७) पर्सुराम	—,,—	—
१८) रेद्धदेव	१९) लक्ष्मीधर	—,,—	—
२०) हरि	२१) लक्ष्मीधर	—,,—	—
२२) चांगुबाई	२३) लक्ष्मीधर	—,,—	—
२४) लक्ष्मीधर	२५) कृष्ण	—,,—	—
२६) माधव	२७) पद्मनाभ	—,,—	काण्व
२८) जनार्दन	२९) विष्णु	—,,—	काण्व
३०) मुकुंदगर्भ	—	काश्यप	—,,—
३१) वसिष्ठ	३२) हरि	—	—,,—
३३) नरसिंह	३४) त्रिविक्रम	मैत्रेय	—,,—
३५) जगन्नाथ	३६) मुकुंद	भारद्वाज	—
—	३७) सुल्हण	भारद्वाज	—
३८) बाईदेव	३९) राम	कौंडिण्य	—
४०) शारंग	४१) हरि	—,,—	—
४२) वासुदेव	४३) शनैश्वर	गौतम	—
—	४४) कृष्ण	—	—
४५) दंडपाणी	—	—	माध्यंदिन
४६) भानपाठक	४७) लक्ष्मीधर	शांडिल्य	—,,—
४८) वासुदेव	४९) कृष्ण	गर्ग	—,,—
५०) माधव	—	मौनभार्गव	—
५१) लषुमिदेव	—	काण्व	—
५२) रेद्धदेव	५३) रामेश्वर	भारद्वाज	—
५४) अनिरुद्धमिश्र	५५) अर्जुनमिश्र	—,,—	—
५६) जगन्नाथ	५५) चा पौत्र	—,,—	—
५७) नारायण	५८) वामन	—,,—	—

दानीचे नाव	पित्याचे नाव	गोत्र	शाखा
५९) भानो (भान?)	६०) मल्लिनाथ	भारद्वाज	—
६१) हरि	६२) गोविंद	काश्यप	—
६३) भानो (भान?)	६४) पद्मनाभ	—,,—	—
६५) भार्गव	६६) महादेव	—,,—	—
६७) एकदेव	६८) लोकनाथ	—,,—	—
६९) पुरुषो (पुरुष)	७०) विष्णु	वासिष्ठ	—
७१) लक्ष्मीधर	७२) राम	—,,—	—
७३) भास्कर	७४) लक्ष्मीधर	—,,—	—
७५) रामेश्वर	७६) वेईदेव	—,,—	—
७७) मार्तंड	७८) विष्ण	मुद्गल	—
७९) आपदेव	८०) ऋषि	—,,—	—
८१) पंचानन	८२) नारायण	अगस्त्य	बह्वृच
८३) राञ्जो	८४) जानो	पार्थश्व	—,,—
८५) कृष्ण	८६) हरि	वासिष्ठकौंडिन्य	—,,—
८७) सांवळदेव	८८) लोहिभट्ट	कौंडिन्य	—,,—
८९) जोगदेव	९०) विष्ण	हारीत	—,,—
९१) काञ्दिेव	९२) माहादेव	काश्यप	—
९३) चांगदेव	९४) नरसिंह	—,,—	—
९५) मञ्दिेव	९६) नरसिंह	—,,—	—
९७) कृष्ण	९८) चांगदेव	—,,—	—
९९) दामोदर	१००) लक्ष्मीधर	—,,—	—
१०१) वासुदेव	१०२) सोमनाथ	—,,—	—
१०३) वासुदेव	१०४) पुरुषोत्तम	वत्स	—
१०५) गोविंद	१०६) हरि	—,,—	—
१०७) अनंत	१०८) माधव	—,,—	—
१०९) श्रीधर	११०) वासुदेव	—,,—	—
१११) गोवर्धन	११२) माञ्दिेव	कौशिक	—
११३) कमलासन	११४) मुकुंद	—,,—	—
११५) रेयो	११६) जसवंत	—,,—	—
११७) कृष्ण	११८) विष्ण	मांडव्य	—
११९) अनंत	१२०) विष्णु	—,,—	—
१२१) म्हालू	१२२) हरि	कौंडिण्य	—
१२३) माधव	१२४) गोविंद	—,,—	—
१२५) गोविंद	१२६) वेञ्दिेव	गर्ग	काण्व
१२७) माधव	१२८) भानु	लौहित	—,,—
१२९) अल्हदेव	१३०) परसुराम	भारद्वाज	—,,—
१३१) देवधर	१३२) कृष्ण	घृतकौशिक	—,,—
१३३) रामभट	१३४) पद्मनाभ	आंगिरस	—,,—
१३५) घंञो	१३६) गोविंद	—	—,,—
१३७) राम	१३८) सारंग	मैत्रेय	—,,—
१३९) माधव–(१३७) चा पौत्र	—	मैत्रेय	—,,—
१४०) वामन	१४१) म्हलू	—	—,,—
१४२) वैद्यनाथ	१४३) कृष्ण	वत्स	—
१४४) राम	१४५) लक्ष्मीधर	—,,—	—

दानीचे नाव	पित्याचे नाव	गोत्र	शाखा
१४६) सादुगी	१४७) देवधर	मुद्‌गल	––
१४८) कृष्ण	१४९) देवधर	––,,––.	––
१५०) श्रीधर	१५१) राम	कौशिक	माध्यंदिन
१५२) जनार्दन	१५३) देवधर	गार्ग्य	––,,––
१५४) गंगाधर	१५५) कृष्ण	कौशिक	––,,––
१५६) दिवाकर	१५७) कृष्ण	––	––,,––
१५८) महादेव	१५९) धनेश्वर	गौतम	––,,––
१६०) पद्मनाभ	१६१) वेद	पौण्ड	––,,––
१६२) प्रभाकर	१६३) धरणीधर	भारद्वाज	––,,––
१६४) जानों	१६५) राम	मैत्रकुशिक	––

१६६) आरुआर लषुमिदेव––लेख लिहिणारा.

ग्रामनामे.––(१) सेउणदेश––जळगाव, धळे, औरंगाबाद व अहमदनगर जिल्ह्यांचा काही भाग; (२) नूपुरग्राम––हल्लीचे नेऊरगाव असावे; (३) निधिवास खंपणक––नेवाशाचे प्राचीन नाव; (४) निद्वासे––नेवासे; (५) सुरिएगाऊ––नेऊरगावजवळ गोदावरी नदीच्या काठावर असलेले हल्लीचे सुरेगाव; (६) पुनादेगाऊ––नेऊरगावच्या दक्षिणेस ६ मैलांवर असलेले पुनदगाव; (७) पाचेगाव––नेऊरच्या दक्षिणेस ६ मैलावर असलेले पाचेगाव; (८) टाकळी––नेऊरगावच्या पश्चिमेस ६ मैलांवर असलेले टाकळीभान; (९) डोमेगाव––टाकळीच्या उत्तरेस १ मैलांवर असलेले डोमेगाव; (१०) घोघरगाऊ––गोदावरी नदीच्या दक्षिण तीरावर असलेले घोगरगाव असावे; (११) ईडलगाऊ––ओळख पटत नाही; (१२) बिल्वग्राम––नेऊरगावच्या दक्षिणेस १ मैलांवर असलेले बेलपांढरी; (१३) पिप्प (लग्राम)––नेऊरगावच्या दक्षिणेस ४ मैलावर असलेले बेलपिंपळगाव.

विशेष महत्त्व.––संपादकांनी नेऊरगावचा जिल्हा औरंगाबाद दिलेला आहे. ग्रामसूचीत नेऊरगाव, जिल्हा–नाशिक, तालुका–पेठ असा उल्लेख मिळतो.

४८०. नेरूर ताम्रपट, चालुक्य सत्याश्रय पुलकेशी

जिल्हा–रत्नागिरी तालुका–कुडाळ

प्राप्तिस्थळ.––हा ताम्रपट इतर ताम्रपटांबरोबर नेरूर येथे १८४८ मध्ये मिळाला. सध्या हा ताम्रपट लंडनच्या इंडिया ऑफिस लायब्ररीमध्ये आहे.

संदर्भ.––(१) जेकब, ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो., १८५१, खंड ३, भाग २, पृ. २१० क्र. ६; (२) फ्लीट, इं. अँ., १८७९, खंड ८, पृ. ४३–४४.

भाषा व लिपी.––संस्कृत, लिपी मंगल ताम्रपटांप्रमाणे.

राजवंश व राजा.––बदामीचा चालुक्य नृपती पुलकेशी (द्वितीय).

वर्ष व तिथी.––दिलेली नाही. अंदाजे इ. स. ६१० ते ६४२.

सारांश.––हा ताम्रपट त्रोटक आहे. याचा उद्देश राजाने कुवळालहसु हे गाव ब्राह्मणाला दान दिले तसेच वत्सगोत्री.... राचार्याला २५ निवर्तने असलेले शेत दान दिले हे नमूद करण्याचा असावा.

व्यक्तिनामे.––(१) कीर्तिराज––चालुक्य नृपती; (२) पोलेकेशी वल्लभ––दान देणारा चालुक्य नृपती, कीर्तिराजाचा पुत्र.

ग्रामनामे.—(१) वातापी—म्हैसूर संस्थानात (कर्नाटकात) विजापूरच्या दक्षिणेस ५ मैलांवर असलेले हल्लीचे बदामी; (२) कुवळालहसु—ओळख पटत नाही.

४८१. नेरूर ताम्रपट, विजयभट्टारिका

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट नेरूर येथे सापडला.

संदर्भ.—(१) जेकब, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८५१, खंड ३, पृ. २०५–२०६, क्र.१; (२) फ्लीट, **इं. अॅ.** १८७८, खंड ७, पृ. १६३–१६४.

भाषा व लिपी.—संस्कृत, तत्कालीन चालुक्य वळणाची लिपी.

राजवंश व राजा.—चालुक्य नृपती चंद्रादित्य व राणी विजयभट्टारिका.

वर्ष व तिथी.—अश्विन वद्य २, अंदाजे इ. स. ६५०–६५५.

सारांश.—प्रस्तुत शासनाचा प्रमुख उद्देश विजयभट्टारिका हिने वत्सगोत्री स्वामी चतुर्वेदीचा पुत्र आर्यस्वामी याला नरकागाहर गावची शेती दान दिली हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) पुलकेशी वल्लभ—चालुक्य नृपती, चंद्रादित्याचा प्रपितामह; (२) कीर्तिवर्मन्—चालुक्य नृपती, पुलकेशी वल्लभाचा पुत्र, चंद्रादित्याचा पितामह; (३) सत्याश्रय—चालुक्य नृपती, कीर्तिवर्म्याचा पुत्र, चंद्रादित्याचा पिता; (४) श्रीहर्षवर्धन—सत्याश्रयाने पराभूत केलेला राजा; (५) विक्रमादित्य—चालुक्य नृपती, सत्याश्रयाचा पुत्र; (६) चंद्रादित्य—चालुक्य नृपती, विक्रमादित्याचा मोठा भाऊ; (७) विजयभट्टारिका—चंद्रादित्याची राणी; (८) आर्यस्वामी दीक्षित—दान स्वीकारणारा वत्स गोत्री ब्राह्मण (९) स्वामि–चतुर्वेदी—आर्यस्वामी दीक्षिताचा पिता; (१०) गृहपति—आर्यस्वामी दीक्षिताचा पितामह.

ग्रामनामे.—नरकागाहर—ओळख पटत नाही.

४८२. नेरूर ताम्रपट, चालुक्य विजयादित्य

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट नेरूर येथे सापडला. सध्या हा ताम्रपट इंडिया ऑफिसच्या लायब्ररीत लंडन येथे आहे.

संदर्भ.—(१) जेकब, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८५१, खंड ३, भाग २, पृ. २१०, क्र. ५ व ७; (२) फ्लीट, **इं. अॅ.**, १८८०, खंड ९, पृ. १२५–१३०, क्र. ७७.

भाषा व लिपी.—संस्कृत; चालुक्य वळणाची लिपी.

राजवंश व राजा.—पश्चिम चालुक्य नृपती विजयादित्य सत्याश्रय.

वर्ष व तिथी.—आषाढ (१५) पौर्णिमा, शके ६२२, ४ थे शासन वर्ष, इ. स. ७००-७०१.

सारांश.—प्रस्तुत ताम्रपटाचा मुख्य उद्देश विजयादित्य नृपतीने वत्स गोत्री जन्नस्वामी याचा पुत्र देवस्वामी याला बळ्ळावळ्ळी व सहम्यपुर या गांवांच्या मधे वसलेले नेरूर हे गाव दान दिले हे नमूद करण्याचा होता. हे शासन त्याने रासेननगरच्या तळावरून दिले होते.

व्यक्तिनामे—(१) पुलकेशी वल्लभ—चालुक्य नृपती; (२) कीर्तिवर्मन्—चालुक्य नृपती, पुलकेशी वल्लभाचा पुत्र; (३) सत्याश्रय—चालुक्य नृपती, कीर्तिवर्म्याचा पुत्र; (४) विक्रमादित्य सत्याश्रय—चालुक्य नृपती, सत्याश्रयाचा पुत्र; (५) विनयादित्य सत्याश्रय—चालुक्य नृपती, विक्रमादित्याचा पुत्र; (६) विजयादित्य सत्याश्रय—दान देणारा

चालुक्य नृपती, विनयादित्याचा पुत्र; (७) देवस्वामी—दान स्वीकारणारा वत्स गोत्री ब्राह्मण; (८) जन्नस्वामी—देवस्वामीचा पिता; (९) रेवस्वामी दीक्षित—देवस्वामीचा पितामह.

ग्रामनामे.—(१) नेरुर—हल्लीचे नेरूर; (२) बळ्ळाहवळ्ळीग्राम—नेरूरच्या पश्चिमेस ३ मैलांवर असलेले वुल्लवुल असावे; (३) सहस्यपुर—ओळख पटत नाही; (४) रासेन नगर—निश्चित ओळख पटत नाही. कदाचित अहमदनगर जिल्ह्यातील राशिन असावे; (५) इरिदिगे—ओळख पटत नाही.

४८३. नेरूर ताम्रपट, चालुक्य विजयादित्य

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट इ. स. १८४८ मध्ये नेरूर येथे सापडला. हल्ली हा ताम्रपट लंडनला इंडिया ऑफिस लायब्ररीत आहे.

संदर्भ.—(१) जेकब, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सी.**, १८५१, खंड ३, भाग २, क्र. २; (२) फ्लीट, **इं. अँ.**, १८८०, खंड ९, पृ. १३०–१३३, क्र. ७८.

भाषा व लिपी.—संस्कृत; पश्चिम चालुक्यकालीन लिपी.

राजवंश व राजा.—बदामीचा चालुक्य नृपती विजयादित्य सत्याश्रय.

वर्ष व तिथी.—१० वे शासन वर्ष, शके ६२७, इ. स. ७०५–७०६.

सारांश—प्रस्तुत शासनाचा उद्देश विजयादित्याने निरनिराळ्या गोत्रांच्या आठ ब्राह्मणांना हिकुळंब किंवा हिकुळंभ हे महासप्तम जिल्ह्यातील गाव दान दिले हे नमूद करण्याचा होता.

व्यक्तिनामे.—(१) पुलकेशी वल्लभ—चालुक्य नृपती; (२) कीर्तिवर्मन्—चालुक्य नृपती, पुलकेशी वल्लभाचा पुत्र; (३) सत्याश्रय—चालुक्य नृपती, कीर्तिवर्म्याचा पुत्र; (४) विक्रमादित्य सत्याश्रय—चालुक्य नृपती, सत्याश्रयाचा पुत्र; (५) विनयादित्य सत्याश्रय—चालुक्य नृपती, विक्रमादित्याचा पुत्र; (६) विजयादित्य सत्याश्रय—चालुक्य नृपती, दान देणारा, विनयादित्याचा पुत्र; (७) उपेंद्र दानासाठी विनंती करणारा; (८) निखद्य पुण्यवल्लभ—शासन लिहिणारा महासांधिविग्रहिक; दान स्वीकारणाऱ्या ब्राह्मणांची नावे (९) देवस्वामी—भारद्वाज गोत्र; (१०) कर्कस्वामी—कौशिक गोत्र; (११) यज्ञस्वामी—भारद्वाज गोत्र; (१२) नागम्मस्वामी—कौंडिन्य गोत्र; (१३) देवस्वामी—मौद्‌गल्य गोत्र; (२४) गर्गस्वामी—आत्रेय गोत्र; (१५) रुद्रस्वामी—काश्यप गोत्र; (१६) दशवर्मन्—वत्स गोत्र.

ग्रामनामे.—(१) हिकुलंब किंवा हिकुळंभ—ओळख पटत नाही; (२) महासप्तम—ओळख पटत नाही; (३) इरिदिगे—ओळख पटत नाही; (४) कुमार—ओळख पटत नाही.

४८४. नेरूर ताम्रपट, चालुक्य विजयादित्य

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट इ. स. १८४८ मध्ये नेरूर येथे सापडला. हल्ली हा ताम्रपट लंडनला इंडिया ऑफिस लायब्ररीमध्ये आहे.

संदर्भ.—जेकब, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सी.**, १८५१, खंड ३, भाग २, पृ. २१०, क्र. ४; (२) फ्लीट, **इं. अॅ.**, १८८०, खंड ९, पृ. १३२–१३५.

भाषा व लिपी.—संस्कृत; पश्चिमी चालुक्य वळणाची लिपी.

राजवंश व राजा.—बदामीचा चालुक्य नृपती विजयादित्य सत्याश्रय.

वर्ष व तिथी.—दिलेली नाही.

सारांश.—या ताम्रपटात विजयादित्य सत्याश्रय व त्याचा पुत्र विक्रमादित्य (दुसरा) यांनी मिळून काढलेल्या हुकुमाची नोंद केलेली आहे. या शासनान्वये कौंडिण्य गोत्री बम्मण्ड-स्वामीचा पुत्र सर्वादित्य दीक्षित याला मळवूर हे गाव दान दिले.

व्यक्तिनामे.—(१) पुलकेशी वल्लभ—चालुक्य नृपती; (२) कीर्तिवर्मन्—चालुक्य नृपती, पुलकेशी वल्लभाचा पुत्र; (३) सत्याश्रय—चालुक्य नृपती, कीर्तिवर्म्याचा पुत्र; (४) विक्रमादित्य सत्याश्रय—चालुक्य नृपती, सत्याश्रयाचा पुत्र; (५) विनयादित्य सत्याश्रय—चालुक्य नृपती, विक्रमादित्याचा पुत्र; (६) विजयादित्य सत्याश्रय—दान देणारा चालुक्य नृपती, विनयादित्याचा पुत्र; (७) विक्रमादित्य सत्याश्रय (दुसरा)—दान देणारा चालुक्य नृपती, विजयादित्याचा पुत्र; (८) सर्वादित्य दीक्षित—दान स्वीकारणारा कौंडिन्य गोत्री ब्राह्मण; (९) बम्मण्ड-स्वामी—सर्वादित्य दीक्षिताचा पिता.

ग्रामनामे.—मळवूर—ओळख पटत नाही.

४८५. नेरूर ताम्रपट, चालुक्य मंगलराज

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट इ. स. १८४८ मध्ये नेरूर येथे सापडला. सध्या हा ताम्रपट लंडनला इंडिया ऑफिस लायब्ररीमध्ये आहे.

संदर्भ.—(१) जेकब, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो**; १८५१, खंड ३, भाग २, पृ. २०३, क्र.३; (२) फ्लीट, **इ. अॅ.**, १८७८, खंड ७, पृ. १६१–१६३.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—बदामीचा चालुक्य नृपती मंगल.

वर्ष व तिथी.—कार्तिक महिन्याचा १२ वा दिवस, अंदाजे इ. स. ५९०–६२०.

सारांश.—या लेखाचा मुख्य उद्देश चालुक्य नृपती मंगल याने काश्यप गोत्री सुमति-स्वामीचा पुत्र प्रियस्वामी याला कोकणातील कुंडिवाटक हे गाव दिले हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) वल्लभ—चालुक्य नृपती; (२) मंगल—दान देणारा चालुक्य नृपती, वल्लभाचा पुत्र; (३) बुधराज.—मंगलने जिकलेला राजा; (४) शंकरगण-बुधराजाचा पिता; (५) स्वामी—'चालिक्य' कुळातील मंगलाने नष्ट केलेला राजा; (६) प्रियस्वामी—दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण; (७) सुमतिस्वामी—प्रियस्वामीचा पिता.

ग्रामनामे.—कुंडिवाटक—संगमेश्वर तालुक्यातील कुंडि हे ठिकाण.

४८६. नेवासे शिलालेख

जिल्हा—**अहमदनगर** तालुका—**नेवासे**

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख नेवासे येथील मोहिनीराज देवालयाजवळ काणव देशपांडे यांच्या वाड्यात सापडला.

संदर्भ.—(१) खरे, ग. ह., **द. म. इ. सा.**, (१९३४) खंड २, पृ. ३–५; (२) तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.**, १९६३, पृ. १२४–१२८, क्र. २४.

भाषा व लिपी..—संस्कृत-मराठी मिश्र, इ. स. १२ व्या शतकातील देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—श्री. तुळपुळयांच्या मते हा लेख यादव सिंधण याच्या राजवटीतील असावा.

वर्ष व तिथी.—शके ११६१, विकारी संवत्सर, इ. स. १२३९–४०.

सारांश.—या लेखात श्री. सीलू पंडित या पुराण सांगून चरितार्थ चालविणाऱ्या माध्यंदिन शाखेच्या शौनक गोत्री ब्राह्मणाने पांपूवीहरि गावाच्या शिवारातील करमुक्त केलेली स्वतःच्या वृत्तीतील १८ निवर्तने जमीन कर्णेश्वर देवालयाला दान दिल्याचा उल्लेख आहे. हीच जमीन देवपुरुषाने जीवण नामक व्यक्तीस दान दिली.

व्यक्तिनामे.—(१) सीलू पंडित—कर्णेश्वर देवालयाचा जुना वृत्तिकार, शौनक गोत्री ब्राह्मण; (२) देवपुरुष—सीलू पंडिताची वृत्ति जीवणास देणारी व्यक्ती; (३) जीवण—कर्णेश्वर देवालयाची वृत्ति मिळालेली व्यक्ती.

ग्रामनामे.—पांपूवीहरि—निश्चित ओळख पटत नाही.

४८७. नेसरी ताम्रपट, राष्ट्रकूट गोविंद (तृतीय)

जिल्हा—**कोल्हापूर** तालुका—**गडहिंग्लज**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट बरीच वर्षे पाटण येथील सरदार नागोजीराव पाटणकर यांच्याजवळ होता. नंतर त्यांनी हा ताम्रपट श्री. मुरारजी देसाई यांना दिला. हल्ली हा मुंबई येथील प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—(१) खरे, ग. ह., **द. म. इ. सा.**, १९३०, खंड १, पृ. १५; (२) गुप्ता पी. एल्., **इ. आय्**, १९६१–६२, खंड ३४, पृ. १२३–१३४; (३) सरकार, डी. सी. **इं. आय्.**, १९६१–६२, खंड ३४, पृ. १३५–१४०.

भाषा व लिपी.—संस्कृत; देवनागरी तत्कालीन दाक्षिणात्य वळणाची आहे.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती गोविंद (तृतीय).

वर्ष व तिथी.—पौष, कृष्ण पक्ष १३, संक्रांत, तारण संवत्सर, शके ७२७ (गत वर्ष), २१ डिसेंबर, इ. स. ८०५.

सारांश.—हे शासन राष्ट्रकूट नृपती गोविंद (तृतीय) याने शूगूदूरु येथील तळावरून दिले आहे. या ताम्रपटाचा मुख्य उद्देश राजाने इक्षुग्रामचा त्रिगोत्री—अंगिरस, बार्हस्पत्य, भारद्वाज—ब्राह्मण परिवच्छर चतुर्वेदी याचा पुत्र शिवनागभट्ट याला चंदगड विषयातील नेसरिका हे गाव दान दिले हे नमूद करण्याचा होता. हे शासन फणींद्र वंशीय बृहच्छिद घराण्याचा राजा नागहस्ति याच्या विनंतीवरून दिले आहे. हे शासन वत्सराजपुत्र अरुणादित्य याने लिहिले असून देवैय राणक हा दूतक होता.

व्यक्तिनामे.—(१) कृष्ण—राष्ट्रकूट नृपती; (२) ध्रुव निरुपम कलिवल्लभ—राष्ट्रकूट नृपती, कृष्णाचा पुत्र; (३) गंग—निरुपमाने जिंकलेला राजा; (४) वत्स—निरुपमाने पळवून लावलेला राजा; (५) गोविंदराज—दान देणारा निरुपमाचा पुत्र; (६) माराशर्व—गोविंदराजाला शरण आलेला राजा; (७) शिवनागभट्ट—इक्षुग्राम (उसगाव) निवासी, त्रिवेदी, दान स्वीकारणारा ब्राह्मण, अंगिरस, बार्हस्पत्य, भारद्वाज सगोत्री, तैत्तिरीय शाखा; (८) परिवच्छर चतुर्वेदी—शिवनागभट्टाचा पिता; (९) मोरिदास चतुर्वेदी—शिवनागभट्टाचा पितामह; (१०) नागहस्ती—दानासाठी विनंती करणारा फणींद्रवंशीय, बृहच्छिद कुळातील राजा; (११) देवैय राणक—दूतक; (१२) अरुणादित्य—लेख लिहिणारा; (१३) वत्सराज—अरुणादित्याचा पिता.

ग्रामनामे.—(१) चंदगड—बेळगाव जिल्ह्यातील चंदगड पेट्याचे मुख्य गाव; (२) नेसरिका—चंदगडपासून १० मैलांवर असलेले हल्लीचे नेसरी गाव असावे. हे हल्ली कोल्हापूर संस्थानात आहे; (३) शुगूदूरु—हे गाव कर्नाटकात असावे; (४) इक्षुग्राम (उसगाव)—ओळख पटत नाही. (५) तारा नदी—नेसरीजवळचा तारहोळ ओढा.

४८८. पणजी ताम्रपट, जयकेशी (प्रथम)

जिल्हा—**पणजी**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट पणजी येथे एका शेतकऱ्याजवळ मिळाला. सध्या हा ताम्रपट मुंबई येथे सेंट झेवियर कॉलेजमध्ये भारत इतिहास संशोधन संस्थेच्या संग्रहालयात आहे.

संदर्भ.—दीक्षित, मो. गं., **इंडिका,** रौप्य महोत्सवी अंक, १९५३, पृ. ८९–९८.

भाषा व लिपी.—संस्कृत; देवनागरी.

राजवंश व राजा.—कदंब नृपती जयकेशी (प्रथम).

वर्ष व तिथी.—सोमवार, आषाढ वद्य ८, शक संवत् ९८१ (गतवर्ष), विकारी संवत्सर, १५ जुलै, इ. स. १०५९.

सारांश.—प्रस्तुत शासनाचा मुख्य उद्देश राजाने गोपकद्वीपातील लघुमोरंबिक हे गाव दान दिले हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) त्रिलोचन कदंब—कदंब घराण्याचा मूळ पुरुष; (२) गूहल्ल (प्रथम)—कदंब नृपती; (३) षष्ठ (प्रथम)—कदंब नृपती, गूहल्ल (प्रथम) चा पुत्र; (४) जयकेशी (प्रथम)—कदंब नृपती, षष्ठ (प्रथम) चा पुत्र; (५) छदम—दान स्वीकारणारा अरब अधिकारी; (६) मधुमद—छदमचा पिता; (७) अलियम—छदमचा पितामह, ताजिय कुळातील नौवित्तिक; (८) विश्वरूप—शासन रचणारा कवी.

ग्रामनामे.—(१) चेमुल्य—कुलाबा जिल्ह्यातील हल्लीचे चौल; (२) गोपक द्वीप—सध्याचे गोवे; (३) मोरंबिक—सध्याचे मोरंबी.

विशेष महत्त्व.—भैरव म्हणून ओळखली जाणारी निष्क नाणी व गद्याणक नाणी यांचा या लेखात उल्लेख आहे.

४८९. परभणी ताम्रपट, चालुक्य अरिकेसरिन् (तृतीय)

जिल्हा—**परभणी** तालुका—**परभणी**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट परभणी येथील नानल वकील यांच्याजवळून श्री. स. न. जोशी यांनी मिळविला.

संदर्भ.—(१) खरे, ग. ह. व जोशी, स. न., **द. म. इ. सा.**, १९३४, खंड २, पृ. ३३–५५; (२) **इं. अ. रि.,** १९६१–६२, पृ. ४१, क्र. ३३.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ९ व्या शतकातील कानडी लिपी.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती कृष्ण (तृतीय) व चालुक्य नृपती अरिकेसरिन् (तृतीय).

वर्ष व तिथी.—शके ८८८, क्षयं संवत्सर, वैशाख पौर्णिमा, बुधवार, ८ एप्रिल, इ. स. ९६६.

सारांश.—हा ताम्रपट चालुक्य नृपती अरिकेसरी याच्या अमदानीतील आहे. या शासनाचा मुख्य उद्देश अरिकेसरीने कवि सोमदेव याला लेंबुळपाटक येथील जैन मंदिराच्या व्यवस्थेसाठी

वनिकट्टुपुलू हे गाव दान दिले हे नमूद करण्याचा होता. हे शासन कवी पेद्दण याने लिहिले व रेव याने कोरले.

व्यक्तिनामे.—(१) युद्धमल्ल (प्रथम)—चालुक्य नृपती; (२) अरिकेसरिन् (प्रथम)—चालुक्य नृपती, युद्धमल्ल (प्रथम) चा पुत्र; (३) नरसिंह (प्रथम)—चालुक्य नृपती, अरिकेसरिन् (प्रथम) चा पुत्र; (४) भद्रदेव—अरिकेसरिन् (प्रथम) चा पुत्र; (५) युद्धमल्ल (द्वितीय)—चालुक्य नृपती, नरसिंह (प्रथम) चा पुत्र; (६) बद्दिग—चालुक्य नृपती, युद्धमल्ल (द्वितीय) चा पुत्र; (७) संगम— बद्दिगाने जिंकलेला राजा; (८) भीम—बद्दिगाने पाण्यातील युद्धात पकडलेला राजा; (९) युद्धमल्ल (तृतीय)—चालुक्य नृपती, बद्दिगाचा पुत्र; (१०) नरसिंह (द्वितीय)—चालुक्य नृपती, युद्धमल्ल (तृतीय) चा पुत्र; (११) अरिकेसरिन् (द्वितीय)—चालुक्य नृपती, नरसिंह (द्वितीय) चा पुत्र; (१२) लोकांबिका—अरिकेसरिन (द्वितीय) ची पत्नी, राष्ट्रकूट राजकन्या; (१३) भद्रदेव (द्वितीय)—चालुक्य नृपती, अरिकेसरिन् (द्वितीय) चा पुत्र; (१४) अरिकेसरिन् (तृतीय)—दान देणारा चालुक्य नृपती, भद्रदेव (द्वितीय) चा पुत्र; (१५) सोमदेव—दान स्वीकारणारा जैन संघाचा मुनि; (१६) नेमिदेव—सोमदेवाचा गुरु; (१७) यशोदेव—नेमिदेवाचा गुरु; (१८) अमोघवर्षदेव—राष्ट्रकूट नृपती; (१९) अकालवर्ष श्रीकृष्णराजदेव—राष्ट्रकूट नृपती; (२०) पेद्दणभट्ट—दानपत्र रचणारा कवी; (२१) रेव—शासन कोरणारा.

ग्रामनामे.—(१) लेंबुळपाटक—हल्लीच्या करीमनगर जिल्ह्यातील वेमलवाड, अरिकेसरिन् (तृतीय) याची राजधानी; (२) रेपाक—करीमनगर जिल्ह्यातील रीपाक; (३) वनिकट्टुपुलु—हल्लीचे वोंतुडपुल्ल, दान दिलेले गाव; (४) दरियूरु—वनिकट्टुपुलुच्या पूर्वेचे गाव, ओळख पटत नाही; (५) कट्टाकूरु—वनिकट्टुपुलुच्या उत्तरेचे गाव, हल्लीचे कटकूर; (६) वेळ्ळाळपट्टु—वनिकट्टुपुलुच्या पश्चिमेचे हल्लीचे वल्लमपुटल; (७) इळिंदीकुंट—वनिकट्टुपुलुच्या दक्षिणेचे गाव, हल्लीचे इळंदकूंट; (८) सब्बिदेश—ओळख पटत नाही.

४९०. परळ शिलालेख, महाराजाधिराज अपरादित्यदेव

जिल्हा—**ठाणे** तालुका—**ठाणे**

प्राप्तिस्थळ—हा शिलालेख कुर्ल्याजवळ माहवली या गावी सापडला. सध्या हा शिलालेख मुंबई येथे प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—(१) इंद्रजी, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८७६, खंड १२, पृ. ३३२–३३५; (२) तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.**, १९६३, पृ. ८०–८४, क्र. १६.

भाषा व लिपी.—संस्कृत–मराठी मिश्र, इ. स. १२ व्या शतकातील देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—महाराजाधिराज अपरादित्यदेव (बहुधा शिलाहार).

वर्ष व तिथी.—पराभव संवत्सर, माघ, शके ११०८, इ. स. ११८७.

सारांश.—या लेखात अपरादित्यदेवाने वैद्यनाथ देवाचे पंचोपचार पूजेसाठी माहवली गावातील अनंत पै प्रभू याची वाटिका समस्त करविमुक्त करून २४ द्रम्मांसह दान दिल्याचे नमूद केले आहे. हा लेख कायस्थ वालिग पंडिताने लिहिला.

व्यक्तिनामे.—(१) अपरादित्यदेव—बहुधा शिलाहार नृपती; (२) भोपा—श्री व्योमशंभुराजकुलातील महामात्य; (३) अनंत पै प्रभु—महासांधिविग्रहिक; (४) वालिग पंडित—लेखक.

ग्रामनामे.—(१) कौंकण—हल्लीचे कोंकण; (२) दर्भवती—बडोदे संस्थानातील डभई; (३) षट्षष्टि—सध्याचे साष्टी; (४) माहवलि— कुर्ल्याजवळील सध्याचे माहुली (जि. मुंबई.).

४९१. पवई मराठी शिलालेख

जिल्हा—**मुंबई**

प्राप्तिस्थळ.—दिलेले नाही.

संदर्भ.—इं. अ. रि., १९६४–६५, पृ. ५९, क्र. ४४.

भाषा व लिपी.—मराठी, देवनागरी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात महासामंत सिउपने नागुदौस्तर (नागदेवेश्वर) च्या पत्नीला जमीन देणगीदाखल दिल्याचे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—सिउप—दान देणारा महासामंत; (२) नागुदौस्तर (नागदेवेश्वर)—दान स्वीकारणाऱ्या स्त्रीचा पती.

ग्रामनामे.—पौवे—हल्लीचे पवई.

४९२. पवनार, गंगामूर्ति शिलालेख

जिल्हा—**वर्धा** तालुका—**वर्धा**

प्राप्तिस्थळ.—हा लेख पवनार येथे सापडलेल्या गंगेच्या मूर्तीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—मिराशी, व्ही. व्ही., **कॉ.इ इं.** १९६३, भाग ५, प्लेट डी.

भाषा व लिपी.—संस्कृत, इ. स. च्या ६ व्या शतकातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. चे ६ वे शतक.

सारांश.—'गंगा भगवती' एवढीच अक्षरे आहेत.

४९३. पवनार शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पवनार येथील किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) कझेन्स, लि. अँ. रि. सी. पी. अँड बेरार, १८९७, पृ. १०; (२) हिरालाल, इं.सी.पी. अँड बेरार, १९१६, पृ. ११, क्र. ९.

भाषा व लिपी.—संस्कृत; देवनागरी.

राजवंश व राजा.—नाही.

वर्ष व तिथी.—नाही.

सारांश.—वाचन केलेले नाही.

४९४. पळसदेव शिलालेख, शके १०७९

जिल्हा—**पुणे** तालुका—**दौंड**

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख पळसदेव येथे एका नाथपंथीय देवालयात आहे. हे देवालय सरडेश्वराचे आहे.

संदर्भ.—(१) दीक्षित, मो. गं., **पराग**, वर्ष २, भाग ११, पृ. २१–२३; **काही उत्कीर्ण लेख म.सं.प.**, वर्ष ९, भाग १, पृ. १३–१४; (२) तुळपुळे, शं. गो., **प्रा.म.को.ले.**, १९६३, पृ. ५९–६२, क्र. ११.

भाषा व लिपी.—मराठी; इ. स. ११ व्या – १२ व्या शतकातील देवनागरी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—शके १०७९, ईश्वर संवत्सर, इ. स. ११५७.

सारांश.—या लेखात दंडनायक श्री. चंगदेव याने बांधलेल्या या विष्णुगृहाचे बांधकाम ईश्वर संवत्सरामध्ये पूर्ण झाले असा उल्लेख आहे. या देवालयास बसवण ऊवजाचा पुत्र, भाइ याने करमुक्त असलेली काही जमीन व काही सुवर्ण नाणी व इतर नाणी देणगी दाखल दिली होती. (करमुक्त–अकरवातोत्तर)

व्यक्तिनामे.—(१) चंगदेव—दंडनायक; (२) बसवण ऊवजा—उपाध्याय; (३) भाइ—दान देणारा, बसवण ऊवजाचा पुत्र.

४९५. पंढरपूर चौऱ्यायशीचा शिलालेख

जिल्हा—**सोलापूर** तालुका—**पंढरपूर**

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख पंढरपूर येथील विठ्ठल मंदिरात आहे.

संदर्भ.—(१) **बॉ.गॅ.**, खंड २०, पृ. ४२१–४२२; (२) राजवाडे, वि. का., **ग्रंथमाला**, वर्ष १२, भाग १, पृ. १–५; (३) दलरी, जी. ए., **द कल्ट ऑफ विठोबा**, पृ. ३६; (४) तुळपुळे, शं. गो., **ज.यु.पू.(ह्युमॅ.)**, खंड १, पृ. १–२५; **प्रा.म.को.ले.**, १९६३, पृ. १६५–१९० क्र. ३४.

भाषा व लिपी.—संस्कृत–मराठी; इ. स. १२ व्या–१३ व्या शतकातील देवनागरी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—प्रस्तुत शिलालेखात पुढील कालोल्लेख आहेत—(१) शके ११९५, श्रीमुख संवत्सर; इ. स. १२७३–७४; (२) भाव संवत्सर, ज्येष्ठ; मे, जून, इ. स. १२७४; (३) शके ११९८, धाता संवत्सर, मार्ग. वदि ३, वृषे, गुरुवार; २६ नोव्हेंबर, इ. स. १२७६; (४) शके ११९९, ईश्वर संवत्सर, मार्गशीर्ष शुद्ध १५; शुक्रवार, १० डिसेंबर, इ. स. १२७७; (५) अश्विन शुद्ध १, रविवार; २ सप्टेंबर, इ. स. १२७४; (६) धाता संवत्सर, चैत्र शुद्ध १५, शके ११९८, सोम.; ३० मार्च, इ. स. १२७६; (७) नभ मासे; जुलै–ऑगस्ट, इ. स. १२७६; (८) धाता संवत्सर, भाद्रपद बहुल ५, रविवार, शके ११९८; ३० ऑगस्ट, इ. स. १२७६; (९) शके ११९८, धाता संवत्सर, अश्विन शुद्ध १०, शुक्रवार; १८ सप्टेंबर, इ. स. १२७६; (१०) भाव संवत्सर, आषाढ; जून–जुलै, इ. स. १२७४; (११) धाता संवत्सर, पौष वद्य ३, शुक्रवार; २५ डिसेंबर, इ. स. १२७६; (१२) धाता संवत्सर आषाढ शुद्ध ११, शके ११९८, भौमे; २३ जून, इ. स. १२७६; (१३) आषाढ बहुल ११, शके ११९८, गुरौ; ९ जुलै, इ. स. १२७६; (१४) कार्तिक शुद्ध १३, ईश्वर संवत्सर, बुधे, १० नोव्हेंबर इ. स. १२७७; (१५) चैत्र शुद्ध १५, भाव संवत्सर, रविवार; २५ मार्च, इ. स. १२७४; (१६) अश्विन शुद्ध १४, भाव संवत्सर, रविवार; १६ सप्टेंबर, इ. स. १२७४; (१७) कार्तिक शुद्ध १५, धाता संवत्सर, शुक्रवार; २३ ऑक्टोबर, इ. स. १२७६; (१८) मार्गशीर्ष वद्य ७, रविवार; २९ नोव्हेंबर, इ. स. १२७६; (१९) कार्तिक शुद्ध १, बहुधान्य संवत्सर, भौमे; १८ ऑक्टोबर, इ. स. १२७८; (२०) कार्तिक शुद्ध १५, धाता संवत्सर, शुक्रवार; २३, ऑक्टोबर, इ. स. १२७६; (२१) वैशाख वदि ११, भाव संवत्सर, शुक्रवार; ४ मे, इ. स. १२७४; (२२) धाता संवत्सर; इ. स. १२७६–७७.

सारांश.—या लेखात विठ्ठलदेवाला देणग्या द्रेणाऱ्यांची नावे व स्थळे नमूद केली आहेत.

व्यक्तिनामे.—स्तंभ १— (१) लाषणनायक; (२) वामैय; (३) श्रीपति दंडनायक; (४) सम्धोलीचा सेणवैय; (५) गंगांधर नायक; (६) विजापूरची गौरूबाई; (७) माहूरचा नामदेव; (८) कोंकणचा केसवदेव; (९) अद्वैल; (१०) मांइबाइ; (११) दामोधरभट्ट; (१२) माहादेव पंडित; (१३) सोमनाथ; (१४) रूपदेव; (१५) सेणवै लषुमिदेव; (१६) नावैय; (१७) विद्याधर; (१८) सरस्वतीभट; (१९) मल्हादेवी; (२०) विठनायक; (२१) देऊबाई; (२२) कान्हूनायक; (२३) सोइंदेव; (२४) राघो; (२५) जाइदेव; (२६) दोंढ(?) पंडित; (२७) रामेस(?); (२८) दामोधर; (२९) हेमाडि पंडित धामन; (३०) रामचंद्रदेव—यादव नृपती; (३१) विजयराय; (३२) रवलदेवनायक; (३३) क्रिष्टदेव; (३४) श्रीपति देव; (३५) मालोदेव; (३६) माधवदेव; (३७) केसव—माधवदेवाचा पिता.

स्तंभ २—(३८) राघेण; (३९) माना—राघेणचा पिता; (४०) श्रीपति दंडनायक; (४१) गंगाधर नायक; (४२) वासुगिसेंठी; (४३) लंनुसेठी; (४४) गणपति नायक; (४५) जोइगुड; (४६) पैठणचा चांगदेव; (४७) कल्याणचा चांगदेव; (४८) कोंटीनचा हेमाडिपंडित; (४९) विजापूरची रेमाई; (५०) हरिदेव; (५१) सिधनायक; (५२) पोलाल; (५३) निंबदेव; (५४) सेणवैय; (५५) इस्वरस्वामि पेदि; (५६) राम पंडित; (५७) जांनोविमाय; (५८) पदुमै; (५९) पुराणिक हाषोबाइ; (६०) बाइदेव गुरव; (६१) चंगदेव; (६२) ईसरदेव; (६३) जतक; (६४) लषुमिदेव; (६५) लषुम; (६६) आवदेपा; (६७) राघो; (६८) नारण राघो; (६९) विजापूरचा दामैय; (७०) श्री सिधनाथ; (७१) पुरुषोत्तम पंडित; (७२) राघो; (७३) मांईदेव; (७४) बाइ; (७५) गोइंददेव; (७६) जाईदेव.

स्तंभ ३—(७७) श्रीपति दंडनायक; (७८) गंगाधर नायक; (७९) बोधक नायक; (८०) हेंपेरु; (८१) मसर; (८२) नरहरि; (८३) सिवैय; (८४) सावुबाइ; (८५) विस्फुराज; (८६) बोपिसेठी; (८७) जगदेव राणा; (८८) पैठणचा चांगदेव; (८९) कोहरचा हेमाडि पंडित; (९०) संतिलाल; (९१) नारण नाक; (९२) चारण मांइनायक; (९३) अर्जुनभट; (९४) विक्कुदेवी; (९५) रामेस्वरंभट; (९६) सायिनायक, (९७) जगदेवराय; (९८) महाजन; (९९) एकण; (१००) विक्रंभट; (१०१) रसमालि(?); (१०२) त्रियंबक; (१०३) मुद्रहस्त सेणवैय; (१०४) विदावंत(?); (१०५) भैरवदेव; (१०६) चांगप्रज्ञ; (१०७) पुरुषोत्तम पंडित; (१०८) हीरा नायकी; (१०९) मलीमाल(?); (११०) आइदेव; (१११) चांगा नायक; (११२) वेसुबाइ; (११३) वीठलदास; (११४) मालीमाल.

स्तंभ ४—(११५) जाठो पंडितराय; (११६) वामैनायक; (११७) गंगाधर नायक; (११८) वेंघाण(?); (११९) चांगदेव; (१२०) त्रिपुरुस(?); (१२१) गोविंद; (१२२) एकुम्हल; (१२३) भाहुदै; (१२४) तावबा; (१२५) अलोनयदेव; (१२६) कोंकणचा महादेव; (१२७) महादेवभट; (१२८) श्रीपति दंडनायक; (१२९) नामदेव; (१३०) रूपदेव—नामदेवाचा पिता; (१३१) पुरुषोत्तम नायक; (१३२) दाठीनायक; (१३३) चांदेवी; (१३४) वीकटकारु(?); (१३५) करणिक दाइंपंडित; (१३६) मलिमाल; (१३७) पदुबाई; (१३८) लाषणदेव; (१३९) उर्वसीदेव; (१४०) एकदेव; (१४१) श्रीपति दंडनायक; (१४२) बामरसचा करणिक; (१४३) वैजुपंडित; (१४४) विजापूरचा बळिदेव पंडित; (१४५) केसव(?) देव पंडित; (१४६) गरजेमा; (१४७) चाणवा सिंपी; (१४८) कोंकणचा गणपतिभट; (१४९) केसव पंडित; (१५०) अतुंव(अंतुव?) नायक; (१५१) मांइंदेव; (१५२) विरमदेव; (१५३) नारणनायक; (१५४) बामरसचा सेणवै चांदेय; (१५५) वामिदेव पंडित; (१५६) म्हाइंदेव; (१५७) दलवै(?) कुमरुपुत्र; (१५८) जोयिलठि; (१५९) माईतीआई; (१६०) कानुल्हाळु; (१६१) विषुभट; (१६२) म्हादेव; (१६३) आषाणलदेव; (१६४) साकुबाई.

स्तंभ ५—(१६५) जाठौआसुत मैना; (१६६) कोंकणचा महुसुद; (१६७) लषुमी; (१६८) महादेवभट; (१६९) कानौ(?); (१७०) मालो; (१७१) लषुम; (१७२) माहादेव; (१७३)

लषुबाय; (१७४) माधव; (१७५) आपंण्णा; (१७६) महदेव पंडित; (१७७) वेडिवंगचा अपण; (१७८) महदेव; (१७९) लषुबा; (१८०) म्हैवालची लषुमी; (१८१) ईस्वरस्वामि; (१८२) भिवुदेव पंडित; (१८३) काललप्पा; (१८४) गौलिवंसु नायक; (१८५) सेणवै विठो; (१८६) भुतारिणीबाई; (१८७) ईस्वरपेदि; (१८८) वीसास्वभट; (१८९) तिमंया पंडित; (१९०) दलवै सिंघदेव; (१९१) हरिदेव; (१९२) केसव पंडित; (१९३) ओपास्तिदेव; (१९४) विठा; (१९५) लखुबाई; (१९६) सेतुगुड; (१९७) मालिमालो(?); (१९८) जनी; (१९९) नारायण; (२००) श्रीकुवरदेव नायक; (२०१) लखुनायक; (२०२) लषा; (२०३) ओंकार पाठक; (२०४) एरंडवलीचा रामनायक; (२०५) असुयिदेव; (२०६) लषुदेव पंडित.

स्तंभ ६—(२०७) रामेसण(?); (२०८) सांगाणदेव; (२०९) स्त्रिपति दंडनायक; (२१०) गंगाधर नायक; (२११) विष्णुभट; (२१२) हरिपाल पंडित; (२१३) बामिदेव; (२१४) माइ; (२१५) पेदि; (२१६) नागंणा; (२१७) ब्रह्मसमुद्रलिंगैय; (२१८) नारण; (२१९) वीकरु; (२२०) वालेषाद्रि केरुगौड; (२२१) पोल(?); (२२२) तिंगवदेव; (२२३) महादेव पंडित; (२२४) मनुषेनायक; (२२५) फुलचौंडभट; (२२६) श्रीपतिदेव; (२२७) विष्णुदत; (२२८) हरीचंद्र; (२२९) स(भ?)मतिज; (२३०) देवमालि; (२३१) कोंडिबा; (२३२) देवण्णा; (२३३) लष्मिदेव मुकजेकार(?); (२३४) सुरवाडीचा देवंणा; (२३५) सिधदेव; (२३६) कुमर पदुमैय; (२३७) सोमनाथ.

स्तंभ ७—(२३८) नामा; (२३९) हमैय; (२४०) गणपति नायक; (२४१) पुरुषोत्तम; (२४२) दामोधर पंडित; (२४३) हरीदेव लोड; (२४४) सीमुषेण केसव; (२४५) माधव; (२४६) आपंणा; (२४७) लखुमै; (२४८) आंणय्य; (२४९) श्रीपति दंडनायक; (२५०) बैजुगिदेव; (२५१) लषुमण; (२५२) सांदेअ (सामदेव); (२५३) कान्हो राईयापा; (२५४) वेंकुण मालो कानड(?); (२५५) श्रीधरदासी; (२५६) देईपेदि; (२५७) विलंबाहू; (२५८) म्हालैयापा; (२५९) सरस्वति; (२६०) लखणभट; (२६१) पेईदेव पंडित; (२६२) लस्मणय; (२६३) जसवंता; (२६४) माहादेव; (२६५) दोरवठेकार लाटिदेव; (२६६) माधव; (२६७) यादो गणसेण; (२६८) एल्लुबाई.

ग्रामनामे.—(१) आंघोली; (२) आद्रुपवाडी; (३) आंबे—हल्लीचे आंबेजोगाई, जि. बीड; (४) आंब्रनेर; (५) आवडे; (६) आवढा—नागनाथाचे आवंढे, जि. परभणी; (७) एरंडवली—मिरजेच्या पूर्वेस १० मैलांवरील एरंडोली, जि. सांगली; (८) कनबरगी—हल्लीचे कणबरगी, जि. धारवाड; (९) कंवली; (१०) कविठ; (११) काटौन—सध्याचे काटोल, जि. नागपूर; (१२) कामेगौ; (१३) कालिंद—देशनाम; (१४) कालुगाव; (१५) किरिकोम—हल्लीचे करकम, पंढरपूरच्या उत्तरेस १४ मैल, जि. सोलापूर; (१६) कोंकण—देशनाम; (१७) कोहर; (१८) घाटोला; (१९) कल्याण; (२०) चांदौर—हल्लीचे चांदोर, जि. अमरावती; (२१) जळोले; (२२) दिवी; (२३) दीघ; (२४) दोरवठे; (२५) पाघोल; (२६) पांडरी; (२७) पिंपलवाड—पैठणच्या पश्चिमेस १० मैलांवरील सध्याचे तारुपिंपळवाडी, जि. औरंगाबाद; (२८) पुजापूर; (२९) पैंठण—हल्लीचे पैठण, जि. औरंगाबाद; (३०) फागनिपूर—हल्लीचे पंढरपूर, जि. सोलापूर; (३१) बामरस; (३२) भुदेस—देशनाम; (३३) मसरे; (३४) माण-देस—देशनाम; (३५) माहुर—हल्लीचे माहूर क्षेत्र, जि. अदिलाबाद; (३६) मुकजे; (३७) मेहंकर—सध्याचे मेहेकर, जि. बुलढाणा; (३८) म्हैवाल किंवा म्हैआल; (३९) म्हैसगी; (४०) युत्र(उपरे?); (४१) रायरी—सध्याचे राहेर, जि. नांदेड; (४२) रुपवाडी; (४३) रुयि; (४४) लाहोर—सध्याचे लाहोरे, जि. उस्मानाबाद; (४५) वंखरखेड; (४६) वणखेड; (४७) विजापुर—हल्लीचे विजापूर; (४८) विलदेस—देशनाम; (४९) विलेकिलंपूर; (५०) वेडिवंग; (५१) वैराग—बार्शीपासून आग्नेयेस १६ मैलांवरील वैराग, जि. सोलापूर; (५२) षेड—हल्लीचे खेड, निश्चित ओळख पटत नाही; (५३) सलिमकरे; (५४) सांगवी; (५५) सांघोले—सोला-पूरच्या नैर्ऋत्येस ५० मैलांवरील सांगोले, जि. सोलापूर; (५६) सांलिवे; (५७) सावे; (५८)

साहोये; (५९) सुरवाडी; (६०) सुरवी; (६१) सेजवल; (६२) सेंडा; (६३) सेंद्रुकणी—सध्याचे शेंदुरणी, जि. जळगाव; (६४) सोडवी; (६५) हानगल; (६६) हाथिद—सध्याचे हाथिद, ता. सांगोले, जि. सोलापूर. (६७) म्हैसाल—सांगलीजवळील म्हैसाळ.

* संपादकाने या लेखातील संशयातीत स्थळांची तेवढी निश्चिती केली आहे. सर्व स्थळांची निश्चिती केलेली नाही. दानकर्त्यात महाराष्ट्रीयाप्रमाणे कर्नाटकी व तेलंगीही आहेत.

४९६. पंढरपूर शिलालेख, विठ्ठलदेव

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत लेख पंढरपूर येथील विठ्ठल मंदिराच्या पश्चिम द्वारासमोरील सध्या "वायकांची बारी" या नावाने परिचित असलेल्या भागात सापडला. हल्ली हा शिलालेख मुंबईच्या डायरेक्टर ऑफ अर्काइव्हजच्या ऑफिसमध्ये आहे.

संदर्भ.—(१) तुळपुळे, शं. गो., **म. सा. प.**, १९५६, वर्ष ३०, भाग ११७ व ११९; **प्रा. म. को. ले.** १९६३, पृ. ८५–९२, क्र. १७; (२) मिराशी, वा. वि., **म. सा. प.**, वर्ष ३०, भाग १८.

भाषा व लिपी.—मराठी; यादवकालीन देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—यादव नृपती समस्त चक्रवर्ती (भिल्लमदेव).

वर्ष व तिथी.—सौम्य संवत्सर, शालिवाहन शके १११९, शुक्रवार, इ. स. ११८९–९०.

सारांश.—हा लेख त्रोटक वाटतो. या लेखात वर उल्लेखिलेल्या दिवशी, समस्त चक्रवर्ती यादव भिल्लम राज्य करीत असताना, महाजन, देव परिवार व मुद्रहस्त विठ्ठलदेव नायक या सर्वांनी हे लहान देऊळ बांधले असे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—विठ्ठलदेव नायक—देऊळ बांधणारा.

४९७. पाटणे शिलालेख, इंद्रराज निकुंभ

जिल्हा—**जळगाव** तालुका—**चाळीसगाव**

प्राप्तिस्थळ.—हा लेख पाटणे येथील महादेव मंदिरात कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बुल्हर, इं. अँ., १८७२, खंड ८, पृ. ३९–४२. येथे चुकीने इंद्रराजाचा मृत्यू गृहीत धरून हा लेख गोवन ३ रा व श्रीदेवी यांच्या नावावर आहे; (२) **इं. अ. रि.**, १९६९–७०, पृ. ४८, क्र. २५.

भाषा व लिपी.—संस्कृत; प्राचीन देवनागरी.

राजवंश व राजा.—खानदेशचा निकुंभ नृपती इंद्रराज व नृपती गोवन.

वर्ष व तिथी.—श्रीमुख संवत्सर, शके १०७५, इ. स. ११५३–५४.

सारांश.—या लेखात इंद्रराज व गोवन यांनी शिवमंदिर बांधल्याचा उल्लेख आहे. या लेखाचा मुख्य उद्देश गोवन याने आपली माता श्रीदेवी हिच्या अनुमतीने देवसंगम हे गाव दान दिले हे नमूद करण्याचा होता.

व्यक्तिनामे.—(१) निकुंभ—निकुंभ घराण्याचा मूळ पुरुष; (२) कृष्णराज (प्रथम)—निकुंभ नृपती; (३) गोवन (प्रथम)—निकुंभ नृपती, कृष्णराज (प्रथम) चा पुत्र; (४) गोविंदराज—निकुंभ नृपती, गोवन (प्रथम) चा पुत्र; (५) गोवन (द्वितीय)—निकुंभ नृपती, गोविंदराजाचा पुत्र; (६) कृष्णराज (द्वितीय)—निकुंभ नृपती, गोवन (द्वितीय) चा पुत्र; (७) इंद्रराज—निकुंभ नृपती, कृष्णराज (द्वितीय)चा पुत्र; (८) श्रीदेवी—सगरवंशीय राजकन्या, इंद्रराजाची

पट्टराणी; (९) गोवन (तृतीय)—निकुंभ नृपती, इंद्रराजाचा पुत्र; (१०) चंगदेव—इंद्रराजाचा प्रधान.

ग्रामनामे.—देवसंगम—ओळख पटत नाही.

४९८. पाटणे शिलालेख, यादव सिंघण

प्राप्तिस्थळ—हा लेख पाटण येथील देवीच्या मंदिराच्या बाहेरील अंगास भिंतीत घातलेल्या शिळेवर आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व फ्लीट, **पालि, संस्कृत व प्राचीन कानडी शिलालेख** पृ. २८४, क्र. ३; (२) किल्हॉर्न, **इ. आय.**, १८९२, खंड १, पृ. ३३८–३४६; (३) मास्टर **बु. स्कू. ओ.** अ. स्ट. खंड २०, पृ. ४३०–४३१; (४) सिक्लेअर, इं. अँ., १८७२, खंड १, पृ. २९६; (५) तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.** १९६३, पृ. १०५–११२, क्र. २१.

भाषा व लिपी.—संस्कृत–मराठी मिश्र, यादवकालीन देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—निकुंभ वंशीय सोइदेव व हेमाडिदेव व यादव नृपती सिंघण.

वर्ष व तिथी.—श्रावण पौर्णिमा; चंद्रग्रहण, प्रभव संवत्सर, शके ११२८, गुरुवार. ९ ऑगस्ट, इ. स. १२०७.

सारांश.—या लेखात सिंघणाचा ज्योतिषी चंगदेव याचा आजा भास्कराचार्य यांनी रचलेल्या सिद्धांतशिरोमणी व इतर ग्रंथांचा अभ्यास करण्यासाठी मठाची स्थापना केल्याचा उल्लेख आहे. या मठाला निकुंभ वंशातील सोइदेव व हेमाडिदेव यांनी काही जमीन व इतर उत्पन्ने कायम देणगीदाखल दिली.

व्यक्तिनामे.—(१) भिल्लम—यादव नृपती; (२) जैत्रपाल—यादव नृपती; भिल्लमाचा पुत्र; (३) सिंघण किंवा सिंह—यादव नृपती, जैत्रपालाचा पुत्र; (४) कृष्णराज—निकुंभ नृपती; (५) इंद्रराज—निकुंभ नृपती, कृष्णराजाचा पुत्र; (६) गोवन—निकुंभ नृपती, इंद्रराजाचा पुत्र; (७) सोइदेव—निकुंभ नृपती, गोवन याचा पुत्र; (८) हेमाडिदेव-निकुंभ नृपती, सोइदेवाचा धाकटा भाऊ. हे सर्व निकुंभ राजे यादवांचे मांडलिक; (९) त्रिविक्रम—शांडिल्य गोत्री ब्राह्मण, कविचक्रवर्ती; (१०) भास्करभट्ट—भोजराजाने 'विद्यापति' म्हणून गौरवलेला त्रिविक्रमाचा पुत्र; (११) गोविंदसर्वज्ञ—भास्करभट्टाचा पुत्र; (१२) प्रभाकर—गोविंदसर्वज्ञाचा पुत्र (१३) मनोरथ–प्रभाकराचा पुत्र; (१४) महेश्वराचार्य—मनोरथाचा पुत्र, कवीश्वर; (१५) भास्कर—महेश्वराचा पुत्र; (१६) लक्ष्मीधर—भास्कराचा पुत्र,. जैत्रपालाचा प्रमुख पंडित; (१७) चंगदेव—लक्ष्मीधराचा पुत्र, सिंघणाचा ज्योतिषी.

ग्रामनामे.—(१) पाटणे—चाळिसगावच्या नैर्ऋत्येस १० मैलांवरील पाटण; (२) ओडग्राम—ओळख पटत नाही; (३) चीलेग्राम—ओळख पटत नाही.

४९९. पाली ताम्रपट, चालुक्य विनयादित्य

जिल्हा–**सातारा** तालुका–**कऱ्हाड**

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत ताम्रपट खंडोबापाली या गावच्या एका मराठा गृहस्थाजवळ होता.

संदर्भ.—चांदोरकर, **भा. इ. सं. म., त्रैमासिक**, शके १८४४, वर्ष ३, भाग १, पृ. ६-१६.

भाषा व लिपी.—अशुद्ध संस्कृत, इ. स. ७ व्या शतकातील लिपी.

राजवंश व राजा.—बदामीचा चालुक्य नृपती विनयादित्य.

वर्ष व तिथी.—कालयुक्त संवत्सर, कार्तिक शुद्ध पंचमी, शके ५२०, भानुवार.

सारांश.—हा ताम्रपट चालुक्य नृपती विनयादित्य याच्या राजवटीतील आहे. पुत्रजन्मोत्सवाचे प्रसंगी त्याने भालाहरी नदीच्या उत्तर तीरावर असलेल्या रक्तापूर या ठिकाणी भारद्वाज गोत्री ब्राह्मण वासुदेव याला करहाटक विषयातील एलापूर गावातील वाटिका दान दिल्याचे या शासनात नमूद केले आहे. हे शासन सांधिविग्रहिक केशवार्य याने लिहिले.

व्यक्तिनामे.—(१) पुलकेशी वल्लभ (प्रथम)—चालुक्य नृपती; (२) कीर्तिवर्मन्—चालुक्य नृपती, पुलकेशी (प्रथम) चा पुत्र; (३) विजयादित्य—चालुक्य नृपती, कीर्तिवर्म्याचा ज्येष्ठ बंधु; (४) विक्रमादित्य—चालुक्य नृपती, विजयादित्याचा पुत्र; (५) विनयादित्य—दान देणारा चालुक्य नृपती, विक्रमादित्याचा पुत्र; (६) वासुदेव भट्ट—दान स्वीकारणारा कन्नड कुलातील भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (७) केशवार्य—ताम्रशासन लिहिणारा सांधिविग्रहिक.

ग्रामनामे.—(१) रक्तापूर—विनयादित्याची राजधानी, ओळख पटत नाही; (२) एल्लापूर—वाळवे तालुक्यातील हल्लीचे येलूर असावे. निश्चित ओळख पटत नाही. पुढील गावांचीही ओळख पटत नाही; (३) कोपरडेग्राम; (४) विवंकटेग्राम; (५) रतकूबग्राम (?); (६) विगराणग्राम; (७) पालीकेत ग्राम; (८) चिचवाकग्राम; (९) विरीग्राम (?); (१०) पाषाणपुर.

५००. पाली शिलालेख, यादव सिंहण

जिल्हा—**बीड** तालुका—**बीड**

प्राप्तिस्थळ.—हा लेख पाली येथील महादेव मंदिरातील शिळेवर (Slab) कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) इं. अ. रि; १९६४–६५, पृ. ५९, क्र. ४३.

भाषा व लिपी.—संस्कृत, इ. स. च्या १३ व्या शतकातील नागरी.

राजवंश व राजा.—यादव नृपती सिंहण. (सिंघणापर्यंतची वंशावळ आहे.)

वर्ष व तिथी.—इ. स. चे १३ वे शतक.

सारांश.—या लेखात चंद्रात्रेय राजाने यमुनेच्या तीरावरून दान दिल्याचे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) सिंहण—यादव नृपती; (२) चंद्रात्रेय—दान देणारा नृपती.

५०१. पाले शैलगृह शिलालेख

जिल्हा—**पुणे** तालुका—उल्लेख नाही.

प्राप्तिस्थळ.—हा लेख पाले येथील शैलगृहात कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) इं. अ. रि., १९६८–६९, पृ. ४७, क्र. १७.

भाषा व लिपी.—प्राकृत; खिर. पू. पहिल्या शतकातील ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—प्रस्तुत लेखात भदंत इदरखित याने (बहुधा इतरांबरोबर) लेणे व कुंड दान दिल्याचे नमूद केले आहे. लेख 'नमो अरिहंताणं' या नमनाने सुरू होतो.

व्यक्तिनामे.—भदंत इदरखित (इंद्ररक्षित)—दानी.

५०२. पांडरंगपल्ली ताम्रपत्र, राष्ट्रकूट नृपती अविधेय

जिल्हा—**सातारा** तालुका—**वाई**

प्राप्तिस्थळ.—सन १९२८ च्या सुमारास प्रस्तुत दानपत्र कोल्हापूरजवळच्या कोरोची नामक खेड्यात सापडले. सध्या हे कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठात आहे.

संदर्भ.—(१) मिराशी, वा. वि., सं. मु. १९६६, सर ५, पृ. ११७–१४२; (२) डॉ. कृष्णा म्हैसूर रि., १९२९, पृ. १९७–२१०; (३) अळतेकर, अ. भा. रि. इ., खंड २४, पृ. १४८; (४) मिराशी, वा. वि., अ. भा. रि. इ., खंड २५, पृ. २५; स्ट. इं., १, पृ. १७८; सं. मु. सर २, पृ. ९५–१०३; इ. आव्., १९६७, खंड ३७, भाग १, पृ. ९–२४.

भाषा व लिपी.—संस्कृत; कीलकशीर्षक प्रकारची लिपी.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती अविधेय.

वर्ष व तिथी.—अविधेयाचे १५ वे शासन वर्ष, भाद्रपद संवत्सर, कार्तिक पौर्णिमा.

सारांश.—प्रस्तुत ताम्रपटाचा उद्देश अविधेय राजानें कोल्लगिरीच्या पूर्वेस अनेवतीच्या तीरी असलेला पांडरंगपल्ली हा गाव जवळच्या काम्यक व जाउली या वाड्यांसह पविद्धक नामक स्थानाहून आलेल्या भार्गव गोत्री आणि त्रिप्रवरी शंभु नामक सामवेदी ब्राह्मणाला वैश्वदेव व अग्निहोत्र यांच्या अनुष्ठानाकरिता कार्तिकी पौर्णिमेस दान दिला होता हे नमूद करण्याचा आहे. दानपत्राच्या शेवटी नेहमीप्रमाणे शापाशीर्वादात्मक श्लोक आले आहेत. त्यानंतर देवदत्ताने राजाच्या अनुज्ञेने हे दानपत्र त्याच्या कारकीर्दीच्या १५ व्या वर्षी भाद्रपद संवत्सरी, कार्तिक महिन्याच्या कृष्ण पक्षातील पंचमीस लिहिले असे म्हटले आहे.

व्यक्तिनामे.—(१) मानांक–कुंतलाधिपती; (२) देवराज—कुंतल देशचा नृपती, मानांकाचा पुत्र; (३) अविधेय–दान देणारा कुंतल देशचा नृपती, देवराजाचा पुत्र; (४) शंभु—दान स्वीकारणारा, भार्गव गोत्री व त्रिप्रवरी, पविद्धक निवासी ब्राह्मण; (५) देवदत्त—दानपत्र लिहिणारा; (६) सर्वरस—दान देणारा इनामदार (मिराशी).

ग्रामनामे.—(१) पांडरंगपल्ली—दान दिलेले गाव, ओळख पटत नाही; (२) जाउली—वाई तालुक्यातील जावळी असावें; (३) काम्यक—ओळख पटत नाही; (४) पविद्धक—विजापूर जिल्ह्यातील सालोटगी असावे; (५) कन्नवाड—कोल्हापूर जिल्ह्यात शिरोळ तालुक्यातील कनवाड असावे; (६) गंगवाड—करवीर तालुक्यातील घानवडे असावे; (७) बळेयवाड–कागल तालुक्यातील बेलेवाडी असावे; (८) रेणांदाळ—हातकणंगले तालुक्यातील रेंदाळ असावे; (९) सीयळार—शाहूवाडी किंवा बावडा तालुक्यातील शिराळे असावे; (१०) शितरगे–शाहूवाडी तालुक्यातील शितूर असावे; (११) आरुंबाळिगे–करवीर तालुक्यातील बालिंगे असावे.

* विदर्भ, अश्मक (गोदावरीच्या दक्षिणेस), व कुंतल (कृष्णा खोरे) या प्रदेशांचा उल्लेख आला आहे.

५०३. पितळखोरे शैलगृह शिलालेख

जिल्हा—**औरंगाबाद** तालुका—**कन्नड**

प्राप्तिस्थळ.—हा लेख पितळखोरे शैलगृह क्र. ५ मध्ये डाव्या बाजूच्या भिंतीमधील छोट्या खांबावर कोरलेला आहे.

संदर्भ.—देशपांडे, एम. एन., ए. इं., क्र. १५ १९५९. पृ. ७६.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.— उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे खिस्तपूर्व २ रे शतक.

सारांश.—भिक्षुणीने दिलेली स्तंभाची देणगी.

५०४. पितळखोरे यक्षमूर्ती लेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पितळखोरे येथे सापडलेल्या यक्षमूर्तीच्या उजव्या पंजावर कोरलेला आहे.

संदर्भ.—देशपांडे, एम. एन. ए. इं., क्रमांक १५, १९५९, पृ. ८२.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—ख्रि. पू. २ रे शतक.

सारांश.—कण्हदास सोनाराने बनविलेली यक्षमूर्ती.

व्यक्तिनामे.— (१) कण्हदास–(कृष्णदास)–मूर्ती बनवणारा सोनार. (हेरंकार)

५०५. पितळखोरे शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पितळखोरे शैलगृह क्र. ४ मधील घोडयाच्या आकृतीच्या वर कोरलेला आहे.

संदर्भ.—देशपांडे, एम. एन. ए. इं., क्र. १५. १९५९, पृ. ७६.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे ख्रि. पू. १ ले किंवा २ रे शतक.

सारांश.—या लेखात दोन ओळी आहेत. त्यापैकी वरची ओळ वाचता येत नाही, खराब झाली आहे. दुसऱ्या ओळीतील 'धेनुकाकटच्या समसचा पुत्र कण्ह याने केले' ही अक्षरे वाचता येतात.

व्यक्तिनामे.—(१) कण्ह (कृष्ण); (२) समस—कण्ह याचा पिता.

ग्रामनामे.—धेनुकाकट.

५०६. पितळखोरे बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पितळखोरे येथील चैत्य लेण्यातील एका स्तंभावर आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं. के. टे. वे. इं., १८८१, पृ. ४०, क्र. २;

(२) बर्जेस व बुल्हर, अ. स. वे. इं. १८८३, खंड ४, पृ. ८३, क्र. २; (३) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. १३७, क्र. ११८८.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—प्रतिष्ठानच्या सघक (संघक) याच्या पुत्रांची स्तंभाची देणगी.

व्यक्तीनामे.—सघक (संघक)—स्तंभाचे दान करणाऱ्यांचा पिता.

ग्रामनामे.—पतिठान—हल्लीचे पैठण.

५०७. पितळखोरे बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पितळखोरे येथील चैत्य लेण्याजवळ असलेल्या विहारात कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. बे. इं.**, १८८१, पृ. ४०, क्र. ३; (२) बर्जेस व बुल्हर, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८३, क्र. ५; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय.**, १०, १९०९–१०, पृ. १३७, क्र. ११८९.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख त्रोटक आहे. याचे भाषांतर असे "वच्छीपुत (वत्सीपुत्र) मगिल याची देणगी."

व्यक्तिनामे.—(१) मगिल (मृगिल)—देणगी देणारा; (२) वच्छी (वात्सी)—मगिलाची माता.

५०८. पितळखोरे बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पितळखोरे येथील विहार लेण्यात आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. बे. इं.**, १८८१, प. ४०, क्र. ४; (२) बर्जेस, व बुल्हर, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८४, क्र. ४; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय.** १०, १९०९–१०, पृ. १३७, क्र. ११९०.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख त्रोटक आहे. एका शब्दाचे भाषांतर 'राजवैद्याचे' असे करता येते.

५०९. पितळखोरे बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पितळखोरे येथील विहार लेण्यात आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. बे. इं.**, १८८१, पृ. ४०, क्र. ५; (२) बर्जेस व बुल्हर, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८४, क्र. ५; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय.**, १०, १९९०–१०, पृ. १३७, क्र. ११९१.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—"राजवैद्य वच्छीपुत्र मगिल याची देणगी."

व्यक्तिनामे.—(१) मगिल (मृगिल)—दान देणारा राजवैद्य; (२) वच्छी (वत्सी)—मगिलाची माता.

५१०. पितळखोरे बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पितळखोरे येथील विहार लेण्यात कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं. के., टे. वे. इं.**, १८८१, पृ. ४०, क्र. ६; (२) बर्जेस व बुल्हर, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८४, क्र. ६; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १३७, क्र. ११९२.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—"राजवैद्य मगिल याची कन्या दता हिची देणगी".

व्यक्तिनामे.—(१) मगिल (मृगिल)—राजवैद्य; (२) दता (दत्ता)—दान देणारी मगिलकन्या.

५११. पितळखोरे बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पितळखोरे येथील विहार लेण्यात आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.**, १८८१, पृ. ४१, क्र. ७; (२) बर्जेस व बुल्हर, **अ. स. वे. इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८४, क्र. ७; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १३७, क्र. ११९३.

भाषा व लिपी.–प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख् नाही.

सारांश.—"राजवैद्य मगिल याचा पुत्र दतक याची देणगी".

व्यक्तिनामे.—(१) दतक (दत्तक) देणगी देणारा मगिलपुत्र, (२) मगिल (मृगिल) राजवैद्य; (३) वच्छी (वत्सी)—मगिलाची माता.

५१२. पितळखोरे बौद्ध स्तंभ शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पितळखोरे येथील चैत्य लेण्यात कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं. के., टे. वे. इं.**, १८८१, पृ. ३९, क्र. १; (२) बर्जेस व बुल्हर, **अ. स. वे. इं.** १८८३, खंड ४, पृ. ८३, क्र. १; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १३७, क्र. ११८७.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—"प्रतिष्ठानचा सुगंधीमितदेव याच्या कुटुंबाची स्तंभाची देणगी."

व्यक्तिनामे.—मितदेव (मितदेव) —दान देणारा सुगंधी. (गाधिक)

ग्रामनामे.—प्रतिष्ठान—हल्लीचे पैठण.

५१३. पिरवाडी ताम्रपट

जिल्हा—**कोल्हापूर** तालुका—**उल्लेख नाही**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट पिरवाडी येथील श्री. दादोबा बाबाजी पाटील यांच्याजवळ होता.

संदर्भ.—(१) राजवाडे, **भा. इ. सं. मं., वा. इ. वृ.**, शके १८३६, पृ. २०९–२१८; (२) चांदोरकर, **भा. इ. सं. मं., त्रैमासिक**, १९२३–२४, पृ. ५०–५६.

भाषा व लिपी.—मराठी; बाळबोध.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती भोज.

वर्ष व तिथी.—भोज शक ४१० (७१६ + ४१० = ११२६), विभव संवत्सर, श्रावणमास सोमवार.

सारांश.—या लेखात शिरगाव येथील मंगळमठाची वृत्ति गंग नाईक याच्याकडून काढून ती दतराय उर्फ कामाजी याला बहाल केल्याचा उल्लेख आहे. सोमंण्णा सोनाराने हे शासन घडवले.

व्यक्तिनामे.—(१) दतराय उर्फ कामाजी—मंगळमठाची वृत्ति स्वीकारणारा शिरगावचा पाडेवार; (२) कोनोजी पाटील—साक्षीदार; (३) लक्ष्मण कुळकर्णी—साक्षीदार; (४) शेटचा गुरव—साक्षीदार; (५) जयराम—साक्षीदार सुतार; (६) नागंणा —साक्षीदार कुंभार; (७) लक्ष्मण—साक्षीदार मडिवाळ (परीट); (८) राणु—साक्षीदार न्हावी; (९) गंगु तराळ—साक्षीदार; (१०) सीताप्पा तराळ—साक्षीदार; (११) मानाजी कोळी—साक्षीदार; (१२) भोज—तत्कालीन नृपती; (१३) गंगाजी नाईक—मंगळ-मठाचा पूर्वीचा पाडेवार; (१४) गणाजी नाईक; (१५) सोमंणा—शासन घडविणारा सोनार.

ग्रामनामे.—(१) रायबाग; (२) शिरगाव; (३) कोकुदनूर—या तिन्ही गावांची ओळख पटत नाही.

विशेष महत्त्व.—प्रा. ग. ह. खरे यांना सदर ताम्रपट बनावट असावा असे वाटते.

५१४. पिंजर देवालय शिलालेख

जिल्हा–**अकोला** तालुका–**अकोला**

प्राप्तिस्थळ.—अकोल्यापासून २२ मैलांवर पिंजर येथील हेमाडपंती मंदिराच्या आवारात असलेल्या नंदी मंदिरात हा लेख कोरलेला आहे.

संदर्भ.—हिराला, **इं. सें. प्रॉ. अॅण्ड बेरार**; १९३२, पृ. १३५, नं. १८५.

भाषा व लिपी.—संस्कृत, इ. स. १२ व्या १३ व्या शतकातील लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही. श्री. हिरालाल यांच्या मते लिपीच्या आधारे हा लेख इ. स. १२ व्या किंवा १३ व्या शतकातील असावा.

सारांश.—लेख वाचता येत नाही, शेवटच्या ओळीत 'कीर्तिप्रशस्ति' ही अक्षरे दिसतात.

५१५. पिंपरी ताम्रपट, राष्ट्रकुट ध्रुवराज

जिल्हा—जळगाव तालुका—**उल्लेख नाही**

प्राप्तिस्थळ.— हा ताम्रपट पिंपरी येथील दशरथ पाटील व लाला पाटील यांच्या ताब्यात आहे.

संदर्भ.—पाठक, के. बी., इ. आय्., १९०९–१०, खंड १०, पृ. ८१–८९.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. आठव्या शतकातील देवनागरी.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती धारावर्ष ध्रुवराज.

वर्ष व तिथी.—कार्तिक वद्य १५, अमावास्या, सूर्यग्रहण, शके ६९७ (गत वर्ष), रविवार, २९ ऑक्टोबर, इ. स. ७७५.

सारांश.—प्रस्तुत लेखाचा उद्देश भारद्वाज गोत्री भट्टावुक याचा पुत्र भट्टदेव दीक्षित याला धारावर्ष ध्रुवराजदेव याने आपल्या व आपल्या आईवडिलांच्या पुण्योपार्जनासाठी लीलाग्राम हे गाव दान दिले हे नमूद करणे हा होता. हे शासन शंखविवरक जवळ लष्करी तळ पडला असताना दिले होते. भट्ट हेरंब हा दूतक होता. बलाधिकृताचा पुत्र श्री. मांदल्ल याने हा लेख लिहिला.

व्यक्तीनामे.—(१) गोविंद (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती; (२) कर्कराज—राष्ट्रकूट नृपती, गोविंद (प्रथम) चा पुत्र; (३) इंद्रराज—राष्ट्रकूट नृपती, कर्कराजाचा पुत्र; (४) दंतिदुर्ग—राष्ट्रकूट नृपती, इंद्रराजाचा पुत्र; (५) कृष्णराज—राष्ट्रकूट नृपती, कर्कराजाचा पुत्र; (६) श्रीहर्ष—दंतिदुर्गाने जिंकलेला राजा; (७) वज्रट—दंतिदुर्गाने जिंकलेला राजा; (८) राहप्प—कृष्णराजाने जिंकलेला राजा; (९) गोविंद (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, कृष्ण राजाचा पुत्र; (१०) ध्रुवराज—राष्ट्रकूट नृपती, गोविंद (द्वितीय) चा धाकटा भाऊ; (११) भट्टदेव—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री काण्व शाखेचा ब्राह्मण; (१२) भट्टावुक दीक्षित—भट्टदेवाचा पिता; (१३) भट्ट हेरंब—धर्माधिकरण दूतक (१४) मांदल्ल—लेख लिहिणारा, महासांधिविग्रहिकाचा अधिकारी सामंत, बलाधिकृताचा पुत्र.

ग्रामनामे.—(१) लीलाग्राम—निलगव्हाण, जि. नाशिक; (२) वटनागरिका (८४)—वणी' जि. नाशिक. पुढील गावांची ओळख पटत नाही; (३) लघुडेञ्जार—लीलाग्रामच्या पूर्वेचे खेडे; (४) तलापाटक—लीलाग्रामच्या दक्षिणेचे खेडे; (५) अज्जलोणि—लीलाग्रामच्या पश्चिमेकडचे खेडे; (६) मोसिणी—लीलाग्रामच्या उत्तरेकडील नदी; (७) शंखविवरक, (८) जंबूसर स्थान.

५१६. पिंपळनेर ताम्रपट, चालुक्य पुलकेशी (द्वितीय)

जिल्हा—धुळे तालुका—**साक्री**

प्राप्तिस्थळ.—या ताम्रपटाची मूळ प्रत पिंपळनेरच्या नवाजी वलद उखाजी जिरी यांच्याजवळ आहे.

संदर्भ.—फ्लीट, इं. अँ., १८८०, खंड ९, पृ. २९३–२९६, नं. ८०; इं. अँ., १९०१, खंड ३०, पृ. २१६, नं. २५.

भाषा व लिपी.—संस्कृत; कानडी. बदामीच्या चालुक्यवंशीय लिपीप्रमाणे.

राजवंश व राजा.—बदामीचा चालुक्य नृपती सत्याश्रय (प्रथम) किंवा पुलकेशी (द्वितीय).

वर्ष व तिथी.—शके ३१०; (गत) इ. स. ३८८–८९, सूर्यग्रहण.

सारांश.—प्रस्तुत शासनाचा मुख्य उद्देश सत्याश्रयाने कात्यायन गोत्री नागस्वामी दीक्षित, श्रीधर दीक्षित इत्यादी ब्राह्मणांना पिप्पलनगर हे गाव दान दिले हे नमूद करण्याचा होता. हे शासन दिवाकरपुत्र नागेश्वर याने लिहिले.

व्यक्तिनामे.—(१) सत्याश्रयदेव— चालुक्य नृपती पुलकेशी (द्वितीय); (२) नागस्वामी दीक्षित; (३) श्रीधर दीक्षित; (४) वामन स्वामी; (५) नारायण; (६) देवार्य; (७) गोविंद स्वामी—(२) ते (७)—दान स्वीकारणारे कात्यायन गोत्री ब्राह्मण; (८) नागेश्वर—शासन लिहिणारा; (९) दिवाकर—नागेश्वराचा पिता.

ग्रामनामे.—(१) पिप्पलनगर—हल्लीचे पिंपळनेर; (२) लोहनगर—ओळख पटत नाही.

५१७. पुणे ताम्रपट, चालुक्य विनयादित्य

जिल्हा–पुणे तालुका–पुणे

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट भारतीय पुरातत्त्व पश्चिम विभागाचे मुख्याधिकारी मा. स्व. वत्स यांनी इ. स. १९३६ मध्ये पुणे येथे विकत घेतला.

संदर्भ.—वत्स, मा. स्व., इ. आय्., १९३९–४०, खंड २५, पृ. २८९–२९२.

भाषा व लिपी.—संस्कृत; देवनागरी.

राजवंश व राजा.—बदामीचा चालुक्य नृपती विनयादित्य.

वर्ष व तिथी—वैशाख पौर्णिमा, शके ६१२ (गत वर्ष), १० वे शासन वर्ष; शुक्रवार, २९ एप्रिल, इ. स. ६९०.

सारांश.—या शासनाचा मुख्य उद्देश विनयादित्याने मंचोह या ठिकाणी तळ असताना तोरवे या गावातील ५० निवर्तने जमीन काश्यप गोत्री ब्राह्मण दुर्गशर्मन् व रविशर्मन् यांना आपल्या राणीच्या विनंतीवरून मुलीच्या लग्नप्रसंगी दान दिली हे नमूद करणे हा होता. हे शासन महासांधिविग्रहिक रामपुण्यवल्लभ याने लिहिले होते.

व्यक्तिनामे.—(१) पुलकेशी वल्लभ—चालुक्य नृपती; (२) कीर्तिवर्मन्—चालुक्य नृपती, पुलकेशीचा पुत्र; (३) विक्रमादित्य—चालुक्य नृपती, कीर्तिवर्म्याचा पुत्र; (४) विनयादित्य—दान देणारा चालुक्य नृपती, विक्रमादित्याचा पुत्र; (५) महादेवी—विनयादित्याची राणी; (६) रामपुण्यवल्लभ—शासन लिहिणारा महासांधिविग्रहिक; (७) दुर्गशर्मन्—दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण; (८) रविशर्मन्—दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण.

ग्रामनामे.—(१) मंचोह (मञ्चुळ्)—पुणे जिल्ह्यात नाशिक मार्गावरील मंचर असावे; (२) तोरवे—विजापूर जिल्ह्यातील हल्लीचे तोरवे.

५१८. पुणे ताम्रपट, प्रभावती गुप्ता

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट पुणे येथे ब. भा. नगरकर यांचेजवळ मिळाला.

संदर्भ.—(१) पाठक, के. बी., इं. अँ., १९१२, खंड ४१, पृ. २१४–२१५; (२) पाठक, के. बी. व दीक्षित, के. एन्., इ. आय्., १९१९–२०, खंड १५, पृ. ३९–४४; (३) मिराशी, वा. वि., काँ. इं. इं., १९६३, खंड ५, पृ. ५–९.

भाषा व लिपी.—संस्कृत, कीलकशीर्षक प्रकारची लिपी.

राजवंश व राजा.—वाकाटक नृपती रुद्रसेन (द्वितीय) व युवराज दिवाकरसेन याची माता प्रभावती गुप्ता.

वर्ष व तिथी.—युवराज दिवाकरसेन याचे १३ वे शासनवर्ष, कार्तिक शुक्ल द्वादशी; सुमारे इ. ४१५ ते ४२०

सारांश.—हा ताम्रपट प्रभावती गुप्ताने नंदिवर्धनहून दिलेला आहे. या शासनाचा मुख्य उद्देश कार्तिक शुद्ध द्वादशीला आचार्य चनालस्वामीला दंगुण हे गाव दान दिले हे नमूद करणे हा होता. हा ताम्रपट चक्रदास याने कोरला.

व्यक्तिनामे.—(१) घटोत्कच—गुप्त नृपती; (२) चंद्रगुप्त (प्रथम)—गुप्त नृपती, घटोत्कचाचा पुत्र; (३) कुमारदेवी—चंद्रगुप्त (प्रथम) ची राणी ; (४) समुद्रगुप्त—गुप्त नृपती, चंद्रगुप्त (प्रथम) चा पुत्र; (५) चंद्रगुप्त (द्वितीय)—गुप्त नृपती, समुद्रगुप्ताचा पुत्र; (६) कुबेरनागा—चंद्रगुप्त (द्वितीय) ची नागकुलातील राणी; (७) प्रभावती गुप्ता—चंद्रगुप्त (द्वितीय) व कुबेरनागा यांची कन्या; (८) रुद्रसेन (द्वितीय)—वाकाटक नृपती, प्रभावती गुप्ताचा पती; (९) दिवाकरसेन—वाकाटक युवराज; (१०) चनालस्वामी—दान स्वीकारणारा आचार्य.

ग्रामनामे.—(१) दंगुण—हल्लीचे हिंगणघाट; (२) विलवणक— हिंगणघाटच्या पश्चिमेस २॥ मैलांवरील वणी असावे; (३) कदापिंजन—हिंगणघाटच्या आग्नेयेस ३ मैलांवरील कडाजन असावे; (४) शीर्षग्राम—हिंगणघाटच्या उत्तरेस असलेले गाव, ओळख पटत नाही; (५) सिदिविवरक—हिंगणघाटच्या दक्षिणेस असलेले गांव, ओळख पटत नाही; (६) नंदिवर्धन—नागपूर जिल्ह्यात रामटेकजवळ हल्लीचे नंदरधन किंवा नगरधन. (७) सुप्रतिष्ठाहार—सध्याचा हिंगणघाट तालुका असावा—यात दंगुण हे गाव होते.

५१९. पुणे ताम्रपट, राष्ट्रकूट कृष्णराज

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट श्री. जी. के. हुंडीवाले साठचे यांच्याजवळ सापडला.

संदर्भ.—(१) आपटे, डी. व्ही., भा. इ. सं. मं., त्रैमासिक पुणे, वर्ष ८, पृ. १६५–१७०; (२) गुप्ते, वाय्. आर्., भा. इ. सं. मं., त्रैमासिक, पुणे, वर्ष ८, पृ. १७०–१७३.

भाषा व लिपी.—संस्कृत; नागरी.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती कृष्णराज.

वर्ष व तिथी.—शके ६८०, अश्विन अमावास्या, सूर्यग्रहण, हेमलंबी संवत्सर, १६ ऑक्टोबर, इ. स. ७५८.

सारांश.—हा ताम्रपट राष्ट्रकूट नृपती कृष्णराज याच्या अमदानीतला आहे. या शासनाचा मुख्य उद्देश पूगडिभट्ट नामक ब्राह्मणाला बोपखळु हे गाव दान दिले हे नमूद करणे हा होता. ताम्रपट कृष्णराजाच्या आदेशानुसार इंद्र याने लिहिला होता.

व्यक्तिनामे.—(१) गोविंदराज—राष्ट्रकूट नृपती; (२) कक्कराज—राष्ट्रकूट नृपती, गोविंदराजाचा पुत्र; (३) इंद्रराज—राष्ट्रकूट नृपती, कक्कराजाचा पुत्र; (४) दंतिदुर्ग—

राष्ट्रकूट नृपती, इंद्रराजाचा पुत्र; (५) कृष्णराज—दान देणारा राष्ट्रकूट नृपती, दंतिदुर्गाचा चुलता; (६) पूगडिभट—दान स्वीकारणारा वासिष्ठ—मैत्रावरुण—कौंडिण्य हे प्रवर असलेला कमइत ब्राह्मण; (७) वड्मडि रामदीक्षित—पूगडिभट्टाचा पिता; (८) इंद्र—शासनाचा लेखक.

ग्रामनामे.—(१) पुण्यविषय—हल्लीचा पुणे जिल्हा; (२) बोपखळु—हवेली तालुक्यात पुण्यापासून ५ मैलांवर असलेले बोपखल असावे; (३) कलस—बोपखलपासून २ मैलांवरील कळस; (४) दर्पपूडिका—बोपखलपासून २ मैलांवरील दापोडी; (५) भेसउरी—बोपखलपासून ४ मैलांवर व पुण्यापासून ९ मैलांवर असलेले भोसरी.

५२०. पुल्लर शिलालेख

जिल्हा–नागपूर | **तालुका–उमरेड**

प्राप्तिस्थळ.—पुल्लर येथील एका गुहेतील भिंतीवर हा लेख कोरलेला असून सध्या तो खराब झाला आहे.

संदर्भ.—इं. अ. रि., १९७०–७१, पृ. ४९, नं. २२.

भाषा व लिपी.—प्राकृत, ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. २ रे शतक.

सारांश.—(१) वासवदलक पुतस; (२) अ (च किंवा व) लस मतिकमम्।

व्यक्तिनामे.—वासवदलक.

ग्रामनामे.—उल्लेख नाही.

५२१. पुल्लर शिलालेख

प्राप्तिस्थळ.—पुल्लर येथील एका गुहेत भिंतीवर हा शिलालेख कोरला असून सध्या हा खराब झाला आहे.

संदर्भ.—इं. अ. रि., १९७०–७१, पृ. ४९, नं. २२.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. दुसरे शतक.

सारांश.—'ओकियस' एवढेच वाचता येते.

व्यक्तिनामे.—ओकिय.

ग्रामनामे.—उल्लेख नाही.

५२२. पुळुंज शिलालेख

जिल्हा–सोलापूर | **तालुका–पंढरपूर**

प्राप्तिस्थळ.—पुळुंज येथील शिवमंदिराजवळ असलेल्या लहान मंदिराच्या बाहेरच्या सोप्यांत हा शिलालेख आहे.

संदर्भ.—खरे, ग. ह., द. म. इ. सा., १९३४, खंड २, पृ. ५६–६९.

भाषा व लिपी.—संस्कृत व कानडी.

राजवंश व राजा.—यादव नृपती सिंघण.

वर्ष व तिथी.—माघ शुद्ध ११, सोमवार, व्यतिपात, सिद्धार्थी संवत्सर; २८ जानेवारी, इ. स. १२००.

सारांश.—या लेखाचा मुख्य उद्देश पुळुंजच्या सिद्धसोमदेवासाठी त्याचा भक्त अंमुगिदेव याला व बीर नागरसाचे देवालयाला मिळालेल्या निरनिराळ्या देणग्या नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) अंमिदेव—सिद्धसोमदेवाचा भक्त, यति; (२) अंमुगिदेव—सोमनाथ देवाचा भक्त; (३) सिंघणदेव—यादव नृपती. यापुढे दान देणाऱ्या व्यक्तींची नावे आहेत :– (४) संकेय—साहणि; (५) देवेय– साहणि; (६) दायिय नायक—साहणि; (७) सोइदेव—कुमार; (८) गंगिदेव—कुमार;. (९) संकमदेव—कुमार; (१०) बिज्जराणा–कुमार; (११) रवेयिदेव—कुमार; (१२) जोइदेव—कुमार; (१३) विक्रमादित्यदेव—महामंडलेश्वर; (१४) सिरियादेवी—विक्रमादित्याची पत्नी; (१५) सिंहेय—साहणि, महाप्रधान; (१६) तिपुरेय नायक—शिकारी; (१७) रायसेट्टि; (१८) जोइसेट्टि; (१९) इसय्य नायक—महाप्रधानाचा खाजगी शिकारी; (२०) वामन नायक; (२१) लाहिदेव नायक; (२२) तंमय्य नायक; (२३) दामोदर—दंडनायक; (२४) चामुंडरस नायक—दंडनायकाचा लेखक, लेख लिहिणारा.

ग्रामनामे.—(१) पूर्ण, पूर्णजे, हूळजे—हल्लीचे पुळुंज; (२) द्वारावती—द्वारका; (३) इय्ये—पुळुंजच्या पश्चिमेस २ मैलांवरील इटे; (४) कवडि—उत्तर कोकण; (५) सोईजण—पुळुंजच्या उत्तर ईशान्येस ७ मैलांवरील सौदने; (६) कुरुवलगे नाड—पुळुंजच्या पूर्व ईशान्येस ११ मैलांवरील कुरुल; (७) देगावे—पुळुंजच्या आग्नेयेस ६ मैलांवरील देगाव; (८) ळळिगे—देगावच्या पश्चिमेस २। मैलांवरील नळी; (९) पत्थरिगे—कुरोलीच्या पूर्वेस ५॥ मैलांवरील पाथरी; (१०) कोरळ्ळी— पुळुंजच्या पूर्व ईशान्येस १६ मैलांवरील कुरोली; (११) चिंचवळ्ळि—पुळुंजच्या उत्तरेस ४ मैलांवरील फूलचिंचोली; (१२) आसुठिगे—पुळुंजच्या वायव्योत्तरेस १८॥ मैलांवरील अष्टे; (१३) रवळपळ—अष्टचाच्या दक्षिणेस चार मैलांवरील रोपळे; (१४) तूंगद्रूह—पुळुंजच्या वायव्योत्तरेस १०॥ मैलांवरील तुंगत; (१५) एवंतिगे—तुंगतच्या उत्तरेस ४। मैलांवरील येवती; (१६) पोरगावे—पुळुंजच्या पश्चिमेस ५ मैलांवरील पोहरगाव.

५२३. पुळुंज कानडी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पुळुंज येथील लिंगेश्वराच्या देवळाच्या दोन हेमाडपंती थाटाच्या सभामंडपांपैकी पहिला मंडप ओलांडून दुसऱ्यात जाताना जे दार लागते त्याच्या डाव्या बाजूस भिंतीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—खरे, ग. ह., द. म. इ. सा., १९३४, खंड २, पृ. ६९–७१

भाषा व लिपी.—कानडी.

राजवंश व राजा.—यादव नृपती सिंघण.

वर्ष व तिथी.—व्यय संवत्सर, सुध····· सोमवार, २७. (शासन वर्ष ?)

सारांश.—हा लेख तुटक आहे. यात अंमुगिदेवास दिलेली दाने नमूद केली असावीत.

व्यक्तिनामे.—(१) सिंघण—यादव नृपती; (२) अंमुगिदेव—दान स्वीकारणारा.

ग्रामनामे.—पूर्नज—पुळुंज.

५२४. पूर शिलालेख, यादव रामचंद्रदेव

जिल्हा–पुणे तालुका–पुरंदर

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत शिलालेख मंडळाच्या प्रदर्शनातील असून तो सासवड जवळच्या पूर या गावी मिळाला.

संदर्भ.—(१) खरे, ग. ह., **द. म. इ. सा.**, १९३४, खंड २, पृ. ५–७; (२) तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.**, १९६३, पृ. २०९–२११, नं. ३९.

भाषा व लिपी.—मराठी, १२ व्या –१३ व्या शतकातील देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—यादव नृपती रामचंद्रदेव.

वर्ष व तिथी.—शके १२०७, पार्थिव संवत्सर, अश्विन शुद्ध १ (आस्विनादौ), शनिवार; १ सप्टेंबर, इ. स. १२८५.

सारांश.—लेख खराब झाल्यामुळे नीट लागत नाही. करणाधिप हेमाडिपंडित यास लोक-कर्माधिकारी हा नवीन अधिकार दिल्याचे नमूद केले आहे. यावरून या लेखास अधिकार लेख म्हणता येईल.

व्यक्तिनामे.—(१) रामचंद्रदेव—यादव नृपती; (२) हेमाडि पंडित—सकलकरणाधिप; (३) बाइदेव—दंडनायक; (४) श्रीपति प्रभुदेवण नायक.

५२५. पेशवे दप्तर ताम्रपट

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट पुणे येथे एलिअनेशन ऑफिसमध्ये आहे.

संदर्भ.—(१) खरे, ग. ह., **द. म. इ. सा.**, १९४९, खंड ३, पृ. ४९–५७; (२) **भा. इ. सं. मं. त्रैमासिक**, पुणे, वर्ष १८, भाग २, पृ. ४९–५७ (शके १८५९).

भाषा व लिपी.—कानडी; इ. स. ११ व्या–१२ व्या शतकातील कानडी लिपीशी जुळणारी.

राजवंश व राजा.—चालुक्य नृपती त्रिभुवनमल्ल वीर सोमेश्वरदेव.

वर्ष व तिथी.—गुरुवार, भाद्रपद शुद्ध पौर्णिमा, विश्वावसु संवत्सर, सोमेश्वरदेवाचे ४ थे शासनवर्ष. याला जुळणाऱ्या तारखा ११ सप्टेंबर, इ. स. ११८५ व २३ ऑगस्ट इ. स. ११८४. गत शक ११०७ ला दक्षिणी पद्धतीप्रमाणे विश्वावसु संवत्सर येते, पण भाद्रपद पौर्णिमा बुधवारी येते. शके ११०६ मधील भाद्रपद पौर्णिमेस गुरुवार येतो पण विश्वावसु संवत्सर येत नाही.

सारांश.—हा ताम्रपट चालुक्य नृपती सोमेश्वरदेव याच्या अमदानीतील आहे. वीर बणंजु नावाच्या व्यापारी संघाचे त्यात वर्णन असून त्या संघाने हा ताम्रपट दिलेला आहे. ताम्रपटात अय्यावोळे, अहिच्छत्र, मणिगव्वळ्ळि इत्यादि स्थलांचा उल्लेख आहे. या शासनान्वये सावकार बम्मिसेट्टि यास सुंक, किरकुल, आय, दाय इत्यादी कर माफ केले होते.

व्यक्तिनामे.—(१) सोमेश्वरदेव—चालुक्य नृपती; (२) बम्मिसेट्टि—कर माफ झालेला सावकार.

ग्रामनामे.—(१) अय्यावोळे—बदामीच्या पूर्वेस १६ मैलांवरील ऐहोळे; (२) अहिच्छत्र—ऐहोळेचे पर्याय नाम; (३) मणिगव्वळ्ळि—विजापूरच्या दक्षिणनैर्ऋत्येस ११ मैलांवरील मानगोळी; (४) नाल्कुंदि सारे(वि)र—ओळख पटत नाही; (५) कंनद नाल्सायिर—विजापूर जिल्ह्यात हुनगुंड तालुक्यात असलेले कंदगल्ल; (६) काकंडिगे—विजापूरच्या दक्षिणेस १६ मैलांवरील काखंडकी.

५२६. पैठण ताम्रपट, राष्ट्रकूट गोविंद (तृतीय)

जिल्हा—**औरंगाबाद** तालुका—**पैठण**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट पैठणनिवासी तिरकमराय तात्या कासार शेठ यांच्याजवळ होता.

संदर्भ.—किलहॉर्न, इ. आय्., १८९४–९५, खंड ३, पृ. १०३–११०.

भाषा व लिपी.—संस्कृत, प्राचीन नागरी लिपी.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती गोविंद (तृतीय).

वर्ष व तिथी.—वैशाख वद्य १, शके ७१६, ४ मे, इ. स. ७९४.

सारांश.—या शासनाचा मुख्य उद्देश राजाने काही ब्राह्मणांना यज्ञ वगैरे धार्मिक कृत्ये करण्यासाठी प्रतिष्ठान भुक्तीमधील १२ गावांच्या साराकच्छ गटातील लिंबारामिका हे गांव दान दिले हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) गोविंदराज(प्रथम)—राष्ट्रकूट नृपती; (२) कर्कराज—राष्ट्रकूट नृपती, गोविंदराज(प्रथम)चा पुत्र; (३) इंद्रराज(द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, कर्कराजाचा पुत्र; (४) दंतिदुर्ग—राष्ट्रकूट नृपती, इंद्रराज(द्वितीय)चा पुत्र; (५) कृष्णराज अकालवर्ष—राष्ट्रकूट नृपती, कर्कराजाचा पुत्र, दंतिदुर्गाचा चुलता; (६) गोविंदराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, कृष्णराजाचा पुत्र; (७) ध्रुवराज निरुपम—राष्ट्रकूट नृपती, गोविंदराज(द्वितीय)चा धाकटा भाऊ; (८) गोविंदराज(तृतीय)—दान देणारा राष्ट्रकूट नृपती, ध्रुवराजाचा पुत्र; (९) भृटिक्रम—दान स्वीकारणारा ब्राह्मण; (१०) ऋषि—भृटिक्रमाचा पिता; (११) राजट—दान स्वीकारणारा ब्राह्मण; (१२) जीज्जट—राजटाचा पिता; (१३) वामदेव—दान स्वीकारणारा ब्राह्मण; (१४) राऊल्ल—वामदेवाचा पिता.

गोत्रे : वत्स, पाराशर, वशिष्ठ, सैतेह (?), हारीत (?), काश्यप; शाखा–वाजसनेयिन्, बह्वृच, तैत्तिरीय, माध्यंदिन.

ग्रामनामे.—(१) प्रतिष्ठान—हल्लीचे पैठण; (२) लिंबारामिका—दान दिलेले गाव, ओळख पटत नाही; (३) समतीर्थक—लिंबारामिकेच्या पूर्वेस, ओळख पटत नाही; (४) धोनग्राम—लिंबारामिकेच्या उत्तरेस, ओळख पटत नाही; (५) ब्रह्मपुरी—लिंबारामिकाच्या पश्चिमेस, ओळख पटत नाही.

५२७. पैठण ताम्रपट, यादव रामचंद्र

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट पैठण येथे सापडला.

संदर्भ.—फ्लिट, इं. अॅ., १८८५, खंड १४, पृ. ३१५–३१९.

भाषा व लिपी.—संस्कृत; नागरी.

राजवंश व राजा.—यादव नृपती रामचंद्र.

वर्ष व तिथी.—शके ११९३, बुधवार, माघ वद्य १२, प्रजापति संवत्सर, इ. स. १२७१–७२.

सारांश.—या ताम्रपटाचा मुख्य उद्देश राजाने ५७ ब्राह्मणांना सेउण देशांत गोदावरीच्या उत्तर तीरावर वसलेले वादाठाणग्राम, पाटारपिंपलग्राम व वैद्यघोघरग्राम ही गावे दान दिली हे नमूद करण्याचा होता. हे शासन पंडित धनेश्वर याने लिहिले.

व्यक्तिनामे.—(१) सिंघण (प्रथम)—यादव नृपती; (२) मल्लुगि—यादव नृपती, सिंघण (प्रथम) चा पुत्र; (३) भिल्लम—यादव नृपती; (४) जैतुगि (प्रथम)—यादव नृपती, भिल्लमाचा पुत्र; (५) सिंघण (द्वितीय)—यादव नृपती, जैतुगि (प्रथम) चा पुत्र; (६) गणपति—जैतुगि (प्रथम) ने तुरुंगवासातून सोडवलेला राजा; (७) जैतुगि (द्वितीय)—यादव नृपती, सिंघण (द्वितीय) चा पुत्र; (८) कृष्ण—यादव नृपती, जैतुगि (द्वितीय) चा पुत्र; (९) आमण—यादव नृपती, कृष्णाचा पुतण्या; (१०) राम—यादव नृपती, कृष्णाचा पुत्र; (११) बल्लाळ—सिंघण (द्वितीय) ने जिंकलेला होयसळ राजा; (१२) कक्कल—सिंघण (द्वितीय) ने जिंकलेला राजा; (१३) भोज—सिंघण (द्वितीय) ने जिंकलेला शिलाहार राजा; (१४) अर्जुन—सिंघण (द्वितीय) ने जिंकलेला राजा; (१५) वीसल—अन्हिलवाडचा व्याघ्रपल्ली शाखेचा चालुक्य नृपती असावा. यादव नृपती आमण याच्या पित्याने त्याचा पाडाव केल्याचा उल्लेख आहे.

दान स्विकारणाऱ्या ब्राह्मणांची नावे :—

ब्राह्मणाचे नाव	पित्याचे नाव	गोत्र	शाखा
(१६) विष्णु	(१७) गोविंद	वासिष्ठ	बह्वृच
(१८) रावलदेव	(१९) दामोदर	—,,—	—,,—
(२०) नागदेव	(२१) गोविंद	—,,—	—,,—
(२२) केशव	(२३) गोविंद	—,,—	—,,—
(२४) जानु	(२५) पद्मनाभ	मुद्गल	—,,—
(२६) गोविंद	(२७) माधव	—,,—	—,,—
(२८) विष्णु	(२९) दामोदर	विष्णुवृद्ध	—,,—
(३०) जानु	(३१) रावलदेव	भारद्वाज	—,,—
(३२) जसमंत	(३३) विनायक	—,,—	—,,—
(३४) आइदेव	(३५) विनायक	—,,—	—,,—
(३६) कृष्ण	(३७) वामिदेव	—,,—	—,,—
(३८) भानो (नु)	(३९) मल्लिनाथ	—,,—	—,,—
(४०) ब्रह्मदेव	(४१) गदाधर	—,,—	—,,—
(४२) गंगाधर	(४३) नारायण	—,,—	—,,—
(४४) जगन्नाथ	(४५) गंगाधर	—,,—	—,,—
(४६) राम पंडित	(४७) विष्णु	—,,—	—,,—
(४८) मांइदेव पंडित	(४९) राम पंडित	—,,—	—,,—
(५०) कृष्ण	(५१) जनार्दन	—,,—	तैत्तिरीय
(५२) प्रभाकर	(५३) धरणू	कौण्डिण्य	बह्वृच
(५४) महादेव	(५५) गौतम	—,,—	—,,—
(५६) कृष्ण	(५७) ईश्वर	—,,—	—,,—
(५८) पुरुषो (ष)	(५९) कृष्ण	—,,—	—,,—
(६०) राम	(६१) कृष्ण	—,,—	—,,—
(६२) ईश्वर	(६३) नागदेव	—,,—	—,,—
(६४) पद्मनाथ (भ) भट्ट	(६५) सोमनाथ	—,,—	तैत्तिरीय
(६६) नरसिंह	(६७) पद्मनाथ (भ)	—,,—	—,,—
(६८) सोमनाथ	(६९) पद्मनाभ	—,,—	—,,—

ब्राह्मणाचे नाव	पित्याचे नाव	गोत्र	शाखा
(७०) सारंग	(७१) —,,—	—,,—	—,,—
(७२) गणेश्वर	(७३) —,,—	—,,—	—,,—
(७४) हरिहर	(७५) —,,—	—,,—	—,,—
(७६) त्रिविक्रम	(७७) —,,—	—,,—	—,,—
(७८) ऋषिदेव	(७९) सारंगभट्ट	—,,—	—,,—
(८०) आदित्य	(८१) नागदेव	—,,—	—,,—
(८२) विष्णु	(८३) नरसिंह	—,,—	—,,—
(८४) माइआ	(८५) गोविंद	विश्वामित्र	बह्वृच
(८६) एल्हुगि	(८७) श्रीपति	—,,—	—,,—
(८८) वामन	(८९) नागदेव	गर्ग	—,,—
(९०) श्रीधर	(९१) आपदेव	हरित	—,,—
(९२) सारंग	(९३) अनंत	—,,—	—,,—
(९४) लक्ष्मीधर	(९५) हरिदेव	—,,—	—,,—
(९६) केशव	(९७) राघव	गार्ग्य	—,,—
(९८) दिवाकर	(९९) देवण	—,,—	तैत्तिरीय
(१००) विष्णु	(१०१) नारायण	—,,—	—,,—
(१०२) नरसिंह	(१०३) मांयदेव	जामदग्न्य-वत्स	बह्वृच
(१०४) वामन	(१०५) धनेश्वर	गौतम	—,,—
(१०६) धनेश्वर	(१०७) दामोदर	—,,—	—,,—
(१०८) चौवेरि	(१०९) विष्णु	—,,—	तैत्तिरीय
(११०) कूचिष्ठ	(१११) महादेव	काश्यप	—,,—
(११२) सोमनाथ	(११३) कामदेव	—,,—	—,,—
(११४) विष्णु	(११५) मल्लिदेव	कौशिक	—,,—
(११६) विष्णु	(११७) नागदेव	वाध्य्रश्व	—,,—
(११८) सारंग	(११९) राम	आत्रेय	—,,—
(१२०) त्र।इदेव	(१२१) तीलूआपा	देवरात	—,,—
(१२२) बोपदेव	(१२३) नारायण	—,,—	—,,—
(१२४) राम	(१२५) वोपदेव	—,,—	—,,—
(१२६) विष्णु	(१२७) नारायण	—,,—	—,,—
(१२८) अनंत	(१२९) नारायण	—,,—	—,,—

(१३०) पंडित धनेश्वर—हा लेख लिहिणारा.

ग्रामनामे.—(१) वादाठाणग्राम; (२) पाटारंपिंपलग्राम; (३) वैद्यघोघरग्राम ही तीन दान दिलेली गावे असून ओळख पटत नाही. या व्यतिरिक्त- (४) वाहगांवु; (५) नेउरगांवु; (६) देइगांवु; (७) खातिगांवु; (८) आलुएगांवु; (९) नागमठाण; (१०) जान्तेगांवु; (११) पानिव; (१२) वडखल; (१३) गंगा-गोदावरी नदी. दान दिलेल्या गावी वेश्यांनी वस्ती करू नये, जुगार खेळला जाऊ नये व शस्त्रे बाळगली जाऊ नयेत या अटी होत्या.

५२८. पैठण शिलालेख, सोमेश्वरदेव

प्राप्तिस्थळ.—हा लेख पैठण येथे महानुभावी मठात (भोगनारायण मंदिर) आहे.

संदर्भ.—(१) तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.**, १९६३, पृ. ३६३–३६९, नं. ७०.

भाषा व लिपी.—मराठी; यादवकालीन देवनागरी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात सोमेश्वरदेवाच्या आवारात असलेल्या सोढल नारायणाच्या देवस्थानास मिळालेल्या देणग्या व त्यांचा विनियोग कसा करावयाचा हे सविस्तरपणे सांगितले आहे. तसेच पैठणमधील सोढल नारायण, शास्त्रमढ, म्हातू नारायणाचे स्थान व सेवगावातील मढ यांनाही काही दाने दिली आहेत.

व्यक्तिनामें.—उल्लेख नाही.

ग्रामनामे.—(१) कविठी—पैठणच्या उत्तरेस ५ मैलांवर पैठण–औरंगाबाद रस्त्यावरील कवठे; (२) टाकली—अहमदनगर जिल्ह्यात नेवाश्याच्या वायव्येस ५ मैलांवरील टाकळी-भान; (३) नारिअले—पैठण–औरंगाबाद रस्त्यावर पैठणपासून २/३ मैलांवरील नारळ हे गाव; (४) सेउगाव—नगर–पैठण रस्त्यावर पैठणच्या नैर्ऋत्येस असलेले हल्लीचे शेवगाव (५) जांबूआली—ओळख पटत नाही; (६) दीवी—ओळख पटत नाही.

५२९. पौनी शिलालेख, भगदत्त

जिल्हा–भंडारा तालुका–भंडारा

प्राप्तिस्थळ.—हा लेख भंडाऱ्याच्या दक्षिणेस ३२ मैलांवर असलेल्या पौनी या गावी मिळाला.

संदर्भ.—(१) मिराशी, वा. वि., इ. अय्., १९३७–३८, खंड २४, पृ. ११–१४.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—भार गणाचा राजा भगदत्त.

वर्ष व तिथी.—इ. स. च्या सुरवातीचा काळ.

सारांश.—या लेखाचा मुख्य उद्देश भगदत्ताने पदचिन्ह (पाजुगापदो) असलेली शिळा दान दिली हे नमूद करण्याचा होता.

व्यक्तिनामे.—भगदत—दान देणारा भार गणाचा राजा.

ग्रामनामे.—उल्लेख नाही.

५३०. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेला शिलाखंड पौनी येथील उत्खननात सापडला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प., **पौनी एक्स्कॅव्हेशन**, १९७२, पृ. ३८, क्र. १.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—लिपीच्या आधारे ख्रिस्तपूर्व ३ ते २ शतक.

सारांश.—उपासिका विसमिताची देणगी.

व्यक्तिनामे.—विसमिता–दान देणारी स्त्री.

५३१. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेला शिलाखंड पौनी येथील उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प., **पौनी एस्कॅव्हेशन,** १९७२, पृ. ३८, क्र. २.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—लिपीच्या आधारे ख्रिस्तपूर्व ३ ते २ शतक.

सारांश.—सर्वांच्या सुखासाठी विसमिताने दिलेली देणगी.

व्यक्तिनामे.—विसमिता—दान देणारी स्त्री.

५३२. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेला शिलाखंड पौनी येथील उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प., **पौनी एस्कॅव्हेशन,** १९७२, पृ. ३८, क्र. ३.

भाष व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—लिपीच्या आधारे अंदाजे ख्रिस्तपूर्व १ ले शतक.

सारांश.—पुसगुताची देणगी.

व्यक्तिनामे.—पुसगुत (पुष्यगुप्त)—दानी.

५३३. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेला शिलाखंड पौनी येथील उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प., **पौनी एस्कॅव्हेशन,** १९७२, पृ. ३८, क्र. ४.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—लिपीच्या आधारे अंदाजे ख्रिस्तपूर्व १ ले शतक.

सारांश.—हा लेख त्रोटक आहे. ह्यातील 'समिकाय हिम्' एवढीच अक्षरे वाचता येतात.

५३४. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पौनी येथील उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प., **पौनी एस्कॅव्हेशन,** १९७२, पृ. ३९, क्र. ५.

भाषा व लिपी.—प्राकृत ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—लिपीच्या आधारे शुंगकाळ.

सारांश.—भिक्षु उतरक याची देणगी.

व्यक्तिनामे.—उतरक—दान देणारा भिक्षु.

एच १५–१७

५३५. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेला कठड्याचा स्तंभ पौनी येथील उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प., **पौनी एस्कॅव्हेशन**, १९७२, पृ. ३९, क्र. ६.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—बुधदेवाची (बुद्धदेवाची) देणगी.

व्यक्तिनामे—बुधदेव—दानी.

५३६. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेला कठड्याचा स्तंभ पौनी येथील उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प., **पौनी एस्कॅव्हेशन**, १९७२, पृ. ३९, क्र. ७.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—भिक्षु उतरगुत (उत्तरगुप्त) याची देणगी.

व्यक्तिनामे.—उतरगुत—दानी भिक्षु.

५३७. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेला कठड्याचा स्तंभ पौनी येथील उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प., **पौनी एस्कॅव्हेशन**, १९७२, पृ. ३९, क्र. ८.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—लिपीच्या आधारे शुंगकाल.

सारांश.—पंचनिकायपंथीय नाग याची देणगी.

व्यक्तिनामे.—नाग—पंचनिकाय पंथाचा अनुयायी दानी.

५३८. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेला कठड्याचा स्तंभ पौनी येथील उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा., व जोशी, ज. प., **पौनी एस्कॅव्हेशन**, १९७२, पृ. ३९, क्र. ९.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख त्रोटक आहे. यातील 'महायसा अंतेवासिनिय····· वलिय (?) दानं, ही अक्षरे वाचता येतात. 'वलिय' चा अर्थ स्पष्ट होत नाही.

व्यक्तिनामे.—महायसा—दान देणारी अंतेवासिनी.

५३९. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेला कठड्याचा स्तंभ पौनी येथील उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प., **पौनी एस्कॅव्हेशन**, १९७२, पृ. ३९, क्र. १०.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—मुचलिंद नागाची आकृति. 'मुचरिदो नागो'.

५४०. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेला कठड्याचा स्तंभ पौनी येथील उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प., **पौनी एस्कॅव्हेशन**, १९७२, पृ. ३९, नं. ११.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.— उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख त्रोटक आहे. यात 'बुध' या शब्दापासून सुरू होणारे दानकर्त्याचे नाव असावे. 'धय बुध' इतकेच वाचता येते.

५४१. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पौनी येथील उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प., **पौनी एस्कॅव्हेशन**, १९७२; पृ. ४०, क्र. १२.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—लिपीच्या आधारे ख्रि. पू. १ ले शतक किंवा इ. स. चे १ ले शतक

सारांश.—या लेखात भिक्षु यखदिन (यक्षदत्त) याची देणगी नमूद केली आहे.

व्यक्तिनामे.—यखदिन (यक्षदत्त)—दानी.

५४२. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पौनी येथील उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प., **पौनी एस्कॅव्हेशन**, १९७२, पृ. ४०, क्र. १३.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—लिपीच्या आधारे इ. स. पू. १ ले किंवा इ. स. १ ले शतक.

सारांश.—या लेखात एका भिक्षुणीची देणगी नमूद केली आहे. नावातील उस–मिता ही अक्षरे वाचता येतात. हे नाव कदाचित 'उसभमिता' असावे.

५४३. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पौनी येथील उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प., **पौनी एस्कॅव्हेशन**, १९७२, पृ. ४०, क्र. १४.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—लिपीच्या आधारे इ. स. पू. १ ले शतक किंवा इ. स. २ रे शतक.

सारांश.—या लेखात 'भिखुणी हलिया' हे नाव दिले आहे.

व्यक्तिनामे.—हलिया—भिक्षुणी.

५४४. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पौनी येथील उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प., **पौनी एस्कॅव्हेशन**, १९७२, पृ. ४०, क्र. १५.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—लिपीच्या आधारे इ. स. पू. १ ले किंवा इ. स. २ रे शतक.

सारांश.—हा लेख त्रोटक आहे. यातील 'बुधरखित' हे नाव वाचता येते.

व्यक्तिनामे.—बुधरखित (बुद्धरक्षित).

५४५. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पौनी येथील उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प., **पौनी एस्कॅव्हेशन**, १९७२, पृ. ४०, क्र. १६.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—लिपीच्या आधारे इ. स. पू. १ ले किंवा इ. स. २ रे शतक.

सारांश.—लेख त्रोटक आहे.

५४६. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पौनी येथील उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प., **पौनी एस्कॅव्हेशन**, १९७२, पृ ४०, क्र. १७.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—लिपीच्या आधारे इ. स. पू. १ ले किंवा इ. स. २ रे शतक.

सारांश.—लेख त्रोटक आहे.

५४७. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पौनी येथे उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प., **पौनी एस्कॅव्हेशन**, १९७२, पृ. ४०, क्र. १८.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—लिपीच्या आधारे इ. स. पू. १ ले किंवा इ. स. २ रे शतक.

सारांश.—या लेखात देणगी नमूद केली आहे. 'माठिय पसाद'.

व्यक्तिनामे.—माठिय (?)—दानी.

५४८. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पौनी येथे उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प., **पौनी एस्कॅव्हेशन**, १९७२, पृ. ४०, क्र. २०.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—लिपीच्या आधारे इ. स. पू. १ ले किंवा इ. स. २ रे शतक.

सारांश.—या लेखात सतिकाची देणगी नमूद केलेली आहे.

व्यक्तिनामे.—सतिका—दान देणारी स्त्री.

५४९. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पौनी येथे उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प., **पौनी एस्कॅव्हेशन**, १९७२, पृ. ४०, नं. २१.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—लिपीच्या आधारे इ. स. पू. १ ले किंवा इ. स. २ रे शतक.

सारांश.—या लेखात बहुधा एका भिक्षुणीचे दान नमूद केले असावे. तिचे नाव बहुधा गोह असावे.

व्यक्तिनामे.—गोह—दान देणारी स्त्री.

५५०. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पौनी येथे उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प., **पौनी एस्कॅव्हेशन**, १९७२, पृ. ४०, क्र. २२.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—लिपीच्या आधारे इ. स. पू. १ ले किंवा इ. स. २ रे शतक.

सारांश.—हा लेख त्रोटक आहे. यात 'तिक' शब्दाने शेवट होणारे व्यक्तीचे नाव नमूद केले आहे.

५५१. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पौनी येथे उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प., **पौनी एस्कॅव्हेशन**, १९७२, पृ. ४०, क्र. २३, २४.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—लिपीच्या आधारे इ. स. पू. १ ले किंवा इ. स. २ रे शतक.

सारांश.—हे दोन्ही लेख अपूर्ण आहेत. क्र. २३ मध्ये कोणातरी व्यक्तीचे दान नमूद केले आहे. क्र. २४ मध्ये 'कृष्ण' हे नाव आलेले आहे. परंतु नंतरच्या अक्षरावरून काही अर्थबोध होत नाही.

व्यक्तिनामे.—कण (कृष्ण).

५५२. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पौनी येथे उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प., **पौनी एस्कॅव्हेशन**, १९७२, पृ. ४०, क्र. २५

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—लिपीच्या आधारे इ. स. पू. १ ले किंवा इ. स. २ रे शतक.

सारांश.—या लेखात 'अगिदेव' हे नांव आलेले आहे.

व्यक्तिनामे.—अगिदेव (अग्निदेव).

५५३. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पौनी येथे उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प. **पौनी एस्कॅव्हेशन**, १९७२, पृ. ४०, क्र. २६, २७, २८.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

वर्ष व तिथी.—लिपीच्या आधारे इ. स. पू. १ ले किंवा इ. स. २ रे शतक.

सारांश.—हे लेख अत्यंत त्रोटक आहेत.

५५४. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पौनी येथे उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प. **पौनी एस्कॅव्हेशन**, १९७२, पृ. ४१, क्र. २९.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख त्रोटक आहे, पण 'वनिय' म्हणजे कोणा व्यापाऱ्यांचा उल्लेख असावा.

५५५. पौनी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख पौनी येथे उत्खननात मिळाला.

संदर्भ.—देव, शां. भा. व जोशी, ज. प., **पौनी एस्कॅव्हेशन**, १९७२, पृ. ४१, क्र. ३०.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात गृहपति नंदन याचा पुत्र वलनक याची देणगी नमूद केली आहे.

व्यक्तिनामे.—(१) नंदन—गृहपति; (२) वलनक—दान देणारा नंदनाचा पुत्र.

५५६. पौनी ताम्रपट, वाकाटक प्रवरसेन (द्वितीय)

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट पौनी येथे श्री. रामचंद्र नारायण वाकडीकर यांच्या शेतात नांगरताना मार्च १९६७ मध्ये मिळाला.

संदर्भ.—(१) इं. अ. रि., १९६७–६८, पृ. ५५; (२) कोलते, व्ही. वी., इ. **आय.** १९६९, खंड ३८, भाग २, पृ. ५३–५६.

भाषा व लिपी.—संस्कृत; दक्षिणेकडील पेटिकाशीर्षक स्वरूपाची ब्राह्मी.

राजवंश व राजा.—वाकाटक नृपति प्रवरसेन (द्वितीय).

वर्ष व तिथी.—ज्येष्ठ कृष्ण तृतीया. प्रवरसेन (द्वितीय) चे ३२ वे शासन वर्ष.

सारांश.—या ताम्रपटाचा उद्देश प्रवरसेन (द्वितीय) याने अचलपुरातील कृष्णालेशालिकटक येथील राजमान्यतेनुसार ५० निवर्तनांची जमीन दुर्गार्य या बह्वृच, औपमन्य गोत्राच्या ब्राह्मणास दान दिली असल्याचे नमूद करण्याचा आहे. यात वाकाटकांची वंशावळ दिलेली आहे. ताम्रपटाच्या शेवटी शापात्मक वचने आलेली आहेत.

व्यक्तिनामे.—(१) प्रवरसेन (प्रथम)—वाकाटक नृपती; (२) गौतमीपुत्र—वाकाटक नृपती, प्रवरसेन (प्रथम) चा पुत्र; (३) रुद्रसेन (प्रथम)—वाकाटक नृपती, गौतमीपुत्राचा पुत्र; (४) पृथिवीसेन—वाकाटक नृपती, रुद्रसेन (प्रथम) चा पुत्र; (५) रुद्रसेन (द्वितीय) वाकाटक नृपती, पृथिवीसेनाचा पुत्र; (६) प्रभावती गुप्ता—रुद्रसेन (द्वितीय) ची पत्नी, गुप्त राजकन्या; (७) प्रवरसेन (द्वितीय)—वाकाटक नृपती, रुद्रसेन (द्वितीय)

चा पुत्र; (८) भवनाग-भारशिवांचा नृपती, गौतमीपुत्राचा मातामह; (९) माधण्ण—लेख लिहिणारा सेनापती; (१०) दुर्गार्य—दान स्वीकारणारा बह्वृच, औपमन्यव गोत्री ब्राह्मण.

ग्रामनामे.—(१) प्रवरपुर—वर्धा जिल्ह्यातील हल्लीचे पवनार; (२) अचलपुक(र)—अमरावती जिल्ह्यातील अचलपूर (एलिचपूर) असावे (३) कृष्णालेशालि—अचलपूरमधील मखादा भाग (कटक) असावा.

विशेष महत्त्व.—आतापर्यंत प्रवरसेन (द्वितीय) याचे २९ वे शासन वर्ष माहीत होते परंतु या ताम्रपटामुळे ३२ वे शासन वर्ष ज्ञात झाले.

५५७. पौनी स्तंभलेख, महाक्षत्रप रुपिअम्म

प्राप्तिस्थळ.—हा स्तंभलेख पौनी येथील श्री. मणिराम लांजेवार यांच्या शेतात मिळाला. सध्या हा स्तंभ नागपूरच्या सेंट्रल म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—मिराशी, वा. वि., **इ. आय.**, १९६८, खंड ३७, भाग ५, पृ. २०१–२०३; **न. वि. प.**, १९६५, खंड १६, क्र. १, पृ. १–४; **सं. मु.**, १९६६, सर ५, पृ. १००–१०५.

भाषा व लिपी.—प्राकृत; इ. स. २ च्या शतकातील ब्राह्मी.

राजवंश व राजा.—शक क्षत्रप रुपिअम्म.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात हा छायास्तंभ महाक्षत्रप (महारक्त) कुमार रुपिअम्म याच्या स्मरणार्थ उभारला असल्याचे सांगितले आहे.

व्यक्तिनामे.—कुमार रुपिअम्म—शक महाक्षत्रप.

ग्रामनामे.—उल्लेख नाही.

विशेष महत्त्व.—छाया खंभो (संस्कृत—छायास्तंभ) या शद्बाचा वापर सर्वप्रथम या स्तंभ-लेखात मिळतो.

५५८. प्रकाशे शिलालेख, यादव सिंघण

जिल्हा—**धुळे** तालुका—**शहादे**

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख प्रकाशे (प्रकाश) येथील श्री. प्रभाकर मास्तर यांच्या घराजवळ असलेल्या विहिरीच्या वरच्या बाजूस होता. लोकांच्या वर्दळीमुळे त्याच्यावरची अक्षरे बरीच पुसट झाली आहेत.

संदर्भ.—(१) सरकार, डी. सी. व सुब्रह्मण्यम्, **इ. आय.**, १९६५–६६, खंड ३६, पृ. १९–२२; (२) **ॲ. रि. इं. ए,** १९५४–५५, क्र. बी. ८९; (३) **इं. अ. रि.**, १९५४–५५, पृ. २९.

भाषा व लिपी.—संस्कृत, दक्षिणेकडील वळणाची नागरी.

राजवंश व राजा.—यादव नृपती सिंघण.

वर्ष व तिथी.—शके ११५६, विजय संवत्सर, इ. स. १२३३–३४.

सारांश.—या शिलालेखात हरदेव व महादेव या आत्रेय गोत्री ब्राह्मण भावांनी 'विक्रमार्क' हे सूर्यदेवाचे मंदिर बांधल्याचा उल्लेख आहे. हे मंदिर श्री. सिंघण महाराजांच्या कारकीर्दीत, सहस्रलिंग वैजूनायक मुख्य प्रधान असताना बांधून झाले.

व्यक्तिनामे.—(१) प्रभुवर—अत्रि ऋषींच्या कुळातील ब्राह्मण नृपती; (२) अभ्रश्याम-प्रभुवराचा पुत्र; (३) जगदेवप्रभु—अभ्रश्यामाचा पुत्र; (४) सिद्धिप्रभु—जगदेवप्रभुचा पुत्र; (५) वैद्यनाथ—जगदेवप्रभुचा नातू; (६) देवल—वैद्यनाथाचा पुत्र; (७) हरदेव—मंदिर बांधणारा देवलचा पुत्र; (८) महादेव—मंदिर बांधणारा देवल याचा पुत्र; (९) सिंघण—यादव नृपती; (१०) सहस्त्रलिंग वैजूनायक–सिंघणाचा मुख्य प्रधान (Viceroy).

ग्रामनामे.—प्रकाशा—येथे विक्रमार्क हे सूर्य मंदिर बांधले.

विशेष महत्त्व.— या लेखात सहस्त्रलिंग वैजूनायक या मुख्य प्रधानाचा (Viceroy) उल्लेख प्रथमच मिळतो.

५५९. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, खरोष्ठी शिलालेख, अशोक

प्राप्तिस्थळ.—हा लेख एका कटोऱ्याच्या काठावर कोरलेला आहे. हा कटोरा गांधार प्रदेशात (सध्या पाकिस्तान) सापडला. सध्या मुंबई येथे प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—इं. अ. रि., १९६२–६३, पृ. ५२, नं. ३१.

भाषा व लिपी.—पालि; खरोष्ठी.

राजवंश व राजा.—मौर्य नृपती अशोक.

वर्ष व तिथी.—इ. स. पू. ३ रे शतक.

सारांश.—या लेखात अशोकाच्या शहाबाजगढी येथे सापडलेल्या ७ व्या शिलाशासनाचा (Rock edict) मजकूर आहे.

५६०. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, ताम्रपट, धरसेन (द्वितीय)

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, मुंबई येथे आहे.

संदर्भ.—आचार्य, जी. व्ही., **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १९२५, खंड १ (न्यू. सि.) पृ. ६६–६९.

राजवंश व राजा.—वलभीचा मैत्रक नृपती धरसेन (द्वितीय).

वर्ष व तिथी.— गुप्त संवत्, २७० माघ शुद्ध १०, इ. स. ५९०.

सारांश.—हा लेख धरसेन (द्वितीय) याच्या अमदानीतील असून सुराष्ट्र प्रांतातील सुदत्त भट्टानक जवळील उट्टपालक हे गाव बुद्ध मूर्तीची पूजा, भिक्षूंना अन्न, वस्त्र, औषधी पुरविणे व विहाराची दुरुस्ती या कार्यासाठी दान दिल्याचे यात नमूद केले आहे. या प्रसंगी सामंत शीलादित्य हा दूतक होता व दिविरपति स्कंदभट हा लेखक होता.

व्यक्तिनामे.—(१) धरसेन (द्वितीय)—मैत्रक नृपती; (२) सामंत शीलादित्य—दूतक; (३) दिविरपति स्कंदभट—लेखक.

ग्रामनामे.—(१) सुदत्त भट्टानक—ओळख पटत नाही; (२) उट्टपालक—ओळख पटत नाही.

५६१. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, भद्रेणियक ताम्रपट, शीलादित्य (१ ला)

प्राप्तिस्थळ.—सध्या प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये असलेला हा ताम्रपट विश्वस्त मंडळाने जी. डी. कुन्हा यांच्या पत्नीजवळून विकत घेतला.

संदर्भ.—बानर्जी, आर. डी., **इ. आय.**, १९३१–३२, खंड २१, पृ. ११६–११९.

भाषा व लिपी.—संस्कृत, इ. स. ७ व्या शतकातील उत्तरेकडील.

राजवंश व राजा.—मैत्रक नृपती शीलादित्य (१ ला).

वर्ष व तिथी.—चैत्र शुद्ध १४, २९२ गुप्त संवत्, इ. स. ६१०–११.

सारांश.—हा ताम्रपट शीलादित्य (प्रथम)च्या अमदानीतील असून त्याच्या देवीसरस येथील विजयी तळावरून दिलेला आहे. याचा मुख्य उद्देश बार–वनस्थळी विभागातील भद्रेणियक गावातील २०० पादावर्त जमीन त्या गावातील सूर्य मंदिराची व्यवस्था, दुरुस्ती व देवतेच्या पूजेसाठी दान दिल्याचे नमूद करणे हा होता. हे शासन सांधिविग्रहाधिकृत दिविरपति वत्रभट्टि याने लिहिले व खरग्रह हा दूतक होता.

व्यक्तिनामे.—(१) गुहसेन—मैत्रक नृपती; (२) धरसेन—मैत्रक नृपती; गुहसेनाचा पुत्र; (३) शीलादित्य (१ ला)—मैत्रक नृपती, धरसेनाचा पुत्र; (४) दिविरपति वत्रभट्टि—लेख लिहिणारा सांधिविग्रहिक; (५) खरग्रह—दूतक; (६) प्रभंदत—दान दिलेल्या जमिनीच्या पश्चिमेस असलेल्या जमिनीचा मालक; (७) रुद्र—दान दिलेल्या जमिनीच्या उत्तरेस असलेल्या जमिनीचा मालक.

ग्रामनामे.—(१) देवीसरस; (२) भद्रेणियक; (३) बार–वनस्थली; (४) बारटिका दंडक; (५) गोप्परवाटक. कोणत्याही गावाची ओळख पटत नाही.

५६२. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ताम्रपट, ध्रुवसेन (द्वितीय)

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट सध्या मुंबई येथे प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—आचार्य, जी. व्ही., **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १९२५, खंड १ (न्यूसि.), पृ. ६९–७०.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—मैत्रक नृपती ध्रुवसेन (द्वितीय).

वर्ष व तिथी.—३१२ गुप्त संवत्, ज्येष्ठ शुद्ध ४; इ. स. ६३२.

सारांश.—या शासनाचा मुख्य उद्देश खेटहार विषयातील हस्तिकपल्लिका या गावातील सारसकेदार नामक शेत गिरिनगरहून आलेल्या व खेटक येथे राहणाऱ्या भारद्वाज गोत्री स्कंदवसु याचा पुत्र मात्राकाल याला दान दिले हे नमूद करणे हा होता. सामंत शीलादित्य हा दूतक होता व संधिविग्रहिक दिविरपति वत्रभट्टि याने शासन लिहिले.

व्यक्तिनामे.—(१) ध्रुवसेन (द्वितीय)—मैत्रक नृपती; (२) मात्राकाल—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री छांदोग्य शाखीय ब्राह्मण; (३) स्कंदवसु—मात्राकालाचा पिता; (४) शीलादित्य–दूतक सामंत; (५) दिविरपति वत्रभट्टि—लेख लिहिणारा सांधिविग्रहिक.

ग्रामनामे.—(१) गिरिनगर—गिरनारच्या पायथ्याशी सध्याच्या जुनागढच्या ईशान्येस असलेले गाव; (२) खेटक—गुजराथमधील कैरा; (३) हस्तिक पल्लिका—ओळख पटत नाही. (४) कोणकपथक—खेटकविषयाचा एक भाग.

५६३. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ताम्रपट, शीलादित्य (तृतीय)

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट सध्या मुंबई येथे प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—आचार्य, जी. व्ही., **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १९२५, खंड १ (न्यू सि.), पृ. ७१–७२.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—वलभीचा मैत्रक नृपती शीलादित्य (तृतीय).

वर्ष व तिथी.—३४६ गुप्त संवत, मार्गशीर्ष वद्य ३; इ. ६६६.

सारांश.—हा ताम्रपट शीलादित्य (तृतीय) याच्या अमदानीतील असून त्याच्या विजयी तळावरून दिलेला आहे. या शासनाचा उद्देश वलभीच्या गार्ग्यगोत्री चतुर्वेदी ब्राह्मण श्रीधर-दत्ताचा पुत्र यज्ञदत्त याला सुराष्ट्रातील कलाक्ष्येटक उपविभागातील पद्मवटिका गावातील दोन शेते व दोन पायविहिरी राजाने दान दिल्या हे नमूद करणे हा होता. राजपुत्र ध्रुवसेन हा दूतक होता व दिविरपति अनहिल हा लेखक होता.

व्यक्तिनामे.—(१) शीलादित्य (तृतीय)—मैत्रक नृपती; (२) ध्रुवसेन—राजपुत्र; (३) यज्ञदत्त—दान स्वीकारणारा गार्ग्य गोत्री छांदोग्य शाखी ब्राह्मण; (४) श्रीधरदत्त–यज्ञदत्ताचा पिता, चतुर्वेदी ब्राह्मण; (५) दिविरपति अनहिल–शासनाचा लेखक; (६) दिविरपति स्कंदभट–लेखकाचा पिता; (७) गोपदिन्न—ब्राह्मण; (८) रट्टक—ब्राह्मण; (९) मातृशर्मन्—ब्राह्मण; (१०) सरस्वती—ब्राह्मण.

ग्रामनामे.—(१) पद्मवाटिका; (२) कलाक्ष्येटक; (३) देवकुलपाटक ग्राम; (४) (बाल्ह) आरणक ग्राम; (५) आनंदपुर; (६) हस्तवप्रहार ग्राम; (७) खेटक–प्रद्रक ग्राम; (८) संतापुत्रग्राम या गावांची ओळख पटत नाही; (९) वलभी—सध्याचे वलभी.

५६४. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ताम्रपट शीलादित्य (तृतीय)

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत ताम्रपट सध्या मुंबई येथे प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—आचार्य, जी. व्ही., **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १९२५, खंड १ (न्यू. सि.), पृष्ठ ७३–७४.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—मैत्रक नृपती शीलादित्य (तृतीय).

वर्ष व तिथी.—३४६ गुप्त संवत्, पौष शुद्ध ७; इ. स. ६६६.

सारांश.—या लेखाचा उद्देश राजाने तीन वेगवेगळ्या व्यक्तींना दिलेली दाने कायम करणे हा होता. कुशन्हद्र येथून आलेला भारद्वाज गोत्री दत्तुलिक याचा पुत्र सोम, गिरिनगरहून आलेला सिंघपूरवासी, वत्सगोत्री ब्राह्मण भट्टिहरी याचा पुत्र पिट्टलेश्वर व त्याचा पुत्र नाग या तीन ब्राह्मणांना सुराष्ट्रातील हस्तवप्राहारातील डच्चाणक ग्रामातील ८० पादावर्त जमीन व वातनुमक गावातील ५० पादावर्त जमीन पायविहिर ब्रह्मदाय म्हणून दिली.

व्यक्तिनामे.—(१) शीलादित्य (तृतीय)—मैत्रक नृपती; (२) सोम—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (३) दत्तुलिक—सोमाचा पिता; (४) पिट्टलेश्वर–दान स्वीकारणारा वत्स गोत्री ब्राह्मण; (५) भट्टिहरि–पिट्टलेश्वराचा पिता; (६) नाग—दान स्वीकारणारा वत्स गोत्री ब्राह्मण, पिट्टलेश्वराचा पुत्र; (७) ध्रुवसेन—दूतक राजपुत्र; (८) दिविरपति अनहिल—लेखक; (९) दिविरपति स्कंदभट—दिविरपति अनहिलाचा पिता, महासंधिविग्रहिक.

ग्रामनामे.—(१) डच्चाणक; (२) कुशह्रद; (३) सिंघपूर; (४) वातनुमक; (५) भटिकाग्राम या गावांची ओळख पटत नाही; (६) वलभी—सध्याचे वलभी; (७) गिरिनगर—सध्याचे गिरनार.

५६५. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ताम्रपट, दद्द (तृतीय)

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट मुंबई येथे प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—(१) चक्रवर्ती, एस. एन. **इ. आय्.**, १९४७–४८, खंड २७, पृ. १९७–२०१; (२) मिराशी, वा. वि., **कॉ. इं. इं.**, १९५५, खंड ४, भाग २, पृ. ६१७–६२२.

भाषा व लिपी.—संस्कृत, दाक्षिणात्य लिपीचा पश्चिमेकडील प्रकार.

राजवंश व राजा.—गुर्जर नृपती दद्द (तृतीय) अथवा बाहुसहाय.

वर्ष व तिथी.—माघ शुद्ध ७, वर्ष ४२७ कलचुरि संवत्, २९ डिसेंबर, इ. स. ६७५.

सारांश.—हा ताम्रपट दद्द (तृतीय) याच्या अमदानीतील आहे. याचा मुख्य उद्देश राजाने भारद्वाज गोत्री ब्राह्मण गंगादित्याच्या मुलाला कोरेल्ल ८४ मधील उवरिवद्र हे गाव रथ-सप्तमीच्या दिवशी दान दिले हे नमूद करणे हा होता. हे शासन दुर्गभटाचा पुत्र महासांधि-विग्रहाधिपति संगुल्ल याने लिहिले.

व्यक्तिनामे.—(१) दद्द (द्वितीय)—गुर्जर नृपती; (२) जयभट (द्वितीय)—गुर्जर नृपती, दद्द (द्वितीय) चा पुत्र; (३) दद्द (तृतीय)—गुर्जर नृपती, जयभट (द्वितीय) चा पुत्र; (४) गंगादित्य—दान स्वीकारणाऱ्या ब्राह्मणाचा पिता, भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (५) दुंदुभीभट्ट—गंगादित्याचा पिता; (६) संगुल्ल—शासनाचा लेखक, महासांधिविग्रहाधिपती; (७) दुर्गभट—संगुल्लाचा पिता;

ग्रामनामे.—(१) भरुकच्छ—हल्लीचे भडोच; (२) कोरेल्ल—नर्मदेच्या दक्षिण तीरावरील कोरल असावे; (३) उवरिवद्र—भडोचच्या दक्षिणेस आठ मैलांवरील उमरवारा असावे; (४) सावत्थी—उमरवाराच्या आग्नेयेस ८ मैलांवरील सावा?

५६६. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ताम्रपट, शीलादित्य (४ था)

प्राप्तिस्थळ.—सध्या हा ताम्रपट प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—आचार्य, जी. व्ही., **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १९२५, खंड १, (न्यू. सि.), पृ. ७५

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—मैत्रक नृपती शीलादित्य (४ था).

वर्ष व तिथी.—मार्गशीर्ष शुद्ध ६, ३८१ गुप्त संवत्, इ. स. ७०१.

सारांश.—हा ताम्रपट शीलादित्य (४ था) याच्या वेळचा असून याचा मुख्य उद्देश आनंदपूरहून आलेला वलभी निवासी ब्राह्मण बालादित्य याला एक गाव (नाव वाचता येत नाही) दान दिले हे नमूद करणे हा होता. राजपुत्र धरसेन हा दूतक होता व दिविरपति हरगण याचा दत्तक पुत्र दिविरपति आदित्याल (?) · · · · · याने हे शासन लिहिले.

व्यक्तिनामे.—(१) शीलादित्य (४ था)—मैत्रक नृपती; (२) धरसेन—दूतक, राजपुत्र; (३) बालादित्य—दान स्वीकारणारा ब्राह्मण; (४) दिविरपति आदित्याल (?)—शासन लिहिणारा, दिविरपति हरगणाचा दत्तक पुत्र; (५) दिविरपति हरगण—लेखकाचा पिता.

ग्रामनामे.—(१) वलभी; (२) आनंदपुर—ओळख पटत नाही.

५६७. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ताम्रपट, जयभट

प्राप्तिस्थळ.—इ. स. १९२० मध्ये हा ताम्रपट बॉम्बे ब्रँच ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटीने प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, मुंबई येथे ठेवावयास दिला.

संदर्भ.—(१) आचार्य, जी. व्ही., इ. आय्., १९३५–३६, खंड २३, पृ. १४७; (२) मिराशी, वा. वि., कॉ. इं. इं., १९५५, खंड ४, भाग १, पृ. १०२–१०९.

भाषा व लिपी.—संस्कृत, दाक्षिणात्य वळणाची पश्चिमेकडील प्रकारची.

राजवंश व राजा.—गुर्जर नृपती जयभट.

वर्ष व तिथी.—अश्विन वद्य १५, वर्ष ४८६ चेदि संवत्; ९ ऑक्टोबर, इ. स. ७३६.

सारांश.—प्रस्तुत शासन गुर्जर नृपती जयभट (४ था) याच्या अमदानीतील आहे. या शासनाचा मुख्य उद्देश कौंडिण्य गोत्री, हेटावुक वर्गाच्या आदित्यनागाचा पुत्र ब्राह्मण उच्चड (आच्चड) याला भरुकच्छ विषयातील मन्नाथ हे गाव राजाने दान दिले हे नमूद करणे हा होता. दान स्वीकारणारा ब्राह्मण लोहिगकक्ष आहारातून स्थलांतरित झालेला होता. या प्रसंगी देइयक हा दूतक होता व बलाधिकृत अल्लचा पुत्र महाबलाधिकृत संगुल्ल हा या शासनाचा लेखक होता.

व्यक्तिनामे.—(१) दद्द (द्वितीय)—गुर्जर नृपती; (२) जयभट (द्वितीय)—गुर्जर नृपती, दद्द (द्वितीय) चा पुत्र; (३) दद्द (तृतीय) बाहुसहाय—गुर्जर नृपती, जयभट (द्वितीय) चा पुत्र; (४) जयभट (तृतीय)—गुर्जर नृपती, बाहुसहायचा पुत्र; (५) अहिरोल—गुर्जर नृपती, जयभट (तृतीय) चा पुत्र; (६) जयभट (४ था)—गुर्जर नृपती, अहिरोलचा पुत्र; (७) उच्चड (आच्चड)—दान स्वीकारणारा वाजसनेयी कौंडिण्य गोत्री ब्राह्मण, माध्यंदिन शाखा; (८) आदित्यनाग—उच्चड (आच्चड) चा पिता; (९) संगुल्ल—शासनाचा लेखक, महाबलाधिकृत; (१०) अल्ल—संगुल्लचा पिता, बलाधिकृत; (११) देइयक—दूतक.

ग्रामनामे.—(१) भरुकच्छ—हल्लीचे भडोच; (२) मन्नाथ—भडोचच्या उत्तरेस २५ मैलांवरील मग्नाथ असावे (मिराशी). आचार्य यांच्या मते हे नर्मदा नदीच्या उत्तर तीरावरील मेहेगावच्या ईशान्येस दीड मैलांवर असलेले मनाद असावे; (३) लोहिकक्ष—ओळख पटत नाही.

५६८. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ताम्रपट, गुजराथ राष्ट्रकूट ध्रुव (द्वितीय)

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट सध्या मुंबई येथे प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—अळतेकर, ए. एस्., इ. आय्., १९३३–३४, खंड २२, पृ. ६४–७६.

भाषा व लिपी.—संस्कृत; तत्कालीन देवनागरी.

राजवंश व राजा.—गुजराथचा राष्ट्रकूट नृपती ध्रुव (द्वितीय).

वर्ष व तिथी.—मार्गशीर्ष शुद्ध २, शके ८०६, २३ नोव्हेंबर, इ. स. ८८४ (अनियमित).

सारांश.—प्रस्तुत शासन राष्ट्रकूट नृपती ध्रुव (द्वितीय) याच्या अमदानीतील आहे याचा मुख्य उद्देश राजाने कांतारग्राम जिल्ह्यातील कांपिल्य येथील बुद्ध विहाराला धडयासह हे गाव दान दिले हे नमूद करणे हा होता. हे शासन महासांधिविग्रहाक्षपटलाधिपति श्री. दींद याने लिहिले.

व्यक्तिनामे.—(१) गोविंद (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती; (२) कर्कराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, गोविंद (प्रथम) चा पुत्र; (३) इंद्रराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, कर्कराज (प्रथम) चा पुत्र; (४) दंतिदुर्ग—राष्ट्रकूट नृपती, इंद्रराज (प्रथम) चा पुत्र; (५) कृष्णराज—राष्ट्रकूट नृपती, दंतिदुर्गाचा चुलता; (६) गोविंदराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, कृष्णराजाचा पुत्र; (७) ध्रुवराज–राष्ट्रकूट नृपती, गोविंदराज (द्वितीय) चा धाकटा भाऊ; (८) गोविंदराज (तृतीय)—राष्ट्रकूट नृपती, ध्रुवराजाचा पुत्र; (९) शर्व अमोघवर्ष (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, गोविंदराज (तृतीय) चा पुत्र; (१०) इंद्रराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, अमोघवर्ष (प्रथम) चा

चुलता; (११) कर्कराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, इंद्रराज (द्वितीय)चा पुत्र; (१२) अमोघवर्ष (द्वितीय)—कर्कराज (द्वितीय) चा भाऊ; (१३) ध्रुवराज (प्रथम)—गुजराथचा राष्ट्रकूट नृपती; (१४) अकालवर्ष कृष्ण (द्वितीय), शुभतुंग—राष्ट्रकूट नृपती, ध्रुवराज (प्रथम)चा पुत्र; (१५) ध्रुव (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, दान देणारा, अकालवर्षाचा पुत्र; (१६) श्रीहर्ष—दंतिदुर्गाने जिंकलेला नृपती; (१७) वज्रट—दंतिदुर्गाने जिंकलेला नृपती; (१८) राहप्प—कृष्ण (प्रथम) ने जिंकलेला चालुक्य राजा; (१९) कर्कराज—ध्रुव (द्वितीय) चा पुत्र, दूतक; (२०) दींद—लेख लिहिणारा महासांधिविग्रहाक्षपटलाधिपती; (२१) अवलोकित—दींदाचा पिता; (२२) स्थिरमति—दानासाठी विनंती करणारा भिक्षु.

ग्रामनामे.—(१) कांपिल्य—मिंधोला नदीच्या दक्षिण तीरावरील कपील; (२) कांतारग्राम—सध्याचे सुरतजवळील कतरग्राम; (३) धडयासह—नवसारी जिल्ह्यांत महुआ तालुक्यातील धुंडेसा; (४) लिंगतडागिका—शंकर तलौरी; (५) पधमश्टण—पथरोण; (६) वडवल्ली—वलोद; (७) श्रीखेणक (श्रीखेटक)—सध्याचे कैरा; (८) कवरिका—ओळख पटत नाही; (९) सुहिला— ओळख पटत नाही. (१०) मद्दापी नदी–सुरत जिल्ह्यातील मिंधोला नदी.

५६९. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम सलप्राक ताम्रपट, शिलाहार छडवैदेव

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमच्या विश्वस्त मंडळाने श्री. कुन्हा यांच्या पत्नीजवळून विकत घेतला.

संदर्भ.—प्रो.रि.अ.स.वे.स., १९१९–२०, पृ. ५५–५६.

भाषा व लिपी.—संस्कृत.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती कृष्णराज (तृतीय) याचा मांडलिक शिलाहार महासामंत छडवैदेव.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही. अंदाजे इ. स. १० व्या शतकाचा उत्तरार्ध.

सारांश.—या शासनाचा प्रमुख उद्देश सालाद विषयातील सलप्राक गावातील काही जमीन काश्यप गोत्री ब्राह्मण चाडदेवभट्ट याला दान दिली हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) दंतिदुर्ग—राष्ट्रकूट नृपती; (२) कृष्णराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, दंतिदुर्गाचा चुलता; (३) गोविंदराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, कृष्णराज (प्रथम) चा पुत्र; (४) निरुपम—राष्ट्रकूट नृपती, गोविंदराज (द्वितीय) चा धाकटा भाऊ; (५) जगत्तुंग— राष्ट्रकूट नृपती, निरुपमाचा पुत्र; (६) अमोघवर्ष (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, जगत्तुंगाचा पुत्र; (७)अकालवर्ष—राष्ट्रकूट नृपती, अमोघवर्ष (प्रथम) चा पुत्र; (८)इंद्रराज (तृतीय)—राष्ट्रकूट नृपती, अकालवर्षाचा नातू; (९) गोज्जिग—राष्ट्रकूट नृपती, इंद्रराज (तृतीय) चा पुत्र; (१०)कृष्णराज (तृतीय)—राष्ट्रकूट नृपती, गोज्जिगचा पुत्र; (११)कपर्दी (प्रथम)—शिलाहार नृपती; (१२) पुल्लशक्ति—शिलाहार नृपती, कपर्दी (प्रथम) चा पुत्र; (१३) कपर्दी (द्वितीय)—शिलाहार नृपती, पुल्लशक्तिचा पुत्र; (१४) वप्पुवन—शिलाहार नृपती, कपर्दी (द्वितीय) चा पुत्र; (१५) झंझ—शिलाहार नृपती, वप्पुवनाचा पुत्र; (१६) गोग्गि—शिलाहार नृपती, झंझाचा धाकटा भाऊ; (१७) छडवैदेव—शिलाहार नृपती, गोग्गीचा पुत्र; (१८) वज्जडदेव—शिलाहार नृपती, छडवैदेवाचा मोठा भाऊ; (१९) चाडदेवभट्ट—दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण.

ग्रामनामे.—(१) सलप्राक; (२) जह्णुपूर या गावांची ओळख पटत नाही.

५७०. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ताम्रपट, मुम्मुणिराज, शके ९७१

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, मुंबई येथील पुरातत्त्व विभागाच्या व्यवस्थापकाला एका हसन रझाक नामक मुसलमान गृहस्थांनी आणून दिला. सध्या हा ताम्रपट प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, मुंबई, येथे आहे.

संदर्भ.—(१) उपाध्याय, एस्. सी., इ. आय्., १९३९–४०, खंड २५, पृ. ५३–६३.

भाषा व लिपी.—संस्कृत; लिपी शिलाहारांच्या इतर लेखाप्रमाणे.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती मुम्मुणिराज.

वर्ष व तिथी.—शुक्रवार, भाद्रपद शुद्ध १५, शके ९७१, मंगळवार, १५ ऑगस्ट, इ. स. १०४९.

सारांश.—प्रस्तुत शासनाचा मुख्य उद्देश राजाने मंदरज जिल्ह्यातील किइञ्छित हे गाव १२ ब्राह्मणांना दान दिले हे नमूद करणे हा होता. यावेळेस श्री. दद्दपैय हा महासामंत होता व श्री. विठ्ठपैय हा महासांधिविग्रहिक होता. या शासनाचा लेखक नागलैय होता.

व्यक्तिनामे.—(१) कपर्दिन् (प्रथम)–शिलाहार नृपती; (२) पुलशक्ति–शिलाहार नृपती, कपर्दिन् (प्रथम) चा पुत्र; (३) लघुकपर्दिन्—शिलाहार नृपती, पुलशक्तीचा पुत्र; (४) वप्पुवन्न—शिलाहार नृपती, लघुकपर्दिन् याचा पुत्र; (५) झंझ—शिलाहार नृपती, वप्पुवन्नाचा पुत्र; (६) गोग्गिराज—शिलाहार नृपती, झंझाचा धाकटा भाऊ; (७) वज्जडदेव (प्रथम)—शिलाहार नृपती, गोग्गिराज याचा पुत्र; (८) अपराजित—शिलाहार नृपती, वज्जडदेव (प्रथम) चा पुत्र; (९) वज्जडदेव (द्वितीय)—शिलाहार नृपती, अपराजिताचा पुत्र; (१०) अरिकेसरिन्—शिलाहार नृपती, वज्जडदेव (द्वितीय) चा भाऊ; (११) छित्तराज—शिलाहार नृपती, वज्जडदेव (द्वितीय) चा पुत्र; (१२) नागार्जुन—शिलाहार नृपती, छित्तराजाचा धाकटा भाऊ; (१३) मुम्मुणिराज—दान देणारा शिलाहार नृपती, नागार्जुनाचा धाकटा भाऊ; (१४) गोम्म; (१५) अत्रपदेव; (१६) भिल्लम; (१७) अम्म; (१८) मणवुव—(१४) ते (१८) या ताम्रपटात उल्लेखिलेले इतर राजे; (१९) दद्दपैय—महासामंत; (२०) विठ्ठपैय—महासांधिविग्रहिक; (२१) नागलैय—शासनाचा लेखक; दान स्वीकारणाऱ्या ब्राह्मणांची नावे.—हे ब्राह्मण गौड, (मुंजस्थान) मध्यप्रदेश व (भृगुकच्छ) लाट येथून आलेले होते.

ब्राह्मणाचे नाव	पित्याचे नाव	गोत्र	शाखा
(२२) कोको पंडित	(२३) पितामह पंडित	शांडिल्य	कौथुम
(२४) देवधर दीक्षित	(२५) यज्ञ दीक्षित	वत्स	बह्वृच
(२६) दामोदर	(२७) केसैय्या दीक्षित	भारद्वाज	माध्यंदिन
(२८) सूदनैय	(२९) सोमेश्वर उपाध्याय	भार्गव	बह्वृच
(३०) दामोदर	(३१) सूदन दीक्षित	उपमन्यु	बह्वृच
(३२) नारायण उपासनी	(३३) दामोदर उपाध्याय	आत्रेय	राणायनी
(३४) श्रीपति अग्निहोत्री	(३५) केशव उपाध्याय	कुशिक	बह्वृच
(३६) श्रीपति भट्ट	(३७) दुर्गैय उपासनी	आत्रेय	बह्वृच
(३८) कनकेश्वर	(३९) वेलादित्य उपाध्याय	जमदग्नि	बह्वृच
(४०) वेलैय उपासनी	(४१) दीघैया अग्निहोत्री	आत्रेय	बह्वृच
(४२) सर्वदेवैय	(४३) ईश्वर उपाध्याय	लोकाक्ष	यज्ञ(?)
(४४) विठ्ठपैय उपाध्याय	(४५) सोढलैय उपाध्याय	आत्रेय	बह्वृच

ग्रामनामे.—(१) मंदरज; (२) एनर; (३) नोम्बा; (४) मातरग्राम; (५) किइञ्छितग्राम; (६) मुंजस्थान, मध्यदेश. या गावांची ओळख पटत नाही.

५७१. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम शिलालेख, महासामंत इंद्रकेशि

प्राप्तिस्थळ.—सध्या हा शिलालेख मुंबई येथे प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—शर्मा, इं. हि. क्वा., १९३२, खंड ८, पृ. ५३५–५४१.

भाषा व लिपी.—संस्कृत; कन्नड.

राजवंश व राजा.—चालुक्य वंशीय नृपती त्रैलोक्यमल्लदेव व त्याचा मांडलिक महासामंत मणलेर वंशीय इंद्रकेशि.

वर्ष व तिथी.—उत्तरायण संक्रांती, व्यतिपात, पौष पौर्णिमा, शार्वरि संवत्सर, आदित्यवार, शक संवत् ९८२; इ. स. १०६०.

सारांश.—प्रस्तुत शासनाचा मुख्य उद्देश महासामंत इंद्रकेशीने दंडनायक मौलरस याच्या शासनाखाली असलेल्या पुरिकर नाड मधील चंडिवाडी येथील ४२ महाजनांना बोलावून त्यांना १२ मत्तर जमीन, आणखी काही जमीन, पिण्याच्या पाण्याची विहीर, व १२ ब्राह्मणांना भोजन देणारे अन्नछत्र ठेवण्याकरता एक घर दान दिले हे नमूद करणे हा होता. याशिवाय त्याने भरसूरि या जैन उपासकालाही काही देणग्या दिल्याचे नमूद केले आहे. हे शासन कल्लोज याने कोरलेले आहे.

व्यक्तिनामे.—(१) त्रैलोक्यमल्लदेव—चालुक्य नृपती; (२) जयकेशि (प्रथम)—मणलेर वंशीय महासामंत; (३) इंद्रकेशि—दान देणारा मणलेर वंशीय महासामंत; (४) जयकेशि (द्वितीय)—इंद्रकेशीला मदत करणारा पुत्र; (५) कब्बरसि—इंद्रकेशीची राणी; (६) मौलरस—दंडनायक; (७) आयुबिसेट्टि—सभामंडप बांधणारा; (८) भरसूरि—दान स्वीकारणारा जैन उपासक; (९) कल्लोज—शासन कोरणारा.

ग्रामनामे.—(१) पुरिकरदेश—धारवाड जिल्ह्यातील हल्लीचे लक्ष्मेश्वर; (२) सिग्गावे—धारवाड जिल्ह्यातील हल्लीचे शिग्गाव; (३) चंडिवाडी—ओळख पटत नाही; (४) मान्यगेरि—ओळख पटत नाही.

५७२. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ताम्रपट, मैत्रक ध्रुवसेन (१ ला)

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट प्रथम रॉयल एशियाटिक सोसायटी, मुंबई येथे होता. सध्या हा लेख मुंबई येथील प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—आचार्य, जी. व्ही., ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो., १९२५, खंड १ (न्यू. सि.), पृ. ६५–६६.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—मैत्रक नृपती ध्रुवसेन (१ ला).

वर्ष व तिथी.—गुप्त—वलभी संवत् २१०, भाद्रपद वद्य १३; इ. स. ५३०.

सारांश.—हा ताम्रपट मैत्रक ध्रुवसेन (१ ला) याच्या अमदानीतील आहे. या लेखात ध्रुवसेनाने भद्रेणिका गावाच्या आग्नेय सीमेजवळ २०० पादावर्त जमीन हस्तवप्रचा रहिवासी भार्गव गोत्री ब्राह्मण गुहभट्टि याला दान दिल्याचे नमूद केले आहे. हे शासन किक्कक याने लिहिले असून रुद्रधर हा दूतक होता.

व्यक्तीनामे.—(१) ध्रुवसेन—दान देणारा मैत्रक राजा; (२) गुहभट्टि—दान स्वीकारणारा भार्गव गोत्री, ऋग्वेदी ब्राह्मण; (३) रुद्रधर—दूतक; (४) किक्कक—शासनाचा लेखक.

ग्रामनामे.—(१) हस्तवप्र—गोघाच्या दक्षिणेस ६ मैलांवरील हाथब असावे; (२) भद्रेणिका—ओळख पटली नाही; (३) नट्टकपुत्र—ओळख पटली नाही; (४) वलभी—काठेवाडमधील वला असावे.

५७३. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ठाणें शिलालेख, शिलाहार अपारदित्य (द्वितीय)

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख कोठे सापडला हे निश्चित सांगता येत नाही. सध्या हा शिलालेख मुंबई येथे प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—(१) इंग्रजी, **बॉ. गॅ.**, खंड १, भाग २, पृ. २०, नोंद २; (२) डिसकळकर, द. बा., **अ. भा. रि. इ.**, खंड ५, पृ. १६९–१७०; (३) सांकलिया व उपाध्याय, **इ. आय्.**, १९३५–३६, खंड २३, पृ. २७७–२७८, नं. ४३; (४) तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.**, १९६३, पृ. ७७–७९, नं. १५.

भाषा व लिपी.—संस्कृत-मराठी संमिश्र, देवनागरी, इ. स. १२ वे शतक.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती अपरादित्य (द्वितीय).

वर्ष व तिथी.—रविवार, चैत्र शुद्ध १५, विश्वावसु संवत्सर, शके ११०७; ७ मार्च, इ. स. ११८५.

सारांश.—हा लेख अपरादित्य याच्या अमदानीतील असून महामात्य भास्कर नायकाचा पुत्र लक्ष्मण नायक याने सोमनाथाच्या पूजेसाठी स्थानकीय पाटन येथील शेताच्या उत्पन्नातील ४ द्रम्म काही विशिष्ट कालाकरता व भाताच्या शेताच्या उत्पन्नातील २८ द्रम्म देणगी दिल्याचे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) चाहडदेव—दान स्वीकारणारा; (२) अपरादित्यदेव—शिलाहार नृपती; (३) लक्ष्मण नायक—दान देणारा; (४) भास्कर नायक—लक्ष्मण नायकाचा पिता, महामात्य.

ग्रामनामे.—स्थानकीय पाटन—सध्याचे ठाणे.

५७४. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ताम्रपट, सोमेश

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट सर वॉल्टर इलियटच्या संग्रहालयात आहे. याचे ठसे मुंबई येथे प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहेत.

संदर्भ.—इं. अ. रि., १९६२–६३, पृ. ५२, नं. ३२.

भाषा व लिपी.—संस्कृत, तामीळ, इ. स. १२ व्या शतकातील ग्रंथ लिपी.

राजवंश व राजा.—सोमेश.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. १२ वे शतक.

सारांश.—जेव्हा वैदुंब गंडदेव महाराज रायिदेव पुत्र सोमेश याच्या आधिपत्याखाली अण्डप्पूरहून राज्य करीत होता तेव्हा रायिदेवाचा पुतण्या अल्लुगंग याने चितकामन्त ऊर्फ रायरपूरम् हे गाव पेरुमाळ् सोमयाजी भट्टाला दान दिले असे या लेखात नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) अल्लुगंग—दान देणारा; (२) रायिदेव—अल्लुगंगचा मामा; (३) गंडदेव—अण्डप्पूरचा वैदुंब वंशीय नृपती; (४) सोमेश—राइदेवाचा पुत्र; (५) पेरुमाळ् सोमयाजी भट्ट—दान स्वीकारणारा ब्राह्मण.

५७५. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम शिलालेख, जयकेशि (तृतीय)

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत शिलालेख सध्या मुंबई येथील प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—शर्मा, बी. सी. एस., **ज. इं. हि.**, १९३१, खंड १०, पृ. २–९.

भाषा व लिपी.—कानडी; इ. स. १२ व्या शतकातील कानडी लिपी.

राजवंश व राजा.—चालुक्य नृपती त्रिभुवनमल्लदेव व त्याचा मांडलिक गोव्याचा कदंब नृपती जयकेशी (तृतीय).

वर्ष व तिथी.—रविवार, पौष वद्य ११, काळयुक्ति संवत्सर, शासन वर्ष १२ वे, कलियुग ४२८८; इ. स. १२००.

सारांश.—या शिलालेखाचा मुख्य उद्देश एलेय पूर्वल्लि येथील २०० महाजनांनी सेणिगेश्वराला काही जमीन दान दिली हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) त्रिभुवनमल्ल—चालुक्य नृपती; (२) जयकेशी—कदंब नृपती.

ग्रामनामे.—(१) हलसिगे १२,०००—हल्लीचे हलसिगे; (२) एलेय पूर्वल्लि—हल्लीचे हुबळी; (३) नविलूर; (४) चौगाम; (५) उणुकेल, (६) बनवासी; (३) ते (६) ओळख पटत नाही; (७) गोवेय—हल्लीचे गोवे;.

५७६. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, बॉम्बे ब्रँच ऑफ रॉयल एशियाटिक सोसायटी लेख, सोमेश्वर

प्राप्तिस्थळ.—हा लेख मुंबई येथे प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—(१) किलहॉर्न, **इं.स.इं.**, पृ. ५६, नं. ३१४; (२) नाईक, ए. व्ही., **इन्स्क्रिप्शन्स ऑफ दि डेक्कन**, पृ. १००, नं. २२५.

भाषा व लिपी.—संस्कृत; नागरी.

राजवंश व राजा.—शिलाहार महासामंताधिपति सोमेश्वर.

वर्ष व तिथी.—शके ११८१, सिद्धार्थ संवत्सर, इ. स. १२५९.

सारांश.—वरील दोन्ही लेखकांनी हा लेख कुठे प्रसिद्ध झाला हे दिलेले नाही.

५७७. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ताम्रपट, जैत्रसिंह

प्राप्तिस्थळ.—नोंद केलेली नाही.

संदर्भ.—इं.अ.रि., १९५४–५५, पृ. २९.

भाषा व लिपी.—दिलेली नाही.

राजवंश व राजा.—वैजवपयन नृपती जैत्रसिंह.

सारांश.—या लेखात नर्मदा तीरावरील नंदपद्र विभागातील ताकरी या गावाची राजाने देणगी दिल्याचे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—जैत्रसिंह—वैजवपयन राजा.

ग्रामनामे.—(१) नंदपद्र; (२) ताकरी.

५७८. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम शिलालेख, यादव रामचंद्र

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख सध्या प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—सांकलिया व उपाध्याय, इ.आय्., १९३५–३६, खंड २३, पृ. २८१–८२.

भाषा व लिपी.—अशुद्ध संस्कृत-मराठी संमिश्र.

राजवंश व राजा.—देवगिरीचा यादव नृपती रामचंद्रदेव.

वर्ष व तिथी.—सोमवार, श्रावण वद्य ७, शार्वरी संवत्सर, शके १२२२; सोमवार, ८ ऑगष्ट इ. स. १३००.

सारांश.—हा लेख रामदेवाने कोकणावर नेमलेला शासक जयदेव याचा आहे. या लेखाचा मुख्य उद्देश काही दान नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) रामदेव—यादव नृपती रामचंद्रदेव याचा मुख्य सेनापती असावा; (२) जयदेव (जाइदेव)—कोकणचा शासक; (३) रामचंद्रदेव—यादव नृपती.

ग्रामनामे.—(१) सुफली—ओळख पटत नाही; (२) धारवली—ओळख पटत नाही.

५७९. फुलंबरी शिलालेख, योगी माधवकुमार

जिल्हा—**औरंगाबाद** तालुका—**औरंगाबाद**

प्राप्तिस्थळ.—हा लेख फुलंबरी येथील मारुतीच्या देवळाच्या कट्टयात घातलेल्या शिळेवरील एका योगी मूर्तीच्या पायथ्याशी कोरलेला आहे.

संदर्भ.—तुळपुळे, शं. गो., **प्रा.म.को.ले.**, १९६३, पृ. ३७३, क्र. ७२.

भाषा व लिपी.—संस्कृत-मराठी मिश्र; देवनागरी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—लिपीच्या आधारे इ. स. चे ११ वे किंवा १२ वे शतक.

सारांश.—योगीश्वर श्री. याज्ञवल्क्य याचा पादपंकित(?) भ्रमर परशुरामसुत माधवकुमार.

व्यक्तिनामे.—(१) माधवकुमार; (२) परशुराम (प्रस्राम)—माधवकुमाराचा पिता.

५८०. फुलंबरी शिलालेख, यादव सिंघण

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख फुलंबरी येथे सापडला. सध्या हा शिलालेख औरंगाबाद येथील टाऊन हॉलमध्ये आहे.

संदर्भ.—तुळपुळे, शं. गो., **प्रा.म.को.ले.**, १९६३, पृ. १३३–१३४, क्र. २६.

भाषा व लिपी.—संस्कृत-मराठी मिश्र; देवनागरी.

राजवंश व राजा.—यादव नृपती सिंघणदेव.

वर्ष व तिथी.—सोभक्रतु (शुभकृत्) संवत्सर, मार्गशीर्ष शुद्ध दशमी, बुधवार, शके ११६४; ३ डिसेंबर, इ. स. १२४२.

सारांश.—हा लेख यादव नृपती सिंघण याच्या अमलातील आहे. या लेखाचा उद्देश ऋषिनायकक्षत्री नामक सिंघणाच्या नोकराने देवालय बांधले हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) सिंघण—यादव नृपती; (२) ऋषिनायक क्षत्री (रुषनायक कतर्वी)—देवालय बांधणारा सेवक.

५८१. बहादुरपूर अभिलेख

जिल्हा—**नांदेड** तालुका—**उल्लेख नाही**

प्राप्तिस्थळ.—उल्लेख नाही.

संदर्भ.—इं.अ.रि., १९५८–५९, पृ. ५९, नं. १८.

भाषा व लिपी.—इ. स. १० व्या शतकातील उत्तरेकडील वळणाची.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती दंतिदुर्ग व कृष्ण (प्रथम).

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात राष्ट्रकूट, यादव व तुंग वंशीय राजांचा उल्लेख केलेला आहे. याशिवाय द्रम्मच्या स्वरूपात दिलेल्या काही देणग्यांचाही उल्लेख यात केलेला आहे.

व्यक्तिनामे.—(१) दंतिदुर्ग—राष्ट्रकूट नृपती; (२) कृष्ण (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती.

५८२. बहाळ शिलालेख, यादव सिंघणदेव

जिल्हा—**जळगाव** तालुका—**चाळीसगाव**

प्राप्तिस्थळ.—हा लेख बहाळ येथील सारजादेवीच्या मंदिरात मिळाला.

संदर्भ.—किलहॉर्न, **इ.आय्**., १८९४–९५, खंड ३, पृ. ११०–११३.

भाषा व लिपी.—संस्कृत; नागरी लिपी.

राजवंश व राजा.—यादव नृपती सिंघणदेव.

वर्ष व तिथी.—शके ११४४ (गत वर्ष), चैत्र आद्य प्रतिपदा, चित्रभानु संवत्सर; इ. स. १२२२–२३.

सारांश.—हा लेख यादव नृपती सिंघणदेव याच्या कारकीर्दीतील आहे. या लेखाचा उद्देश सिंघणदेव याचा ज्योतिषी अनंतदेव याने द्वारजा (सारजादेवी)-भवानीदेवीच्या देवालयाचा पाया बांधला हे नमूद करण्याचा होता. या लेखाचे दोन भाग आहेत. पहिल्या भागात अनंतदेव व त्याचे पूर्वज यांची माहिती दिलेली असून दुसऱ्या भागात सिंघणदेव, त्याचा पिता व पितामह यांची स्तुति केलेली आहे. या लेखात पुढे जैत्रपालाने गणपतीला आंध्र प्रदेशाचा प्रमुख केल्याचा उल्लेख आहे. लेखाच्या शेवटी हा लेख नागर ब्राह्मण गंगाधर याने लिहिला असा उल्लेख आहे. तसेच सूत्रधार थालू याचाही उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—(१) सिंह (सिंघण)—यादव नृपती; (२) जैत्रपाल—यादव नृपती, सिंघणाचा पिता; (३) भिल्लम—यादव नृपती, सिंघणाचा पितामह; (४) गणपति—जैत्रपालाने संरक्षण दिलेला आंध्र देशचा राजा; (५) अर्जुन—सिंघणाचा प्रतिपक्षी राजा; (६) अनंतदेव—देऊळ बांधणारा राजज्योतिषी; (७) महेश्वर—प्रशस्ती रचणारा, बांधकामासाठी आर्थिक मदत देणारा अनंतदेवाचा भाऊ; (८) गंगाधर—लेख लिहिणारा नागर ब्राह्मण; (९) थालू—बांधकामाचा सूत्रधार; (१०) शांडिल्य—अनंतदेवाच्या घराण्याचा मूळ पुरुष; (११) मनोरथ—शांडिल्याच्या वंशातील अनंतदेवाचा पूर्वज; (१२) महेश्वर—ज्योतिष जाणणारा मनोरथाचा पुत्र; (१३) श्रीपति–महेश्वराचा पुत्र, अनंतदेवाचा पितामह; (१४) गणपती–श्रीपतीचा पुत्र, अनंतदेवाचा पिता.

५८३. बहुलावाड ताम्रपट, गोविंदराज

जिल्हा—**जळगाव** तालुका—**पाचोरा**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट सरदार आबासाहेब मुजुमदार यांनी भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे येथे आणला.

संदर्भ.—खरे, ग. ह., **द.म.इ.सा**., १९३४, खंड २, पृ. १३–२२.

भाषा व लिपी.—संस्कृत; देवनागरी.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती गोविंदराज (तृतीय).

वर्ष व तिथी.—चालू शके ७३२, सर्वधारी संवत्सर, आषाढ बहुल, अमावास्या, सूर्यग्रहण, १६ जुलै, इ. स. ८०९.

सारांश.—या लेखाचा उद्देश गोविंदराज याने स्वत:ला व आपल्या मातापित्यांना पुण्य प्राप्त व्हावे यासाठी निंबस्थलीनिवासी आत्रेयवत्स गोत्री ब्राह्मण श्रीधरभट्ट याचा पुत्र महीधरभट्ट याला बहुला विषयातील बहुलावार हे खेडे दान दिले हे नमूद करण्याचा होता. हा लेख म्हणजे विषयपती, राष्ट्रपती आणि इतर अधिकारी यांना उद्देशून मयूरखंडी येथून काढलेला हुकूम आहे. हा लेख वत्सराजाचा पुत्र अरुणादित्य याने लिहिला असून वादैय्य हा दूतक होता.

व्यक्तिनामे.—(१) गोविंदराज—दान देणारा राष्ट्रकूट नृपती; (२) निरुपम कलिवल्लभ—गोविंदराजाचा पिता, राष्ट्रकूट नृपती; (३) महिधरभट्ट—दान स्वीकारणारा आत्रेयवत्स गोत्री ब्राह्मण; (४) श्रीधरभट्ट—महिधरभट्टाचा पिता; (५) अरुणादित्य—लेख लिहिणारा; (६) वत्सराज—अरुणादित्याचा पिता; (७) वादैय्य—दूतक.

ग्रामनामे.—(१) मयूरखंडी—नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुक्याच्या दक्षिणेस असलेल्या डोंगराच्या ओळीतील मार्किंड नावाचा डोंगरी किल्ला; (२) निंबस्थली—हल्लीचे नीमथळी किंवा नीमथडी; (३) बहुलावार—दान दिलेले गाव, हल्लीचे बहुलावाड; (४) वरग्राम—ओळख पटत नाही; (५) राजअुरा—पाचोऱ्याच्या आग्नेयेस असलेले राजुरी बुद्रुक किंवा राजुरी खुर्द; (६) वारीखेर—पाचोऱ्याच्या आग्नेय व पूर्व दिशांमध्ये पाचोऱ्याहून ७ मैलांवरील वारखेडी बुद्रुक किंवा वारखेडी खुर्द असावे. (७) बहुला विषय—पाचोरे तालुका विभाग.

५८४. बलसाणे शिलालेख, कृष्ण

जिल्हा—धुळे तालुका—**पिंपळनेर**

प्राप्तिस्थळ.—हा लेख बळसाणे येथील मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या वर असलेल्या चौकटीवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) **बॉ.गॅ.**, खंड १२, (खानदेश), पृ. ४३३; (२) कझेन्स, **लि.ॲ.रि. इन.बाँ.प्रे.** खंड ३, पृ. ५५; (३) बॅनर्जी, आर्. डी., **प्रो.अ.स.वे.स.** १९१८–१९, पृ.४५; (४) दीक्षित मो. गं., **इ.आय्.**, १९४१–४२, खंड २६, पृ. ३०९–३१३.

भाषा व लिपी.—संस्कृत; १२ व्या शतकातील नागरी लिपी.

राजवंश व राजा.—नृपती कृष्ण; (अ) निकुंभ (एस्.सी. मजुमदार); (ब) भंभागिरीचा आभीर (एम्. जी. दीक्षित).

वर्ष व तिथी.—शके ११०६, इ. स. ११८४. (जास्त माहिती दिलेली नाही).

सारांश.—या लेखाचा उद्देश गार्ग्य वंशीय सोमेश्वर पंडिताचा पुत्र, पद्मनाभ याचा नातू, प्रसिद्ध गणितज्ञ व धर्मज्ञ महलूक पंडित याने नृपती कृष्ण याला भूमि जिकण्यास मदत केली व बलसाणक येथे नदीकाठावर असलेल्या राजमठाची ब्राह्मणांच्या निवासासाठी दुरुस्ती केली हे नमूद करण्याचा होता. लेखाच्या शेवटी हा लेख स्थपति दांड याने कोरला असा उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—(१) सोमेश्वर पंडित—गार्ग्य कुलातील विख्यात कवी; (२) पद्मनाभ—सोमेश्वराचा पिता; (३) महलूक पंडित—सोमेश्वराचा पुत्र, राजमठाची दुरुस्ती करणारा कृष्ण राजाचा सहाय्यक; (४) कृष्ण—(अ) निकुंभ वंशीय नृपती (एस्. सी. मुजुमदार), (ब) भंभागिरीचा आभीर नृपती (एम्. जी. दीक्षित); (५) दांड—लेख कोरणारा स्थपती.

ग्रामनामे.—(१) बलसाणक—पश्चिम खानदेशात पिंपळनेर तालुक्यातील भामेरपासून १० मैलांच्या परिसरात असलेले बलसाणे.

५८५. बागेहळ्ळी शिलालेख

जिल्हा—**सोलापूर** तालुका—**अक्कलकोट**

प्राप्तिस्थळ.—हा लेख बागेहळ्ळी येथील हनुमान मंदिरात असलेल्या शिळेवर मिळाला.

संदर्भ.—पंचमुखी. आर्. एस्., **कर्नाटक इन्स.**, १९५२, खंड २, पृ. १२६–१२८, क्र. ३६.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—देवगिरीचा यादव नृपती सिंघणदेव.

वर्ष व तिथी.—सिंघणदेवाचे १८ वे राज्यवर्ष, ईश्वर संवत्सर, वैशाख शुद्ध प्रतिपदा, सोमवार सूर्यग्रहण. हे तिथीविषयक उल्लेख नीट लागत नाहीत. ते अंदाजे इ. स. १२१७ या वर्षातील तिथीशी जुळतात. ईश्वर संवत्सर असताना किंवा त्याच्या आधीच्या संवत्सराचे वेळी किंवा नंतरच्या संवत्सरात सूर्यग्रहण चैत्र महिन्यात आले नव्हते. हे दान चैत्र वद्य अमावास्येला करून लगेच दुसऱ्या दिवशी शिळेवर लिहिले असावे.

सारांश.—हा लेख देतेवेळी महाप्रधान मगर मुरारि संगमदेव राज्य करीत होता. या लेखाचा उद्देश अंकुलगे जिल्ह्यात असलेल्या बावुगेयहळ्ळी येथील माणिकेश्वरदेव या मंदिराला बादावि येथील संगेय साहणि याने दान दिले हे नमूद करण्याचा होता.

व्यक्तिनामे.—(१) मगर मुरारि संगमदेव—महाप्रधान; (२) सिंघणदेव—यादव नृपती; (३) कुप्पदेवरस—महामंडलेश्वर; (४) मल्लिदेवरस—महामंडलेश्वर; (५) संगेय साहणि—दान देणारा अधिकारी.

ग्रामनामे.—(१) बावुगेयहल्ली—हल्लीचे बागेहळ्ळी; (२) अंकुलगे—आधुनिक अक्कलकोट; (३) बादावि—हल्लीचे बादामी.

५८६. बामणी शिलालेख, शिलाहार विजयादित्य

जिल्हा—**कोल्हापूर** तालुका—**कागल**

प्राप्तिस्थळ.—हा लेख कागलच्या नैर्ऋत्येस असलेल्या बामणी या खेड्यातील जैन मंदिराच्या द्वाराजवळ असलेल्या शिळेवर आहे.

संदर्भ.—(१) ग्रॅहॅम, **कोल्हापूर**, पृ. ३८१; (२) किलहॉर्न, **इ. आय.**, १८९४–९५, खंड ३ पृ. २११–२१३.

भाषा व लिपी.—संस्कृत, प्राचीन कानडी लिपी.

राजवंश व राजा.—महामंडलेश्वर शिलाहार विजयादित्य.

वर्ष व तिथी.—शके १०७३, भाद्रपद पौर्णिमा, चंद्रग्रहण, प्रमोद संवत्सर, शुक्रवार; ८ सप्टेंबर, इ. स. ११५०.

सारांश.—हा लेख शिलाहार नृपती विजयादित्य याच्या कारकिर्दीतील आहे. या लेखात विजयादित्य याची वंशावळ दिलेली आहे. या लेखाचा उद्देश विजयादित्य याने त्याचे रहाण्याचे ठिकाण वळवाड येथून त्याचा मामा सामंत लक्ष्मण याच्या विनंतीवरून आणि पुण्यप्राप्तीसाठी वर दिलेल्या तिथीस व प्रसंगी चोधोरे कामगावुंड याच्या पार्श्वनाथ देवाच्या मंदिरातील अष्टपूजेसाठी णवुकगेगोल्ल जिल्ह्यातील मडलूर खेड्यातील पाच निवर्तने जमीन, ३० स्तंभ असलेले फुलांचे उद्यान व १२ हात मापाचे घर दान दिले. हा लेख अभिनंददेव याचा शिष्य व सुवर्णकार बम्योज याचा पुत्र गोब्योज याने कोरलेला आहे.

व्यक्तिनामे.—(१) जतिग—शिलाहार नृपती; (२) गोंकल—शिलाहार नृपती, जतिगाचा पुत्र; (३) गूवल—शिलाहार जतिगाचा पुत्र; (४) मारसिंह—शिलाहार नृपती, गोंकलाचा पुत्र; (५) गंडरादित्य—शिलाहार नृपती, मारसिंहाचा पुत्र; (६) विजयादित्य—दान देणारा शिलाहार नृपती, गंडरादित्याचा पुत्र; (७) लक्ष्मण—सामंत, दानासाठी विनंती करणारा विजयादित्याचा मामा; (८) चोधोरे कामगावुंड—पार्श्वनाथाचे देवालय स्थापन करणारा; (९) माघनंदिसिद्धांतदेव—क्षुल्लकपूर येथील जैन चैत्यालयाचा आचार्य, कुलचंद्रमुनींचा शिष्य; (१०) कुलचंद्रमुनि—कुंदकुंदान्वयातील आचार्य; (११) नंदिसिद्धांतदेव—दान स्वीकारणारा जैन आचार्य, माघनंदिसिद्धांतदेवाचा अंतेवासी शिष्य; (१२) बम्योज–सोनार; (१३) गोव्योज–लेख लिहिणारा बम्योज सोनाराचा पुत्र; (१४) अभिनंददेव—गोव्योज याचा गुरु; (१५) सणगमय्य—चोधोरे कामगावुंड याचा पिता; (१६) पुन्नकव्वा—चोधोरे कामगावुंडाची पत्नी; (१७) जेन्तगावुंड—चोधोरे कामगावुंड याचा पुत्र; (१८) हेम्मगावुंड—चोधोरे कामगावुंड याचा पुत्र.

ग्रामनामे.—(१) क्षुल्लकपूर—हल्लीचे कोल्हापूर; (२) वळवाड—संपादकांच्या मते कोल्हापूरच्या दक्षिणेस सुमारे १६ मैलांवरील वाळवे किंवा कृष्णेच्या तीरावरील वाळवे असावे; (३) णवुकगेगोल्ल—हल्लीचे कागल शहर असावे; (४) मडलूर—ओळख पटत नाही.

५८७. बार्शी–टाकळी शिलालेख

जिल्हा—**अकोला** तालुका—**अकोला**(?)

प्राप्तिस्थळ.—हा लेख बारशी-टाकळी येथील भवानीच्या मंदिरात आहे.

संदर्भ.—मिराशी, वा. वि., **इ. आय्**., १९३१–३२, खंड २१, पृ. १२८–१३२.

भाषा व लिपी.—संस्कृत; नागरी लिपी.

राजवंश व राजा.—निकुंभ किंवा यादववंशीय, टेक्कली येथून राज्य करणारा मांडलिक नृपती हेमाद्रीदेव.

वर्ष व तिथी.—गुरुवार, वैशाख शुक्ल ७, दुर्मुख संवत्सर, शके १०९८; ७ एप्रिल, इ.स. ११७७.

सारांश.—शिलालेखाच्या खंडित स्वरूपामुळे या लेखाचा सुसंगत अर्थ लावता येत नाही. प्रारंभीच दंतुराज याच्या वंशातील घटाम या व्यक्तीचे उल्लेख आलेले आहेत. नंतर एका राजाने–बहुधा हेमाद्रिदेव–राजधानीवर चालून आलेल्या मालुगिपुत्र राजल याचा पराभव केल्याचा उल्लेख आहे. या राजाने आपल्या सत्कृत्यांनी राजधानी टेक्कलीस पवित्र वाराणसी शहराचे रूप प्राप्त करून दिले. लेखात पुढे वंशपरंपरेने मंत्रीपद चालवीत असलेल्या वालभ्य गोत्रीय मंत्र्यांची वंशावळ दिलेली आहे. या घराण्यातील गामियाय याने टेक्कलीस विष्णु-मंदिर बांधले व लोकोपयोगासाठी तळे व विहीर बांधल्याचाही उल्लेख या लेखात आहे.

व्यक्तिनामे.—(१) हेमाद्रिदेव—भिल्लमाचा सेनापती खोलेश्वर याने जिंकलेला पर्णखेटचा नृपती. या लेखात टेक्कलीचा राजा; (२) दंतुराज—टेक्कली येथील राजघराण्याचा मूळ पुरुष; (३) घाटम—दंतुराज याच्या वंशातील नृपती; (४) राजल—टेक्कलीवर चाल करून आलेला व हेमाद्रिदेवाने पराभूत केलेला नृपती; (५) मालुगिदेव—राजल याचा पिता; (६) भिल्लम—हेमाद्रिदेवाचा वालभ्य गोत्री मंत्री; (७) पालम—भिल्लम याचा पुत्र; (८) माइल—पालम याचा पुत्र; (९) गामियाय (गामयाज)—दान देणारा माइल याचा पुत्र.

ग्रामनामे.—टेक्कली—राजधानीचे ठिकाण, हल्लीचे वऱ्हाडातील बारशी-टाकळी.

विशेष महत्त्व.—या लेखामुळे टेक्कली येथून राज्य करणाऱ्या राजपुत्रांचे नाव ज्ञात झाले. या राजवंशाचा मूळ पुरुष दंतुराज हा होता. त्याचा पुत्र घाटम याच्या नंतरच्या राजांची नावे ज्ञात नाहीत. लेख देतेवेळी राजा हेमाद्रिदेव राज्य करीत होता.

५८८. बाली शिलालेख, कदंब

गोवा राज्य

प्राप्तिस्थळ.—हा लेख बाली येथील कुंडेश्वर मंदिराजवळ असलेल्या एका शिळेवर कोरलेला आहे.

संदर्भ.—गुणे, टी. व्ही., **ए.आर.जी.**, १९६६, क्र. २०.

भाषा व लिपी.—नागरी.

राजवंश व राजा.—गोव्याचा कदंब राजा.

वर्ष व तिथी.—लिपीच्या आधारे अंदाजे इ. स. चे १३ वे शतक.

सारांश.—या लेखात सुरवातीलाच 'कदंब कुल' ही अक्षरे आहेत. लेख त्रोटक आहे.

५८९. बांदोरा ताम्रपट, मौर्य अनिर्जितवर्मन्

गोवा राज्य — तालुका—**फोंडा**

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत ताम्रपट फोंडा तालुक्यात बांदिवडे येथे मिळाला.

संदर्भ.—(१) गै., इ.आय्., १९५९–६०, खंड ३३, पृ. २९३–२९६; (२) गुणे, टी.व्ही. ए.आर्.जी., १९६६, क्र. ५.

भाषा व लिपी.—संस्कृत; पेटिकाशीर्षक लिपी.

राजवंश व राजा.—मौर्य नृपती अनिर्जितवर्मन्.

वर्ष व तिथी.—२९ वे शासन वर्ष, हेमंत ऋतूच्या सातव्या पंधरवड्यातील १० वा दिवस. लिपीच्या आधारे इ. स. चे ६ वे किंवा ७ वे शतक.

सारांश.—हे शासन कुमारद्वीपाहून दिलेले असून मौर्य महाराज अनिर्जितवर्मन् याच्या कारकिर्दीतील आहे. या शासनाचा मुख्य उद्देश राजाने अज्ञात राष्ट्रकूट व्यक्तीच्या मालकीची असलेली काही जमीन, घरासाठी जागा असलेली काही जमीन, मळा, तलाव किंवा टाके व जंगल साफ करून प्राप्त झालेली काही जमीन हारीतगोत्री हस्त्यार्याला दान दिली हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) अनिर्जितवर्मन्—मौर्य नृपती, दान देणारा; (२) नागपद्द—दानकर्ता; (३) मल्लदत्त—दानकर्ता; (४) अचल—दानकर्ता; (५) हस्त्यार्य—दान स्वीकारणारा हारीत-गोत्री ब्राह्मण.

ग्रामनामे.—कुमारद्वीप—गुणे यांच्या मते गोव्यातील हल्लीचे कुंभर-जुवबेट असावे.

५९०. बांदोरा गाडीवोळे ताम्रपट, षष्ठदेव (द्वितीय)

गोवा राज्य — तालुका—**फोंडा**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट बांदोरा येथे मिळाला.

संदर्भ.—(१) गै, जी. एस्., इ.आय्., १९६१–६२, खंड ३४, पृ. १०५–११०; (२) गुणे, टी. व्ही., **ए.आर्.जी.**, १९६६, क्र. १७.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. १३ व्या शतकातील नागरी लिपी.

राजवंश व राजा.—कदंब नृपती षष्ठदेव (द्वितीय).

वर्ष व तिथी.—शनिवार, पौष अमावास्या, दुर्मति संवत्सर, ८ वे शासन वर्ष, कलियुग ४३५७, २१ जानेवारी, इ. स. १२६२.

सारांश.—प्रस्तुत शासनाचा मुख्य उद्देश राजाने पनसदेशातील अज्जगावे कंपणातील गाडिवोळे हे गाव आत्रेय गोत्री ब्राह्मण ज्योतिषी लोकणार्य व त्याची पत्नी श्रीदेवी यांचा पुत्र लक्ष्मीधर व त्याचे भाऊ यांना कायम स्वरूपात दान दिले हे नमूद करणे हा होता. दैवज्ञ नारायण व त्याची पत्नी कमला यांचे हे नातू होते. या दानाबरोबरच त्यांना काही खास हक्क दिले असल्याचे या शासनात नमूद केले आहे. हे शासन चटचणार्याचा पुत्र व सोमनाथाचा नातू पद्मनाभ याने तयार केले व रुप्पल श्रेष्ठीचा पुत्र धन्नय याने लिहिले.

व्यक्तिनामे.—(१) गूहल—कदंब नृपती; (२) षष्ठदेव (प्रथम)—कदंब नृपती; (३) जयकेशी (प्रथम)—कदंब नृपती, षष्ठदेव (प्रथम) चा पुत्र; (४) विजय (प्रथम)—कदंब नृपती, जयकेशी (प्रथम) चा पुत्र; (५) जयकेशी (द्वितीय)—कदंब नृपती, विजय (प्रथम) चा पुत्र; (६) मैलल महादेवी—जयकेशी (द्वितीय) ची पत्नी, चालुक्य राजकन्या; (७) पेर्माडि—मैलल महादेवीचा पिता; (८) पेर्माडि—जयकेशी (द्वितीय) चा पुत्र; (९) विजय (द्वितीय)—कदंब नृपती, जयकेशी (द्वितीय) चा पुत्र; (१०) जयकेशी (तृतीय)—कदंब नृपती, विजय (द्वितीय) चा पुत्र; (११) महादेवी—जयकेशी (तृतीय) ची पत्नी; (१२) त्रिभुवनमल्ल—कदंब नृपती, जयकेशी (तृतीय) चा पुत्र; (१३) माणिकादेवी—त्रिभुवनमल्लाची पत्नी; (१४) षष्ठदेव (द्वितीय)—कदंब नृपती, त्रिभुवनमल्लाचा पुत्र; (१५) लक्ष्मीधर—दान स्वीकारणारा आत्रेय गोत्री ब्राह्मण; (१६) लोकणार्य—लक्ष्मीधराचा पिता, ज्योतिषी; (१७) श्रीदेवी—लक्ष्मीधराची माता; (१८) नारायण—लक्ष्मीधराचा पितामह, दैवज्ञ; (१९) कमला—नारायणाची पत्नी; (२०) पद्मनाभ—शासन तयार करणारा; (२१) चटचणार्य—पद्मनाभाचा पिता; (२२) सोमनाथ—पद्मनाभाचा पितामह; (२३) धन्नय—शासन लिहिणारा; (२४) रुप्पल श्रेष्ठी—धन्नयचा पिता.

ग्रामनामे.—(१) गोकर्ण—म्हैसूरच्या उत्तर कानरा जिल्ह्यातील यात्रेचे ठिकाण गोकर्ण; (२) पनसदेश—बेळगाव जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील सध्याचे पलसिगे किंवा पलाशिका १२,०००; (३) कोंकण—गोव्याचा पश्चिम किनाऱ्याचा प्रदेश; (४) अज्जगावे—पणजीच्या उत्तरेस सुमारे २५ मैलांवर समुद्र किनाऱ्यावरील हल्लीचे आजगाव असावे; (५) गाडिवोळे—ओळख पटत नाही.

वैशिष्ट्य—खास हक्कात निधि, निक्षेप, दण्ड, दोष, अपुत्रिक, शुल्क, कर आणि उपकर यांचा उल्लेख आहे.

५९१. बॉम्बे ब्रँच ऑफ रॉयल एशियाटिक सोसायटी ताम्रपट

जिल्हा— (?) तालुका— (?)

प्राप्तिस्थळ.—या ताम्रपटाचे मूळचे उपलब्धिस्थान माहीत नाही. सध्या हा ताम्रपट रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई येथील संग्रहालयात आहे.

संदर्भ.—(१) बुल्हर, इं. अँ., १८८१, खंड १०, पृ. २७७.

भाषा व लिपी.—संस्कृत.

राजवंश व राजा.—वलभीच्या मैत्रक वंशाचा नृपती धरसेन (द्वितीय).

वर्ष व तिथी.—वैशाख पौर्णिमा, शके ४००, इ. स. ४७८.

सारांश.—हा ताम्रपट मैत्रक नृपती गुहसेन याचा पुत्र धरसेन याचा आहे. याचा मुख्य उद्देश कांतारग्राम १६०० मधील नबीदसर किंवा नंदीअरक हे गाव दशपूरच्या कौशिक गोत्री

भट्ट इसर (ईश्वर) याचा पुत्र भट्ट गोमिंद (गोविंद) याला नृपतीने दान दिले हे नमूद करणे हा होता. हे शासन माधव पुत्र रेव याने लिहिले.

व्यक्तिनामे.—(१) गुहसेन—मैत्रक नृपती; (२) धरसेन—दान देणारा मैत्रक नृपती, गुहसेनाचा पुत्र; (३) भट्ट गोमिंद (गोविंद)—दान स्वीकारणारा कौशिक गोत्री ब्राह्मण; (४) इसर (ईश्वर) भट्ट—भट्ट गोमिंदाचा चतुर्वेदी पिता; (५) रेव—शासनाचा लेखक.

ग्रामनामे.—(१) कांतारग्राम १६००– गुजराथ राज्यात सुरतच्या ईशान्येस असलेले कट्टरगाम किंवा कटरगाम असावे; (२) दशपूर—मध्यप्रदेशातील मंदसोर असावे; (३) गिरिवली– ओळख पटत नाही; (४) नविदसर किंवा नंदीअरक; (५) मदावि नदी; (६) देयथलिग्राम.

विशेष—हा ताम्रपट बनावट असावा.

५९२. बॉम्बे ब्रॅन्च ऑफ रॉयल एशियाटिक सोसायटी शिलालेख

जिल्हा— ? तालुका— ?

प्राप्तिस्थळ.—ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो. च्या संग्रहात हा लेख असलेला शिलाखंड आहे.

संदर्भ.—बॉ. गॅ., खंड १, भाग २, पृ. २०, नोंद क्र. २.

भाषा व लिपी.—उल्लेख नाही.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती अपरादित्य (द्वितीय).

वर्ष व तिथी.—रविवार, चैत्र शुद्ध ६, विश्वावसु संवत्सर, शके ११०९.

सारांश.—या लेखात सौराष्ट्रातील सोमनाथ (परमेश्वर) चा उल्लेख असून भास्कर नायकाचा पुत्र महामंत्री लक्ष्मणनायक याने दिलेल्या दानाचा उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—(१) लक्ष्मणनायक—दान देणारा महामंत्री; (२) भास्कर नायक—लक्ष्मण नायकचा पिता; (३) अपरादित्य (द्वितीय)–शिलाहार नृपती.

५९३. बेंटगी शिलालेख

गोवा राज्य तालुका—**फोंडा**

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख बेटगीपासून दोन फर्लांगावर असलेल्या व्हाळ या ओढ्याच्या काठावर एका आंब्याच्या झाडाखाली मिळाला.

संदर्भ.—रमेश, के. व्ही., इ.आय., १९६८, खंड ३७, भाग ६, पृ. २८७–२८८.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही. अंदाजे इ. स. १२ वे शतक. (कदम्ब काल)

सारांश.—या शिलालेखात बेटगीचा प्रमुख (प्रभु) जय याचा मृत्यु झाल्याचा उल्लेख आहे. त्याच्या सैन्यातील द्वारपाल पोष्ठदेव हा वागिणीहून आलेला होता. सूत्रधार तिक्कम याने हा लेख लिहिला.

व्यक्तिनामे.—(१) जय—बेटगीचा प्रमुख; (२) पोष्टदेव—जयच्या सैन्यातील द्वारपाल; (३) तिक्कम—हा शिलालेख लिहिणारा सूत्रधार.

ग्रामनामे.—(१) बेत्तुगी—हल्लीचे बेटगी. शिलालेखाचे प्राप्तिस्थान; (२) वगिणी—बिचोली तालुक्यातील हल्लीचे वैंगणी असावे.

५९४. बेडसे बौद्ध शैलगृह शिलालेख

जिल्हा—**पुणे** तालुका—**मावळ**

प्राप्तिस्थळ.—हा लेख बेडसे येथील चैत्य लेण्यातील व्हरांड्याच्या उजव्या टोकाला असलेल्या खोलीच्या दाराच्या वर आहे.

संदर्भ.—(१) वर्ड, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८४४, खंड १, पृ. ४४०; (२) बर्जेस व बुल्हर, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८९, क्र. १; (३) फ्रँक, **झेड.डी.एम.जी.**, १८९६, खंड १, पृ. ५९३; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १२०, क्र. ११०९.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—"ही नाशिक येथील सेठ आनंद याचा पुत्र पुष्यणक याची देणगी आहे".

व्यक्तिनामे.—(१) आनंद—नाशिक येथील श्रेष्ठी; (२) पुसणक—दान देणारा आनंद याचा पुत्र.

ग्रामनामे.—नासिक—हल्लीचे नाशिक.

५९५. बेडसे बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख बेडसे येथील चैत्य लेण्याजवळ असलेल्या कुंडावर आहे.

संदर्भ.—(१) वर्ड, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.** १८४४, खंड १, पृ. ४४१; (२) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.** १८८१, पृ. २६, क्र. २; (३) बर्जेस व बुल्हर, **अ.स.वे.इं.** १८८३, खंड ४, पृ. ९०, क्र. ३; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १२०, क्र. ११११.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—"महाभोयची कन्या, आपदेवणक याची पत्नी महादेवी महारथिनी सामडिनिका हिची ही पुण्यकारक देणगी आहे".

व्यक्तिनामे.—(१) सामडिनिका—दान देणारी महारथिनी; (२) आपदेवणक—सामडिनिकाचा पती, महारथी.

५९६. बेडसे बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख बेडसे शैलगृहातील चैत्य लेण्याच्या जवळ असलेल्या दगोबाच्या मागच्या बाजूला असलेल्या शिळेवर आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.** १८८१, पृ. २६, क्र. १; (२) बर्जेस व बुल्हर, **अ.स.वे.इं.** १८८३, खंड ४, पृ. ८९, क्र. २; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १२०, क्र. १११०.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––उल्लेख नाही.

सारांश.––"मारकुडवर रहाणाऱ्या, भिक्षेवर उदरनिर्वाह करणाऱ्या आरण्यक गोभूतीचा हा आषाढमित्र भट्टाने बांधलेला स्तूप आहे".

व्यक्तिनामे.––(१) गोभूती; (२) आषाढमित्रभट्ट––गोभूतीचा स्तूप बांधणारा.

५९७. बेलोरा ताम्रपट, प्रवरसेन (द्वितीय) (संच 'अ')

जिल्हा––**वर्धा** तालुका––**आर्वी**

प्राप्तिस्थळ.––हा ताम्रपट बेलोरा येथे जने यांच्या घरी होता.

संदर्भ.––मिराशी, वा. वि., **इ.आय्.**, १९३७–३८, खंड २४, पृ. २६०–२६७; **कॉ.इं.इं.** १९६३, खंड ५, पृ. १६–३१.

भाषा व लिपी.––संस्कृत; लिपी पेटिकाशीर्षक प्रकारची असून ती द्वितीय प्रवरसेनाच्या इतर ताम्रपटांप्रमाणे आहे.

राजवंश व राजा.––वाकाटक नृपती प्रवरसेन (द्वितीय).

वर्ष व तिथी.––दिलेली नाही.

सारांश.––या लेखाचा उद्देश प्रवरसेन (द्वितीय) ने शैलपुर विभागातील असि भुक्तिमधील महल्ललाट हे खेडे प्रवरेश्वरषड्विंशति वाटक रहिवासी तैत्तिरीय शाखेच्या काश्यप गोत्री सूर्यस्वामी याला दान दिले हे नमूद करण्याचा होता. हे दानपत्र नंदिवर्धन येथून देण्यात आले होते. या ताम्रपटात प्रवरसेनाची वंशावळ दिलेली आहे. हा लेख सेनापती चित्रवर्मा याने लिहिला.

व्यक्तिनामे.––(१) प्रवरसेन (प्रथम)––वाकाटक नृपती; (२) गौतमीपुत्र––प्रवरसेन (प्रथम) चा पुत्र; (३) भवनाग––गौतमीपुत्राचा मातामह; (४) रुद्रसेन (प्रथम)––वाकाटक-नृपती, गौतमीपुत्राचा पुत्र; (५) पृथिवीसेन––वाकाटक नृपती, रुद्रसेन (प्रथम) चा पुत्र; (६) रुद्रसेन (द्वितीय)––वाकाटक नृपती, पृथिवीसेनाचा पुत्र; (७) देवगुप्त––गुप्त नृपती चंद्रगुप्त (द्वितीय), प्रवरसेन (द्वितीय) चा मातामह; (८) प्रवरसेन (द्वितीय)––दान देणारा वाकाटक नृपती, रुद्रसेन (द्वितीय) चा पुत्र; (९) प्रभावती गुप्ता––रुद्रसेन (द्वितीय) ची पत्नी, प्रवरसेन (द्वितीय) ची माता; (१०) सूर्यस्वामी––दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (११) चित्रवर्मन्––लेख लिहिणारा सेनापती.

ग्रामनामे.––(१) नंदिवर्धन––नागपूर जिल्ह्यातील रामटेकजवळचे नंदरधन किंवा नगरधन; (२) महल्ललाट––लाडकी किंवा घाटलाडकी, मोर्शी तालुका, जिल्हा अमरावती, बेलोराच्या वायव्येस सुमारें १८ मैलांवर; (३) शैलपूर––आधुनिक सालबर्डी, लाडकीच्या पूर्वेस १५ मैलांवर; (४) असि––बेलोराच्या दक्षिणेस १० मैलांवरील अष्टी; (५) प्रवरेश्वर षड्विंशतिवाटक––ओळख पटत नाही. (६) पावंकण राष्ट्र–ओळख पटत नाही; (७) दीर्घद्रह–दान दिलेले गाव, ओळख पटत नाही.

५९८. बेलोरे ताम्रपट, प्रवरसेन (द्वितीय) (संच 'ब')

प्राप्तिस्थळ.––हा ताम्रपट बेलोरा येथे श्री. जाने यांच्या घरी होता.

संदर्भ––मिराशी, वा. वि., इ.आय्., १९३७–३८, खंड २४, पृ. २६०–२६७; **कॉ. इं. इं.**, १९६३, खंड ५, प. १६–२१.

भाषा व लिपी.––संस्कृत; पेटिकाशीर्षक प्रकारची लिपी.

राजवंश व राजा.––वाकाटक नृपती प्रवरसेन (द्वितीय).

वर्ष व तिथी––शासनवर्ष ११, कार्तिक शुक्ल १३.

सारांश––या ताम्रपटाचा उद्देश पाक्कण राष्ट्रातील दिर्घद्रह व शैलपूर विभागातील असि भुक्तीमधील महल्लमलाट हे खेडे तैत्तिरीय शाखेच्या काश्यपगोत्री सूर्यस्वामी याला दान दिले हे नमूद करण्याचा होता. हा लेख सेनापती चित्रवर्मा याने लिहिला.

व्यक्तिनामे.––(१) प्रिथिवीसेन––वाकाटक नृपती; (२) रुद्रसेन (द्वितीय)––वाकाटक नृपती, प्रिथिवीसेनाचा पुत्र; (३) प्रवरसेन (द्वितीय)––दान देणारा वाकाटक नृपती, रुद्रसेन (द्वितीय) चा पुत्र; (४) देवगुप्त––गुप्त नृपती चंद्रगुप्त (द्वितीय), प्रवरसेन (द्वितीय) चा मातामह (५) प्रभावती गुप्ता––रुद्रसेन (द्वितीय) ची पत्नी, प्रवरसेन (द्वितीय) ची माता; (६) सूर्यस्वामी––दान स्वीकारणारा काश्यपसगोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (७) चित्रवर्मन्––लेख लिहिणारा सेनापती.

ग्रामनामे.––(१) महल्लमलाट––बेलोराच्या वायव्येस सुमारे १८ मैलांवरील लाडकी किंवा घाटलाडकी, तालुका मोर्शी, जिल्हा अमरावती; (२) शैलपूर––लाडकीच्या पूर्वेस १५ मैलांवरील हल्लीचे सालबर्डी; (३) असि––बेलोराच्या दक्षिणेस १० मैलांवरील अष्टी; (४) प्रवरेश्वर-षड्विंशतिवाटक––ओळख पटत नाही; (५) दीर्घद्रह––अष्टीच्या दक्षिणेस ३० मैलांवरील दीघी; (६) पाक्कण––ओळख पटत नाही.

५९९. बोपगाव ताम्रपट, चालुक्य विजयादित्य

जिल्हा––पुणे तालुका––**सासवड**

प्राप्तिस्थळ.––हा ताम्रपट बोपगाव या खेड्यात रहाणारे श्री. स. के. फडतरे यांच्याजवळ होता.

संदर्भ.––दीक्षित, का. ना., **भा.इ.सं.मं., त्रैमासिक**, पुणे, वर्ष ९, भाग २, पृ. १–६.

भाषा व लिपी.––संस्कृत; पश्चिमी चालुक्यांची लिपी.

राजवंश व राजा.––बदामीचा चालुक्य नृपती विजयादित्य.

वर्ष व तिथी.––शके ६४०, २२ वे शासनवर्ष, चैत्र पौर्णमासी संक्रांति, सोमवार, २१ मार्च, इ. स. ७१८.

सारांश.––प्रस्तुत ताम्रपट पश्चिमी चालुक्य नृपती विजयादित्य याच्या कालातील आहे. या ताम्रपटामध्ये काश्यप गोत्रीब्राह्मण शर्वस्वामीचा नातू, ईश्वरस्वामी याचा पुत्र, वत्सस्वामी याला समगिरी विषयातील दविळग्रामजवळचे निर्गुंडी हे खेडे दान दिले अशी नोंद केली आहे. हे दानपत्र विजयी राजधानी हतम्पुर येथून दिले आहे. यामध्ये नेहमीप्रमाणे वंशावळ दिलेली आहे.

व्यक्तिनामे.––(१) पुलकेशी वल्लभ––चालुक्य नृपती; (२) सत्याश्रय––चालुक्य नृपती, पुलकेशी वल्लभाचा पुत्र; (३) हर्षवर्धन––सत्याश्रयाने जिंकलेला उत्तरापथाचा स्वामी; (४) विक्रमादित्य (सत्याश्रय)––चालुक्य नृपती, सत्याश्रयाचा पुत्र; (५) विनयादित्य (सत्याश्रय)––चालुक्य नृपती, विक्रमादित्याचा पुत्र; (६) विजयादित्य (सत्याश्रय)––दान देणारा चालुक्य नृपती, विनयादित्याचा पुत्र; (७) वत्सस्वामी––दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण; (८) ईश्वरस्वामी––वत्स- स्वामीचा पिता; (९) शर्वस्वामी––वत्सस्वामीचा पितामह; (१०) निरवद्यपुण्यवल्लभ––शासन लिहिणारा महासांधिविग्रहिक.

ग्रामनामे.—(१) दविळग्राम—पुरंदर किल्ल्याच्या दक्षिणेस चार मैलांवरील दिवळे; (२) निगुंडी—दिवळेजवळील निगडे; (३) हतम्पूर—पुरंदरजवळील हल्लीचे पूर असावे किंवा दिवळे गावाजवळचे हातवे असावे; (४) समगिरि— पुरंदरचे प्राचीन नाव.

६००. भाजे बौद्ध शैलगृह शिलालेख

जिल्हा—**पुणे** तालुका—**मावळ**

प्राप्तिस्थळ.—हा लेख भाजे येथील चैत्य लेण्याच्या छताला असलेल्या एका लाकडी तुळईवर आढळला.

संदर्भ.—**इं.अ.रि.**, १९५५–५६, पृ. २९.

भाषा व लिपी.—प्राकृत; इ. स. पू. २ ऱ्या शतकाच्या प्रारंभीच्या काळातील ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही. अंदाजे इ. स. पू. २ रे शतक.

सारांश.—हा लेख असा—"धमभगसँ पसादो".

६०१. भाजे बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख भाजे येथील विहार लेणे क्र. २२ मधील खोलीच्या द्वारावर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व बुल्हर, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८२, क्र. १; (२) फ्रँकड **झेड्.डी.एम.जी.**, १८९६, खंड १, पृ. ५८६; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११४ क्र. १०७८.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. पू. १ ले शतक.

सारांश.—"भोगवतीच्या नाथ नाडसव याने या खोलीची देणगी दिली आहे".

व्यक्तिनामे.—नाडसव—दानकर्ता, भोगवतीचा रहिवासी.

ग्रामनामे.—भोगवती—ओळख पटत नाही.

६०२. भाजे बौद्ध कुंड शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख भाजे येथील शैलगृह क्र. १६ व १७ यांच्यामध्ये असलेल्या कुंडावर आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, **ज.बॉ.ब्रँ.रॉ.ए.सो.** खंड १, पृ. ४२२, क्र. ४; **हि.रि.**, १८४७, प्ले. क्र. ५३,३; (२) विल्सन, **ज.बॉ.ब्रँ.रॉ.ए.सो.** १८५०, खंड ३, भाग २, पृ. ५२; (३) स्टिव्हन्सन व ब्रेट, **ज.बॉ.ब्रँ.रॉ.ए.सो.**, १८५४, खंड ५, पृ. १५९, क्र. १; (४) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.** १८८१, पृ. २४, क्र. २; (५) बर्जेस व बुल्हर, **अ.स.वे.इं.** १८८३, खंड ४, पृ. ८३, क्र. ७; (६) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११५, क्र. १०७९.

भाषा व लिपी.—प्राकृत; लिपी(?)

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––उल्लेख नाही.

सारांश.––"कोसिकीपुत महारथि विण्हुदत याची कुंडाची पुण्यकारक देणगी".

व्यक्तिनामे.––(१) विण्हुदत (विष्णुदत्त)––दानकर्ता महारथी; (२) कोसिकी (कौशिकी)––विण्हुदताची माता.

६०३. भाजे बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.––हा लेख भाजे येथील चैत्य लेण्याच्या पूर्वेस असलेल्या विहार लेणे क्र. ६ मध्ये मागे उजव्या बाजूला असलेल्या खोलीच्या द्वारावर आहे.

संदर्भ.––(१) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ. २५, क्र. ७; (२) बर्जेस व बुल्हर, अ.स.वे.इं., १८८३, खंड ४, पृ. ८३, क्र. ६; (३) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. ११५. क्र. १०८४.

भाषा व लिपी.––प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राज .––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––उल्लेख नाही.

सारांश.––ही हालिकपत्नी बाधा (बोधी?) हिची देणगी आहे.

व्यक्तिनामे.––बाधा (बोधी?)––दान देणारी शेतकऱ्याची पत्नी.

६०४. भाजे बौद्ध स्तूप शिलालेख

प्राप्तिस्थळ.––हा लेख भाजे शैलगृहातील ५ व्या दगोबाच्या तळाशी आहे.

संदर्भ.––(१) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ. २५, क्र. ५; (२) बर्जेस व बुल्हर, अ.स.वे.इं., १८८३, खंड ४, पृ. ८२, क्र. २; (३) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. ११५, क्र. १०८२.

भाषा व लिपी.––प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––उल्लेख नाही.

सारांश.––"आदरणीय स्थविर संघदिनाचा स्तूप".

व्यक्तिनामे.––संघदिन (संघदत्त)––भदंत थेर.

६०५. भाजे बौद्ध स्तूप शिलालेख

प्राप्तिस्थळ.––हा लेख भाजे शैलगृहातील तिसऱ्या दगोबाच्या तळाशी आहे.

संदर्भ.––(१) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ. २४, क्र. ४; (२) बर्जेस व बुल्हर, अ.स.वे.इं., १८८३, खंड ४, पृ. ८२, क्र. ३; (३) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. ११५, क्र. १०८१.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—"आदरणीय स्थविर अंपिकिणक याचा स्तूप". ओळीच्या सुरवातीला त्रिशूलचिन्ह आहे.

व्यक्तिनामे.—अंपिकिणक (अहिकिणक)—भदंत थेर.

६०६. भाजे बौद्ध स्तूप शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख भाजे शैलगृहातील मोठ्या दगोबाच्या घुमटावर आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.**, १८८१, पृ. २४, क्र. ३; (२) बर्जेस व बुल्हर, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८३, क्र. ४; (३) फँक, **झेड.डी.एम.जी.**, १८९६, खंड ५०, पृ. ५८६; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११५, क्र. १०८०.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—"आदरणीय स्थविर धमगिरि याचा स्तूप".

व्यक्तीनामे.—धमगिरि (धर्मगिरि)—भदंत थेर.

६०७. भाजे बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख भाजे शैलगृहातील शिलाखंडाखाली येणाऱ्या दुसऱ्या ओळीतील एका दगोबाचे शीर्षावर आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, **इं.के.टे.वे.इं.**, १८८१, पृ. २५, क्र. ६; (२) बर्जेस व बुल्हर, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८३, क्र. ५; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११५, क्र. १०८३.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख अपूर्ण आहे. यात फक्त 'थेरानं भयंत' एवढीच अक्षरे आहेत.

६०८. भाजे बौद्ध स्तूप शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख भाजे शैलगृहातील मोठ्या दगोबाच्या घुमटावर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्ड, **हि. रि.**, १८४७, प्लेट क्र. ५३,४; (२) बर्जेस व इंद्रजी, **इं. के. टे. वे. इं.** १८८१, पृ. २५, क्र. ८; (३) बर्जेस व बुल्हर, **अ.स.वे.इं.**, १८८३, खंड ४, पृ. ८३; (४) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. ११५, क्र. १०८५.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात स्तूपाच्या देणगीची नोंद केली आहे परंतु दान देणाऱ्या व्यक्तीचे नाव उपलब्ध नाही.

६०९. भाडणे ताम्रपट, शिलाहार अपराजित

जिल्हा—**ठाणे** तालुका—**भिवंडी**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट भिवंडीच्या उत्तरेस १० मैलांवर असलेल्या भेरे या गावच्या प्रमुखाच्या घरी मिळाला.

संदर्भ.—किलहॉर्न, इ. आय; १८९४–९५, खंड ३, पृ. २६७–७६.

भाषा व लिपी.—संस्कृत; नागरी.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती अपराजित.

वर्ष व तिथी.—आषाढ वद्य ४, हेमलंब संवत्सर, (चालू वर्ष), शके ९१९, २५ किंवा २६ जून इ. स. ९९७.

सारांश.—हा ताम्रपट शिलाहार महामंडलेश्वर अपराजित याच्या काळचा असून यामध्ये राष्ट्रकूट व शिलाहार वंशांची वंशावळ दिलेली आहे. या लेखाचा मुख्य उद्देश लवणेतट येथील लोणादित्य मंदिराला कोकणातील माहिरिहार विभागातील भादान हे खेडे दान दिले हे जाहीर करण्याचा होता. याशिवाय या दानपत्रात २६० द्रम्म दान दिल्याचाही उल्लेख आहे. ही प्रशस्ती संगलैय याच्या मार्गदर्शनानुसार त्याचा पुत्र व दुय्यम अन्नपैय यानें लिहिली. ही स्थानक येथे ठेवली होती. याशिवाय यामध्ये राजाच्या काही मंत्र्यांचीही नावे आहेत.

व्यक्तिनामे.—(१) गोविंदराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती; (२) कर्कराज—राष्ट्रकूट नृपती; (३) इंद्रराज—राष्ट्रकूट नृपती; (४) दंतिवर्मन्—राष्ट्रकूट नृपती, इंद्रराजाचा पुत्र; (५) कृष्णराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, कर्कराजाचा पुत्र; (६) गोविंदराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती; (७) ध्रुव—राष्ट्रकूट नृपती, गोविंदराज (द्वितीय) चा धाकटा भाऊ; (८) जगत्तुंग—राष्ट्रकूट नृपती, ध्रुवाचा पुत्र; (९) अमोघवर्ष—राष्ट्रकूट नृपती; (१०) कृष्णराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, अमोघवर्षाचा पुत्र; (११) इंद्रदेव नित्यवर्ष—राष्ट्रकूट नृपती, जगत्तुंगाचा पुत्र; (१२) अमोघवर्ष (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, इंद्रदेव नित्यवर्ष याचा पुत्र; (१३) गोविंदराज (तृतीय) सुवर्णवर्ष—राष्ट्रकूट नृपती, अमोघवर्ष (द्वितीय) चा धाकटा भाऊ; (१४) वद्दिगदेव—राष्ट्रकूट नृपती, गोविंदराज (तृतीय) चा चुलता; (१५) कृष्णराज (तृतीय)—राष्ट्रकूट नृपती; (१६) खोट्टिगदेव—राष्ट्रकूट नृपती; (१७) कक्कल—राष्ट्रकूट नृपती, निरुपमाचा पुत्र; (१८) तैलप—राष्ट्रकूट सत्ता झुगारून देणारा पश्चिमी चालुक्य नृपती; (१९) जीमूतवाहन—शिलाहार घराण्याचा मूळ पुरुष; (२०) जीमूतकेतु—जीमूतवाहनाचा पिता; (२१) कपर्दी (प्रथम)—शिलाहार नृपती; (२२) पुलशक्ति—शिलाहार नृपती; (२३) कपर्दी (द्वितीय)—शिलाहार नृपती, पुलशक्तीचा पुत्र; (२४) वप्पुवन्न—शिलाहार नृपती; (२५) झंझ—शिलाहार नृपती, वप्पुवन्नाचा पुत्र; (२६) गोग्गिराज—शिलाहार नृपती, झंझाचा भाऊ; (२७) वज्जडदेव—शिलाहार नृपती, गोग्गिराजाचा पुत्र; (२८) अपराजित—दान देणारा शिलाहार महामंडलेश्वर, वज्जडदेवाचा पुत्र; (२९) अंबुश्रेष्ठी—दान स्वीकारणारा; (३०) वाप्पैय्यश्रेष्ठी—दान स्वीकारणारा; (३१) छेलप्पैयु—दान स्वीकारणारा पुजारी (भोजक); (३२) गोवनैय्य—दान स्वीकारणारा ब्राह्मण; (३३) संगलैय—महामात्य; (३४) सिहपैय्य—महासांधिविग्रहिक; (३५) अन्नपैय्य—लेख लिहिणारा.

ग्रामनामे.— (१) भादानग्राम—हल्लीचे भाडणे; (२) पडिगहग्राम—हल्लीचे पडघे अथवा पडघा, भाडणेच्या उत्तरेस दोन मैलांवर; (३) आसच्छदी—भाडणेच्या पश्चिमेकडे असलेले गाव, ओळख पटत नाही; (४) लवणेतट—भिवंडीच्या आग्नेयेस सहा मैलांवर असलेले लोणाड; (५) स्थानक—आधुनिक ठाणे; (६) गुणपुर—ओळख पटत नाही; (७) तगर—उस्मानाबाद जिल्ह्यातील · · · · तेर. (८) कुम्भारी—पडघे गांवाच्या पूर्वेस असलेली हल्लीची कुम्बरि अथवा कोम्बरि नदी; (९) मुरुल—हल्लीची उल्हास नदी.

६१०. भारत इतिहास संशोधक मंडळ ताम्रपट

जिल्हा— ?

तालुका— ?

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट श्री. आबासाहेब मुजुमदार यांनी मंडळात आणून दिला. सध्या हा ताम्रपट भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे येथे ठेवलेला आहे.

संदर्भ.—(१) खरे, ग. ह., **इ.म.इ.सा.**, १९४९, खंड ३, पृ. २७–३६.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ८ व्या शतकातील नागरी लिपी.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती गोविंद (तृतीय).

वर्ष व तिथी.—महावैशाखी पर्व, वैशाख पौर्णिमा, विरोधी संवत्सर, शके ७३२, ३ मे, इ. स. ८०९.

सारांश.—हा ताम्रपट राष्ट्रकूट नृपती गोविंद (तृतीय) याच्या अमदानीतील आहे. या शासनाचा मुख्य उद्देश राजाने खेड विभागातील दशपूर गावातील काही स्थळे (sites) धाराशिववासी काश्यपगोत्री रिसियप्प, एरंडवल्लीवासी गौतमगोत्री महीधर, कऱ्हाडवासी काश्यपगोत्री व्यास यांना दान दिली हे नमूद करणे हा होता. हे शासन वत्सराजपुत्र अरुणादित्य याने तयार केले व स्वामियप्प राणक हा या प्रसंगी दूतक होता.

व्यक्तिनामे.—(१) गोविंद—राष्ट्रकूट नृपती; (२) रिसियप्प—दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण; (३) महीधर—दान स्वीकारणारा गौतमगोत्री ब्राह्मण; (४) व्यास—दान स्वीकारणारा काश्यपगोत्री ब्राह्मण; (५) अरुण दित्य—शासनाचा लेखक; (६) वत्सराज—अरुणादित्याचा पिता; (७) स्वामियप्प राणक—दूतक; (८) सण्णसाविभट्ट—रिसियप्पाचा पिता; (९) मासोपवासी—रिसियप्पाचा पितामह.

ग्रामनामे.—(१) करहाड—सातारा जिल्ह्यातील हल्लीचे कऱ्हाड; (२) खेडविषय—बडोदा संस्थानातील सध्याच्या संखेडाचे प्राचीन नाव असावे; (३) पिप्परिका—संखेड्याच्या दक्षिणेस २ मैलांवरील पिपलिया; (४) सुकली—संखेडा जवळील हल्लीचे सुकली; (५) भग्गाल (भग्गली)—तिलकवाडजवळील हल्लीचे बगली; (६) इंदउरिका—संखेडापासून ७ मैलांवरील हल्लीचे इंद्रोल; (७) लाडावल्लिका—संखेडाजवळील हल्लीचे लाडोध; (८) अम्बिलिकुण्ड—सिनोर तालुक्यातील सध्याचे अंबालि असावे. यापुढील गावांची ओळख पटत नाही; (९) मरुमध्य; (१०) श्रीभवन; (११) मयुरखंडी; (१२) धाराशिव; (१३) एरंडवल्ली; (१४) दशपुर; (१५) तियडी; (१६) देवभोगतियडि.

६११. भारत इतिहास संशोधन मंडळ, अपूर्ण ताम्रपट, सिंद आदित्यवर्मन्

जिल्हा— ?

तालुका— ?

प्राप्तिस्थळ.—या ताम्रपटाचे उपलब्धिस्थळ निश्चित सांगता येत नाही. याचा एक पत्रा श्री. जी. आर्. चांदुरकर यांच्याजवळ होता व दुसरा पत्रा पुणे येथे भारत इतिहास संशोधन मंडळात ठेवलेला होता.

संदर्भ.—मिराशी, वा. वि. व दीक्षित, मो. गं., ए. इं. १९३९–४०, खंड २५, पृ. १६४–१७१.

भाषा व लिपी.—संस्कृत; नागरी.

राजवंश व राजा.—सिंद वंशीय महासामंत आदित्यवर्मन्.

वर्ष व तिथी.—सूर्यग्रहण, चैत्र अमावास्या, क्रोधन संवत्सर, शके ८८७ (गतवर्ष), सोमवार ६ मार्च, इ. स. ९६५.

सारांश.—हा ताम्रपट सिंद राजा महासामंत आदित्यवर्मन् याच्या अमदानीतील आहे. या शासनाचा मुख्य उद्देश मध्यदेशातून आलेल्या कौंडिन्य गोत्री ब्राह्मण चंद्रभट्टाचा पुत्र नवशिव याला रामतीर्थिका ८४ मधील किणिहिका हे गाव आदित्यवर्म्याने दान दिले हे नमूद करण्याचा होता.

व्यक्तिनामे.—(१) दृष्टिविष—नाग राजा; (२) आदित्यवर्मन्—सिंदनृपती; (३) भीम—आदित्यवर्म्याचा पिता; (४) मुंज—आदित्यवर्म्याचा पितामह; (५) नवशिव—दान स्वीकारणारा कौंडिन्य गोत्री ब्राह्मण; (६) चंद्रभट्ट—नवशिवाचा पिता.

ग्रामनामे.—(१) किणिहिका—पुण्याच्या वायव्येस १६ मैलांवर इंद्रायणीच्या दक्षिण तीरावरील किन्हई असावे; (२) जुन्निनगर—पुणे जिल्ह्यातील जुन्नर; (३) पंगरिका—ओळख पटत नाही; (४) रामतीर्थिका—ओळख पटत नाही; (५) इन्द्र–हल्लीची इन्द्रायणी नदी.

६१२. भाळवणी येथील कानडी शिलालेख

जिल्हा—**सांगली** तालुका—**खानापूर**

प्राप्तिस्थळ.—हा लेख कऱ्हाड येथील श्री शिवाजी विद्यालयाच्या पुरातत्त्व विभागात आणून ठेवला आहे.

संदर्भ.—कोलते, वि. भि., **भारतीय इतिहास आणि संस्कृति**, त्रैमासिक, ऑक्टोबर १९७२, व. ९, पु. ३५, पृ. ६३.

भाषा व लिपी.—कानडी.

राजवंश व राजा.—चालुक्य नृपती त्रैलोक्यमल्लदेव व रायमुरारि सोयिदेव.

वर्ष व तिथी.—(१) ८ वे राज्यवर्ष (त्रैलोक्यमल्लदेव), धाता संवत्सर, मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा गुरुवार, १५ नोव्हेंबर, इ. स. ११५६; (२) ४ थे शासनवर्ष, (रायमुरारि सोयिदेव), विकृत संवत्सर, ज्येष्ठ शुद्ध अष्टमी, सोमवार, १८ मे, इ. स. ११७०.

सारांश.—या लेखाचा उद्देश भाळवणी येथील गवरेश्वरदेवाच्या पूजा-अर्चेसाठी आणि देवालयाच्या जीर्णोद्धारासाठी सोवणनायक, चावणनायक, नागदेवनायक, कलिदेवय्यनायक आणि व्यापारी संस्था (श्रेणी) यांनी दिलेल्या २०० कम्म जमिनी आणि करांच्या रूपाने दिलेली दाने नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) त्रैलोक्यमल्लदेव—चालुक्य नृपती; (२) बिज्जणदेव—चालुक्य नृपती; (३) मैळुगिदेव—चालुक्य नृपती; (४) सोवणनायक—दान देणारा महाप्रधान लेखाधिकारी; (५) चावणनायक—दान देणारा हिशेबनीस; (६) नागदेवनायक—दान देणारा करणाध्यक्ष; (७) रायमुरारि सोयिदेव—कलचुरि नृपती; (८) सिध्धय—महामंडलेश्वर; (९) रेवरस दंडनायक सिध्धयचा लेखाधिकारी; (१०) कलिदेवनायक—दान देणारा मुख्य प्रतिनिधी; (११) मल्ल—न्हावी.

ग्रामनामे.—(१) भाळवणी—हल्लीचे भाळवणी, ता. खानापूर, जि. सांगली; (२) अय्याय वोळे—म्हैसूर राज्यात विजापूर जिल्ह्यातील हुनगुंड तालुक्यातील हल्लीचे ऐहोळे असावे.

६१३. भाळवणी येथील कानडी शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख कऱ्हाड येथील श्री शिवाजी विद्यालयाच्या पुरातत्त्व विभागात आहे.

संदर्भ.—कोलते, वि. भि., भा.इ.सं., १९७२, व. ९, पु. ३५, पृ. ८२.

भाषा व लिपी.—कानडी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—शके १०९६, जय संवत्सर, ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमा, सोमवार, २८ मे, इ. स. ११७३.

सारांश.—संक्रांतीच्या मुहुर्तावर राजधानी भाळवणी येथील प्रभु आणि पट्टण सेट्टी प्रमुख, सर्व व्यापारी श्रेण्या, तसेच व्यापारी श्रेणींचा प्रमुख (वड्डव्यवहारी) पाणुवनायक याने जैनांच्या विहाराला गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य इत्यादिकांनी पूजाअर्चा करण्यासाठी जमिनीचे दान दिले व देवालयाच्या आवारातील घरे तेथील व्यवस्थापक व स्थानपती यांच्या स्वाधीन केली.

व्यक्तिनामे.—पाणुवनायक—दान देणारा व्यापारी श्रेणींचा प्रमुख.

ग्रामनामे.—उल्लेख नाही.

६१४. भांडूप ताम्रपट, शिलाहार छित्तराज

जिल्हा—**ठाणे** तालुका—**सालसेट**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट भांडूप येथे मिळाला. सध्या हा ब्रिटिश संग्रहालयात आहे.

संदर्भ.—(१) वाथेन, **ज.रॉ.ए.सो.**, १८३५, खंड २, पृ. ३८३; **ज.रॉ.ए.सो.**, १८३७, खंड ४, पृ. १०९; (२) बुल्हर, **इं.अॅ.**, १८७६, खंड ५, पृ. २७७; (३) फ्लीट, **इ.आय्.**, १९१३–१४, खंड १२, पृ. २५०–२६८.

भाषा व लिपी.—संस्कृत; पश्चिम भारतांतील इ. स. ११ व्या शतकातील नागरी लिपी.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती छित्तराज.

वर्ष व तिथी.—कार्तिक शुद्ध १५, रविवार, सूर्यग्रहण, क्षय संवत्सर, शके ९४८ (गतवर्ष), २८ ऑक्टोबर किंवा १२ नोव्हेंबर, इ. स. १०२६.

सारांश.—ताम्रपटाचे प्रारंभी गणपतीचे स्तवन केले आहे. नंतर शिलाहार वंशाची जीमूतवाहनापासून छित्तराजदेव पर्यंतची वंशावळ दिली आहे. या दानपत्राचा मुख्य उद्देश वर दिलेल्या तिथीस व प्रसंगी राजाने पाराशर गोत्री ब्राह्मण नोडमैय्यचा पुत्र आमदेवैय्य याला स्थानक विभागातील षट्षष्टि जिल्ह्यातील वोडणिभट्ट याचे शेत दान दिले हे नमूद करणे हा होता. हे दानपत्र हम्यमान शहरातील लोकांना उद्देशून काढलेले आहे. राजाज्ञेवरून हे दानपत्र भांडागारसेन महाकवी नागलैय याच्या भावाचा पुत्र भांडागारसेन जोगपैय याने लिहिले.

व्यक्तीनामे.—(१) जीमूतवाहन—शिलाहार घराण्याचा मूळ पुरुष; (२) जीमूतकेतू—जीमूतवाहनाचा पिता; (३) कपर्दी (प्रथम)—शिलाहार नृपती; (४) पुलशक्ति—शिलाहार नृपती, कपर्दी (प्रथम) चा पुत्र; (५) कपर्दी (द्वितीय) किंवा लघु कपर्दी—शिलाहार नृपती, पुलशक्तीचा पुत्र; (६) वप्पुवन्न—शिलाहार नृपती, कपर्दी (द्वितीय) चा पुत्र; (७) झंझ—शिलाहार नृपती, वप्पुवन्नाचा पुत्र; (८) गोग्गि—शिलाहार नृपती, झंझाचा भाऊ; (९) वज्जडदेव (प्रथम)—शिलाहार नृपती, गोग्गीचा पुत्र; (१०) अपराजित—शिलाहार नृपती, वज्जडदेव

(प्रथम) चा पुत्र; (११) वज्जडदेव (द्वितीय)—शिलाहार नृपती, अपराजिताचा पुत्र; (१२) केशिदेव—वज्जडदेव (द्वितीय) चा मोठा भाऊ; (१३) छित्तराज—शिलाहार नृपती, वज्जडदेव (द्वितीय) चा पुत्र, दानकर्ता; (१४) नागणैय—सर्वाधिकारी; (१५) सीहपैय—सांधिविग्रहिक; (१६) कपर्दी—कर्णाट सांधिविग्रहिक; (१७) आमदेवैय्य—दान स्वीकारणारा पाराशर गोत्री ब्राह्मण; (१८) नोडमैय्य—आमदेवैय्य याचा पिता; (१९) वोडणिभट्ट—दान दिलेल्या शेताचा मालक; (२०) जोगपैय्य—लेख लिहिणारा भांडागारसेन; (२१) नागलैय—भांडागारसेन महाकवि, जोगपैय्य याचा चुलता.

ग्रामनामे.—(१) तगर—उस्मानाबाद जिल्ह्यातील आधुनिक तेर; (२) स्थानक—आधुनिक ठाणे; (३) षट्षष्टि—हल्लीचे साष्टी; (४) नोऊर—ठाण्याच्या नैर्ऋत्येस दोन मैलांवरील नोवोहूर; (५) गोम्वणी—नोवोहूरच्या ईशान्येस १ मैलावरील गोव्हन; (६) हम्यमन—आधुनिक संजान असावे. निश्चित ओळख पटत नाही; (७) गोरपवली—हे जुने भांडूप असावे; (८) पुरी—घारापुरी असावे.

६१५. भांदक ताम्रपट, कृष्णराज (प्रथम)

जिल्हा—**चांदा** तालुका—**वरोडा**

प्राप्तिस्थळ.—हा लेख भांदक येथे मिळाला.

संदर्भ.—सुकथनकर, व. स., इ.आय्., १९१७–१८, खंड १४, पृ. १२१–१३०.

भाषा व लिपी.—संस्कृत; उत्तरेकडील लिपीप्रमाणे अक्षरे.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती कृष्णराज (प्रथम).

वर्ष व तिथी.—शके ६९४ (गतवर्ष), आषाढ वद्य ३, संक्रांति, मंगळवार, २३ जून, इ. स. ७७२

सारांश.—हा ताम्रपट कृष्णराज (प्रथम) याच्या कारकिर्दीतला असून याचा मुख्य उद्देश कृष्णराज याने आपले मातापिता व स्वतःला पुण्यप्राप्ति व्हावी म्हणून आपल्या नांदीपुरद्वारि तळावरून उदुमवरमन्ति येथील आदित्य मंदिरातील भट्टराज याला णगणपुरि हे खेडे दान दिले हे जाहीर करण्याचा होता. हे दानपत्र मदन याच्या विनंतीवरून लिहिले होते व वामन नाग याने कोरले होते. या लेखात राष्ट्रकूटांची वंशावळ दिलेली आहे.

व्यक्तिनामे.—(१) कृष्णराज—राष्ट्रकूट नृपती; (२) भट्टराज—दान स्वीकारणारा; (३) मदन—लेख लिहिण्याची विनंती करणारा; (४) वामन नाग—लेख कोरणारा.

ग्रामनामे.—(१) नांदीपुरद्वारि—अंतरगावहून ९ मैलांवर असलेले नांदोरा; (२) उदुवरमन्ति—हल्लीचे उमरावती; (३) अंतरैग्राम—उमरावतीच्या पूर्वेस १६ मैलांवरील अंतरगाव; (४) उम्वरग्राम—वर्धा तहसीलमधील अंतरगावच्या पश्चिमेस असलेले उमरगाव; (५) कपिद्धग्राम—ओळख पटत नाही; (६) णगणपुरी; व (७) नागाम—ओळख पटत नाही.

६१६. भांदक नागनाथ मंदिर शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख भांदक येथील नागनाथ मंदिराच्या ओवरीत ठेवलेला मिळाला.

संदर्भ.—(१) कनिंगहॅम, **अ.स.रि.**, खंड ९, पृ. १३२–१३३; (२) स्टिव्हन्सन, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, खंड १, पृ. १४८; (३) देशपांडे, य. खु., **भा.इ.सं.मं.**, त्रैमासिक, वर्ष ८, भाग १ व २, पृ. ६९–८५; (४) तुळपुळे, शं. गो., **प्रा.म.को.ले.**, १९६३, पृ. ३७–४२, क्र. ६.

भाषा व लिपी.—मराठी-संस्कृत; जुनी देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—शके १०६८, क्षय संवत्सर, मार्गशीर्ष शुद्ध १०, रेवती नक्षत्र, शुक्रवार, १५ नोव्हेंबर, इ. स. ११४६.

सारांश.—या लेखाच्या सुरवातीस वासुदेवास नमन केलेले आहे. वर दिलेल्या तिथीस चांगनायकाचा पुत्र जाषनायक याने नारायणाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली अशी नोंद या लेखात केलेली आहे. लोणार-मेहकर येथील अधिष्ठाते जनार्दन पंडित यांचा पुत्र गोपीनाथ पंडित याने संमती दिल्यावरून पवार याने देवळाची दुरुस्ती केल्यानंतर मूर्तीला तीन डोळे तयार केले. हा लेख आशीर्वादात्मक वचनांनी संपतो.

व्यक्तिनामे.—(१) जाषनाक—नारायणाची प्रतिष्ठापना करणारा, चांगनाकाचा तिसरा पुत्र; (२) चांगनाक—जाषनायकाचा पिता; (३) गोपीनाथ पंडित—देवळाचा जीर्णोद्धार करण्यास अनुमती देणारा लोणार-मेहकर येथील अधिष्ठाते जनार्दन पंडित यांचा पुत्र; (४) जनार्दन पंडित—लोणार-मेहेकर येथील अधिष्ठाते.

ग्रामनामे.—लोणार-मेहकर–सध्याचे विदर्भातील लोणार.

६१७. भांदक शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेली शिळा भांदक येथील भद्रनाग मंदिराच्या मंडपात ठेवलेली आहे.

संदर्भ.—इं.अ.रि., १९६३–६४, पृ. ७२, क्र. ५२.

भाषा व लिपी.—संस्कृत.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—शके १२४८, इ. स. १३३६.

सारांश.—या लेखात मंदिराच्या जीर्णोद्धाराचा व नारायणाच्या मूर्तीच्या प्रतिष्ठापनेचा उल्लेख आहे.

६१८. भिवघाट शिलालेख

जिल्हा—सातारा   तालुका—आटपाडी

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत शिलालेख मु: नेलकरंजी ता. आटपाडी येथील रानात असलेल्या भीमाशंकराच्या देवळात होता.

संदर्भ.—खरे, ग. ह., **द.म.इ.सा.**, १९३४, खंड २, पृ. ७१–७४.

भाषा व लिपी.—या लेखातील आरंभीचा श्लोक फक्त संस्कृतमध्ये असून बाकी सर्व लेख जुन्या कानडी भाषेत आहे; इ. स. १२ व्या शतकातील कानडी लिपी.

राजवंश व राजा.—कलचुरि नृपती सोयिदेव व त्याचा बंधू संकामदेव.

वर्ष व तिथी.—या लेखात कालाचे दोन उल्लेख आहेत—(१) विजय संवत्सर, पौष शुद्ध पौर्णिमा, सोमवार, उत्तरायण संक्रमण, शके १०९५ (गतवर्ष), १७ डिसेंबर, इ. स. ११७३ (कलचुरि सोयिदेव शके १०८९–१०९८); (२) कालाच्या दुसऱ्या उल्लेखात संकामदेव राज्य करीत होता एवढ्याच अर्थाचे शब्द लागतात. संकामदेव शके १०९८ ते ११०२ पर्यंत राज्य करीत होता.

सारांश.—प्रस्तुत लेखाचा काही भाग कलचुरि नृपती सोयिदेव याच्या कारकिर्दीत व काही भाग कलचुरि संकामदेव याच्या कारकिर्दीत लिहिलेला आहे. या लेखात आरंभी भंडिवण येथील भीमनाथ किंवा भीमेश्वर या स्वयंभू देवाची स्तुती केली आहे. या लेखाचा मुख्य उद्देश सोयिदेव व त्याचा भाऊ संकामदेव यांनी दिलेल्या दानाची नोंद करणे हा आहे. नृपती सोयिदेव मंगळवाढ येथे राज्य करीत असता त्याचा चाकर महाप्रचंड दंडनायक याच्या विनंतीवरून वर दिलेल्या तिथीस वरील देवाला त्याचे अंगरंगभोग व जीर्णोद्धार वगैरेसाठी पाडेनाडमधील करजय गावातील दोन मत्तर जमीन राजाने दान दिली. तसेच त्याचा भाऊ संकामदेव याच्या, महाप्रधान, महामंडलेश्वर वगैरे विशेषणांनी युक्त असलेल्या अधिकाऱ्याने नारविगावे येथील जमीन दान दिली.

व्यक्तिनामे.—(१) सोयिदेव—कळचुर्य नृपती; (२) संकमदेव—कळचुर्य नृपती, सोयि-देवाचा भाऊ.

ग्रामनामे.—(१) करजय—भिवघाटाच्या दोन तीन मैलांवरील करंजे असावे; किंवा (२) नारविगावे व करजयखेड मिळून नेलकरंजी हे जोडनाव झाले असावे (ग. ह. खरे); (३) मंगळवाड—हल्लीचे मंगळवेढे; (४) पाडेनाड—आटपाडी असावे; (५) भंडिवण—ओळख पटत नाही.

६१९. भोईघर ताम्रपट, शिलाहार च्छित्तराज

जिल्हा—**कुलाबा** तालुका—**मुरुड**

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत ताम्रपट भोईघर या गावातील श्री. नातू यांना शेतात मिळाला.

संदर्भ.—दीक्षित, मो. गं., **म.प्रा.ता.शि.**, १९४७, पृ. ३२–४६.

भाषा व लिपी.—संस्कृत; देवनागरी.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती छित्तराज.

वर्ष व तिथी.—शके ९४६, भाद्रपद वद्य १३, गुरुवार, ७ सप्टेंबर, इ. स. १०२१.

सारांश.—या ताम्रपटात पुरी १४०० येथे राज्य करत असलेल्या शिलाहार नृपती च्छित्तराजाचा उल्लेख आहे. या लेखाचा मुख्य उद्देश चिपळूण येथील करहाटक ब्राह्मण कोटणक्रम याला काही करांपासून मुक्तता देऊन करदांड या पाणाडविषयातील खेड्यातील व कोलपल्लिका या खेड्यातील काही उद्याने व त्यांचे उत्पन्न दान दिले हे नमूद करण्याचा होता. या लेखात काही राजमंत्र्यांची नावे आहेत.

व्यक्तिनामे.—(१) जीमूतवाहन—शिलाहार घराण्याचा मूळ पुरुष; (२) जीमूतकेतु—जीमूतवाहनाचा पिता; (३) वज्जडदेव—शिलाहार नृपती; (४) छद्मराज—शिलाहार नृपती; गोग्गिराज—शिलाहार नृपती, वज्जडदेव याचा भाऊ; (६) कपर्दि—शिलाहार नृपती; (७) च्छित्तपैय देवराज—दान देणारा शिलाहार नृपती छित्तराज; (८) कोटणक्रम—दान स्वीकारणारा चिपळूण येथील कऱ्हाडा ब्राह्मण; (९) पद्मलदेवी—च्छित्तराजाची राणी; (१०) रामपंडित—महामात्य, राजगुरु; (११) नागणैय—प्रचंडदंडनायक; (१२) दादपैय—सर्वाधिकारी प्रभु; (१३) संगलैय—प्रधान; (१४) तिक्कपैय—प्रधान; (१५) जोउपैय—लेख लिहिणारा; (१६) नागलैय—जोउपैयाचा चुलता, भांडागारसेन, महाकवी; (१७) धारप्पैय—लेख कोरणारा; (१८) दैंदपैय्य—धारप्पैयाचा पिता.

ग्रामनामे.—(१) पाणाड—अलिबागच्या ईशान्येस ८ मैलांवरील पोयनाड असावे; (२) चिपळूण—हल्लीचे चिपळूण; (३) करदांड—हल्लीचे दांडे; (४) कोलपल्लिका—हल्लीचे कोलवल्ली असावे.

६२०. भोर संस्थान संग्रहालय ताम्रपट, धारावर्ष ध्रुवराज

जिल्हा—पुणे

तालुका—भोर

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत लेख भोर संस्थान संग्रहालयात आहे.

संदर्भ.—आळतेकर, ए. एस्., इ.आय्., १९३३–३४, खंड २२, पृ. १७६–१८६.

भाषा व लिपी.—संस्कृत; नागरी.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती धारावर्ष ध्रुवराज.

वर्ष व तिथी.—शके ७०२, सिद्धार्थ संवत्सर, माघ शुद्ध ७, रथसप्तमी.

सारांश.—हा ताम्रपट राष्ट्रकूट नृपती कृष्ण (प्रथम) याचा पुत्र ध्रुव याने दिलेला असून या लेखाचा मुख्य उद्देश करहाडनिवासी गर्ग गोत्री दुर्गभट्ट याचा पुत्र वासुदेवभट्ट याला श्रीमाल विषयातील लघुविंग खेडे दान दिले हे नमूद करण्याचा होता. हा ताम्रपट नीरा नदीच्या संगमावर असलेल्या तळावरून दिलेला आहे.

व्यक्तिनामे.—(१) गोविंद (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती; (२) कर्कराज—राष्ट्रकूट नृपती, गोविंद (प्रथम) चा पुत्र; (३) इंद्रराज—राष्ट्रकूट नृपती, कर्कराजाचा पुत्र; (४) दंतिदुर्ग—राष्ट्रकूट नृपती, इंद्रराजाचा पुत्र; (५) कृष्णराज—राष्ट्रकूट नृपती, कर्कराजाचा पुत्र; (६) राहप्प—कृष्णराजाने पराभूत केलेला राजा; (७) गोविंद (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, कृष्ण-राजाचा पुत्र; (८) ध्रुवराज—राष्ट्रकूट नृपती, गोविंद (द्वितीय) चा धाकटा भाऊ; (९) वासुदेवभट्ट—दान स्वीकारणारा कऱ्हाड येथील ब्राह्मण; (१०) दुर्गभट्ट—वासुदेवभट्टाचा पिता.

ग्रामनामे.—(१) श्रीमाल—हल्लीचे शिरवळ; (२) लघुविंग—शिरवळच्या पश्चिमेस तीन मैलांवरील विंग; (३) बृहद् विंग—विंगच्या पश्चिमेस असलेले वडगाव.; (४) लयनगिरि—विंग जवळच्या नेगाडी टेकड्या. (५) नीरा—नीरा नदी

६२१. भोर संस्थान संग्रहालय ताम्रपट, खंभ (द्वितीय)

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट पूर्वी पुणे जिल्ह्यात भोर येथील संग्रहालयात होता.

संदर्भ.—(१) आळतेकर, ए. एस्., इ.आय्., १९३३–३४, खंड २२, पृ. १८६–१९१; (२) दीक्षित, मो. गं., इ.आय्., १९३५–३६, खंड २३, पृ. ९९–१००; (३) तुळपुळे, शं. गो., प्रा.म.को.ले., १९६३, पृ. ३१५–३१८, क्र. ६०.

भाषा व लिपी.—संस्कृत-प्राकृत मिश्रण; देवनागरी.

राजवंश व राजा.—चालुक्यवंशीय खंभ (द्वितीय).

वर्ष व तिथी.—शके १००१ (गतवर्ष), सिद्धार्थ संवत्सर, ज्येष्ठ पौर्णिमा, शनिवार, १८ मे इ. स. १०७९.

सारांश.—या लेखातील दानकर्ता खंभ हा श्रीवलय येथून राज्य करणारा चालुक्य वंशीय आहे. तो तैलपपुत्र असून खंभ (प्रथम) याचा नातू आहे. या दानपत्रात विंगनिवासी कुंभदेव गंगलदुवेर व इतर ब्राह्मणांना विंग खेडे दान दिल्याचा उल्लेख आहे. तसेच खंभ याची वंशावळ दिलेली असून त्याच्या पाच मंत्र्यांची नावेही दिलेली आहेत.

व्यक्तिनामे.—(१) खंभ (द्वितीय)—दान देणारा श्रीवलयाचा अधिपती; (२) कुंभदेवभट्ट—दान स्वीकारणारा ब्राह्मण; (३) गंगलदुवेर—दान स्वीकारणारा ब्राह्मण; (४) कुमार जैसिंघ (जयसिंह)—अमात्य; (५) तैलप्प—खंभ (द्वितीय) चा पिता; (६) खंभ (प्रथम)—खंभ

(द्वितीय) चा पितामह; (७) चाचु—सामंत; (८) कोन्तलि (ठाकुर)—अमात्य; (९) सोमनाथैय—राणी सिरियादेवीचा मंत्री; (१०) मुंजेय—प्रधान; (११) महलादेवी—राणी (अळतेकर); (१२) महलादेवला—राणी (तुळपुळे); (१३) लैयादरनायक—प्रधान (अळतेकर); (१४) दरनायक—प्रधान (तुळपुळे); (१५) सिरियादेवी—राणी.

ग्रामनामे.—(१) सिरिवलय—भोर संस्थानातील शिरवळ; (२) विंग—निरा नदीच्या काठावर असलेले हल्लीचे विंग.

६२२. मनूर शिलालेख

जिल्हा—**बीड** तालुका—**माजलेगाव**

प्राप्तिस्थळ.—दिलेले नाही.

संदर्भ.—इं.अ.रि., १९६४–६५, पृ. ५९, क्र. ४२.

भाषा व लिपी.—मराठी; नागरी.

वर्ष व तिथी.—शके ११७०, इ. स. १२४८.

राजवंश व राजा.—यादव नृपती कन्हरदेव (कृष्ण).

सारांश.—या लेखात कण्हरदेवाचा मेहुणा थोरथ याने मंदिर बांधल्याचा उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—(१) कण्हरदेव (कृष्णदेव)—यादव नृपती; (२) थोरथ—कृष्णदेवाचा मेहुणा, मंदिर बांधणारा.

६२३. मलखणे (क्युपेम) शिलालेख

गोवा राज्य तालुका—**क्युपेम**

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख मलखणे येथील मल्लिकार्जुन मंदिराच्या उजव्या बाजूला वीरगळ शिळेवर कोरलेला आढळला. सध्या हा लेख पणजी येथे गोवा अर्काईव्हज्मध्ये आहे.

संदर्भ.—गुणे, टी. व्ही., **ए. आर. जी.**, १९६६, क्र. २१.

भाषा व लिपी.—मराठी; नागरी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. १३ वे शतक.

सारांश.—या लेखात विज्जदेऊ नामक व्यक्तीच्या मृत्यूची नोंद केली आहे. हा बहुतेक प्रनजु ठाकुराचा नोकर असावा.

व्यक्तिनामे.—(१) विज्जदेऊ; (२) प्रनजु ठाकुर.

६२४. महाकाळ शैलगृह शिलालेख

जिल्हा—**ठाणे** तालुका—**बोरीवली**

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख कान्हेरीजवळ मेहाळ गावी असलेल्या महाकाळ शैलगृह क्र. १३ मधील दगोबाच्या भोवती असलेल्या भिंतीवर आहे.

संदर्भ.—(१) विलफोर्ड, **एसियाटिक रिसर्चेस**, १७९९, खंड ५, पृ. १४०, क्र. ५; (२) वेस्ट, **ज. बॉ. ब्रॅ. रॉ. ए. सो.**, १८६१, खंड ६, पृ. १३, क्र. ६०; (३) ल्युडर्स, **अपेंडिक्स, इ. आय्.**, १०, १९०९–१०, पृ. १०९, क्र. १०३५.

भाष व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—कुणा एका गौतम गोत्री ब्राह्मणाने दिलेल्या दानाचा उल्लेख आहे.

६२५. महाड बौद्ध शैलगृह शिलालेख

जिल्हा—कुलाबा तालुका—महाड

प्राप्तिस्थळ.—हा लेख महाडजवळ पाल गावी असलेल्या शैलगृह क्र. ९ मधील उजव्या बाजूच्या दालनाच्या मागच्या भिंतीवर आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टेंवे.इं., १८८१, पृ. २; (२) बर्जेस व बुल्हर, अ.स.वे.इं., १८८३, खंड ४, पृ. ८८ क्र. १; (३) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ.आय्., १०, १९०९–१०, पृ. ११४, क्र. १०७२.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—प्रस्तुत लेखात कुमार काणभोअ वेण्हुपालित याने लेणे, चेतियघर, आठ ओवरक (ओवऱ्या), लेण्याच्या दोन्ही बाजूस एक एक कुंड व लेण्याचा मार्ग यांची दिलेली देणगी नमूद केली आहे.

व्यक्तिनामे.—काणभोअ (काणभोज) व्हेणुपालित (विष्णुपालित)—लेण्याची देणगी देणारा राजपुत्र.

६२६. महाड बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख महाड येथील पाल शैलगृहात कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व बुल्हर, अ.स.वे.इं., १८८३, खंड ४, प्ले. ४६; (२) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ.आय्., १०, १९०९–१०, पृ. ११४, क्र. १०७४.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा लेख वाचता येत नाही.

६२७. महाड बौद्ध शैलगृह शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख महाड येथील पाल लेण्यामध्ये कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व बुल्हर, अ.स.वे.इं., १८८३, खंड ४, पृ. ८८–८९, क्र. ११; (२) ल्युडर्स, अपेंडिक्स, इ. आय्., १०, १९०९–१०, पृ. ११४, क्र. १०७३.

भाष व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––उल्लेख नाही.

सारांश.––प्रस्तुत लेखात लेणे, चैत्य लेणे व लेण्याच्या खालच्या बाजूला असलेली काही शेते यांची देणगी नमूद केली आहे. दान देणाऱ्या व्यक्तीचे नाव वादसिरी (वादश्री) आहे.

व्यक्तीनामे.––(१) वादसिरी (वादश्री)–– दान देणारी व्यक्ती, बहुधा स्त्री असावी; (२) संघरखित (संघरक्षित)––गृहपती श्रेष्ठी.

६२८. मंगळवेढे शिलालेख, कलचुरी पेर्माडिदेव

जिल्हा––सोलापूर तालुका––मंगळवेढे

प्राप्तिस्थळ.––हा लेख मंगळवेढे येथे एका शेतात सापडला.

संदर्भ.––(१) खरे, ग. ह., **सह्याद्री**, वर्ष २, अंक ११; **मराठी ताम्रलेखाचा अल्प परिचय,** (भा.इ.सं.मं.) पुणे; (२) तुळपुळे, शं. गो., **प्रा.म.को.ले.**, १९६३, पृ. ३४४–३४७, क्र. ६५.

भाषा व लिपी.––प्रथमार्ध कानडी भाषा व कानडी लिपी, द्वितीयार्ध मराठी भाषा, देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.––कलचुरी नृपती पेर्माडिदेव.

वर्ष व तिथी.––तिथी दिलेली नाही. अंदाजे शके १०५४, इ. स. ११३२ (शं. गो. तुळपुळे), शके १०२५–१०५० (खरे).

सारांश.––प्रस्तुत लेखात पेर्माडिदेव याने नारायणदेवाला कंनेश्वरातील ५० निवर्तनें जमीन दान दिल्याचे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.––(१) जोगमराणा; (२) पेर्माडिदेव––दान देणारा कलचुरी नृपती.

६२९. मंगळवेढे शिलालेख, चंडिकादेवी

प्राप्तिस्थळ.––हा शिलालेख मंगळवेढे येथील गावाच्या हद्दीबाहेर एका शेतात सापडला.

संदर्भ.––(१) तुळपुळे, शं. गो., **प्रा.म.को.ले.**, १९६३, पृ. २०६–२०८, क्र. ३८.

भाषा व लिपी.––मराठी; देवनागरी.

राजवंश व राजा.––उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.––शके १२०४ (गतवर्ष), चित्रभानु संवत्सर, मार्ग.... यापुढील भाग वाचता येत नाही. नोव्हेंबर, इ. स. १२८२.

सारांश.––कविदेव घराण्यातील सिद्धनाथ नामक व्यक्तीने चंडिका देवीला कविठे हे मुख्य गाव धरून सहा गावे दिल्याचे या लेखात नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.––सिद्धनाथ––कविदेव वंशातील दानकर्ता.

ग्रामनामे.––(१) कविठे––सांगली जिल्ह्यातील कवठे महांकाळ असावे; (२) केकंमिरि––विजापूर जिल्ह्यातील ककमरी असावे.

६३०. माटवण ताम्रपट, त्रैकूटक विक्रमसेन

जिल्हा—**रत्नागिरी** तालुका—**दापोली**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट दापोलीहून ७ मैल असलेल्या माटवण गावी श्री. महाडिक यांचेजवळ होता.

संदर्भ.—गोखले, सौ. शोभना, **इ. आणि सं.**, त्रैमासिक, १९७२, वर्ष ९, अंक ३५, पृ. ५–११.

भाषा व लिपी.—संस्कृत; दाक्षिणात्य वळणाची ब्राह्मी.

राजवंश व राजा.—त्रैकूटक नृपती विक्रमसेन.

वर्ष व तिथी.—संवत् २८४, चैत्र वद्य २, यात वाराचा उल्लेख नाही. संवताचे नाव दिलेले नसल्यामुळे निश्चित इ. स. सांगता येत नाही.

सारांश.—प्रस्तुत ताम्रपट त्रैकूटक नृपती विक्रमसेन याने कौंडिण्य गोत्री, तैत्तिरीय शाखेच्या शिवस्वामी या ब्राह्मणाला दान दिला आहे. हा ब्राह्मण कल्लिवन येथे रहाणारा होता. या ताम्रपटान्वये महाकटाहार अग्रहारातील फरतटिकांतर्गत पंचामलक हे गाव दान दिले.

व्यक्तिनामे.—(१) विक्रमसेन—त्रैकूटक नृपती; (२) शिवस्वामी—दान स्वीकारणारा कौंडिण्य गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (३) स्वामिक—लेखक; (४) रुद्र—दूतक; (५) नरेंद्र; (६) नारायण.

ग्रामनामे.—(१) अनिरुद्धपुरी—सुरत जिल्ह्यातील बार्डोलीजवळच्या तेन या गावाच्या आसपास असावे असे मिराशी यांचे मत आहे; (२) महाकटाहार—कदाचित रत्नागिरी जिल्ह्यातील महाड असावे; (३) कल्लिवन—नाशिकजवळचे कळवण असावे; (४) फरतटिका—ओळख पटत नाही; (५) पंचामलक—ओळख पटत नाही.

६३१. माडगीहाळ शिलालेख

जिल्हा—**सांगली** तालुका—**जत**

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख मडगीहाळ या गावी महादेवाच्या देवालयासमोर सापडला.

संदर्भ.—बार्नेट, इ. आय्., १९१९–२०, खंड १५, पृ. ३१५–३२९.

भाषा व लिपी.—प्राचीन कानडी; इ. स. १२ व्या शतकाच्या शेवटी प्रचलित असलेली कानडी लिपी.

राजवंश व राजा.—(१) कलचुरि नृपती संकमदेव; (२) यादव नृपती भिल्लम.

वर्ष व तिथी.—शके १०९३ (गत वर्ष), फाल्गुन अमावास्या, सूर्यग्रहण, नंदन संवत्सर, २७ जानेवारी, इ. स. ११७२ (प्रथम देणगी).

सारांश.—प्रस्तुत लेखात दोन मंदिरांना वेगवेगळ्या वेळी दिलेल्या देणग्यांची नोंद केलेली आहे. रायमुरारि सोयिदेव शासन करीत असताना माळिगेचा शेरीफ बिज्जय याने शिव-सोमनाथाची दोन मंदिरे बांधली व या मंदिरांना देणग्या दिल्या. नंतर कलचुरि नृपती संकमदेव याच्या शासनकाळातही या मंदिरांना देणग्या मिळाल्या. यादव नृपती भिल्लम हा राज्यपदी असतानाही या मंदिरांना देणग्या मिळाल्याचा उल्लेख या लेखात आलेला आहे.

व्यक्तिनामे.—(१) कन्नम—मंगळीवेडचा नृपती; (२) राज—कन्नमचा पुत्र; (३) अम्मुगि–राज याचा पुत्र; (४) संकम—राज याचा पुत्र; (५) जोगम्म—राज याचा पुत्र; (६) हेम्माडि—जोगम्म याचा पुत्र; (७) बिज्जल—हेम्माडि याचा पुत्र, कळचुर्य राज्याचा संस्थापक नृपती;

(८) सोयिदेव (सोमदेव)—कळचुर्य नृपती, बिज्जलाचा पुत्र; (९) बिज्जय नायकर—दान देणारा प्रभु; (१०) सायियक्क (सावित्रीदेवी)—बिज्जय नायकरची पत्नी; (११) मुद्दियक्क—बिज्जय नायकरची माता; (१२) मल्ल गाउंड (द्वितीय)—बिज्जय नायकरचा पिता; (१३) बल्ल गाऊंड—बिज्जय नायकरचा पितामह; (१४) मल्ल गाउंड (प्रथम)—बिज्जय नायकरचा प्रपितामह; (१५) संकम—कळचुर्य नृपती; (१६) भिल्लम—यादव नृपती; (१७) लोकाभरण—शैव साधु; (१८) कल्याणदेव—लोकाभरणाचा शिष्य.

ग्रामनामे.—(१) मंगळीवेड—पूर्वीच्या सांगली संस्थानातील हल्लीचे सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढे; (२) काळांजर—कदाचित निडुगल असावे; (३) माळिगे— हल्लीचे माडगीहाळ; (४) वासुंबिगे—ओळख पटत नाही; (५) लोणार—निश्चित ओळख पटत नाही. त्या परिसरात या नावाची दोन गावे आहेत; (६) कोळनूर—ओळख पटत नाही; (७) चेंडिके वेट्ट (चंडिकेची टेकडी)—ओळख पटत नाही; (८) डोंगरिगावे—या नावाची अनेक गावे आहेत; (९) सणम्वडे—सनबरा असावे.

६३२. माणकेश्वर शिलालेख

जिल्हा—उस्मानाबाद **तालुका—परांडा**

प्राप्तिस्थळ.—हा लेख माणकेश्वर येथील महादेवाच्या मंदिरात मिळाला.

संदर्भ.—इं.अ.रि., १९७०–७१, पृ. ४९.

भाषा व लिपी.—उल्लेख नाही.

राजवंश व राजा.—यादव नृपती सिंघण.

वर्ष व तिथी.—शके ११४१, इ. स. १२१९, क्र. २३.

सारांश.—दिलेला नाही.

व्यक्तिनामे.—उल्लेख नाही.

ग्रामनामे.—उल्लेख नाहीं.

६३३. माणिकपूर शिलालेख

जिल्हा—ठाणे **तालुका—वसई**

प्राप्तिस्थळ.—हा लेख माणिकपूर येथे सापडला. सध्या हा मुंबई येथे प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—दीक्षित, मो. गं., **म. प्रा. ता. शि.**, १९४७, पृ. ८१–८४.

भाषा व लिपी.—संस्कृत; देवनागरी.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती अपरादित्य (द्वितीय).

वर्ष व तिथी.—गुरुवार, कार्तिक वद्य १०, शके १११९, ६ नोव्हेंबर, इ. स. ११९७.

सारांश.—प्रस्तुत लेखात सोमेश्वर देवालयाचा पुजारी वेदांगराशी यास सतुली गावातील काही जमीन दान दिल्याचे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.–(१) जीमूतवाहन–शिलाहार घराण्याचा मूळ पुरुष; (२) अपरादित्य (द्वितीय) —शिलाहार नृपती; (३) लक्ष्मण नायक—महामात्य; (४) साहामल्ल—श्रीकरण; (५) जोधुनायक—प्रभु; (६) वेदांगरासि (वेदांगराशी)—दान स्वीकारणारा सोमेश्वराचा पुजारी.

ग्रामनामे.—(१) सतुली—माणिकपूरच्या ईशान्येस तीन मैलांवरील संतिवली हे गाव असावे.

६३४. मार्कंडी शिलालेख

जिल्हा—चांदा तालुका—**गढचिरोली**

प्राप्तिस्थळ.—हा लेख मार्कंडी येथे मार्कंडेश्वराच्या मंदिराच्या आवारातील एका शिलाखंडावर कोरलेला आहे.

संदर्भ.—इं.अ.रि., १९६३–६४, पृ. ७२, क्र. ५३.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ७ व्या शतकातील उत्तरेकडील वळणाची.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखाचा सुसंगत अर्थ लागत नाही. (१) अनुराग : प्रियपूर्ण : (२) बप्पनागश्री.

६३५. मार्कंडी शिलालेख, यादव कृष्णदेव

प्राप्तिस्थळ.—हा लेख मार्कंडी येथे मार्कंड ऋषीच्या मंदिरातील उध्वस्त झालेल्या सभामंडपाच्या इतस्ततः पडलेल्या हेमाडपंती खांबांपैकी एका खांबावर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) कनिंगहॅम, रि.अ.स.इं., खंड ९, पृ. १५०; (२) देशपांडे, य. खु., भा.इ..सं.मं., त्रैमासिक, पुणे, पृ. ८५–८८, वर्ष १९, अंक ३; (३) तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.**, १९६३, पृ. ३५५–३५७, क्र. ६८.

भाषा व लिपी.—मराठी; इ. स. १२ व्या – १३ व्या शतकातील देवनागरी.

राजवंश व राजा.—यादव नृपती कृष्णदेव.

वर्ष व तिथी.—तिथीचा उल्लेख नाही. तुळपुळ्यांच्या मते सुमारे शके ११७८ चा हा लेख असावा.

सारांश.—प्रस्तुत लेखात पुरुषोत्तमपुत्र कान्हो याचा पुत्र व सिंघणरायाचा पणतु उपांगराव याने मार्कंडेयाचे स्तवन केलेले आहे.

व्यक्तिनामे.—(१) उपांगराओ—यादव वंशातील सिंघणाचा पणतू रामचंद्रदेव (तुळपुळे); (२) कान्हो (कृष्णदेव)—उपांगरावाचा पिता; (३) पुरुषोत्म— उपांगरावाचा पितामह; (४) सिंघण—उपांगरावाचा प्रपितामह.

६३६. मार्डी शिलालेख, कलचुरी संकमदेव

जिल्हा—**सोलापूर** तालुका—**सोलापूर**

प्राप्तिस्थळ.—हा लेख मार्डी येथील सुतार आळीत नरसोबा देवालयाच्या अवशेषांमध्ये सापडला.

संदर्भ.—खरे, ग. ह., द.म.इ.सा., १९३०, खंड १, पृ. ४३–५४.

भाष व लिपी.—संस्कृत; इ. स. १२ व्या शतकातील देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—कलचुरि नृपती संकमदेव, यादव नृपती भिल्लम, जैतुगि, सिंघण.

वर्ष व तिथी.—(१) ५ वे शासन वर्ष (संकमदेव), शार्वरी संवत्सर अश्विनी, अमावास्या, सोमवार, शके ११०२ (गतवर्ष); (२) ४ थे शासनवर्ष (भिल्लम), प्लवंग संवत्सर, पौष १०, कृष्ण पक्ष, सोमवार, उत्तरायण संक्रांत; शके ११०९ (३) जतुगिविजयराज्ये. . शक, मास, तिथी दिलेली नाही; (४) १३ वे शासनवर्ष (सिंघणदेव), आंगिरस संवत्सर, पौष शुक्ल ४, उत्तरायण संक्रांत, शक संवत् ११३४.

सारांश.—या लेखात योगेश्वरदेवाला वेळोवेळी मिळालेल्या देणग्या नमूद केल्या आहेत.

व्यक्तिनामे.—(१) भल, भलेश, भलवासुदेव—साधूचे नाव; (२) बिज्जण—कलचुरी नृपती; (३) सोम—कलचुरी नृपती, बिज्जणाचा पुत्र; (४) मल्लुगि—कलचुरी नृपती; (५) संकमदेव—कलचुरी नृपती; (६) भिल्लम—यादव नृपती; (७) जैतुगि—यादव नृपती, भिल्लमाचा पुत्र; (८) सिंघण—यादव नृपती, जैतुगिचा पुत्र; (९) धोयिपैय नायक—दान देणारा कुलकरणि, धर्मसायक; (१०) योगेश्वर—शंकराचे देऊळ बांधून 'योगेश्वरा'ची स्थापना करणारा काश्यप गोत्री ब्राह्मण; (११) गोविंद चतुर्वेदी—योगेश्वराचा पिता, सोमयाजी ब्राह्मण; (१२) गोविंदयोगेश्वर—योगेश्वराचा पुत्र; (१३) वासुगि—जमिनीचा मालक सेट्टि, चोथमल्लाचा मुद्राधिकारी; (१४) चोथमल्ल—वासुगि सेट्टिचा मालक; (१५) विक्रमपाल—तेलाचा घाणा दान देणारा.

ग्रामनामे.—(१) मारूढिनगर—हल्लीचे मार्डी; (२) कसयग्राम—मार्डीच्या आग्नेयेस असलेले कासेगाव; (३) गवरेश्वरपूर—ओळख पटत नाही; (४) सुरत—ओळख पटत नाही; मार्डीच्या दक्षिणेस असलेले तरडगाव ? ; (५) दवडिगे—निजाम हद्दीतील हगरटग विशतातील एक गाव.

६३७. माहुरझरी ताम्रपट वाकाटक पृथिवीषेण (द्वितीय)

जिल्हा—**नागपूर** तालुका—**नागपूर**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट श्री. बोरकर यांना त्यांच्या माहुरझरी येथील शेतात नांगरणी चालू असताना मिळाला. नागपूर येथील जिल्हाध्यक्षांनी हा ताम्रपट आपल्या ताब्यात घेतला.

संदर्भ.—कोलते, वि. भि., **वि.सं.मं.वा.**, १९७१, पृ. ५३–७७.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी, पेटिकाशीर्षक लिपी.

राजवंश व राजा.—वाकाटक नृपती पृथिवीषेण (द्वितीय).

वर्ष व तिथी.—१७ वे शासनवर्ष, कार्तिक शुक्ल १२.

सारांश.—या ताम्रपटाचा उद्देश राजाने काश्यप गोत्री ब्राह्मण विष्णुदत्त व भवदत्त यांना सुरम्वि राज्याच्या जमलखेटक विभागातील जमलखेटक नामक गाव दान दिले हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) प्रवरसेन (प्रथम)—वाकाटक नृपती; (२) गौतमीपुत्र—वाकाटक नृपती, प्रवरसेन (प्रथम) चा पुत्र; (३) भवनाग—भारशिव राजा, गौतमीपुत्राचा मातामह; (४) रुद्रसेन (प्रथम)—वाकाटक नृपती, गौतमीपुत्राचा पुत्र; (५) पृथिवीषेण (प्रथम)—वाकाटक नृपती, रुद्रसेन (प्रथम) चा पुत्र; (६) रुद्रसेन (द्वितीय)—वाकाटक नृपती, पृथिवीषेण

(प्रथम) चा पुत्र; (७) देवगुप्त—गुप्त नृपती चंद्रगुप्त (द्वितीय); (८) प्रभावतीगुप्ता—देवगुप्ताची कन्या, रुद्रसेन (द्वितीय) ची पत्नी; (९) प्रवरसेन (द्वितीय)—वाकाटक नृपती, रुद्रसेन (द्वितीय) चा पुत्र; (१०) नरेंद्रसेन—वाकाटक नृपती, प्रवरसेन (द्वितीय) चा पुत्र; (११) अज्झितभट्टारिका—नरेंद्रसेनाची पत्नी; (१२) पृथिवीषेण (द्वितीय)—वाकाटक नृपती, नरेंद्रसेनाचा पुत्र, दानकर्ता; (१३) विष्णुदत्त—दान स्वीकारणारा वाजसनेयी काश्यप सगोत्री ब्राह्मण; (१४) भवदत्त—दान स्वीकारणारा वाजसनेयी काश्यपसगोत्री ब्राह्मण; (१५) रविदत्त—लेख लिहिणारा सेनापती.

ग्रामनामे.—(१) पृथिवीसमुद्र—पृथिवीषेण (द्वितीय) ची राजधानी. निश्चित शोध लागत नाही; (२) पृथिवीपूर—ओळख पटत नाही; (३) जमलखेटक—सावनेर तालुक्यातील खापा गावाच्या ईशान्येस २ मैलांवर असलेले जमलपाणी बहुधा असावे; (४) अुब्भीलक—बहुधा जमलपाणीच्या उत्तरेस दोन मैलांवरील खुबाळी असावे; (५) नान्दीपुरक—जमलपाणीच्या पश्चिमेस तीन मैलांवरील नंदापूर असावे; (६) सोमदरी—ओळख पटत नाही. ते कदाचित जमलखेटकच्या पूर्वेकडील दरीचेच नाव असावे.

६३८. माहुल (ट्रॉम्बे) शिलालेख, हरिपालदेव

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख १९५८ मध्ये माहुल येथे मिळाला.

संदर्भ.—(१) दीक्षित, एम्. जी., इ.आय्., १९६७, खंड ३७, भाग ४, पृ. १६५–१६६; (२) अॅ.रि.इं.ए., १९५८–५९, पृ. ४५.

भाषा व लिपी.—संस्कृत व मराठी ; नागरी लिपी.

राजवंश व राजा.—शिलाहार हरिपालदेव.

वर्ष व तिथी.—शके १०७५, श्रीमुख संवत्सर, रविवार, आषाढ शुद्ध १५, चंद्रग्रहण, ७ जुलै, इ. स. ११५३.

सारांश.—या शिलालेखात हरिपालदेवाने केलेल्या व्यवस्थेचे वर्णन आहे. षट्षष्टी विषयातील माहवल खेड्यातील ब्राह्मणांना घरपट्टी माफ केली आहे. पोफळीच्या बनातील ३ टक्के लेव्ही द्यावी. गोवर्धन भट्टोपाध्याय याची डोम्बिलवाटिका मात्र करमुक्त केली आहे. ही व्यवस्था राजाने स्वकल्याणार्थ केली. हेच पुन्हा मराठीत लिहिले आहे.

व्यक्तिनामे.—(१) हरिपालदेव—शिलाहार नृपती; (२) गोवर्धन भट्टोपाध्याय—कर माफ झालेला ब्राह्मण.

ग्रामनामे.—(१) षट्षष्टी—सालसेट किंवा साष्टी, जि. ठाणे; (२) माहवल—ट्रॉम्बे (तुरभे) पासून दीड मैलावर असलेले माहुल; (३) डोम्बिल (वाटिका)—कल्याणजवळील डोंबिवली.

विशेष महत्त्व.—या शिलालेखात घरपट्टीचा (गृहदेणक) आणि पोफळीच्या बनावरील कराचा उल्लेख प्रथमच मिळतो.

६३९. मांडवी शिलालेख, शिलाहार केशिदेव (द्वितीय)

जिल्हा—ठाणे तालुका—वसई

प्राप्तिस्थळ.—हा लेख मांडवी येथे सापडला. हा शिलालेख मुंबई येथील प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये ठेवलेला आहे.

संदर्भ.—(१) दीक्षित, मो. गं., म.सं.प., वर्ष ६, अंक ४, पृ. ६–७; (२) तुळपुळे, शं. गो., प्रा.म.को.ले., १९६३, पृ. ९८–१००, क्र. १९.

भाषा व लिपी.—संस्कृत-मराठी संमिश्र भाषा; देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती केशिदेव (द्वितीय).

वर्ष व तिथी.—माघ शुद्ध १५, रुधिरोद्गारी संवत्सर, शके ११२५, बुधवार, २९ जानेवारी, इ. स. १२०३.

सारांश.—हा लेख शिलाहार नृपती केशिदेव याच्या अमदानीतील असून यामध्ये त्याचा मुख्यमंत्री लक्ष्मीधर महामात्य याने मांडवली येथे स्थापिलेल्या लक्ष्मीनारायणाचे साक्षीने सोम ठाकूर याने दिलेल्या देणग्या नमूद केल्या आहेत.

व्यक्तिनामे.—(१) केशिदेव—शिलाहार नृपती; (२) लक्ष्मीधर—लक्ष्मीनारायणाची स्थापना करणारा केशिदेवाचा महामात्य; (३) सोम ठाकूर—दानकर्ता.

ग्रामनामे.—मांडवली—ठाणे जिल्ह्यात वसईच्या ईशान्येस १५ मैलांवर असलेले मांडवी हे गाव.

६४०. मिरज ताम्रपट, चालुक्य जयसिंह (द्वितीय)

जिल्हा—सांगली तालुका—मिरज

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट मिरज येथे मिळाला.

संदर्भ.— (१) वाथेन, ज.रॉ.ए.सो., १८३५, खंड २ (1st series), पृष्ठ ३८०; ज.रॉ.ए.सो., १८३६, खंड ३, पृ. २५८; (२) फ्लीट, इं.अँ., १८७९, खंड ८, पृ. ११; (३) बार्नेट, इ.आय्., १९१३–१४, खंड १२, पृ. ३०३–३१५.

भाषा व लिपी.—संस्कृत; उत्तरेकडील वळणाची.

राजवंश व राजा.—पश्चिमी चालुक्य नृपती जगदेकमल्ल जयसिंह (द्वितीय).

वर्ष व तिथी.—शके ९४६ (गतवर्ष), वैशाख पौर्णिमा, रक्ताक्षि संवत्सर, रविवार, २६ एप्रिल इ. स. १०२४.

सारांश.—या लेखाचा उद्देश करटिकल्लु ३०० व एडडोर २००० मधील माडदूरु हे गाव श्रीधर याचा नातू व रेवणार्य याचा पुत्र वासुदेवार्य याला दान दिले हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) जयसिंह (प्रथम)—चालुक्य नृपती; (२) रणराग—चालुक्य नृपती जयसिंह (प्रथम) चा पुत्र; (३) पुलकेशी (प्रथम)—चालुक्य नृपती, रणरागाचा पुत्र; (४) कीर्तिवर्मन् (प्रथम)—चालुक्य नृपती, पुलकेशी (प्रथम) चा पुत्र; (५) मंगलीश—चालुक्य नृपती, कीर्तिवर्मन् (प्रथम) चा धाकटा भाऊ; (६) सत्याश्रय (प्रथम)—चालुक्य नृपती, कीर्तिवर्मन् (प्रथम) चा पुत्र; (७) हर्ष—सत्याश्रय (प्रथम) ने जिंकलेला महानृपती; (८) नेडमरि—चालुक्य नृपती, सत्याश्रय (प्रथम) चा पुत्र; (९) आदित्यवर्मन्—चालुक्य नृपती, नेडमरीचा पुत्र; (१०) विक्रमादित्य (प्रथम)—चालुक्य नृपती, आदित्यवर्म्याचा पुत्र; (११) युद्धमल्ल—चालुक्य नृपती, विक्रमादित्य (प्रथम) चा पुत्र; (१२) विजयादित्य—चालुक्य नृपती, युद्धमल्लाचा पुत्र; (१३) विक्रमादित्य (द्वितीय)—चालुक्य नृपती, विजयादित्य याचा पुत्र; (१४) कीर्तिवर्मन् (द्वितीय)—चालुक्य नृपती विक्रमादित्य (द्वितीय) चा पुत्र; (१५) भीम (?)—चालुक्य नृपती, विक्रमादित्य (द्वितीय) चा भाऊ; (१६) कीर्तिवर्मन् (तृतीय)—चालुक्य नृपती, भीमाचा पुत्र; (१७) तैल (प्रथम)—चालुक्य नृपती, कीर्तिवर्मन् (तृतीय) चा पुत्र; (१८) विक्रमादित्य (तृतीय)—चालुक्य नृपती, तैल (प्रथम) चा पुत्र; (१९) भीम (द्वितीय)—चालुक्य नृपती, विक्रमादित्य (तृतीय) चा पुत्र; (२०) अय्यण (प्रथम)—चालुक्य नृपती, भीम (द्वितीय) चा पुत्र; (२१) कृष्ण (तृतीय)—राष्ट्रकूट नृपती, अय्यण (प्रथम) चा सासरा;

(२२) विक्रमादित्य (चतुर्थ)—चालुक्य नृपती, अय्यण (प्रथम) चा पुत्र; (२३) बोंथादेवी—चेदि राजकन्या, विक्रमादित्य (चतुर्थ) ची पत्नी; (२४) लक्ष्मण—चेदि राजा, बोंथादेवीचा पिता; (२५) तैल (द्वितीय)—चालुक्य नृपती, विक्रमादित्य (चतुर्थ) चा पुत्र; (२६) कर्कर—तैल (द्वितीय) ने जिकलेला राष्ट्रकूट नृपती; (२७) रणस्तंभ—तैल (द्वितीय) ने जिकलेला राष्ट्रकूट नृपती; (२८) जाकव्वा—भम्महाची कन्या, तैल (द्वितीय) ची पत्नी; (२९) भम्मह—रट्ट राजा, जाकव्वाचा पिता; (३०) सत्याश्रय (द्वितीय)—चालुक्य नृपती, तैल (द्वितीय) चा पुत्र; (३१) दशवर्मन्—चालुक्य नृपती, सत्याश्रय (द्वितीय) चा धाकटा भाऊ; (३२) भाग्यवती—दशवर्म्याची पत्नी; (३३) विक्रमादित्य (पाचवा)—चालुक्य नृपती, दशवर्म्याचा पुत्र; (३४) जयसिंह (द्वितीय)—दान देणारा चालुक्य नृपती जगदेकमल्ल, विक्रमादित्य (पाचवा) याचा धाकटा भाऊ; (३५) वासुदेवार्य—दान स्वीकारणारा कौशिक गोत्री ब्राह्मण; (३६) रेवणार्य—वासुदेवार्याचा पिता; (३७) श्रीधर—वासुदेवार्याचा पितामह; (३८) प्रोलार्य—महाप्रचंडदंडनायक; (३९) माइपय्य—लेख लिहिणारा प्रोलार्याच्या हाताखालील अधिकारी.

ग्रामनामे.—(१) कोल्लापुर—हल्लीचे कोल्हापूर; (२) मुदुनीर—गुलबर्गा जिल्ह्यातील हल्लीचे मुदनूर. पुढील गावांची ओळख पटत नाही. (३) माडदूरु; (४) जालिहाळु; (५) उणहल्ली; (६) वव्वुलिखेट; (७) गोवन्ति.

६४१. मिरज शिलालेख, शिलाहार विजयादित्य

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेली शिळा मिरज येथील प्रवेशद्वाराच्या भिंतीत बसवलेली आहे.

संदर्भ.—(१) बार्नेट, इ.आय्., १९२७–२८, खंड १९, पृ. ३५–४१.

भाषा व लिपी.—कानडी.

राजवंश व राजा.—शिलाहार महामंडलेश्वर विजयादित्य.

वर्ष व तिथी.—(१) शके १०६५, दुंदुभी संवत्सर, भाद्रपद शुद्ध २, शुक्रवार, (अनियमित), सोमवार, २४ ऑगस्ट, इ. स. ११४२; (२) शके १०६६, रुधिरोग्दारी संवत्सर, माघ वद्य १४, वड्डवार (गुरुवार), शिवरात्री, शुक्रवार, ४ फेब्रुवारी, इ. स. ११४४.

सारांश.—या लेखात वीर बणंज संघाच्या काही प्रतिनिधींनी सेडंबाळ येथे शक संवत् १०६५ मध्ये भरलेल्या सभेमध्ये तेथील प्रमुख शेरिफाने बांधलेल्या शिवमंदिराला बऱ्याच देणग्या दिल्याचे नमूद केले आहे. शके १०६६ मध्ये महामंडलेश्वर विजयादित्याचे अधिकारी भायिपय्य नायक व माळपय्य नायक यांनी त्याच देवळाला काही देणग्या दिल्याचेही नमूद केले आहे. सोवरासि हा या दानाचा विश्वस्त होता.

व्यक्तिनामे.—(१) पृथ्वीसेट्टि—दान देणाऱ्या वीर बणंज श्रेणीचा सभासद; (२) बोप्पणय्य—मिरजेचा राजव्यापारी; (३) वेसपय्यसेट्टि—मोठा व्यापारी; (४) सोवणसेट्टि—दान देणारा व्यापारी; (५) चिक्क चावुंड—बागे गावचा मूळिग; (६) जयसिगद सिरियमसेट्टि—दान देणारा व्यापारी; (७) हेम्मसेट्टि—प्रधानपुरुष (Headman); (८) मल्लसेट्टि—सेट्टिगुत्त; (९) कुवर लक्कसेट्टि—दान देणारा व्यापारी; (१०) निगळद केति सेट्टि—दान देणारा व्यापारी; (११) सूरसेट्टि—दान देणारा व्यापारी; (१२) आकेतसेट्टि—दान देणारा व्यापारी; (१३) चवुडसेट्टि—दान देणारा व्यापारी; (१४) बोंदलव्वे—सेडंबाळ येथील स्त्री (?); (१५) कोप्पसेट्टि—सेडंबाळाचा दान देणारा व्यापारी; (१६) मादिराजय्य—माधवेश्वराचे देऊळ बांधणारा महाप्रभु; (१७) विजयादित्य—शिलाहार महामंडलेश्वर; (१८) भायिपय्य नायक—विजयादित्याचा महाप्रधान; (१९) माळपय्य नायक—मिरिजे प्रांताचा क्रेणिकार; (२०) सोवरासि सिद्धांतिदेव—दान स्वीकारणारा देवळातील आचार्य, दानाचा विश्वस्त.

ग्रामनामे.——(१) अय्यावळे (अहिच्छत्रा)—हल्लीचे विजापूर जिल्ह्यातील ऐहोळे, हुनगुंड तालुका; (२) मिरिंजे—हल्लीचे मिरज; (३)बागे—बागडगे किंवा बागेनाडु असावे. यापुढील गावांची ओळख पटत नाही; (४) वळवाड; (५) दोणिकोडु; (६) तोळकले; (७) कूंडिली; (८) पिरियुगुवार; (९) सेंडेबाळ—हल्लीचे शेडबाळ; (१०) सिरिगुप्पे—हल्लीचे शिरगुप्पी; (११) जुगुळकोप्प—हल्लीचे जुगुळ.

६४२. मिरज ताम्रपट

प्राप्तिस्थळ.——हा ताम्रपट लंडन येथे ब्रिटिश म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.——(१) फ्लीट, इं.अँ., १८८५, खंड १४, पृ. १४०–१४२; (२) तुळपुळे, शं. गो., प्रा.म.को.ले., १९६३, पृ. ३३४–३४०, क्र. ६३.

भाषा व लिपी.——संस्कृत भाषा, कानडी लिपी; मराठी भाषा, प्राचीन वळणाची देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.——चालुक्य नृपती सत्याश्रयदेव.

वर्ष व तिथी.——भाव संवत्सर, ज्येष्ठ, कृष्ण पक्ष, ससिवार, सप्तमी. तुळपुळ्यांच्या मते शक संवत् १०७६ असावे.

सारांश.——वीर सत्याश्रय चक्रवर्ती याने कोपेश्वर देवाजवळ तळ टाकला असताना सैंगोलपा यास ३०० गावांच्या मिरिंजे विभागातील सेलगार गाव करमुक्त करून दान दिला. त्याचप्रमाणे १२ गावांची कोंगुलवलि दान दिली.

व्यक्तिनामे.—— (१) सत्याश्रय—चालुक्य नृपती; (२) सैंगोलपा—दान स्वीकारणारा भीमराय मदहस्तिपादरक्षपालक; (३) गोविंदराय—सत्याश्रयाचा पिता; (४) वीरेय नायक—मूलस्थानदेवाचा माळी; (५) गुंडराणा.

ग्रामनामे.——(१) मिरिंजे—हल्लीचे मिरज; (२) सेलगार–हल्लीचे सलगर. पुढील गावांची ओळख पटत नाही; (३) कोंगुलवलि; (४) बोरेवलि; (५) बेलुवलिके किंवा बेलुवणिके; (६) मदकुणिके.

६४३. मुरुड-जंजिरा ताम्रपट, शिलाहार अपराजितदेव

जिल्हा——कुलाबा तालुका——मुरुड

प्राप्तिस्थळ.——हा ताम्रपट मुरुड येथे एका चपराशाच्या घराच्या आवारात मिळाला, सध्या हा बडोदा येथील म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.——(१) प्रोसिडिंग्ज अँड ट्रँन्झॅक्शन्स, ऑ.इं.ओ.कॉं., १९३७, पृ. ८८०; (२) गद्रे, ए. एस्., इं. फ्रॉम बडोदा, १९४३, पृ. ३५–५५.

भाष व लिपी.——संस्कृत; इ. स. १० व्या शतकातील नागरी लिपी.

राजवंश व राजा.——शिलाहार नृपती अपराजितदेव.

वर्ष व तिथी.——शके ९१६(५), श्रावण बहुल १५, रविवार, विजय संवत्सर, सूर्यग्रहण २० ऑगस्ट इ. स. ९९३.

सारांश.——हा ताम्रपट शिलाहार महामंडलेश्वर अपराजितदेव याच्या कारकिर्दीतील आहे. हा ताम्रपट दोन भागात आहे. एका भागात राष्ट्रकूटांची कक्क (द्वितीय) पर्यंत वंशावळ दिलेली असून दुसऱ्या भागात शिलाहारांची वंशावळ दिलेली आहे. पुरी कोंकण १४०० मधील चिखलाड जिल्ह्यातील विहले क्षेत्रातील जमीन दान दिल्याचे पहिल्या भागात

नमूद केले आहे. दान स्वीकारणारा काश्यप गोत्री हरिदेवपुत्र कोलम हा खेटकचा रहिवासी होता. हे शासन स्थानकहून दिले होते. या लेखात अमात्य अम्मणैय व सांधिविग्रहिक झंझमैय यांची नावे नमूद केली असून हे शासन कायस्थ चक्कैय याचा पुत्र उद्दाम याने लिहिले. दुसऱ्या भागात पाणाड भागातील सालणक गावातील फळांची बाग हरिदेवपुत्र कोलम याला दान दिल्याचे नमूद केले आहे. यात अमात्य केशपार्य या नावाचा उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—(१) गोविंद (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती; (२) कर्कराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती; (३) इंद्रराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती; (४) दंतिवर्मन् (दंतिदुर्ग)—राष्ट्रकूट नृपती, इंद्रराज (प्रथम) चा पुत्र; (५) कृष्णराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, कर्कराज (प्रथम) चा पुत्र; (६) गोविंदराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती; (७) ध्रुव (प्रथम) (ध्रुवांक)—राष्ट्रकूट नृपती, गोविंदराज (द्वितीय) चा धाकटा भाऊ; (८) जगत्तुंग गोविंद (तृतीय)—राष्ट्रकूट नृपती, ध्रुव (प्रथम) चा पुत्र; (९) अमोघवर्ष (प्रथम)—राष्ट्रकूटनृपती; (१०) कृष्णराज (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, अमोघवर्ष (प्रथम) चा पुत्र; (११) इंद्रदेव (तृतीय)—राष्ट्रकूट नृपती नित्यवर्ष, जगत्तुंगाचा पुत्र; (१२) अमोघवर्ष (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, इंद्रदेव (तृतीय) चा पुत्र; (१३) गोविंद (चतुर्थ)—राष्ट्रकूट नृपती सुवर्णवर्ष, अमोघवर्ष (द्वितीय) चा धाकटा भाऊ; (१४) वड्डिगदेव—राष्ट्रकूट नृपती, इंद्रदेव (तृतीय) नित्यवर्ष याचा धाकटा भाऊ, गोविंद (चतुर्थ) चा चुलता; (१५) कृष्णराज (तृतीय)—राष्ट्रकूट नृपती; (१६) खोट्टिग—राष्ट्रकूट नृपती, कृष्णराज (तृतीय) चा धाकटा भाऊ; (१७) कक्कल किंवा कर्क (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, निरुपमाचा पुत्र; (१८) निरुपम—राष्ट्रकूट नृपती, कृष्ण (तृतीय) व खोट्टिग यांचा धाकटा भाऊ; (१९) कपर्दी (प्रथम)—शिलाहार नृपती; (२०) पुलशक्ति—शिलाहार नृपती, कपर्दी (प्रथम) चा पुत्र; (२१) कपर्दी (द्वितीय)—शिलाहार नृपती, पुलशक्तीचा पुत्र; (२२) वप्पुवन्न—शिलाहार नृपती, कपर्दी (द्वितीय) चा पुत्र; (२३) झंझ—शिलाहार नृपती, वप्पुवण्णाचा पुत्र; (२४) गोग्गि किंवा ईर्मडिझंझ—शिलाहार नृपती, झंझाचा भाऊ; (२५) नागम—गोग्गीचा सचिव; (२६) वज्जडदेव—शिलाहार नृपती; (२७) अपराजित—दान देणारा शिलाहार नृपती, वज्जडदेवाचा पुत्र; (२८) कोलम—दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण; (२९) हरिदेव—कोलमाचा पिता; (३०) अम्मणैय—अमात्य; (३१) झंझमैय—सांधिविग्रहिक; (३२) उद्दाम—लेख लिहिणारा कायस्थ; (३३) चक्कैय—उद्दामाचा पिता. दुसऱ्या भागात वरील राष्ट्रकूट व शिलाहार नृपतींची नावे असून हरिदेव हाच दान स्वीकारणारा ब्राह्मण आहे. याशिवाय पुढील नावे आली आहेत—(१) केशपार्य—अमात्य; (२) रुद्रोपाध्याय—ब्राह्मण; (३) सीहप्पैय—ब्राह्मण.

ग्रामनामे.—(१) मान्यखेटक—हल्लीचे मानखेड, राष्ट्रकूटांचे मुख्य स्थान; (२) तगरपूर—उस्मानाबाद जिल्ह्यातील हल्लीचे तेर; (३) संयानभूमि—हल्लीचे संजान; (४) पुणकदेश—हल्लीचा पुणे परिसर; (५) खेटक—पुणे जिल्ह्यातील हल्लीचे खेड; (६) चिपुलण—रत्नागिरी जिल्ह्यातील हल्लीचे चिपळूण; (७) संगमेश्वर—रत्नागिरी जिल्ह्यातील हल्लीचे संगमेश्वर; (८) चंद्रपूर—कोकणातील हल्लीचे चांदोर; (९) करहाट—हल्लीचे कऱ्हाड; (१०) मज्झिग्राम—हल्लीचे माजगाव; (११) स्थानक—हल्लीचे ठाणे; (१२) विहले—हल्लीचे वेलस्ले; (१३) मानेचोली व (१४) कोटिलेवल्ली—ओळख पटत नाही. दुसऱ्या भागात याशिवाय पुढील ग्रामनामे आहेत—(१) पाणाड—हल्लीचे पेण असावे; (२) चम्मेलेवाखाडी—हल्लीचे चिखलपाखाडी असावे; (३) सालणक—हल्लीचे मुरुड-जंजिरा असावे.

६४४. मुंदखेडे ताम्रपट, सेंद्रक जयशक्ती

जिल्हा—**पूर्व खानदेश** तालुका—**चाळीसगाव**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट मुंदखेडे येथील पाटलाच्या जवळ सापडला.

संदर्भ.—(१) चांदोरकर, जी. के., **प्रभात,** खंड १, क्र. १२; **भा.इ.सं.मं.**, वार्षिक, शके १८३४, पृ. १६९–१७८; (२) मिराशी, वा. वि., **इ.आय्.** १९५१–५२, खंड २९, पृ. ११६–१२१.

भाषा व लिपी.---संस्कृत; दाक्षिणात्य वळणाची.

राजवंश व राजा.---सेंद्रक नृपती जयशक्ति.

वर्ष व तिथी.---फाल्गुन वद्य १०, शके ६०२, १८ फेब्रुवारी, इ. स. ६८१.

सारांश.---हा ताम्रपट सेंद्रक नृपती जयशक्ती याच्या राजवटीतील असून या ताम्रपटाचा मुख्य उद्देश नृपतीने कुंडलिकामल विषयातील सेणाणा हे गाव कल्लिवनचा रहिवासी काश्यप गोत्री ब्राह्मण बप्पस्वामी याला दान दिले हे नमूद करण्याचा होता. हे शासन सांधिविग्रहिक राम याने लिहिले.

व्यक्तिनामे.---(१) भानुशक्ति---सेंद्रक नृपती; (२) आदित्यशक्ति---सेंद्रक नृपती, भानुशक्तीचा पुत्र; (३) निकुंभाल्लशक्ति---सेंद्रक नृपती, आदित्यशक्तीचा पुत्र; (४) जयशक्ति---दान देणारा सेंद्रक नृपती, निकुंभाल्लशक्तीचा पुत्र; (५) बप्पस्वामी---दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा; (६) रेवस्वामी---बप्पस्वामीचा पिता; (७) राम---शासन लिहिणारा सांधिविग्रहिक.

ग्रामनामे.---(१) कुंदलिकामल---खानदेशात नांदगावच्या पश्चिमेस १४ मैलांवर असलेले कुंदलगाव असावे; (२) सेणाणा---मिराशींच्या मते नांदगावच्या वायव्येस १० मैलांवर असलेले हल्लीचे सौंदणे असावे; (३) जयपुरद्वारि---नांदगावच्या उत्तरेस ७ मैलांवरील जेऊर असावे; (४) कल्लिवन---नाशिक जिल्ह्यातील हल्लीचे कळवण.

६४५. मुंबई विद्यापीठ शिलालेख

प्राप्तिस्थळ.---हा लेख असलेली बुद्धमूर्ति भगवानलाल इंद्रजींजवळ होती. सध्या ही मूर्ती मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयात आहे.

संदर्भ.---भांडारकर, डी. आर्., **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८९८--१९०२, खंड २०, पृ. २६९--३०२.

भाषा व लिपी.---मिश्र भाषा; कुषाणकालीन लेखांप्रमाणे.

राजवंश व राजा.---कुषाण नृपती हुविष्क.

वर्ष व तिथी.---वर्षा ऋतूतील ३ ऱ्या महिन्यातील १५ वा दिवस, देवपुत्र हुविष्क याचे ४५ वे शासन वर्ष.

सारांश.---हा लेख कुषाण नृपती हुविष्क याच्या अमदानीतील आहे. या लेखाचा मुख्य उद्देश खसिचा नामक स्त्री उपासिकेने शाक्यमुनीच्या मूर्तीची आळिका येथील रोशिक विहारात स्थापना केली हे नमूद करणे हा होता. हा लेख या मूर्तीच्या खालच्या बैठकीवर कोरलेला आहे.

व्यक्तिनामे.---खसिचा---उपासिका स्त्री.

ग्रामनामे.---आळिका---ओळख पटत नाही.

६४६. मेथी शिलालेख, यादव कृष्ण.

जिल्हा---**धुळे** तालुका---**सिंदखेड**

प्राप्तिस्थळ.---हा लेख मेथी येथील अनंतशयन मंदिराच्या मधल्या दालनाच्या प्रवेशद्वाराच्या वरच्या पट्टीवर (Lintel) कोरलेला आहे.

संदर्भ.---देसाई, पी. बी., **इ. आय्.**, १९४९--५०, खंड २८, पृ. ३१२--३२०.

भाषा व लिपी.—अशुद्ध संस्कृत; इ. स. १३ व्या शतकातील नागरी लिपी.

राजवंश व राजा.—यादव नृपती कृष्ण.

वर्ष व तिथी.—वैशाख शुद्ध ११, जयनी, सोम, आनंद संवत्सर, शके ११७६, बुधवार, २९ एप्रिल, इ. स. १२५४. (जयनी हे एकादशीचे नाव असावे)

सारांश.—या लेखात कृष्ण याने कुरुकवाटक हे गाव दान दिल्याचे नमूद केले आहे. कुरुकवाटक या खेड्याचे अर्धे उत्पन्न भद्रहरी या देवतेची पूजा, नैवेद्य यासाठी व अर्धे उत्पन्न यज्ञकर्म करणाऱ्या ब्राह्मणांना मिळावे असे यात नमूद केले आहे.

व्यक्तिनामे—(१) दृढप्रहार; (२) सेउन्न; (३) धाडिपक; (४) भिल्लम; (५) वादुगि; (६) भिल्लम; (७) वेसुगिदेव; (८) भिल्लम; (९) सेउन्नराज; (१०) मालुगि; (११) कृष्ण; (१२) भिल्लम; (१३) जैत्र; (१४) सिंघण; (१५) जैत्र; (१६) कृष्ण. ही सर्व व्यक्तिनामे यादव नृपतींची म्हणून सांगितली आहेत. त्यांचा परस्पर संबंध या लेखात स्पष्ट केलेला नाही. वृत्ति स्वीकारणाऱ्या ब्राह्मणांची नावे पुढीलप्रमाणे—(१७) लोलिग अग्निहोत्री, कौंडिन्य गोत्र; (१८) आता पाठक, भारद्वाज गोत्र; (१९) दामोदर भट्ट, भारद्वाज गोत्र; (२०) वील्हण पाठक, भारद्वाज गोत्र; (२१) सोमनाथ पाठक, कृष्णात्र (कृष्णात्रेय?) गोत्र; (२२) नागदेव पाठक, अगस्ति गोत्र; (२३) नारायण भट्ट, सांकर गोत्र; (२४) राम उपाध्या, काड्वसगोत्र (२५) महेस्व(श्व)र ज्योतिषी, कौंडिन्य गोत्र; (२६) वासुदेव पाठक, कौंडिन्य गोत्र; (२७) हरदेव भट्ट, कौंडिन्य गोत्र; (२८) सारंग पाठक, सां(शां)डिल्य गोत्र; (२९) सूल्हण पाठक, भार्गव गोत्र; (३०) केशव अवस्थी, काश्यप गोत्र; (३१) सारंग पाठक, काश्यप गोत्र; (३२) कृष्ण पंडित, काश्यप गोत्र; (३३) सारंग उपाध्या, काश्यप गोत्र; (३४) कृष्ण भट्ट, वच्छीसगोत्र; (३५) महादेव शुक्ल, वच्छपुरोध गोत्र; (३६) महादेव पाठक, कौशिक गोत्र; (३७) जगधर पाठक, कौशिक गोत्र; (३८) रामदेव पाठक, लोहित गोत्र; (३९) गांगैया पाठक, वाछ्चा (त्स्या)यन गोत्र; (४०) विष्णु पाठक, कौरव्य गोत्र; (४१) महादेव पाठक, कौरव्य गोत्र; (४२) लक्ष्मीधर पंडित—पौराणिक वृत्ती शाश्वत करणारा ब्राह्मण; (४३) सिद्ध सारस्वत—लेखासाठी शिला तयार करणारा; (४४) गंगाधर—घर, जमीन व द्रव्य दान देणारा; (४५) हेमदेव—लेख कोरणारा. (गोत्रांची नावे बरीच अशुद्ध आहेत).

ग्रामनामे.—कुरुकवाटक—मेथीच्या जवळ असलेले हल्लीचे करूकवाडे असावे.

६४७. मेहकर शिलालेख

जिल्हा—**बुलढाणा** तालुका—**मेहकर**

प्राप्तिस्थळ.—हा लेख जैन मूर्तीच्या खालच्या बैठकीवर लिहिलेला आहे.

संदर्भ.—इं.अ.रि., १९६९–७०, पृ. ४८, क्र. २४.

भाषा व लिपी.—संस्कृत; लिपीचा उल्लेख नाही.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—शके १२७२, इ. स. १३५०.

सारांश.—या लेखात आचार्य श्रीकीर्ति हे नाव दिलेले असून कंधारवंशीय श्रेष्ठी सिंह याचा प्रणाम नमूद केला आहे.

व्यक्तिनामे.—(१) श्रीकीर्ति—आचार्य; (२) सिंह—कंधारवंशीय श्रेष्ठी.

६४८. मेहुणबरे ताम्रपट, सेंद्रक वैरदेव.

जिल्हा—जळगाव तालुका—चाळीसगाव

प्राप्तिस्थळ.—हा लेख मेहुणबरे येथे सापडला. सध्या हा ताम्रपट भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे येथे आहे.

संदर्भ.—(१) सरकार, डी. सी., अ. रि., १९५७–५८, क्र. ए. १३; (२) गै, जी. एस्. इ.आय्., १९६३–६४, खंड ३५, पृ. १९३–१९७.

भाषा व लिपी.—संस्कृत; लिपी दाक्षिणात्य वळणाचा पश्चिमेकडील प्रकार.

राजवंश व राजा.—सेंद्रक निकुंभ नृपती वैरदेव.

वर्ष व तिथी.—शके ६२४, श्रावण वद्य ११, संक्रांत व्यतीपात, सोमवार, २४ जुलै, इ. स. ७०२ किंवा गुरुवार, २५ जुलै, इ. स. ७०२ (परंतु या दिवशी संक्रांत येत नाही.)

सारांश.—हे ताम्रशासन बहलापुरीहून दिलेले असून वैरदेवाने बहलापुरीच्या पश्चिमेस दोन गव्यूति अंतरावर असलेले देवीग्राम कांचीपुरीचा रहिवासी काश्यप गोत्री षडंगवित् ब्राह्मण नंदीस्वामी याचा पुत्र नागशर्मन् याला दान दिल्याचे या शासनात नमूद केले आहे. या दानाचा उपयोग बलि, चरु, अग्निहोत्र इत्यादीसाठी व्हावा असे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) वैरदेव—दान देणारा सेंद्रक-निकुंभ वंशीय नृपती; (२) दंडिराज—सेंद्रक निकुंभ नृपती, वैरदेवाचा पिता; (३) देवशक्ति—सेंद्रक-निकुंभ नृपती, वैरदेवाचा पितामह; (४) नागशर्मन्—दान स्वीकारणारा सांगोपनिषद्वेदविद् ब्राह्मण; (५) नंदिस्वामी—नागशर्म्याचा पिता, षडंगविद्; (६) रेवस्वामी—नागशर्म्याचा पितामह, चतुर्वेदी; (७) सौअक—लेख लिहिणारा महासांधिविग्रहाधिकृत.

ग्रामनामे.—(१) वहलापुरी—खानदेशातील हल्लीचे बहाळ; (२) देवीग्राम—बहाळच्या पश्चिमेस सहा मैलांवरील देवगाव असावे; (३) कांचीपूर—हल्लीचे कांची.

६४९. येवती मराठी ताम्रपट

जिल्हा—उस्मानाबाद तालुका—तुळजापूर

प्राप्तिस्थळ.—दिलेले नाही.

संदर्भ.—इं.अ.रि., १९६४–६५, पृ. ६०, क्र. ५२.

भाषा व लिपी.—मराठी; मोडी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात नलदुर्ग येथील नव्या बुरजाच्या पायामध्ये गरोदर स्त्री जिवंत पुरण्यास देणाऱ्याचे काही खास अधिकार (हक्क) नमूद केले आहेत.

व्यक्तिनामे.—उल्लेख नाही.

ग्रामनामे.—नलदुर्ग.

६५०. राजवाडे संशोधन मंडळ ताम्रपट

जिल्हा—**उल्लेख नाही** तालुका—**उल्लेख नाही**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट सध्या धुळे येथे राजवाडे संशोधन मंडळात आहे.

संदर्भ.—मिराशी, वा. वि., दीक्षित, मो. गं. इ.आय्., १९३९–४०, पृ. १६४–१७१.

भाषा व लिपी.—संस्कृत; नागरी.

राजवंश व राजा.—सिंदवंशीय महासामंत आदित्यवर्मन्.

वर्ष व तिथी.—क्रोधन संवत्सर, चैत्र अमावास्या, आदित्यग्रहणपर्व, शके ८८७, सोमवार, ६ मार्च, इ. स. ९६५.

सारांश.—या लेखाचा मुख्य उद्देश कौंडिण्य गोत्री ब्राह्मण चंद्रभट्टाचा पुत्र नवशिव याला दोन खेडी मिळाली हे नमूद करणे हा आहे. हा ताम्रपट आदित्यवर्मन् याने जुन्निनगरहून दिलेला आहे.

व्यक्तिनामे.—(१) आदित्यवर्मन्—सिंद वंशीय महासामंत; (२) नवशिव—दान स्वीकारणारा कौंडिण्य गोत्री ब्राह्मण; (३) चंद्रभट्ट—नवशिवाचा पिता; (४) भीम—आदित्यवर्म्याचा पिता; (५) मुंज—आदित्यवर्म्याचा पितामह.

ग्रामनामे.—(१) किणिहिका—पुण्याच्या वायव्येस १६ मैलांवर इंद्रायणी नदीच्या तीरावरील किन्हई; (२) जुन्निनगर—पुण्याच्या उत्तरेस असलेले जुन्नर; (३) रामतीर्थिका—ओळख पटत नाही.

पहा, क्र. ६१२

६५१. राजपुरी शिलालेख, सोमनाथदेव

जिल्हा—**सातारा** तालुका—**जावळी**

प्राप्तिस्थळ.—हा लेख राजपुरी येथील शैलगृहात कोरलेला आहे.

संदर्भ.—तुळपुळे, शं. गो., **प्रा.म.को.ले.** १९६३, पृ. ३८१–३८४, क्र. ७६.

भाषा व लिपी.—मराठी; इ. स. १० व्या, ११ व्या शतकातील देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—प्रजापती संवत्सर, अंदाजे इ. स. ११ वे शतक.

सारांश.—प्रस्तुत लेखात राजपुरी येथील सोमनाथाच्या देवळाचा इतिहास आलेला आहे. या दैवताचा प्रथम अवतार जलसंपात (किंवा जलसंपत्ति) देवाने जेव्हा सोमभुविनीस उपदेश केला तेव्हा झाला. पुढे सोमनाथास श्रीपती नायकाच्या वंशातील कोणा विनायकाने उंच नेले व त्याच्या वंशातील ईदोप्प नामक व्यक्तीने सोमनाथाचे देऊळ बांधले.

व्यक्तिनामे.—(१) श्रीपती नायक; (२) ददृनायक—श्रीपती नायकाचा पिता; (३) विनायक; (४) इदोप्प.

ग्रामनामे.—(१) वणग्रह—राजपुरीच्या उत्तरेस २–३ मैलांवरील आजचे वणघर; (२) वांवधन—राजपुरीच्या पूर्वेस व वाईच्या दक्षिणेस तीन मैलांवरील बांवधन.

६५२. रानवड शिलालेख, शिलाहार सोमेश्वर

जिल्हा—**कुलाबा** तालुका—**उरण**

प्राप्तिस्थळ.—हा लेख रानवड येथे मिळाला. सध्या हा लेख मुंबई येथील प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—(१) सांकलिया व उपाध्याय, **इ.आय्.**, १९३५–३६, खंड २३, पृ. २७८–२७९; (२) तुळपुळे, शं. गो., **प्रा.म.को.ले.**, १९६३, पृ. १५६–१६०, क्र. ३२.

भाषा व लिपी—संस्कृत–मराठी मिश्रण; इ. स. १२ व्या किंवा १३ व्या शतकातील देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती सोमेश्वरदेव.

वर्ष व तिथी.—शके ११८१, सिद्धार्थ संवत्सर, चैत्र वद्य १५, गुरुवार, २४ एप्रिल, इ. स. १२५९.

सारांश.—हा लेख शिलाहार नृपती सोमेश्वरदेव याच्या अमदानीतील आहे. या लेखाचा मुख्य उद्देश राजाने दामोदरभट्ट व वासुदेवभट्ट यांना नारळ अर्पण करून संक्रांतिपर्वाच्या निमित्ताने दामोदरभट्टाच्या उरणे व पडिवसे या गावातील खंडपलास्थानिचा (खंडप्रलय स्थानीचा) एक भाग, देऊळेखंड संपूर्ण व तीन वृत्ति दामोदरभट्टाच्या भावांना दान दिल्या हे नमूद करणे हा होता. (तारीख अनियमित आहे)

व्यक्तिनामे.—(१) सोमेश्वरदेव—शिलाहार नृपती; (२) झंपडप्रभु—महामात्य; (३) तैज प्रभु—महासांधिविग्रहिक; (४) दादप्रभु—श्रीकरण; (५) दामोदरभट्ट—दान स्वीकारणारा ब्राह्मण; (६) वासुदेवभट्ट—दान स्वीकारणारा ब्राह्मण.

ग्रामनामे.—(१) उरणे—कुलाबा जिल्ह्यातील हल्लीचे उरण; (२) पडिवसे—उरणपासून २ मैलांवरील फुंडे किंवा ३ मैलांवरील पांजे असावे. (सांकलिया-उपाध्याय).

६५३. रामटेक ताम्रपट, प्रवरसेन (द्वितीय)

जिल्हा—**नागपूर** तालुका—**रामटेक**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट मनसर येथे मिळाला.

संदर्भ.—(१) हिरालाल, **इं.सी.पी.ॲन्ड बेरार**, १९५२, पृ. ४–५; (२) मिराशी, वा. वि., **कॉ.इं.इं.**, १९६३, खंड ५, पृ. ७३–७५.

भाषा व लिपी.—संस्कृत; दाक्षिणात्य वळणाची पेटिकाशीर्षक लिपी.

राजवंश व राजा.—हा लेख वाकाटक नृपती प्रवरसेन (द्वितीय) याचा असावा.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—हा ताम्रपट पूर्ण उपलब्ध नसल्यामुळे यातील मजकुराविषयी निश्चित काही सांगता येत नाही. उपलब्ध भागात दान दिलेल्या गावाबद्दल मजकूर आढळतो.

६५४. रामटेक शिलालेख, यादव रामचंद्र

प्राप्तिस्थळ.—हा लेख रामटेक येथील लक्ष्मण मंदिराच्या द्वाराच्या उजव्या हाताच्या भिंतीत बसवलेल्या शिळेवर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) कनिंगहॅम, **अ.स.रि.**, खंड ७, पृ. ११२; (२) मिराशी, वा. वि., व कुलकर्णी, एल्. आर्., **इ.आय्.**, १९३९–४०, खंड २५, पृ. ७–२०.

भाषा व लिपी.——संस्कृत; इ. स. १३ व्या शतकातील नागरी लिपी.

राजवंश व राजा.——(बहुधा) यादव नृपती सिंघण व रामचंद्रदेव.

वर्ष व तिथी.——उल्लेख नाही. (अंदाजे इ. स. १३ व्या शतकाच्या शेवटी).

सारांश.——हा लेख त्रोटक असल्यामुळे सुसंगत अर्थ लागत नाही. कदाचित राघव नावाच्या व्यक्तीने या मंदिराच्या बांधकाम वगैरेची जी व्यवस्था केली त्याची नोंद करणे हा या लेखाचा उद्देश असावा. लेखाच्या शेवटी माइदेव नामक अधिकाऱ्याचा उल्लेख आलेला आहे.

व्यक्तिनामे.——(१) सिंहण——यादव नृपती; (२) रामचंद्रदेव——यादव नृपती; (३) राघव——रामचंद्रदेवाचा अधिकारी; (४) वायिनायक——राघवदेवाचा पिता; (५) माइदेव——स्थानिक अधिकारी.

६५५. रामलिंग मुद्गड, चालुक्य शिलालेख

जिल्हा—उस्मानाबाद तालुका——निलंगा

प्राप्तिस्थळ.——दिलेले नाही.

संदर्भ.——इं.अ.रि., १९६४–६५, पृ. ६०, क्र. ५१.

भाषा व लिपी.——कन्नड.

राजवंश व राजा.——कल्याणचा चालुक्य नृपती विक्रमादित्य ६ वा.

वर्ष व तिथी.——चालुक्य विक्रम संवत् ३२, इ. स. ११०७.

सारांश.——या लेखात दंडनायक नरवैद्य नारायण भट्टाने स्वतः मुदगोलु येथे स्थापन केलेल्या नीलकंठेश्वराला दिलेली जमिनीची देणगी नमूद केली आहे.

व्यक्तिनामे.——(१) विक्रमादित्य ६ वा——चालुक्य नृपती; (२) नारायण भट्ट——दान देणारा दंडनायक नरवैद्य.

ग्रामनामे——मुदगोलु.

६५६. राय शिलालेख, जयकेशी (प्रथम)

जिल्हा——ठाणे तालुका——सालसेट

प्राप्तिस्थळ.——हा लेख फादर हेरास यांना सालसेट तालुक्यात राय येथे मिळाला. हल्ली हा मुंबई येथे सेंट झेवियर कॉलेजमध्ये भारत इतिहास संशोधन संस्थेच्या संग्रहालयात आहे.

संदर्भ.——(१) मोराएस, कदंब कुल, १९३१, पृ. ४०१, क्र. ३; (२) गुणे, टी.व्ही., ए.आर्.जी., १९६६, क्र. ३.

भाषा व लिपी.——कल्ले, कानडी.

राजवंश व राजा.——गोव्याचा कदंब नृपती जयकेशी (प्रथम).

वर्ष व तिथी.——सोमवार, ज्येष्ठ वद्य १४, विरोधकृत् संवत्सर, शके ९९३, इ. स. १०७१.

सारांश.——या लेखात जयकेशी (प्रथम) राज्य करीत असताना वल्पियपूरचा राजा भूप याचा सरदार गोमरसिम हा युद्धात मृत्यु पावल्याचा उल्लेख आहे. हा लेख त्रोटक आहे.

व्यक्तिनामे.—(१) जयकेशी (प्रथम)–कदंब नृपती; (२) भूप–वप्तियपूरचा नृपती; (३) गोमरसिम–युद्धात मृत्यु पावलेला भूपाचा सरदार.

ग्रामनाम.—वप्तियपूर.

६५७. रायगड ताम्रपट, विजयादित्य

जिल्हा—कुलाबा तालुका—महाड

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट रायगडच्या पाटलाजवळ मिळाला.

संदर्भ.—(१) पाठक, के. बी., इ.आय्., १९०९–१०, खंड १०, पृ. १४–१७.

भाषा व लिपी.—संस्कृत.

राजवंश व राजा.—वदामीचा चालुक्य नृपती विजयादित्य सत्याश्रय.

वर्ष व तिथी.—८ वे शासनवर्ष, शके ६२५, इ. स. ७०३.

सारांश.—या शासनाचा मुख्य उद्देश चालुक्य नृपती विजयादित्य याने आपल्या करहाटकातील मरिवसति या विजयी तळावरून तालिटहार विषयातील जल्लग्राम व निरूळणग्राम ही गावे शांडिल्यगोत्री देव दीक्षितांचा पुत्र नाथेर चतुर्वेदी याला दान दिले हे नमूद करणे हा होता. हा ताम्रपट निरवद्य पुण्यवल्लभ याने लिहिला.

व्यक्तिनामे.—(१) पुलकेशिवल्लभ—चालुक्य नृपती; (२) कीर्तिवर्मन्—चालुक्य नृपती, पुलकेशीवल्लभाचा पुत्र; (३) सत्याश्रय—चालुक्य नृपती, कीर्तिवर्म्याचा पुत्र; (४) विक्रमादित्य–चालुक्य नृपती, सत्याश्रयाचा पुत्र; (५) विनयादित्य—चालुक्य नृपती, विक्रमादित्याचा पुत्र; (६) विजयादित्य–चालुक्य नृपती, विनयादित्याचा पुत्र, (७) नाथेर चतुर्वेदी–दान घेणारा शांडिल्य गोत्री ब्राह्मण; (८) देव दीक्षित—नाथेर चतुर्वेदीचा पिता; (९) निरवद्य पुण्यवल्लभ—शासन लिहिणारा; (१०) अन्नस्वामी—नाथेर चतुर्वेदीचा पितामह.

ग्रामनामे.—(१) जल्लग्राम—ओळख पटत नाही; (२) निरूळणग्राम—ओळख पटत नाही; (३) करहाटक—हल्लीचे कऱ्हाड.

६५८. रायबाग शिलालेख

जिल्हा—कोल्हापूर तालुका—रायबाग

प्राप्तिस्थळ.—हा लेख रायबाग येथे मिळाला. सध्या हा लेख कोल्हापूर येथील आर्यविन शेतकी संग्रहालयात आहे.

संदर्भ.—कुंदनगर, इ.नॉ.क.को., १९३९, पृ. ७५–७६, क्र. ६.

भाषा व लिपी.—कानडी.

राजवंश व राजा.—चालुक्य नृपती भूलोकमल्ल.

वर्ष व तिथी.—गुरुवार, वैशाख शुद्ध ३, प्लवंग संवत्सर, चालुक्य विक्रम संवत् ५१, शके १०४९, शनिवार (मेळ जमत नाही.) १६ एप्रिल, इ. स. ११२७.

सारांश.—वर उल्लेखिलेल्या तिथीला केरेयेलीच्या केशवेश्वराला नैवेद्य दाखवण्यासाठी व पूजेसाठी १६ मत्तर जमीन व एक बगीचा व पुजाऱ्याला रहाण्यासाठी घर दान दिले असे या लेखात नमूद केले आहे. दान देणाऱ्याचे पूर्ण नाव उपलब्ध नाही.

व्यक्तिनामे.—भूलोकमल्लदेव—चालुक्य नृपती.

ग्रामनामे.—(१) हुविनबागे; (२) केरेंयेलि; (३) प्रयाग—हल्लीचे प्रयाग. पहिल्या दोन गावांची ओळख पटत नाही.

६५९. रायबाग शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख रायबाग येथील जैन मंदिरात मिळाला.

संदर्भ.—(१) ग्रॅहॅम, **कोल्हापूर**, पृ. ४१५–४१७, क्र. ९; (२) फ्लीट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८७१–७४, खंड १०, पृ. १८३.

भाषा व लिपी.—संस्कृत; कानडी.

राजवंश व राजा.—रट्ट नृपती कार्तवीर्य (द्वितीय).

वर्ष व तिथी.—शके ११२४, दुर्मति संवत्सर, वैशाख पौर्णिमा, व्यतीपात, शुक्रवार, इ. स. १२०२.

सारांश.—या लेखाचा मुख्य उद्देश कार्तवीर्यदेवाने त्याची माता चंद्रिका महादेवी हिने बांधलेल्या जैन मंदिराच्या व्यवस्थेसाठी मुख्य उपाध्याय शुभचंद्र भट्टारक यास काही देणग्या दिल्या हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) कृष्ण—रट्टकुलाचा मूळ पुरुष; (२) कार्तवीर्य (प्रथम)—रट्ट नृपती; (३) लक्ष्मीदेव—रट्ट नृपती, कार्तवीर्य (प्रथम) चा पुत्र; (४) चंद्रिका महादेवी—लक्ष्मीदेवाची पत्नी, कार्तवीर्य (द्वितीय) ची माता; (५) कार्तवीर्य (द्वितीय)—दान देणारा रट्टनृपती, लक्ष्मीदेवाचा पुत्र; (६) शुभचंद्र भट्टारक—दान स्वीकारणारा मुख्य उपाध्याय, कुंदान्वयातील आचार्य.

ग्रामनामे.—वेणुग्राम—कार्तवीर्य (द्वितीय) ची राजधानी.

६६०. रायबाग शिलालेख, दासिमरसु

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख रायबाग येथे सापडला. सध्या हा शिलालेख कोल्हापूर येथील आर्यविन शेतकी संग्रहालयात आहे.

संदर्भ.—(१) फ्लीट, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८७१–७४, खंड १०, पृ. १८३–१८४; (२) कुंदनगर, **ज. बॉ. हि. सो.**, १९३०, खंड ३, पृ. १९२–२००.

भाषा व लिपी.—संस्कृत कानडी मिश्रण; कानडी.

राजवंश व राजा.—कल्याणचा चालुक्य नृपती जगदेकमल्ल व त्याचा मांडलिक दंडनायक दासिमरसु.

वर्ष व तिथी.—सिद्धार्थी संवत्सर, जगदेकमल्लाचे २ रे शासनवर्ष, सोमवार, आषाढ वद्य १३, (शके ९४२, इ. स. १०२०) (किंवा शके १०६२, इ. स. ११४०–४१).

सारांश.—हा लेख चालुक्य नृपती जगदेकमल्ल याच्या अमदानीतील आहे. या लेखात जगदेकमल्लाचा मांडलिक दंडनायक दासिमरसु याने कुमार कीर्तिपंडितदेव याला वर उल्लेखिलेल्या तिथीला जैन मंदिराला दिलेली देणगी नमूद केली आहे.

व्यक्तीनामे.—(१) जगदेकमल्ल—चालुक्य नृपती; (२) दासिमरसु—दान देणारा मांडलिक दंडनायक; (३) कीर्तिपंडितदेव—दान स्वीकारणारा; (४) कालिदास—सरदार.

विशेष.—रायबाग म्हणजेच प्राचीन बागे किंवा हूनिनबागे.

६६१. रायबाग शिलालेख, रट्टकार्तवीर्य

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेला शिलाखंड रायबाग येथे मिळाला. सध्या हा शिलालेख कोल्हापूर येथील आर्यविन शेतकी संग्रहालयात आहे.

संदर्भ.—कुंदनगर, के. जी., **इ.नॉ.क.को.**, क्र. २३, पृ. १६९–१७४.

भाषा व लिपी.—कानडी.

राजवंश व राजा.—रट्ट महामंडलेश्वर कार्तवीर्य (द्वितीय).

वर्ष व तिथी.—आषाढ महिन्यातील पहिल्या पंधरवडयातील १० वा दिवस, भाव संवत्सर, शके ५००.

सारांश.—या लेखाचा मुख्य उद्देश रट्ट नृपती एरेग राज्य करीत होता तेव्हा त्याने वर उल्लेखिलेल्या तिथीला मुख्यमंत्री मादिराज याला कुंडी ३,००० मधील मल कुरुंबेट्ट जिल्ह्यातील ४,१०० कंब जमीन व काही मळे दान दिले व इतर देणग्या दिल्या हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) सेन—रट्ट नृपती; (२) लखुमादेवी—सेनची पत्नी; (३) कार्तवीर्य (प्रथम)—रट्ट नृपती, सेनाचा पुत्र; (४) पद्मावती—कार्तवीर्य (प्रथम) ची पत्नी; (५) लक्ष्मीदेव—रट्ट नृपती, कार्तवीर्य (प्रथम) चा पुत्र; (६) चंद्रिकादेवी—लक्ष्मीदेवाची पत्नी; (७) कार्तवीर्य (द्वितीय)–रट्ट नृपती, लक्ष्मीदेवाचा पुत्र; (८) मल्लिकार्जुन–रट्ट नृपती, लक्ष्मीदेवाचा पुत्र; (९) बाचरस—कार्तवीर्य (द्वितीय) चा मांडलिक; (१०) परसियव्वे—बाचरसाची पत्नी; (११) हेम्मणय्य—बाचरसाचा पुत्र, कार्तवीर्य (द्वितीय) चा मंत्री; (१२) चिट्टणय्य—बाचरसाचा पुत्र, कार्तवीर्याचा पुत्र; (१३) कालिमय्य—बाचरसाचा युद्धकलेत निपुण असलेला पुत्र; (१४) चावुंडराय—बाचरसाचा पुत्र, कार्तवीर्य (द्वितीय) चा मंत्री; (१५) एरेगदेवरस—दान देणारा रट्ट नृपती, रट्ट घराण्याचा मूळ पुरुष; (१६) मादिराज—दान स्वीकारणारा कानडी ब्राह्मण, शांडिल्य गोत्र, एरेगदेवाचा मुख्यमंत्री, दंडनायक; (१७) भलारी—दान स्वीकारणारी व्यक्ती; (१८) विनायक—दान स्वीकारणारी व्यक्ती.

ग्रामनामे.—(१) कुंडि; (२) वेणुग्राम; (३) कंकणनूरु; (४) कुरुंबेट्ट; (५) मोदिणी; (६) नागनूरु-या सर्व गावांची ओळख पटवलेली नाही.

६६२. रांजली शिलालेख, शिलाहार हरिपालदेव

जिल्हा—ठाणे तालुका—**वसई**

प्राप्तिस्थळ.—हा लेख नालासोपारा स्टेशनजवळच्या शेतात एका रेल्वे अधिकाऱ्याला मिळाला.

संदर्भ.—(१) दीक्षित, मो. गं., **द.म.इ.सा.**, १९५१, खंड ४, पृ. ६२–६५; (२) तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.**, १९६३, पृ. ४३–४७, क्र. ७.

भाषा व लिपी.—संस्कृत-मराठी मिश्रण; देवनागरी.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती हरिपालदेव.

वर्ष व तिथी.—(१) शके १०७०, इ. स. ११४८; (२) पिंगल संवत्सर, शके १०५९, इ. स. ११३७.

सारांश.—प्रस्तुत लेख हरिपालदेव याच्या अमदानीतील आहे. या लेखाचा मुख्य उद्देश संवत्सर १०७० मध्ये हरिपालदेव राज्य करीत असताना सुर्पारक २,००० विभागातील समुद्रकाठापर्यंत पसरलेली स्वतःच्या मालकीची जमीन श्रीदिवल नायक व इतरांनी एकमताने दान दिली हे नमूद करणे हा होता. तसेच रांजली गावातील एक मळा तेथील जुना धर्मपती व सुर्पारक येथील सहवासी विष्णु उपाध्याला दान दिला असा उल्लेख आहे. यापूर्वी शके १०५९ मध्ये चाटंस विसलदेवाला १० द्रम्म शिल्प व वृत्ति यानिमित्त दान दिले होते असे लेखात शेवटी नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) हरिपालदेव—शिलाहार नृपती; (२) दिवल नायक—दान देणारी व्यक्ती; (३) विष्णु उपाध्या—दान स्वीकारणारी व्यक्ती; (४) चाटंस विसलदेव—दान स्वीकारणारी व्यक्ती.

ग्रामनामे.—(१) सुर्पारक—हल्लीचे सोपारा, ता. वसई, जि. ठाणे; (२) रांजली—सोपाऱ्याच्या आग्नेयेस सुमारे चार मैलांवरील रांजली; (३) माहर—निर्मळच्या नैर्ऋत्येस एक मैलावर व सोपाऱ्यापासून ७ मैलांवर असलेले हल्लीचे माहर.

६६३. रेनापूर शिलालेख

जिल्हा—**बीड** तालुका—**मोमिनाबाद**

प्राप्तिस्थळ.—हा लेख रेनापूर येथे नागनाथाच्या देवळात आढळला.

संदर्भ.—इं. अ. रि., १९६९–७०, पृ. ४८, क्र. २३.

भाषा व लिपी.—मराठी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—शके १६३८, इ. स. १७१६.

सारांश.—हा लेख कान्होजी व बंगजी यांनी लिहिल्याचे या लेखात नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) कान्होजी—लेखक; (२) बंगजी—लेखक.

६६४. रेंदाळ शिलालेख

जिल्हा—**कोल्हापूर** तालुका—**हातकणंगले**

प्राप्तिस्थळ.—हा लेख रेंदाळ येथे मिळाला.

संदर्भ.—(१) किलहॉर्न, इं. स. इं., पृ. ६५, क्र. ३६२.

भाषा व लिपी.—शेवटची ओळ मराठी.

राजवंश व राजा.—यादव नृपती महादेव.

वर्ष व तिथी.—दुर्मति संवत्सर, शके ११८३, इ. स. १२६१.

६६५. रोहिलगड शिलालेख

जिल्हा—**औरंगाबाद** तालुका—**अंबड**

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख बदनापूर वेशीजवळ मिळाला.

संदर्भ.—इं.अ.रि., १९७०–७१, पृ. ४९, क्र. १९.

भाषा व लिपी.—उल्लेख नाही.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—इ. स. १२७०.

सारांश.—या शिलालेखात इ. स. १२७० मध्ये एका पाटलाने कीर्तन मंडप उभारल्याचा उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—उल्लेख नाही.

६६६. लातूर शिलालेख, सोमेश्वर (तृतीय)

जिल्हा–उस्मानाबाद तालुका–लातूर

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख लातूर येथील भूतनाथ मंदिरात मिळाला.

संदर्भ.—खरे, ग. ह., द.म.इ.सा., १९३४, खंड २, पृ. ८४–९०.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ११ व्या शतकातील नागरी लिपी.

राजवंश व राजा.—कल्याणचा चालुक्य नृपती सोमेश्वर (तृतीय).

वर्ष व तिथी.—शके १०४९, प्लवंग संवत्सर, फाल्गुन शुक्ल अष्टमी, शुक्रवार, १० फेब्रुवारी इ. स. ११२८.

सारांश.—या शिलालेखात भूलोकमल्ल (सोमेश्वर) याची वंशावळ दिल्यानंतर लत्तलौर येथील पापविनाशन देवाची स्तुती केलेली आहे.

व्यक्तिनामे.—(१) आहवमल्ल (सोमेश्वर प्रथम)—चालुक्य नृपती; (२) परमर्दि (विक्रमादित्य ६ वा)—चालुक्य नृपती, आहवमल्लाचा पुत्र; (३) भूलोकमल्ल (सोमेश्वर तृतीय)—चालुक्य नृपती, परमर्दीचा पुत्र.

ग्रामनामे.—लत्तलौर–उस्मानाबाद जिल्ह्यातील हल्लीचे लातूर.

विशेष महत्त्व.—या लेखातील वंशावळीत सोमेश्वर (द्वितीय) याचा उल्लेख नाही हे विलक्षण आहे.

६६७. लातूर शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख लातूर येथील सिद्धेश्वर मंदिरात सापडला.

संदर्भ.—खरे, ग. ह., द.म.इ.सा., १९३४, खंड २, पृ. ९०.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. १२ व्या–१३ व्या शतकातील नागरी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही. लिपीच्या आधारे अंदाजे इ. स. १२ वे–१३ वे शतक.

सारांश.—प्रस्तुत लेखात सिद्धेश्वरदेवाला ३६ निवर्तने जमीन दान दिल्याची नोंद केलेली आहे. या देणगीवर ब्राह्मण व तपस्वी यांचा अधिकार नाही असे या लेखात नमूद केले आहे. ज्या खेड्यातील जमीन दानामध्ये मिळाली त्याचे नाव वाचता येत नाही.

६६८. लोनाड शिलालेख, शिलाहार अपरादित्य (द्वितीय)

जिल्हा–**ठाणे** तालुका–**भिवंडी**

प्राप्तिस्थळ.—हा लेख लोनाड येथे मिळाला. सध्या हा लेख मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—(१) दीक्षित, मो. गं., **ज.बि.रि.सो.**, खंड २९, पृ. २१०–२१५; (२) तुळपुळे, शं. गो., **प्रा.म.को.ले.**, १९६३, पृ. ७२–७६, क्र. १४.

भाषा व लिपी.—संस्कृत-मराठी संमिश्र; १२ व्या शतकात दक्षिणेत रूढ असलेली नागरी लिपी.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती अपरादित्य (द्वितीय).

वर्ष व तिथी.—शके ११०६ (गतवर्ष), क्रोधी संवत्सर, कार्तिक वद्य १५, सोमवार, सूर्यग्रहण ५ नोव्हेंबर, इ. स. ११८४.

सारांश.—हा लेख शिलाहार नृपती अपरादित्य (द्वितीय) याचा असून त्याचा महाप्रधान भोपक व्योमशंभु याचाही यात उल्लेख आहे. या महाप्रधानाने राजाच्या अनुमतीने षट्षष्टी विषयातील श्रीचातकेश्वर देवाच्या देहसग्रामांतर्गत वेहरली गावातील एक वाडी सूर्यग्रहणाच्या प्रसंगी व्योमेश्वरदेवास दान दिली. याखेरीज सोमेश्वर देवाला दिलेली काही दानेही या लेखात नमूद केली आहेत. त्यातील काही पोरुत्थ द्रम्मच्या स्वरूपात दिलेली आहेत.

व्यक्तिनामे.—(१) अपरादित्यदेव—शिलाहार नृपती; (२) भोपक व्योमशंभु—दान देणारा महाप्रधान; (३) ईस्व(श्व)रनायक—नवस फेडण्यासाठी दान देणारा; (४) माधव—लेख लिहिणारा भक्त; (५) दिवाकर.

ग्रामनामे.—(१) षट्षष्टी—सध्याचा साष्टी प्रांत; (२) विहरलि—ठाणे जिल्ह्यातील हल्लीचे विहरोली.

६६९. लोनाड शिलालेख, शिलाहार केशिदेव

प्राप्तिस्थळ.—हा लेख लोनाड येथे सापडला.

संदर्भ.—दीक्षित, मो. गं., **अ.भा.ओ.रि.इ.**, खंड २३, पृ. ९८–१०२.

भाषा व लिपी.—अशुद्ध संस्कृत; १२ व्या शतकातील नागरी लिपी.

राजवंश व राजा.—उत्तर कोकणातील शिलाहार नृपती केशिदेव.

वर्ष व तिथी.—शके ११६२, माघ वद्य १४, शिवरात्रि, विकारी संवत्सर, मंगळवार, २४ जानेवारी, इ. स. १२४०.

सारांश.—प्रस्तुत लेखाचा मुख्य उद्देश केशिदेव याने सोमेश्वर मंदिराचा उपाध्याय सोमनायक यास ब्रह्मपुरी हे गाव दान दिले हे नमूद करणे हा होता. याशिवाय सोमेश्वराच्या उपाध्याय संघाला माजसपल्ली हे गाव दान दिल्याचाही उल्लेख या लेखात आहे.

व्यक्तिनामे.—(१) सोमनायक—सोमेश्वराचा दान स्वीकारणारा उपाध्याय; (२) केशिदेव–दान देणारा शिलाहार नृपती; (३) झंपडप्रभु–महामात्य; (४) राजदेव पंडित–महासांधिविग्रहिक; (५) अनंत प्रभु—श्रीकरणभांडागार; (६) शर्व—सोमनायकाचा पिता; (७) अपरार्कराज—शिलाहार नृपती, केशिदेवाचा पिता; (८) सूर्यनायक—दान स्वीकारणारा ब्राह्मण; (९) गोविंद नायक–दान स्वीकारणारा ब्राह्मण; (१०) नाऊ नायक—दान स्वीकारणारा ब्राह्मण.

ग्रामनामे.—(१) ब्रह्मपुरी—ठाणे जिल्ह्यातील हल्लीचे चौधारपाडा असावे; (२) वो (बो)-पग्राम—हल्लीचे बावगाव, शिलालेखाच्या पूर्वेस २ फर्लांग; (३) माजसपल्ली—ओळख पटत नाही.

६७०. लोहारा ताम्रपट, गोविंद (तृतीय)

जिल्हा—**अकोला** तालुका—**मूर्तिजापूर**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट एका मुसलमानाजवळ होता. हल्ली हा ताम्रपट नागपूरच्या सेंट्रल म्युझियममध्ये ठेवलेला आहे.

संदर्भ.—मिराशी, वा. वि., इ.आय., १९३५–३६, खंड २३, पृ. २१२–२२२.

भाषा व लिपी.—संस्कृत; उत्तर हिंदुस्थानी वळणाची देवनागरी.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती गोविंद (तृतीय).

वर्ष व तिथी.—मार्गशीर्ष शुद्ध १, सूर्यग्रहण, शके ७३४ (गतवर्ष), मंगळवार, ९ नोव्हेंबर इ. स. ८१२.

सारांश.—प्रस्तुत लेखाचा उद्देश मुरुम्ब विषयातील लोहारा हे गाव राजाने काश्यप गोत्री रिषियप्पभट्ट याला दान दिले हे नमूद करण्याचा होता. हा ताम्रपट राजाने मयूरखंडीहून दिला होता.

व्यक्तिनामे.—(१) कृष्णराज—राष्ट्रकूट नृपती; (२) निरुपम कलिवल्लभ—राष्ट्रकूट नृपती, कृष्णराजाचा पुत्र; (३) गोविंदराज—राष्ट्रकूट नृपती, निरुपमाचा पुत्र; (४) रिषियप्प—दान स्वीकारणारा काश्यप गोत्री त्रैविद्य ब्राह्मण, बह्वृच शाखा; (५) अण्णमभट्ट—रिषियप्पाचा पिता; (६) मासोपवासी—रिषियप्पाचा पितामह; (७) अरुणादित्य—लेख लिहिणारा; (८) वत्सराज—अरुणादित्याचा पिता; (९) चंदियम्म—दूतक; (१०) वयम—दूतक. रिषियप्पाकडून दानातील भाग स्वीकारणाऱ्या ब्राह्मणांची नावे पुढीलप्रमाणे—(११) माधव; (१२) श्रीधर; (१३) दोधाम; (१४) अवकुटी दीक्षित; (१५) लोकभट्ट; (१६) श्रीधर दीक्षित; (१७) मधुक द्विवेदी; (१८) पृथिवीभट्ट.

ग्रामनामे.—(१) श्रीभवन—भडोच जिल्ह्यातील सरभोण; (२) वेंगी—पूर्वेकडील चालुक्यांची राजधानी; (३) मयूरखंडी—चांदा जिल्ह्यातील मार्कंडी; (४) लोहारा—अकोला जिल्हातील करंजाच्या पश्चिमेस आठ मैलांवरील लोहारा; (५) धाराशिव—अकोट तालुक्यातील धारूर असावे; (६) मुरुंब—लोहाराच्या आग्नेयेस ३ मैलांवरील मुरुंबी; (७) मुदुप—लोहाराच्या दक्षिणेस तीन मैलांवरील मांडव; (८) पिप्परिका—लोहाराच्या पूर्वेस चार मैलांवरील पिंपळगाव. पुढील गावांची ओळख पटत नाही; (९) मारुरिकग्राम; (१०) सामरिपल्लग्राम; (११) खेडग्राम.

६७१. वजीरखेडे ताम्रपट, इंद्र (तृतीय) (संच 'अ')

जिल्हा—नाशिक तालुका—**मालेगाव**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट वजीरखेडे येथील श्री. ना. मो. माळी यांना शेत नांगरताना मिळाला.

संदर्भ.—कोलते, वि. भि., **नागपूर विद्यापीठ पत्रिका**, १९६७, खंड १७, क्र. २, पृ. ११७–१३७.

भाषा व लिपी.—संस्कृत; उत्तरेकडील वळणाची.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती इंद्र (तृतीय).

वर्ष व तिथी—शुक्रवार, मृगशीर्ष नक्षत्र, फाल्गुन शुद्ध ७, युव संवत्सर, शके ८३६ (गतवर्ष), २४ फेब्रुवारी, इ. स. ९१५.

सारांश.—हे शासन इंद्र (तृतीय) ने तो पट्टबंध समारंभासाठी कुरुंदक येथे गेला असताना दिलेले आहे. या शासनाचा मुख्य उद्देश राजाने द्राविड संघातील विरण्णाय्य अन्वयाचा वीरगण पंथीय वर्धमान याला चंदनापुरी येथील अमोघ जैन मठासाठी दोन गावे दान दिली हे नमूद करणे हा होता. हे शासन राजशेखर याने लिहिले.

व्यक्तिनामे.—(१) दंतिदुर्ग—राष्ट्रकूट नृपती; (२) कृष्णराज (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, दंतिदुर्गाचा चुलता; (३) गोविंद—राष्ट्रकूट नृपती, कृष्णराज (प्रथम) चा पुत्र; (४) निरुपम—राष्ट्रकूट नृपती, गोविंदचा धाकटा भाऊ; (५) जगत्तुंग (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती, निरुपमाचा पुत्र; (६) अमोघवर्ष—राष्ट्रकूट नृपती, जगत्तुंग (प्रथम) चा पुत्र; (७) कृष्ण (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, अमोघवर्षाचा पुत्र; (८) जगत्तुंग (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, कृष्ण (द्वितीय) चा पुत्र (९) लक्ष्मी—जगत्तुंग (द्वितीय) ची राणी, शंकरगणाची कन्या; (१०) शंकरगण—हैहय कुलातील चेदि नृपती, लक्ष्मीचा पिता; (११) कोक्कल—शंकरगणाचा पिता; (१२) अरयम्म—चालुक्य नृपती, शंकरगणाचा सासरा; (१३) सिंहक—अरयम्माचा पिता; (१४) इंद्रराज—राष्ट्रकूट नृपती, जगत्तुंग (द्वितीय) चा पुत्र, दानकर्ता; (१५) वर्धमान—दान स्वीकारणारा विरण्णाय्य अन्वयाचा वीरगण पंथाचा जैन आचार्य; (१६) राजशेखर—लेखक.

ग्रामनामे—(१) मान्यखेट—गुलबर्गा जिल्ह्यातील हल्लीचे मालखेड; (२) कुरुंदक—(अ) तापीच्या तीरावरील हल्लीचे कदोद (आर्. जी. भांडारकर); (ब) हल्लीचे कुरुंदवाड (जॅक्सन); (क) प्रवरा संगमाजवळील कैगाव (मिराशी); (ड) नांदेड जिल्ह्यातील बसमत तालुक्यातील कुरुंदा (कोलते); (३) चंदनापुरी—नाशिक जिल्ह्यात मालेगावच्या दक्षिणेस २ मैलांवरील हल्लीचे चंदनपुरी; (४) मालदह—मालेगावच्या आग्नेयेस २ मैलांवरील मलधा, दान दिलेले गाव; (५) पाडलावद्द—मलधाच्या ईशान्येस १२ मैलांवरील पाडलदां; (६) चिंचवल्ली—मलधाच्या पूर्वेस १० मैलांवरील चिंचगवाण; (७) माहुलीग्राम—मलधाच्या उत्तरेकडील मालेगाव असावे; (८) पारियाल—औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील पारल; दान दिलेले गाव. (९) सीहपूर—पारलच्या पूर्वेस ८ मैलांवरील सिऊर; (१०) निंबग्राम—पारलच्या पूर्वेस ५ मैलांवरील निमगाव; (११) भट्टावल्ली—पारलच्या उत्तरेस ४ मैलांवरील भादली.

६७२. वजीरखेडे ताम्रपट, इंद्र (तृतीय) (संच 'ब')

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत ताम्रपट वजीरखेडे येथील श्री. माळी यांना शेत नांगरताना मिळाला.

संदर्भ.—कोलते, वि.भि., **नागपूर विद्यापीठ पत्रिका**, १९६७, खंड १७, क्र. २, पृ. ११७–१४२.

भाषा व लिपी.—संस्कृत; उत्तर हिंदुस्थानी वळणाची.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती इंद्र (तृतीय).

वर्ष व तिथी.—संच 'अ' प्रमाणे.

सारांश.—हे शासन राष्ट्रकूट नृपती इंद्र (तृतीय) याच्या अमदानीतील आहे. या शासनाचा मुख्य उद्देश राजाने वडनेर येथील उरियम्म (ज्वालमालिनी) जैन मठाला रुद्दाण, धन्नउर, तुंगोणि, अज्जलोणी, चंदुहाण व दिवारग्राम ही सहा गावे दान दिली हे नमूद करणे हा होता. हे दान लोकभद्राचा शिष्य, द्राविड संघातील विरण्णाय्य अन्वयाचा वीरगण पंथीय वर्धमान याने स्वीकारले. हे शासन राजशेखराने लिहिले.

व्यक्तिनामे.—(१) इंद्र (तृतीय)—दान देणारा राष्ट्रकूट नृपती; (२) वर्धमान—दान स्वीकारणारा लोकभद्राचा शिष्य; (३) लोकभद्र—वर्धमानाचा गुरु; (४) राजशेखर—प्रशस्ती लिहिणारा. याशिवाय संच 'अ' मधील सर्व व्यक्तिनामे.

ग्रामनामे.—(१) मान्यखेट—गुलबर्गा जिल्ह्यातील हल्लीचे मालखेड; (२) कुरुंदक—नांदेड जिल्ह्यातील बसमत तालुक्यातील कुरुंदा (कोलते); (३) वडनेर—नाशिक जिल्ह्यात मालेगावच्या वायव्येस १५ मैलांवरील वडनेर; (४) रुद्दाण—दान दिलेले गाव, वडनेरच्या वायव्येस १० मैलांवरील अुत्राण; (५) रंकाण २४—ओळख पटत नाही; (६) वारिवाहला—रुद्दाणच्या पश्चिमेकडील गाव, ओळख पटत नाही; (७) धन्नऊर—दान दिलेले गाव, तलवाडच्या दक्षिणेस ५ मैलांवरील धन्नर असावे; (८) तलवाड—वडनेरच्या दक्षिणेस ७ मैल व मालेगावच्या पश्चिमेस १० मैलांवर असलेले तलवाड; (९) छट्टियान; (१०) फेंचग्राम व (११) अंतरवल्ली या तीनही गावांची ओळख पटत नाही; (१२) तुंगोणी—दान दिलेले गाव, बागलाण तालुक्यातील हल्लीचे तुंगाण; (१३) दशभोइयली—तुंगाणच्या पूर्वेस १ मैलावरील दशवेल; (१४) कतरवल्ली—तुंगाणच्या उत्तरेस २ मैलांवरील कतरवेल; (१५) साविणीवाड—ओळख पटत नाही; (१६) अज्जलोणी—दान दिलेले गाव, ओळख पटवलेली नाही; (१७) वटनगर—हल्लीचे वडनेर; (१८) नीलग्राम—वजीरखेडेच्या जवळ असलेले हल्लीचे नीलगव्हाण; (१९) डोंगरग्राम—ओळख पटत नाही; (२०) चंदुहाण–दान दिलेले गाव, हल्लीचे बागलाण तालुक्यातील चौधाणे; सटाण्याच्या वायव्येस ६ मैल; (२१) कन्हैनाणग्राम—चौधाणेच्या पश्चिमेस २ मैलांवरील कंधाने; (२२) वट्टार—चौधाणेच्या उत्तरेस १ मैलावरील वाठार; (२३) अग्गवल्ली—ओळख पटत नाही; (२४) उद्वलउल–चांदवडच्या दक्षिणेस ७ मैलांवरील उध्रुल; (२५) दिवारग्राम–उध्रुलच्या नैर्ऋत्येस तीन मैलांवरील देवरगाव; (२६) पिप्पलवद्द—देवरगावच्या पूर्वेस ३ मैलांवरील हल्लीचे पिंपलाद; (२७) सीहग्राम—ओळख पटत नाही; (२८) भोराग्राम—देवरगावच्या उत्तरेस २ मैलांवरील हल्लीचे भोयगाव. (२९) मोसिनी नदी–सध्याची मोसम.

६७३. वडगाव ताम्रपट, प्रवरसेन (द्वितीय)

जिल्हा—चांदा तालुका—वरोरा.

प्राप्तिस्थळ.—हा लेख वडगाव येथे मिळाला. सध्या हा लेख मुंबईस प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—मिराशी, वा. वि., इ.आय्., १९४७–४८, खंड २७, पृ. ७४–७९; कॉ.इं.इं., १९६३, खंड ५, पृ. ५३–५६, क्र. १२.

भाषा व लिपी.—संस्कृत; दाक्षिणात्य वळणाची पेटिकाशीर्षक लिपी.

राजवंश व राजा.—वाकाटक नृपती प्रवरसेन (द्वितीय).

वर्ष व तिथी.—२५ वे शासनवर्ष, ज्येष्ठ शुद्ध १०.

सारांश.—प्रस्तुत ताम्रपटाचा उद्देश प्रवरसेनाने रुद्रार्य नामक वाजिलोहित्य गोत्री ब्राह्मणाला सुप्रतिष्ठित आहारातील वेलुसुक गावातील राजदंडाने मोजलेली ४०० निवर्तने जमीन दान दिली हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) प्रवरसेन (प्रथम)—वाकाटक नृपती; (२) गौतमीपुत्र—वाकाटक नृपती, प्रवरसेन (प्रथम) चा पुत्र; (३) भवनाग—भारशिव नृपती, गौतमीपुत्राचा मातामह; (४) रुद्रसेन (प्रथम)—वाकाटक नृपती, गौतमीपुत्राचा पुत्र; (५) पृथिवीषेण—वाकाटक नृपती, रुद्रसेन (प्रथम) चा पुत्र; (६) रुद्रसेन (द्वितीय)—वाकाटक नृपती, पृथिवीषेणाचा पुत्र; (७) प्रभावती गुप्ता–गुप्त राजकन्या, रुद्रसेन (द्वितीय) ची पत्नी; (८) देवगुप्त–गुप्त सम्राट चंद्रगुप्त (द्वितीय), प्रभावतीगुप्ताचा पिता; (९) प्रवरसेन (द्वितीय)—दान देणारा वाकाटक नृपती, रुद्रसेन (द्वितीय) चा पुत्र; (१०) रुद्रार्य—दान स्वीकारणारा वाजिलोहित्य गोत्री ब्राह्मण; (११) बाप्पदेव—सेनापती दूतक; (१२) मारदास—लेखक.

ग्रामनामे.—(१) सुप्रतिष्ठित आहार—हिंगणघाट तहसील, वर्धा जिल्हा, वरोरा व यवतमाळ तालुक्यांचा उत्तरभाग; (२) वेलुसुक—निश्चित ओळख पटत नाही. वुन्ना नदीच्या दक्षिणेस असलेले चिंचमंडल असावे; (३) गृध्रग्राम—चिंचमंडलच्या पश्चिमेस आठ मैलांवरील गदेघाट; (४) नीलीग्राम—चिंचमंडलच्या पूर्वेस ५ मैलांवरील नीलजै; (५) कदंबसरक—चिंचमंडलच्या उत्तरेस २ मैलांवरील कोसर; (६) कोकिला—चिंचमंडलच्या वायव्येस ४ मैलांवरील खैरी; (७) एकार्जुनक—बहुधा वरोऱ्याच्या ईशान्येस सुमारे १६ मैलांवरील अर्जुनी असावे. (८) हिरण्या नदी–वरोरा विभागातील इरइ नदी.

६७४. वडनेर ताम्रपट, बुद्धराज

जिल्हा—**नासिक** तालुका—**चांदवड.**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट वडनेर येथे नाना ऊर्फ अहिराजी तिडके यांच्याजवळ मिळाला

संदर्भ.—(१) गुप्ते, वाय्. आर्., **इ.आय्.**, १९१३–१४, खंड १२, पृ. ३०–३६; (२) मिराशी, वा. वि.; **कॉ.इं.इं.**, १९५५, खंड ४, भाग १, पृ. ४७–५१.

भाषा व लिपी.—संस्कृत; दाक्षिणात्य वळणाची, पश्चिमेकडील प्रकारची.

राजवंश व राजा.—कलचुरी नृपती बुद्धराज.

वर्ष व तिथी.—भाद्रपद शुद्ध १३, (कलचुरि सं.) वर्ष ३६०, ऑगस्ट, इ. स. ६१०.

सारांश.—हे शासन कलचुरी नृपती शंकरगणाचा पुत्र बुद्धराज याच्या अमदानीतील आहे. या शासनाचा मुख्य उद्देश बुद्धराजाने वटनगरचा काश्यप गोत्री ब्राह्मण बोधस्वामी याला वटनगर भोगातील भट्टऊरिका जवळचे कोणियांचे गाव दान दिले हे नमूद करणे हा होता. हे शासन विदिशा येथील लष्करी तळावरून दिले होते व महासांधिविग्रहिक अनाफित याने अनंतमाहायी नामक राणीच्या विनंतीवरून लिहिले. महाबलाधिकृत प्रसह्यविग्रह हा याप्रसंगी दूतक होता.

व्यक्तिनामे.—(१) कृष्णराज—कलचुरी नृपती; (२) शंकरगण—कलचुरी नृपती, कृष्णराजाचा पुत्र; (३) बुद्धराज—कलचुरी नृपती, शंकरगणाचा पुत्र; (४) बोधस्वामी—दान स्वीकारणारा काश्यप गोत्री ब्राह्मण, वाजसनेय माध्यंदिन शाखा; (५) अनाफित—लेख लिहिणारा महासांधिविग्रहिक; (६) अनंतमाहायी—दानासाठी विनंती करणारी राणी; (७) प्रसह्यविग्रह—दूतक, महाबलाधिकृत.

ग्रामनामे.—(१) वटनगर–हल्लीचे वडनेर, ता. चांदवड, जि. नाशिक; (२) भट्टउरिका—वडनेरच्या उत्तरेस २ मैलांवरील भाटगाव; (३) विदिशा—मध्यप्रदेशातील हल्लीचे बेसनगर.

६७५. वडवली ताम्रपट, अपराजितदेव

जिल्हा—**ठाणे** तालुका—**उल्लेख नाही.**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट वडवली या गावी मिळाला.

संदर्भ.—पाठक, के. बी., **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.** १९०१–०३, खंड २१, पृ. ५०५–५१६.

भाषा व लिपी.—संस्कृत; नागरी.

राजवंश व राजा.—उत्तर कोंकणचा शिलाहार नृपती अपराजितदेव.

वर्ष व तिथी.—शके १०४९, प्लवंग संवत्सर, कार्तिक पौर्णिमा, शुक्रवार; इ. स. ११२७.

सारांश.—हा ताम्रपट शिलाहार नृपती अपराजितदेव याच्या अमदानीतील आहे. या शासनाचा मुख्य उद्देश राजाने वारेषगण गोत्री माध्यंदिन शाखेच्या ब्राह्मणाला वडवली हे गाव व मोरग्रामातील काही शेते दान दिली हे नमूद करणे हा होता. हे शासन महाप्रधान लक्ष्मणय्य याने लिहिले.

व्यक्तीनामे.—(१) कपर्दी—शिलाहार नृपती; (२) पुलशक्ति—शिलाहार, नृपती, कपर्दीचा पुत्र; (३) लघु-कपर्दी—शिलाहार नृपती, पुलशक्तीचा पुत्र; (४) वप्पुवन्न—शिलाहार नृपती लघुकपर्दीचा पुत्र; (५) झंझ—शिलाहार नृपती, वप्पुवन्नाचा पुत्र; (६) गोग्गिराज—शिलाहार नृपती, झंझाचा भाऊ; (७) वज्जडदेव (प्रथम)—शिलाहार नृपती, गोग्गिराजाचा पुत्र; (८) अपराजित (प्रथम)—शिलाहार नृपती, वज्जडदेव (प्रथम) चा पुत्र; (९) वज्जडदेव (द्वितीय)—शिलाहार नृपती, अपराजित (प्रथम) चा पुत्र; (१०) अरिकेसरिन्–शिलाहार नृपती, वज्जडदेव (द्वितीय) चा भाऊ; (११) च्छित्तराज—शिलाहार नृपती, वज्जडदेव (द्वितीय) चा पुत्र; (१२) नागार्जुन—शिलाहार नृपती, च्छित्तराजाचा भाऊ; (१३) मुम्मुणि—शिलाहार नृपती, नागार्जुनाचा भाऊ; (१४) अनंतपाल—शिलाहार नृपती, नागार्जुनाचा पुत्र; (१५) अपराजित (द्वितीय) किंवा अपरादित्य—दान देणारा शिलाहार नृपती, अनंतपालाचा पुत्र; (१६) लक्ष्मण नायक—महामात्य; (१७) लक्ष्मणैय प्रभु—लेख लिहिणारा महाप्रधान, महासांधिविग्रहिक; (१८) च्छित्तमैय प्रभु—प्रधान; (१९) त्रिविक्रम—दान स्वीकारणारा याज्ञिक ब्राह्मण; (२०) अनंत अग्निहोत्री—त्रिविक्रमाचा पिता.

ग्रामनामे.—(१) वडवली—दान दिलेले हल्लीचे वडवली; (२) वरकूट विषय व (३) मोरग्राम—या दोनही गावांची ओळख पटत नाही; (४) घोरपड नदी; (५) मोव्वलि नदी; (६) खज्जन वनेटिका.

६७६. वणी ताम्रपट, गोविंद (तृतीय)

जिल्हा—**नासिक** तालुका—**दिंडोरी**

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत ताम्रपट वणी येथे मिळाला. हल्ली हा ताम्रपट मुंबईस बाँबे ब्रँच ऑफ रॉयल एशियाटिक सोसायटीमध्ये आहे.

संदर्भ.—(१) वाथेन, **ज.रॉ.ए.सो.** (ओ.सि.), खंड ५, पृ. ३४३; (२) फ्लीट, **इं.अँ.**, १८८२, खंड ११, पृ. १५६–१६३.

भाषा व लिपी.—संस्कृत; नागरी.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती गोविंद (तृतीय).

वर्ष व तिथी.—चंद्रग्रहण, वैशाख पौर्णिमा, व्यय संवत्सर, शके ७३० (गतवर्ष) (अनियमित).

सारांश.—हा ताम्रपट राष्ट्रकूट नृपती गोविंद (तृतीय) याच्या अमदानीतील आहे. या ताम्रपटाचा मुख्य उद्देश राजाने मयूरखंडी या राजधानीहून वेंगीनिवासी, भारद्वाज गोत्री द्विवेदी दामोदर याचा पुत्र चतुर्वेदी दामोदरभट्ट याला नासिक देशातील वटनगर विषयातील अंबकग्राम दान दिले हे नमूद करण्याचा होता. हा लेख वत्सराजपुत्र अरुणादित्य याने लिहिला व याप्रसंगी भुविराम हा दूतक होता.

व्यक्तिनामे.—(१) कृष्णराज—राष्ट्रकूट नृपती; (२) धोर (ध्रुव)—राष्ट्रकूट नृपती, कृष्णराजाचा पुत्र; (३) गोविंदराज—राष्ट्रकूट नृपती, ध्रुवाचा पुत्र, दानकर्ता; (४) चतुर्वेदी दामोदरभट्ट—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण, तैत्तिरीय शाखा, वेंगीचा रहिवासी; (५) द्विवेदी दामोदर—चतुर्वेदी दामोदरभट्टाचा पिता; (६) विष्णुभट्ट—चतुर्वेदी दामोदरभट्टाचा पितामह; (७) अरुणादित्य—लेखक; (८) वत्सराज—अरुणादित्याचा पिता; (९) भुविराम—दूतक.

एच १५–२१(अ)

ग्रामनामे.—(१) मयूरखेडी—नाशिक जिल्ह्यातील वणीच्या उत्तरेकडील मोरखिंड किल्ला (बुल्हर); (२) वारिखेड—सध्याचे वरखेड; (३) वटनगर—हल्लीचे वणी असावे; (४) अंबकग्राम—वणीच्या दक्षिणेस ८ मैलांवरील अंबे. पुढील गावांची ओळख पटत नाही; (५) वडवुर; (६) पल्लितवाड; (७) पद्मनाल. (८) पुलिंदा नदी—वणीच्या दक्षिणेस उनंदा नदी.

६७७. वलिपत्तन ताम्रपट, शिलाहार रट्टराज

जिल्हा—उल्लेख नाही

तालुका—उल्लेख नाही

प्राप्तिस्थळ.—श्री. चकलधर याना हा ताम्रपट श्री. डी. आर्. भांडारकर यांनी दिला.

संदर्भ.—चकलधर, एच्. सी., इं.हि.क्वा., १९२८, खंड ४, पृ. २०३–२२०.

भाषा व लिपी.—संस्कृत; नागरी लिपी.

राजवंश व राजा.—उत्तर कोंकणातील शिलाहार नृपती रट्टराज.

वर्ष व तिथी.—पौष वद्य १, शके ९३२, साधारण संवत्सर, उत्तरायण संक्रांत, रविवार, २४ डिसेंबर, इ. स. १०१०.

सारांश.—प्रस्तुत शासनाचा मुख्य उद्देश राजाने दिलेल्या पुढील देणग्या नमूद करणे हा होता—(१) सेनावइ (सेनापती) नागमैय्य याचा पुत्र संकमैय्य याला काही जमीन दिली; (२) संझैय्य ब्राह्मणाच्या नातीला उदरनिर्वाहासाठी सुपारीच्या झाडांचा मळा दिला.

व्यक्तिनामे.—(१) जीमूतवाहन—शिलाहार घराण्याचा मूळ पुरुष; (२) सणफुल्ल—शिलाहार नृपती; (३) धम्मियर—शिलाहार नृपती, सणफुल्लाचा पुत्र; (४) ऐयप—शिलाहार नृपती, धम्मियरचा पुत्र; (५) अवसर (प्रथम)—शिलाहार नृपती, ऐयपाचा पुत्र; (६) आदित्य वर्मन्—शिलाहार नृपती, अवसर (प्रथम) चा पुत्र; (७) अवसर (द्वितीय)—शिलाहार नृपती, आदित्यवर्म्याचा पुत्र; (८) इंद्रराज—शिलाहार नृपती, अवसर (द्वितीय) चा पुत्र; (९) भीम—शिलाहार नृपती, इंद्रराजाचा पुत्र; (१०) अवसर (तृतीय)—शिलाहार नृपती, भीमाचा पुत्र; (११) रट्टराज—दान देणारा शिलाहार नृपती, अवसर (तृतीय) चा पुत्र; (१२) संकमैय—दान स्वीकारणारा ब्राह्मण; (१३) नागमैय्य—ब्राह्मण सेनापती, संकमैयचा पिता; (१४) संझैय—दान स्वीकारणाऱ्या स्त्रीचा आजा; (१५) कुंवरैय—संझैयचा नातू; (१६) चाटव्वैय—कुंवरैयची पत्नी; (१७) लोकपार्य—शासनाचा लेखक; (१८) देवपाल—लोकपार्याचा पिता, सांधिविग्रहिक.

ग्रामनामे.—(१) वलिपत्तन—ओळख पटत नाही; (२) हंजमान—आधुनिक संजान(?); (३) पलौरे—ओळख पटत नाही.

६७८. वसई ताम्रपट, यादव सेऊणचंद्र (द्वितीय)

जिल्हा—ठाणे

तालुका—वसई

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट डॉ. भाऊ दाजी यांनी, वसईहून आणला. सध्या हा ताम्रपट कोठे आहे हे माहीत नाही.

संदर्भ.—इंद्रजी, इ.ॲ., १८८३, खंड १२, पृ. ११९–१२६.

भाषा व लिपी.—अशुद्ध संस्कृत; नागरी लिपी.

राजवंश व राजा.—यादव नृपती सेउणचंद्र (द्वितीय).

वर्ष व तिथी.—गुरुवार, श्रावण शुद्ध चतुर्दशी, सौम्य संवत्सर, शके ९९१, इ. स. १०६९.

सारांश.—हा लेख सेऊणचंद्र याच्या कालातील आहे. या लेखाचा उद्देश सेउण याने राजघराण्याचा उपाध्याय सोमदेव आचार्याचा शिष्य सर्वदेवाचार्य याला वर उल्लेखिलेल्या तिथीस सिंही या १२ खेड्यांच्या छोट्या विभागातील चिंचुली हे खेडे दान दिले हे नमूद करण्याचा होता. हे दानपत्र नृपतीने चंद्रादित्यपुर या गावाहून दिलेले दिसते. या ताम्रपटात सेऊणचंद्राची वंशावळ दिलेली असून त्याच्या पराक्रमी कृत्यांचा यात उल्लेख आहे. या दानपत्राचा लेखक प्रेकरय हा होता व सेकारेयनायक याने हे दानपत्र कोरले आहे.

व्यक्तिनामे.—(१) दृढप्रहार—पहिला यादव नृपती; (२) सेउणचंद्र (प्रथम)—यादव नृपती, दृढप्रहाराचा पुत्र; (३) द्वाडियप्पा—यादव नृपती, सेउणचंद्र (प्रथम) चा पुत्र; (४) बृहद्‌भिल्लम—यादव नृपती; (५) वड्डिग—यादव नृपती; (६) लच्छियव्वा—वड्डिगाची पत्नी, शिलाहार झंझाची कन्या; (७) झंझ—शिलाहार नृपती, लच्छियव्वाचा पिता; (८) श्रीराज—यादव नृपती; (९) नायियल्ला—यादव राणी, गोगिराज चालुक्याची कन्या; (१०) गोगिराज—चालुक्य नृपती, नायियल्लाचा पिता; (११) तेसुक—यादव नृपती, वड्डिगाचापुत्र (?); (१२) भिल्लम (द्वितीय)—यादव नृपती, तेसुकाचा पुत्र; (१३) अव्वलादेवी—भिल्लम (द्वितीय) ची पत्नी, चालुक्य राजकन्या, जयसिंहाची कन्या; (१४) जयसिंह—चालुक्य नृपती, अव्वलादेवीचा पिता; (१५) आहवमल्ल—चालुक्य नृपती, जयसिंहाचा पुत्र; (१६) सेऊणचंद्र (द्वितीय)—दान देणारा यादव नृपती; (१७) सर्वदेव—दान स्वीकारणारा आचार्य, सोमदेवाचा शिष्य; (१८) सोमदेव—राजघराण्याचा उपाध्याय, सर्वदेवाचा गुरु; (१९) श्रीधर—महाप्रचंडदंडनायक; (२०) वासुदेवैय—महामात्य; (२१) अभियाक—महाप्रधाननायक; (२२) श्रीनायक—सांधिविग्रहिक; (२३) भरवैयानायक (हरवैयानायक)—पातलकरणी; (२४) आपैयाक—राजाध्यक्ष; (२५) आमादित्य—महत्तम; (२६) भरथनायक—पातलकरणी; (२७) प्रेकरय—लेख लिहिणारा; (२८) सेकरेयनायक—लेख कोरणारा; (२९) स्तंबु—सेकरेयनायकाचा पिता.

ग्रामनामे.—(१) सेउणपुर—सिन्नर(?); (२) सिंदीनेर—सिन्नर; (३) द्वारावती—ओळख पटत नाही; (४) चंद्रादित्यपूर—नाशिकच्या ईशान्येस ४० मैलांवरील चंद्रपूर किंवा चांदोर; (५) चिंचुली—नाशिकच्या आग्नेयेस १२ मैलांवरील चिंचोली; (६) वदगंभा—ओळख पटत नाही; (७) सिंदी—चिंचोलीच्या उत्तरेकडील गाव, ओळख पटत नाही; (८) महुय—चिंचोलीच्या ईशान्येस असलेले गाव, ओळख पटत नाही; (९) सेवै—ग्रामनाम?

६७९. वसई शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख वसईहून आणला. सध्या हा मुंबई येथील प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम-मध्ये आहे.

संदर्भ.—सांकलिया व उपाध्याय, इ.आय्., १९३५–३६, खंड २३, पृ. २७४–२७६, क्र. सी.

भाषा व लिपी.—अशुद्ध संस्कृत; देवनागरी लिपी, परंतु काही अक्षरे प्राचीन नागरी लिपीतील आढळतात.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती मल्लिकार्जुन.

वर्ष व तिथी.—पुष्य (पौष) वद्य १५, सोमवार, वृष संवत्सर, शके १०८३, १७ जानेवारी इ. स. ११६२.

सारांश.—हा लेख तगरपुराधिपति शिलाहार मल्लिकार्जुनदेव याच्या कारकिर्दीतील आहे. या लेखाचा उद्देश एका उपाध्यायाला कटशडी विभागातील पढालसकमधील लोन येथील उद्यान दान दिले हे नमूद करण्याचा होता. लेख बराच झिजला असल्यामुळे दान देणाऱ्या

व्यक्तीचे नाव वाचता येत नाही. या लेखात महासांधिविग्रहिक प्रभाकर नायक आणि अणत (अनंत) पै प्रभु या मंत्र्यांचाही उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—(१) मल्लिकार्जुन—शिलाहार नृपती; (२) प्रभाकर नायक—महासांधिविग्रहिक; (३) अणत (अनंत) पै प्रभु—महाप्रधान; (४) वेदशिव—राजगुरु, कदाचित हा दाता असावा; (५) भोपक व्योमशिव—मंदिरातील पुजारी.

ग्रामनामे.—(१) लोन—भिवंडीच्या पूर्वेस सहा मैलांवरील लोनद असावे; (२) तगरपुर—उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर; (३) कटशडि; (४) पढालसक—यांची ओळख पटत नाही.

६८०. वसई शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख वसई येथील आहे.

संदर्भ.—इं.अ.रि., १९६९–७०, पृ. ४९, क्र. ३१.

भाष व लिपी.—संस्कृत व स्थानिक भाषेचे मिश्रण; नागरी.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती अनंतदेव.

वर्ष व तिथी.—शके ११२०, काल्युक्त संवत्सर, इ. स. ११९८.

सारांश.—या लेखात शिलाहार नृपती महाराजाधिराज परमेश्वर अनंतदेव याचा उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—अनंतदेव—शिलाहार नृपती.

६८१. वाघली शिलालेख, यादव सेऊणचंद्र (द्वितीय)

जिल्हा—जळगाव तालुका—चाळीसगाव

प्राप्तिस्थळ.—हा लेख वाघली येथील महानुभावांच्या हेमाडपंती मंदिरात कोरलेला आहे.

संदर्भ.—किलहॉर्न, इ.आय., १८९४, खंड २, पृ. २२१–२२८.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ११ व्या शतकातील देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—यादव नृपती सेंउण व त्याचा मांडलिक मौर्य गोविंदराज.

वर्ष व तिथी.—सूर्यग्रहण, आषाढ वद्य १५, सौम्य संवत्सर, शके ९९१, मंगळवार, २१ जुलै, इ. स. १०६९.

सारांश.—या लेखाचा मुख्य उद्देश गोविंदराजाने हा लेख असलेले मंदिर बांधले व या मंदिराला बऱ्याच देणग्या दिल्या हे नमूद करणे हा होता. याशिवाय यादव नृपती सेउण याने सिद्धेश्वराच्या मंदिराला संगमी व मधुवाटिका ही गावे दान दिल्याचे नमूद केले आहे. हा लेख तीन भागात आहे. तथापी तीनही भाग मिळून एकच लेख आहे हे अगदी स्पष्ट आहे.

व्यक्तिनामे.—(१) मांधाता—मौर्य कुलाचा मूळ पुरुष; (२) कीकट—मौर्य नृपती; (३) तक्षक—मौर्य नृपती; (४) भीम—मौर्य नृपती; (५) सर्वशूर—मौर्य नृपती; (६) गोविंद—मौर्य नृपती; (७) साध्वसिक—मौर्य नृपती. हे एका मागोमाग राज्यावर आलेले राजे होते परंतु

त्यांचे परस्पर नाते लेखात स्पष्ट होत नाही; (८) झंझ—मौर्य नृपती; (९) देवहस्ती—मौर्य नृपती, झंझाचा पुत्र; (१०) मुंज—मौर्य नृपती, देवहस्तीचा पुत्र; (११) पद्माकर—मौर्य नृपती, मुंजाचा पुत्र; (१२) वप्पैय—मौर्य नृपती; (१३) वालपराज—मौर्य नृपती, वप्पैयाचा नातू; (१४) साध्वसिक—मौर्य नृपती; (१५) शांतिराज—मौर्य नृपती; (१६) प्रवरसूकर—मौर्य नृपती, शांतिराजाचा पुत्र; (१७) भैलेक—मौर्य नृपती, प्रवर सूकराचा पुत्र; (१८) भीमराज—मौर्य नृपती; (१९) गोविंदराज—शंकराचे मंदिर बांधणारा व दान देणारा मौर्य नृपती; (२०) नायकी—मंदिर बांधण्यात सहभागी झालेली गोविंदराजाची राणी; (२१) सेउण—दान देणारा देवगिरीचा यादव नृपती सेउण (द्वितीय).

ग्रामनामे.—(१) वलभी—मौर्यांचे सुराष्ट्रातील (सौराष्ट्रातील) मूलस्थान; पुढील गावांची ओळख पटत नाही; (२) संगमी; (३) मधुवाटिका; (४) कारकग्राम.

६८२. वाफळे शिलालेख, यादव कालीन

जिल्हा—**सोलापूर** तालुका—**माढे**

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत शिलालेख वाफळे येथील जुन्या मंदिराच्या दक्षिणेकडील भिंतीच्या जवळ आहे.

संदर्भ.—दीक्षित, मो. गं., **द.म.इ.सा.,** १९५१, खंड ४, पृ. ६६–७२, क्र. १०.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. १२ व्या शतकातील नागरी लिपी.

राजवंश व राजा.—यादव नृपती सिंघण व जैत्रपाल.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. १२९०. (निर्देश नाही.)

सारांश.—या लेखाचा उद्देश यादव सिंघणाच्या नोकरीत असलेल्या नारण (नारायण) नामक व्यक्तीच्या नातवाने उपल येथील तेजेश्वराच्या मंदिराला दिलेल्या निरनिराळ्या देणग्या नमूद करणे हा होता. जैत्रपालाच्या राजवटीत दिलेल्या देणग्या कायम केल्याचाही उल्लेख या शिलालेखात केलेला आहे. याशिवाय बागवी गावातील तेजेश्वराच्या मंदिरातील कलाकारांना माईदेव याने दिलेल्या देणग्या दिल्या आहेत.

व्यक्तिनामे.—(१) मल्लि (मालुगि)—यादव नृपती, याचे दुसरे नाव श्रीकांत असावे; (२) अमर गांगेय—यादव नृपती, मल्लीचा पुत्र; (३) बल्लाळ—यादव नृपती; (४) भिल्लम—यादव नृपती; (५) जैत्रपाल—यादव नृपती, भिल्लमाचा पुत्र; (६) सिंघण—यादव नृपती, जैत्रपालाचा पुत्र; (७) विश्वनाथ—सिंघणाचा सेवक, कौशिक गोत्री ब्राह्मण; (८) नारण (नारायण)—विश्वनाथाचा पुत्र; (९) हरिहर—नारण (नारायण) याचा पुत्र; (१०) नारण (नारायण)—दान देणारा कौशिक गोत्री ब्राह्मण, हरिहराचा पुत्र; (११) माईदेव—दान देणारा; (१२) दिनू नायक—जैत्रपालाचा अधिकारी; (१३) अनंतदेव—लेख लिहिणारा.

ग्रामनामे.—(१) करकंबदेश—वाफळेच्या आग्नेयेस १२ मैलांवरील हल्लीचे करकम किंवा करकंब, त्यावरून दिलेले विभागवाचक नाम; (२) उपल—वाफळेच्या उत्तरेकडील उपळाई, (३) देइवाडि—वाफळ्याच्या दक्षिणेस २ मैलांवरील देवडी; (४) बागवी—वाफळ्याच्या पश्चिमेस सव्वा तीन मैलांवरील सध्याचे बावी.

विशेष– शंखपूरक, काहलिक, मृदंगवादक, दुंदुभीवादक, जयघंटावादक आणि चंडाईल, हे वाद्य वाजविणारे कलाकार.

६८३. वाशीम ताम्रपट, विंध्यशक्ति (द्वितीय)

जिल्हा—**अकोला** तालुका—**वाशीम**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट वाशीम येथे पंडित वासुदेवशास्त्री धनागरे यांच्याजवळ सापडला.

संदर्भ.—(१) मिराशी, वा. वि., **वा.नृ.का.**, १९५७, पृ. ३२५–३३७; **कॉ.इं.इं.**, १९६३, खंड ५, पृ. ९३–१००; **वा.रा.त.अ.**, १९६४, पृ. २४२–२५०; (२) देशपांडे, य. खु., व महाजन, **प्रो.इं.हि.कॉ.**, तिसरे अधिवेशन, पृ. ४५९.

भाषा व लिपी.—काही भागात संस्कृत, इतरत्र प्राकृत. लिपी पेटिकाशीर्षक प्रकारची असून सामान्यतः द्वितीय प्रवरसेनाच्या दानपत्रांसारखी आहे.

राजवंश व राजा.—वाकाटक नृपती विंध्यशक्ति (द्वितीय), वत्सगुल्म शाखा.

वर्ष व तिथी.—३७ वे शासनवर्ष, हेमंतातील पहिल्या पक्षातील चवथा दिवस, अंदाजे इ. स. ३५५ (मिराशी).

सारांश.—हा ताम्रपट विंध्यशक्ति (द्वितीय) च्या कालातील असून त्याचा उद्देश नांदीकडच्या उत्तरमार्गातील ताकालखोपक गावांनजीकचे आकासपद्द हे गाव विंध्यशक्तीने दान दिले हे नमूद करण्याचा होता. हे दान स्वीकारणारे ब्राह्मण अथर्ववेदी होते. या ब्राह्मणांची नावे व गोत्रे दिलेली आहेत. त्याचप्रमाणे विंध्यशक्तीची वंशावळ दिलेली आहे. हे दानपत्र सेनापती वण्हु (विष्णु) याने लिहिले असून ते वत्सगुल्म येथून दिलेले आहे.

व्यक्तिनामे.—(१) प्रवरसेन—वाकाटक नृपती; (२) सर्वसेन—वाकाटक नृपती, प्रवरसेनाचा पुत्र; (३) विंध्यशक्ति—दान देणारा वाकाटक नृपती, सर्वसेनाचा पुत्र. दान स्वीकारणाऱ्या ब्राह्मणांची नावे पुढीलप्रमाणे—(४) जिवज्ज (जीवार्य)– भालंदायन गोत्र; (५) रुद्दज (रुद्रार्य)– कपिंजल गोत्र; (६) भाट्टिदेवज्ज (भर्तृदेवार्य)– श्राविष्ठायन गोत्र; (७) देअज (देवार्य)– कौशिक गोत्र; (८) वेण्हुज्ज (विष्ण्वार्य)– कौशिक गोत्र; (९) विधिज्ज (विध्यार्य)– कौशिक गोत्र; (१०) जेट्ठज (ज्येष्ठार्य)– कौशिक गोत्र; (११) भाद्दिलज्ज (भाद्रिलार्य)– कौशिक गोत्र; (१२) शिवज्ज (शिवार्य)–कौशिक गोत्र; (१३) हरिण्णज्ज (हिरण्यार्य)–कौशिक गोत्र; (१४) रेवतीज्ज (रेवत्यार्य)–कौशिक गोत्र; (१५) पितुज (पित्रार्य)–पैप्पलादि गोत्र; (१६) चांदज (चंद्रार्य)– भालंदायन गोत्र; (१७) बुद्धज (बुद्धार्य)–भालंदायन गोत्र; (१८) वण्हु (विष्णु)—आज्ञा लिहिणारा सेनापती.

ग्रामनामे.—(१) वत्सगुल्म—विंध्यशक्तीची राजधानी, आधुनिक वाशीम; (२) नांदीकड—आधुनिक नांदेड; (३) ताकालखोपक—ओळख पटत नाही पण नांदेडच्या उत्तरेस ४० मैलांवरील टाकळी गोहन असावे किंवा ४३ मैलांवरील टाकळी असावे. निर्णायक मत देता येत नाही. (मिराशी); (४) आकासपद्द—टाकळीगोहनच्या पश्चिमेस ७ मैलांवरील असुंद असावे.

विशेष महत्त्व.—या लेखामुळे वाकाटकांच्या वत्सगुल्म शाखेच्या अंमलाखाली वऱ्हाड व हैद्राबाद प्रदेशाचा उत्तर भाग होता हे स्पष्ट होते.

६८४. विहार शिलालेख, शिलाहार अनंतदेव

जिल्हा—**ठाणे** तालुका—**उल्लेख नाही**

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख विहार येथे मिळाला. सध्या हा लेख प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, मुंबई येथे आहे.

संदर्भ.—(१) दीक्षित, मो. गं., **म.प्रा.ता.शि.**, १९४७, पृ. ६९–७२, क्र. ५; (२) तुळपुळे, शं. गो., **प्रा.म.को.ले.**, १९६३, पृ. १५–१७, क्र. ३.

भाषा व लिपी.—संस्कृत-मराठी संमिश्र, देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—शिलाहार महामंडलेश्वर अनंतदेव.

वर्ष व तिथी.—शके १००३, इ. स. १०८१. (तपशील नाही.)

सारांश.—"महामंडलेश्वर अनंतदेव याच्या राजवटीत त्याचा अमात्य रुद्रपैय व इतर अधिकारी असताना, वियाडिक वंशातील मातैयाचा पुत्र अज्यपानायक याचा पुत्र खैं रामणंयप याने सिद्धांसाठी म्हणून वेणापटण या गावात गृह व काही द्रम्म दान दिले".

व्यक्तिनामे.—(१) अनंतदेव—शिलाहार नृपती; (२) रुद्रपै—अमात्य; (३) खै रामणंयप—दान देणारा; (४) अज्यपानायक—दानकर्त्याचा पिता; (५) मातैया—दानकर्त्याचा पितामह.

६८५. वेतुरें शिलालेख, सोमेश्वर देवालय

जिल्हा—रत्नागिरी तालुका—वेंगुर्ले

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत शिलालेख वेतुरें येथे मिळाला. वेतुरें गावापासून सुमारे पाऊण मैलावर "न्हाव्याची आवाट" या नावाने ओळखली जाणारी एक वाडी आहे. तेथे जवळच रानात सोमेश्वराचे एक देवालय आहे. या देवालयात हा लेख असलेली शिळा उभी करून ठेवलेली आहे.

संदर्भ.—तुळपुळे, शं. गो., **प्रा.म.को.ले.**, १९६३, पृ. ५१–५२, क्र. ९.

भाषा व लिपी.—मराठी; इ. स. ११ व्या–१२ व्या शतकातील देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—शके १०७७, युव संवत्सर, चैत्र शुद्ध १, ६ मार्च, इ. स. ११५५.

सारांश.—या लेखातील पहिल्या फक्त तीन ओळी वाचता येतात. पुढचा भाग अस्पष्ट झाला आहे. या सोमेश्वराची स्थापना कोणा नारायणदेवाच्या सोमदेव नामक आश्रिताने केली असे या लेखावरून कळते.

व्यक्तिनामे.—(१) नारायणदेव; (२) सोमदेव—सोमेश्वराची प्रतिष्ठापना करणारा नारायणदेवाचा आश्रित.

६८६. वेरे मराठी ताम्रपट

गोवा राज्य तालुका—फोंडा

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट वेरे येथील श्री. आत्मारामशेट वेरेकर यांच्याजवळ मिळाला.

संदर्भ.—(१) आपटे, डी. व्ही., **भा.इ.सं.मं.**, वार्षिक, शके १८३७, पृ. ८३–८८; (२) गुणे, टी. व्ही., **ए.आर्.जी.**, १९६६, क्र. २२.

भाषा व लिपी.—मराठी; हाळेकन्नड लिपी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—सोमवार, श्रावण ८, शार्वरी संवत्सर, शके १२२१, इ. स. १२९९.

सारांश.—या शासनाचा उद्देश वेरे येथील वाण्यांनी दिलेले खास अधिकार नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—उल्लेख नाही.

ग्रामनामे.—वेरे—आधुनिक वेरे.

६८७. (वेल्हे) गोवा शिलालेख, कदंब जयकेशी

गोवा राज्य तालुका—**उल्लेख नाही**

प्राप्तिस्थळ.—दिलेले नाही.

संदर्भ.—इं.अ.रि., १९६३–६४, पृ. ६८–६९, क्र. १६.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—गोव्याचा कदंब नृपती जयकेशी.

वर्ष व तिथी.—शके ९७ (६), इ. स. १०५४.

सारांश.—या लेखात जयकेशीदेवाच्या सैनिकाचा उल्लेख आहे. हा सैनिक वीरवरम्मदेवाचा भक्त होता.

व्यक्तिनामे.—जयकेशीदेव—गोव्याचा कदंब नृपती.

६८८. वेळापूर शिलालेख

जिल्हा—**सोलापूर** तालुका—**माळशिरस**

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत शिलालेख वेळापूर येथे गावाच्या मध्यभागी वाटेतच एक शिळा जमिनीत अर्धवट गाडलेली आहे तिच्यावर कोरलेला मिळाला.

संदर्भ.—(१) खरे, ग. ह., **द.म.इ.सा.**, १९३४, खंड २, पृ. ७–८, क्र. १२.१; (२) तुळपुळे, शं. गो., **प्रा.म.को.ले.**, १९६३, पृ. १०१–१०४, क्र. २०.

भाषा व लिपी.—मराठी; देवनागरी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—शके ११२८, इ. स. १२०६. (तपशील नाही.)

सारांश.—हा लेख स्मारक स्वरूपाचा दिसतो. कसेगावचा कोणी कायस्थ मल्लसेठि मृत्यु पावला व त्याचे स्मारक त्याच्या चाहत्यांनी उभारले असा या लेखात उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—मल्लसेठि—कायस्थ.

ग्रामनामे.—कसे—सोलापूरच्या ईशान्येस आठ मैलांवर असलेले कासेगाव असावे.

६८९. वेळापूर शिलालेख, यादव रामचंद्रदेव

प्राप्तिस्थळ.—हा लेख वेळापूर येथील शिवालयासमोर असलेल्या विहिरीच्या पायऱ्या उतरताना उजव्या बाजूच्या भिंतीत बसवलेला आहे.

संदर्भ.—(१) खरे, ग. ह., **द.म.इ.सा.**, १९३०, खंड १, पृ. ८०–८२, क्र. २; (२) तुळपुळे, शं. गो., **प्रा.म.को.ले.**, १९६३, पृ. २४८–२५५, क्र. ५०.

भाषा व लिपी.—मराठी; देवनागरी.

राजवंश व राजा.—यादव नृपती रामचंद्रदेव.

वर्ष व तिथी.—शके १२२७, विश्वावसु संवत्सर, मार्गशीर्ष शुद्ध ५, सोमवार, २२ नोव्हेंबर, इ. स. १३०५.

सारांश.—यादव नृपती रामचंद्रदेव राज्य करीत असताना त्याचा सर्वाधिकारी ब्रह्मदेवराणा याने वेळापुरातील वटेश्वराच्या लहान देवळावर मलयाचलाप्रमाणे प्रासाद उभारला. तसेच देवता व लोकपाल यांच्यात एकसूत्रता आणून कलश प्रतिष्ठापना केली व देवळावर ध्वज लावला असे या लेखात नमूद केले आहे. वटेश्वराच्या मंदिरास मिळालेली दानेही या लेखात दिली आहेत.

व्यक्तिनामे.—(१) रामचंद्रदेव—यादव नृपती; (२) ब्रह्मदेवराणा—दान देणारा माणदेशाचा सर्वाधिकारी; (३) बाईदेव—दानकर्ता; (४) चारुगुंडा—दानकर्ता.

ग्रामनामे.—वेलापूर—सोलापूर जिल्ह्यातील हल्लीचे वेळापूर.

६९०. वेळापूर शिलालेख, यादव रामचंद्रदेव

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेली शिळा वेळापूर येथे गावाच्या दक्षिणेस पूर्व-पश्चिम वाटेवर जमिनीत अर्धवट पुरलेल्या अवस्थेत मिळाली.

संदर्भ.—(१) खरे, ग. ह., द.म.इसा., १९३४, खंड २, पृ. ८–९, क्र. १२.२; (२) मास्टर, बु.स्कू.ओ.अ.स्ट., खंड २०, पृ. ४३३–४३४; (३) तुळपुळे, शं. गो., प्रा.म.को.ले., १९६३, पृ. २२९–२३१, क्र. ४५.

भाषा व लिपी.—लेखाचा सुरवातीचा भाग संस्कृतमध्ये असून पुढील मजकूर मराठी भाषेत आहे. इ. स. १२ व्या–१३ व्या शतकातील देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—यादव नृपती रामचंद्रदेव.

वर्ष व तिथी.—शके १२२२, शार्वरी संवत्सर, ज्येष्ठ शुद्ध १, शुक्रवार; २० मे, इ. स. १३००.

सारांश.—हा लेख यादव नृपती रामचंद्रदेव याच्या कारकिर्दीतील आहे. या लेखाचा उद्देश रामचंद्रदेवाचा पादपद्मोपजीवी सर्वाधिकारी जोइदेव, त्याचा निरोपित ब्रह्मदेवराणा व त्याचा भाऊ वाइदेवराणा हे अधिकारी असताना वेळापूर येथील धर्मस्थळ वटेश्वर याच्यासाठी वाइदेवाने मठ करमुक्त करून दिला. हा लेख दामोदर पंडित याचा पुत्र महादेव याने लिहिला.

व्यक्तिनामे.—(१) रामचंद्रदेव—यादव नृपती; (२) जोइदेव—सर्वाधिकारी; (३) ब्रह्मदेवराणा—निरोपित (मुतालिक); (४) वाइदेवराणा—ब्रह्मदेवराणाचा भाऊ; (५) महादेव—लेखक; (६) दामोदर पंडित—महादेवाचा पिता.

ग्रामनामे.—वेलापुर—सध्याचे सोलापूर जिल्ह्यातील वेळापूर.

६९१. वेळापूर शिलालेख, यादव रामचंद्रदेव

प्राप्तिस्थळ.—हा लेख वेळापूर येथील हरनरेश्वर मंदिरात एका शिळेवर कोरलेला आढळला.

संदर्भ.—(१) खरे, ग. ह., द.म.इ.सा., १९३०, खंड १, पृ. ७८–८०; (२) मास्टर, बु.स्कू.ओ.अ.स्ट., १९६३, खंड २०, पृ. ४३३; (३) तुळपुळे, शं. गो., प्रा.म.को.ले., १९६३, पृ. २३७–२४१, क्र. ४७.

भाषा व लिपी.—संस्कृत-मराठी संमिश्र; देवनागरी.

राजवंश व राजा.—यादव नृपती रामचंद्रदेव.

वर्ष व तिथी.—शके १२२२, शार्वरी संवत्सर, मार्गशीर्ष वद्य ९, सोमवार; ५ डिसेंबर, इ. स. १३००.

सारांश.—यादव नृपती रामचंद्रदेव याचा सर्वाधिकारी जोइदेव याचा निरोपित ब्रह्मदेव-राणा व त्याचा भाऊ बाइदेवराणा यांनी वेळापूरचे वटेश्वर–जोगेश्वराचे देवालयाचा काही भाग नवीन बांधून दानधर्म केला.

व्यक्तिनामे.— (१) रामचंद्रदेव—यादव नृपती; (२) जोइदेव—सर्वाधिकारी; (३) ब्रह्मदेवराणा—निरोपित (मुतालिक); (४) बाइदेवराणा—ब्रह्मदेवराणाचा भाऊ.

ग्रामनामे.—वेलापुरी—सोलापूर जिल्ह्यातील हल्लीचे वेळापूर.

६९२. शिरपूर ताम्रपट, महाराज रुद्रदास

जिल्हा—**धुळे** तालुका—**शिरपुर**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट शिरपूर येथील श्री. मोतीराम पाटील यांच्याजवळ मिळाला.

संदर्भ.—(१) इंग्रजी, इ.अॅ. १८८७, खंड १६, पृ. ९८; (२) मिराशी, वा. वि., कॉ.इं.इं., १९६५, खंड ४, भाग १, पृ. १०–१२.

भाषा व लिपी.—संस्कृत; दाक्षिणात्य वळणाची पश्चिमेकडील प्रकारची.

राजवंश व राजा.—नृपती रुद्रदास (वंशाचा उल्लेख नाही.)

वर्ष व तिथी.—वैशाख ३, वर्ष ११८ (मिराशींच्या मते कलचुरी संवत्), १८ एप्रिल, इ. स. ३६७.

सारांश.—हा लेख महाराज रुद्रदास याच्या अमदानीतील आहे. या लेखाचा मुख्य उद्देश राजाने ब्राह्मण द्रोणिलक याला काशपूर उपविभागातील विकट्टाणक या गावाच्या पश्चिम सरहद्दीला लागून असलेले घोटकतल नामक शेत दान देण्यास संमती दिली हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) रुद्रदास—नृपती; (२) द्रोणिलक—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण.

ग्रामनामे.—(१) विकट्टाणक—शिरपूरच्या आग्नेयेस असलेले हल्लीचे विटनेर असावे; (२) काशपूर व (३) कोहलट्टणक—यांची ओळख पटत नाही.

६९३. शिरोडे ताम्रपट, देवराज

गोवा राज्य तालुका—**फोंडा**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट शिरोडे येथे उत्खननात मिळाला.

संदर्भ.—(१) कृष्णम्माचारी, सी. आर्., इ. आय्., १९३७–३८, खंड २४, पृ. १४३–१४५; (२) लक्ष्मीनारायणराव, इ.आय्., १९४१–४२, खंड २६, पृ. ३३७; (३) गुणे, टी. व्ही. ए. आर. जी., १९६६, क्र. १.

भाषा व लिपी.—संस्कृत; दक्षिणी पद्धतीची.

राजवंश व राजा.—भोज नृपती देवराज.

वर्ष व तिथी.—माघ वद्य १२, १२ वे शासनवर्ष, अंदाजे इ. स. ४ थे शतक.

सारांश.—हे शासन देवराजाने चंद्रपूरहून दिलेले असून याचा मुख्य उद्देश त्याने जिजया विभागातील यान्नियरक–कोहिकय्य या गावातील कराचे उत्पन्न आणि इतर देणग्या भारद्वाज गोत्री गोविंदस्वामी व इंद्रस्वामी या दोन भावांना दिल्याचे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) देवराज—भोज नृपती; (२) प्रभुनाग—भोगिकामात्य; (३) अमरेश्वर–सर्वतंत्राधिकृत; (४) प्रभाकर—शासन तयार करणारा रहस्याधिकृत; (५) गोविंदस्वामी—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण; (६) इंद्रस्वामी—दान स्वीकारणारा गोविंदस्वामीचा भाऊ.

ग्रामनामे.—(१) जिजया—ओळख पटत नाही; (२) चंद्रऊर—गोव्यातील हल्लीचे चांदोर; (३) यान्नियरक–कोहिकय्य—ओळख पटत नाही.

६९४. शिलाहार शासन, च्छित्तराज

जिल्हा—ठाणे तालुका—उल्लेख नाही

प्राप्तिस्थळ.—दिलेले नाही.

संदर्भ.—इं.अ.रि., १९५६–५७, पृ. ४०.

भाषा व लिपी.—दिलेली नाही.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती च्छित्तराज.

वर्ष व तिथी.—शके ९५६, इ. स. १०३४.

सारांश.—या लेखात भगवती मंदिरात दीप लावण्यासाठी मांडलिक महामंडलेश्वर चामुंडराज याने मठिकेला तेलघाणी दान दिल्याचे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) च्छित्तुराज—शिलाहार नृपती; (२) चामुंडराज—मांडलिक राजा.

ग्रामनामे.—संयान—(संजान ?).

६९५. शिलाहार शासन नागार्जुन

जिल्हा—ठाणे तालुका—उल्लेख नाही

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट ठाणे येथे सापडला.

संदर्भ.—इं.अ.रि., १९६५–६६, पृ. ६४–६५, क्र. २९.

भाषा व लिपी.—संस्कृत; नागरी.

राजवंश व राजा.—उत्तर कोकणचा शिलाहार नृपती नागार्जुन.

वर्ष व तिथी.—शके ९६१, इ. स. १०३८.

सारांश.—या लेखात मध्यप्रदेशातील हस्तिग्रामहून आलेल्या गोकर्ण पंडिताचा पुत्र माधव पंडित याला वार्षिक ३०० द्रम्म उत्पन्न देणारे कोरियल १२ मधील मुंजवली हे गाव दान दिल्याचे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) माधव पंडित—दान स्वीकारणारा ब्राह्मण; (२) गोकर्ण पंडित—माधव पंडिताचा पिता; (३) नागार्जुन—शिलाहार नृपती.

ग्रामनामे.—(१) मुंजवली; (२) हस्तिग्राम. दोन्हीही गावांची ओळख पटलेली नाही.

६९६ शिलाहार शासन, मारसिंह

जिल्हा—उल्लेख नाही तालुका—उल्लेख नाही

प्राप्तिस्थळ.—या ताम्रपटाचे शाईने घेतलेले ठसे श्री. वाथेन यांच्या संग्रही होते. मूळ ताम्रपट हरवला आहे.

संदर्भ—(१) वाथेन, **ज.रॉ.ए.सो.**, खंड २, पृ. ३८४ व खंड ४, पृ. २८१; (२) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ. १०१–१०५.

भाषा व लिपी.—संस्कृत; कानडी

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती मारसिंह.

वर्ष व तिथी.—गुरुवार, पौष शुद्ध ७, विलंबी संवत्सर, शके ९८०, इ. स. १०५८.

सारांश.—प्रस्तुत शासन शिलाहार नृपती मारसिंह याच्या अमदानीतील आहे. याचा उद्देश कीळिगिळाचल दुर्गाहून राज्य करीत असताना मारसिंहाने कुंडी ३००० मधील मिरिंज जिल्ह्यातील सिरिवोळलमधील गाळिकुट्टि, हाडलिवाड, कन्नवाड या गावांच्या मध्यभागी असलेले कुंटवाड हे गाव चिक्कदेव नामक उपाध्यायाला दान दिले हे नमूद करण्याचा होता.

व्यक्तिनामे.—(१) मलेयंक—नाग नृपती; (२) जतिग—शिलाहार नृपती; (३) गोंकराज—शिलाहार नृपती, जतिगाचा पुत्र; (४) गुहलांक—शिलाहार नृपती, गोंकराजाचा धाकटा भाऊ; (५) मारसिंह—शिलाहार नृपती, गोंकराजाचा पुत्र; (६) चिक्कदेव—दान स्वीकारणारा उपाध्याय; (७) मलेयाळोदेव—चिक्कदेवाचा गुरु; (८) ब्रह्मेश्वर पंडित—मलेयाळोदेवाचा गुरु.

ग्रामनामे.—(१) मिरिंज—हल्लीचे मिरज; (२) सिरिवोळल—कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ; (३) तगरपूर—उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर. पुढील गावांची ओळख पटत नाही—(४) किळिगिळदुर्ग; (५) कुण्टवाड; (६) कन्नवाड; (७) हाडलीवाड; (८) गाळिकुट्टि; (९) करहाटक—हल्लीचे कऱ्हाड; (१०) पन्नाळदुर्ग—पन्हाळा किल्ला.

६९७. शिवपूर ताम्रपट, चंद्रवर्मन्

प्राप्तिस्थळ—गोव्यामध्ये सापडलेला हा ताम्रपट विले पार्ले, मुंबई येथील व्ही. आर्. वर्दे यांच्याजवळ आहे.

संदर्भ—(१) दीक्षित, मो. गं., **न्यू.इं.अँ.**, १९४१–४२, खंड ४, पृ. १८१–१८३; (२) सरकार, डी. सी., **अ.भा.ओ.रि.इ.**, रौप्यमहोत्सवी अंक, पृ. ५१०–५१३: इ.आय्., १९५९–६० खंड ३३, पृ. २९४; (३) गुणे, टी. व्ही., **ए.आर्.जी.**, १९६६, क्र. ४.

भाषा व लिपी—संस्कृत; दक्षिणी पद्धतीची ब्राह्मी लिपी.

राजवंश व राजा—कोकणचा मौर्य नृपती चंद्रवर्मन्.

वर्ष व तिथी—चैत्र वद्य १०, २ रे शासनवर्ष. लिपीच्या आधारे अंदाजे इ. स. ५ वे किंवा ६ वे शतक.

सारांश—हा ताम्रपट मौर्य नृपती चंद्रवर्मन् याने दिलेला आहे. या शासनाचा मुख्य उद्देश शिवपूर येथील महाविहाराला दिलेली जमिनीची देणगी नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे—(१) चंद्रवर्मन्—(अ) कदंब नृपती (दीक्षित); (ब) कोकणाचा मौर्य नृपती (सरकार).

ग्रामनामे—शिवपूर—चांदोर तालुक्यातील शिवपूर किंवा फोंडा तालुक्यातील शिरोड असावे. निश्चित ओळख पटत नाही.

६९८. शितर्गे दानपत्र, सर्बरस

जिल्हा—कोल्हापूर तालुका—शाहुवाडी

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट कोल्हापूर जवळच्या एका खेड्यातील पाटलाजवळ होता. सध्या हा कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठात आहे.

संदर्भ.—(१) मिराशी, वा. वि., इ.आय्., १९६७, खंड ३७, भाग १, पृ. ९–२४; (२) कृष्णा, एम्. एच्., अ.रि.म्है.अ.डि., १९२९, पृ. १९७–२१०.

भाषा व लिपी.—कन्नड; ९ व्या शतकातील कन्नड लिपी.

राजवंश व राजा.—सर्बरस हा राष्ट्रकूट अमोघवर्ष (प्रथम)—(कृष्णा).

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या ताम्रपटात कन्नवाड, गंगवाड, बळियवाड, रेर्णादाळ, सिळार यांचा प्रमुख सर्बरस याने आरुंबाळिगेसह शितर्गे दान दिल्याचे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) सर्बरस—(अ) कृष्णांच्या मते राष्ट्रकूट नृपती सर्व अथवा अमोघवर्ष (प्रथम); (ब) मिराशींच्या मते हा एक मोठा इनामदार असावा.

ग्रामनामे—(१) कन्नवाड—शिरोळ तालुक्यातील कनवाड; (२) गंगवाड—करवीर तालुक्यातील घानवडे; (३) बलियवाड—कागल तालुक्यातील बेलेवाडी; (४) रेर्णादाळ—रेंदाळ ता. हातकणंगले; (५) सियाळार—शिराळे, ता. शाहुवाडी किंवा बावडा; (६) शितर्गे—शाहुवाडी तालुक्यातील शितूर असावे; (७) आरुंबाळिगे—बाळिगे, ता. करवीर.

६९९. शेलारवाडी बौद्ध शैलगृह शिलालेख

जिल्हा—पुणे तालुका—हवेली

प्राप्तिस्थळ.—हा लेख शेलारवाडी शैलगृह क्र. १ च्या बाहेरच्या बाजूस कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) बर्जेस व इंद्रजी, इं.के.टे.वे.इं., १८८१, पृ. ३८; (२) बर्जेस व बुल्हर, अ.स.वे.इं., १८८३, खंड ४, पृ. ९२, क्र. १९.

भाषा व लिपी.—प्राकृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही.

सारांश.—या लेखात शेतकरी व गृहपती उसभणक याची पत्नी सिअगुतणिका हिची तिचा पुत्र गृहपती नंद याच्यासह दिलेली लेण्याची देणगी नमूद केली आहे.

व्यक्तिनामे.—(१) सिअगुतणिका (सिंहगुप्तिनिका किंवा श्रीयगुप्तिनिका)—पुत्रासह दान देणारी स्त्री; (२) उसभणक (ऋषभणक)—गृहपती, सिअगुतणिकाचा पती; (३) नंद—गृहपती, सिअगुतणिकाबरोबर दान देणारा तिचा पुत्र.

ग्रामनामे.—धेणुकाकड (धेनुकाकट)—हल्लीचे धरणिकोटा (आंध्र प्रदेश).

७००. संगम चालुक्य शिलालेख

जिल्हा—नांदेड तालुका—बिलोली

प्राप्तिस्थळ.—हा लेख संगम येथे सापडला.

संदर्भ.—इं.अ.रि., १९६४–६५, पृ. ५९, क्र. ४८.

भाषा व लिपी.—कन्नड व नागरी लिपीत कोरलेला आहे. भाषेचा उल्लेख नाही.

राजवंश व राजा.—कल्याणीचा चालुक्य नृपती विक्रमादित्य (६ वा).

वर्ष व तिथी.—शके १०४२, इ. स. ११२०.

सारांश.—हा त्रोटक लेख विक्रमादित्य (६ वा) याच्या अमदानीतील आहे.

व्यक्तिनामे.—(१) विक्रमादित्य (६ वा)—चालुक्य नृपती.

७०१. संगम शिलालेख, चालुक्य विक्रमादित्य (६ वा)

प्राप्तिस्थळ.—हा लेख संगम येथे सापडला.

संदर्भ.—इं.अ.रि., १९५९–६०, पृ. ५८, क्र. ३४.

भाषा व लिपी.—दिलेली नाही.

राजवंश व राजा.—कल्याणीचा चालुक्य नृपती विक्रमादित्य (६ वा).

वर्ष व तिथी.—शके १०४२, इ. स. १११९.

सारांश.—हा लेख त्रोटक आहे. लेख विक्रमादित्याच्या अमदानीतील असून यामध्ये राजपुत्र मल्लिकार्जुन, त्याचा मंत्री व सेनापती भृगुवंशीय ब्रह्मशर्मन् यांचा उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—(१) विक्रमादित्य (६ वा)—चालुक्य नृपती; (२) मल्लिकार्जुन—चालुक्य राजपुत्र, विक्रमादित्य (६ वा) चा पुत्र; (३) ब्रह्मशर्मन्—राजपुत्राचा भृगुवंशीय मंत्री व सेनापती

७०२. संगमनेर ताम्रपट, यादव भिल्लम (द्वितीय)

जिल्हा—अहमदनगर तालुका—संगमनेर

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट संगमनेरच्या एका रहिवाश्याजवळ मिळाला.

संदर्भ.—किलहॉर्न, इ. आय्., १८९४, खंड २, पृ. २१२–२२१.

भाषा व लिपी.—संस्कृत; तत्कालीन नागरी लिपी.

राजवंश व राजा.—यादव महासामंत भिल्लम (द्वितीय).

वर्ष व तिथी.—शर्वरी संवत्सर, सूर्यग्रहण, भाद्रपद अमावास्या, शके ९२२ (गतवर्ष), इ. स. १०००.

सारांश.—या शासनाचा मुख्य उद्देश भिल्लमाने काही जमीन भिन्न गोत्री २१ ब्राह्मणांना दान दिली हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) सेउणचंद्र—यादव नृपती; (२) धाडि(यप्प)—यादव नृपती, सेउणचंद्राचा पुत्र; (३) भिल्लम (प्रथम)—यादव नृपती, धाडियप्पाचा पुत्र; (४) श्रीराज किंवा

राजगि—यादव नृपती, भिल्लम (प्रथम) चा पुत्र; (५) वंदिग—यादव नृपती, श्रीराजाचा पुत्र; (६) वोद्दियव्वा—धोरप्प नृपतीची कन्या, वंदिगाची पत्नी; (७) भिल्लम (द्वितीय)—यादव नृपती, वंदिगाचा पुत्र; (८) कृष्ण किंवा कृष्णराज—राष्ट्रकूट नृपती; (९) मुंज—माळव नृपती; (१०) रणरंगभीम—पश्चिम चालुक्य नृपती तैलप; (११) धोरप्प (ध्रुव)—राष्ट्रकूट नृपती; (१२) केशव उपाध्याय—लेखक. दान स्वीकारणाऱ्या ब्राह्मणांची नावे पुढीलप्रमाणे—

ब्राह्मणाचे नाव	पित्याचे नाव	गोत्र	शाखा
–होपाध्याय	(१३)नारणै उपाध्याय	गौतम	वाजिकाण्व
(१४) विद्याधर	(१५)श्रीधर उपाध्याय	कौंडिन्य	वाजिकाण्व
(१६) महल(?) पैय	(१७) विद्धपैय	भारद्वाज	बह्वृच
(१८) महल(?) पैय	(१९) इंदपैय	कौंडिन्य	वाजिमाध्यं
(२०) देवपैय	(२१) अल्लपैय	,,	बह्वृच
(२२) प्रभाकर दीक्षित	....	....	छंदोग
(२३) वच्छपैय	....	....	मैत्रायणीय
(२४) अंध्रपम्यणैय	....	....	....
(२५) गुहिसपैय	....	....	माध्यंदिन
(२६) छंदोगग्गल(?)	(२७) सोमैय्य	....	....
(२८) महलपैय	....	....	माध्यंदिन
(२९) महलपैय राजदौवारिक	....	....	बह्वृच
(३०) संग्गल	....	....	—,,—
(३१) वप्पल (करहाटचा)	....	....	....
(३२) निंबैय	....	....	वाजिकाण्व
(३३) नेवपैय	....	....	बह्वृच
(३४) विक्कपैय	(३५) श्रीधर	कौशिक	—,,—
(३६) (धो?) प्पल	....	—,,—	—,,—
(३७) अण्णलैय	....	....	—,,—
(३८) दंदपैय	(३९) कालपै	....	—,,—
(४०) पौम्वदेव	(४१) अल्लपै	....	....

ग्रामनामे.—(१) सिंदीनगर—नाशिक जिल्ह्यातील हल्लीचे सिन्नर; (२) अर्ज्जुनोण्ढिका–अहमदनगर जिल्ह्यातील हल्लीचे राजपूर असावे (वर्जेस); (३) संगमनगर—अहमदनगर–जिल्ह्यातील हल्लीचे संगमनेर; (४) चिखलीग्राम—राजपूरच्या दक्षिणेस २ मैलांवरील चिखली; (५) जम्वलेनिम्वग्राम—राजपूरच्या पश्चिमेस २।। मैलांवरील जवलेकर्दक; (६) वव्वूलवेद्र—राजपूरच्या उत्तरेस २ मैलांवरील वेल्हाळे; (७) लघु अर्ज्जुनोण्ढिका; (८) लघु वव्वूलवेद्र यांची ओळख पटवलेली नाही; (९) मातुलिङ्गि–संगमनेरजवळील माळुंगि नदी.

७०३. संगलूद ताम्रपट, राष्ट्रकूट नन्नराज

जिल्हा—**अकोला** तालुका—**उल्लेख नाही**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट अकोला जिल्ह्यात संगलूद येथे मिळाला.

संदर्भ.—एम्. व्यंकटरामैय्या, इ. आय्., १९५१–५२, खंड २९, पृ. १०९–११५.

भाषा व लिपी.—संस्कृत; दाक्षिणात्य वळणाची.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती नन्नराज.

वर्ष व तिथी.—कार्तिक पौर्णिमा, शके ६१५, इ. स. ६९३.

सारांश.—हा ताम्रपट राष्ट्रकूट नृपती नन्नराज याच्या अमदानीतील आहे. या शासनाचा मुख्य उद्देश राजाने उंबरिकाग्राम व वटपूरकग्राम या गावातील जमीन तगरनिवासी वा(मा)रूळ गोत्री ब्राह्मण हरगण द्विवेदी याला दान दिली हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) दुर्गराज–राष्ट्रकूट नृपती; (२) गोविंदराज–राष्ट्रकूट नृपती, दुर्गराजाचा पुत्र; (३) स्वामिकराज—राष्ट्रकूट नृपती, गोविंदराजाचा पुत्र; (४) नन्नराज—राष्ट्रकूट नृपती स्वामिकराजाचा पुत्र; (५) हरगण द्विवेदी—दान स्वीकारणारा वा(मा)रूल गोत्री ब्राह्मण, कौशिक प्रवर, तैत्तिरीय चरण; (६) भूतगणभट्ट—हरगण द्विवेदीचा पिता; (७) वर्मुलक–चतुर्वेदी—हरगणाचा पितामह.

ग्रामनामे.—(१) पद्मनगर—अकोला जिल्ह्यातील हल्लीचे पद्मीन; (२) उंबरिका—अकोल्याजवळचे उंबरी; (३) तगर—उस्मानाबाद जिल्ह्यातील हल्लीचे तेर; (४) नागयवि—अकोल्याजवळचे नायगाव असावे; (५) वटपुरक; (६) वैवद्रक; (७) उच्छीवाहल. शेवटच्या तीन गावांची ओळख पटत नाही.

७०४. संजान ताम्रपट, अमोघवर्ष (प्रथम)

जिल्हा—**ठाणे** तालुका—**डहाणू**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट संजान येथे मिळाला.

संदर्भ.—भांडारकर, इ.आय्., १९२५–२६, खंड १८, पृ. २३५–२५७.

भाषा व लिपी.—संस्कृत; इतर राष्ट्रकूट लेखांप्रमाणे.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती अमोघवर्ष (प्रथम).

वर्ष व तिथी.—उत्तरायण, पौष, नंदन संवत्सर, शके ७९३, इ. स. ८७१.

सारांश.—हा ताम्रपट राष्ट्रकूट नृपती अमोघवर्ष याच्या अमदानीतील आहे. या शासनाचा प्रमुख उद्देश संजानजवळील २४ खेड्यांच्या गटातील झरिवल्लिका हे गाव चार ब्राह्मणांना दान दिले हे नमूद करणे हा होता. हे शासन मान्यखेटहून दिले होते. हा लेख वालभच्या कायस्थ घराण्यातील वत्सराजपुत्र गुणधवल याने लिहिला व या प्रसंगी महत्तक गोगु राणक हा दूतक होता.

व्यक्तिनामे.—(१) पृच्छकराज—राष्ट्रकूट नृपती; (२) गोविंद—राष्ट्रकूट नृपती, पृच्छक राजाचा पुत्र; (३) कर्क—राष्ट्रकूट नृपती; (४) इंद्र—राष्ट्रकूट नृपती; (५) दंतिदुर्ग—राष्ट्रकूट नृपती; (६) शुभतुंग वल्लभ (कृष्ण प्रथम)—राष्ट्रकूट नृपती; (७) प्रभूतवर्ष (गोविंद द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती; (८) धारावर्ष (ध्रुव)—राष्ट्रकूट नृपती; (९) गोविंद (तृतीय)—त्रिभुवनधवल हे बिरुद धारण करणारा राष्ट्रकूट नृपती, धारावर्षाचा पुत्र; (१०) अमोघवर्ष—दान

देणारा राष्ट्रकूट नृपती, गोविंद (तृतीय) चा पुत्र; (११) वत्सराज—अवंतीचा प्रतीहार नृपती; (१२) नागभट—गोविंद (तृतीय) ने जिकलेला प्रतीहार नृपती, वत्सराजाचा पुत्र; (१३) चंद्रगुप्त—गोविंद (तृतीय) ने जिकलेला कोशल देशाचा पांडव वंशीय राजा; (१४) धर्म—गोविंद (तृतीय) ने जिकलेला पाल घराण्यातील नृपती धर्मपाल; (१५) चक्रायुध—गोविंद (तृतीय) ने जिंकलेला कनोजचा नृपती; (१६) आर्य पातालमल्ल—अमोघवर्षाला साहाय्य करणारा नृपती; (१७) माराशर्व—श्रीभवनचा नृपती महाराज शर्व; (१८) गुणधवल—शासन लिहिणारा कायस्थ; (१९) वत्सराज—गुणधवलाचा पिता; (२०) गोगूराणक—महत्तक दूतक; (२१) नरसिंघ दीक्षित—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (२२) गोल सडगमि—नरसिंघ दीक्षिताचा पिता; (२३) साविकुवार—नरसिंह दीक्षिताचा पितामह; (२४) रच्छादित्य—दान स्वीकारणारा भारद्वाज गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (२५) गोविंदभट्ट—रच्छादित्याचा पिता; (२६) भट्ट—रच्छादित्याचा पितामह; (२७) त्रिविक्रम षडंगमि—दान स्वीकारणारा वड्डमुख गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (२८) विष्णुभट्ट—त्रिविक्रमाचा पिता; (२९) दावडि गहियसहास—त्रिविक्रमाचा पितामह; (३०) केशव गहियसहास—दान स्वीकारणारा वत्स गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (३१) गोवादित्य भट्ट—केशवाचा पिता; (३२) हरिभट्ट—केशवाचा पितामह.

ग्रामनामे.—(१) संजान—ठाणे जिल्ह्यातील हल्लीचे संजान; (२) झरिवल्लिका—ठाणे जिल्ह्यातील हल्लीचे झरोली; (३) उप्पलहत्थक—हल्लीचे उपलात; (४) नंदग्राम—हल्लीचे नंदगाव; (५) धन्नवल्लिका—हल्लीचे धनोली; (६) मान्यखेट—हल्लीचे मालखेड; (७) उज्जैन—हल्लीचे उज्जैन; (८) श्रीभवन—ओळख पटवलेली नाही; (९) हेलापूर—म्हैसूर प्रांतातील बेलापूर किंवा बेलूर असावे; (१०) लंका—हल्लीचे सिलोन (श्रीलंका); (११) कांची—हल्लीचे कांची; (१२) करहाड—सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड; (१३) कल्लुवी—ठाणे जिल्ह्यातील काळु नदी.

७०५. साग्रोली चालुक्य शिलालेख

जिल्हा—**नांदेड** तालुका—उल्लेख नाही.

प्राप्तिस्थळ.—हा लेख साग्रोली येथे मिळाला.

संदर्भ.—इं. अ. रि., १९६४–६५, पृ. ५९, क्र. ४७.

भाषा व लिपी.—कन्नड.

राजवंश व राजा.—कल्याणीचा चालुक्य नृपती विक्रमादित्य ६ वा.

वर्ष व तिथी.—शासन वर्ष ३५, ३७ व ३९.

सारांश.—हे चार लेख आहेत. यामध्ये सवरवल्ली येथील सांबेश्वराला नंदादीपासाठी तेल, तेलघाणा व कराचे उत्पन्न अशा रूपाने दिलेल्या देणग्या नमूद केल्या आहेत. ३७ व्या शासनवर्षातील २ लेख आहेत.

व्यक्तिनामे.—विक्रमादित्य (६ वा)—चालुक्य नृपती.

ग्रामनामे.—सवरवल्ली—हल्लीचे साग्रोली.

७०६. सामनगड ताम्रपट, राष्ट्रकूट दंतिदुर्ग

जिल्हा—**कोल्हापूर** तालुका—**गडहिंग्लज**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट सामनगड येथे सापडला. सध्या हा ताम्रपट रॉयल एशियाटिक सोसायटीमध्ये आहे.

संदर्भ.—(१) शास्त्री, बी. जी., **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८४४–४७, खंड २, पृ. ३७१–३७५; (२) फ्लीट, **इं. अॅ.** १८८२, खंड ११, पृ. ११०–११५.

भाषा व लिपी.—संस्कृत; ८ व्या शतकातील.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती दंतिदुर्गराज.

वर्ष व तिथी.—माघ शुद्ध ७, रथसप्तमी, शके ६७५, इ. स. ७५३.

सारांश.—प्रस्तुत शासन राष्ट्रकूट नृपती दंतिदुर्गराज याच्या अमदानीतील आहे. या शासनाचा मुख्य उद्देश दंतिदुर्गाने कोप्पर ५०० भुक्तिमधील करंदिवडेजफितदेऊलवाडा (?) हे खेडे करहाटक निवासी ब्राह्मण नारायणभट्ट याला दान दिले हे नमूद करणे हा होता. हे शासन इंद्र याने लिहिले.

व्यक्तिनामे.—(१) गोविंदराज—राष्ट्रकूट नृपती; (२) कर्कराज—राष्ट्रकूट नृपती, गोविंद-राजाचा पुत्र; (३) इंद्रराज—राष्ट्रकूट नृपती, कर्कराजाचा पुत्र; (४) दंतिदुर्ग—दान देणारा राष्ट्रकूट नृपती, इंद्रराजाचा पुत्र; (५) वल्लभ—दंतिदुर्गाने जिकलेला चालुक्य नृपती कीर्तिवर्मन् (द्वितीय); (६) नारायणभट्ट—दान स्वीकारणारा वसिष्ठ गोत्री ब्राह्मण, बह्वृच शाखा; (७) कृष्णभट्ट—नारायणभट्टाचा पिता; (८) त्रिविक्रमभट्ट—नारायणभट्टाचा पितामह; (९) इंद्र—शासनाचा लेखक.

ग्रामनामे.—(१) करंदिवडेजफितदेऊलवाडा (?)—ओळख पटत नाही; (२) उवात्यलेवाडी; (३) पारगावा; (४) विल्ववाडे (?); (५) ऐतवडे. यापैकी कोणत्याच गावाची ओळख पटत नाही.

७०७. सावई-वेरे ताम्रपट, कदंब गुहल्लदेव

राज्य—**गोवा** तालुका—**फोंडा**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट तिवरे या गावी एका शेतकऱ्याजवळ होता. हल्ली हा ताम्रपट मुंबईच्या सेंट झेवियर कॉलेजमध्ये भारत इतिहास संशोधन संस्थेच्या संग्रही आहे.

संदर्भ.—(१) दीक्षित, मो. गं., **म. प्रा. ता. शि.**, १९४७, पृ. ४६–६८.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. १० व्या शतकातील नागरी लिपी.

राजवंश व राजा.—कदंब नृपती गुहल्लदेव.

वर्ष व तिथी.—गुरुवार, चैत्र शुद्ध पौर्णिमा, चंद्रग्रहण, बहुधान्य संवत्सर, शके ९६० (गतवर्ष) २३ मार्च, इ. स. १०३८.

सारांश.—हे शासन कदंब नृपती गुहल्लदेव (द्वितीय) याने दिलेले आहे. या शासनाचा उद्देश शाटचायन गोत्री नारायणभट्टाला सावई हे गाव दान दिले हे नमूद करण्याचा होता. नारायणभट्ट हा गुहल्लदेवाचा उपाध्याय होता. हे शासन माध्वालीचा पुत्र व कविश्रेष्ठ ब्राह्मणाने लिहिला व गंगाधराने कोरला.

व्यक्तिनामे.—(१) कंटकाचार्य—कदंब नृपती; (२) नायव्यदेवी—कंटकाचार्याची पत्नी; (३) नागवर्मन्—कदंब नृपती, कंटकाचार्याचा पुत्र; (४) मालव्यदेवी—नागवर्म्याची सुस्वरूप पत्नी; (५) गुहल्लदेव (प्रथम)—कदंब नृपती, नागवर्म्याचा पुत्र; (६) गौरव्यदेवी—गुहल्लदेव (प्रथम)ची पत्नी; (७) षष्ठ—कदंब नृपती, गुहल्लदेव (प्रथम)चा पुत्र; मंत्री मंडळाचा अध्यक्ष; (८) गुहल्लदेव (द्वितीय)—दान देणारा कदंब नृपती, षष्ठाचा पुत्र; (९) च्छद्दुम—मुख्य स्वीकरण; (१०) देवण—मुख्य स्वीकरण; (११) गोविंद—प्रतिहस्तक (उपाध्यक्ष); (१२) श्रीयमै—

प्रधान; (१३) दामपै—प्रधान?; (१४) माधव—प्रधान?; (१५) खेन्तपै—महल्ल (अंत:पुरावरील अधिकारी); (१६) भल्लपै—सांधिविग्रहिक; (१७) गोवर्धन—पुरोहित; (१८) मंगल—शाटचायन गोत्री ब्राह्मण; (१९) सिरिवा—मंगलची पत्नी; (२०) आदित्य—मंगलचा पुत्र, क्रमिक अग्निहोत्री; (२१) अरेवा—आदित्याची पत्नी; (२२) नारायणभट्ट—दान स्वीकारणारा आदित्याचा पुत्र, गोवर्धन पुरोहिताचा भाऊ; (२३) माध्वाली—लेखकाचा पिता?; (२४) गंगाधर—ताम्रपट कोरणारा.

ग्रामनामे.—(१) गोकर्ण—हल्लीचे गोकर्ण; (२) कोल्लापूर—हल्लीचे कोल्हापूर; (३) स्थानक—हल्लीचे ठाणे; (४) सोमेश्वर—हल्लीचे सोमनाथ; (५) कारी—सध्याचे केरी; (६) तास विषय—गोव्याचा तिसवाडी विभाग असावा; (७) चंद्रपूर—गोव्यातील हल्लीचे चांदोर; (८) साउवै व (९) वेरक—सध्या सावई-वेरे या एकाच नावाने ही दोन शेजारी शेजारी वसलेली गावे ओळखली जातात; (१०) सुरलवडपाटक—सावईवेऱ्याच्या आग्नेयेस असलेले सुरल असावे; (११) वेत्तगी—सावई-वेऱ्याच्या वायव्येस दीड मैलावर असलेले बेतगी असावे.

७०८. सावरगाव शिलालेख, कदंब मरुडदेव

जिल्हा—**उस्मानाबाद** तालुका—**तुळजापूर**

प्राप्तिस्थळ.—हा लेख सावरगाव येथील मल्लिकार्जुनाचे मंदिरातील एका दगडी खांबावर कोरलेला आहे.

संदर्भ.—(१) खरे, ग. ह., **द. म. इ. सा.**, १९३४, खंड २, पृ. १–३; (२) तुळपुळे, शं. गो. **प्रा.म.को.ले.**, १९६३, पृ. ६८–७१, क्र. १३.

भाषा व लिपी.—संस्कृत-मराठी मिश्रण; इ. स. १० –११ व्या शतकातील देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—कदंब महामंडलेश्वर मरुडदेव राणक.

वर्ष व तिथी.—शके १०८६, तारण संवत्सर, अश्विन शुद्ध १, गुरुवार (जमत नाही.), शनिवार १९ सप्टेंबर, इ. स. ११६४.

सारांश.—या लेखाचा मुख्य उद्देश महामंडलेश्वर मरुडदेवाचा सेवक भाली व इतरांनी अंबादेवीला दिलेल्या देणग्या नमूद करणे हा होता. प्रस्तुत लेख मल्लिकार्जुन मंदिरात कोरण्याचे कारण समजत नाही.

व्यक्तिनामे.—(१) मरुडदेव (मारडदेव-खरे)—महामंडलेश्वर; (२) भाली—मरुडदेवाचा दान देणारा सेवक; (३) माधवनायक—दानकर्ता; (४) लाहिप नायक—दानकर्ता.

७०९. सावरगाव शिलालेख, चालुक्य त्रैलोक्यमल्ल (द्वितीय)

प्राप्तिस्थळ.—हा शिलालेख सावरगावपासून १॥ मैलावर असलेल्या विहिरीच्या काठावर सापडला.

संदर्भ.—तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.**, १९६३, पृ. ३४८–३५०, क्र. ६६.

भाषा व लिपी.—मराठी; इ. स. १०–११ व्या शतकातील देवनागरी लिपी.

राजवंश व राजा.—कल्याणीचा चालुक्य नृपती त्रैलोक्यभुवनमल्ल.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. १२ व्या शतकातील हा लेख असावा (तुळपुळे).

सारांश.—या लेखात चालुक्य नृपती आ(हवम)ल्ल (सोमेश्वर १ ला) याने सावरगाव येथील गुंडेश्वर मंदिराला देणगी दिल्याचे नमूद केले आहे व त्रैलोक्यभुवनैकमल्लाच्या अमदानीत श्रीपतिनायक याने या देवळाचा जीर्णोद्धार केल्याचे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—(१) त्रैलोक्यभुवनैकमल्ल—चालुक्य नृपती; (२) श्रीपति नायक—देवळाचा जीर्णोद्धार करणारा.

७१०. सावरगाव एकलवीर स्मारक शिलालेख

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेला शिलाखंड सावरगावजवळ एका शेतात मिळाला.

संदर्भ.—तुळपुळे, शं. गो., **प्रा. म. को. ले.**, १९६३, पृ. ३७४–३७५, क्र. ७३.

भाषा व लिपी.—मराठी; देवनागरी.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. १२ वे–१३ वे शतक.

सारांश.—या लेखाचा सुसंगत अर्थ लागत नाही. यात प्रथम नीलकंठ व एकलवीर यांचा उल्लेख आहे. त्यातील एकलवीर पराजित झाल्याने पंचत्वाप्रत गेला व म्हणून तो यति झाला (मुक्ति पावला.) अर्थ नीट स्पष्ट होत नाही.

७११. सांगली ताम्रपट, राष्ट्रकूट गोविंदराज

जिल्हा—**सांगली** तालुका—**सांगली**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट सांगलीच्या एका ब्राह्मण कुटुंबाजवळ मिळाला. नंतर हा ताम्रपट सावंतवाडीच्या वामनराव पीतांबर चिटणीस यांच्याजवळ होता.

संदर्भ.—(१) जेकब, **ज.बॉ.ब्रॅ.रॉ.ए.सो.**, १८५०–५२, खंड ४, पृ. १००–१०४; (२) फ्लीट, **इं. अँ.**, १८८३, खंड १२, पृ. २४७–२५५.

भाषा व लिपी.—संस्कृत; प्राचीन नागरी लिपी.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती गोविंद (५ वा).

वर्ष व तिथी.—शके ८५५, विजय संवत्सर, पूर्वा भाद्रपदा नक्षत्र, श्रावण पौर्णिमा, गुरुवार, इ. स. ९३३–३४.

सारांश.—हा ताम्रपट गोविंद (५ वा) याच्या अमदानीतील आहे. या शासनाचा मुख्य उद्देश राजाने रामपुरी ७०० या विभागातील लोहग्राम हे गाव कौशिक गोत्री ब्राह्मण केशव दीक्षित याला दान दिले हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) दंतिदुर्ग—राष्ट्रकूट नृपती; (२) कृष्ण—राष्ट्रकूट नृपती, दंतिदुर्गाचा चुलता; (३) गोविंद—राष्ट्रकूट नृपती, कृष्णाचा पुत्र; (४) निरुपम—राष्ट्रकूट नृपती, गोविंदचा भाऊ; (५) जगत्तुंग (प्रथम)—राष्ट्रकूट नृपती; (६) अमोघवर्ष—राष्ट्रकूट नृपती, जगत्तुंगाचा पुत्र; (७) अकालवर्ष—राष्ट्रकूट नृपती, अमोघवर्षाचा पुत्र; (८) जगत्तुंग (द्वितीय)—राष्ट्रकूट नृपती, अकालवर्षाचा पुत्र; (९) इंद्रराज—राष्ट्रकूट नृपती, जगतुंग (द्वितीय) चा पुत्र (१०) गोविंदराज—दान देणारा राष्ट्रकूट नृपती, इंद्रराजाचा पुत्र; (११) लक्ष्मी—कलचुरी राजकन्या, जगत्तुंग (द्वितीय) ची पत्नी; (१२) रणविग्रह—कलचुरी नृपती, लक्ष्मीचा पिता; (१३) द्विजांबा—हैहय राजकन्या, इंद्रराजाची पत्नी; (१४) अम्मणदेव—हैहय नृपती,

द्विजांबाचा पिता; (१५) अर्जुन—हैहय नृपती, अम्मणदेवाचा पिता; (१६) कोक्कल—हहय नृपती, अर्जुनाचा व रणविग्रहाचा पिता; (१७) केशव दीक्षित—दान स्वीकारणारा कौशिक गोत्री ब्राह्मण, वाजिकाण्व शाखा; (१८) दामोदरभट्ट—केशव दीक्षिताचा पिता.

ग्रामनामे.—(१) पुंडवर्धन—उत्तर बंगालमधील महास्थान; (२) मान्यखेट—हल्लीचे मालखेड. पुढील गावांची ओळख पटत नाही; (३) घोडेग्राम; (४) वंजुली; (५) लोहग्राम; (६) विंचविहरज; (७) सोन्नही.

७१२. सांगसी स्मारक शिलालेख

जिल्हा—**कोल्हापूर** तालुका—**गगनबावडा**

प्राप्तिस्थळ.—हा लेख सांगसीजवळ असलेल्या एका शेतात मिळाला. सध्या हा शिलालेख गगनबावड्याच्या पूर्वेस दोन मैलांवर एका छोट्या देवळात ठेवलेला आहे.

संदर्भ.—(१) सांकलिया व दीक्षित, बु.डे.कॉ.रि.इं., डिसेंबर १९४८, पृ. १६१–१६६; (२) देसाई, बी. पी., इ. आय्., १९४९–५०, खंड २८, पृ. १२९–१३३.

भाषा व लिपी.—संस्कृत; दाक्षिणात्य वळणाची पेटिकाशीर्षक लिपी.

राजवंश व राजा.—नृपती पु. . . . (पुष्पायुध?).

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही. अंदाजे इ. स. ५००.

सारांश.—या लेखात राजा व त्याची पत्नी हालिदेवी यांचा उल्लेख आहे. लेखाच्या शेवटी ही शिला राजाने आपल्या पत्नीच्या स्मृतीप्रीत्यर्थ बसवली असल्याचे सांगितले आहे.

व्यक्तिनामे.—हालिदेवी—राजपत्नी.

७१३. सीसवे ताम्रपट, राष्ट्रकूट गोविंद (तृतीय)

जिल्हा—**अकोला** तालुका—**मूर्तिजापूर**

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट सिरसोच्या एका मुसलमानाजवळ मिळाला. सध्या हा ताम्रपट नागपूरच्या सेंट्रल म्युझियममध्ये आहे.

संदर्भ.—मिराशी, वा. वि., इ. आय., १९३५–३६, खंड २३, पृ. २०४–२१२.

भाषा व लिपी.—संस्कृत; उत्तरेकडील वळणाची.

राजवंश व राजा.—राष्ट्रकूट नृपती गोविंद (तृतीय).

वर्ष व तिथी.—चंद्रग्रहण, भाद्रपद पौर्णिमा, व्यय संवत्सर, शके ७२९ (गतवर्ष), शनिवार, २१ ऑगस्ट, इ. स. ८०७.

सारांश.—या शासनाचा मुख्य उद्देश धाराशिवचा रहिवासी काश्यप गोत्री रिसियप्पभट्ट याला राजाने माणक विषयातील सीसवें हे गाव आणि मोरग्गणमधील काही जमीन दान दिली हे नमूद करणे हा होता. हे शासन वत्सराजाचा पुत्र अरुणादित्याने लिहिले व याप्रसंगी जडवुलभट्ट हा दूतक होता.

व्यक्तिनामे.—(१) कृष्णराज—राष्ट्रकूट नृपती; (२) निरुपम कलिवल्लभ—राष्ट्रकूट नृपती, कृष्णराजाचा पुत्र; (३) गोविंदराज—दान देणारा राष्ट्रकूट नृपती, निरुपमाचा पुत्र; (४) माराशर्व—गोविंदराजाने जिंकलेला नृपती; (५) रिसियप्पभट्ट—दान स्वीकारणारा काश्यप

गोत्री ब्राह्मण; (६) अन्नसाविभट्ट—रिसियप्प भट्टाचा पिता; (७) विष्णुभट्ट—रिसियप्पभट्टाचा पितामह; (८) अरुणादित्य—शासन लिहिणारा; (९) वत्सराज—अरुणादित्याचा पिता; (१०) जडवुलभट्ट—दूतक.

ग्रामनामे.—(१) श्रीभवन—भडोच जिल्ह्यातील हल्लीचे सरभोण; (२) वेंगी—पूर्व चालुक्यांची राजधानी; (३) मयूरखंडी—चांदा जिल्ह्यातील मार्कंडी; (४) सीसवै—हल्लीचे सिरसो; (५) मोरगण—निश्चित ओळख पटत नाही. कदाचित हल्लीचे मूर्तिजापूर असेल; (६) माणक—मुंबई-नागपूर रेल्वे मार्गावरील माना स्टेशन, मूर्तिजापूरच्या पूर्वेस ८ मैल; (७) हरिपूर—सिरसोच्या पूर्वेस २ मैलांवरील हिरपूर; (८) खैरडे—सिरसोच्या आग्नेयेस ३ मैलांवरील खरवाडी; (९) अथकवाड—सिरसोच्या पश्चिमेस ३।। मैलांवरील अतकली; (१०) लखैपरी—सिरसोच्या उत्तरेस ५ मैलांवरील लाखपुरी; (११) धाराशिव—अकोला जिल्ह्यात अकोट तालुक्यांतील धारुर असावे. निश्चित ओळख पटत नाही.

७१४. सेंट झेवियर कॉलेज, कदंब शासन

जिल्हा—**उल्लेख नाही.** तालुका—**उल्लेख नाही**

प्राप्तिस्थळ.—सध्या हा ताम्रपट सेंट झेवियर कॉलेजच्या संग्रही आहे.

संदर्भ.—इं. अ. रि., १९५६–५७, पृ. ४०.

भाषा व लिपी.—उल्लेख नाही.

राजवंश व राजा.—उल्लेख नाही.

वर्ष व तिथी.—चंद्रग्रहण, शके ९६०, इ. स. १०३८.

सारांश.—या लेखात नारायण उपाध्यायाला धेरकमध्ये असलेल्या सौवयिपाटक या गावाची करमुक्त देणगी मिळाल्याचे नमूद केले आहे.

व्यक्तिनामे.—नारायण—दान स्वीकारणारा उपाध्याय.

ग्रामनामे.—(१) सौवयिपाटक—ओळख पटत नाही; (२) अंबरमंगल—नारायणाचे मूलस्थान, ओळख पटत नाही.

७१५. सोपारा शिलालेख, अशोक

जिल्हा—**ठाणे** तालुका—**वसई**

प्राप्तिस्थळ.—हा लेख असलेला शिलाखंड बॉम्बे बँच ऑफ रॉयल एशियाटिक सोसायटीचे ग्रंथपाल श्री. एन्. ए. गोरे यांना सोपाऱ्याजवळ भुईगाव येथे मिळाला. हा शिलाखंड प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, मुंबई येथे आहे.

संदर्भ.—सरकार, डी. सी., इ. आय्., १९५७–५८, खंड ३२, पृ. २९–३०.

भाषा व लिपी.—प्राकृत; मौर्यकालीन ब्राह्मी.

राजवंश व राजा.—देवानांपिय पियदसी (अशोक).

वर्ष व तिथी.—अंदाजे इ. स. ३ रे शतक.

सारांश.—अशोकाच्या ९ व्या शिलाशासनाचा हा काही भाग आहे.

७१६. हिस्से-बोराळा शिलालेख, वाकाटक देवसेन

जिल्हा—अकोला तालुका—वाशीम

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत लेख असलेला शिलाखंड हिस्से-बोराळा या खेड्यात सापडला.

संदर्भ.—(१) मिराशी, वा. वि., **वा. रा. इ. अ.**, १९६४, पृ. २८९–२९०; (२) कोलते वि. भि., **वि. सं. मं.**, वार्षिक पत्रिका, १९६४, पृ. १३६–१३७; (३) गोखले, शोभना, **इ.आय्.**, १९६७, खंड ३७, भाग १, पृ. १–४.

भाषा व लिपी.—संस्कृत; ब्राह्मी.

राजवंश व राजा.—वाकाटक नृपती देवसेन.

वर्ष व तिथी.—शके ३८०, इ. स. ४५८–५९.

सारांश.—या लेखाचा उद्देश वाकाटक नृपती देवसेन याचा सेवक स्वामिल्लदेव याने सुदर्शन तळे बांधले याची नोंद करणे हा होता. बप्पक हा या कामावर देखरेख करणारा अधिकारी, कर्मोपदेष्टा होता.

व्यक्तीनामे.—(१) देवसेन—वाकाटक नृपती; (२) स्वामिल्लदेव—सुदर्शन तळे बांधणारा देवसेनाचा आज्ञाकर अधिकारी; (३) बप्पक—कर्मोपदेष्टा.

विशेष महत्त्व.—शक वर्षाचा उल्लेख वाकाटक शिलालेखात प्रथमच मिळाला आहे. यापूर्वी सापडलेल्या शिलालेखात त्या त्या राजांच्या शासन वर्षांचा उल्लेख आढळतो. तसेच आतापर्यंत ४६५ हे शक वर्ष माहीत होते परंतु या शिलालेखात त्या आधीचे शके ३८० ज्ञात झाले.

७१७. हिंगणी बेर्डी ताम्रपट, राष्ट्रकूट विभुराज

जिल्हा—पुणे तालुका—दौंड

प्राप्तिस्थळ.—हा ताम्रपट भीमा नदीच्या तीरावर असलेल्या हिंगणी बेर्डी या खेड्यामध्ये एका ब्राह्मणाच्या घरी मिळाला.

संदर्भ.—(१) चांदोरकर, **भा. इ.**, **सं. मं.**, ६ वे वार्षिक, पृ. ६३–६५; (२) दीक्षित, मो. गं. **इ. आय्.**, १९५१–५२, खंड २९, पृ. १७४–१७८.

भाषा व लिपी.—संस्कृत; दाक्षिणात्य वळणाची कीलकशीर्षक लिपी, इ. स. ५ वे–६ वे शतक.

राजवंश व राजा—राष्ट्रकूट नृपती विभुराज.

वर्ष व तिथी.—३ रे शासनवर्ष, वैशाख पौर्णिमा.

सारांश.—हा लेख राष्ट्रकूट नृपती विभुराज याच्या अमदानीतील आहे. या लेखाचा उद्देश विभुराजाच्या राज्याभिषेक शकाच्या तिसऱ्या वर्षी माणराजाची माता श्यावलंगी महादेवी हिने वैशाखी पौर्णिमेला कमलीभूहक हे गाव व ५० सुवर्णशलाका नन्नस्वामी नावाच्या ब्राह्मणास धर्मकृत्ये करण्यासाठी दान दिल्या हे नमूद करणे हा होता.

व्यक्तिनामे.—(१) विभुराज—राष्ट्रकूट नृपती; (२) देवराज—राष्ट्रकूट नृपती; (३) श्यावलंगी महादेवी—दान देणारी राष्ट्रकूट राणी, देवराजाची पत्नी; (४) माणराज—श्यावलंगीचा पुत्र. दीक्षितांच्या मते विभुराजाचे दुसरे नाव; (५) नन्नस्वामी—दान स्वीकारणारा अगस्त्य गोत्री ब्राह्मण.

ग्रामनामे.—(१) कमलीभूहक—पुरेशा माहितीअभावी ओळख पटत नाही.

७१८. हिंपळगाव चालुक्य शिलालेख

जिल्हा—उस्मानाबाद तालुका—अहमदपूर

प्राप्तिस्थळ.—हा लेख हिंपळगाव येथील गणेशवाडीत आहे.

संदर्भ.—इं. अ. रि., १९६४–६५, पृ. ५९, क्र. ४९.

भाषा व लिपी.—संस्कृत; नागरी.

राजवंश व राजा.—चालुक्य नृपती विक्रमादित्य (६ वा).

वर्ष व तिथी.—२४ वे शासनवर्ष, चालुक्य विक्रम संवत् २४, इ. स. १०९९.

सारांश.—या लेखात पिप्पल येथे ब्रह्मा, विष्णु व शिव मंदिर बांधल्याचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे भीम सेनापतीने दिलेल्या देणग्या नमूद केल्या आहेत. त्याचा पुत्र अभिनव कालिदास दंडनायक याने वदिरुद्र पंडित व त्याचे शिष्य यांची स्तुती केलेली आहे.

व्यक्तिनामे.—(१) भीम—दान देणारा सेनापती; (२) अभिनव कालिदास—दंडनायक, भीमाचा पुत्र; (३) वदिरुद्र पंडित.

ग्रामनामे.—(१) पिप्पल—ओळख पटवलेली नाही.

७१९. हेर्ले कानडी शिलालेख, शिलाहार गंडरादित्य

जिल्हा—कोल्हापूर तालुका—करवीर

प्राप्तिस्थळ.—प्रस्तुत लेख कोल्हापूर जिल्ह्यात करवीर पेटचातील हेर्ले या खेड्यात मिळाला.

संदर्भ.—ग्रॅहॅम, कोल्हापूर, १८५४, पृ. ३२६ व ३४९–३५०.

भाषा व लिपी.—प्राचीन कानडी भाषा व लिपी.

राजवंश व राजा.—शिलाहार नृपती गंडरादित्य.

वर्ष व तिथी.—चंद्रग्रहण, विलंबी संवत्सर, शके १०४०, इ. स. १११८.

सारांश.—या लेखात नृपतीने कोल्हापूरनिवासी आचार्य शांतिदेव शांतधीर याला इंद्रनद या खेड्यातील ६० वऊले भरणारी जमीन मोगलदेवीच्या विनंतीवरून दान दिली. त्याचप्रमाणे राजाने एका सावकाराजवळ काही रक्कम ठेवावयास दिली होती असाही उल्लेख आहे. या रकमेवर येणारे व्याज व दान दिलेल्या जमिनीपासून मिळणारे उत्पन्न यांचा उपयोग इंद्रनद येथील जैन देवालयासाठी करावयाचा होता. लेखाच्या प्रारंभी बलचंद्र वगैरे जैन यतीचा उल्लेख आहे.

व्यक्तिनामे.—(१) गंडरादित्य—शिलाहार नृपती; (२) मोगलदेवी—दानासाठी विनंती करणारी; (३) शांतिदेव शांतधीर—दान स्वीकारणारा जैन आचार्य; (४) बालचंद्र—जैन यति; (५) चंद्रप्रभ—जैन यतींचा मुख्य.

ग्रामनामे.—(१) वळवड—ओळख पटत नाही; (२) हेरुलगे—लेख सापडला ते हेर्ले हे ठिकाण; (३) इंद्रनद—ओळख पटत नाही, (४) कोल्हापूर—हल्लीचे कोल्हापूर.

७२०. होट्टल शिलालेख, चालुक्य सोमेश्वर

जिल्हा—**नांदेड** तालुका—**देगलूर**

प्राप्तिस्थळ.—हा लेख होट्टल येथील एका भग्न मंदिरात पडलेल्या खांबावर कोरलेला मिळाला.

संदर्भ.—(१) सरकार, डी.सी. व भट्टाचार्य, जी., इ. आय्., १९६३–६४, खंड ३५, पृ. १५९–१६८; (२) इं. अ. रि., १९५८–५९, पृ. ५९–६०, क्र. १९.

भाषा व लिपी.—संस्कृत; इ. स. ११ व्या–१२ व्या शतकातील नागरी लिपी.

राजवंश व राजा.—कल्याणचा चालुक्य नृपती सोमेश्वर.

वर्ष व तिथी.—निश्चित उल्लेख नाही. कार्तिक पौर्णिमा, कृत्तिका नक्षत्र, अंदाजे ११ व्या शतकाचा उत्तरार्ध.

सारांश.—या लेखात प्रारंभी शिवस्तुती केली आहे. नंतर राजाची वंशावळ सांगितली आहे. या लेखाचा मुख्य उद्देश सिद्धगी नामक वैश्याने सोमेश्वर नृपतीची राजधानी असलेल्या कल्याण शहरी परमेश्वर स्थाणूची प्रतिष्ठापना केली हे सांगण्याचा होता. राजाने प्रत्येक खेड्यातून व शहरातून मिळणाऱ्या उत्पन्नातून या देवाची पूजा करण्यासाठी एकेक निष्क आणि द्रम्म दान दिले. दान उपाध्याय चंद्रराशी याच्यासमोर झाले. सिद्धेश्वराच्या पूजेसाठी हीच व्यवस्था केली.

व्यक्तिनामे.—(१) मुनिमानसिद्धि–अग्निवंशाचा मूळ पुरुष; (२) धोरराज (ध्रुवराज)–अग्निवंशीय नृपती; (३) मुंज—परमार नृपती; (४) तैलेश्वर—चालुक्य नृपती तैलप (द्वितीय); (५) गोपाल–धोरराजाशी संबद्ध व्यक्ती; (६) उत्तम–अग्निवंशीय नृपती; (७) कलिचोर (प्रथम)–अग्निवंशीय नृपती, उत्तमाचा पुत्र; (८) अर्गदेव—अग्निवंशीय नृपती, कलिचोर (प्रथम) चा पुत्र; (९) कलिचोर (द्वितीय)—अग्निवंशीय नृपती रैभेय निगलंकमल्ल; (१०) सिद्धगि—शिवलिंग स्थापन करणारा वैश्य; (११) सोमेश्वर—चालुक्य नृपती; (१२) लक्ष्मण—लेख लिहिणारा; (१३) चंद्रराशी—देवळातील आचार्य.

ग्रामनामे.—(१) कल्याण—म्हैसूर प्रांतातील बिदर जिल्ह्यातील हल्लीचे कल्याण; (२) येर्ग—होट्टलपासून ३ मैलांवर असलेल्या येर्गी खेड्याचा परिसर.

७२१. होन्नूर शिलालेख

जिल्हा—**कोल्हापूर** तालुका—**कागल**

प्राप्तिस्थळ.—हा लेख होन्नूर येथील जैन मंदिरातील मूर्तीच्या अभिषेक स्तंभावर कोरलेला आहे.

संदर्भ.—फ्लीट, इं. अँ., १८८३, खंड १२, पृ. १०२.

भाषा व लिपी.—कानडी भाषा व लिपी.

राजवंश व राजा.—महामंडलेश्वर वल्लाळ आणि कोल्हापूरचा शिलाहार नृपती गंडरादित्य.

वर्ष व तिथी.—उल्लेख नाही. अंदाजे शके १०३०, इ. स. ११०८–११०९.

सारांश.—विजयी महामंडलेश्वर वल्लाळ व गंडरादित्य यांनी २०० कम्म व ६ हस्त असलेले घर पुण्यकर्म करणाऱ्या जैन विहाराला भोजन पुरवण्यासाठी दान दिले. हा विहार बम्मगावुंड याने बांधला होता.

व्यक्तिनामे.—(१) वल्लाळदेव—दान देणारा शिलाहार महामंडलेश्वर; (२) गंडरादित्य—दान देणारा कोल्हापूरचा शिलाहार महामंडलेश्वर; (३) बम्मगावुंड—जैन विहार बांधणारा, पुन्नागवृक्षमूलगणाचा व श्रीमूलसंघाचा सदस्य.

आभिलेखांची अकारविल्हे सूची

(टीप: सूचीतील क्रमांक पृष्ठांचे नसून अभिलेखांचे आहेत)

व्यक्तिनामांची अकारविल्हे सूची

ग्रामनामांची अकारविल्हे सूची

गोत्रनामांची अकारविल्हे सूची

शामुको.—एच १५-१०२९-७.८४

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.